# ध. रा. गाडगीळ लेखसंग्रह

## खंड २

खले अर्थशास्त्र संस्था

# ध. रा. गाडगीळ लेखसंग्रह

खंड २

संपादक
सुलभा ब्रह्मे

गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे

गोखले अर्थशास्त्र संस्था, मराठी प्रकाशन १६ वे

© १९७४, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे ४

या ग्रंथाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाकडून
अनुदान मिळाले आहे

किंमत पंचवीस रुपये

प्रकाशक
वि. म. दांडेकर
गोखले अर्थशास्त्र संस्था
पुणे ४

मुद्रक
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

# प्रास्ताविक

प्रा. ध. रा. गाडगीळ यांनी आपल्या सुमारे पन्नास वर्षांच्या अभ्यासपूर्ण सार्वजनिक जीवनात अनेक ग्रंथांखेरीज विविध आर्थिक, सामाजिक व राजकीय विषयांवर विपुल लिखाण केले. हे संकीर्ण लिखाण एकत्र आणून समग्रपणे यथावकाश प्रकाशित करण्याची संस्थेची योजना आहे. प्रा. गाडगीळांनी इंग्रजीबरोबर मराठीतही पुष्कळ लिखाण केले. किंबहुना त्यांचा पहिला प्रकाशित लेख मराठीतच आहे. इंग्लंडातील हिंदी खलाशांची स्थिती हा लेख त्यांनी १९२३ साली इंग्लंडात विद्यार्थी म्हणून असतानाच लिहिला. तेथपासून शेवटपर्यंत ते मराठीतून सातत्याने लिहीत होते. त्यावरून त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम आणि आर्थिक-सामाजिक प्रश्नांची चर्चा जनसामान्यापर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा आग्रह स्पष्ट होतो.

मराठीतील त्यांचे समग्र लिखाण आम्ही दोन खंडांत प्रकाशित करीत आहोत. त्यांपैकी पहिला खंड ऑगस्ट १९७३ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. भारतीय व जागतिक प्रश्नांवरील लेख या खंडात समाविष्ट आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भातील लेख प्रस्तुतच्या दुसऱ्या खंडात संकलित केलेले आहेत. या दोन्ही खंडांचे संपादन सुलभा ब्रह्मे यांनी केले आहे. संपादकीय क्लिष्ट कामाखेरीज एक विस्तृत संपादकीय प्रस्तावनाही त्यांनी प्रथम खंडास दिली आहे.

प्रस्तुत संग्रहातील लेख वृत्तपत्रे, नियतकालिके, लेखसंग्रह यांमध्ये अगर पुस्तिकारूपाने प्रसिद्ध झालेले आहेत. हे लेख पुनर्मुद्रणासाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल संबंधित प्रकाशकांची संस्था आभारी आहे.

वाढत्या महागाईमुळे प्रकाशनाचे काम दिवसेदिवस अवघड होत आहे. ग्रंथांच्या किंमती वाचक-वर्गाच्या आटोक्याबाहेर गेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रस्तुत ग्रंथास अनुदान देऊन प्रकाशनाचा पंचवीस टक्के खर्च सोसल्याने किंमत काहीशी सुसह्य ठेवणे शक्य झाले आहे. या अनुदानाबद्दल संस्था मंडळाची आभारी आहे.

वि. म. दांडेकर
संचालक

१५ ऑगस्ट १९७४
गोखले अर्थशास्त्र संस्था,
पुणे ४.

# अनुक्रमणिका

प्रास्ताविक

विभाग १ : संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न

१ वृहन्महाराष्ट्र व खानेसुमारीचे काही आकडे ३
२ 'संयुक्त महाराष्ट्र' हा एक प्रांत का असावा ? २०
३ संयुक्त महाराष्ट्र २४
४ मुंबई शहराचे भवितव्य २९
५ महाविदर्भाची कल्पनाच कृत्रिम ४९

विभाग २ : महाराष्ट्राचे आर्थिक प्रश्न

१ मुंबई इलाख्यातील जमाबंदीची पद्धती ५५
२ मुंबई सरकारचे औद्योगिक खाते ५९
३ जमीनमहसूल व तद्विषयक प्रश्न ६२
४ महाराष्ट्रातील शेतकी समितीची कामगिरी ६८
५ मुंबई प्रांतातील धान्यपरिस्थिती कशी सुधारेल ? ७२
६ अन्नधान्यांतील भाववाढ ७९
७ महाराष्ट्राचा ग्रामीण विकास ८९
८ पुण्यातील घरे आणि गलिच्छ वस्त्या ९४
९ पुण्यातील पानशेत प्रलय व पुनर्वसनाच्या समस्या १०१
१० जमिनीच्या कमाल धारणेचे विधेयक १०७
११ कृष्णा–गोदावरी पाणीवाटप १११
१२ अन्नधान्य पुरवठ्याची गंभीर परिस्थिती ११७
१३ महाराष्ट्र राज्य एकाधिकार ज्वारी खरेदी योजना १२२
१४ शेतीसाठी पाणीपुरवठ्याच्या नियमनातील समस्या १२६

## विभाग ३ : आर्थिक नियोजन


| | | |
|---|---|---|
| १ | प्रादेशिक समाज व प्रादेशिक अर्थव्यवस्था | १३१ |
| २ | संयुक्त महाराष्ट्र, लोकशाही समाजवाद आणि आर्थिक नियोजन | १४८ |
| ३ | वर्धा जिल्ह्याची विकास योजना : उद्देश, स्वरूप व कार्यपद्धती | १५६ |
| ४ | जिल्हा परिषदांच्या कारभारातील संभाव्य धोके | १६२ |
| ५ | लोकशाही विकेंद्रीकरण व आर्थिक नियोजन | १६६ |
| ६ | कोकणचा आर्थिक विकास | १८२ |


## विभाग ४ : सहकारी अर्थव्यवहार


| | | |
|---|---|---|
| १ | सहकारी चळवळीचे समालोचन | १९१ |
| २ | लोणी येथील सहकारी साखर कारखाना | २०३ |
| ३ | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक : अध्यक्षीय भाषणे | २०६ |
| ४ | ज्वारी खरेदी योजनेतील सहकारी संस्थांची कामगिरी | २२१ |
| ५ | 'सहकारी अर्थव्यवस्था' : प्रस्तावना | २२६ |
| ६ | महाराष्ट्रातील सहकारी अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप | २२९ |


## विभाग ५ : सामाजिक व शैक्षणिक प्रश्न


| | | |
|---|---|---|
| १ | पुणे युनिव्हर्सिटी कशी असावी ? | २३७ |
| २ | 'बहुजन समाजातील कर्मवीर' : प्रस्तावना | २४६ |
| ३ | ब्राह्मण जातीतील व्यक्तींचे पुढील धोरण | २४९ |
| ४ | 'गांवगाडा' : प्रस्तावना | २५५ |
| ५ | भारत व महाराष्ट्र | २६० |
| ६ | महाराष्ट्रातील विद्यापीठ शिक्षणाची पुनर्घटना | २९२ |
| ७ | 'शिंदे लेखसंग्रह' : पुरस्कार | २९४ |
| | सूची | २९९ |

# विभाग : १

## संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न

# १ . . बृहन्महाराष्ट्र व खानेसुमारीचे काही आकडे

हिंदुस्थानातील पोट-राष्ट्रांना महत्त्व देण्याची प्रवृत्ती अलीकडे बळावलेली असून जे भाषासमूह वेगवेगळ्या राजकीय प्रांतांत विभागले गेले आहेत त्यांच्या एकीकरणाची चळवळ जोराने सुरू झाली आहे. कानडी बोलणारांचा सर्व प्रदेश एका प्रांतात यावा म्हणून खटपट सुरू आहे; उडिया भाषासमूहाचा मद्रास इलाख्यात असलेला भाग ओरिसा प्रांताकडे देता येईल किंवा नाही याचा एक कमिटी विचार करीत आहे. आपल्याकडेही महाराष्ट्रीयत्वाच्या भावनेवर अलीकडील वाङ्मयांत विशेष जोर दिला जातो. "मराठा तितका मेळवावा" हे वचन व "बृहन्महाराष्ट्रात" ही संज्ञा अलीकडे फार प्रचारात आली आहे. तेव्हा सर्व मराठे किती, त्यांचा प्रदेश कोणता, बृहन्महाराष्ट्राची आर्थिक व सामाजिक स्थिती कशी आहे या मुद्द्याचा विचार करणे हल्ली अत्यावश्यक आहे. बृहन्महाराष्ट्र या शब्दाचे दोन अर्थ करिता येतात. मराठी बोलणारांचा समूह—मग ते कोठेही वसाहत करून असोत, हा पहिला व मराठी बोलणारे ज्या प्रांतात बहुसंख्याक आहेत तो प्रदेश, हा दुसरा. या दुसऱ्या अर्थी बृहन्महाराष्ट्राबद्दलची थोडीबहुत माहिती खानेसुमारीचे अहवालावरून गोळा करण्याचा आम्ही या लेखात प्रयत्न केला आहे.

## खानेसुमारीचे महत्त्व

दशवार्षिक खानेसुमारी घेण्याची पद्धती हिंदुस्थानात सन १८७२ पासून सुरू झाली. १८७२ नंतर ९ वर्षांनी म्हणजे १८८१ साली दुसरी खानेसुमारी घेण्यात आली तेव्हा व तेव्हापासून दर दहा वर्षांनी खानेसुमारी घेत असतात. कोणत्याही देशाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीविषयी कल्पना येण्यास खानेसुमारीच्या आकड्यांचा फार उपयोग होतो. खानेसुमारीच्या वेळी वय, जात, धर्म, उद्योगधंदा, वगैरे सर्वसाधारण माहिती गोळा करण्यात येते. आधिभौतिक शास्त्राप्रमाणे प्रयोग करून बिनचूक माहिती जमविणे समाजशास्त्रात शक्य नाही; तेव्हा सामाजिक स्थित्यंतराबद्दल खात्रीलायक अनुमाने करण्यात खानेसुमारीचे वेळेस व वेळोवेळी सरकारने जमवून प्रसिद्ध केलेल्या इतर माहितीवरच समाजशास्त्रज्ञांस विशेष अवलंबून रहावे लागते. बहुतेक सर्व देशांत स्वतंत्र संशोधकही समाजाच्या निरनिराळ्या अंगांचे मोजमाप करण्याचे व माहिती गोळा करण्याचे काम करीत असतात. आपल्याकडे अशा प्रकारचे प्रयत्न अजून फारसे झाले नाहीत. इतकेच नव्हे, तर सामाजिक व आर्थिक बाबतीत मते प्रतिपादन करीत असता ती आकड्यांनी तोलण्याची सवयसुद्धा यावी तितकी प्रचारात अजून आली नाही. शिवाय आपल्याकडे सामाजिक वा आर्थिक प्रश्नांचा विचार प्रायः अखिल हिंदुस्थानविषयक प्रश्न या दृष्टीने करण्यात येतो. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या

पोट-राष्ट्रांत सर्वच गोष्टींत बरेचसे साम्य आहे हे खरे. पण प्रांताप्रांतांतले फरकही महत्त्वाचे आहेत हे विसरून चालावयाचे नाही. काही प्रांतांत पडद्याची चाल आहे, तर इतर प्रांतांत ती नाही. काही प्रांतांत हिंदु-मुसलमानांचा लढा महत्त्वाचा, तर इतर प्रांतांत ब्राह्मण-ब्राह्मणेतरांचा. आर्थिक बाबीतसुद्धा हेच दिसून येईल. एकंदर देश कृषिप्रधान असला तरी तो निरनिराळ्या प्रमाणात, जमिनीचा सुपीकपणा, दुष्काळापासून निर्भयता, उद्योगधंद्यांच्या वाढीची साधने या सर्व बाबींत सारखेपणा कोठेच दृष्टीस पडत नाही. शिवाय निरनिराळ्या भाषासमूहांच्या संस्कृतीत थोडेफार फरक आहेतच. म्हणून बऱ्याच प्रश्नांचा तपशीलवार विचार करणे असल्यास तो एकंदर हिंदुस्थानाबद्दल एकदम न करिता लहान समजातीय घटकांबद्दल केला पाहिजे. असे करणे इष्ट आहे खरे; पण प्रस्तुतच्या तऱ्हेवाईक प्रांतविभागणीमुळे हे कठीण झाले आहे. कारण सर्व सरकारी आकडे प्रांतवारच प्रसिद्ध होतात. अर्थात ही प्रांतविभागणी अभ्यासकांच्याच आड येते असे नाही; व्यावहारिक दृष्ट्यासुद्धा मुंबई इलाखा चार भाषासमूहांची खिचडी असल्यामुळे त्याची राजकीय, शैक्षणिक वगैरे सर्वच बाजूंची प्रगती कशी पदोपदी अडून रहात आहे हे अलीकडे अगदी स्पष्ट झाले आहे. एकाच भाषासमूहाने व्यापलेला असा एकही प्रांत हिंदुस्थानात आढळत नाही. यामुळे हल्ली प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या आकड्यांवरून निश्चित अनुमाने काढणे कठीण जाते. निरनिराळ्या भाषासमूहांबद्दलची माहिती ते ज्या ज्या प्रांतांतून वाटले गेले आहेत त्यांच्या तक्त्यांतून घेऊन एकत्रित करावी लागते. मुंबई इलाखा, मध्यप्रांत व निझामचे राज्य या तीन प्रांतांत बृहन्महाराष्ट्र विभागला गेला असल्यामुळे खाली दिलेले आकडे या तीन प्रांतांच्या तक्त्यांवरून तयार करावे लागले आहेत. खानेसुमारीचे आकड्यांवरून फक्त ठळक ठळक अशीच माहिती मिळते. आपल्या सामाजिक स्थितीची नीटशी कल्पना येण्यास आणखी पुष्कळच माहिती तपशीलवार मिळविली पाहिजे हे लिहावयास नकोच.

## बृहन्महाराष्ट्राची सीमा

प्रथम बृहन्महाराष्ट्राची सीमा नक्की करणे आवश्य आहे. वर दर्शविल्याप्रमाणे "मराठी बोलणारे ज्या प्रांतात बहुसंख्याक आहेत तो प्रांत" अशी बृहन्महाराष्ट्राची आम्ही व्याख्या केली आहे. या व्याख्येनुसार ज्या जिल्ह्यांत मराठी बोलणाऱ्यांची संख्या दोन तृतीयांशाहून अधिक आहे ते सर्व जिल्हे बृहन्महाराष्ट्रात जमेस धरावे असे आम्ही ठरविले. या नियमानुसार बृहन्महाराष्ट्रात कोणते जिल्हे व संस्थाने समाविष्ट होतात व त्यांतील मराठी बोलणाऱ्यांचे जिल्हानिहाय दरहजारी प्रमाण किती हे पुढील तक्त्यावरून दिसून येईल.

### मराठी भाषिकांचे प्रमाण

| जिल्हा अथवा संस्थान | मराठी बोलणाऱ्यांचे दर हजार माणशी प्रमाण |
|---|---|
| १. कोकण : कुलाबा | ९७७ |
| रत्नागिरी | ९८२ |
| ठाणे | ८८७ |
| सावंतवाडी | ९७५ |
| २. महाराष्ट्र : अहमदनगर | ८९० |
| पूर्व खानदेश | ७८० |

| १ | २ |
|---|---|
| नाशिक | ८५९ |
| पुणे | ८९८ |
| सातारा | ९४९ |
| सोलापूर | ७८२ |
| कोल्हापूर | ८०३ |
| भोर | ९८४ |
| ३. मोगलाई : औरंगाबाद | ८२३ |
| बीड | ८८८ |
| नांदेड | ६४७ |
| परभणी | ८३९ |
| उस्मानाबाद | ८४९ |
| ४. नागपूर-वऱ्हाड : वर्धा | ७९१ |
| नागपूर | ७७४ |
| चांदा | ६९२ |
| भंडारा | ७१३ |
| उमरावती | ७८१ |
| अकोला | ८२९ |
| बुलढाणा | ८५१ |
| यवतमाळ | ६८३ |

(या तक्त्यात कोकणीचा समावेश मराठीत करण्यात आला आहे.)

बृहन्महाराष्ट्राचे वर दर्शविल्याप्रमाणे आम्ही चार भाग पाडले आहेत. हे विभाग राजकीय दृष्ट्या निराळे आहेतच, पण शिवाय सामाजिक व आर्थिक दृष्ट्याही हे एकमेकांपासून भिन्न आहेत. म्हणून या चार विभागांनुसारच आकडे देऊन त्यांचा निरनिराळा विचार पुढे केला आहे.

## बृहन्महाराष्ट्रामधून वगळलेले विभाग

वरील तक्त्यात नांदेड जिल्ह्यातील मराठी बोलणाऱ्यांची लोकसंख्या दोन तृतीयांशाहून थोडी कमी असूनही त्याचा समावेश केला आहे. उलटपक्षी मराठी प्रदेशांतील काही भाग वगळला आहे. मुंबई शहरात मराठी बोलणाऱ्यांचे प्रमाण दर हजारी ५४१ पडते. पण इतर भाषीयांचीही तेथे बरीच वस्ती असल्यामुळे सर्व मुंबई शहर बृहन्महाराष्ट्रातच जमेस धरले पाहिजे असे म्हणता येत नाही. मुंबईच्या उपनगरांत तर मराठ्यांची संख्या पुष्कळच म्हणजे हजारांत ६८३ आहे. पण या उपनगरांच्या आर्थिक व सामाजिक राहणीचा मुंबईशी फार निकट संबंध आहे. मुंबई व तिची उपनगरे हा घटक बृहन्महाराष्ट्राच्या इतर भागांहून अगदी भिन्न आहे म्हणून मुंबईबरोबरच ही उपनगरेही वगळली आहेत. मुंबई इलाख्यातील संस्थानांमध्येही मराठी बोलणाऱ्यांची संख्या दोन तृतीयांशाहून अधिक आहे. हे सदर गाळण्याचे मुख्य कारण म्हणजे ही संस्थाने इलाखाभर पसरलेली आहेत हेच होय. हा विभाग समजातीय नाही, तर समसीमही नाही. म्हणून त्याचा या आकड्यांत विचार केलेला नाही. वरील अपवाद सोडून दिले असता जो जो जिल्हा अथवा संस्थान प्रामुख्याने मराठी आहे असे दिसले

त्याचे आकडे आम्ही विचारात घेतले आहेत. खानेसुमारीचे तक्त्यातील आकडे जिल्हावार दिलेले असल्यामुळेच बृहन्महाराष्ट्राची सीमा निश्चितपणे ठरविता आली नाही; कारण सरहद्दीवरील जिल्ह्यांची लोकसंख्या नेहमी मिश्र स्वरूपाची असते. उदाहरणार्थ, आम्ही जमेस धरलेल्या काही जिल्ह्यांत महाराष्ट्राबाहेरील भागांचाही क्वचित समावेश होतो. सोलापूर व कोल्हापूरमध्ये कर्नाटकाचा थोडा भाग आणि चांदा व नांदेडमध्ये तेलंगणातील काही तालुके येतात. उलटपक्षी सबंध जिल्हा मराठी बोलणाऱ्यांनी व्यापलेला नसल्यामुळे सरहद्दीवरील जिल्ह्यांत बरेच मराठी तालुके असूनही ते जिल्हे गाळणे भाग पडले. कोकणातील कानडा जिल्ह्यात मराठी (कोकणी धरून) बोलणाऱ्यांचे प्रमाण शेकडा ३८, मुंबई शहरात शेकडा ५१, पश्चिम खानदेशात शेकडा २७ व बेळगाव जिल्ह्यात शेकडा २५ आहे. मोगलाईत बेदर जिल्ह्यात शेकडा ३७, अदिलाबाद जिल्ह्यात शेकडा २२ व गुलबर्गा जिल्ह्यात शेकडा १५ लोक मराठी बोलतात. तसेच मध्यप्रांतातील बालाघाट, बेतूल, छिंदवाडा व नेमाड या जिल्ह्यांत मराठी बोलणाऱ्यांचे प्रमाण अनुक्रमे शेकडा २५, २३, १९ व १४ असे आहे. बस्तर संस्थानात जवळजवळ एक तृतीयांश लोकसंख्येची मातृभाषा हळबी नावाची एक मराठीची पोटभाषा आहे. ही लोकसंख्या बृहन्महाराष्ट्रातीलच आहे तरी तिच्यासंबंधीचे आकडे निराळे मिळणे शक्य नसल्यामुळे त्यांचा समावेश पुढे दिलेल्या तक्त्यात करता आला नाही.

वरील तक्त्यात दिलेल्या सर्व प्रांतांची एकंदर लोकसंख्या जवळजवळ एक कोट ऐंशी लक्ष आहे. यांपैकी जवळजवळ एक कोट पन्नास लक्ष लोकांची मातृभाषा मराठी आहे. म्हणजे बृहन्महाराष्ट्रात मराठी बोलणाऱ्यांचे प्रमाण अदमासे शेकडा ८० आहे. एकंदर हिंदुस्थानात मराठी बोलणाऱ्यांची संख्या सुमारे १ कोट ८८ लक्ष आहे. म्हणजे आम्ही घेतलेल्या आकड्यांतून ३८ लक्ष मराठी बोलणारे गळतात. याचे कारण वर दर्शविल्याप्रमाणे मुंबई व तिची उपनगरे, महाराष्ट्रातील काही किरकोळ संस्थाने, आपल्या प्रांताच्या सरहद्दीवरील काही भाग हे जमेस धरता आले नाहीत, हेच मुख्यत्वे करून होय. शिवाय जे मराठी बोलणारे इतर प्रांतांत खानेसुमारीचे वेळी होते त्यांचा विचार करणे अर्थातच शक्य नाही.

## लोकसंख्येचे दाढर्य

**क्षेत्रफळ व लोकसंख्या**

| प्रदेश | क्षेत्रफळ (चौरस मैल) | लोकसंख्या | लोकसंख्येचे दाढर्य (दर चौरस मैलामागे माणसे) |
|---|---|---|---|
| बृहन्महाराष्ट्र | १,०६,२५७ | १,८०,०८,५११ | १७० |
| कोकण | १०,५१८ | २६,८३,५४२ | २५५ |
| महाराष्ट्र | ३६,००३ | ६३,८१,४१३ | १७७ |
| नागपूर, वऱ्हाड | ३६,९७० | ५७,०९,९१० | १५४ |
| मोगलाई | २२,७६६ | ३२,३३,६४६ | १४२ |
| हिंदुस्थान | १८,०६,३३२ | ३१,८९,४२,४८० | १७७ |

आपल्या बृहन्महाराष्ट्राचे क्षेत्रफळ सबंध हिंदुस्थानच्या क्षेत्रफळाचा सुमारे १७ वा हिस्सा आहे व या प्रांतात हिंदुस्थानातील जवळजवळ एक अठरांश लोक राहतात. हिंदुस्थानचे व बृहन्महाराष्ट्राचे लोकसंख्येचे दाढर्य म्हणजे दर चौरस मैलामागे राहणाऱ्या माणसांची संख्या जवळजवळ एकच आहे. पण हिंदुस्थानातील काही भागांत उदाहरणार्थ, पूर्वबंगाल, औध वगैरेत हे प्रमाण ६०० वर आहे, तर राजपुतान्यात ते ४० हून कमी आहे. लोकसंख्येचे दाढर्य बऱ्याच गोष्टींवर अवलंबून असते. औद्योगिक

राष्ट्रांतील लोकवस्ती अर्थात शेतकी राष्ट्रांपेक्षा अधिक दाट असते. पावसाचे मान, जमिनीचा सुपीकपणा, रोगराईचा प्रादुर्भाव वगैरे कारणांमुळे खुद्द शेतकी देशांतही हे प्रमाण वेगवेगळ्या भागांत वेगवेगळे असते. कोकणात दुष्काळाचे भय नसल्यामुळे बृहन्महाराष्ट्रातील इतर भागांपेक्षा तेथील लोकवस्ती जास्त दाट आहे. लोकसंख्येचे दार्ढ्य केवळ नैसर्गिक कारणांवरच अवलंबून असते असे नाही. ज्या प्रदेशात माणसांची वसाहत जास्त जुनी, तेथील लोकवस्ती अधिक दाट असण्याचा संभव असतो. कानडा, न्यूझीलंड वगैरे प्रदेशांतील वस्ती फार विरळ आहे. कोकणपट्टी वगळली असता बृहन्महाराष्ट्रातील कोणत्याच विभागातील वस्ती दाट नाही; आणि कोकणपट्टीतसुद्धा दार्ढ्याचे प्रमाण इतर सर्व प्रांतांतील सुपीक प्रदेशांपेक्षा बरेच कमी आहे. हिंदुस्थानातील मोठमोठ्या नद्यांच्या किनाऱ्यालगतच्या व मुखाजवळील प्रदेशांतील लोकवस्ती फार दाट आहे. बृहन्महाराष्ट्रात बऱ्याच मोठ्या पूर्ववाहिनी नद्या उगम पावतात, पण त्यांची खोरी बृहन्महाराष्ट्राबाहेर विस्तृत बनतात. सह्याद्रीत उगम पावून अरबी समुद्रास मिळणाऱ्या कोकणातील सर्व नद्या फारच लहान आहेत. आपल्या प्रांतातील बहुतेक सर्व जमीन साधारणतः कमी कसाची व देशावर दुष्काळाची भीती फार असल्यामुळे या प्रदेशात क्षेत्रफळाच्या मानाने मोठ्या लोकसंख्येचे पोषण होणे शक्य नाही. हिंदुस्थानातील लोकसंख्येचे प्रमाण बहुतांशी जमिनीच्या उत्पादनावरच अवलंबून आहे. जमिनीचा सुपीकपणा, पावसाचा नियमितपणा व मुबलकपणा यांवर लोकसंख्येचे प्रमाण बसलेले असते. या विषयी विचार करताना मुंबई इलाख्याच्या १९२१ च्या खानेसुमारीच्या परिशिष्टामध्ये दिलेले आकडे फार महत्त्वाचे आहेत. या परिशिष्टात जिल्ह्यातील कृषियोग्य जमीन व लोकसंख्या यांमधील दार्ढ्याचे प्रमाण दाखविले आहे. ज्या जमिनीचा उत्पादनाकडे उपयोगच करता येत नाही ती वगळली म्हणजे निरनिराळ्या जिल्ह्यांतील कृषियोग्य जमिनीची उत्पादनशक्ती नीट कळून येते. या परिशिष्टावरून असे दिसून येते की, कोकण विभागात (खानेसुमारीच्या रिपोर्टात केलेला कोकण विभाग) हे दार्ढ्य ५१२ पडते व डेक्कनमध्ये २२६ पडते. जिल्ह्याजिल्ह्यांतील फरक तर याहूनही मोठे आहेत. रत्नागिरीतील दार्ढ्य ६९४ आहे तर अहमदनगर जिल्ह्यात ते फक्त १४५ आहे.

**लोकसंख्येची वाढ**

| प्रदेश | १८७२ | १८८१ | १८९१ |
|---|---|---|---|
| बृहन्महाराष्ट्र | — | १,६२,९७,२६८ | १,८४,५४,१२२ |
| कोकण | ३३,३०,४१६ | २३,७८,५६१ | २६,१९,१३९ |
| महाराष्ट्र | ५८,५१,६०० | ५८,५५,०९७ | ६७,६६,१४० |
| नागपूर-वऱ्हाड | ४२,२५,३३९ | ४८,५२,३९५ | ५२,४०,२२१ |
| मोगलाई | — | ३२,११,४०५ | ३६,२८,६३२ |

| | १९०१ | १९११ | १९२१ |
|---|---|---|---|
| बृहन्महाराष्ट्र | १,७२,१८,६८० | १,८८,८१,७६० | १,८०,०८,५११ |
| कोकण | २७,०९,४३५ | २७,९६,०२३ | २६,८३,५४२ |
| महाराष्ट्र | ६४,२२,०७१ | ६७,८४,३८३ | ६३,८१,४१३ |
| नागपूर–वऱ्हाड | ५०,१२,६६२ | ५६,९०,२४१ | ५७,०९,९१० |
| मोगलाई | २९,७४,५११ | ३६,११,११३ | ३२,३३,६४६ |

## लोकसंख्येची वाढ

वरील तक्त्यात बृहन्महाराष्ट्राची व त्यातील विभागांची प्रत्येक खानेसुमारीच्या वेळची लोकसंख्या दिली आहे. (निजामच्या राज्याची खानेसुमारी १८७२ साली घेण्यात आली नव्हती, त्यामुळे त्या विभागाचे आकडे १८८१ सालापासून पुढे देण्यात आले आहेत.) १८८१ ते १९२१ या चाळीस वर्षांत बृहन्महाराष्ट्राच्या लोकसंख्येची वाढ जवळ जवळ १७ लक्ष म्हणजे शेकडा ११ टक्के झाली आहे असे दिसून येईल. पण १८९१ चे आकडे ध्यानात घेता त्या सालापासून पुढील ३० वर्षांत एकंदर वाढ न होता उलट लोकसंख्या सुमारे साडेचार लाखांनी कमीच झाली आहे. एका दशकात लोकसंख्या वाढते तर दुसऱ्या दशकात ती कमी होते, हा क्रम आळीपाळीने चालल्याचे या तक्त्यावरून स्पष्ट दिसते. हा क्रम हिंदुस्थानात सर्वत्र दिसून येतो, पण हिंदुस्थानातील काही प्रांतांत—उदाहरणार्थ ब्रम्हदेशात—लोकसंख्या सारखी वाढत असल्यामुळे गेल्या ५० वर्षांतील कोणत्याच दशकात हिंदुस्थानच्या लोकसंख्येची पिछेहाट झालेली दिसत नाही. पण एका दशकात झपाट्याने वाढ, तर दुसऱ्या दशकात वाढीचा वेग अगदी खुंटलेला, असे मात्र स्पष्ट दिसून येते. पहिल्या खानेसुमारी (१८७२) नंतरच्या दशकात एक मोठा दुष्काळ पडल्यामुळे त्या दशकातील एकंदर वाढ फार कमी प्रमाणात झाली. १८८१ पासून १८९१ पर्यंतची दहा वर्षे उत्तम गेल्यामुळे लोकसंख्येची वाढ पुष्कळच झाली. पुढच्या दशकात लागोपाठ दोन दुष्काळ पडल्यामुळे ही वाढ पुन्हा खुंटली. १९०१ पासून १९११ पर्यंत प्लेगचा फैलाव झाला असताही लोकसंख्येची वाढ बऱ्याच मोठ्या प्रमाणात झाली. पुन्हा १९१८ च्या इन्फ्ल्यूएंझाच्या साथीतील मृत्युसंख्येमुळे १९२१ सालच्या खानेसुमारीत एकंदर वाढ फारच कमी झालेली आढळून आली. हिंदुस्थानच्या लोकसंख्येवर परिणाम करणारी कारणे बृहन्महाराष्ट्रालाही लागू आहेत. फरक एवढाच की, दुष्काळ व रोगराई यांपासून हिंदुस्थानातील काही प्रांतांचा बचाव झाला तर दर दुष्काळात व दर साथीत महाराष्ट्रातील बरीच माणसे मृत्युमुखी पडली. या प्रश्नाचा आता थोडा विभागवार विस्तृत विचार करू.

हिंदुस्थानातील लोकसंख्येचे वाढीसंबंधी विशेष लक्षात घेण्याजोगी एक गोष्ट म्हणजे आपल्या देशातील जन्म व मृत्युसंख्येचे प्रमाण फार मोठे आहे ही होय. हिंदुस्थानातील अर्भकांची मृत्युसंख्या फारच मोठी आहे. युरोपातील सर्व देशांत गेल्या पन्नाससाठ वर्षांत रोगराईच्या प्रतिबंधाकरिता बरेच उपाय योजले गेल्यामुळे मृत्युसंख्येचे प्रमाण बरेच कमी होत आहे, त्याबरोबरच जन्मसंख्येचे प्रमाणही कमी होत आहे. फ्रान्ससारख्या काही देशांत जन्मसंख्येचे प्रमाण फारच कमी झाल्यामुळे लोकसंख्येची वाढच खुंटली आहे. पण इतर देशांतील जन्मसंख्या कमीअधिक प्रमाणात वाढत आहे. हिंदुस्थानात मात्र या बाबीत सुधारणा घडून येत असल्याचे बिलकुल दिसत नाही. जन्म व मृत्युसंख्येचे प्रमाण फार मोठे असणे हे सर्वच दृष्ट्या अनिष्ट आहे. जन्मसंख्येचे प्रमाण व मृत्युसंख्येचे प्रमाण यांमधील फरक हा लोकसंख्येच्या वाढीचा द्योतक आहे. गेल्या पन्नास वर्षांतील हिंदुस्थानातील लोकसंख्येच्या इतिहासावरून असे म्हणता येईल की, आपली लोकसंख्या काही वर्षे सारखी वाढत जाते; व ती फार फुगली म्हणजे एखाद्या दुष्काळामुळे अथवा साथीमुळे तिला एकदम आळा बसतो. अशा दुष्काळानंतर अथवा साथीनंतर काही वर्षे वाढीचे प्रमाण प्रौढ वयातील माणसे कमी झाल्यामुळे थोडे खुंटते. पण पुन्हा थोड्याच अवधीत वाढीस पूर्ववत सुरुवात होते, ती दुसऱ्या दुष्काळ अथवा साथीपर्यंत. युरोपात देशाचे उत्पन्न व त्यातील लोकसंख्या यांतील प्रमाण बिघडून जनतेची अवनती होऊ नये, म्हणून बुद्धिपुरःसर प्रयत्न चालू असतात तर आपल्याकडे दुष्काळ व साथी यांसारखी "नैसर्गिक" कारणे हे काम करीत असतात.

कोकणात पावसाच्या नियमितपणामुळे दुष्काळाची भीती नाही. त्याअर्थी तेथील लोकसंख्येचा चढ-

उतार इतर विभागांपेक्षा बराच कमी आहे. १९११–१९२१ या दशकातच काय ती लोकसंख्या कमी झालेली आढळून येते. बाकी १८७२ पासून १९११ पर्यंत ती सारखी वाढतच आहे. बृहन्महाराष्ट्राच्या इतर सर्व विभागांप्रमाणे कोकणातही १८८१–९१ या दशकात बरीच झपाट्याने वाढ झाली. या दशकातील वाढीचे प्रमाण जवळ जवळ शेकडा १० आहे. १९११–२१ चे दरम्यान शेकडा ४ या प्रमाणात लोकसंख्या कमी झाली. इतर दशकांतील वाढीचे प्रमाण फार लहान आहे. वर दर्शविल्याप्रमाणे कोकणातील लोकसंख्येचे दार्ढ्य इतर विभागांपेक्षा बरेच जास्त आहे. परंतु येथील कृषियोग्य जमिनीच्या मानाने लोकसंख्या मोठी असल्यामुळे या प्रांतातील बऱ्याच लोकांस परप्रांतगमन करणे भाग पडते. काही लोक परप्रांतात कायमचे रहिवासी होऊन राहतात, तर बरेच मुंबईसारख्या ठिकाणी तात्पुरते मात्र जातात. परप्रांतगमनाचा जन्मसंख्येवर व लोकसंख्येच्या वाढीवर परिणाम होतो. परप्रांतात गेलेल्यांची मोजणी त्यांच्या खानेसुमारीच्या वेळच्या राहण्याच्या ठिकाणी झाल्यामुळे कोकणी लोकसंख्येची सर्व वाढ कोकणातच मोजली जात नाही. पण याहूनही विशेष महत्त्वाचा मुद्दा हा की, जे परप्रांतांत कायमचे जातात ते व त्यांची संतती यांची कोकणाशी कायमची फारकत होते. तात्पुरत्या परप्रांतगमनामुळेही जनसंख्येवर परिणाम होतो. कोकणातील जन्मसंख्येचे प्रमाण महाराष्ट्रापेक्षा पुष्कळच कमी आहे ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. याचे एक कारण प्रौढ वयाची माणसे उदरनिर्वाहाकरिता मुंबईस व इतर ठिकाणी जातात आणि त्यामुळेच लहान मुले व म्हातारी माणसे यांचे प्रमाणच कोकणातील लोकसंख्येत विशेष आहे. शिवाय कोकणातील लोकसंख्येचे प्रजोत्पादनसामर्थ्यही महाराष्ट्रापेक्षा कमी असण्याचा संभव आहे.

कोकणात दुष्काळाचे अभावामुळे व परप्रांतगमनामुळे वाढ अथवा पिछेहाट ही दोन्ही माफक प्रमाणात होत आली तर महाराष्ट्रात व मोगलाईत याच्या अगदी उलट प्रकार दृष्टीस पडतो. कोकणातील लोकसंख्या जवळजवळ स्थिर आहे, तर इतर विभागांत दर दशकात फार फरक होत आहेत. महाराष्ट्रातील लोकसंख्या १८८१–९१ या दशकात ९ लाख (जवळ जवळ शेकडा १६) वाढली, तर १९११–२१ मध्ये ४ लाख (जवळजवळ शेकडा ६) कमी झाली. १८७२ ते १८८१ या दशकात महाराष्ट्राच्या काही भागांत दुष्काळ बराच तीव्र भासल्यामुळे एकंदर विभागातील लोकसंख्या स्थिर राहिली. १८९१ ते १९०१ चे दरम्यान दोन मोठे दुष्काळ पडल्यामुळे लोकसंख्या अडीच लाखांनी कमी झाली. यापुढील दहा वर्षांत दुष्काळ नव्हते, पण प्लेगमुळे वाढीचे प्रमाण कमी झाले. मोगलाईतील फरक महाराष्ट्रापेक्षाही मोठ्या प्रमाणावर घडून आले. १८७२ ते १८८१ चे दरम्यान जो मोठा दुष्काळ पडला त्याने या प्रांतात फारच कहर उडविला. १८८१ ते १८९१ या दशकात चार लाखांची (शेकडा १२) वाढ झाली. पुढील दहा वर्षांत साडेसहा लाखानी (शेकडा १८) लोकसंख्या कमी झाली. १९०१ ते १९११ या दशकात प्लेगचा प्रसार या प्रांतात इतर विभागांइतका नसल्यामुळे ती पुन्हा साडेसहा लाखांनी (शेकडा २०) वाढली व पुन्हा इन्फ्लूएंझाच्या साथीमुळे ती चार लाखांनी (शेकडा १२) कमी झाली. नागपूर-वऱ्हाड या विभागातील लोकसंख्येची वाढ जास्त नियमित दिसते. तेथील एकंदर वाढीचे प्रमाण शेकडा १४ ते १५ दिसून येते. फक्त १८९१ व १९०१ या दरम्यान दुष्काळामुळे लोकसंख्या चार लाखांनी कमी झाली व गेल्या दशकातील साथीस सर्व वाढ बळी पडून लोकसंख्या पूर्वीइतकीच राहिली.

## लोकसंख्येच्या भावी वाढीसंबंधी अंदाज

येथवर निरनिराळ्या विभागांचा विचार झाला. आता या आकड्यांवरून बृहन्महाराष्ट्रातील लोकसंख्येच्या वाढीबद्दल भविष्य काय करता येईल, याबद्दल थोडा विचार करू. युरोपीय देशांत

लोकसंख्या वाढत आहे अथवा उतरती आहे याबद्दल अनुमान करण्याकरिता सेंटबर्गच्या कोष्टकांचा उपयोग करितात. हे कोष्टक निरनिराळ्या वयोमर्यादेत खानेसुमारीच्या वेळेस असलेल्या लोकसंख्येवर बसविले आहे. आपल्या लोकसंख्येस हे कोष्टक लावल्यास कदाचित कोकण वगळून बाकी सर्व विभागांतील लोकसंख्या वाढतीच आहे असे दिसून येईल. पण वर दर्शविल्याप्रमाणे आपल्या लोकसंख्येच्या वाढीच्या परिस्थितीत व युरोपीय परिस्थितीत इतका फरक आहे की, सेंटबर्गच्या कोष्टकांचा आपणास फारसा उपयोग नाही. आपली लोकसंख्या साहजिकपणे नेहमी वाढतच असते; मधून मधून नैसर्गिक आपत्ती कोसळल्यामुळे उतरते एवढेच. आजपर्यंत या आपत्ती साधारणतः २० वर्षांनी आल्या आहेत; पण यावरून यापुढेही त्या अशाच येतील असे अनुमान करणे योग्य होणार नाही. पण या प्रश्नाचा दुसऱ्या दृष्टीने विचार करिता येण्यासारखा आहे. लोकसंख्येची वाढ प्रांताच्या उत्पादनशक्तीवर अवलंबून असते आणि ही शक्ती वाढविण्यास वाव असल्यास लोकसंख्या वाढण्यास हरकत नाही असे म्हणता येईल. या प्रश्नाबद्दल खानेसुमारीच्या रिपोर्टात प्रत्यक्ष माहिती फारशी मिळत नाही. कोकण प्रांतात लोकसंख्येचे वाढीस फार वाव नाही, हे उघडच आहे. येथील लोकांस परप्रांतगमन करणे भाग पडत आहे व मुंबईच्या उद्योगधंद्यावरच बऱ्याच कोकणी लोकसंख्येचा उदरनिर्वाह होत आहे. महाराष्ट्राचा बराच भाग दुष्काळपीडित आहे. आणि गेल्या तीस वर्षांत तेथील लोकसंख्येस उतरती कळा लागली आहे. इन्फ्ल्यूएंझातील मृत्युसंख्येचासुद्धा या बाबीत उपयोग करिता येईल. कारण ही साथ जगभर पसरली होती तरी ज्या प्रांतांतील लोकसंख्या बुभुक्षिततेमुळे कमकुवत झालेली होती तेथेच या साथीतील मृत्युसंख्येचे प्रमाण विशेष पडले. महाराष्ट्रात हे प्रमाण शे. ६ ते ८ म्हणजे मुंबई इलाख्याच्या इतर कोणत्याही भागाहून जास्त पडले ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. मोगलाईतसुद्धा इन्फ्ल्यूएंझा फार तीव्र होता, पण साथीमुळे झालेल्या मृत्युसंख्येचे नक्की आकडे रिपोर्टात दिले नाहीत. बृहन्महाराष्ट्राच्या सर्व विभागांत नागपूर-वऱ्हाडचीच आर्थिक स्थिती त्यातल्या त्यात बरी आहे. तरी येथेसुद्धा १९११ ते २१ या दशकात लोकसंख्या वाढू शकली नाही. या प्रांतात यवतमाळ, चांदा व इतर काही जिल्ह्यांत शेतकीस योग्य असून अजून ज्याची लागवड केलेली नाही असा काही प्रदेश शिल्लक आहे. बाकी इतर सर्व विभागांतील कृषियोग्य जमीन पुरती व्यापली गेली आहे.

आपल्या प्रांताच्या सरहद्दीवर असलेल्या इतर भाषासमूहांच्या वाढीबद्दल जी तुलनात्मक माहिती खानेसुमारीच्या रिपोर्टात नमूद केली आहे तीही उद्बोधक आहे. १९११ चे मुंबई इलाख्याचे रिपोर्टात दक्षिण विभागातील जिल्ह्यांत कानडी अथवा मराठी बोलणाऱ्यांचे प्रमाण जास्त वाढते आहे काय हे अजमावण्याचा प्रयत्न केला गेला व या दोहोंचेही प्रमाण सारखेच आहे असे ठरविण्यात आले. मोगलाईचे तेलंगण व मराठवाडा असे दोन भाग करण्यात येतात. तेलंगण या भागातील लोकसंख्या मराठवाड्यापेक्षा अधिक झपाट्याने वाढत आहे.

तेलंगण हा प्रांत जास्त सुपीक असून तेथे पाण्याचा पुरवठा मुबलक आहे व अजून लागवड न झालेला भाग त्यात बराच आहे. मोगलाईत १८९१ साली दरहजारी ४३० तेलगू व ३०३ मराठी बोलणारे होते, तर १९२१ साली ४८२ तेलगू बोलणारे व सारे २६४ मराठी बोलणारे होते. मध्यप्रांतात सुद्धा सरहद्दीवरील जिल्ह्यांत मराठीची पिछेहाट होत असून हिंदी पुढे सरसावत आहे असे तेथील कमिशनरांचे मत आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता लोकसंख्येच्या मानाने मराठी बोलणाऱ्यांचे प्रमाण एकंदर हिंदुस्थानात यापुढे थोडे कमी होत जाण्याचाच संभव जास्त दिसतो.

## नागर लोकसंख्या

हिंदुस्थानातील एकंदर वस्ती लहानमोठ्या खेड्यांतून व शहरांतून कशी विभागली आहे याबद्दलही

माहिती खानेसुमारीच्या वेळेस गोळा करण्यात आली. पण खेड्यांचे बाबीत ही माहिती खात्रीलायक नाही. कारण की, मुलकी खात्याने आपल्या सोयीकरिता बनविलेली खेडीच फक्त खानेसुमारीच्या वेळेस खेडी म्हणून मोजण्यात आली. पण एका मुलकी खेड्यात एखादे वेळेस दोन किंवा अधिक लोकवस्तीच्या समूहाचे राहण्याचे एक ठिकाण या अर्थाने खेडी किती व केवढी मोठी वगैरे माहिती जी आपणास हवी ती मिळत नाही. मुंबई इलाख्यात या दुसऱ्या प्रकारचीसुद्धा माहिती मिळण्याचा प्रयत्न केला गेला, पण तो फारसा यशस्वी झाला नाही. अर्थात शहरांचे बाबतीत ही अडचण उद्भवत नाही. स्थूलमानाने खेड्यांत राहणारी एकंदर वस्ती किती व शहरांत राहणारी किती, हेच फक्त आपणास खानेसुमारीवरून कळू शकते. बृहन्महाराष्ट्रांतील नागर लोकसंख्येचे प्रमाण पुढील तक्त्यात दर्शविले आहे.

## नागर लोकसंख्येचे प्रमाण

| प्रदेश | नागर लोकसंख्येचे शेकडा प्रमाण |
|---|---|
| बृहन्महाराष्ट्र | १४·० |
| कोकण | ७·५ |
| महाराष्ट्र | १८·० |
| मोगलाई | ९·० |
| नागपूर–वऱ्हाड | १५·० |

खानेसुमारीचे वेळेस साधारणपणे ५००० हून जास्त लोकसंख्या असलेली सर्व गावे नगरे म्हणून भरण्यात आली. वरील तक्ता बृहन्महाराष्ट्रात ५००० वरील गावांत दर शेकडा माणसे किती राहतात हे दर्शवितो. सर्व हिंदुस्थानातील नागर लोकसंख्येचे प्रमाण १०·२ आहे, मुंबई इलाख्यात २२·२ तर आसाममध्ये फक्त ३·२ आहे. ज्या प्रदेशात नागर लोकसंख्येचे प्रमाण जास्त त्या प्रदेशात शेतकीपेक्षा व्यापार व इतर उद्योगधंदे यांचे महत्त्व जास्त असे म्हणता येईल. बऱ्याच युरोपीय देशांत अर्ध्याहून अधिक जनसमाज शहरांतून राहतो. वरील तक्त्यावरूनसुद्धा कोकण व मोगलाईपेक्षा महाराष्ट्र व नागपूर-वऱ्हाड या प्रदेशांत व्यापार व उद्योगधंदे यांचा फैलाव जास्त झाला आहे हे दिसून येते. सर्व हिंदुस्थानात गुजराथ या बाबतीत पुढारलेला आहे. मुंबई इलाख्याच्या उत्तर विभागात नागर लोकसंख्येचे प्रमाण २५·५ पडते. आणखी एका गोष्टीचा विचार येथे केला पाहिजे. तो हा की, दोन कृषिप्रधान प्रदेशांची तुलना करताना ज्या प्रदेशात लोकवस्ती जास्त दाट आहे त्या प्रदेशात थोड्या शहरांनी जे काम भागेल ते करण्यास विरळ वस्तीच्या प्रदेशात जास्त शहरांची जरुरी भासते. हे मुख्यत्वेकरून सरकारी काम आणि धान्य व इतर शेतकीनिपज यांच्या व्यापारांच्या बाबीत लागू पडते. देशाच्या औद्योगिक वाढीचे दृष्टीने २०,००० वर लोकवस्ती असलेली शहरेच महत्त्वाची असतात. बृहन्महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या शहरांत राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण शे. ६ पडते. हिंदुस्थानात ते ५·५ पडते. अर्थात आपले हिशेबात मुंबई वगळल्यामुळे सर्व मराठी बोलणाऱ्यांच्या स्थितीचे हे आकडे निदर्शक आहेत असे म्हणता येत नाही. मुंबई शहर हे काही अंशी गुजराथी व काही अंशी मराठी आहे. म्हणून तुलना करण्याकरिता गुजराथी बोलणाऱ्या प्रांताचे आकडे घेतले असता असे दिसून येते की, मुंबई वगळूनसुद्धा गुजराथेतील शेकडा ९ लोकसंख्या २०,००० वरील शहरांत राहते. नगरवाढीचा

हा प्रश्न फार महत्त्वाचा असल्यामुळे आता बृहन्महाराष्ट्रातील काही शहरांची चढउतार कशी होत गेली आहे याचा थोडक्यांत विचार करू.

## नागर लोकसंख्येतील चढउतार

बृहन्महाराष्ट्रात एक लाखावरील वस्तीची तीन शहरे आहेत. पुणे, नागपूर व सोलापूर. या तिहींचीही वाढ गेल्या पन्नास वर्षांत बरीच झाली. पुणे ही मुंबई इलाख्याची पावसाळी राजधानी, एक महत्त्वाचे जंक्शन व व्यापारी पेठ; नागपूर ही मध्यप्रांताची राजधानी व व्यापार आणि उद्योगधंद्याचे एक केंद्र; यांमुळे ही दोन्ही शहरे सारखी वाढतच आली. १८९१ नंतर मात्र या शहरांतील लोकसंख्या हळूहळू वाढत आहे. सोलापूरची वाढ गेल्या दोनतीन दशकांतच विशेष झाली. त्यातल्या त्यात १९०१ ते २१ चे दरम्यान तेथील कापडाच्या गिरण्यांच्या भरभराटीमुळे ते फार वाढले. पन्नास हजार व लाख या दरम्यान बृहन्महाराष्ट्रात फक्त कोल्हापूर एवढे एकच शहर आहे. येथील लोकसंख्येत वाढ होत आहे, पण ती लहान प्रमाणात. पंचवीस हजार ते पन्नास हजार या मर्यादेत आपल्या प्रांतात एकंदर सहा शहरे आहेत. यांतील अहमदनगर व औरंगाबाद यांची लोकसंख्या १८९१ पासून जवळजवळ स्थिरच आहे व पंढरपूरची वस्ती तर १९०१ पासून कमीच होत आली आहे. बाकीची तीन वाढती शहरे म्हणजे नाशिक, अमरावती व भुसावळ. यांतील नाशिकची लोकसंख्या १८७२ पासून १९०१ पर्यंत कमी होत होती. पण पुढील वीस वर्षांत ती फार झपाट्याने वाढली. याचे कारण उद्योगधंद्याची वाढ हे दिसत नाही. पण व्यापारी व इतर दृष्ट्या (नवीन सरकारी खाती वगैरे उघडणे) या शहराचे महत्त्व या दशकातच विशेष वाढलेले दिसते. अमरावतीची सारखी वाढ होत आहे. वऱ्हाडची राजधानी व व्यापारी पेठ या दृष्टीने या शहराचे महत्त्व कायम आहे. भुसावळ केवळ रेल्वेचे शहर आहे व एक मोठे जंक्शन म्हणूनच ते वाढत आले. वीस हजार ते पंचवीस हजार वस्ती असणारी शहरे दहा आहेत. यांतील जळगाव, चंद्रपूर व नांदेड ही सारखी वाढत आली आहेत. ठाण्याची वाढ १९११ पर्यंत थोडीच होती. पण यापुढील दहा वर्षांत ती बरीच झपाट्याने झाली; व मालेगाव, बार्शी, व मालवण यांची वाढ हळूहळू होत आहे. उलट एलिचपूर, सातारा व कामठी यांची १९२१ मधील लोकसंख्या त्यांच्या १८७२ मधील लोकसंख्येहून कमी होती.

## नगरवाढीची कारणे

नगरवाढीचे मुख्य कारण म्हणजे उद्योगधंद्यांची किंवा व्यापाराची वाढ होय. यांचा ऱ्हास झाला असता शहरास उतरती कळा लागते. तसेच सरकारी कचेऱ्या वसविणे अथवा उठविणे यामुळेही शहराचे लोकसंख्येवर परिणाम होतो. बृहन्महाराष्ट्रात कारखान्यांचे अथवा उद्योगधंद्यांचे वाढीमुळे कोणतेही शहर अलीकडे भरभराटीस आल्याचे क्वचितच दृष्टीस पडेल. सोलापुराशिवाय दुसरे उदाहरण नाहीच म्हटले तरी चालेल. बहुतेक वाढ व्यापारामुळे अथवा सरकारी कामाची महत्त्वाची ठिकाणे म्हणून झालेली आहे. जुने उद्योगधंदे नाहीसे झाल्यामुळे भिवंडी व येवल्यासारख्या काही शहरांची लोकसंख्या गेल्या पन्नास-साठ वर्षांत सारखी कमी झाली आहे. पण ऱ्हास होण्याचे मुख्य कारण म्हणजे जुने दळणवळणाचे मार्ग रेल्वेमुळे बदलले हेच होय. रेल्वेमुळे वऱ्हाड-महाराष्ट्रातील जुन्या व्यापारी मार्गावरील कारंजे व औरंगाबादसारख्या मुख्य शहरांचे महत्त्व नाहीसे झाले. कोकण-महाराष्ट्रामधील व्यापाराच्या जुन्या पेठांचीही हीच स्थिती झाली. उलट भुसावळ, इगतपुरीसारख्या काही शहरांस रेल्वे-नगरेच म्हणता येईल. गेल्या पन्नास वर्षांत फार थोड्याच नगरांची झपाट्याने वाढ झाली व जी झाली ती सर्व बहुतेक कापसाच्या व्यापारामुळे झालेली आढळून येईल. उदाहरणार्थ, वऱ्हाड-नागपुरात

यवतमाळ आणि वर्धा, खानदेशात जळगाव, अमळनेर व चाळिसगाव (धुळे पश्चिम खानदेशात असल्यामुळे गाळण्यात आले आहे) व मोगलाईत लातूर. सरकारी कारणामुळे ऱ्हास झालेल्या शहरांचे मुख्य उदाहरण कामठी होय. येथील छावणीचे महत्त्व सारखे कमी होत आहे. एलिचपूरचे बाबतीत-सुद्धा सरकारी कचेरी उठविणे हेच कारण थोडे लागू पडेल.

वरील विवेचनावरून साधारणपणे २५,००० वरील बहुतेक शहरे कमीअधिक प्रमाणात वाढत आहेत, पण याखालील शहरांत काहींची वस्ती कमीही होत आहे असे दिसून येईल.

या बाबतीत मुंबई इलाख्याचे १९२१ चे रिपोर्टांत गोळा केलेली काही माहिती फार उद्बोधक आहे. एकंदर नगरवाढीचा ओघ निरनिराळ्या विभागांत कसा आहे हे अजमाविण्याकरिता इलाख्याचे नैसर्गिक विभाग पाडून प्रत्येक विभागात लहान शहरांचा एक समूह निवडण्यात आला व या प्रत्येक समूहाच्या एकंदर लोकसंख्येत १८९१ पासून १९२१ पर्यंत कसकसे फरक होत गेले हे एका तक्त्यात दर्शविण्यात आले. या तक्त्यावरून असे दिसून येते की, १८९१ पासून खानदेशसमूहाची लोकसंख्याच काय ती वाढली, दक्षिण महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्र यांतील निवडलेल्या शहरांची वस्ती थोडी कमी झाली आणि मावळातील म्हणून जी चार नगरे धरण्यात आली होती ती तर पुष्कळच खालावली. यावरून महाराष्ट्रातील नागर लोकसंख्येची वाढ फारशी झाली नसावी असे वाटते. कोकणात व मोगलाईत तर डबघाईस आलेली नगरेच पुष्कळ आहेत. नागपूर व वऱ्हाडात बरीच शहरे झपाट्याने वाढली, पण विशेषतः वऱ्हाडात व्यापारी महत्त्व कमी होत असलेल्या जुन्या लहान नगरांची संख्या बरीच आहे.

सबंध हिंदुस्थानात नागर लोकसंख्येचे प्रमाण गेल्या पन्नास-साठ वर्षांत फार हळू म्हणजे जेमतेम शेकडा २ने वाढले. बृहन्महाराष्ट्रातील नगरवाढ मुख्यतः व्यापाराचे वाढीमुळे झाली आहे व ज्या भागात व्यापाराचे प्रमाण वाढले—म्हणजे महाराष्ट्र व नागपूर–वऱ्हाड (विशेषतः यांतील कापूस पिकणारे जिल्हे) तेथे नागर लोकसंख्येचे प्रमाण वाढले, उलट मोगलाई व कोकण या विभागांत एकंदर नागर लोकसंख्या स्थिरच असावी असे वाटते.

## परप्रांतगमन

खानेसुमारीच्या वेळेस प्रत्येक इसम कोणत्या ठिकाणी जन्मला याची माहिती गोळा केली जाते. साधारणपणे ज्या जिल्ह्यात इसम जन्मतो तेथीलच तो रहिवासी असला पाहिजे असे गृहीत धरण्यास हरकत नसल्यामुळे या प्रकारच्या माहितीचा उपयोग कोणत्याही जिल्ह्यातून अथवा प्रांतातून दुसऱ्या जिल्ह्यात अथवा प्रांतात माणसे किती गेली व परकी माणसे खानेसुमारीच्या वेळेस तेथे किती होती हे ठरविण्याकडे केला जातो. पण बृहन्महाराष्ट्राचे बाबतीत या आकड्यांचा काहीएक उपयोग करता आला नाही. याचे कारण असे की, प्रत्येक इलाख्याच्या तक्त्यात परप्रांतात जन्मलेल्या माणसांची माहिती जिल्हावार न देता फक्त प्रांतवार दिली आहे. उदाहरणार्थ, पुणे जिल्ह्यात मध्यप्रांतात जन्मलेली माणसे खानेसुमारीच्या वेळेस किती होती हे सांगता येईल, पण यातील मराठी मध्यप्रांतातील किती व हिंदी मध्यप्रांतातील किती हे ठरविणे शक्य नाही. तसेच ब्रम्हदेशात सबंध मुंबई इलाख्यात जन्मलेली १२८१६ माणसे नोंदली गेली, पण इलाख्याच्या निरनिराळ्या विभागाबद्दल तपशीलवार माहिती मिळणे शक्य नाही; म्हणून बृहन्महाराष्ट्रात बाहेरची माणसे किती होती व इतर प्रांतांत बृहन्महाराष्ट्रा-तील किती हे ठरविता येणे या आकड्यांवरून शक्य नाही. जन्मस्थानाच्या या माहितीवरून साधारण-पणे आपला जिल्हा सोडून बाहेर जाण्याची प्रवृत्ती आपल्या लोकांत दिसत नाही असे म्हणता येईल. सर्वच कृषिप्रधान देशांत ही गोष्ट आढळून येते. जेव्हा शेतकीवर पोट भरणे अशक्य होते तेव्हा घराबाहेर पडावे लागते आणि शहरांतून नवीन उद्योगधंदे सुरू होऊन तेथे वेतन चांगले मिळू लागले

म्हणजे परदेशगमन करण्यास उत्तेजनही मिळते. या प्रवृत्तीचे उत्तम उदाहरण रत्नागिरी जिल्हा होय. १९२१ साली मुंबई शहरांत राहणारी शे० २० माणसे रत्नागिरी जिल्ह्यात जन्मलेली होती. तसेच कृषिप्रधान देशातसुद्धा एका जिल्ह्यातून दुसऱ्या जिल्ह्यात मजुरवर्गाची तात्पुरती हालचाल आढळून येते. उदाहरणार्थ, देशावरून काही महिन्यांकरिता बरेच मजूर दरवर्षी मुंबईस जातात व कापूस वेचण्याच्या हंगामाच्या वेळेस वऱ्हाडलगतच्या जिल्ह्यांतून वऱ्हाडात येणाऱ्या मजुरांचे प्रमाणही बरेच मोठे आहे. या लोकसंख्येच्या हालचालीबद्दल खानेसुमारीच्या प्रत्येक रिपोर्टात थोडेबहुत विवेचन केलेले आहे. पण वर दर्शविल्याप्रमाणे एकंदर बृहन्महाराष्ट्राकरिता जन्मस्थानांच्या आकड्यांचा उपयोग करता आला नाही.

## परप्रांतातील 'मराठे'

पण एकंदर 'मराठे' आपल्या देशाबाहेर किती आहेत हे ठरविण्याकरिता आम्ही एका निराळ्या तक्त्यावरून माहिती गोळा केली आहे. खानेसुमारीचे वेळेस प्रत्येक इसमाची मातृभाषा कोणती हे नोंदले जाते. या मातृभाषेच्या तक्त्यावरून बृहन्महाराष्ट्राच्या बाहेरील प्रांतांत जे मराठी बोलणारे आढळतील ते स्वदेश सोडून बाहेर गेलेले असले पाहिजेत. हा तक्ता तयार करताना एक अडचण उद्भवली. बृहन्महाराष्ट्राचे हे आकडे तयार करताना बृहन्महाराष्ट्राच्या सर्व भागांचा समावेश केलेला नाही हे सुरुवातीचे विवेचनातच स्पष्ट केले आहे. तेव्हा या भागांबाहेरील लोकसुद्धा ते केवळ आमच्या तक्त्यातल्या बृहन्महाराष्ट्राच्या बाहेर म्हणून आपला प्रांत सोडून गेलेले असे गृहीत धरले तर ती

**बृहन्महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषिकांची संख्या**

| प्रदेश | मराठी भाषिकांची संख्या |
|---|---|
| मद्रास इलाखा | ३०२००० |
| म्हैसूर | ९०००० |
| मोगलाई (तेलंगण व रायचूर) | ७४००० |
| मध्य हिंदुस्थानातील संस्थाने (इंदूर वगैरे) | ५३००० |
| गुजराथ व काठेवाड† | ५१००० |
| धारवाड | ३४२०० |
| मद्रास इलाख्यातील संस्थाने‡ | ३४१०० |
| छत्तीसगड | २४१०० |
| ग्वाल्हेर संस्थान | २३००० |
| सिंध | १३४०० |
| हिंदी मध्यप्रांत | ७६०० |
| कूर्ग | ३५०० |
| संयुक्तप्रांत | २८०० |
| बंगाल | २६०० |

† यांतील ३३ हजार बडोदे संस्थानात.

‡ कोचीन व त्रावणकोर धरून

घोडचूक होईल. उदाहरणार्थ, मुंबई आम्हांस वगळावी लागली, पण मुंबईतील मराठी बोलणारे आपल्या प्रांताच्या बाहेर गेलेले असे म्हणवत नाही. हीच स्थिती सर्व सरहद्दीवरील जिल्ह्यांची. ही अडचण टाळण्याकरिता आम्ही बृहन्महाराष्ट्राच्या सरहद्दीलगतच्या एकेक जिल्ह्यातील मराठी बोलणाऱ्यांची संख्या जमेस धरली नाही. म्हणजे बेळगाव व विजापूर या जिल्ह्यांतील मराठी बोलणारे आपल्या प्रांतातच आहेत पण धारवाड जिल्ह्यातले परप्रांतांत असे आम्ही गृहीत धरले. अर्थात हा गृहीत पक्ष सर्वस्वी समाधानकारक नाही. पण ठोकळ विधाने करण्यास अशी गोळा केलेली माहिती पुरेशी आहे.

या खेरीज इतर सर्व प्रांतांत मराठी बोलणाऱ्यांची संख्या दोन हजारांहून कमी आहे. बृहन्महाराष्ट्राबाहेरील मराठी बोलणाऱ्यांची एकंदर संख्या जवळजवळ सात लाख साठ हजार आहे. हिंदुस्थानातील सर्व मराठी बोलणाऱ्यांत हे शेकडा ४ प्रमाण पडले. गुजराथेत अशा धर्तीवर आकडे गोळा केले तर गुजराथी बोलणाऱ्यांतले शेंकडा ६ परप्रांतांत राहणारे आढळून येतात. मराठ्यांचा फैलाव कुठेकुठे झाला याचा विचार करिता दक्षिणेकडेच तो विशेष झाल्याचे आढळून येते. (कोकणी बोलणाऱ्यांचाही वरील आकड्यांत समावेश झाला आहे हे लक्षात ठेविले पाहिजे.) कर्नाटकात व मलबार किनाराभर थेट कोचीन-त्रावणकोरपर्यंत मराठ्यांचा बराच प्रसार झालेला दिसतो. मराठी इतिहासात प्रथमपासूनच या भागाचा—विशेषतः कर्नाटकाचा आपणाशी फार निकट संबंध आहे. तेव्हा मराठ्यांचा येथे निरनिराळ्या पेशांत प्रवेश होणे साहजिक आहे.

दक्षिणेच्या खालोखाल पूर्वेकडे मोगलाईतील तेलंगणात बरेच मराठी बोलणारे आढळतात. बस्तर संस्थानात जवळ जवळ एक तृतीयांश हळबी बोलणारे आहेत हे वर सांगितले आहेच. तसेच छत्तीसगड प्रांतातही मराठ्यांचा थोडाबहुत फैलाव झालेला आहे. गुजराथेत मुख्यत्वेकरून बडोदा संस्थानामुळे मराठ्यांचा शिरकाव झाला व या संस्थानाच्या हद्दीतच मराठी लोकसंख्या आज विशेष आहे. मध्य हिंदुस्थानात इंदूर, देवास, ग्वाल्हेर वगैरे मराठी संस्थाने आहेतच. मराठ्यांशी फारसा ऐतिहासिक संबंध नसलेल्या अशा एकाच सिंध प्रांतात मराठी बोलणाऱ्यांची संख्या जवळजवळ साडेतेरा हजार आहे. यांतील बहुतेक सर्व कराचीस राहाणारी आहे. रत्नागिरी जिल्ह्यात जन्मलेले जवळ जवळ साडेपाच हजार लोक खानेसुमारीच्या वेळेस कराची शहरात होते. कराचीतील मराठ्यांत मजूरवर्गाचेच प्रमाण अधिक आहे.

अर्थात या आकड्यांवरून परप्रांतांत कायमचे वस्ती करून राहिलेले मराठे किती व तात्पुरते गेलेले किती हे सांगता येणे शक्य नाही. जन्मस्थानाच्या आकड्यांचाही उपयोग करता आला असता तरच याबद्दल थोडी माहिती मिळाली असती. पण साधारणपणे कुठेकुठे मराठी बोलणारे विशेष आढळतात यावरून जुन्या मुलुखगिरीच्या दिवसात जी लाट बाहेर गेली तिचीच अवशिष्ट डबकी आता राहिली आहेत असे म्हणता येईल. गुजराथेशी आपली तुलना केली असता हे चटकन कळून येते. गुजराथी बोलणाऱ्यांची एकंदर संख्या मराठी बोलणाऱ्यांच्या निम्म्याने असूनसुद्धा बंगाल, बिहार, पंजाब वगैरे दूरदूरच्या प्रांतांतून गुजराथ्यांची संख्या मराठ्यांपेक्षा पुष्कळच जास्ती आहे. परप्रांतांत जाणाऱ्यांच्या पेशाची माहिती मिळत नाही. ती मिळाली असती तर आम्ही वर निर्देशिलेल्या मुद्द्यावर बराच प्रकाश पडला असता. तसेच परप्रांतांतील मराठ्यांशी आपला जिवंत संबंध किती आहे, ही संख्या वाढत आहे की हळूहळू आजूबाजूच्या लोकसंख्येत तादात्म्य पावून महाराष्ट्रास कायमची मुकत आहे वगैरे बरेच मुद्दे विचारार्ह आहेत. पण हा एक स्वतंत्र निबंधाचाच विषय आहे व यावर खानेसुमारीचे बाहेर बरीच माहिती गोळा करावी लागेल.

## बृहन्महाराष्ट्रातील परप्रांतीय

बृहन्महाराष्ट्रात इतर भाषा बोलणारे किती, याचा विचार ओघानेच आला. यांतील सर्वांत मोठी संख्या चौदा लाख एकतीस हजार हिंदी बोलणाऱ्यांची आहे, पण हे सर्वच परप्रांतीय आहेत असे नक्की म्हणता येत नाही. कारण खानेसुमारीच्या वेळेस हिंदीतच उर्दूचा समावेश करण्यात येतो व अलीकडे बरेच महाराष्ट्रीय मुसलमानांचा मराठीचे ऐवजी उर्दूच मातृभाषा म्हणून घेण्याचा कल असल्यामुळे हा आकडा फुगला असावा. हिंदी बोलणारे नागपूर-वऱ्हाडात ६२१ हजार, मोगलाईत ३४३ हजार, महाराष्ट्रात ३८१ हजार व कोकणात ४६ हजार असे पसरलेले आहेत. याशिवाय प्रामुख्याने जे इतरभाषीय आपल्या प्रदेशात आहेत त्यांचा तक्ता खाली दिला आहे.

### मराठी प्रदेशातील अन्यभाषिकांची संख्या

| प्रदेश | अन्य भाषिकांची संख्या (आकडे हजारात) | | | |
|---|---|---|---|---|
| | तेलगू | कानडी | गुजराथी | राजस्थानी |
| बृहन्महाराष्ट्र | २९९ | २५४ | १४१ | २११ |
| कोकण | २ | १ | ६४ | ३ |
| महाराष्ट्र | ६४ | १९४ | ४३ | ६३ |
| मोगलाई | १३४ | ५४ | ९ | १९ |
| वऱ्हाड-नागपूर | ९८ | ५ | २४ | १२५ † |

† राजस्थानी म्हणजे मेवाडी, मारवाडी वगैरे राजपुतान्यातील भाषा बोलणारे. यांतील ७६ हजार वंजारी बोलणारे.

हे सर्व परप्रांतीय बृहन्महाराष्ट्रात येऊन राहिलेले असाही अर्थ होत नाही. कारण सुरवातीसच सुचविल्याप्रमाणे काही सरहद्दीवरील जिल्ह्यांतील लोकसंख्या बरीच मिश्र आहे. उदाहरणार्थ, सोलापूर-कोल्हापुरांत कानडी प्रांताचा थोडा समावेश होतो, आणि नांदेड व चांदा या जिल्ह्यांत काही तेलगू भाग येतो. कोकणात गुजराथी बोलणारे इतके असण्याचे कारण ठाणे जिल्ह्यातील त्यांची संख्या होय. राजस्थानीत वंजारीचाही समावेश केला जातो व ही भाषा बोलणारी एक वन्य जात यवतमाळ व अकोला जिल्ह्यांत मुख्यत्वेकरून राहत असल्यामुळे वऱ्हाड-नागपुरात राजस्थानी बोलणाऱ्यांची संख्या विशेष मोठी दिसते.

## धर्म

बृहन्महाराष्ट्रात निरनिराळ्या धर्मांचे लोक कोणत्या प्रमाणात राहतात हे पुढील तक्त्यावरून कळेल.

### निरनिराळ्या धर्मांच्या लोकांचे प्रमाण

| प्रदेश | हिंदू | मुसलमान | ॲनिमिस्ट |
|---|---|---|---|
| | | एकूण लोकसंख्येत शेकडा प्रमाण | |
| बृहन्महाराष्ट्र | ८८·८ | ६·६ | २·८ |
| कोकण | ९२·६ | ५·४ | — |
| महाराष्ट्र | ९०·६ | ५·८ | — |
| मोगलाई | ८७·५ | १०·० | २·० |
| वऱ्हाड-नागपूर | ८६·० | ५·८ | ८·० |

यांतील ॲनिमिस्ट हा सेन्सस कमिशनरांनी स्वतःच उत्पन्न केलेला एक धर्माचा प्रकार आहे. मानववंशशास्त्रज्ञ हा शब्द धार्मिक समजुती ज्यांच्यांत बिलकुल विकास पावलेल्या नाहीत अशा वन्य जातीना लावतात. सेन्सस कमिशनरांच्या मते भिल्ल, गोंड वगैरे हिंदुस्थानातील लोक हिंदू नसून धार्मिक प्रगतीच्या अगदी खालच्या पायरीवर अजून आहेत व म्हणून त्यांना या वेगळ्या वर्गात नोंदण्यात आले आहे. पण हा भेद सर्वांनाच मान्य नाही; व १९२१ सालचे मुंबई इलाख्याचे सेन्सस कमिशनर मि. सिजविच यांनी आपल्या रिपोर्टात भिल्ल लोकांना इतर हिंदूंपासून निराळे मोजणे किती वेडगळपणाचे आहे हे स्पष्टपणे दर्शविले आहे. याचकरिता मुंबई इलाख्यात या खेपेस फारच थोडे ॲनिमिस्ट या सदराखाली नोंदले गेले. इतर भागांतसुद्धा ॲनिमिस्ट्स व हिंदू हे एकच धरून चालणे सयुक्तिक दिसते.

वरील तक्त्यावरून हिंदूंचे प्रमाण शेकडा नव्वदवर आहे असे दिसून येईल. हिंदूंच्या खालोखाल मुसलमान येतात. मोगलाईशिवाय इतर विभागात त्यांचे प्रमाण साधारणपणे शेकडा साडेपाच पडते. मोगलाईत त्यांचे प्रमाण बरेच आहे. मोगलाईतील मराठी भागात जुन्या मुसलमानी राज्यांच्या बऱ्याच राजधान्यांचा समावेश होतो; व हल्लीही तेथे मुसलमानीच राज्य आहे. ही याची मुख्य कारणे असावीत. जवळजवळ एक लक्ष पंचेचाळीस हजार जैनधर्मी बृहन्महाराष्ट्रात आहेत. यांपैकी बरेचसे म्हणजे एक लक्ष दोन हजार महाराष्ट्रात सापडतात. खिस्ती एकंदर एक लक्ष सतरा हजार आहेत. यांपैकी अठ्ठावन हजार महाराष्ट्रात व चाळीस हजार कोकणात आहेत. कोकणात लोकसंख्येच्या मानाने त्यांचे प्रमाण बरेच (शेकडा १·५) पडते. पारसी एकंदर साडेदहा हजार आहेत.

## शिक्षण

### मराठी प्रदेशातील साक्षरतेचे प्रमाण

| प्रदेश | एकूण लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| | | दर हजारी साक्षर | |
| बृहन्महाराष्ट्र | ५२ | ९४ | १० |
| कोकण | ५० | ९२ | ११ |
| महाराष्ट्र | ६६ | ११९ | १५ |
| मोगलाई | २४ | ४४ | ४ |
| नागपूर-वऱ्हाड | ५२ | १०० | ७ |

वरील तक्त्यावरून बृहन्महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण फार कमी आहे हे सहज कळून येईल. इतर देशांशी तुलना करण्याचे राहोच, पण हिंदुस्थानातील इतर प्रांतांशी तुलना केली असताही आपण शिक्षणाचे बाबतीत फार मागासलेले आहोत. महाराष्ट्राच्या लगतच गुजराथेत साक्षरतेचे प्रमाण बरेच मोठे आहे. बृहन्महाराष्ट्राकरिता केलेल्या वरील तक्त्याप्रमाणेच गुजराथ व काठेवाडकरिता आम्ही आकडे तयार केले. त्यांवरून साक्षरतेचे एकंदर लोकसंख्येतील प्रमाण ११०, पुरुषांतील १८३ व बायकांतील ३४ आहे, असे दिसून आले. हिंदुस्थानाच्या खानेसुमारीच्या रिपोर्टात दिलेले साक्षरतेचे प्रमाण पाच वर्षांपुढील लोकसंख्येतून घेतले असल्यामुळे त्याची व वरील तक्त्याची एकदम तुलना करिता येणे शक्य नाही. म्हणून बृहन्महाराष्ट्राचे आकडेही पाच वर्षांखालील मुले वगळून तयार केले पाहिजेत. आपल्या लोकसंख्येत पाच वर्षांखालील मुलांचे प्रमाण शेकडा पंधराहून जास्त असणे शक्य नाही, तेव्हा शेकडा १५ हे प्रमाण धरून आकडे तयार केल्यास ठोकळ मानाने तुलना करण्यास ते उपयोगी पडतील. असे आकडे तयार केल्यास बृहन्महाराष्ट्रातील एकंदर लोकसंख्येतील

प्रमाण ६१, पुरुषांतील ११० व बायकांतील १२ असे येते. हिंदुस्थानातील निरनिराळ्या विभागांपैकी काहींचे आकडे खालील तक्त्यात दिले आहेत.

**हिंदुस्थानातील निवडक प्रांतांतील साक्षरतेचे प्रमाण**

| प्रदेश | एकूण लोकसंख्या | पुरुष | स्त्रिया |
|---|---|---|---|
| | ५ वर्षांवरील लोकसंख्येमध्ये दर हजारी साक्षर | | |
| हिंदुस्थान | ८२ | १३९ | २१ |
| ब्रह्मदेश | ३१७ | ५१० | ११२ |
| त्रावणकोर | २७९ | ३८० | १७३ |
| बंगाल | १०४ | १८१ | २१ |
| मद्रास | ९८ | १७३ | २४ |
| म्हैसूर | ८४ | १४३ | २२ |
| पंजाब | ४६ | ७६ | ९ |
| संयुक्तप्रांत | ४२ | ७३ | ७ |

पंजाब, संयुक्तप्रांत, बिहार व ओरिसा आणि काही संस्थाने खेरीजकरून बाकी सर्व हिंदुस्थान बृहन्महाराष्ट्रापेक्षा फार पुढारलेले आहे असे स्पष्ट दिसते. आपल्याकडे महाराष्ट्र सुसंस्कृत व सुशिक्षित म्हणून मिरवून घेण्याची बऱ्याच जणांची प्रवृत्ती आहे. त्यांनी या खानेसुमारीच्या आकड्यांकडे नजर फेकल्यास बरे ! बृहन्महाराष्ट्रातील निरनिराळ्या विभागांत साक्षरतेच्या प्रमाणात मोगलाईशिवाय फारसा फरक दिसून येत नाही. फक्त नागपूर–वऱ्हाडातील स्त्रीशिक्षण विशेष मागासलेले असावे असे वाटते. मोगलाईतील शिक्षणविषयक स्थिती तर अत्यंत निकृष्ट आहे. हिंदुस्थानातील इतर कोणत्याही मोठ्या संस्थानिकांची या बाबतीतील वृत्ती इतकी बेजबाबदार दिसून येत नाही.

कोणत्याही भाषेत पत्र लिहिता येणे व ते वाचता येणे ही साक्षरतेची खूण खानेसुमारीच्या वेळेस धरण्यात आली होती. त्याचप्रमाणे इंग्रजीत किती साक्षर होते हेही मोजण्यात आले. बृहन्महाराष्ट्रात एक लक्ष बारा हजार, कोकणात पंधरा हजार, महाराष्ट्रात एकसष्ट हजार, मोगलाईत पाच हजार व नागपूर–वऱ्हाडात एकतीस हजार अशी इंग्रजी जाणणाऱ्यांची संख्या भरली. परंतु या आकड्यांवरून इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराबद्दल काही नक्की अनुमान काढता येत नाही; कारण की, इंग्रजी मातृभाषा असणारे यांतील बरेच आहेत.

### स्त्री व पुरुष यांचे प्रमाण

आपल्या प्रांताच्या लोकसंख्येत स्त्रिया व पुरुष यांचे प्रमाण काय आहे हे खालील तक्त्यावरून कळेल.

**स्त्री-पुरुष प्रमाण**

| प्रदेश | दरहजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या |
|---|---|
| बृहन्महाराष्ट्र | ९८७ |
| कोकण | १०७७ |
| महाराष्ट्र | ९६९ |
| मोगलाई | ९७० |
| नागपूर-वऱ्हाड | ९७६ |

फक्त कोकणात स्त्रियांचे लोकसंख्येतील प्रमाण पुरुषांहून जास्त आहे. याचे कारण कोकणातून बरेच पुरुष मजुरीकरिता तात्पुरते इतर प्रांतांत जातात हे उघड आहे. इतर विभागांत स्त्रिया पुरुषांहून कमी आहेत; पण दोहोंच्या संख्येमधील फरक फार नाही. एकंदर हिंदुस्थानात सेन्सस कमिशनरांचे मते दक्षिणेकडील व पूर्वेकडील प्रदेशांत स्त्रियांची संख्या जास्त आहे; व जसजसे उत्तरेकडे व पश्चिमेकडे जावे तो तो ती कमी कमी होत जाते. वायव्य सरहद्दीवरील प्रांत, पंजाब व सिंध या प्रांतांत स्त्रियांचे प्रमाण फार कमी आहे; तर मद्रास, बिहार व ओरिसा यांत ते पुरुषांहून जास्त आहे.

१९२१ साली एकंदर लोकसंख्येतील स्त्रियांचे प्रमाण आधीच्या खानेसुमारीपेक्षा कमी झालेले आढळले. याचे कारण असे की, दुष्काळात साधारणपणे स्त्रियांपेक्षा पुरुष अधिक मृत्युमुखी पडतात. पण १९१७–१८ सालांतील इंन्फ्ल्यूएंझाच्या साथीत बळी पडलेल्यांत स्त्रियांची संख्या विशेष होती.

वरील लेखात आम्ही खानेसुमारीच्या आकड्यांपैकी विशेष महत्त्वाचे आकडे गोळा करून त्यांवर लहान लहान टाचणे लिहून ते वाचकांपुढे मांडले आहेत. आपली स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करण्याचे आधी तिचे यथार्थ ज्ञान होणे अवश्य आहे. हे ज्ञान होण्यास आवश्यक असणाऱ्या माहितीपैकी काही भाग खानेसुमारीच्या आकड्यांत व रिपोर्टात सापडतो. खानेसुमारीचे रिपोर्ट काही अर्थशास्त्रज्ञ वगळले असता बाकी कोणी सहसा पाहत नाहीत; व त्यातही महाराष्ट्र जनतेबद्दलची माहिती अशी एकत्र मिळत नाही. ही उणीव थोड्या अंशी वरील लेखाने भरून निघेल अशी आशा आहे.

*रत्नाकर* १ : ५ मे १९२८ पृ० ३०३–३१३

☆

# २ . . 'संयुक्त महाराष्ट्र' हा एक प्रांत का असावा ?

महाराष्ट्राचा असा स्वतंत्र एक राजकीय विभाग असण्याची आवश्यकता कोणाही विचारी मनुष्यास पटण्यासारखी आहे. खरोखर हा केवळ महाराष्ट्राचा प्रश्न नाही. महाराष्ट्राचे एकीकरण या बाबीचा समावेश हिंदुस्थानचे नवीन राजकीय विभाग कसे पाडावे या मोठ्या प्रश्नातच होतो. हिंदुस्थान हे इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स यांसारखे एकजिनसी राष्ट्र आहे असे आज कोणी प्रतिपादीत नाही. चीनमध्ये एका भाषेमुळे अस्तित्वात असलेले एक राष्ट्रीयत्वही आपल्या वाट्यास आलेले नाही. हिंदुस्थान हे 'महाराष्ट्र' आहे; त्यात अनेक पोटराष्ट्रांचा समावेश होतो; आणि म्हणूनच, हिंदुस्थानाच्या राज्यघटनेबाबत विचार करताना कोणीही या मोठ्या व बहुरूपी देशाची राज्यघटना एकमुखी असावी असे म्हणत नाही. आपली राज्यघटना संयुक्त असावी, याबद्दल एकमत आहे. जेथे राज्यविस्तार मोठा व मूळ घटक विविध प्रकारचे तेथेच संयुक्त राज्यघटनेची जरुरी भासते. आपणांकडे या दोन्ही दृष्टींनी संयुक्त राज्यघटना आवश्यक आहे.

## एकजिनसी राज्यघटकांची आवश्यकता

संयुक्त राज्याच्या कल्पनेतच ज्यांचा संयोग व्हावयाचा, ज्यांची जुळणी नवीन संयुक्त राज्यात करावयाची अशा मूळ एकजिनसी राज्यांचे अस्तित्व अभिप्रेत आहे. ऐतिहासिक दृष्ट्या विचार करता आधुनिक इतिहासातील संयुक्त राज्यघटने आधी मूळ निरनिराळी सलग राज्ये अगर प्रांत अस्तित्वात होते असे आढळते. अमेरिकेतील संयुक्त संस्थानांतील राज्यघटनेची स्वातंत्र्य-युद्धोत्तर स्थापना होण्याच्या वेळेस या सर्व संस्थानांनी आपणांस स्वतंत्र समजून नंतर संयुक्त घटनेचा बराच ऊहापोह करून स्वीकार केला. ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका इत्यादी वसाहतींतील प्रांत प्रथम सलग होते; व काही काळाने त्यांचा समावेश एका संयुक्त राज्यघटनेत झाला. झारशाहीतील रशियात आजच्या हिंदुस्थानाप्रमाणेच एकतंत्री व एकमुखी अंमल होता. परंतु जेव्हा रशियात प्रजासत्ताक राज्य स्थापन झाले तेव्हा राज्यपद्धतीचे स्वरूप बदलावे लागले. भौगोलिक परिस्थिती व निरनिराळ्या लोकसमाजांचा इतिहास, भाषा, परंपरा, संस्कृती इत्यादी विचार करून नवीन एकजिनसी प्रजासमूह प्रथम बनविण्यात आले. या प्रत्येकाची सलग प्रजासत्ताक राज्ये बनविली व तदनंतर या सर्व राज्यांची मिळून अशी संयुक्त राज्यव्यवस्था निर्माण करता आली.

आपणांपुढे उभ्या असलेल्या आजच्या प्रश्नाचे स्वरूप या रुसी राज्यघटनेच्या प्रश्नासारखेच आहे. जुना एकतंत्री व एकमुखी अंमल, की जेथे कोणत्याच प्रादेशिक, सांस्कृतिक, भाषिक मुद्द्यांचा विचार केला जात नव्हता, तो मोडावयाचा व त्याच्याऐवजी देश व लोक परिस्थितीस जास्त अनुरूप अशी

व्यवस्था स्थापावयाची हा उद्योग आपणांस करावयाचा आहे. या काळी हल्लीच्या प्रांतिक विभागणीचा काही उपयोग नाही हेही सर्वांस मान्य आहे. इंग्रजांनीही सिंध व उरिया प्रांत निर्माण करून हे कबूल केले आहे. हल्लीची प्रांतिक विभागणी कुचकामाची, याचे कारण हेच की, आजचे बरेच प्रांत एकजिनसी, एकरूप नाहीत; व म्हणून ते संयुक्त राज्यघटनेतील प्राथमिक घटक बनण्यास नालायक आहेत. एक काळ असा होता की, जेव्हा निरनिराळ्या लोकसमूहांची खिचडी एखाद्या विभागात बुद्ध्या केली म्हणजे तेथे एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्कटत्वास पावते असे काही सुज्ञ लोकही समजत असत. गेल्या कित्येक वर्षांच्या अनुभवाने ही कल्पना आता मागे पडली आहे. विशेषतः मुंबई, मद्रास व मध्यप्रांत येथील प्रांतिक सरकारे व विश्वविद्यालये यांच्या कारभारांत ज्या प्रत्यही अनेक आगंतुक अडचणी उत्पन्न होतात व जे निष्कारण गैरसमज फैलावतात, त्यावरून असे प्रत्ययास येते की, नित्याच्या व्यवहारांत भिन्न परंपरा व भाषा असलेल्या लोकसमूहाची जबरदस्तीने एकत्र दावण बांधण्यात फायदा नसून तोटाच होतो.

## राज्यघटकांचे अधिष्ठान

आजचे प्रांत जर निरुपयोगी तर त्यांच्या ऐवजी नवीन घटक कसे निर्माण करावयाचे ? हे नवीन घटक जास्त एकजिनसी असतील असे कशावरून ? या प्रश्नांचा विचार करताना प्रथमच ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, आधुनिक राज्याचे घटक प्रादेशिक घटक असले पाहिजेत. आधुनिक राजनिष्ठेचे मूळ शेजारधर्मात आहे. आपण एका गावात राहणारे, एका प्रदेशात राहणारे, म्हणून त्या गावाच्या अगर प्रदेशाच्या रक्षणार्थ व पोषणार्थ राज्यसंस्था निर्मितो, हीच कल्पना सर्व अलीकडील राजनीतीच्य बुडाशी आहे. ही कल्पना मान्य केली असता जात, पंथ, धर्म, धंदा इत्यादिकांवर राज्यघटकांचे अधिष्ठान ठेवता येत नाही, हे उघड आहे. घटक प्रादेशिकच असणार व त्यांच्यांत एका प्रदेशात राहणाऱ्या सर्वांचा समावेश जरुरीने होणार. कोणत्याही प्रदेशातील समाज एकजिनसी व इतरांहून निराळा आहे किंवा नाही हे ठरविण्याचे निश्चित बाह्य गमक एकही उपलब्ध नाही. वंश, भाषा, संस्कृती, इतिहास, धर्मपरंपरा इत्यादी अनेक गमके सांगितली जातात; पण त्यांत प्रत्येकास अपवाद दाखविता येतील. ही बाब खरी भावनेची आहे, मानण्यावर अवलंबून आहे. तेव्हा प्राप्त परिस्थितीत प्रत्यक्ष भावनेची कसोटी लावून या मर्यादा ठरवावयाच्या आहेत; म्हणजे स्वयंनिर्णयाचा सिद्धांतच आपणांस येथे अंमलांत आणावयाचा आहे. हिंदुस्थानाच्या भावी राज्यघटनेत मूल प्राथमिक घटक ठरविण्यापासूनच या सिद्धांताचा आपणांस आश्रय धरला पाहिजे.

## महाराष्ट्राचा एकजिनसीपणा

एकभाषी महाराष्ट्र हा स्वतंत्र एकजिनसी घटक कसा बनतो याचे उत्तर एकच असू शकते. ते असे की, एकंदर पुणेकर-कोल्हापूरकर हे नागपूरकरांस सुरतकर-धारवाडकरांपेक्षा जास्त जवळचे समजतात म्हणून. एकभाषी महाराष्ट्र हा जरी राज्यकारभाराच्या बाबत चतुर्विध किंवा पंचविध विभागलेला असला तरी येथील लोकसमूहात आपण एका समाजाचे आहोत अशी भावना आहे, म्हणून महाराष्ट्र एक व म्हणूनच त्याचा निराळा राजकीय विभाग व्हावा. अशी भावना का व्हावी याला अनेक कारणे दाखविता येतील. इतिहासाकडे बोट दाखविता येईल, एका भाषेचा प्रभाव वर्णिता येईल, धार्मिक परंपरेचे वैशिष्ट्य सांगता येईल, लोकरीती, आचार, ग्रामरचना, समाज-संघटना हे सर्व पुष्ट्यर्थ उल्लेखिता येईल. परंतु हे सर्व जरी झाले तरी शेवटचे खरे गमक आजची प्रत्यक्ष भावना हेच होय. ही भावना प्रत्यक्ष तशी नसती तर इतर सर्व विधाने फोल ठरली असती.

महाराष्ट्राचा एकजिनसीपणा व हा घटक वेगळा असण्याची जरुरी या गोष्टी काही महत्त्वाच्या बाबींचा विचार करून पटविता येतील. आपणांतील सामाजिक कलह हिंदुस्थानाच्या प्रगतीच्या आड येत आहेत ही गोष्ट सर्वमान्य आहे. या कलहाचे प्रकार मात्र निरनिराळे आहेत. महाराष्ट्रातील आजचा मुख्य कलह म्हणजे ब्राह्मण-ब्राह्मणेतर. याचे महाराष्ट्रातील विशिष्ट स्वरूप इतरत्र कोठे दृष्टीस पडत नाही. हा वाद महाराष्ट्रभर आहे, कोकणात आहे, देशावर आहे, वऱ्हाडात आहे, नागपुरात आहे, पण ठाणे सोडून सुरत जिल्ह्यात गेल्यास हा वाद तेथे नाही; अगर कोल्हापूर सोडून धारवाडात गेल्यास तेथे निराळाच वाद प्रामुख्याने दृष्टोत्पत्तीस येतो. हे अंतर्गत कलह ज्या समाजाचे त्या समाजानेच सोडविले पाहिजेत. असे ते सोडविले गेल्यासच समाज सुरक्षित राहून बलवान होतो. यांत जर बाहेरच्यांची लुडबूड चालू दिली तर नुकसान सर्वांचेच होऊन बाहेरचा मात्र बळावतो. या दृष्टीनेही एकजिनसी प्रांत असणे महत्त्वाचे आहे. अस्पृष्टांचा विचार केला तरी महाराष्ट्रातील प्रश्न विशिष्ट प्रकारचा आहे. येथे सर्वच भागांत मुख्यत्वे महारांचा प्रश्न निकडीचा आहे. मराठे, महार व ब्राह्मण हे महाराष्ट्र समाजाचे मुख्य घटक; व यांचे परस्पर-संबंध निश्चित व सलोख्याचे झाल्याशिवाय आपणास तरणोपाय नाही. व या गोष्टी होण्यास स्वतंत्र, निर्भेळ महाराष्ट्र प्रांतच हवा.

आर्थिक प्रश्नाचे स्वरूपही महाराष्ट्राचे विशिष्ट असेच आहे. आपल्यापुढे सार्वत्रिक एकच मोठा प्रश्न आहे, तो हा की, महाराष्ट्रीय अशा वंशपरंपरेचा अभाव व त्याचे महाराष्ट्रास भोगावे लागणारे परिणाम. जसजसे वंशव्यवसायाचे महत्त्व जगात वाढत जाते व संपन्न वर्गाची राजसत्तेवरील हुकमत वाढत जाते, तसतसे हे परिणाम जास्त तीव्रतेने भासू लागतात. या प्रश्नांचा नीट विचार होण्यास व त्यावर उपाययोजना होण्यासही महाराष्ट्राचा निराळा प्रांत हवा.

## प्रांतीयवादाचा मिथ्या आरोप

अजूनही काही जणांस असे वाटते की, निराळ्या प्रांताची मागणी करणे याचे मूळ परप्रातीयांच्या द्वेषात आहे. पण हा आरोप मिथ्यारोप आहे. हिंदुस्थान निराळा असल्यास ज्याप्रमाणे चीनी-इराण्यांचा द्वेष अभिप्रेत नाही, तसेच महाराष्ट्र निराळा हवा म्हणण्यात गुजराथी-बंगाल्यांचा द्वेष नाही. उलट आपणां सर्वांसच हिंदुस्थानात एकोप्याने राहावयास या प्रांतविभागणीने मदतच होणार आहे. शिवाय यात महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या परप्रांतीयांचा द्वेष अगर त्यांच्या विरुद्ध कारवाई नाही. याबाबतचा न्याय साधा व सगळीकडे सारखाच आहे. तो असा की, कोणत्याही प्रदेशात स्थायिक झालेल्या इसमाने आपले अगर आपल्या ज्ञातीचे हित त्या प्रदेशाच्या सार्वत्रिक हिताहून भिन्न असे मानता कामा नये; व त्याने असे न मानल्यास तो व जुने तत्प्रांतीय यांत भेद मानणे अयोग्य आहे. याच्या उलट परप्रांतीयाने आपल्या मूळ स्थानाचे व ज्ञातीचे हित हेच मुख्य मानून आपण स्थायिक झालेल्या प्रदेशाचे हित गौण मानले अगर त्यास विरोधी वर्तन केले तर मात्र त्यास निराळा समजून वागविण्याचा मार्ग मोकळा पाहिजे. अकोल्याच्या अखिल भारतीय हिंदु-महासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री सी. विजय राघवाचारियर यांनी हिंदुस्थानास मातृभूमी समजून सतत वागणारा तो हिंदू अशी व्याख्या केली होती. तिच्या बुडाशी अशीच कल्पना असावी. अहमदा-बादेस अगर तंजावरास स्थायिक झालेल्या महाराष्ट्रीयाने आपल्या परंपरेचा अभिमान बाळगणे केव्हाही युक्तच आहे. पण त्याचे नित्याचे हितसंबंध गुजराथचे व तामीळदेशाचेच होत. महाराष्ट्रातही निरनिराळ्या प्रांतांतून निरनिराळ्या कारणाने स्थायिक झालेल्या जमाती आहेत. स्वराज्यात तर अनेक गुणी माणसे मुद्दाम आमंत्रिली. यांतील बरेच लोक मराठी समाजात पुरे मिसळलेले आहेत. इतरांची

परंपरा भिन्न राहिली तरी त्यांनी आपले हितसंबंध निराळे समजण्याचे कारण नाही; व जोपावेतो त्यांची वागणूक व व्यवहार ही महाराष्ट्राच्या हितास पोषक अशीच आहेत, तोपर्यंत त्यांस आम्हीही परके लेखणे योग्य होणार नाही. तसे पाहिले तरी महाराष्ट्रातील धर्माची शिकवण व इतिहासाची परंपरा ही दोन्ही अशीच आहेत की, महाराष्ट्राशी एकरूप होऊन तेथे कोणीही प्रेमाने, बरोबरीने येऊन बसावे.

*केसरी*, हीरक महोत्सव विशेषांक, ३ जानेवारी १९४१, पृ० ३६–३७

☆

# ३ . . संयुक्त महाराष्ट्र

महाराष्ट्राच्या संयुक्तीकरणाचा विचार करताना संघराज्याची घटना व स्वरूप यांविषयी थोडासा प्रास्ताविक विचार करणे आवश्यक आहे. संघराज्याची कल्पना ही राज्यातील निरनिराळ्या विभागांतील लोकांमध्ये आपल्या विभागाचे विशिष्ट अस्तित्व वेगळे राखणे व त्याबरोबर इतर विभागांसह राजकीय ऐक्य संपादणे या दोन काहीशा परस्परविरोधी भावनांचा समन्वय साधण्याकरिता उद्भवते. आपल्या विभागाचे अस्तित्व वेगळे ठेवण्याच्या भावनेमागील कारणे निरनिराळ्या देशांत व राजकीय घटकांत निरनिराळी असू शकतील. कुठे भौगोलिक अगर आर्थिक भिन्न परिस्थितीमुळे निराळेपणाची भावना निर्माण होते; तर कुठे ती वंश, भाषा, धर्म इत्यादी भेदांमुळे होते. परंतु अधिक व्यापक अगर मोठा राजकीय आणि आर्थिक घटक केल्याने जे अनेक फायदे होतात ते आपापल्या प्रांतांना अगर प्रदेशांना मिळवून देण्यासाठी पुष्कळ वेळा वेगवेगळ्या कारणांसाठी आपले भिन्नत्व अबाधित राखू इच्छिणारे लहान घटक एक होऊ पाहतात. तसेच आपले वैशिष्ट्य कायम राखण्याची तीव्र इच्छा असताही घटकांच्या पृथगात्मकतेच्या भावनेहूनही प्रभावी अशा सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक, ऐतिहासिक इत्यादी अनेक प्रकारच्या एकात्मकतेच्या भावनेमुळे घटकांना एकत्र येण्याची इच्छा होते. राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेचा परिपोष करण्यासाठी एक मोठे संघराज्य बनविल्यामुळे प्रत्येक घटकाच्या होणाऱ्या आर्थिक व राजकीय फायद्यांमुळे संघराज्य करण्याच्या इच्छेस अधिकच बळकटी येते. कारण राज्य जितके मोठे तितके ते जास्त संरक्षणक्षम असते; व त्याचे आंतरराष्ट्रीय व्यवहारातील महत्त्वही त्याच प्रमाणात वाढते. तसेच देश विस्ताराने मोठा असला म्हणजे तो आर्थिक दृष्ट्या अधिक स्वावलंबी असण्याचा संभव तितका जास्त असतो. या स्वावलंबनामुळे आंतरराष्ट्रीय व्यवहारात त्याची बाजू बळकट होते व युद्धाच्या वेळी त्याची आर्थिक नाकेबंदी होण्याचा संभव कमी असतो. शिवाय अंतर्गत राज्यकारभार मोठ्या प्रमाणावर चालविल्यामुळेही बरेच फायदे होत असतात. त्यामुळे आर्थिक पुनर्रचनेच्या अगर सामाजिक सुखसोयींच्या आणि सुधारणेच्या योजना आखणे अधिक सुलभ होते. म्हणूनच आपले वैशिष्ट्य व भिन्नता कायम ठेवून व स्थानिक आणि प्रादेशिक हितसंबंधांचे रक्षण करूनसुद्धा राज्यकारभाराच्या सोयीसाठी एक मोठा घटक केल्याने जे आर्थिक व राजकीय फायदे होतात ते लहान लहान घटकांना मिळवून देणे हा संघराज्याच्या कल्पनेमागील मुख्य हेतू असतो. संघराज्याचे निरनिराळे घटक हे मध्यवर्ती सत्तेने राज्यकारभाराच्या सोयीसाठी पाडलेले प्रादेशिक विभाग नव्हेत हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. भौगोलिक, ऐतिहासिक, आर्थिक, राजकीय फायद्यांसाठी स्वेच्छेने एकत्र येऊ इच्छिणाऱ्या स्वतंत्र घटकांचेच संघराज्य बनत असते. देशामध्ये एकावयवी (Unitary) मध्यवर्ती सरकार असण्याने जरी काही फायदे आहेत असे दिसले तरी निरनिराळ्या प्रादेशिक

घटकांतील विविधतेला व हितसंबंधांना पूर्ण वाव देण्याच्या दृष्टीने एकावयवी मध्यवर्ती सरकारापेक्षा विशिष्ट परिस्थितीत संघराज्यच युक्त ठरते.

## भारतीय संघराज्याच्या घटकांचे स्वरूप

सध्याच्या परिस्थितीत हिंदुस्थानामध्ये एकावयवी मध्यवर्ती सरकार असावे असा आग्रह धरणारे कोणी असतील असे वाटत नाही. ज्या कारणांमुळे निरनिराळ्या प्रादेशिक विभागांमध्ये भिन्नत्वाची भावना निर्माण होऊ शकते ती बहुतेक सर्व कारणे हिंदुस्थानसारख्या अवाढव्य देशात या ना त्या स्वरूपात निश्चितपणे आढळतात. हिंदुस्थानचे आर्थिक किंवा भौगोलिक दृष्ट्या किती तरी वेगळे भाग पडतात. शिवाय वंश, परंपरा, भाषा, धर्म इत्यादिकांमुळे पडणारे भेदही आपल्या देशात काही थोडे थोडके नाहीत. असे भेद असूनही मुसलमानेतर हिंदी जनतेमध्ये समान सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरेमुळे एकात्मकतेची भावना जागृत आहे. ही भावना व संघराज्यामुळे होणारे आर्थिक व राजकीय फायदे यांमुळेच हिंदी संघराज्य निर्माण करण्याची तीव्र इच्छा त्यांच्यामध्ये जागृत झाली आहे. अशा परिस्थितीत जे नवे हिंदी संघराज्य जन्माला यावयाचे ते कार्यक्षम व बलशाली होण्याच्या दृष्टीने त्याचे घटक कसे असावेत, त्या घटकांच्या भौगोलिक मर्यादा ठरविताना कोणत्या तत्त्वांचा अवलंब करावा ह्याचा विचार करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

जगातील हल्लीची बहुतेक संघराज्ये अस्तित्वात येण्यापूर्वीच त्यांचे आजचे घटक स्वतंत्रपणे निर्माण होऊन त्यांनी स्वतंत्र राजकीय अस्तित्व व त्यांचेपैकी काहींनी सार्वभौमत्वही उपभोगिले होते. युनाइटेड स्टेटस ऑफ अमेरिका, कॅनडा, स्वित्झर्लंड किंवा ऑस्ट्रेलिया या संघराज्यांचे आजचे घटक ही पूर्वीची स्वतंत्र राज्ये अगर संस्थाने होत. म्हणून या संघराज्यांच्या बाबतीत नवीन काही घटक निर्माण करण्याचा किंवा त्यांच्या प्रादेशिक मर्यादा बदलण्याचा प्रश्न उत्पन्नच झाला नाही. परंतु हिंदुस्थानातील परिस्थिती वेगळी आहे. हिंदुस्थानचे जे संघराज्य हो आहे ते पूर्वी स्वतंत्र असलेल्या घटकांचे बनणार नसून ऐतिहासिक योगायोगामुळे बनलेल्या किंवा राज्यकारभाराच्या सोयीसाठी एकावयवी मध्यवर्ती सत्तेने बनविलेल्या हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतिक विभागांचे होणार आहे. आजचे प्रांत कोणत्याही मूलभूत तत्त्वानुसार निर्माण झालेले नसल्यामुळे बदलत्या राज्यसंघटनेत ते तसेच ठेवण्यात काही स्वारस्य नाही. ते नवीन हिंदी संघराज्याचे राजकीय दृष्ट्या अगर युक्त असे घटक होऊच शकत नाहीत. कारण राज्यकारभाराच्या सोयीसाठी निरनिराळे प्रादेशिक घटक त्यांत समाविष्ट केलेले असल्यामुळे मुळातच त्यांना लहान लहान संघराज्यांचे स्वरूप आले आहे. तेव्हा हिंदुस्थानची नवी घटना बनविणाऱ्या समितीचे कार्य कायम व टिकाऊ स्वरूपाचे होण्याच्या दृष्टीने संघराज्याचे घटक कोणते असावेत हे संघराज्याची घटना बनविण्याच्या अगोदर ठरविणे जास्त सयुक्तिक होईल. संघराज्याचे मध्यवर्ती सरकार व आपली भिन्नता थोड्याबहुत अंशाने कायम ठेवू इच्छिणारे त्याचे प्रांतीय घटक यांच्यामधील परस्पर हितसंबंधांचा प्रश्न जर कायमच्या स्वरूपात सोडवावयाचा असेल तर घटनासमितीत बसणारे सभासद हे त्या त्या भावी घटकांचे प्रतिनिधी म्हणून समजले गेले पाहिजेत.

अशा रीतीने प्रथम प्रांतीय घटक निश्चित करणे हे एक महत्त्वाचे व तातडीचे काम आहे. त्यासाठी कोणत्या तत्त्वाचा अंगीकार केला असता ह्या घटकांचा राज्यकारभार सोयीचा व सुरळीत होईल हे पाहिले पाहिजे संघराज्याची कल्पना विशद करताना त्यासंबंधीचे थोडे विवेचन वर केलेच आहे. स्वतंत्र अस्तित्व ठेवूनही व्यापक फायद्यासाठी एकत्र येऊ इच्छिणाऱ्या घटकांचे संघराज्य बनते. म्हणजेच प्रत्येक घटकातील लोकांना इतरांपासून त्यांच्या भिन्नत्वाची व आपल्या एकात्मकतेची जाणीव असावयाला पाहिजे. प्रत्येक घटकातील ही एकात्मकतेची भावना समान सांस्कृतिक, धार्मिक अगर

ऐतिहासिक परंपरांमुळे अगर भाषेमुळे निर्माण होऊ शकते. ज्या राजकीय घटकांच्या राज्ययंत्राबाबत समग्र जनतेची आपलेपणाची भावना सहज उद्भूत होईल व जेथील कारभारास या आपलेपणाच्या भावनेमुळे लोकमताचा स्वयंस्फूर्त पाठिंबा मिळू शकेल असेच कोणत्याही संघराज्याचे घटक बनविणे आवश्यक आहे.

## भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व

ह्या दृष्टीने हिंदी संघराज्याचे घटक बनविताना भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व हे विशेषतः दक्षिण हिंदुस्थानास लावणे अत्यंत योग्य व इष्ट होणार आहे. हिंदी संघराज्याचे घटक हे एकभाषिक प्रांत असावेत, हे तत्त्व कोणीही सहज मान्य करील. अनेक भाषा प्रचलित असलेल्या घटकात लोकशाही पद्धतीने कारभार चालविण्यात फार अडचणी निर्माण होतात असा अनुभव आहे. म्हणून दुसऱ्या कशासाठी नाही तरी निदान खऱ्या लोकशाहीच्या निर्मितीसाठी तरी भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व अंगीकारिले पाहिजे. या दृष्टीने मराठीभाषी प्रदेशाकडे पाहिले तर तो प्रदेश सलग व मोठा असल्यामुळे संघराज्याचा एक स्वतंत्र घटक होऊ शकतो. शिवाय या प्रदेशामध्ये वर सांगितलेल्या कारणांसाठी आणखी एक लहान पण स्वतंत्र घटक होऊ शकेल असा कोणताही भाग दिसून येत नाही. राजकीय एकात्मकता कायम ठेवून हिंदी संघराज्याचा प्रत्येक घटक जितका मोठा होईल तितका तो संघराज्याच्या दृष्टीने त्याप्रमाणेच त्या घटकांच्या अंतर्गत व्यवहाराच्या दृष्टीनेही अधिक फायदेशीर होईल. कारण एखाद्या प्रांताचे राजकीय महत्त्व व बलशालित्व, तेथील सरकारने हाती घेतलेल्या आर्थिक व सामाजिक पुनर्घटनेच्या योजनांची यशस्विता या सर्व गोष्टी त्या प्रदेशाच्या विस्तारावर व तेथे उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक संपत्तीवर अवलंबून असतात. हिंदी संघराज्याच्या कल्पिलेल्या घटनेनुसार काही विशिष्ट बाबी सोडून आर्थिक बाबतीत बहुतेक सर्व सत्ता घटकांच्याच हातात दिली जाणार आहे. अशा परिस्थितीत घटकांची संख्या विनाकारण जास्त वाढविल्यास नुकसान होण्याचा संभव आहे. एखाद्या घटकाचे संघराज्यातील स्थान व महत्त्व त्याच्या राजकीय व आर्थिक बलावरच बहुतांशी अवलंबून असणार. त्यामुळे मोठ्या घटकाला आंतरप्रांतीय व्यवहारात अगर संघराज्याच्या कारभारात साहजिकच जे महत्त्व प्राप्त होईल ते लहान लहान घटकांना प्राप्त होणार नाही. म्हणून संघराज्याचे सर्वच घटक एकात्मतेच्या तत्त्वाला बाध न आणता जितके मोठे होतील तितके करणे व होणे इष्ट आहे. या सर्व दृष्टीने महाराष्ट्र एकीकरणाचा विचार केला तर मराठीभाषी लोकांचा एक प्रांत बनविणे किती वाजवी आहे हे सिद्ध करणे अगदी सोपे आहे. हिंदुस्थानातील इतर कोणत्याही एकभाषी प्रदेशापेक्षा राजकीयदृष्ट्या महाराष्ट्र अधिक एकजिनसी आहे. ह्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांची भाषाच एक आहे असे नव्हे तर त्यांची वाङ्मयीन परंपराही एकच आहे. ह्या सर्व प्रदेशातील जनतेमध्ये आतापर्यंत सामाजिक व सांस्कृतिक दळणवळणाच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे विशिष्ट अडथळे उत्पन्न झालेले नाहीत. एकमेकांपासून पुष्कळ दूर असलेल्या मराठीभाषी लोकांच्या सामाजिक रूढी व चालीरीती व एकंदर समाजव्यवस्था खरोखर आश्चर्य वाटण्याइतक्या सारख्या आहेत. महाराष्ट्रीय जनतेचे ब्राह्मण, मराठा व महार हे जे मुख्य तीन वर्ग मानले जातात ते या प्रदेशात बहुतांशी सर्वत्र सारख्याच प्रमाणात विखुरलेले आहेत. आणि त्या त्या वर्गामध्ये आपण कोठेही असलो तरी एक आहोत ही भावना कायम आहे व त्यांच्यामध्ये सामाजिक व्यवहारही मोठ्या प्रमाणावर चालू आहे. या सर्व प्रदेशाची धार्मिक व सांस्कृतिक परंपरा एकच आहे. या प्रदेशातील जनतेच्या श्रद्धास्थानी असलेले संत, पूजास्थानी असलेल्या ऐतिहासिक व्यक्ती व तिच्या स्मृतिसंपुटात साठविलेला इतिहास व परंपरा ही सर्वत्र एकच आढळून येतात. सामाजिक अगर सांस्कृतिक भिन्नता

दाखविण्यासाठी या सर्व प्रदेशाचे विभाग करू म्हटले तर तसे करणे शक्य होणार नाही इतका या प्रदेशातल्या जनतेमध्ये एकजिनसीपणा आहे. हा एकजिनसीपणा आजकाल निर्माण झालेला नसून तो कित्येक शतकांपूर्वीपासून चालत आलेला आहे. हा इतिहास व ही पूर्वपीठिका लक्षात घेता संयुक्त महाराष्ट्राच्या सरकारशी या प्रदेशातील जनता या एकात्मतेमुळे स्वयंस्फूर्तीने सहकार्य करील व एकनिष्ठ राहील यांत शंका नाही.

## महाराष्ट्राची आर्थिक व भौगोलिक एकात्मता

आर्थिक किंवा भौगोलिक दृष्टयाही या सर्व प्रदेशाचे आणखी विभाग पडण्यासारखे नाहीत. परंतु त्यातल्या त्यात भौगोलिकदृष्टया जर कोणता एक भाग पडण्यासारखा असेल तर तो कोकण हा होय. कोकणची भौगोलिक व आर्थिक परिस्थिती इतर कोणत्याही विभागापेक्षा जरा वेगळी आहे. परंतु म्हणून कोकणचा एक वेगळा राजकीय प्रांत करावा असे आजपर्यंत कोणी सुचविलेले नाही व कोणी सुचवील असे वाटत नाही. निदान गेली १००० वर्षे तरी कोकण हे राजकीयदृष्टया कधीच स्वतंत्र नव्हते व ते नेहमीच घाटावरच्या महाराष्ट्राला जोडलेले होते. उरलेल्या महाराष्ट्रात तर वर म्हटल्याप्रमाणे विशेष असे आर्थिक अगर भौगोलिक भेद नाहीतच. त्याप्रमाणे त्यातील कोणत्याही एका भागाचे हितसंबंध इतर भागांहून काही विशेष वेगळे आहेत अशीही परिस्थिती नाही. कारण कोणत्याही एका भागात औद्योगिक वाढ केंद्रित झालेली नाही किंवा विशिष्ट प्रकारचे उत्पादन व उत्पादनव्यवस्था इतर भागांपेक्षा अगदी भिन्न अशा प्रकारची नाही. आज निरनिराळ्या सहा सरकारांमध्ये वाटल्या गेलेल्या महाराष्ट्रातील कोणत्याही विभागाकडे पाहिले तर मराठीभाषी प्रदेशाची झालेली वाटणी अगदी अर्थहीन असल्याचे उघड दिसून येते. महाराष्ट्रातील कोल्हापूर वगैरे दक्षिणी संस्थानांतील आर्थिक, सामाजिक अगर सांस्कृतिक जीवन हे त्यांच्या लगतच्या प्रदेशातील जीवनापेक्षा कोणत्येही तऱ्हेने वेगळे नाही. वऱ्हाडमधील आर्थिक परिस्थितीही खानदेशच्या आर्थिक स्थितीशी जितकी जुळती आहे तितकी ती भंडारा किंवा चांदा ह्या मध्यप्रांतातील जिल्ह्यांच्या आर्थिक परिस्थितीशी जुळती नाही. त्याप्रमाणेच निझामच्या राज्यातील मराठवाडा हा भाग व अहमदनगर, सोलापूर, खानदेश व वऱ्हाडातील जिल्हे हे बव्हंशी एकजिनसी स्वरूपाचे आहेत. दख्खनच्या विस्तृत पठाराचा सर्व भाग एका विशिष्ट नमुन्याचा आहे. म्हणूनच या तीन विभागांचा आणखी एक स्वतंत्र प्रांत म्हणून त्यांची महाराष्ट्रापासून विभागणी करण्यात आली तर त्यांना किंवा ह्या सर्व प्रदेशाला ती मुळीच हितावह होणार नाही. हिंदुस्थानच्या संघराज्यात सर्व महाराष्ट्राचा मिळून एकच घटक न राहिल्याने महाराष्ट्र लंगडा व दुर्बल तर होईलच; शिवाय या विभागांचे कोणतेही विशिष्ट असे आर्थिक, सामाजिक अगर सांस्कृतिक हितसंबंध नसल्यामुळे त्या विभागांचे स्वतंत्र घटक बनविण्याने त्याचे कोणतेही हित साधण्याचा संभव नाही.

एखाद्या विस्तृत प्रदेशाचा एकच राजकीय प्रांत बनविल्याने त्यातील स्थानिक हितसंबंधांची गळचेपी होऊन कोणता तरी एखादा विभाग अगर प्रादेशिक गट हा इतरांवर वर्चस्व गाजवील अशी भीती केव्हा केव्हा व्यक्त केली जाते. तसेच एखाद्या विभागाची आर्थिक परिस्थिती इतरांपेक्षा थोडी बरी असल्यास त्याचा फायदा फक्त त्याच विभागाला न मिळता सर्व प्रदेशाला मिळेल; व त्यामुळे त्या विशिष्ट विभागाचे नुकसान होईल अशीही एक तक्रार केली जाते. अशी उघड उघड स्वार्थी तक्रार करणे हे हल्लीच्या काळात कितपत रास्त होईल हे न सांगताच समजण्यासारखे आहे. आज हिंदुस्थान आणि इतर दलित व गरीब राष्ट्रे ही अन्नधान्याच्या किंवा इतर बाबतीत संपन्न राष्ट्रांनी आपणांला विशेष सवलती द्याव्यात अशी मागणी करताना आढळतात. जगातील संपन्न राष्ट्रांनी गरीब राष्ट्रांना

मदत करावी हा न्याय जितका सर्वराष्ट्रीय व्यवहारात लागू पडतो त्यापेक्षा एकाच घटकातील निरनिराळ्या विभागांना तर तो अधिकच लागू व्हावयास पाहिजे. म्हणून ही संकुचित वृत्ती कोणी दाखविली तर ती स्वागतार्ह आहे असे म्हणता येणार नाही. सुदैवाने महाराष्ट्रात असा कोणताही एक विभाग वरील तक्रार करण्याला पुरेसे समर्थन असण्याइतका श्रीमंत नाही. फक्त उत्तर कोकण हा एकच भाग महाराष्ट्रातला सर्वांत गरीब विभाग आहे. बाकी कोल्हापूर किंवा दक्षिण सातारा, कालव्याच्या पाण्यावर पिकांचे उत्पन्न काढणारा मुंबई प्रांतातील इतर प्रदेश, खानदेश, वऱ्हाड आणि नागपूर हे सर्व भाग संपन्नतेच्या दृष्टीने जवळजवळ सारखे आहेत; व ते महाराष्ट्रात सर्वत्र विखुरलेलेच आहेत. कापसाला तेजी आली असताचा काळ सोडून दिला तर वऱ्हाडचे जिल्हे हे महाराष्ट्रातील इतर भागांपेक्षा काही विशेष संपन्न होते किंवा आहेत असे मानण्याचे कारण नाही. उलट विजेच्या शक्तीचे उत्पादन वाढविण्याच्या अगर अधिक पाटबंधारे व कालवे खोदण्याच्या शक्यतेमुळे भविष्यकाळात मुंबई प्रांतातील महाराष्ट्रच विशेष सधन होण्याचा संभव आहे. तेव्हा कोणत्याही एका संपन्न विभागाने आपली संपत्ती आपल्यासाठीच उपयोगात आणली जावी अशी संकुचित मागणी करण्यातील युक्तायुक्तता जरी बाजूला ठेवली तरी संयुक्त महाराष्ट्रात आज हा प्रश्नच उद्भवत नाही. एक भाग अगर प्रादेशिक गट दुसऱ्या भागांवर वर्चस्व गाजवील किंवा एखाद्या भागाकडे सरकारचे दुर्लक्ष होईल ही भीती नाहीशी करण्यासाठी महाराष्ट्राच्या भावी घटनेमध्ये जरूर तर काही योजना करणे शक्य आहे. मतदानाचा हक्क व राजकीय सत्ता ही सर्वत्र सारख्याच प्रमाणात वाटलेली असल्यानंतर संयुक्त महाराष्ट्रातील एक विभाग दुसऱ्या विभागावर वर्चस्व गाजवील ही भीती खरोखर निराधार आहे. सर्वसामान्यपणे राजकीय जीवनाच्या बाबतीत किंवा सामाजिक व आर्थिक प्रश्नांच्या बाबतीत ह्या सर्व प्रदेशात सारखीच परिस्थिती असल्यामुळे अशी कोणत्याही एका विभागातील लोकांच्या मनात भीती का निर्माण व्हावी हे समजणे मोठे कठीण आहे. या सर्व प्रदेशातील ग्रामीण जनताही सर्वसाधारणपणे एकाच प्रवृत्तीची व प्रकृतीची, सारखेच हितसंबंध असलेली व एकाच विचारसरणीची आहे. संयुक्त महाराष्ट्रातील राजकीय सत्ता त्यांच्याच प्रतिनिधींच्या हाती जाणार आहे. यामुळे त्यांनी निवडलेले प्रतिनिधी किंवा त्यांचे राजकीय कार्यक्रम आणि कार्यपद्धती यांबाबत निरनिराळ्या विभागांत फारसा फरक पडेल असे वाटत नाही. असे असले तरी काही विशिष्ट प्रादेशिक हितसंबंध रक्षण करण्याची जरुरीच भासल्यास त्या विभागांतील जनतेची भीती दूर करण्याच्या दृष्टीने प्रांताच्या घटनेमध्ये आवश्यक वाटल्यास काही तरी व्यवस्था करणे शक्य आहे. हिंदुस्थानातील सर्वच प्रांतांमध्ये हा प्रश्न उत्पन्न होण्याचा संभव आहे. तेव्हा तो कसा सोडविता येईल हे या व्यापक भूमिकेवरूनच पाहिले पाहिजे. प्रांतातील विशिष्ट विभागांना अगर शहरांना जास्तीत जास्त राजकीय स्वायत्तता देऊन हा प्रश्न सोडविता येण्यासारखा आहे. स्थानिक स्वराज्याच्या कल्पनेची व व्याप्तीची अशी ही केलेली वाढ आपल्या आजपर्यंतच्या राजकीय वळणाशी आणि महाराष्ट्रीय जनतेच्या परंपरेशी सुसंगत अशीच आहे.

संयुक्त महाराष्ट्र परिषद, प्रकाशन १ (पुणे, १९४६)

☆

# ४ . . मुंबई शहराचे भवितव्य

भाषावार प्रांतरचना समितीने मुंबई शहराच्या भावी राजकीय दर्जा-संबंधीचा मुद्दा आपल्या प्रश्नपत्रिकेत अंतर्भूत केला आहे. हा मुद्दा प्रश्नपत्रिकेत अशा स्वरूपात उपस्थित केला जातो याचा अर्थच असा की, हिंदी संघराज्याची घटना ज्या तत्त्वांवर घडविली जावयाची त्यांच्या मूलभूत कल्पनांचा आराखडाच जसा स्पष्ट व्हावयास पाहिजे तसा तो झालेला नाही. म्हणूनच या प्रश्नाचा विचार करताना हिंदी संघराज्यातील प्रदेशांची पुनर्रचना व अंतर्गत राजकीय संबंध यांची मूलतत्त्वे काय असावीत ते निश्चित ठरविण्यापासून सुरुवात केली पाहिजे. हिंदी घटना समितीने मान्य केलेल्या पहिल्या ठरावात हिंदी संघराज्याच्या संयुक्त स्वरूपावर तसेच त्याच्या घटकांनी उपभोगावयाच्या प्रांतिक स्वायत्ततेवर विशेष भर दिला आहे. या ठरावाचा तिसरा परिच्छेद पुढील प्रमाणे आहे :

"उपर्युक्त प्रांतांना त्यांच्या सध्याच्या सीमांनुसार अथवा सध्या घटनासमितीने व नंतर घटना कायद्याने ठरवून दिलेल्या मर्यादांत, शेषाधिकारांसह संपूर्ण स्वायत्त घटकांचाच दर्जा दिला जाईल अथवा कायम केला जाईल. जे अधिकार व अंमलबजावणी संघराज्याच्या स्वाधीन आहेत अथवा त्यास दिले गेले आहेत तसेच ज्या अधिकारांचे क्षेत्र संघराज्याच्या कल्पनेतच गर्भित अथवा अंगभूत आहे असे अधिकार व अंमल खेरीज करून बाकीच्या सर्व राज्यकारभाराचे अधिकार व अंमल यांबाबत या घटकांना पूर्ण स्वातंत्र्य राहील."

हिंदी संघराज्य हे हिंदी प्रदेशातील निरनिराळ्या लोकसमुदायांच्या एकत्रीकरणाने निर्माण झालेले संघराज्य आहे. ऐतिहासिक काळात यांपैकी बहुतेक घटकांना स्वतंत्र राजकीय अस्तित्व होते. यूरोप-खंडातील स्वतंत्र राष्ट्रांप्रमाणे विशिष्ट दर्जाही त्यांनी वेळोवेळी मिळविला होता. ब्रिटिश अमलात आपल्या देशाची वेगवेगळ्या राजकीय प्रांतांत जी फाळणी झाली ती करताना राजकीय परंपरा व भावना यांचा काडीमात्रही विचार करण्यात आला नव्हता. ऐतिहासिक योगायोगानेच केवळ प्रांतांची रचना होत गेली. परंतु पुढे जेव्हा हिंदी राजकारणात देशी लोकमताचे विशेष दडपण पडू लागले तेव्हापासून झालेली प्रांतांची पुनर्वाटणी व पुनर्रचना प्रांतांची राजकीय व सांस्कृतिक एकता विचारात घेऊनच करण्यात आली आहे. बंगाल प्रांतापासून बिहार व आसाम यांचे विभक्तीकरण, बंगालच्या फाळणीविरुद्ध उडालेली खळबळ, ओरिसा व सिंध यांची स्वतंत्र प्रांत म्हणून निर्मिती या सर्व घटना वरील धोरणाचे निरनिराळे टप्पेच समजण्यास हरकत नाही. हिंदुस्थानचे सार्वभौम लोकसत्ताक संघराज्य स्थापन करताना हा आडवळणाने होत आलेला प्रयोग आता झपाट्याने पुरा करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

## राज्यपुनर्रचनेमध्ये भाषिक एकात्मतेचे महत्त्व

हिंदी राज्यघटनेच्या प्राथमिक मसुद्यात ज्या स्वायत्त घटकांना स्थान मिळावयाचे आहे ते घटक एकजिनसी, समान उद्दिष्ट बाळगणारे व स्वघटकाविषयी इमान राखण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या जनसमुदायाचे असले पाहिजेत. राजकीय भावनांचा एकजिनसीपणा ज्या विशिष्ट तत्त्वाने निश्चित करता येतो, त्या तत्त्वाचा आढळ या घटकांच्या निर्मितीमध्येच अभिप्रेत आहे. भाषिक एकतेतच हे तत्त्व दिसून येते याबद्दल सर्वत्र एकवाक्यता आढळते. हिंदी भाषिकांचा गट बाजूला काढला तर हिंदुस्थानातील भाषिक संबंध हे फक्त वाङ्मयीन एकसंधताच नव्हे तर परंपरा, संस्कृती व सर्वसाधारणपणे राजकीय भावना यांचेही ऐक्य दर्शवितात ही गोष्ट सर्व ठिकाणी मान्य करण्यात आली आहे.

हे तत्त्व एकदा गृहीत धरले की पुढचा टप्पा, एकच प्रमुख भाषा बोलणाऱ्यांनी वसणूक केलेल्या सलग अशा प्रदेशाची मर्यादा ठरवून त्याप्रमाणे ओरिसा व सिंध यांच्या आखणीनुसार एकभाषिक घटक निश्चित ठरविणे हा होय. हा प्रदेश म्हणजे त्या विशिष्ट भाषिकांचा प्रांत व हिंदी संघराज्यातील एक स्वायत्त घटक होय. घटकाची उभारणी कोणत्याही तत्त्वानुसार झाली तरी त्याची एकात्मता असणे हे त्यातील मूलभूत तत्त्व होय. संयुक्त संघराज्य या कल्पनेमागील तत्त्वांची फोड करावयाची म्हणजे अशा कोणत्याही एका घटकाच्या मर्यादेत बसणारे सर्व प्रदेश संपूर्णतया त्या घटकाच्या नियंत्रणाखालील समजले पाहिजेत. एकभाषिक लोकांच्या प्रदेशाचेच निरनिराळे स्वायत्त घटक बनवावयाचे हे तत्त्व एकदा गृहीत धरले म्हणजे अशा प्रत्येक प्रादेशिक घटकामध्ये न्यायतः अंतर्भूत होणारा प्रदेश हा त्या विशिष्ट स्वायत्त भाषिक गटाच्याच नियंत्रणाखाली राहिला पाहिजे हे उघड आहे. असल्या एखाद्या घटकामधील कोणताही प्रादेशिक विभाग हिरावून घेण्याचा कसलाही प्रयत्न करण्यात आला तर तो हिंदी संघराज्याच्या कल्पनेला तसेच चालू अथवा होऊ घातलेल्या प्रांतरचनेच्या एकात्मतेला विघातक आहे एवढेच नव्हे तर त्या विशिष्ट भाषिक गटाच्या प्रतिष्ठेवर घाला घालणारा आहे.

गेल्या सबंध वर्षभर जुन्या संस्थानी प्रदेशाची पुनर्रचना नव्या धोरणानुसार करण्यात येत असून या रचनेत राजकीय एकसंधता साधणे हा एक उद्देश आहे. शिवाय हिंदीतर भाषिकांचे जे जे लहान गट स्वतंत्रपणे अस्तित्वात होते त्यांच्या प्रादेशिक ऐक्यास बाध न आणता ते एकत्र आणून त्यांचा जास्तीत जास्त मोठा एकभाषिक संघ तयार करावा हे तत्त्व ही पुनर्रचना करताना अवलंबिण्यात आले आहे. सौराष्ट्राची निर्मिती तसेच गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक, ओरिसा वगैरे प्रांतांतील संस्थाने यांच्या विलिनीकरणात हेच तत्त्व गृहीत धरल्याचे आढळते.

## प्रांतीयतेचा खोडसाळ आरोप

भाषावार प्रांतरचनेची मागणी ही फुटीर वृत्तीची द्योतक आहे असा एक आरोप अलीकडे करण्यात येतो. ही मागणी करणाऱ्यांच्या हेतूंबद्दल अशा प्रकारे खोडसाळ गैरसमज पसरविण्याइतकी तर्कदुष्टता दुसरी कोणतीही नसेल. ही मागणी करणाऱ्यांच्या मनात संघराज्याच्या सार्वभौमत्वाविषयी अथवा त्याच्या विशिष्ट अधिकाराविषयी कोणताही दुरावा नाही. भाषावर प्रांतरचनेची मागणी करणारांना एवढेच म्हणावयाचे आहे की घटनासमितीच्या कार्याला आधारभूत असलेले व सर्वांनी एकदा एकमताने मान्य केलेले हिंदी संघराज्याचे स्वरूप आपण एकदा प्रमाणभूत मानले म्हणजे नंतर त्याच्या स्वायत्त घटकांची निर्मिती एका ठळक व तर्कशुद्ध विचारप्रणालीप्रमाणेच घडवून आणावयाला पाहिजे. यापूर्वी ब्रिटिश अमलात असलेल्या प्रांतांच्या मर्यादा व त्यांत विशिष्ट वर्गास मिळालेल्या सवलती यांचा नवीन प्रांतरचनेच्या कामी कसलाही मुलाहिजा ठेवता कामा नये. नवीन स्वायत्त घटकांना आताच्या प्रांताचाच दर्जा राहील. हे घटक हिंदी संघराज्याशी समान निष्ठेने राहतील याबद्दल कसलीही

शंका बाळगण्याचे कारण नाही. भाषावार प्रांतरचनेच्या मागणीदारांवरील फुटीर वृत्तीच्या आरोपास आणखीही एका प्रकारे उत्तर देता येईल ते असे : भाषावार प्रांतरचनेची मागणी करणाऱ्या गटांखेरीज इतर एकभाषिक गट आधीच हिंदी राज्यात अस्तित्वात आहेत की नाहीत? विजोड लोकसंख्येचे प्रदेश एकत्र करण्यात काही विशेष श्रेय मिळावयाचे असेल अथवा निरनिराळ्या भाषिक गटांना एका दावणीत बांधण्यामुळे जर काही उच्च प्रकारच्या राष्ट्राभिमानाची पैदास होणार असेल तर बंगाल, बिहार, ओरिसा, आसाम व संयुक्त प्रांत यांच्या सीमा सोयीस्करपणे बदलण्यासाठी ताबडतोब प्रयत्न करावयास पाहिजेत! तसे प्रयत्न न होता एकभाषिक प्रांतरचनेमुळे होणारे राजकीय व इतर फायदे या प्रांतांना यापुढेही जर अबाधितपणे मिळणार असतील तर इतर प्रांतांना ते तसेच का मिळू नयेत? खरे पाहिले असता बिहारी, बंगाली, आसामी अथवा ओरिया यांची ऐतिहासिक काळातील स्वतंत्र प्रांताची मागणी अथवा 'गरवी गुजरात'च्या पुढाऱ्यांची महत्त्वाकांक्षा यापेक्षा भाषावार प्रांतरचनेच्या मागणीमध्ये फुटीर वृत्तीचे निदर्शक असे काहीही नाही. या मागणीस विरोध करणारे व तिची नालस्ती करणारे लोकही फक्त काही विशिष्ट वर्गांचेच आहेत. या लोकांना अशी भीती वाटत आहे की भाषावार तत्त्वानुसार प्रांताची फेरवाटणी झाली म्हणजे आपल्याला जुन्या व्यवस्थेत जे प्रमाणाबाहेर फायदे मिळत आहेत त्यांच्यावर गदा येईल. तसेच प्रांताच्या आजच्या विशिष्ट रचनेमुळे, प्रांताचे स्थायी रहिवाशी नसूनसुद्धा त्याच्या जीवनावर अधिकार चालविण्याच्या मिरासदारीला धोका पोहोचेल. साम्राज्यशाही वृत्तीची मुळे धरू पाहाणाऱ्या काही हिंदी भाषिक गटांकडूनही अलीकडे या मागणीला विरोध होऊ लागला आहे.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे भावी हिंदुस्थानातील नव्या प्रांतरचनेच्या मुळाशी पुढील तत्त्वे आहेत : (१) नव्याने निर्माण करावयाच्या प्रांतांतील घटकावयवांत समान राजकीय उद्दिष्ट असले पाहिजे. हिंदी भाषिक प्रांत सोडले तर एकभाषा हेच या एकजिनसीपणाचे खरेखुरे गमक होऊ शकते. (२) राजकीय एकसंधता साधणाऱ्या शक्य तितक्या मोठ्या अशा सलग प्रदेशाचा एक स्वायत्त घटक घडवावा. आणि (३) संयुक्त राज्यघटनेतील स्वायत्त घटकांनी परस्परांचा मान व दर्जा राखण्याच्या दृष्टीने एक आवश्यक बाब म्हणून प्रत्येक स्वायत्त घटकाच्या प्रादेशिक एकतेचा योग्य तो मान राखावा.

## मुंबई महाराष्ट्राचा अविभाज्य भाग

एकदा ही तत्त्वे स्पष्टपणे समजून घेतली म्हणजे मुंबई शहराच्या दर्जाविषयी प्रश्न उपस्थित करण्याची आवश्यकताच राहत नाही, हे कुणाच्याही लक्षात येईल. मुंबई व साष्टी बेटे म्हणजे कोकणचा एक भाग आहे, आणि मराठीला भाषेचे स्वरूप ज्या काळी प्राप्त झाले त्या काळापासूनच ह्या दोन्ही बेटांत मराठी भाषीयांची वस्ती आहे. शिलालेख, शिल्पाचे नमुने व इतर ऐतिहासिक साधने ही तपासून पाहता उत्तर कोकणात दमणगंगेपर्यंत मराठी भाषीयांची वस्ती नेहमीच होती आणि म्हणूनच हा प्रदेश महाराष्ट्रीय आहे, या गोष्टी निःसंशयपणे सिद्ध होतात.[1]

अलीकडच्या ऐतिहासिक कालात शिवाजी महाराज व त्यांचे वंशज यांनी मुंबईच्या उत्तर व दक्षिण दोन्ही दिशांनी कोकणची परकीयांच्या दास्यातून सुटका करण्याचे प्रयत्न केले. आज मुंबईच्या उत्तरेला कमीत कमी ८० मैलांवर गुजराती भाषेची सरहद्द सुरू होते. मुंबईच्या पूर्वेला व दक्षिणेला परकी भाषांची ही सरहद्द शेकडो मैल दूर आहे. अर्थातच मुंबई व साष्टी हा मराठी भाषीयांचाच प्रदेश

१. "मराठी भाषेची सुरुवात पश्चिम किनाऱ्यावर दमणगंगेपासून किंवा ठाणे जिल्ह्यापासून सुरू होते असे म्हणता येते." Baines, J. A., *Census of Bombay Presidency*, 1882.

होय. हिंदी संघराज्याच्या नव्या प्रांतरचनेत मुंबईच्या स्थानाबद्दल शंकाच उद्भवू शकत नाही. मुंबई शहर हा महाराष्ट्र या भाषिक घटकाचा एक भाग आहे आणि तो तसाच राहील ही गोष्ट स्पष्ट आहे.

मुंबई व तिच्या आसपासच्या प्रदेशात मराठी भाषीय लोक नेहमीच बहुसंख्येने राहात आले आहेत. मुंबई व इतर बेटे पोर्तुगीज किंवा इंग्रज लोकांच्या ताब्यात जाण्यापूर्वी मराठीतर लोकांची वस्ती तेथे असावी असे म्हणण्यास आधार नाही. १९ व्या शतकात बाहेरचे लोक मुंबईत येण्यास सुरुवात झाली. परंतु त्यांतही मराठी भाषीयांचीच संख्या अधिक होती. मुंबईत मराठी भाषीय बहुसंख्य होते ही गोष्ट १८८१ ते १९३१ पर्यंतच्या खानेसुमारीच्या रिपोर्टावरून स्वच्छपणे दिसून येते. १९४१ च्या खानेसुमारीत मराठी भाषियांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा किंचित कमी आहे असे दिसते खरे. परंतु ही संख्या १९३१ मधील संख्येपेक्षा फारशी घटलेली किंवा वाढलेली नाही. मराठी भाषीयांच्या बहुसंख्येची ही बाब बाजूला ठेवली तरी मराठीशिवाय दुसरी कोणतीही भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या मुंबईत २१ टक्क्यांपेक्षा केव्हाही अधिक नव्हती, ही गोष्ट लक्षात घेणे जरूर आहे. शिवाय भाषावार प्रांतरचनेचा विचार करताना त्या प्रांताच्या अंतर्भागात सामावणाऱ्या एखाद्या विशिष्ट प्रदेशातील जनतेची भाषा कोणती हे विचारात घेण्याचे कारण नाही. तसे करणे असंबद्ध होईल. असा प्रदेश दोन भाषा विभागांच्या सरहद्दीवर वसलेला असेल तरच या मुद्द्याला महत्त्व प्राप्त होते. कारण या ठिकाणी प्रांताच्या सीमा निश्चित करावयाच्या असतात. उदाहरणच घ्यावयाचे झाले तर मालेगावचे घेता येईल. मालेगाव हे महाराष्ट्राच्या अंतर्भागात असून तेथील बहुसंख्य रहिवाशी उर्दू भाषीय मुसलमान आहेत. यावरून मालेगाव हा पाकिस्तानचा एक भाग आहे असे कुणीही म्हणू शकणार नाही. त्याचप्रमाणे हिंदुस्थानातील अनेक शहरांत महाराष्ट्रीयांच्या लहानमोठ्या वसाहती पसरलेल्या आहेत. पण म्हणून या वसाहती महाराष्ट्राला जोडून घेण्याचा विचार कुणी करणार नाही किंवा ज्या प्रांतांत त्या वसल्या आहेत त्या प्रांतांचे ते घटक नाहीत असे कुणी म्हणू शकत नाही.

## महाराष्ट्राच्या सांस्कृतिक चळवळींचे केंद्र

मुंबई शहर हा महाराष्ट्राचा एक भाग आहे एवढेच नसून मराठी भाषीय जनतेच्या जीवनाचे अनेक दृष्टींनी ते केंद्र आहे. मराठी भाषीयांची जास्तीत जास्त शहरी वस्ती मुंबईतच आहे. म्हणूनच मराठी वृत्तपत्रव्यवसाय, मराठी ग्रंथप्रकाशन, मराठी रंगभूमी यांसारख्या सांस्कृतिक चळवळी यांचे ते प्रमुख केंद्र होऊन बसले आहे. या दृष्टिकोणाने पाहिले तर मराठीशिवाय इतर भाषा बोलणाऱ्या कोणत्याही गटाचे ते सांस्कृतिक केंद्र बनलेले नाही ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. महाराष्ट्रातील सर्व सडका व रेल्वे मुंबईला अभिमुख आहेत व त्या मुंबईशी केंद्रित झाल्या आहेत. सडकांचा व रेल्वेचा नकाशा पाहिल्यास हे अधिक स्पष्ट होईल. महाराष्ट्राचे शेजारी जे गुजरात किंवा कर्नाटक प्रांत, त्यांतील रेल्वे व रस्ते यांची रचना पाहिल्यास त्यांचा मुंबईशी असा संबंध नाही, हेही कळणे कठीण नाही. गुजरात व कर्नाटकातील दळणवळणाचे केंद्र मुंबई आहे असे मुळीच म्हणता येणार नाही. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या दळणवळणाचे मुंबई हे केंद्र बनल्यामुळे महाराष्ट्रातील व्यापाराचेही ते एकुलते एक मुख होऊन बसले आहे. अर्थातच व्यापारी पिळणुकीचेही ते केंद्र झाले असले तर त्यांत नवल नाही. या बाबतीत गुजरात व कर्नाटक यांचे मुंबईशी असलेले संबंध अत्यंत भिन्न आहेत. गुजरातची सारी नैसर्गिक बंदरे बलसाडच्या उत्तरेस आहेत. सौराष्ट्राची नवनिर्मिती होऊन तो हिंदी संघराज्यात सामील झाल्यामुळे गुजरातच्या व्यापारासाठी बंदरांची फार चांगली सोय झालेली आहे. कर्नाटकाला नवीन बंदर तयार करून देण्याच्या कामास हिंदी सरकारने हात घातला आहे. या नव्या बंदरातून कर्नाटकाच्या बऱ्याच व्यापाराची वाहतूक होईल. आणखी एका दृष्टीने पाहिले तर महाराष्ट्रातील

साधनसामग्रीचा उपयोग करणारी व्यापारी पेठ व औद्योगिक केंद्र म्हणून मुंबईचे महत्त्व आहे. गुजरात किंवा कर्नाटक प्रांतांतील साधनसामग्रीच्या बाबतीत महाराष्ट्राइतके हे विधान निर्धास्तपणे करता येणार नाही. उलट गुजरातला अहमदाबाद हे स्वतःचे असे एक औद्योगिक व व्यापारी मोठे केंद्र असून, शिवाय लहान लहान अनेक केंद्रे आहेत, आणि दुसरी होऊ घातली आहेत. या सर्व प्रमाणांवरून जी गोष्ट दिसून येते ती ही की मुंबई हा पूर्वकाली तर महाराष्ट्राचा एक भाग होताच पण आजही ते शहर मराठी सांस्कृतिक, बौद्धिक व शहरी जीवनाचे मोठ्यांतले मोठे केंद्र असून महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचाही तो मध्यबिंदू आहे. म्हणूनच ज्या महाराष्ट्राची राजधानी मुंबई नाही अशा महाराष्ट्राची निर्मिती करण्याची कल्पना अव्यवहार्य ठरेल आणि महाराष्ट्रापासून मुंबई निराळी करण्याचा एखादा प्रयत्न झाला तर महाराष्ट्राची राजव्यवस्था सुयंत्रितपणे चालणे अशक्य होऊन बसेल.

## ‘स्वतंत्र शहरा’ची कालबाह्य कल्पना

मुंबई शहराचा भावी राजकीय दर्जा आणि राज्यव्यवस्था यांचा तपशीलवार विचार करण्यापूर्वी मुंबई स्वतंत्र शहर करावे किंवा मध्यवर्ती सरकारकडून मुंबईचा कारभार हाकला जावा अशा ज्या योजना सुचविल्या जातात त्यांवर दोन शब्द लिहिले पाहिजेत. मुंबई शहर स्वतंत्र करावे म्हणणे म्हणजे जुन्या काळात पुन्हा प्रवेश करणे होय. मोठी राष्ट्रे उदयाला येण्यापूर्वीच्या मध्ययुगीन किंवा प्राचीन काळात ही “स्वतंत्र शहरा”ची कल्पना प्रचलित होती. त्या काळात ही स्वतंत्र शहरे एक तर सभोवतालच्या प्रदेशाचे सांपत्तिक शोषण करून त्यावर वैभव उपभोगणारी किंवा आजूबाजूच्या प्रदेशाविषयी बेपर्वाई दाखविणारी परदेशी व्यापाराची केंद्रे असत. विसाव्या शतकात आढळणारी स्वतंत्र शहरे ही मध्ययुगीन कालखंडाचे अवशेष होते. आज ते स्वतंत्र राज्यात समाविष्ट होऊन गेले आहेत. मुंबईची तुलना पुष्कळ वेळा डँझिग किंवा ट्रीस्टसारख्या आंतरराष्ट्रीय अंमलाखाली असलेल्या शहरांशी केली जाते. ही तुलना चुकीची आहे. एखाद्या बंदरी शहरात आणि आजूबाजूच्या किनारपट्टीत जे रहिवासी असतात, त्यांच्याहून भिन्न भाषा व भिन्न राष्ट्रीयत्व असलेले लोक अंतर्भागात असले तर राष्ट्राराष्ट्रांत कलह सुरू होतात आणि अशा वेळी त्या शहरावर आंतरराष्ट्रीय मालकी असणे इष्ट ठरते. डँझिग हे जर्मन शहर होते आणि ते शहर ज्या अंतर्भागाचे (hinterland) बंदर म्हणून उपयोगी पडत असे त्यांत पोलीश वस्ती होती. मुंबई हे मराठी शहर आहे आणि त्याचा अंतर्भागही महाराष्ट्र आहे. ऐतिहासिक काळात इटालियन लोकांनी ट्रीस्ट व त्याच्या आसपासच्या किनारपट्टीत हातपाय पसरले होते, त्यामुळेच ट्रीस्टमध्ये बहुतांशी इटालियन लोकांची वस्ती आहे. त्याचा अंतर्भाग मुख्यतः स्लाव लोकांचा आहे. परंतु मुंबई शहरात किंवा त्याच्या परिसरात परभाषीय लोक मराठी भाषीय लोकांपेक्षा अधिक संख्येने कधीही आले नाहीत.

मुंबईचा कारभार मध्यवर्ती सरकारकडून हाकला जावा अशीही सूचना पुढे आलेली आहे. संघराज्यरचनेच्या मूलभूत तत्त्वांना ही सूचना विरोधी आहे. संघराज्य हे अनेक स्वायत्त राज्यांच्या घटकांनी एकत्र आल्यामुळे तयार होते. किंवा असे म्हणू की संघराज्याच्या अमलाखालील प्रदेश मध्यवर्ती सत्तेच्या प्रत्यक्ष अमलाखाली असतात. संघराज्याच्या राजधानीसाठी राखून ठेवलेला एक, आणि वासाहतिक किंवा अर्धवासाहतिक स्वरूपाचा दुसरा. हा दुसऱ्या प्रकारचा प्रदेश कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे स्वायत्त राज्यांच्या राजकीय दर्जास पात्र झालेला नसतो, व तो इतर स्वायत्त राज्यांच्या बाहेर असतो. एखाद्या घटक राज्यातून विशिष्ट कार्यासाठी विशिष्ट जागा मिळविण्याचे अधिकार संघराज्य सरकारला असले तरी एखाद्या घटक राज्याचा एखादा भाग राज्य कारभारासाठी म्हणून संघराज्य सरकारने घेणे हे संघराज्याच्या मूलभूत तत्त्वांनाच मारक ठरेल.

महाराष्ट्राच्या इतर प्रदेशापासून मुंबई वेगळी काढण्याच्या योजनेचे जी कारणे देऊन समर्थन केले जाते त्यांचा आता आपण विचार करू. पहिले कारण हे की मुंबईमध्ये मराठी भाषीयांची जरी बहुसंख्या असली तरी हे लोक मुख्यतः कारकुनी व कामकरी पेशाचे आहेत; आणि उद्योगपती, पुंजीपती, व्यापारी व सटोडिये बहुसंख्येने परभाषी आहेत. ही खरी गोष्ट आहे; आणि ब्रिटिश राजवटीतील अर्थकारणाच्या इतिहासाचा तो वारसा आहे. मुंबई शहरातच हा प्रकार दिसतो असे नसून कलकत्त्यासारख्या अनेक शहरांतूनही तो आढळतो. ब्रिटिशांच्या काळात ज्या आर्थिक सत्ता वावरल्या त्यांचा तो क्रमप्राप्त परिणाम होय. हिंदुस्थानबाहेर आग्नेय आशियात तर त्यांचा अधिक चमत्कारिक व एकांतिक परिणाम झाला. "बहुविध समाज" (plural society) नावाने ओळखली जाणारी एक नवीन आणि कठीण परिस्थिती तिकडे निर्माण झाली. ब्रह्मदेशातील परिस्थिती एका लेखकाने पुढीलप्रमाणे वर्णन केली आहे :

"खुद्द स्वतःच्या देशातील औद्योगिक क्षेत्रात ब्रह्मी मनुष्याला हळूहळू कमी महत्त्व मिळू लागले. रंगूनमध्ये म्हणजे राजधानीच्या शहरात तो निर्माल्यवत ठरला. गरिबीच्या कलंकाने त्याला निकामी बनविले." (Collis : Trials in Burma, p. 216).

ब्रह्मदेश व रंगून यांचे हे वर्णन महाराष्ट्र–मुंबईशी काही अंशी जुळणारे असले तरी तिकडची परिस्थिती आपल्याकडच्या मानाने फारच पुढे गेली आहे असे म्हटले पाहिजे. पण असे असूनही रंगून ब्रह्मदेशाचा भागच नव्हे असे म्हणण्याचे धाडस अजूनपर्यंत कुणी केलेले नाही. हिंदुस्थानातल्या इतर ठिकाणांच्यापेक्षा मुंबईत ही परिस्थिती अधिक तीव्र झाली असेल. तरीही समाजवादी लोकराज्य समजल्या जाणाऱ्या राष्ट्राच्या प्रादेशिक घटकांची रचना करताना, विशिष्ट प्रदेशावर खरी मालकी कुणाची आहे हे न पाहाता, ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या कारकीर्दीत मालकी हक्क कुणाच्या हातात पडले याकडे जर लक्ष दिले गेले तर समाजवादी लोकराज्य निर्मितीच्या कल्पनेची ती थट्टा होईल.

## अन्यभाषीयांचा प्रश्न

मुंबईत मराठी भाषीय समाज बहुसंख्य असला तरी अन्यभाषीयांची वस्तीही बरीच मोठी आहे. मुंबई महाराष्ट्रात गेली तर या मराठीतर समाजाला अन्याय केल्यासारखे होईल असे म्हटले जाते. हे विधान मान्य केले तर संघराज्याची शांततापूर्ण रचना व राज्यकारभार यांच्या मुळावरच घाव घातल्यासारखे होणार आहे. या युक्तिवादाचा अर्थ असा होतो की एखाद्या प्रांताने आपल्या प्रदेशात अन्य भाषीय लोकांना वस्ती करून राहाण्यास वाव दिला तर कालांतराने या वसाहती मूळ प्रांतातून फुटून जाण्याचा धोका त्याला पत्करावा लागेल. शांतता आणि स्नेह यांच्या योगाने निर्माण झालेल्या संघराज्यातील एखाद्या घटकराज्याच्या नागरिकाला दुसऱ्या कुठल्याही घटकराज्यात जाण्याचा व वस्ती करून राहाण्याचा अधिकार असतो हे गृहीत धरले पाहिजे. निरनिराळ्या राज्य-घटकांत किंवा त्यांतील विशिष्ट प्रदेशांत अन्यभाषीयांची संख्या लहान किंवा मोठी असेल. परंतु या अन्यभाषीय जमातीला प्रांताच्या प्रादेशिक एकतेत किंवा त्यातील एखाद्या प्रदेशाच्या राजकीय दर्जात बिघाड होईल असे वर्तन करण्याची खात्रीने मोकळीक नसावी. एखाद्या प्रांतात प्रांतिक भाषेहून भिन्न भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या बरीच मोठी असली तर त्या प्रांतातील ती एक महत्त्वाची भाषिक अल्पसंख्य जमात ठरेल. संघराज्याच्या घटनेत त्या अल्प संख्यांकांचे अधिकार व हितसंबंध संरक्षिण्याची तरतूद केली जाईल. महाराष्ट्राबाहेर राहायला गेलेले मराठी भाषीय किंवा महाराष्ट्रात राहायला आलेले अन्य भाषीय या दोघांच्याही बाबतीत ही व्यवस्था सारखीच असेल. हिंदुस्थानच्या इतिहासात भिन्न भाषीय दळणवळण फार जुन्या काळापासून चालू होते. पेशव्यांच्या काळात पुण्याच्या रहिवाशांत मराठीतर भाषा बोलणाऱ्यांची

संख्या विलक्षण मोठी होती. म्हणून कुणी पुणे शहर त्याच्या परिसरापासून अलग करावे असे म्हणू शकला नसता. मुंबईला हे तत्त्व लागू केले तर इतर प्रांतांतील अशा प्रदेशांविषयीचे प्रश्न ताबडतोब उभे राहातील; इतकेच नव्हे तर स्थानिक व अन्यभाषीयांच्या परस्परसंबंधांत सर्व ठिकाणी बिघाड उत्पन्न होईल.

याचसंदर्भात भाषावार प्रांतरचना समितीच्या प्रश्नपत्रिकेत कसातरी घुसडल्या गेलेल्या एका प्रश्नाचा उल्लेख केला पाहिजे. हा प्रश्न १९ वा असून तो खालीलप्रमाणे आहे :

"नवा प्रांत निर्माण केल्यामुळे मोठ्या प्रमाणावर लोकवस्तीची अदलाबदल करावी लागेल आणि तिचा क्रमप्राप्त परिणाम म्हणून जनतेचे हाल होतील असे तुम्हांस वाटते काय? तुम्हांला जर असे वाटत असेल तर हे संकट निवारण करण्याचा कोणता मार्ग तुम्ही सुचविता?"

या प्रश्नाला प्रतिप्रश्न विचारूनच उत्तर देता येईल. संयुक्त प्रांत, बिहार, बंगाल, आसाम, ओरिसा इत्यादी प्रांतांत त्या त्या प्रांतांच्या भाषेहून अन्य भाषा बोलणारे लोक अजूनही वस्ती करून राहिले आहेत की तिथे लोकवस्तीची अदलाबदल करणे जरूर झाले आहे? आंध्र, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र इत्यादी प्रांतांची संस्कृती व सभ्यता, सहिष्णुता व शालीनता, राजकीय दर्जा व कारभाराची लायकी यांचे सर्वसाधारण प्रमाण इतर प्रांतांपेक्षा निकृष्ट दर्जाचे आहे असे मानण्यास कारण नसताना समितीने हा प्रश्न विचारावयास नको होता. किती काळजीपूर्वक सीमा आखल्या तरी भाषिक अल्पसंख्यांक प्रत्येक राज्यात राहाणारच. भाषावार प्रांतरचना केल्यामुळे प्रांतांच्या राज्यकारभाराच्या किंवा सरकारी शाळाखात्याच्या भाषेत काही ठिकाणी बदल होईल. परंतु नागरिकाच्या राजकीय दर्जास किंवा आर्थिक जीवनास त्यामुळे कोणताही धक्का लागू शकणार नाही. संघराज्याचे नागरिकत्व हे कोणत्याही ठिकाणी सारखेच राहील आणि त्याचे व्यक्तिस्वातंत्र्य व हक्क घटनेने व कायद्याने संरक्षिले जातील. आपापल्या प्रदेशांतील भाषिक अल्पसंख्यांकांच्या बाबतीतले सर्व प्रांतांचे धोरण सारखेच असेल. या भाषिक अल्पसंख्यांकांनी प्रांताच्या खुद्द अस्तित्वास किंवा सुरळीतपणे चाललेल्या राज्यकारभारास धोका देण्याचा प्रयत्न केला तर हे धोरण बदलू शकेल. उदाहरणार्थ, भाषिक अल्पसंख्यांकांच्या वस्तीमुळे प्रांताला आपला एखादा प्रदेश गमावण्याची पाळी आली तर संघराज्याची बैठकच मुळी हादरली जाईल, आणि तीमुळे पुढे निर्माण होणारी परिस्थिती कठीण होईल. मग कोणताही प्रांत परभाषीयांना आसरा देण्यास तयार होणार नाही आणि अशा प्रकारे निर्वासितांचा प्रश्न उग्र स्वरूप धारण करील. तसेच संघराज्याच्या निरनिराळ्या प्रांतांत तूर्त राहात असलेल्या भाषिक अल्पसंख्यांकांना कदाचित असाही अनुभव येणे शक्य आहे की तेथील स्थानिक जनता असहिष्णुतेने वागते.

## मुंबईवर मध्यवर्ती शासन असमर्थनीय

मुंबईचा निराळ्या दृष्टिकोणाने विचार केला पाहिजे असे सांगताना जो आणखी एक मुद्दा पुढे केला जातो तो हा की मुंबई हे एक मोठे बंदर व विशाल औद्योगिक केंद्र आहे. आर्थिक दृष्ट्या एखाद्या प्रदेशाचे महत्त्व कितीही मोठे असले तरी संघराज्यरचना असलेल्या राष्ट्रात तो विशिष्ट प्रदेश मध्यवर्ती सत्तेच्या अमलाखाली असला पाहिजे असे म्हणण्यास सयुक्तिक कारण नाही. संघराज्याची घटना करताना संघराज्यातील सर्व प्रदेशांबाबतचे सर्वसाधारण आर्थिक महत्त्वाच्या विषयांसंबंधीचे अधिकार मध्यवर्ती सरकारच्या हाती सुपूर्द केलेले असतात. संघराज्यातील मोठी बंदरे, विमानतळ किंवा मूलभूत उद्योगधंदे घटक प्रांतांत असोत किंवा मध्यवर्ती सरकारच्या अमलाखालील प्रदेशांत असोत, त्यांच्यावर संघराज्य सरकारचा सारखाच अधिकार चालतो. संघराज्याच्या घटनेत खात्याची विभागणी जेव्हा करण्यात येते तेव्हा मध्यवर्ती सरकारने कारभारासाठी घ्यावयाचे विषय संघराज्य सरकारच्या

विषयांच्या यादीत (Federal Subjects) समाविष्ट केले जातात. एखाद्या प्रदेशाचा प्रत्यक्ष राज्यकारभार हाती घेतल्यामुळे संघराज्य सरकारचे जे अधिकार वाढतात ते घटक प्रांतांना व स्थानिक अधिकाऱ्यांना सर्वसाधारणपणे देण्यात आलेल्या अधिकारांच्या दिशेने. मध्यवर्ती सरकारच्या अमलाचे पुढीलप्रमाणे परिणाम होतात:–(१) संघराज्य सरकारच्या अमलाखाली असलेल्या प्रदेशाचा त्याच्या परिसरातील प्रांतात समाविष्ट होण्याचा हक्क नाकारला जातो. (२) स्वतःच्या कारभार स्वतः हाकण्याचा हक्क अमान्य केला जातो. याचे कारण असे की मध्यवर्ती सरकारच्या अमलाखाली असलेल्या प्रदेशाचा दर्जा स्वायत्त प्रांतांच्या बरोबरीचा नसतो. मध्यवर्ती सरकारच्या अमलाखालील एखादा अधिकारी या प्रदेशाचा कारभार चालवितो. तिसरा परिणाम साहजिकपणे असा होईल की मध्यवर्ती सरकारच्या प्रत्यक्ष अमलामुळे संघराज्याची राष्ट्रभाषा या प्रदेशात प्रभावी होईल व त्या मानाने प्रादेशिक भाषेची गळचेपी होईल. याचा आणखी एक परिणाम शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी चळवळींवर झाल्याविना राहणार नाही. या परिणामांशी एखाद्या प्रदेशातील आर्थिक घडामोडींचा काहीच संबंध नसतो ही गोष्ट उघड आहे. संघराज्य सरकारचे आर्थिक व राजकीय हितसंबंध घटनेने मर्यादित केलेले असतात. एखादा प्रदेश त्याच्या प्रत्यक्ष अमलाखाली दिल्यामुळे त्याच्या अधिकारांत किंवा हितसंबंधांत भर पडते असे नाही.

मुंबई संघराज्य सरकारच्या अमलाखाली देण्याची ही सूचना जर मान्य करण्यात आली तर मुंबईशिवाय इतर अनेक शहरांच्या बाबतीत हाच मार्ग अनुसरणे तर्कशुद्ध होईल. फक्त मुंबईच नव्हे तर आर्थिक दृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या सर्व केंद्रांना हाच न्याय लागू करावा लागेल. कलकत्ता, मद्रास, विजगापट्टण यांच्यासारखी मोठी बंदरी शहरे व पुढेमागे मोठ्या बंदरांच्या दर्जाला पोचणारी शहरे, तसेच अहमदाबाद, कानपूर, जमशेटपूर सारखी उद्योगकेंद्रे असलेली शहरे मध्यवर्ती सरकारच्या अमलाखाली द्यावी लागतील. या सूचनेचा असा तर्कशुद्ध विस्तार केला नाही तर महाराष्ट्राचे आर्थिक सामर्थ्य व त्याचे राजकीय व सामाजिक जीवन बुद्धिपुरस्सर लुळे पांगळे करण्याचा हा एक डाव आहे असे म्हणावे लागेल.

## सार्वमताची सूचना अनुचित

कधी कधी असाही युक्तिवाद केला जातो की हा सबंध प्रश्न सार्वमताने सोडवता येईल. मुंबई महाराष्ट्रात राहावी, तो एक स्वायत्त घटक व्हावा की मध्यवर्ती सरकारच्या अमलाखालील प्रदेश व्हावा, याच मुद्यावर सामान्यतः सार्वमत घेतले जाईल. सार्वमताच्या सूचनेमुळे दोन प्रश्न निर्माण होतात. सार्वमताची मागणी समर्थनीय ठरण्यासाठी त्या विशिष्ट प्रदेशाकडून काही अपेक्षा पुऱ्या व्हाव्या लागतात. निराळा स्वतंत्र प्रांत बनविण्यासाठी किंवा संघराज्याच्या अमलाखालील प्रदेश करण्यासाठी सार्वमताची मागणी करण्याचा अधिकार सर्वच लहानमोठ्या प्रदेशांतील रहिवाशांना देणे शक्य नाही. संघराज्यातील स्वायत्त घटक प्रांताचा दर्जा मिळविण्यासाठी जो प्रदेश सार्वमताची मागणी करतो त्याचा विस्तार व साधनसंपत्ती स्वायत्त प्रांत बनविण्यास जरूर तितकी असली पाहिजे. आज संघराज्यात असलेल्या स्वायत्त घटकांच्या दर्जाची बरोबरी करू शकतील अशाच प्रदेशांना सार्वमताची मागणी करता येईल. ज्यांचे क्षेत्रफळ पुरेसे मोठे आहे, ज्यांची साधनसामग्री विविध व जरूर तेवढी आहे आणि शेजारच्या प्रदेशांहून ज्यांचे हितसंबंध स्पष्टपणे भिन्न आहेत अशाच प्रदेशांना सार्वमताचा हक्क बहाल करता येईल.

ज्या एकात्मतेच्या दर्जावर राजकीय एकसंधता आणि अंतर्गत एकात्मता असणाऱ्या प्रदेशालाच हक्क सांगता येईल तोच स्वायत्ततेचा दर्जा एखाद्या शहराला देता येणार नाही. एखाद्या प्रदेशातले

एखादे विशिष्ट शहर हे त्या प्रदेशातील विशिष्ट आर्थिक उलाढालींमुळे उदयाला आलेले असते. शहर हे केव्हाही स्वयंपूर्ण नसते. शहर व भोवतालचा प्रदेश मिळून एकसंध घटक बनतो. पुष्कळ वेळा शहरातील नागरिक ही गोष्ट विसरतात. ज्या वेळी शहरातील राबविणारा वर्ग हा सभोवतालच्या खेड्यांतील लोकांहून निराळा व असहिष्णू असतो त्या वेळी ही गोष्ट विशेषेकरून घडते. वास्तविक खेड्यांतील राबणाऱ्या वर्गामुळे शहराची उन्नती होत असते. शहर व ते ज्या प्रदेशात आहे तो प्रदेश ही एकमेकांवर अवलंबून असतात. अशा वेळी आर्थिक व राजकीयदृष्ट्या शहर त्या प्रदेशातून वेगळे काढण्याची कल्पना आजच्या राजकीय, आर्थिक वा सामाजिक तत्त्वज्ञानाला धरून नाही. उलट शहरे व त्यासभोवतालील प्रदेश एकात्म असावे, निदान त्यांत समतोलपणा असावा, यावरच आजकाल अधिक भर दिला जातो. शहरांतील लोकसंख्येच्या बेसुमार वाढीमुळे जे गुंतागुंतीचे प्रश्न उपस्थित झाले आहेत ते सोडविण्याचे प्रयत्न विकेंद्रीकरण व प्रादेशिक एकात्मता या दिशेने झाले पाहिजेत, असे समाजशास्त्राच्या अभ्यासकांचे मत आहे. 'स्वतंत्र शहरे' करण्याचा दावा या प्रागतिक कल्पनेला विरोधी असून तो मध्ययुगीन आहे. मध्ययुगीन राज्यव्यवस्था पुनरुज्जीवित केली तर मध्ययुगीन लढेही अटळ होतील ही गोष्ट या ठिकाणी लक्षात घेतली पाहिजे.

सार्वमताची सूचना अनुचित आहे. तो एक सरळ सरळ डाव आहे. जे लोक ही सूचना करतात त्यांना असे वाटते की मुंबईत मराठीतर भाषा बोलणाऱ्या लोकांची जी स्थिर व अस्थिर (floating) मोठी संख्या आहे ती महाराष्ट्राच्या विरूद्ध मत देईल.

१९३९ मधील मुंबईच्या लोकवस्तीचे वर्णन खालीलप्रमाणे करण्यात आले आहे.

"मुंबई शहरातील लोकवस्तीच्या तळाचा थर मूळ रहिवाशांचा आहे. परंतु बाहेरून आलेल्या लोकांनीच ती अत्यंत मोठ्या प्रमाणावर व्यापलेली आहे. त्यांतील काही लोकांनी मुंबईत कायम वस्ती केली आहे तर काही लोक केवळ उद्योगधंद्यासाठीच येथे आलेले आहेत. धंदा-नोकरीचा काळ संपला म्हणजे ते मुंबई सोडून जातात." (Report of the Rent Enquiry Committee, 1939, Vol. I, p. 5)

हा अहवाल लिहिला गेल्यानंतर मुंबईची अस्थिर लोकसंख्या भलतीच वाढली आहे. असल्या लोकसंख्येच्या मतावर एखाद्या प्रदेशाच्या कायमच्या भवितव्याचा प्रश्न अवलंबून ठेवणे अव्यवहार्य आहे. या निर्णयाला राजकीय महत्त्व नाही की नैतिक वजन नाही. मराठीशिवाय अन्य भाषा बोलणाऱ्या लोकांनी मुंबई या मराठी प्रदेशाचे भवितव्य ठरविणे म्हणजे त्यांचा दुहेरी फायदा होणे. त्यांच्या मताने मुंबईचे भवितव्य ठरविले जाणे हा एक व त्यांच्या स्वतःच्या प्रांतांतील औद्योगिक केंद्रे निराळी न करणे हा दुसरा. त्यांचे हे मुंबईविषयीचे मत त्यांच्या प्रांतांतील औद्योगिक शहरांनाही लागू केले असते, तर ते योग्य झाले असते. म्हणूनच ही योजना मुंबईबरोबरच मद्रास, विजगापट्टण, कलकत्ता, कानपूर इत्यादी शहरांच्या बाबतीत अमलात आली असती तर तिला काही अर्थ होता.

सारांश, महाराष्ट्रातून मुंबई निराळी काढण्यास कोणताही सयुक्तिक आधार नाही. मुंबई शहर हा मराठी प्रदेशाचा एक भाग आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचा तो मध्यबिंदू आहे. मराठी भाषीयांच्या सांस्कृतिक व बौद्धिक चळवळीचे ते मोठ्यांतील मोठे केंद्र आहे. मुंबई ही उद्योगधंद्याचे केंद्र आहे म्हणून तिच्यावर जे नियंत्रण मध्यवर्ती सरकारला ठेवायचे असेल ते इतर औद्योगिक शहरांप्रमाणेच, मुंबई महाराष्ट्रात असूनही ठेवता येईल. मध्यवर्ती सरकारला असे नियंत्रण ठेवायचे आहे म्हणून मुंबई त्याच्या अंतर्भागापासून विभक्त केली पाहिजे हे म्हणणे असमर्थनीय होय. कोणतेही शहर स्वायत्त राजकीय घटक होऊ शकत नाही. अस्थिर लोकसंख्येच्या मतावर हिंदी संघराज्यांतील घटकांची पुनर्रचना करण्याची सूचना करणे वेडेपणाचे आहे. आर्थिक व राजकीय दृष्ट्या मुंबई शहर

अखिल महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे व भावी कालातील प्रांतांच्या पुनर्रचनेतही त्याला तेच स्थान दिले गेले पाहिजे.

## मुंबईचे प्रश्न

आता आपण मुंबईच्या भवितव्याचा आणि तिच्या जीवनात जे अनेक बिकट प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांचा राजकीय व राज्यकारभाराच्या दृष्टीने विचार करू. मुंबईच्या दर्जाबद्दल वाद–विवाद करताना खऱ्या वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष केले जाते. मुंबई ही तिच्या अंतर्भागापासून वेगळी आहे अशी कल्पना करून तिचा विचार करण्याच्या पद्धतीचा हा परिणाम आहे. मुंबईचे स्वतंत्रपणे महत्त्व वाढविण्याचे, मुंबईत संपत्ती व सत्ता यांचे केंद्रीकरण करण्याचे, आणि ती एक स्वतंत्र घटक आहे असा प्रचार करण्याचे बुद्धिपुरस्सर किंवा अबुद्धिपुरस्सर प्रयत्न केले जातात. याचा परिणाम असा झाला की, मुंबईचे आधीच कठीण असलेले प्रश्न अधिक कठीण होऊन बसले, तिच्या आजूबाजूच्या प्रदेशातील साधनसामग्रीकडे एकतर दुर्लक्ष झाले किंवा तिचा दुरुपयोग करण्यात आला, व तेथील जनता अधिकाधिक गरीब होत गेली.

लंडनच्या प्रश्नाशी मुंबईच्या प्रश्नाची तुलना केली तर तो समजण्यास अधिक सुलभ होईल. इंग्लंड-मधील औद्योगिक लोकसंख्येची व्यवस्था लावण्यासाठी नेमण्यात आलेल्या रॉयल कमिशनने (बार्लो कमिशन) आपल्या अहवालात शहरांचा प्रश्नही हाताळला आहे. शहरांच्या प्रश्नांची चर्चा करताना कमिशनने एका अमेरिकन रिपोर्टातील एक उतारा उद्धृत केला असून त्या उताऱ्याचा काही भाग पुढीलप्रमाणे आहे :

"अत्यंत लहान भूभागात अत्यंत मोठ्या लोकवस्तीने दाटीवाटीने राहणे म्हणजे वेळ, शक्ती व साधनसंपत्ती यांचा नाश करणे होय...ह्या शहरी लोकवस्तीचा मूलभूत आर्थिक पाया पक्का असेल, आणि तिच्या मर्यादित क्षेत्रफळामुळे उद्भवणाऱ्या अडचणींचे उल्लंघन करणे कष्टाचे नसेल, तर आदर्श शहरे निर्माण करण्याच्या दृष्टीने अशा शहरातील लोकवस्ती विखरून टाकणे योग्य नव्हे. उलट कमिटीचे असे मत आहे की योजनाबद्ध आखणी करून शहराची दूरदृष्टीने पद्धतशीर सुधारणा वेळोवेळी करावी." (रिपोर्ट पृ. १५४–५) हे तत्त्व एखाद्या विशिष्ट शहराला कसे लागू करावे याची चर्चा करताना कमिटी म्हणते की, "अशा वेळी शहराचे क्षेत्रफळ केवढे लहान आहे किंवा त्याची लोक-संख्या केवढी मोठी आहे या गोष्टी विचारात घेण्याचे कारण नसून समाजाच्या सामुदायिक जीवनाचा उत्कर्ष साधण्यात त्याचा किती उपयोग होतो हे पाहणे जास्त महत्त्वाचे आहे."

शहराचे क्षेत्रफळ अमुक इतक्या विस्ताराचे असलेच पाहिजे असे कमिटीचे म्हणणे नाही. कमिटी ज्या एका मुद्दयावर भर देते तो हा : "मोठ्यांतील मोठी शहरे धरून देशातील सर्व शहरांची उभारणी योजनाबद्ध असली पाहिजे. तशी उभारणी करणे यापुढे शक्य नसेल तर त्यांची सुधारणा आणि पुनर्रचना झाली पाहिजे. त्यामुळे वाढती गर्दी, सूर्यप्रकाश व मनोविनोदाची साधने यांचा अभाव, रहिवाशांच्या आरोग्यावर होणारा वाईट परिणाम व वाढत्या रहदारीमुळे होणारा शक्तीचा अपव्यय, वगैरे जे प्रश्न आज निर्माण झाले आहेत त्यांना तोंड देता येईल." (रिपोर्ट पृ. १५६). शहरांतील वाढत्या गर्दीपेक्षा बेशिस्त गर्दी हटविण्याचे प्रयत्न प्रथम केले पाहिजेत, असे कमिटीचे मत आहे. लोकसंख्येची व उद्योगधंद्यांची शहरांतील ही बेशिस्त गर्दी ओळखण्याची साधी, सोपी खूण कमिटीने सांगितलेली नाही. पण दर एकरी लोकसंख्येचे प्रमाण, हाऊस ॲक्टप्रमाणे दर एकरी घरांच्या व कारखान्यांच्या संख्येचे प्रमाण, दर एकरी खुल्या जागेचे प्रमाण, वाहतुकीच्या अडचणी, जमिनीच्या किमती, इत्यादी साधनांनी शहरांतील गर्दी बेशिस्त व अनैसर्गिक झाली आहे की काय हे समजून

घेता येईल असे कमिटीने सांगितले आहे. वाहतुकीच्या साधनांवर जो ताण पडेल त्याच्या प्रमाणावरूनही शहरांतील उद्योगधंद्यांच्या गर्दीची कल्पना करणे सुलभ होईल असेही कमिटीचे मत आहे.

## लंडनशी तुलना

लंडन शहराच्या प्रश्नाची चिकित्सा करताना कमिशनने दोन मुद्दे मांडलेले आहेत. (१) बृहत् लंडनमध्ये होत असलेली औद्योगिक वाढ व लोकसंख्या. (२) कामाच्या जागेपासून मजुरांची घरे दूर असणे. दुसऱ्या प्रश्नाबद्दल कमिशन शेरा मारते की कामाची जागा व राहण्याची जागा यांच्यामधील अंतर अनिर्बंधपणे वाढविता येणार नाही. त्याला काही मर्यादा असली पाहिजे. घरातून निघून कामाच्या जागी पोचण्याकरिता लागणारा वेळ व पैसा यांना आळा पडलाच पाहिजे. (पृ. १७३). हा मुद्दा स्पष्ट करताना कमिशनने काही उदाहरणे दिली आहेत. कोणत्या कारखान्यांतील मजूर वा ऑफिसांतील कारकून कुठे राहातात, त्यांना कामावर जाण्यासाठी कोणत्या वाहतुकीच्या साधनांचा उपयोग करावा लागतो, वेळ किती लागतो, खर्च किती येतो याचे तक्ते कमिशनने दिले आहेत. मुंबईच्या बाबतीत असे तक्ते वा आकडे उपलब्ध नाहीत. परंतु मुंबईत सुद्धा हा प्रश्न तीव्रतर आहे असे मानण्यास मुळीच हरकत नाही.

लंडन शहराच्या प्रश्नाची काळजीपूर्वक पाहणी करून कमिशनने शेवटी असा निर्णय घेतला की उद्योगधंद्यांच्या अस्तित्वामुळे लंडनमध्ये लोकसंख्येचा ओघ वाहता व वाढता आहे. त्यामुळे सामाजिक, आर्थिक, व राजनैतिक अशी एक समस्या निर्माण झाली असून तिच्याकडे ताबडतोब लक्ष पुरविणे अगत्याचे झाले आहे. कमिशनने मग अशी शिफारस केली आहे की एक नॅशनल इंडस्ट्रियल बोर्ड निर्माण करण्यात यावे व त्याला प्रथमपासून इंग्लंडमधील वाढत्या कारखान्यांचे नियंत्रण करण्याचे अधिकार देण्यात यावेत. रॉयल कमिशनने हा रिपोर्ट १९४० मध्ये केला होता. तेव्हापासून लंडनमध्ये या बाबतीत जी योजनाबद्ध हालचाल झालेली दिसत आहे ती या बार्लो कमिशनने सुचविलेल्या मूलभूत सिद्धांतांवरच आधारलेली आहे. सर पीटर ॲबरक्रोंबी यांनी बृहत् लंडनची योजना तयार करताना ज्या गोष्टी गृहीत धरल्या त्यांतील काही पुढीलप्रमाणे : (१) बार्लो कमिशनच्या शिफारशीप्रमाणे लंडन शहरात किंवा होम काउंटीजमध्ये नवीन कारखान्यांना वा उद्योगधंद्यांना मुळीच परवानगी देऊ नये. या नियमाला फार थोडे उद्योगधंदे अपवाद आहेत. (२) गर्दी झालेल्या कारखान्यांच्या केंद्रांचे विकेंद्रीकरण करावे. (३) बार्लो कमिशनच्या शिफारशींप्रमाणे लंडन शहर व होम काउंटीजची एकंदर लोकसंख्या वाढू देऊ नये, उलट ती कमी करावी. (४) जमिनीच्या किमतीचे नियंत्रण करणाऱ्या कायद्यांसारख्या नव्या अधिकार-साधनांचा नवरचनेत उपयोग करून घेता यावा.

शहरांतील लोकवस्तीच्या वाढत्या गर्दीचे महत्त्वाचे कारण जे औद्योगिक केंद्र त्याविषयी ॲबरक्रोंबी रिपोर्टात आणखी काही सूचना केल्या आहेत. (१) बृहत् लंडनमध्ये नवीन उद्योगधंद्यांस तर बंदी करावीच पण चालू धंद्याचाही खूप मोठा विस्तार करण्यास बंदी करावी. (२) शेतकीकडे अधिक लक्ष पुरविण्यात यावे. त्यामुळे खेड्यांतील शेतांवर राबणाऱ्या मजुरांस चांगले व कायम वेतन मिळू शकेल. अशा प्रकारे त्यांचे जीवनमान व राहाणीचा दर्जा वाढविता येईल आणि मोठ्या शहरांविषयी त्यांना वाटणारे आकर्षण या मार्गाने नष्ट झाल्यामुळे शहरांकडे वाहणारा लोकसमुदायाचा लोंढा थोपवून धरता येईल. 'Ministry of Town and Country Planning Committee'च्या मेमोरँडम्मध्ये (१९४७) बृहत् लंडन योजनेविषयी असे म्हटलेले आहे की बृहत् लंडनची लोकसंख्या १९३८ मधील लोकसंख्येपेक्षा केव्हाही वाढू देऊ नये. या योजनेवर मि. ल्युई ममफर्ड यांनी टीका केली आहे. त्यांचे म्हणणे असे की १९३८ मधील बृहत् लंडनची लोकसंख्याच मुळी वाजवीहून अधिक आहे.

बार्लो कमिशनने जे प्रश्न हाताळले आहेत त्या प्रश्नांविषयी मुंबईची स्थिती काय आहे हे समजून घेण्यासाठी मुंबईविषयी तसे आकडे उपलब्ध नाहीत. परंतु बऱ्याच बाबतींत मुंबईची स्थिती लंडनपेक्षा किती तरी पटीने अधिक वाईट आहे, ही गोष्ट उघड आहे. सामान्य दर्जाच्या देखील घरांची वाण, इतरत्र क्वचितच दिसेल अशी रहदारीची खेचाखेच, कामाच्या जागेपासून वस्तीच्या जागेपर्यंतचे अंतर, हे अंतर काटण्यासाठी खर्च होणारी शक्ती व पैसा, जमीन व घरे यांच्या वाढलेल्या किमती, यांवरून मुंबईचा प्रश्न जगातला एक बिकट प्रश्न होऊन बसला आहे असे म्हणावयास हरकत नाही. यातील एका अंगाचा — घरांचा प्रश्न तपासण्यासाठी १० वर्षांपूर्वी एक सरकारी कमिटी नेमली गेली होती. या कमिटीने आपला रिपोर्टही सरकारला सादर केला. त्या वेळी कमिटीला जी परिस्थिती आढळली तिचे वर्णन तिने आपल्या रिपोर्टांत केले आहे, (Report of the Rent Enquiry Committee, Vol. I, Chap. II) ते विषादकारक आहे. १९३९ मध्ये सुद्धा मुंबईतील परिस्थिती लंडनशी तुलना करता असमाधानकारक होती. आणि कमिटीच्या मते "मुंबईचे वैभव म्हणजे फार थोड्यांचे वैभव व फार मोठ्या बहुसंख्येचे चिखलात कुजणे असे होते."

मुंबईचे हे प्रश्न निर्माण होण्यास मूळ कारण म्हणजे तिचे मूळ स्थान. कितीही केले तरी मुंबईच्या या स्थानाचे दुष्परिणाम टाळणे जवळजवळ अशक्य आहे. मागच्या काळात झालेले प्रयत्न या जागेच्या प्रश्नास तोंड देण्यास अपुरे पडले. त्यांचा थोडासा उपयोग झाला तो व्यापारी केंद्रात. त्यामुळे थोडीशी भर पडली व थोड्या श्रीमंतांची जागेची सोय झाली. मुंबई बेटाच्या मूळ जागेत त्यामुळे फारशी भर पडू शकली नाही, किंवा शहराच्या एका टोकाला असलेल्या व्यापारी केंद्रामुळे निर्माण झालेला रहदारीचा प्रश्न सुटू शकला नाही. मुंबईला साष्टी बेट जोडले व बृहन् मुंबई घडविली गेली तरी मुंबईच्या ह्या मूलभूत प्रश्नात बदल होणार नाही. ही दोन्ही बेटे मिळून जो भूभाग तयार होतो तो सुद्धा इतर शहरांच्या तुलनेने फार मोठा नाही आणि व्यापारी केंद्राचे स्थानही त्यामुळे बदलत नाही. ते त्याच्या अरुंद बाजूकडेच राहते. हे व्यापारी केंद्र शहराच्या जर मध्यभागी असते तर मुंबई व साष्टी बेट मिळून झालेला शहराचा विस्तार अपुराच पडला असता. आजच्या स्थितीत वाहतुकीची व्यवस्था फार अपुरी आहे आणि व्यापारी केंद्रापासून वस्तीचे विभाग फार दूर आहेत. मुंबईचे हे मूळ स्थान एका औद्योगिक शहराच्या अस्तित्वास अयोग्य आहे. १९३८ मध्ये सुद्धा रहिवाशांच्या घरांचा व वाहतुकीचा प्रश्न सोडविता आला नव्हता. तेव्हापासून लोकसंख्येत फार मोठी भर पडत आलेली आहे. आणि आज या प्रश्नांनी उग्र स्वरूप धारण केलेले आहे.

## मुंबईतील केंद्रीकरण रोखणे आवश्यक

मुंबईची लोकसंख्या बृहत् लंडनच्या मानाने लहान असली तरी मुंबईचे प्रश्न मात्र अधिक तीव्र आहेत. मात्र बृहत् लंडनसाठी करण्यात आलेल्या योजनेच्या दिशेनेच मुंबईचे प्रश्न सोडविण्याचा विचार केला पाहिजे. मुंबईच्या बाबतीतही उपाययोजना अधिक कडक व अधिक शीघ्र करावी लागेल. त्या उपाययोजनेच्या पायऱ्या अशा : (१) बृहन् मुंबईत नवीन उद्योगधंद्यांच्या कारखान्यांना व असलेल्या कारखान्यांच्या वाढीस परवानगी देता कामा नये. (२) बृहन् मुंबईत १९४१ मध्ये जी वस्ती होती ती प्रमाण धरून त्याहून वाढलेली वस्ती व कारखाने दुसरीकडे हलविले पाहिजेत. तसेच मुंबई बेटातील वाढलेली वस्ती बृहन् मुंबईच्या इतर भागांत हलविली पाहिजे. आज बृहन् मुंबईचीच वस्ती व तिच्यांतील उद्योगधंदे इतके वाढलेले आहेत की, कारखान्यांना परवानगी नाकारावयाची ती कल्याण-अंबरनाथ पर्यंतच्या प्रदेशात नाकारली पाहिजे. कारण ही जादा वस्ती त्या बाजूलाच हलवावी लागेल; आणि हे सारे करण्यासाठी एक योजना करणे जरूर आहे.

मुंबईच्या या मूलभूत प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जाते असे म्हणता येईल. मुंबईत नवीन उद्योगधंदे निर्माण करण्यास सरकार उत्तेजन देते व त्यामुळे लोकसंख्येच्या वाढीत अधिकच भर पडते असे दिसून येते. मुंबईचा प्रश्न वरील दृष्टिकोणाने सोडविण्याचा यत्न झाला नाही तर या प्रश्नाचे गांभीर्य अधिकाधिक वाढत जाईल. तसे ते वाढत चाललेलेही आहे. उल्हास नदीचे खोरे सरकारी दृष्टीने महत्त्वाच्या अशा बनावट रेशमाच्या धंद्यास दिले जाणार आहे, अशी बातमी आहे. हे खोरे पाण्याच्या समृद्धीमुळे तांदूळ व इतर धान्याच्या पैदाशीस उपयुक्त आहे. मुंबईच्या परिसरात धान्य पिकविणारे हे असले जमिनीचे पट्टे नष्ट होऊ देता कामा नयेत. या दृष्टीने सरकारने घेतलेला वरील निर्णय चुकीच्या मार्गाने घेतला आहे. मुंबईतील दूधपुरवठ्याचा व घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी सरकार जे कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे, व पुढे करणार आहे ते आज व्यर्थ आहेत. हा पैसा राष्ट्राच्या उत्पन्नाच्या मानाने, लोकसंख्येच्या मानाने, व अपेक्षित यशाच्या मानाने प्रमाणाबाहेर खर्च केला जात आहे. ही कोट्यवधी रुपयांची रक्कम कालव्यांसारख्या उत्पादक कार्यात खर्च झाली असती तर देशातल्या अन्नधान्य वाढीच्या दृष्टीने त्याचा ताबडतोब उपयोग झाला असता व खेड्यांतील जनतेच्या राहणीचे मान यामुळे वाढले असते. मुंबईत वाढत असलेल्या लोकसंख्येला आळा न घालता व औद्योगिक केंद्रांचे विकेंद्रीकरण करण्याची योजना न आखता मुंबईवर इतका पैसा खर्च करणे म्हणजे सरळसरळ पैशाचा अपव्यय होय. या बाबतीतील सरकारी दृष्टिकोणाचे स्पष्टीकरण करावयाचे झाले तर असे म्हणता येईल की, मुंबईचा प्रश्न हा तिच्या अंतर्भागाच्या प्रश्नांहून स्वतंत्र आहे असे जे ब्रिटिश राजवटीत गृहीत धरले जात होते ती सवय अजून सुटलेली नाही.

युद्धकाळात किंवा निर्वासितांच्या लोंढ्यामुळे मुंबईच्या प्रश्नाला जे सरकारने महत्त्व दिले ते अर्थातच वाजवी आहे. परंतु मुंबईत नवीन उद्योगधंदे निर्माण करण्याच्या बाबतीतले किंवा आधीच गर्दी झालेल्या बृहन्मुंबईत निर्वासितांना कोंबण्याच्या बाबतीतले सरकारी धोरण चुकीचे आहे. बार्लो कमिशन म्हणते त्याप्रमाणे यशस्वी होण्यासारखे दुसरे यश नाही. मुंबईसारख्या औद्योगिक शहराचे बाहेरच्या लोकांना आकर्षण वाटणे साहजिकच आहे. कमिशन म्हणते :

"बाजारपेठ, मजुरांचा पुरवठा, बटवड्याची साधने, विद्युत्शक्तीचा सुलभ पुरवठा या बृहत् लंडनच्या आकर्षणामुळे पुष्कळ उद्योगपतींना लंडनमध्ये किंवा त्याच्या परिसरात कारखाने काढण्याची इच्छा होते. या नवीन कारखान्यांमुळे कामकऱ्यांची व त्यामुळे एकंदर लोकसंख्येची वाढ होते. यामुळे जनतेची क्रयशक्ती व व्यापारी देवघेव वाढते; आणि या सर्व कारणांमुळे आणखी बाहेरच्या लोकांस लंडनमध्ये येण्याविषयी आकर्षण निर्माण होते आणि त्यातच लंडन हे राजधानीचे शहर असल्यामुळे या आकर्षणात भर पडते." (रिपोर्ट पृ. १७०)

राजधानीच्या प्रदेशात खासगी उद्योगधंद्यांना नियंत्रण न घातल्यामुळे अनैसर्गिक गर्दी कशी होते हे यावरून स्पष्ट होईल. परंतु मुंबईच्या प्रश्नाची या दृष्टिकोणातून सरकारने दखल का घेतलेली नाही हे कळत नाही. या प्रश्नाविषयी सरकारचे दुर्लक्ष झाले आहे, किंवा असा एक प्रश्न आहे याची जाणीवच मुळी सरकारला झालेली नाही असे दिसते. कारण 'Provincial Industrial Committee' च्या रिपोर्टात तसेच तिच्या 'Location Sub-Committee' च्या रिपोर्टात मुंबईच्या उद्योगधंद्यांत आणखी खूप भर घालण्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. विद्युत् व पाणीपुरवठा भरपूर असलेल्या, परंतु मुंबईहून बऱ्याच दूर ठिकाणी असलेल्या खोऱ्यांत मुंबईतील कारखाने हलविले तर ते सोईस्कर होईल ही सूचना आज कुणी उचलून धरणार नाही. कारण हितसंबंधी लोकांना व जनतेच्या पुढाऱ्यांना वाटते की, असल्या सूचना मुंबईच्या हिताला बाधक आहेत.

सरकारही मुंबई ही तिच्या अंतर्भागापासून निराळी आहे असे मानते, त्यामुळे त्याचा मुंबईविषयी

आज जो दृष्टिकोण आहे तो तसाच पुढेही राहील. मुंबईची वाढ थांबविण्याचा विचार ते करणार नाही. कारण आकारमानाप्रमाणेच शहराचे महत्त्व वाढते असे त्याचे मत आहे. जनतेचा शारीरिक व नैतिक अधःपात कसा होतो याची दखल ते घेणार नाही. कारण ही प्रक्रिया मुख्यतः शहरात होणार नसून शहर ज्या आजूबाजूच्या प्रदेशावर अन्य सामग्रीच्या बाबतीत अवलंबून आहे त्या प्रदेशात होणार आहे. शहरांचा विचार करताना ज्या खेड्यांतून या शहराला कामकऱ्यांचा पुरवठा होतो त्या खेड्यांतील वाढती गरिबी ते हिशेबात घेणार नाही. शहरांच्या प्रश्नाला तोंड देताना शहरासाठी जो खर्च करावा लागतो तो तुलनात्मक दृष्ट्या जादा असला तरी सरकारला चालण्यासारखा असतो. कारण सर्व प्रांताची संपत्ती त्याच्या हाती असते. शहराच्या आकारमानाबरोबरच शहरातील संपत्ती वाढत जाते, सौंदर्य वाढते, चकचकाट, थाटमाट वाढतो. पण यामुळे शहरातील बहुसंख्य नागरिक ज्या अत्यंत हलाखीच्या स्थितीत दिवस कंठीत असतात त्यांच्याकडे दुर्लक्ष होते. शहरी जीवनाच्या परिस्थितीने महाराष्ट्रीय लोकांवर नैतिक दृष्ट्या फार वाईट परिणाम केला आहे. शहरात कामाच्या अपेक्षेने जाणारे हेच लोक अधिक असतात. ते आपल्या बायका मंडळींना घेऊन शहरात जातात. महाराष्ट्रीयांशिवाय जे दुसरे शहराचे कायमचे रहिवाशी झाले आहेत ते महाराष्ट्रीयांच्या मानाने फार थोडे आहेत आणि आर्थिक दृष्ट्या अधिक चांगल्या स्थितीत आहेत. शहराची जी अस्थिर लोकवस्ती आहे ती बहुतेक कामासाठी आलेल्या पुरुषांची बनली आहे. शहरातील निकृष्ट परिस्थितीचा एकत्रित परिणाम जे बालमृत्यू ते मुख्यत्वेकरून महाराष्ट्रीयांत घडतात.

## उद्योगधंद्यांच्या योजनाबद्ध विकेंद्रीकरणाची निकड

ही प्रचलित परिस्थिती सुधारण्याचा उपाय एकच आहे आणि तो म्हणजे उद्योगधंद्यांचे योजनाबद्ध विकेंद्रीकरण. ते करावयाचे झाले तर त्यांची पुनर्वसाहत कुठे करावयाची हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. ज्या ठिकाणी वाहतुकीची सोय, पाणी व विद्युत्‌पुरवठा, तसेच मजूर मिळण्याची शक्यता अधिक असेल अशाच प्रदेशात औद्योगिक केंद्रे निर्माण होतात. मोठ्या बंदराचेही फायदे असतात. म्हणूनच अशी केंद्रे बंदराजवळ साहजिकपणे वसली जातात. परंतु वाहतुकीची चांगली सोय केली तर उद्योगधंद्यांची ही केंद्रे दूरवर हालविणे शक्य असते. त्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढला तरी जागेची विपुलता व स्वस्तता हे फायदे मिळू शकतात. या ठिकाणी विद्युत् व पाणीपुरवठाही भरपूर होण्याजोगा आहे. घाटावर कोल्हापूरपर्यंत ज्या नव्या कालव्यांच्या योजना होत आहेत त्यांचा फायदा घेऊन ही केंद्रे तिथपर्यंत व त्याच्याही पुढे नेता येतील. हा सगळा प्रदेश महाराष्ट्रातच अंतर्भूत होतो. आज जेथून मुंबईला मजुरांचा पुरवठा होतो तो विभाग या विद्युत् व पाणी विपुल असलेल्या प्रदेशातच किंवा त्याच्या जवळपास आहे. गुजरात, राजपुताना, काठेवाडमधील मजुरांना आकर्षित करणारी औद्योगिक केंद्रे त्या बाजूला बरीच असल्यामुळे हे मजूर दक्षिणेला मुंबईच्या इतके लांब येणार नाहीत. आज मुंबईत येणारा महाराष्ट्रीयेतर मजूरवर्ग कमीतकमी ५०० मैलांवरून येतो. केव्हा केव्हा हे अंतर त्याहून अधिक असते. इतक्या लांबून मजुरांचे स्थलांतर होणे हे राष्ट्रीय शक्तीचा अपव्यय करणे होय. जिथून हा मजूरवर्ग येतो त्या ठिकाणीच किंवा त्याच्या जवळपास त्यांना काम मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे. अर्थातच मुंबईतील औद्योगिक केंद्रे हलवावयाची म्हणजे ती कोकण व देश यांमधील जवळच्या जिल्ह्यांत विखरून टाकणे श्रेयस्कर ठरते.

मुंबईचे भवितव्य अशा रीतीने महाराष्ट्राशी पूर्णपणाने निगडित झाले आहे. मुंबईला जे महत्त्व आले आहे ते राष्ट्रातील इतर विभागांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे. यापुढे सागरी वाहतुकीकडे अधिक लक्ष पुरविले जाईल. गोव्याच्या दक्षिणेकडे, सुरतेच्या बाजूस व कच्छमध्ये नवी बंदरे होणार आहेत, याचा

परिणाम मुंबईच्या आजच्या केंद्रीकरणावर झाल्याशिवाय राहणार नाही. त्याचप्रमाणे औद्योगिक वाढही झपाट्याने होईल. व दूरवरच्या मजुरांच्या मुंबईकडे वाहणाऱ्या ओघास आळा पडेल. काही विशिष्ट बाबतींत मुंबईचे अखिल भारतीय महत्त्व राहीलच. परंतु ते मोठे बंदर व महाराष्ट्राचे औद्योगिक केंद्र म्हणून.

मुंबईच्या लोकवस्तीच्या व औद्योगिक स्थलांतराचा हा प्रश्न तपासून पाहिला म्हणजे मुंबई महाराष्ट्रापासून फोडण्याचे धोरण किती कृत्रिम आहे हे स्पष्ट होते. असे धोरण स्वीकारण्यात आले तर झगडे सुरू होतील आणि या झगड्यांचा परिणाम मुंबई शहर व महाराष्ट्र यांच्यापुढे नवे प्रश्न निर्माण करण्यात होईल. प्रथम सीमेच्या बाबतीत भांडणे सुरू होतील. मुंबईच्या सीमा निश्चित करण्याचे वस्तुनिष्ठ असे गमक उपलब्ध नाही. ही सीमा कृत्रिम होईल. या वेळी बृहन्मुंबईच्या योजनेकडे संशयाने पाहिले जाईल. महाराष्ट्रातील जास्तीत जास्त प्रदेश मुंबईत ओढण्याची ही कारवायी आहे असा ग्रह होईल. ही बृहन्मुंबई महाराष्ट्रापासून निराळी करण्याच्या योजनेची पहिली पायरी होय असा त्याचा अर्थ होईल व महाराष्ट्रातील लोक त्याला कसून विरोध करतील. पण बृहन् मुंबई करूनही सारे प्रश्न सुटणार नाहीत, कारण मुंबईला पाणी व विद्युत् पुरवठा हा पुढेही बृहन्मुंबईच्या बाहेरूनच व्हावयाचा आहे.

मुंबई हे राजधानीचे शहर असल्यामुळे जे प्रश्न निर्माण झाले आहेत त्यांना तोंड देण्यासाठीच फक्त बृहन् मुंबईची योजना जर होऊ घातली असेल तर प्रश्नाची सोडवणूक योग्य दिशेने होत आहे असे म्हणता येईल. शहरी वस्तीत अमाप गर्दी झाल्यामुळे राज्यकारभार व आर्थिक घडामोडींचा सुरळीतपणा यांच्या बाबतीत जो प्रश्न उत्पन्न झालेला असतो त्याला अनेक बाजू असतात. शहरी विस्ताराच्या ज्या एका विभागात रहिवाशांची खेचाखेच झालेली असते त्याचा कारभार कसा करावा ही पहिली बाजू. बृहन् मुंबईतील हा विभाग म्हणजे मुंबई शहर हा होय. दुसरी बाजू उपनगरांच्या कारभारांची. शहराच्या मर्यादेत घेणे जरूर असलेल्या खेडीवजा प्रदेशाच्या कारभाराची तिसरी बाजू. मुख्य शहरापासून उपनगरे निराळी व स्वतंत्र जागेत असली तर शहर व उपनगरे यांचा कारभार एकत्रित करण्याच्या प्रयत्नामुळे फायद्याऐवजी तोटेच अधिक होतात. याच्यातून मार्ग काढायचा तर उपनगरांना स्वतंत्र म्युनिसिपालिट्या द्याव्या लागतील. अर्थातच ही उपनगरे तेवढी मोठी, अलग व वैशिष्ट्यपूर्ण असली पाहिजेत. दूरच्या प्रदेशात विखुरलेल्या खेड्यांना लोकलबोर्डे द्यावी लागतील. शहराची नगरपालिका, उपनगरांच्या म्युनिसिपालिट्या व खेड्यांची लोकलबोर्डे यांची सांगड घालण्यासाठी एक संयोजनसत्ता निर्माण करावी लागेल. या संयोजनसत्तेच्या अधिकारक्षेत्रातील विषय व उपनगरे आणि लोकलबोर्डे यांच्या कक्षेतील विषय यांचा समन्वय घालण्याचे कामही महत्त्वाचे आहे. ही समन्वय साधणारी सत्ता, मग ती एका अधिकाऱ्याकडे असो किंवा सल्लागार-मंडळाकडे असो, दळणवळण व शहररचना या विषयांवर नियंत्रण ठेवील. शिवाय सर्व बृहन्नगरासाठी म्हणून शहररचना योजनेचे काम तिच्या हाती राहील. सबंध प्रदेशासाठी अशी एखादी योजना आखली तर त्या योजनेतूनच वाहतूक व विद्युत्पुरवठा, तसेच उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण यांच्या योजनाही बाहेर पडतील; आणि या प्रचंड योजनेतच बृहन्नगराची योजना सामावलेली असेल.

## मुंबईचा प्रश्न सोडविण्याच्या पायऱ्या

ज्या पायऱ्यांनी मुंबईचा प्रश्न सोडवायचा त्या पायऱ्या अशा : (१) मुंबईतील फोर्ट विभागापासून सडकेने किंवा रेल्वेने ५० मैलपर्यंतच्या प्रदेशात नव्या उद्योगधंद्याच्या उभारणीला किंवा जुन्याची वाढ करण्याला परवानगी न देणे, (२) मुंबई व तिचा अंतर्भाग यांत उद्योगधंद्यांची स्थापनानिश्चिती करण्यासाठी योजना तयार करणे, (३) बृहन् मुंबईतील वाढलेली लोकसंख्या व कारखाने, तसेच मुंबई

शहरातील अनैसर्गिक गर्दी पायरीपायरीने दुसरीकडे कशी हलविता येईल याची तपशीलवार योजना आखणे. शहररचनेची आखणी, दळणवळण व घरबांधणी यांबाबतचे पूर्ण अधिकार देऊन सबंध क्षेत्रासाठी एका अधिकाऱ्याची किंवा मंडळाची नेमणूक करणे. या पायऱ्यांनी जर प्रयत्न केला आणि त्याच्या भरीला मुंबईपासून ८० ते १०० मैलांच्या परिघातील प्रदेशाच्या शेतीकडे लक्ष देऊन ती सुधारली तर मुंबईचा प्रश्न सुटण्याच्या मार्गाला लागेल.

मुंबई जर महाराष्ट्रापासून निराळी केली तर हे घडणार नाही, कारण मुंबई निराळी केल्यामुळे मुंबईतील हितसंबंधी लोक व मुंबईबाहेरील जनता यांच्यांत विरोध सुरू होईल. मुंबईतील महाराष्ट्रीयेतरांचा गट आपण महाराष्ट्रीय जनतेपासून निराळे व उच्च पातळीवर आहो असे मानतो. या हितसंबंधी गटाशी मुंबईबाहेरील प्रदेशातली गरीब जनता मुंबईचा प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत कसलेच सहकार्य करणार नाही, आणि यशाची आशा नसतानाही स्वतःचे स्वतंत्र केंद्र निर्माण करण्याच्या खटपटीला लागेल.

## 'स्वतंत्र मुंबई'च्या मागणीची विचिकित्सा

शेवटी मुंबई महाराष्ट्रापासून निराळी करण्याची मागणी ज्या कारणांकरता काही गटांकडून करण्यात येते त्यांचा विचार करणे जरूर आहे. अशा प्रकारची मागणी काही अंशी ज्या भीतीवर आधारलेली आहे तिचे निराकरण करणे शक्य आहे. मुंबई निराळी करण्याची मागणी करणाऱ्यांत सगळेच्या सगळे महाराष्ट्रीयेतर आहेत. महाराष्ट्राच्या राजकीय व आर्थिक घडणीत मुंबईचे स्थान कायम असावे असे सर्व मराठी भाषीय आग्रहाने प्रतिपादतात. महाराष्ट्रात नेहमीच निर्माण होणारी काही विक्षिप्त माणसे सोडली तर महाराष्ट्राची मागणी एकमुखी आहे. मुंबई महाराष्ट्रातच ठेवण्याच्या मागणीस 'दि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'ने पाठिंबा दिला आहे. याचा अर्थ असा की मुंबईतील मराठी भाषीय भांडवलवाले व व्यापारीच मुंबई महाराष्ट्रांत ठेवावी ही मागणी करतात असे नसून मुंबई बाहेरच्या महाराष्ट्रातील मराठीतर भाषा बोलणारे हितसंबंधी लोकही तीच करतात. 'दि महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स'च्या सभासदांत बाहेरून येऊन महाराष्ट्रात स्थाईक झालेले व मराठीतर मातृभाषा असलेले, अनेक भांडवलवाले व व्यापारी लोक आहेत.

मुंबई महाराष्ट्रापासून निराळी करावी या मागणीच्या पाठीमागे असलेल्या कारणांची विचिकित्सा करणे कठीण होऊन बसले आहे. कारण आतापर्यंत कोणत्याही जबाबदार गृहस्थाने किंवा संस्थेने ती पद्धतशीर रीतीने पुढे मांडलेली नाही. मुंबईतील मराठीतर हितसंबंधी लोकांकडूनच ही मागणी करण्यात आली आहे. या लोकांचा दावा असा की, मुंबईची जी वाढ झाली आहे त्यात महाराष्ट्रीयेतर जमातींचा वाटा फार मोठा आहे. म्हणूनच मुंबई जरी महाराष्ट्राचा प्रादेशिक विभाग असला तरी ती त्याच्यापासून विभागली जाणे न्याय्य आहे. "वाढ" या शब्दाचा अर्थ करणे कठीण आहे. परंतु हे हितसंबंधी लोक जेव्हा हा शब्द वापरतात तेव्हा त्याचा अर्थ फायद्याच्या अपेक्षेने घातलेले भांडवल असा घ्यावा लागतो. सर्वसाधारणपणे मुंबई बेटाची प्राथमिक वाढ केली ती इंग्रजांनी. हिंदी जमातींनीही त्यांच्या कार्याला निःसंशय हातभार लावला. परंतु ही वाढ करण्यास त्यांनी काही नवीन तंत्र किंवा नवीन साधने वापरली नाहीत; आणि जे भांडवल त्यांनी वापरले ते सुद्धा येथील स्थानिक साधनसामग्रीतूनच निर्माण झाले होते. हे हिंदी लोक म्हणजे इंग्रजांचे सहाय्यक होते किंबहुना अनुकरण करणारे होते. इंग्रजांच्या या सहाय्यकांत आणि अनुयायांत महाराष्ट्रीयांपेक्षा महाराष्ट्रीयेतर लोक अधिक असू शकतील. मुंबईच्या वाढीत इतिहास-काळात कोणी कितीही भाग घेतलेला असो, स्थानिक राजकीय सत्तेशी किंवा मुंबई महाराष्ट्रातच ठेवावी किंवा ती निराळी करावी या मुद्द्याशी त्यांचा कोणताही संबंध पोचत नाही. इंग्रजांनी हिंदुस्थानातील काही शहरांचीच वाढ केली असे नसून अनेक प्रदेशही त्यांनी

उदयाला आणले. युरोपियन सत्तांनी तर आग्नेय आशियात अनेक प्रदेशांचा व राष्ट्रांचा विकास केला. पण ही कारणे पुढे करून हिंदुस्थानात काय किंवा आग्नेय आशियात काय त्या त्या सत्तांनी आपले कायम आसन त्या ठिकाणी ठोकले नाही, किंवा त्यांनी वाढ केलेले एखादे बंदर किंवा औद्योगिक शहर हे त्याच्या परिसरातल्या प्रदेशापासून तोडून स्वतंत्र करावे असा दावा मांडला नाही. मुंबईची वाढ करण्यात महाराष्ट्रीयेतरांनी विशेष भाग घेतला म्हणून आपल्या इच्छेला मान देऊन मुंबई महाराष्ट्रापासून तोडावी असे जे हे लोक म्हणतात, तसेच आग्नेय आशियातील राष्ट्रांच्या बाबतीत युरोपियनांनाही अधिक हक्काने म्हणता आले असते. या हिंदी भांडवलवाल्यांपेक्षा त्यांचे तिकडचे कार्य कितीतरी मोठे आहे. पण एकाही युरोपियन भांडवलवाल्याला असा दावा मांडण्याचे धाडस कधी झाले नाही.

महाराष्ट्रीयेतर हितसंबंधी लोकांना अशी आशा वाटते की, मुंबई महाराष्ट्राहून निराळी केली तर ती आपल्या हातात पक्केपणी राहील. मुंबईत स्थिर अशी वस्ती एकंदर लोकसंख्येच्या मानाने थोडी आहे. आणि तिचे जीवन या हितसंबंधी लोकांवर अवलंबून आहे. या हितसंबंधी लोकांच्या कारखान्यांकचेऱ्यांतच मुंबईत कायम वस्ती करून राहिलेले वरील लोक राबत असतात. मुंबईतील अस्थिर लोकवस्तीचे लागेबांधे किंवा हितसंबंध या शहरात गुंतलेले नाहीत. त्यांच्या संख्येत फेरबदल होत असतो. या अस्थिर लोकवस्तीवर वेगवेगळ्या मार्गांनी दडपण आणणे सोपे असते. मुंबईत आर्थिक घडामोडींचे केंद्रीकरण झाल्यामुळे जी साधनसंपत्ती निर्माण होत आहे तिचा उपयोग फक्त मुंबईच्या उत्कर्षासाठीच करता यावा या इच्छेच्या पोटीही मुंबईच्या विभक्तीकरणाची मागणी उद्भवली असेल. या योगाने मुंबईच्या परिसरातील खेड्यांतली साधनसामग्री त्यांना शहरात आणता येईल व शहरातील नागरिकांकडून वसूल केल्या जाणाऱ्या कराच्या उत्पन्नातून खेड्यांच्या उत्कर्षाकरता जो खर्च व्हायला पाहिजे त्याला त्यांना बंदी घालता येईल. या हितसंबंधी लोकांना एक भीतीही वाटत असावी असे दिसते. लोकशाहीचा पुरस्कर्ता महाराष्ट्र आर्थिक व्यवहारांवर बंधने घालील व आपल्याला मानवणार नाही अशा उदार सामाजिक धोरणाचा पुरस्कार करील अशी भीती त्यांना वाटणे शक्य आहे. त्यांचा हा युक्तिवाद, आशा व भीती यांविषयी काहीच सांगता येण्यासारखे नाही. पण एक गोष्ट खरी की त्यांची मागणी सफळ झाली तर महाराष्ट्राचा राजकीय दर्जा हिंदी संघराज्यांतील इतर घटकांच्या मानाने कमकुवत होऊन बसेल.

हितसंबंधी लोकांच्या या योजनेला काही महाराष्ट्रीयेतर बुद्धिमंतांनीही पाठिंबा दिलेला आढळतो. परंतु महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करावी असे म्हणताना ते मुंबईच्या अठरापगडपणावर—विश्वबंधुत्वावर भर देतात. बुद्धिमंतांच्या या दाव्याचे युरोपियन राष्ट्रांकडून होत असलेल्या चीनच्या काही शांतता-बंदरांच्या (Treaty Ports) मागणीशी साम्य आहे. जागतिक प्रगती, शांती व विश्वबंधुत्व यांच्या वृद्धीसाठी चीनकडे काही शांतता-बंदरांची मागणी करावी असे युरोपियन राष्ट्रांनी एकमताने ठरविले आणि चीनकडे तशी मागणी केली. युरोपियन राष्ट्रांइतक्या निरपेक्ष बुद्धीने मुंबईत आलेले महाराष्ट्रीयेतर मुंबई स्वतंत्र करण्याची मागणी करीत आहेत. महाराष्ट्रीयाला आश्चर्य वाटते ते विश्वबंधुत्वावर हा प्रयोग फक्त मुंबईवरच का व्हावा या गोष्टीचे ! इतर प्रांतांतील राजधान्यांवर व औद्योगिक शहरांवर देखील हाच प्रयोग का करण्यात येऊ नये ? अशा परिस्थितीत विश्वबंधुत्वाच्या ह्या प्रयोगाचा मान स्वतःच्या प्रांताला लाभू देण्याचे भाग्य महाराष्ट्रीयांनी नाकारले तर त्यांना दोष दिला जाऊ नये.

महाराष्ट्रीयेतर हितसंबंधी लोक सोडले तर मुंबईत आणखी काही असे गट असतील की एक प्रकारच्या भीतीमुळे मुंबई स्वतंत्र करण्याच्या योजनेस ते पाठिंबा देत असतील. या गटाचे वर्णन बौद्धिक गुलाम असे केले तर ती त्यांची बदनामी आहे असे त्यांनी मानू नये. मुंबई महाराष्ट्रात गेली तर आपण नोकरीला मुकू अशी भीती त्यांना वाटत असावी. या भीतीला कसलाच आधार नाही. मुंबई महाराष्ट्रात

राहिली तर मुंबईच्या नागरिकांच्या राजकीय व आर्थिक हक्कांत यत्किंचितही बदल होणार नाही हे या ठिकाणी स्पष्टपणे सांगितले पाहिजे. मुंबई महाराष्ट्रात राहिली तरी मुंबई–महाराष्ट्राच्या नागरिकांप्रमाणेच दुसऱ्या प्रांतांतून मुंबईत येणाऱ्या महाराष्ट्रीयेतरालाही, स्थाईक होण्याचा, धंदा करण्याचा, कोणत्याही नोकरीपेशांत शिरण्याचा, इस्टेट संपादनाचा किंवा ती विकण्याचा वगैरे सर्व हक्क प्राप्त होतील. उदाहरणार्थ, खाजगी कारखान्यांत नोकरी करणाऱ्याला आज ज्या अटी लागू होतात त्यांत मुंबई महाराष्ट्रात राहिली तरी कोणताच बदल होणार नाही. स्थलांतर करणे, स्थाईक होणे, कोणताही धंदा–व्यापार करणे या बाबतीत महाराष्ट्रीय व महाराष्ट्रीयेतर असा फरक मराठी प्रांतात केला जाणार नाही. महाराष्ट्राच्या उदार धोरणामुळेच केवळ या सवलती दिल्या जाणार आहेत असे नसून संघ-राज्याच्या संघटनेतच हे हक्क संरक्षिले जातील.

नव्या स्वायत्त महाराष्ट्र प्रांतात नागरिकांचा राजकीय दर्जा व आर्थिक हक्क यांत बदल होणार नाही हे जितके खरे तितकेच मुंबई शहराच्या आजच्या स्थानिक कारभार–पद्धतीतही काही बदल होणार नाही, हेही खरे. मुंबई नगरपालिकेच्या अधिकारात कोणत्याही प्रकारची कपात होणार नाही. उलट विकेंद्रीकरणाच्या धोरणामुळे तिच्या अधिकारात वाढ होईल. मागच्या भागात सांगितल्याप्रमाणे बृहन् मुंबईपेक्षाही मोठ्या प्रदेशासाठी एखाद्या संयोजन–अधिकाऱ्याची किंवा अधिकारी–मंडळाची नेमणूक करणे जरूर होईल. या सर्व कारभारात मुंबईतील नागरिकांना, मग ते मराठी असोत की अन्य भाषीय असोत, सारखीच संधी मिळेल. बृहन् मुंबईच्या इतर भागांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना अत्यंत उदार पायावर केली जाईल. एकंदर प्रांताच्या उत्कर्षासाठी जी विशाल योजना आखली जाईल तीत मुंबईच्या सुधारणेसाठी तपशीलवार योजनेचाही समावेश होईल. आणि या योजनेची सारी सूत्रे मुंबईच्या नागरिकांच्याच हाती असतील.

आता एक गोष्ट मात्र खरी आहे की, नव्या प्रांतात स्थाईक होण्यासाठी बाहेरून येणाऱ्या लोकांना एका तात्पुरत्या अडचणीला तोंड द्यावे लागेल. पण ही अडचण फक्त महाराष्ट्रातच उपस्थित होणार नसून संघराज्याच्या सर्व प्रांतांत ती सारख्याच प्रमाणात उद्भवेल. ही अडचण म्हणजे भाषेची. हिंदी संघराज्याच्या राज्यकारभारात इंग्रजीचे महत्त्व यापुढे कमी होणार असल्यामुळे ज्या प्रांतात बाहेरचे लोक येतील त्यांना स्थानिक भाषेकडे पूर्वीप्रमाणे दुर्लक्ष करून चालणार नाही. प्रांताच्या कारभारात प्रादेशिक भाषा अधिकाधिक प्रभावी होत जाईल; आणि ज्या परप्रांतीयांना प्रांतात नोकऱ्या करा-वयाच्या असतील त्यांना प्रादेशिक भाषेचे ज्ञान अवश्य होऊन बसेल. ही घटना एकंदरीत उपकारक होईल असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. यापूर्वी बुद्धिजीवी वर्गांचे निरनिराळ्या प्रांतांत परस्पर दळणवळण असूनही परस्परांबद्दल दुजाभाव वसत आलेला दिसे. इंग्रजीने जरूरीपुरते काम भागत असल्यामुळे परप्रांतांतून आलेल्या लोकांना स्थानिक लोकांचे जीवन, भाषा, रीतरिवाज वगैरे समजून घेण्याची गरज भासत नसे. नवीन परिस्थिती परिणामी हितकर असली तरी प्रथमच्या बदलत्या काळात अडचणी उत्पन्न करणारी आहे हेही खोटे नाही. ज्या ठिकाणी भाषिक अल्पसंख्यांकांचे मोठे गट कायमची वस्ती करून राहिले असतील त्या ठिकाणी या अडचणीची तीव्रता वाढणारच आहे. अर्थातच याला उपाय म्हणजे सर्व नवीन घटक प्रांतांनी भाषेच्या बाबतीत उदार धोरणाचा अवलंब करणे.

## मुंबईची प्रादेशिक भाषा मराठी

या संदर्भात मुंबई सरकारने नुकताच जो एक ठराव केला आहे त्याकडे लक्ष दिले पाहिजे. प्रांतातील ज्या प्रादेशिक भाषा आहेत त्यांच्याशिवाय इतर भाषांच्या बाबतीतले सरकारी धोरण काय आहे यासंबंधीचा तो ठराव आहे. ठरावात असे म्हटले आहे की, प्रांतातील सरकारी प्राथमिक शाळांतून

शिक्षणाचे माध्यम म्हणून त्या त्या विभागाच्या प्रादेशिक भाषेचा उपयोग करण्यात यावा; आणि ज्या प्राथमिक व दुय्यम शिक्षणाच्या शाळा खाजगी रीतीने चालविल्या जात असतील, त्यांना सरकारी मदत मिळवायची असेल, तर प्रादेशिक भाषा सक्तीने शिकवण्याची व्यवस्था त्यांना करावी लागेल. मुंबईच्या मंत्रिमंडळातील तिन्ही भाषांच्या विभागांतून आलेल्या मंत्र्यांचे या बाबतीत एक मत झाल्याचे दिसते.* या सरकारी ठरावावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, जरी भाषावार प्रांतरचना ताबडतोब झाली नाही तरी प्रादेशिक भाषेचा प्रश्न चालढकलीवर टाकता येत नाही. खरे म्हटले तर भाषिक विभागांमधील सीमांच्या अभावी, मिश्र भाषीय जिल्ह्यांत या ठरावाच्या अमलामुळे अडचणी वाढतील व तक्रारी उत्पन्न होतील. ठरावात जे धोरण स्वीकारण्यात आले आहे ते फक्त एकभाषिक प्रांतातच अंमलात येण्यासारखे आहे. ठरावात तशी प्रच्छन्न अपेक्षाही असावी. हिंदी संघराज्यातील सर्व घटक प्रांतांत, शाळांतील शिक्षणाच्या माध्यमाच्या बाबतीत मुंबई सरकारचेच धोरण स्वीकारले जाईल यात वाद नाही.

ज्या उल्लेखित सरकारी ठरावात प्रदेश, भाषा व शिक्षणपद्धती यांच्या परस्परसंबंधाविषयी इतके चांगले प्रतिपादन केले आहे त्याच ठरावात मुंबईविषयी एक चमत्कारिक विधान केलेले आढळते. प्रचलित परिस्थितीचा दाब सरकारवर देखील कसा पडतो याचे हे उदाहरण आहे. ठराव म्हणतो की, "मुंबई हे एकाहून अधिक प्रादेशिक भाषा चालू असलेल्या प्रदेशाचे" उदाहरण होय. हे विधान दोन भाषिक प्रांतांच्या सरहद्दीवर असलेल्या परंतु सीमा न ठरविलेल्या प्रदेशाचा अपवाद सोडला तर अर्थशून्य आहे. एकभाषिक प्रांताच्या मध्यभागात असलेल्या विभागाची भाषा कोणती याबद्दल शंका घेण्याचे कारणच नाही. मुंबई शहराची प्रादेशिक भाषा मराठीशिवाय दुसरी असूच शकत नाही. महाराष्ट्रातील एखाद्या विभागाची, उदाहरणार्थ मालेगावची भाषा जितकी मराठी आहे तितकीच ती मुंबईची आहे. मुंबईबाबतचे सरकारी ठरावातले वरील विधान विचारसरणीत गोंधळ असल्याची साक्ष देते. सरकारातच नव्हे तर सर्वसाधारण जनतेतही दुर्दैवाने अशीच चुकीची समजूत प्रचलित आहे. या ठरावाबाबत मुंबई महाराष्ट्रापासून स्वतंत्र करण्यातले धोकेही स्पष्ट होतात. मुंबई शहराला लागू केलेले हे भाषाविषयक तत्त्व उद्या बृहन् मुंबईला व तिच्या परिसरातल्या प्रदेशांनाही लावण्यात येईल. एकदा हे विभक्तीकरणाचे तत्त्व मान्य केले की मुंबईच्या विस्ताराच्या गरजेप्रमाणे महाराष्ट्राचा एकेक तुकडा तोडून देण्यास संमती द्यावी लागेल आणि अशा प्रकारे महाराष्ट्राचे क्षेत्र संकुचित होत जाईल.

मुंबईच्या एकाहून अधिक प्रादेशिक भाषा आहेत या विधानाचा निषेध करताना मराठीतर भाषीय लोकही मुंबईत स्थाईक होऊन राहिले आहेत या गोष्टीची दखल घेतली पाहिजे. सरकारी ठरावातील धोरणात अंशतः फेरफार करता येण्यासाठी त्यात एका अपवादाचा समावेश करावा लागेल. भाषिक अल्पसंख्यांकांची संख्या साधारण मोठी म्हणजे लोकसंख्येच्या वीस टक्क्यांहून जास्त असली तर त्यांना काही सवलती देणे योग्य आहे. खाजगी शाळांतून आपल्या भाषेचे शिक्षण घेणे, तसेच सरकारी शाळांतून सुद्धा या अल्पसंख्यांकांची भाषा शिकविण्याची व्यवस्था करणे, अशा या सवलती असाव्यात. आजच्या प्राथमिक शिक्षण कायद्यात महत्त्वाच्या भाषिक अल्पसंख्यांकांच्या शिक्षणाची व्यवस्था केली पाहिजे, अशा अर्थाची कलमे आहेत. या बाबतीत आजचे धोरण बदलण्याची आवश्यकता नाही. फक्त

* भूतकाळात महाराष्ट्रीय जर हे धोरण स्वीकारण्यात यशस्वी झाले असते तर आताच्या प्रमाणे मुंबई ही महाराष्ट्रापासून निराळी आहे असा दावा महाराष्ट्रीयेतरांकडून सांगितला गेला नसता. ब्रिटिश राजवटीत प्रादेशिक हितसंबंधांविषयी जी बेपर्वाई दाखविली गेली तिचा हा दुसरा नैसर्गिक परिणाम होय.

प्रादेशिक भाषा शिकण्याची सक्ती करण्याचे एक कलम मात्र त्यात वाढवावे लागेल. भाषिक अल्पसंख्य जमात जर मोठी होत गेली तर प्राथमिक शिक्षणासंबंधीचे तत्त्व उच्च शिक्षणालाही लागू करावे. महत्त्वाच्या भाषिक अल्पसंख्यांकांच्या भाषेला शिक्षण पद्धतीत खास महत्त्व द्यावे लागेल. परंतु प्रादेशिक भाषेचे किमान ज्ञान त्यांनी मिळविलेले असले पाहिजे. भाषिक अल्पसंख्यांकांचा मोठा गट जर एखाद्या प्रदेशात एकवटलेला असला तर त्यांच्या भाषेला स्थानिक राज्यकारभारात व स्थानिक व्यवहारात दुसरी पूरक भाषा म्हणून अवश्य स्थान द्यावे. मुंबईचा महाराष्ट्रात समावेश केल्यामुळे आपल्याला अनावश्यक त्रास व अडचणी सोसाव्या लागतील अशी जी खरीखुरी भीती गुजराती सारख्या जमातीला वाटते तिचा परिहार अशा उपायांनी करता येईल. मुंबई महाराष्ट्राची राजधानी झाली तर मुंबईतील गुजराती व इतर जमातींची अडचण होईल व त्यांना हाल सोसावे लागतील असे म्हणण्यास कोणतेच कारण नाही. महाराष्ट्रीयेतरांनी मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांतही जी कामगिरी केली आहे ती गुणग्राहक दृष्टीने महाराष्ट्रीयांनी जाणून घेतली पाहिजे; आणि महाराष्ट्रातील ज्या प्रदेशांत त्यांची अधिक वस्ती आहे तेथील कारभारात व शिक्षणसंस्थांत त्यांच्या भाषेला स्थान देण्याचे प्रागतिक धोरण ठेवून त्यांचा संशय व भीती घालविली पाहिजे. संघराज्याचा कारभार सुरळीत व शांततेने चालण्याच्या दृष्टीने या बाबतीत प्रागतिक धोरणाचा अवलंब करण्याची आत्यंतिक गरज आहे.

हे निवेदन संपविण्यापूर्वी मुंबईच्या बाबतीत महाराष्ट्रीयांनी घेतलेल्या भूमिकेवरून त्यांच्यावर संकुचित वृत्तीचे जे आरोप करण्यात येतात त्यांचा उल्लेख केला पाहिजे. महाराष्ट्रीयाच्या दृष्टीने हे आरोप गंभीर आहेत व ते ऐकले म्हणजे तो गोंधळून जातो, आश्चर्याने थक्क होतो. तीन कोटी मानवांची एक नमुनेदार जमात बनविण्याचा प्रयत्न हे संकुचित वृत्तीचे लक्षण आहे, किंवा आमचा प्रदेश 'हा आमचा आहे' असे म्हणण्यात आक्रमक वृत्ती आहे असे त्यास वाटत नाही. गेल्या वर्षी सौराष्ट्राला व महागुजराथला जुनागड मिळवून देण्यात त्याने मदत केली आहे आणि काश्मीऱ्यांसाठी काश्मीर राखण्याच्या आज चालू असलेल्या प्रयत्नांतही तो भाग घेत आहे. या दोन्ही साहसांस देशातील पुढाऱ्यांचा एकमुखी पाठिंबा मिळाला आहे. त्यामुळे साहजिकच महाराष्ट्रीयाला वाटते की, जो निःसंशय मराठी प्रदेश आहे आणि महाराष्ट्राच्या नसांचे जे केंद्र आहे ते महाराष्ट्रापासून तोडून काढण्याच्या प्रयत्नांस नम्रपणे पण सर्व शक्ती एकवटून विरोध करणे हे आपले साधे कर्तव्य आहे.

संयुक्त महाराष्ट्र प्रकाशन (पुणे, १९४८)

☆

# ५ . . महाविदर्भाची कल्पनाच कृत्रिम

भारतीय राज्यांच्या पुनर्घटनेचा विचार करण्याकरिता एक कमिशन नेमण्याचा भारत सरकारचा मानस प्रसिद्ध झाल्यापासून मराठी भाषकांच्या प्रदेशांतील राज्यांची पुनर्घटना कशी व्हावी याबाबत विचारविनिमय व मतप्रदर्शन यांस साहजिकच पुन्हा सुरुवात झाली आहे. सर्व मराठी भाषकांच्या सलग प्रदेशांचे एक राज्य बनवावे या कल्पनेचा पुरस्कार आज सात-आठ वर्षे बऱ्याच पद्धतशीर रीतीने झाला आहे व ती बऱ्याच अंशी बहुमान्य झाली आहे. या कल्पनेस मुंबई राज्यातील मराठी भाषकांचा पूर्णपणे पाठिंबा आहे. 'दार कमिशन'च्या चौकशीच्या वेळेस हैदराबादच्या विभागणीचा प्रश्न विचारात घेणे शक्य नव्हते. आज हैदराबाद-विभागणीची मागणी सार्वत्रिक झाली आहे. अशी विभागणी करून मराठवाड्यातील मराठी प्रदेश मुंबई राज्यातील मराठी प्रदेशात सामील करावा या योजनेस मराठवाड्यातील पुढाऱ्यांचा पाठिंबा दिसतो; व या योजनेविरुद्ध कोणी तेथे विशेष चळवळही करीत असल्याचे ऐकिवात नाही.

## नागपूर-कराराची पूर्वपीठिका

मराठी भाषकांच्या सलग प्रदेशाचे एक राज्य करण्यात आज मुख्य दोन अडचणी दिसतात. एक मुंबई शहराबाबतची. मुंबई शहराबाबतचा विरोध मुख्यतः मुंबई शहरातील बिगर मराठी भाषकांचा आहे. दुसरी अडचण नागपूर-वऱ्हाडबाबतची. मराठी भाषकांचे एक राज्य असावे ही कल्पना रुजण्याच्या आधीच मध्यप्रदेशातील मराठी भाषकांचा वेगळा प्रांत करावा अशी मागणी त्या भागात होत होती. त्यामुळे निराळ्या महाविदर्भाच्या मागणीचा पूर्वीपासून पुरस्कार करणाऱ्यांत मराठी भाषकांच्या एका राज्याबाबत मतभिन्नता उत्पन्न झाली. हा प्रश्न 'दार कमिशन'च्या आधीपासूनच गुंतागुंतीचा झाला होता. राजकीय पुढाऱ्यांच्या याबाबत अनेक वेळा चर्चा व वाटाघाटी झाल्या व काही करारही झाले. जुना अकोला–करार प्रसिद्ध आहे. त्याचीच नवीन आवृत्ती अलीकडचा नागपूर–करार म्हणता येईल. अकोला–करार झाला तेव्हा भारताच्या लोकसत्ताकाची घटना झालेली नव्हती. तेव्हा अकोला–करारात अनेक गोष्टी कल्पिता आल्या. आजचा करार भारतीय राज्यघटनेला धरूनच झाला पाहिजे, म्हणून नागपूर–करारातील तपशील बदलावा लागला. दोन्ही करारांची मूळ बैठक एकच आहे. असे असता अजून नागपूर-वऱ्हाडातील काँग्रेस पक्षाच्या बऱ्याच पुढाऱ्यांचा या करारास विरोध दिसतो.

मागे ज्यांनी महाविदर्भ ही पहिली पायरी म्हणून मागणी केली तेच आज शाश्वत घटना म्हणून महाविदर्भाचा पुरस्कार करताना दिसतात. काहींची मजल कोरियाप्रमाणे महाराष्ट्राची, नकाशावर कृत्रिम रेघ काढून विभागणी व्हावी असे म्हणण्यापर्यंत गेली आहे! मराठी भाषकांची अशी शकले करण्याचा ज्यांचा अट्टाहासच आहे त्यांबाबत काहीच बोलणे शक्य नाही. कोणत्याही स्वतंत्र एकजिनसी

समाजाने अशा प्रकारे स्वतःस दुभंगून घेतल्याचे इतिहासात नमूद नाही. अशा घटना फक्त जित समाजांबाबतच घडून आल्या आहेत! नागपूर–कराराच्या आधी व नंतर झालेल्या प्रचाराचा विचार करता काही प्राथमिक पण खऱ्या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष झाल्यासारखे वाटते म्हणून त्यांचा आज पुनरुच्चार करणे आवश्यक आहे:

## एकजिनसी घटकांची गरज

मूलभूत विचार भारतातील राज्यांची पुनर्रचना का व कशी हवी हा आहे. थोडक्यात असे की, भारत हे संघराज्य आहे व हा संघ बंगाली, मराठी, तामीळ, गुजराथी, पंजाबी इत्यादी अनेकांचा मिळून झाला आहे. ही गोष्ट आपण आपल्या राष्ट्रगीतात व भारतीय भाषांचा निर्देश घटनेत करून मान्य केली आहे. संघराज्याचे प्राथमिक घटक समर्थ व्हावेत, त्यांचा कारभार शक्य तो एकोप्याने व्हावा, याकरिता ते एकजिनसी असणे अत्यंत इष्ट. आजचे एकभाषी समाज बहुतांशी एकजिनसी असे आहेत. शिवाय राज्ये एकभाषिक झाल्यामुळे निरनिराळ्या भारतीय भाषा, साहित्य व सांस्कृतिक वैशिष्ट्यांच्या विकासास विशेष अवसर मिळेल. ही मूलभूत दृष्टी मान्य झाल्यावर मराठीसारख्या एकभाषेच्या प्रदेशात मराठी भाषकांचा एक प्रांत असे म्हणण्यास निराळे काहीच सांगावे लागत नाही. प्रांत दोन असावे असे जे म्हणतात त्यांनी मात्र ही विभागणी कशी समर्थनीय आहे हे दाखविले पाहिजे.

## महाविदर्भाची कल्पना कृत्रिम

महाविदर्भ हे नावच मुळात नवीन व कृत्रिम आहे. आज ज्यास महाविदर्भ म्हणतात त्यात नागपूरचा व वऱ्हाडचा असे दोन भाग अगदी अनेक प्रकारे भिन्न आहेत. याच्या उलट नाशिक, नगर, खानदेश, मराठवाडा व वऱ्हाड हा पूर्वकालापासून अगदी विशेष निकटसंबंधी असा महाराष्ट्राचा गाभा समजला गेला आहे. मराठीतील अगदी प्राचीन अशा महानुभाव वाङ्मयातही हेच स्पष्ट प्रतीत होते. भाषिक भेद म्हटले तर ते कोकण व देश यांच्यांतच विशेष. या वर गाभ्याच्या म्हटलेल्या प्रदेशांत भाषिक, सांस्कृतिक जीवन व समाजव्यवसाय व राहणी यांबाबत कोणतेच भेद नाहीत; आणि आज आपल्या साहित्यिक, भाषिक, कलात्मक व इतर सांस्कृतिक हालचाली सबंध मराठी बोलणाऱ्यांच्या प्रदेशांत एकच आहेत. यांत भेद पाडण्याचे व मानण्याचे क्वचित प्रयत्न झाले, पण ते पूर्णपणे अयशस्वी ठरले.

हिंदू समाज हा मुख्यतः जातींचा बनलेला आहे. जातीजातींचा एकमेकांपासून विभक्तपणा लक्षात घेता हिंदू समाज कोठेच इस्लामी व ईसाई समाजाइतका सुसंघटित नाही. हा हिंदू समाजाचा सार्वत्रिक गुण वगळता महाराष्ट्र समाज सर्व मराठी भाषकांच्या प्रदेशांत एकच आहे हे निर्विवाद. महाराष्ट्रातील मुख्य जाती ब्राह्मण, मराठे व महार. महाराष्ट्रात केवळ स्थानिक अशा जाती कमी व लहानलहान प्रादेशिक जाती होण्याचीही प्रवृत्ती नाही. ब्राह्मणांतील माध्यंदिन, ऋग्वेदी, कोकणस्थ, कऱ्हाडे इत्यादी सर्व जाती सर्व महाराष्ट्रभर पसरलेल्या आहेत. त्यांतील कोणाचेच हितसंबंध एका प्रदेशात एक व दुसऱ्यात निराळे असे नाहीत. सगळ्यांच्या सोयरिका सर्रास महाराष्ट्रभर होतात. हीच गोष्ट मराठ्यांची. महारही आपणांस एका भागातले इतर भागांपेक्षा निराळे लेखत नाहीत. सर्व मराठी भाषिक प्रदेशात पश्चिमेस तसेच पूर्वेस मराठा कुणबी हेच मुख्य शेतकरी आणि त्यांच्या व महारांच्या सार्वत्रिक वसाहतीमुळे मराठी प्रदेशास इतर कोणत्याही भारतीय भाषिक प्रदेशापेक्षा एकता प्राप्त झाली आहे.

महाविदर्भातील समाज हा इतर महाराष्ट्राच्या भागापेक्षा वेगळा कधीच नव्हता, आजही नाही. काही फरकच करावयाचा तर मराठवाड्यातील विशिष्ट परिस्थितीमुळे तेथे थोडा तुटकपणा जास्त राहिला.

वऱ्हाड-नागपूर व पश्चिम महाराष्ट्र यांत हा अगदीच नाही. वऱ्हाड-नागपूरचे राजकीय पुढारीपणही पश्चिम महाराष्ट्रापेक्षा निराळे कधीच नव्हते. रानडे, गोखले व टिळक परंपरा दोहोंकडे सारख्याच पोसल्या; उलट डॉ. मुंजे यांची मतप्रणाली किंवा नागपुरास स्थापन झालेला रा. स्व. संघ याचा प्रभाव नागपूरइतका पुण्यातही दिसला. ब्राह्मणेतर चळवळ पश्चिम महाराष्ट्राइतकी नागपूर-वऱ्हाडात प्रबल झाली नाही; तरी ज्योतिबा फुले व सत्यशोधक समाज यांची पकड तेथेही आज दिसून येते. डॉ. आंबेडकरांवरील निष्ठा त्यांच्या भंडाऱ्याच्या अनुयायांत त्यांच्या कुलाब्याच्या अनुयायांइतकीच दिसते. एवंच, जुन्या इतिहासाचा विचार केला किंवा आजची साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती पाहिली तर नागपूर-वऱ्हाड हा एक निराळा, एकजिनसी, इतर मराठी भाषकांहून भिन्न असा प्रदेश आहे हे म्हणणे क्षणभरही टिकावयाचे नाही.

याच्या पुढील प्रश्न म्हणजे आर्थिक हितसंबंध आणि संघराज्यघटकांचा इष्ट विस्तार व त्यांचा अर्थव्यवहार यांचा. नागपूर-वऱ्हाडच्या जनतेचे आर्थिक हितसंबंध पश्चिम महाराष्ट्रातील जनतेपेक्षा काही निराळे आहेत काय? निराळे असल्याचे लक्षण मला तरी कोठें दिसत नाही. शेती, व्यापारउदीम, कारखानदारी, मजूरवर्ग यांचे प्रश्न व त्यांची परिस्थिती ही दोन्ही ठिकाणी साधारणपणे सारखीच आहे. काही फरक असलाच तर तो एवढाच की, त्यातल्या त्यात निकृष्ट वर्गाचे हितसंबंध मुंबई राज्यात जरा जास्त सांभाळले गेले आहेत. सावकारीनियंत्रणे, कूळकायदे, मजूरवेतन वगैरे सर्व बाबतींत नागपूर-वऱ्हाडची परिस्थिती काहीशी मागासलेली आहे; व ग्रामीण भागातील आर्थिक विषमता नागपूर-वऱ्हाडकडे जास्त दिसते. तेथे सावकार, व्यापारी, इनामदार, या वर्गाची पकड जमिनीवर बरीच घट्ट आहे. ती इकडे पुष्कळ निसट आहे. राजकारणातही तिकडे सामाजिक व आर्थिक श्रेष्ठता असलेला वर्गच अजून पूर्णपणे प्रभावी आहे. शेतकरीमजूर संघटना त्या मानाने दुर्बल. तेव्हा आर्थिक राजकारणाच्या दृष्टीने तेथील बहुसंख्य जनतेचे हित येथील पुढारलेल्या ओघात मिसळण्यात आहे हे उघड आहे. अर्थात उलट दृष्टीने विचार केल्यास निष्कर्ष साहजिकच उलटा निघेल.

## घटकराज्यांच्या कमाल व किमान मर्यादा

शेवटचा विचार घटक राज्यांच्या इष्ट मर्यादा व त्यांचा अर्थव्यवहार. याबाबत आपल्याकडे अजून जशा गोष्टी घडत आल्या तशा होऊ दिल्यामुळे तात्त्विक विचारच झाला नाही. उत्तर प्रदेशापासून भोपाळपर्यंत लहान मोठी राज्ये आहेत. परंतु नवीन राज्ये निर्माण करावयाची तर त्यांच्या कमाल व किमान मर्यादांचा नीटपणे विचार झाला पाहिजे. कमाल मर्यादा बरीच मोठी दिसते. उत्तर प्रदेशाची लोकसंख्या सहा कोटींवर व बिहारची चार कोटींवर आहे. त्यांचे अनेक लहान-मोठे तुकडे पाडावे असे कोणी म्हणत नाही. तामीळ, तेलगु व कन्नड या भाषकांची निराळी राज्ये झाली म्हणजे ही सर्व तीन कोटींच्या आतबाहेरील होतील. तेलगु भाषकांच्या प्रांतात भौगोलिक, आर्थिक इत्यादी भेद मराठी भाषिक प्रांतापेक्षा अधिक, पण तेथेही विभक्तपणाचे वाद त्यांनी मिटते घेतले. उत्तर व दक्षिण कर्नाटकात दोन मोठ्या निरनिराळ्या जमाती बलवान आहेत. ही कर्नाटक एकीकरणाच्या मार्गात मोठी अडचण होती. पण तीही आता मिटत आली आहे. तेव्हा तीन-सव्वातीन कोटी लोकसंख्येचा महाराष्ट्र फार मोठा होतो म्हणून तो विभागला पाहिजे या म्हणण्याला कोणताच आधार नाही.

दुसऱ्या बाजूने विचार करावयाचा तर लहानांत लहान राज्य केवढे असलेले चालेल हे पाहिले पाहिजे. नवीन राज्य बनवावयाचे तर ते आर्थिक दृष्ट्या आपल्या पायावर उभे राहिले पाहिजे हे उघड आहे. याकरिता किमान सामर्थ्य किती हवे ते 'फायनान्स कमिशन'च्या अहवालावरून कळेल. सर्वच

लहान राज्यांची कशी कुचंबणा होते हे त्यावरून दिसून येईल. या अहवालावरून थोडक्यात असा निष्कर्ष काढता येईल की, अर्थव्यवहाराचा विचार करता नवीन राज्य शक्य तितके मोठे असणे हे राज्याच्या व संघराज्याच्या दोन्ही दृष्टींनी इष्ट व आवश्यक आहे. तेव्हा काही विशेष कारण असल्याशिवाय अडीच-तीन कोटींहून कमी लोकसंख्या असलेले राज्य निर्माण करण्यास कोणीही अर्थव्यवहारज्ञ अनुकूलता दर्शविणार नाही. तसेच लहान राज्य केल्याने आम्ही तेथील जनतेचे काही विशेष हित पाहतो, या दाव्याचा फोलपणा अर्थव्यवहाराची ही आकडेमोड केल्यावर स्पष्ट होईल. याबाबत काही ठोकळ आकडे पाहावे. पश्चिम महाराष्ट्राची लोकसंख्या – मुंबई शहर धरून – १९० लाखांहून अधिक आहे. नागपूर–वऱ्हाडची ८० लाखांहून कमी व मोगलाईच्या मराठी भागाची जेमतेम ५० लाख आहे. तेव्हा हे तीनही भाग एक होणे हेच उघडपणे इष्ट. असे झाल्यानेच नवीन समर्थ राज्य निर्माण होईल. एरवी नाही.

## उपेक्षेची निराधार भीती

राजकारणी पुढाऱ्यांना असे वाटते की, दोन भाग एकत्र झाले म्हणजे लहान भागातील लोक व पुढारी यांची मोठा भाग उपेक्षा करील. जेथे एकमेकांत विलीन होणारे दोन भाग एकजिनसी नाहीत तेथे हा विचार प्रस्तुत आहे. मराठी भाषकांच्या एका राज्यात असे होणार नाही. याचे कारण सर्व मराठी समाज एकजिनसी आहे हे होय. जुन्या मुंबई राज्यातील मराठी घटक, वऱ्हाड–नागपूरच्या मराठी घटकापेक्षा आपण निराळे असे वागत राहणे असंभाव्य आहे. खानदेश – वऱ्हाडचे प्रश्न इतके सारखे आहेत की, यांतील पुढारी एकमेकांना साहजिक जवळ समजतील. जुन्या काळी एका राज्यात होतो म्हणून रत्नागिरी व खानदेशचे पुढारी आपणांस एकातले समजून वऱ्हाडला डावलतील ही कल्पनाच फोल होय. हे जसे प्रादेशिक हितसंबंधाचे तसेच जातीजातींचे. उदाहरणार्थ, कोल्हापूरच्या मराठ्यांस पुणे–नाशिकच्या मराठ्यांपेक्षा उमरावतीचा मराठा आजही दूरचा वाटत नाही. एक राज्य झाल्यावर जुन्या प्रादेशिक भेदांची याबाबत आठवणही राहणार नाही.

शेवटी एक गोष्ट आग्रहाने सांगावीशी वाटते. ती ही की, मूलतः हा प्रश्न सौद्याचा नाही, भावनेचा आहे. सर्व मराठी भाषक एकमेकांस विशेष जवळचे वाटत असले, आपल्या इतिहासाच्या व परंपरेच्या अनुरोधाने आपले एक राज्य झाले असता भारताची विशेष सेवा करून दाखवू अशी त्यांच्यांत सार्वत्रिक भावना असली तरच अशा एक राज्याचा विचार करण्याची जरुरी, एरवी नाही. अकोला–करार अगर नागपूर–करार यांचे उद्देश कोणते तरी दोन जवळचे प्रदेश देवाण–घेवाण करून जोडण्याचा नव्हता व नाही. साधर्म्यामुळे एकत्र येण्याची तीव्र इच्छा असलेल्या लोकांच्या भिन्न राज्यांत अनेक वर्षे राहिल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या एकीकरणाच्या मार्गातील अडचणी साधक–बाधक विचार करून निवारण करणे एवढेच विचारविनिमयाने अथवा कराराने होऊ शकते. मूळ एकात्मतेची भावनाच नसती तर कोणी या खटाटोपात पडले नसते; व तशी भावना नसती तर या वाटाघाटींना आले इतकेही यश कधी येऊ शकले नसते.

*केसरी*, १–११–१९५३

☆

# विभाग : २

## महाराष्ट्राचे आर्थिक प्रश्न

# १ . . मुंबई इलाख्यातील जमाबंदीची पद्धती

या वादात आरंभीच शेतसारा म्हणजे कर की खंड, हा प्रश्न उद्‌भवतो. खंड हा शब्द येथे अर्थशास्त्रात इंग्रजी शब्द रेंट हा ज्या अर्थाने वापरतात, त्या अर्थाने वापरला आहे. शेतीच्या उत्पन्नाचे शास्त्रीय दृष्टया दोन भाग करण्यात येतात. एक भाग जमिनीच्या नैसर्गिक गुणांमुळे जे उत्पन्न झाले तो व दुसरा शेतकऱ्याच्या अंगमेहनतीमुळे जे उत्पन्न झाले तो. या पहिल्या भागास खंड असे म्हणतात; व अर्थात तो जमिनीच्या मालकाचा हिस्सा होय. मग शेतसारा खंड असल्यास प्रत्यक्ष जमीन वाहणाऱ्या शेतकऱ्याच्या वेतनावर त्याचा भार बिलकुल पडत नाही व तो जमिनीच्या मालकालाच भरावा लागेल हे खरे. शेतसारा हा खंड आहे या सरकारी विधानास पुरावा म्हणजे हिंदुस्थानातील राजे पुरातन काळापासून आपणांस सर्व जमिनीचे मालक म्हणवीत आले एवढाच काय तो होय. अर्थात 'भूपति' या शब्दात असा थोडाबहुत ध्वनी निघतो; पण अशा प्रकारच्या पुराव्यास फारसे महत्त्व नाही. जमिनीचे मालक ही संज्ञासुद्धा अत्यंत मोघम अशी आहे. मोगल व मराठी अमदानीचे भरभराटीचे दिवसांत राजाची मालकी सर्व जमिनीवर आहे अशी समजूत रूढ नसावी, असे बेडन पॉवेलचे मत आहे. मोगल अमदानीच्या अस्तकालात, विशेषतः १८ व्या शतकाचे शेवटी शेवटी, हा हक्क प्रतिपादन करण्यात आला व त्यावरूनच ब्रिटिशांनीही तो हक्क सांगण्यास सुरुवात केली.

तथापि, या प्रश्नाचा ऐतिहासिक दृष्टया विचार करून काही फायदा नाही. जुन्या हिंदी राज्यपद्धतीत व आजच्या ब्रिटिश राज्यपद्धतीत इतका जमीन-अस्मानाचा फरक आहे की, त्या वेळेचे प्रचलित सिद्धांत आजच्या परिस्थितीस लागू करणे हास्यास्पद आहे. हल्ली रयतेचे हक्क काय ते पाहिले म्हणजे खरा मालक कोण हे चटकन कळेल. ब्रिटिशांनी सुरुवातीपासूनच जमिनीचा कोणत्याही तऱ्हेचा उपयोग करण्याचा व ती विकून टाकण्याचासुद्धा हक्क रयतेस दिला आहे. खंडकऱ्याला जमीन विकून टाकण्याचा हक्क कोठे असतो? शेतसाऱ्यात कराहून विशेष असे काहीच नाही. शेतसारा बरीच वर्षे थकला असता सरकार शेताचा कबजा घेईल. पण कोणत्याही सुधारलेल्या देशात कोणाही नागरिकाने कराची रकम न भरल्यास त्याच्या इस्टेटीवर जप्ती ही येणारच. या बाबत जास्त लिहावयास नको. खुद्द सरकारनेच ही गोष्ट अप्रत्यक्ष रीतीने कबूल केली आहे. १८८६ च्या इन्कमटॅक्स ॲक्टान्वये शेतकी उत्पन्नावर हा कर द्यावा लागत नाही. शेतसारा कर नसल्यास या योजनेची जरुरी नव्हती. पण इन्कमटॅक्ससारखाच एखादा कर शेतकऱ्यावर आधीच लादलेला आहे अशी सरकारची खात्री होती म्हणूनच ही सूट शेतकऱ्यांना मिळाली. शेतसारा जर खंड म्हणजे सरकारच्या जमिनीच्या मालकी-बद्दलचे देणे, तर मग शेतकी उत्पन्नावर प्रत्यक्ष कर असा काहीच लादलेला नाही हे उघड आहे व

असे असता इन्कमटॅक्सची सूट देण्याचे काहीच कारण नव्हते. शेतसारा खंड की कर, हा वाद फारसा महत्त्वाचा नाही. विशेषतः ज्या ज्या प्रांतांतून रयतवारी पद्धती प्रचलित आहे, तेथे तर त्यास अगदीच कमी महत्त्व. कारण सालिना २०० रुपये उत्पन्नातून १५ रुपये भरणारा शेतकरी खंड देवो की कर देवो, उत्पन्नाच्या मानाने सरकारी देणे जबर भरतो हे निर्विवाद आहे. शेवटी एवढेच सांगावयाचे की, हा एके काळी खंड म्हणून लादला असो वा नसो आपणांस हिंदी करपद्धतीचा विचार करताना हा एक करच आहे समजून त्यात कोणत्या दृष्टीने फरक करणे योग्य आहे हे ठरविले पाहिजे. जुन्या काळी कर कसेही लादलेले असोत, आपल्या नवीन योजनेत सर्व प्रकारच्या उत्पन्नावर सारखाच बोजा पडेल अशी सुधारणा करण्याचा प्रयत्न जरूर आहे.

शेतसारा हा एक कर आहे; व तो प्रत्यक्ष कर आहे. काही दिवसांपूर्वी शेतसारा हा अप्रत्यक्ष कर आहे, असे 'केसरी'मध्ये एका लेखात प्रतिपादन करण्यात आले होते. पण हे चुकीचे आहे. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हे शब्द Direct व Indirect या इंग्रजी शब्दांचे प्रतिशब्द होत. Direct Taxation याची व्याख्या जरी निश्चित नाही तरी एवढे खरे की, उत्पन्नावरील सर्व करांना प्रत्यक्ष कर असे म्हणतात. शेतसारा वाढला असता धान्याची किंमत शेतकरी कदाचित वाढवू शकेल म्हणून तो अप्रत्यक्ष कर असे म्हणणे, इन्कमटॅक्स वाढला असता कारखानदार जिनसांच्या किमती वाढवील, अथवा वकील आपली फी वाढवील, म्हणून इन्कमटॅक्स हा अप्रत्यक्ष कर असे म्हणण्यासारखे आहे. ज्या प्रमाणे इन्कमटॅक्स बिनशेतकी उत्पन्नावरील एक प्रत्यक्ष कर, त्याचप्रमाणे शेतसारा हा शेतकी उत्पन्नावरील प्रत्यक्ष कर.

## शेतसाऱ्याची आकारणी

कोणत्याही उत्पन्नावरील कराबद्दलचा पहिला प्रश्न म्हणजे कररूपाने उत्पन्नाचा कोणता हिस्सा सरकार घेते हा होय. ब्रिटिश अमदानीच्या पूर्वभागात हा हिस्सा ठरविण्याचे बरेच प्रयत्न झाले व आजतागायत काही इतर प्रांतांत उत्पन्नाचा कोणता हिस्सा शेतसारा हे पक्के ठरविण्याचा प्रयत्न केलेला आढळतो. मुंबई इलाख्यातसुद्धा सुरुवातीस असले प्रयत्न करण्यात आले, पण ते सर्व निष्फळ ठरले. जमीनदारी प्रांतांतून जमीनदाराचे उत्पन्न म्हणजे खंडाची रक्कम. ही रक्कम साधारणपणे निश्चित करणे फार अवघड नाही. पण रयतवारीत जमिनीचा मालकच जमीन बहुशः वाहतो. येथे जमिनीच्या मालकाचे उत्पन्न म्हणजे शेतीचा खर्चवेच जाऊन उरलेले निव्वळ उत्पन्न. हे निखालस उत्पन्न किती आहे हे निश्चित करणे ब्रिटिश राज्याच्या सुरुवातीच्या काळात फार कठीण होते. प्रिंगल साहेबाने हा प्रयत्न केला, पण त्यात तो अगदीच फसला. तेव्हा सरकारने हा नाद सोडून देऊन शेतसाऱ्याची आकारणी करताना जुना वसूल ध्यानात घेऊन साधारणपणे सरकारचे उत्पन्नाला धक्का पोचणार नाही व शेतकऱ्यावरही जुलूम होणार नाही, अशी रक्कम जमाबंदी कामगारांनी बसवावी असे ठरविले. अर्थात सरकारी नियमांनी कोणतीही मर्यादा पक्की ठरविलेली नसल्यामुळे या मूळच्या जमाबंदीची रक्कम प्रत्येक जमाबंदी कामगारांच्या वैयक्तिक कलावर अथवा लहरीवर बरीच अवलंबून राहिली. याचा परिणाम असा झाला की, जिल्ह्या-जिल्ह्यांतून अथवा जवळजवळच्या तालुक्यांतूनसुद्धा शेतसाऱ्याची आकारणी सारखीच असेल असा काही नेम राहिला नाही. त्यानंतर तालुक्याचा शेतसारा ३३ टक्क्यांहून जास्त वाढविणे बरोबर नाही, असा सरकारी नियम झाल्यामुळे मूळच्या जमाबंदीत असलेले फरक अजून कायम आहेत. (उदाहरणार्थ, भुसावळ, जामनेर व जळगाव तालुक्याचे सेटलमेंट रिपोर्ट पाहा.) ठराविक मर्यादेचे अभावी सेटलमेंट ऑफिसरावर शेतसाऱ्याची रक्कम इतकी अवलंबून असते की, निदान रिपोर्टावरून तरी एका ठिकाणी साऱ्याची वाढ कमी व दुसऱ्या ठिकाणी जास्त असे का,

हे काहीच कळत नाही. (उदाहरणार्थ, खेड व माळशिरस तालुक्याचे सेटलमेंट रिपोर्ट पाहा. रिपोर्टावरून खेडची सांपत्तिक स्थिती माळशिरसहून बरीच चांगली आहे, असा समज होतो. तरी खेड तालुक्यात २५ टक्के वाढीची शिफारस करण्यात आली, पण माळशिरस तालुक्यात पुरते ३३ टक्के वाढवावे असे सरकारने ठरविले!) यामुळे इलाख्याच्या सर्व तालुक्यांत शेतसाऱ्याचा बोजा एकसारखा नाही. किमतीच्या वाढीमुळे हल्ली तर हे फरक जास्तच मोठ्या प्रमाणात दृष्टोत्पत्तीस येतात.

मुंबई सरकारचे धोरण साधारण माफक शेतसारा आकारून तो ३० वर्षे कायम करणे हे होय. अर्थात माफक शेतसारा आकारण्याचे आश्वासन फार मोघम. त्या अर्थी गेल्या शतकात जमाबंदीच्या बाबीतले मुंबई सरकारचे धोरण कसे बदलत गेले, हे पाहू. १८२० चे सुमारास या इलाख्यातील शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत हलाखीची होती. दुसऱ्या बाजीरावाच्या अमदानीतील अंदाधुंदीमुळे बराच प्रांत ओसाड पडला होता व वसूल सारखा कमी होत होता. १८४० पर्यंत ही स्थिती अशीच राहिली. या २० वर्षांत मुंबई सरकारचे धोरण अजून ठरले नव्हते. शेतसाऱ्याच्या आकारणीचे मान बाजीरावाच्या कारकीर्दीतील वसुलावरून ठरविले असल्यामुळे त्याचा बोजा शेतकऱ्यास दुःसह होता. इतर प्रांतांतील जमाबंदी पद्धती येथे सुरू करण्याचे प्रयत्नही काही झाले, पण ते सर्व निष्फळ ठरले. १८४० चे सुमारास रयतवारी पद्धतीवर माफक सारा व ३० वर्षे मुदत हे धोरण नक्की झाले. जुनी आकारणी जिकडे तिकडे कमी करण्यात आली; व त्यामुळे शेतकऱ्याची स्थिति बरीच सुधारली. शेतसारा कमी केला असता शेतकरी जास्त जमीन वाहू लागेल, ही सरकारची अटकळ खरी ठरली. तरी साधारणतः जमाबंदी कामगारांचा कल शक्य तितकी सारावाढ करण्याकडे असल्यामुळे सरकारला काही इतर ठराविक निर्बंध घालावे लागले. पहिला प्रश्न धान्याच्या किमतीचा. ज्या वेळेस राजा शेतसारा हा पिकाचा ठराविक भाग असा घेत असे, तेव्हा हा प्रश्न महत्त्वाचा नव्हता. पण वसुलात धान्य न घेता जेव्हा धान्याची किंमत घेण्याचा प्रघात सुरू झाला, तेव्हा या प्रश्नाचा विचार करणे अवश्य झाले. शिवाय ३० वर्षे शेतसारा ठरविणे म्हणणे ही ३० वर्षे किमतीची पातळी काय राहील याबद्दल अटकळ बांधणे! या प्रश्नाचा विचार न केल्यामुळे शेतकऱ्यावर बराच जुलूम झाला. १८६० पासून ६६ पर्यंत अमेरिकेतील दक्षिण व उत्तर संस्थानांतील लढाईमुळे कापसाचा भाव फार वाढला होता. त्याच वेळेस काही तालुक्यांत जमाबंदीचे काम चालू होते. तेथील सेटलमेंट ऑफिसरांनी कापसाचा भाव तोच कायम राहील असे गृहीत धरून साऱ्याची आकारणी केली. पुढे थोड्याच वर्षांत कापसाचा भाव उतरला, अर्थात शेतकऱ्याचे उत्पन्न कमी झाले, पण शेतसारा मात्र कायम! १८७५ साली पुणे व अहमदनगर जिल्ह्यांतील झालेल्या दंग्यांचे हे एक कारण असे दंगा-कमिटीचे मत होते. सरकारला अर्थात सूट देणे प्राप्त झाले. परंतु दरम्यान शेतकरी फुकट बुडाला.

याहूनही महत्त्वाचा प्रश्न म्हणजे दुष्काळातील तहकुबीचा व माफीचा. मुंबई सरकारचे म्हणणे असे की, आम्ही जी आकारणी करतो ती या सर्व गोष्टींचा विचार करूनच. निरनिराळ्या वर्षांची आणेवारी लक्षात घेऊन त्यांचे निदान काढतो व मग शेतसाऱ्याची रक्कम कायम करतो. पीक चांगले आले असता शेतकऱ्याचा सारा काही वाढवीत नाही; मग वाईट पिकाचे वेळेस सूट का! तात्त्विक दृष्ट्या हे काही चुकीचे नाही, पण व्यवहारात याचे परिणाम शेतकऱ्यास फार भोवले. विशेषतः १८७६–७८ सालच्या दुष्काळात फारच अन्याय झाला. पुण्याचे सार्वजनिक सभेने माफी मिळविण्याची फार धडपड केली; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी १९०१ चे कमिशनने जेव्हा याबाबतीतील मुंबई सरकारच्या धोरणावर बरेच कोरडे ओढले, तेव्हा तहकुबी व माफी देणे सरकारास भाग पडले. त्याचप्रमाणे शेतकऱ्याने आपला पैसा खर्च करून केलेल्या शेताच्या सुधारणांमुळे जर त्याचे उत्पन्न

वाढले तर त्या वाढलेल्या उत्पन्नावर शेतसारा आकारू नये, असेही सरकारने १८८० चे सुमारास ठरविले. शिवाय सेटलमेंट ऑफिसराच्या कर वाढविण्याच्या हक्काला काहीतरी आळा म्हणून सरकारने दर ३० वर्षांनंतरचे फेरतपासणीच्या वेळेस कोणत्याहि शेतावर शेकडा १०० टक्के, गावावर ५० टक्के, व तालुक्यावर ३३ टक्के याहून जास्त दर वाढवू नये असा नियम केला. त्यावेळेपासून शेतसाऱ्याचे मान ठरून गेल्यासारखेच झाले! रिव्हिजन सेटलमेंट ऑफिसरला आता फक्त पुरती ३३ टक्के वाढ करावयाची की कमी करावयाची एवढाच प्रश्न बहुतेक उरतो.

*केसरी*, २९–१२–१९२५

☆

# २ . . मुंबई सरकारचे औद्योगिक खाते

मुंबई इलाख्याच्या औद्योगिक खात्याचा सन १९२९–३० सालचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून सरकारने मनात आणलेच तर आर्थिक उन्नतीचे कार्य कोणकोणत्या दिशेने करता येण्यासारखे आहे हे स्पष्ट दिसून येते.. औद्योगिक क्रांती एकंदर हिंदुस्थानात सुरू होऊन फार थोडी वर्षे झाली. १९०६ च्या सुमारास मद्रास इलाख्यात एक औद्योगिक खाते स्थापन करण्यात आले, पण लॉर्ड मोर्ले यांचे मत प्रांतिक सरकारने अशा प्रकारची कोणतीच जबाबदारी आपणावर घेऊ नये असे पडल्यावर हे खाते लवकरच बंद करावे लागले. पुढे औद्योगिक कमिशनने उद्योगधंद्यास ऊर्जितावस्था आणण्यासाठी सरकारने निरनिराळ्या प्रकारे कशी मदत करावी याबद्दल बऱ्याच सूचना केल्या. मॉंटफर्ड सुधारणांप्रमाणे उद्योगधंदे हा विषय प्रांतिक बनल्यामुळे या सूचनांस मूर्त स्वरूप देण्याचे कार्य प्रांतिक सरकारांकडेच ओघाने आले. त्याप्रमाणे निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या धर्तीने काम सुरू झाले. पण मुंबई इलाखा इतर बऱ्याच बाबतींप्रमाणे याही बाबतीत पुष्कळ मागासला. काही वर्षे हे खाते निराळे होते, पण नंतर काही वर्षे ते दुसऱ्या एका खात्याबरोबर जोडून देण्यात आले. पुनः गेली तीन-चार वर्षे औद्योगिक संचालक (Director of Industries) असा निराळा अधिकारी नेमण्यात आला आहे. खात्याचे अंदाजपत्रक नेहमी अगदी तुटपुंजे. तेव्हा संचालकाचे मनात असते तरी त्याला काही फारसे करिता येण्याजोगे नव्हते. १९२९ सालपावेतो संचालक एवढाच काय तो मोठ्या हुद्द्याचा अधिकारी या खात्यात होता. या साली मात्र एक औद्योगिक रसायनज्ञ व एक औद्योगिक यंत्रज्ञ (इंजिनियर) या दोन नेमणुका नवीन करण्यात आल्या. म्हणजे आता नवीन कारखाने अथवा उद्योगधंदे काढावयाचे असल्यास सुरुवातीस तज्ज्ञांकडून सल्ला मिळण्याची सोय थोडीबहुत झाली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. याप्रमाणे २०–२५ लोकांस सल्ला दिल्याचे अहवालात नमूद केले आहे. अर्थातच या तीन अधिकाऱ्यांस सर्वच बाबतींत योग्य सल्ला देणे शक्य नाही. पण निदान धंद्याचे सुरुवातीस आवश्यक अशी सर्व माहिती नवीन कारखानदारास उपलब्ध करून देणे हे औद्योगिक खात्यास आता शक्य झाले आहे असे वाटते. आपल्याकडे विशेषतः लहान प्रमाणावर निघत असलेल्या बऱ्याच धंद्यांच्या बाबतीत सुरुवातीस नफ्यातोट्याचा विचार जितका कसोशीने व्हावयास पाहिजे तितका तो होत नाही व योग्य सल्ल्याच्या अभावी अशा पुष्कळच चुका घडतात की, ज्यांमुळे पुढे धंदा किफायतशीर बनणे कठीण जाते. औद्योगिक खात्याने वेळेवर मदत करून व अशी मदत मिळण्यासारखी आहे हे सर्वत्र जाहीर करून येथे बरीच सुधारणा घडवून आणणे जरूर आहे.

औद्योगिक खात्याचा सल्लागार म्हणून उपयोग काही नवीन यांत्रिक कारखाने वगैरे काढू इच्छिणाऱ्यांसच होणार. याशिवाय या खात्याचे काम म्हणजे एकंदर इलाख्यातील परिस्थितीची पाहणी करून

नवीन उद्योगधंदे, कार्याच्या नवीन दिशा व पद्धती सुचविणे हे होय. ही गोष्ट झाली आधुनिक यांत्रिक पद्धतीने चालविलेल्या उद्योगांसंबंधी. परंतु आपल्या औद्योगिक कामगारांचा मुख्य भरणा घरगुती धंद्यांतच आहे. तेव्हा या सर्व प्रकारच्या घरगुती धंद्यांची सुधारणा करणे हे सरकारी खात्याचे दुसरे कर्तव्य होय. प्रस्तुत अहवालात नवीन धंद्यांची पाहणी या दृष्टीने रासायनिक धंद्यांविषयी औद्योगिक खात्याने चौकशी केली असे नमूद केले आहे. निरनिराळी रसायने आपल्या देशात तयार होण्यास व्यापारी संरक्षण सरकारास देणे अवश्य आहे किंवा नाही यासंबंधी जकातमंडळ विचार करीतच आहे. पण येथील औद्योगिक खात्याने केलेल्या चौकशीवरून रासायनिक धंद्यांची एकंदर परिस्थिती बरीच आशाजनक आहे असे संचालकांचे म्हणणे पडते.

दुसऱ्याही एका महत्त्वाच्या गोष्टीबद्दल माहिती गोळा करण्यात आली. ही गोष्ट म्हणजे लहानसहान धंद्यांस विजेचा पुरवठा करण्यासंबंधीची होय. टाटांची धरणे बांधण्यापूर्वी जल–विद्युत् अथवा पाणवीज फार स्वस्त होईल अशी सर्वांची अपेक्षा होती. परंतु गेल्या दहा–पंधरा वर्षांच्या अनुभवांती या बाबतीत पूर्ण निराशाच होत आहे असे कबूल करणे भाग आहे. काही वर्षांपूर्वी टाटांनी मुंबईच्या गिरण्यांस विकलेल्या आपल्या विजेचा भाव वाढविल्यावरून कोळशापेक्षा पाणवीज काहीतरी स्वस्त पडते किंवा नाही याबद्दल वाद होऊन ती फारशी स्वस्त पडत नाही असेच बहुमत झालेले दिसले. आता औद्योगिक खात्याने केलेल्या चौकशीवरून लहानसहान उद्योगधंद्यांस पाणवीज एका युनिटमागे अडीच आण्यांहून अधिक स्वस्त पडणे शक्य नाही असे ठरते. पण लहानसे तैलयंत्र वापरल्यास या चालक-शक्तीचा (motive power) खर्च एका युनिटमागे पावणेदोन आणे सरासरी पडतो, असे संचालकांचे म्हणणे आहे. तेव्हा पाणविजेबद्दलची अपेक्षा निष्फळ ठरल्यामुळे चालकशक्तीची महर्घता हा आपल्या औद्योगिक परिस्थितीतील महादोष तसाच कायम राहणार असे दिसत आहे.

औद्योगिक खात्याचे मुख्य कार्य घरगुती धंद्यांसंबंधी आहे. तीन मोठे अधिकारी सोडल्यास सदरहू खात्यातील इतर सर्व कामदारांची नेमणूक हातमागाच्या धंद्यात शिक्षण देण्याकरिता व सुधारणा घडवून आणण्याकरिता झालेली आहे. नुकतीच सरकारने पुण्यास एक हातमागाची शाळा काढली आहे. परंतु कार्याची खरी दिशा म्हणजे फिरते शिक्षक व प्रचारक नेमणे हीच होय. हे फिरते शिक्षक व प्रचारक बऱ्याच विणकऱ्यांच्या पेठांतून हिंडले, असे अहवालात म्हटले आहे. धावता धोटा अथवा इतर हातमाग यांत किंवा हातमागावरील कापड तयार करण्याच्या सर्व क्रियांत ज्या नवीन सुधारणा इष्ट वाटतील त्यांचा प्रचार करणे हे त्यांचे मुख्य कार्य. रंगकाम सुधारण्याकरिताही बरेच श्रम घेण्यात आले असे दिसते. विणकरांस सूत रंगविण्यास शिकविणे व रंगकामातील दोष नाहीसे कसे करावयाचे याबद्दलची माहिती देणे हेही या प्रचारकांचे कार्य आहे. स्थानिक परिस्थितीची थोड्याशा बारकाईने चौकशी झाल्यास पुष्कळ वेळा स्थानिक मालात कसा फरक पाडता येतो याबद्दल बराच अनुभव या अहवालात दिला आहे. एकंदर पैसा थोडा व फक्त पाच–दहा प्रचारक व शिक्षक असल्यामुळे फारसे कार्य पार पाडणे शक्य नाही हे उघड आहे. तथापि या दिशेने सारखे प्रयत्न होत राहिल्यास ते खरोखरच परिणामकारक होतील असे म्हणावयास हरकत नाही.

सारांश, प्रस्तुत अहवालातून कार्य विशेष झाले असे म्हणता येत नाही. हातमागाशिवाय इतर कोणत्याच घरगुती धंद्यात प्रचारक अथवा शिक्षक नाहीत. हातमागाचा धंदाही आपल्याकडे फार मागासलेला आणि त्या मानाने तद्विषयक सुधारणेचे प्रयत्न फार अल्प आहेत. धावत्या धोट्याचा दहा वर्षांपूर्वीच मद्रास इलाख्यात बव्हंशी सार्वत्रिक प्रसार झाला होता; पण आपल्याकडे अजूनही त्याची माहिती सगळीकडे नाही. पाहणी वगैरेचे कामही औद्योगिक खात्याने फारसे हाती घेतलेले दिसत नाही; आणि पाहणी केली तरी सरकार तदनुसार नवीन दिशेने कार्य सुरू करीलच अशी

अपेक्षा करिता येत नाही. दोन वर्षांपूर्वीच झालेल्या रा. गायतोंडे यांच्या कातडे कमविण्याच्या धंद्याच्या पाहणीविषयी अहवाल प्रसिद्ध करण्याकडेकडे सरकारने अद्यापि काहीच केलेले नाही. असो. आम्ही सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे करता येण्यासारखे पुष्कळ आहे. खुद्द संचालकांनीच नवीन दिशा, नवीन सूचना, जुन्याच कार्याकडे अधिक खर्च, यांबद्दल सरकारला भरपूर शिफारशी केल्या आहेत; परंतु त्यांतील एकीचाही स्वीकार होईल असे वाटत नाही. किंबहुना हल्लीच्या परिस्थितीत सबंध खात्यासच काट देण्याचा प्रसंग पुनः आला नाही म्हणजे मिळविली!

*लोकशिक्षण* ४ : १  १ जानेवारी १९३१  पृ० ४९–५१

☆

# ३ . . जमीनमहसूल व तद्विषयक प्रश्न

'केसरी'स जमीनमहसुलाबाबत लिहिण्याचे प्रसंग मुख्यत्वेकरून पिके बुडाली असता फेरपाहणीचे वेळी अथवा एखादे बिल कौन्सिलपुढे मांडलेले असता आलेले आहेत. १९२५ ते १९२७ साली लँड रेव्हेन्यू कमिटीची चौकशी चालली होती, तेवढा प्रसंग सोडल्यास केवळ तत्त्वदृष्ट्या या विषयावर 'केसरी'त लिखाण बहुतेक आले नाही. तथापि प्रासंगिक बाबींवरील अग्रलेख व स्फुटे यांमधील प्रदर्शित केलेल्या विषयात एकंदर सूत्रबद्धता उत्कृष्ट रीतीने दिसून येते. निर्भीडपणे टीका करणे, अमुक एका प्रसंगी सरकारी जुलुमाचा विरोध अमुक तऱ्हेने करा असे जनतेस आग्रहाने सांगणे व अगदी कठीण विषयसुद्धा सुबोध करणे हे 'केसरी'चे गुण येथेही निदर्शनास येतात.

## दुष्काळातील सारावसुली

'केसरी' निघाल्यानंतरची दहा-बारा वर्षे पीकपाण्याच्या मानाने बरी गेली. म्हणून त्या वेळेस 'केसरी'स सूट व तहकुबी यांसंबंधी काही लिहिण्याचे प्रयोजन पडले नाही. पण १८९६–९७ व १९००–०१ या दोन सालांतील दुष्काळांनी सारावसुली हा विषय महत्त्वाचा होऊन बसला. १८८० च्या फॅमिन कमिशनने एकंदर फॅमिन रिलीफ कोडास कायमचे स्वरूप देऊन तहकुबी व सूट ही केव्हा व कशी द्यावी याचे नियम निश्चित केले होते. हे चोहोंकडे सारखेच अमलात आणले जात नसत. त्यातही मुंबई सरकारची याबाबत अनुदारपणाची प्रथमपासूनच प्रसिद्धी होती. १८९२ च्या शेतकरी कमिशन-नेही मुंबई सरकारने सारा वसुलीचे धोरण बदलले पाहिजे अशी शिफारस केली. या कमिशनचे रिपोर्टावर लिहिताना 'केसरी'ने सरासरीच्या तत्त्वाबद्दल समर्पक दृष्टांत दिला. "धारे बसवितांना बरेवाईट पिकांची सरासरी काढून त्याप्रमाणें सारा कायम करितात असे सरकारच्या ऑफिसरांचें म्हणणें आहे. हें म्हणणें जरी आपण खरें घेऊन चाललों, तरी या सरासरीचा शेतकऱ्यांस कांही विशेष फायदा होत असेल असें दिसत नाहीं. सरासरीचे मानानें जीं प्रमाणे ठरविलीं जातात, तीं हिशेबास कितीहि सोईवार असलीं, तरी नदींत सरासरीनें गुडघाभर पाणी आहे असल्या बोलण्यावर विश्वास ठेवून जसा एकादा मनुष्य डोहांत बुडावयाचा, त्याप्रमाणेंच आमच्या शेतकऱ्यांची स्थिति आहे." (२०-१२-९२). तहकुबी वेळेवर न मिळाली तर शेतकरी कसा साफ बुडतो याचे प्रत्यंतर लगेच चार वर्षांनी आलेच. १८९६–९७ सालच्या दुष्काळाबद्दल 'केसरी' म्हणतो, "गुरें कडब्याच्या किंमतीस विकूं लागलीं आणि कडबा सोन्याच्या भावानें जात चालला आहे. सरकारनें आमच्याकडून पैसे घेऊन दुष्काळाचा विमा उतरला आहे व फॅमिन रिलीफ कोडाची नवी आवृत्ति प्रसिद्ध करून या प्रसंगीं आपण कशी मदत करणार हें सरकारनें जाहीर केलें आहे. तेव्हां आतां सरकारनें ज्या ज्या गोष्टी करतों म्हणून

कबूल केलें आहे, तितक्या त्याच्याकडून लोकांनीं पुऱ्या करवून घ्याव्यात. गरीब शेतकरी लोकांस संकटसमयीं काय करावें हें सुचत नाहीं, त्यांस मार्ग दाखवून देणें हें आमचें काम आहे व तो मार्ग म्हटला म्हणजे 'सरकारकडे जा' असा उपदेश करणें व सरकारकडे जाऊन (१) तहकुबी (२) रिलीफ कामावर मजुरी व (३) तगाई हीं मागा असें सांगणें. या समयीं पुण्याच्या 'सार्वजनिक सभे'नें लोकांस हक्काची जाणीव करून देण्याकरितां प्रचारक नेमून उत्कृष्ट काम केलें. पण हें सरकारास अनिष्ट वाटलें व सभेनें पाठविलेल्या मुखत्यारांवर खटले करण्यापर्यंन्त मजल गेली. कांहीं झालें तरी न डगमगतां आपले कायदेशीर हक्क सांभाळणें हेंच जनतेचें कर्तव्य आहे व तें लोकांस नीट समजावून देऊन सरकारी अधिकाऱ्यांपुढें त्यांचें म्हणणें मांडणें हें पुढाऱ्यांचें कर्तव्य आहे, अशीच 'केसरी'ची या वेळची शिकवण आहे. अमुक आणे पीक बुडाल्यास साऱ्याची तहकुबी अगर माफी मिळेल असा जर कायदा आहे तर सरकारी अधिकाऱ्यांनीं लोकांस ती अवश्य दिली पाहिजे व लोकांनीं ती निश्चयानें पण शांततेनें आग्रहपूर्वक मागून घेतली पाहिजे! एका हातांत फॅमिन रिलीफ कोड, दुसऱ्या हातांत अर्ज व मनांत त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय अशी जेव्हां रयतेची स्थिति होईल, तेव्हांच त्यांची या दुष्काळांत दाद लागेल. नाहींपेक्षां दुष्काळनिवारणार्थ चांगला कायदा केल्याचें श्रेय सरकार घेईल आणि आम्ही मात्र उपाशी मरू." (१६-१२-९६). तसेंच पुढाऱ्यांस "असल्या गोष्टीस आता भिऊन उपयोगाचे नाही; किंबहुना योग्य रीतीने रयतेच्या पोटाकरिता भांडत असता एखाद्यास तुरुंगात जाण्याचा जरी प्रसंग आला तरी हरकत नाहीं." (२२-१२-९६), असा उपदेश केला आहे. या वेळी मुंबई सरकारचे धोरण अत्यंत निर्दयपणाचे होते. त्यावर 'केसरी' म्हणतो, "सरकार मारवाडी आहे, अनुदार आहे." नंतर सरकारी ठरावाची फॅमिन रिलीफ कोडाशी विसंगतता दाखवून व साऱ्याच्या तहकुबीची व सुटीची एकंदर हकिगत देऊन किती सूट मिळावयास पाहिजे याचे 'केसरी'ने विवेचन केले. १८९७ सालच्या फॅमिन कमिशनने मुंबई सरकारच्या या धोरणाबद्दल बरीच कडक भाषा वापरली. एकंदर तहकुबी अत्यंत अल्प दिली गेली; व त्यात ऐपतदार व बिनऐपतदार हा नवीनच फरक करण्यात आला. या दोन मुद्द्यांवर 'केसरी'प्रमाणेच फॅमिन कमिशननेही जोर दिला. हा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर सूट देण्याची वहिवाट या देशात कशी जुनी आहे हे सांगून 'केसरी'ने यापुढे तरी मुंबई सरकारचे डोळे उघडतील अशी आशा प्रदर्शित केली. १९०० साली तहकुबीबाबत पूर्वीइतका अन्याय झाला नाही; पण एकंदर सरकारी व्यवस्थेत कंजुषपणाच दिसून आला व बरेच ठिकाणी खालच्या अंमलदारांनी दांडगाई केली. त्यांपैकी काही ठिकाणी चौकशी होऊन लोकांची तक्रार खरी ठरली. या वेळचे विशेष प्रसिद्धीस पावलेले प्रकरण म्हणजे नामदार पारख यांनी गुजरातेतील काही प्रकार उघडकीस आणले त्याबद्दलचे. यावर 'केसरी'ने अग्रलेख लिहिले होते. पुढे १९०२ साली हिंदुस्थान सरकारने दुष्काळातील सुटी-करिता एकदम रकम मंजूर केली असता, मुंबई सरकारने वैयक्तिक चौकशीची मध्येच भानगड उपस्थित केली. त्याबद्दल 'केसरी'ने 'कोठावळ्याचे मध्येच पोट का दुखते!' असा प्रश्न विचारून वेळोवेळी सात-आठ स्फुटे लिहिली. तसेच १९०६-०७ साली याबाबत नवीन नियम प्रसिद्ध झाले, तेव्हा त्यांवर तपशीलवार टीका केली व अगदी अलीकडे म्हणजे १९१८ सालचे खेडा सत्याग्रहाचे वेळेस लॉर्ड विलिंग्डननी सूट अथवा तहकुबी देणे ही सरकारी मोहबत आहे असे एका भाषणात म्हटले असता, ही मोहबत नसून हा रयतेचा पूर्वापार चालत आलेला हक्क आहे, असे 'केसरी'ने त्यांस खडखडीत बजावले.

## शेतसाऱ्याच्या वाढीचा परिणाम

शेतकरी लोकांची इंग्रज सरकारच्या राज्यात निकृष्टावस्था होण्यास जी अनेक कारणे आहेत त्यांपैकीच वारंवार वाढणारा शेतसारा हे एक होय. (२४-१०-९९) असे म्हणून या लेखात दहाणू-

उंबरगाव पेठ्यांतील सारावाढ बेजबाबदार रीतीने करण्यात आली, सरकारने स्वतःच घालून दिलेले नियम कसे पाळण्यात आले नाहीत, सरकारी ठराव जरी चांगले असले तरी खालील अधिकाऱ्यांचे कर्माने जुलूम होतो व यावर अर्ज करावे म्हटले तर हे दाद लागण्याचे द्वार नेहमी मोकळे असतेच असे नाही, असे उद्गार काढले. फेरपाहणीविरुद्ध तक्रार करण्याचे प्रसंग वारंवार यावयाचेच. १८९२ साली रत्नागिरी जिल्ह्यात सारावाढ झाली, त्या वेळेस 'हे सारा वाढविणे की जुलूम' असा अग्रलेख होता. या वेळेस फेरपाहणीच्या बद्दलचे नियम अगदीच सैल होते. "एकदम सारा दोनशे पटीने वाढतो हा धडधडीत अन्याय आहे व तशी सक्ती जर एखादा इनामदार करू लागला तर सरकारच त्याचा प्रथम निषेध करील. पण स्वतःवर प्रसंग आला म्हणजे "पुराणातील वांगी पुराणात," अशा तऱ्हेची सरकारवर टीका केली. मॅक्डोनल्ड कमिशनने विहिरी, ताली वगैरेंपासून सुधारणा झाल्यास त्यापासून होणाऱ्या फायद्यांवर सारा घेऊ नये, या केलेल्या शिफारशीवर हिंदुस्थान सरकारने नकारार्थी ठराव काढला. त्यात सरकारने आपला अनुदारपणा, कंजूषपणा व मारवाडीपणा व्यक्त केला, असे स्पष्ट मत 'केसरी'ने नमूद केले. (५-५-०३). १९२० साली लढाईमुळे झालेली महागाई व अँडरसनचे खंडाचे तत्त्व या नवीन बाबी पुढे आल्या. त्यामुळे सरसहा सर्वच फेरपाहणीच्या संबंधी तत्त्वात व तपशिलात विरोध करणे भाग पडले. १९२४ सालचे पुढे तर 'केसरी'त या विषयावर अनेक स्फुटे व अग्रलेख येऊन गेले. सांगोले, इगतपुरी, अलिबाग, देवगड वगैरे अनेक तालुक्यांतील सारावाढीचे वेळेस 'केसरी'ने रयतेची बाजू स्पष्टपणे पुढे मांडली. अगदी शेवटचे म्हणजे बार्डोलीचे उदाहरण. या सर्वांबाबत प्रथमापासूनच 'केसरी'चे धोरण उघड आहे. अन्याय दिसला की दादफिर्याद निकराने मागण्याचा उपदेश करावयाचा, नियमबाह्य वर्तन झाल्यास त्यावर प्रमाणसिद्ध सडेतोड टीका करावयाची व जेथे नियमांचा अभाव असेल व अधिकाऱ्यांचे बेजबाबदार वर्तनास मुभा असेल, तेथे नियम झाले पाहिजेत व जबाबदारीचे तत्त्व स्वीकारले पाहिजे असा आग्रह धरावयाचा.

## जमीनमहसूल बदलण्याच्या कायद्यास विरोध

जमीनमहसूल बदलण्याच्या १९०१ च्या कायद्यास अगदी प्रथमपासून जोराचा विरोध 'केसरी'ने केला. कायद्याचा पहिला मसुदा प्रसिद्ध झाल्याबरोबर ता. २८-५-०१ चे स्फुटात जी टीका केली त्याच पद्धतीनुसार पुढे ही चळवळ सुरू ठेवली. या कायद्यात एक नवीनच तत्त्व गोवले होते. "आजपर्यन्त रयत ही मालक व सरकारचा हक्क फक्त जमिनीबद्दल कर घेण्यापुरता आहे अशी समजूत होती. पण ही स्थिति हळू हळू बदलण्याचा सरकारचा प्रयत्न चालला होता. जुना मिरासदार म्हणजे जमिनीचा पूर्णपणे मालक होता. हा त्याचा पूर्ण मालकी हक्क अंशतः १८९७ च्या कायद्याने हिरावून घेतला; व त्यापासून शेतकऱ्यास सरकारसारा भरीपावेतो जमिनीचा पृष्ठभाग नांगरण्याचा व त्याचे उत्पन्न वंशपरंपरा खाण्याचा हक्क कायम राखला. पण आता तर गहाण–विक्रीचे हक्क कमी करून शेतकऱ्यांस केवळ उपरी कुळें बनविण्याचा घाट सरकारनें घातला आहे." यावर 'केसरी'ने, "उपरी कूळ या नात्यानें राहण्यांतच जर शेतकऱ्यांचें हित आहे तर मग इनामदारांची सर्व कुळें उपरी करून टाकण्यास काय हरकत आहे?" असा प्रश्न विचारला व त्याला "इनामदार स्वार्थसाधू व कर्जबाजारी असतात असाच जर आक्षेप घ्यावयाचा असेल तर तो आक्षेप सरकारला बिल्कूल लागू पडत नाहीं असें नाहीं. कारण हिंदुस्थान सरकारलाहि पुष्कळ कर्ज आहे आणि त्याची स्वार्थ-परायणता इतकी जबर आहे कीं, दुष्काळांत मोकळ्या हातानें शेतकऱ्यांस सूट देणें त्याच्या जिवावर आलें आहे." (४-६-०१), अशी पुस्ती जोडली. या बिलाने कलेक्टर हा जिल्ह्याचा बडा इनामदार बनेल असे 'केसरी'ने बजावले. पुढे चळवळ वाढल्यावरून हे केवळ प्रयोगादाखल आहे असे जेव्हा

सरकारकडून सांगण्यात आले, तेव्हा प्रयोगच करावयाचा तर एकदोन जिल्ह्यांपुरताच करा असें त्यास सरळ उत्तर दिले गेले. या बिलाचे समर्थनार्थ शेतकऱ्यांची पत कमी करणे त्यांसच हितावह असे सांगण्यात येत असे. त्यास 'केसरी'ने समर्पक उत्तर दिले. "सावकारानेंच शेतकऱ्यांस बुडविलें अशी अधिकारी लोकांनी आपली खोटी कल्पना करून घेतली आहे, त्याचाच हा सर्व परिणाम आहे. अव्वल इंग्रजींत मोजणी तीस वर्षांची झाली व शेतकऱ्यांस मालकीबद्दलची खात्री वाटूं लागली, तेव्हा चोहोंकडे नव्या जमिनी लागवडीस येऊं लागल्या, असे रिपोर्ट जुन्या सरकारी अधिकाऱ्यांनी केले ते खोटे काय? दुष्काळांत सारा भरण्याची ऐपत नसणाऱ्यांच्या जमिनी हिरावून घेण्याचा हा डाव उघड आहे. शेतकऱ्यांची विपन्न स्थिति हा कांही आजकालचा विषय नाही. त्यांच्या निकृष्टावस्थेचीं कारणें शोधून काढण्यास पाहिजे तर कमिशन नेमा; पण घाईनें किंवा उच्छृंखलपणानें केवळ कांही अधिकाऱ्यांच्या तब्येतीखातर दुष्काळानें गांजलेल्या लोकांस बुचाडून नंगे फकीर बनवूं नका, असें सरकारास आम्ही स्पष्टपणें सांगितलें पाहिजे" (१८–६–०१) जूनपासून आक्टोबर पावेतो या बिलावर सारखे अग्रलेख व स्फुटे लिहिली जात होती. "हा कायदा शेतकऱ्यांस गुलाम करणारा आहे व सावकारासहि बुडविणारा आहे. केवळ उपरी कुळांस तगाईशिवाय गत्यंतर नाही, त्यांस पैसे दिल्यास गहाणविक्रीचा हक्क नसल्यामुळे सावकारहि बुडणारच, तेव्हां चळवळ जोरानें झाली पाहिजे. अर्जावर अर्ज पाठवा." अशी 'केसरी'ने वारंवार सूचना केली. या सर्व वादात जमिनीची मालकी शेतकऱ्यांचीच हा 'केसरी'चा आग्रहाने प्रतिपादिलेला मुद्दा. बिलाचे पहिले वाचनाच्या वेळेस याबाबत काही लोकनियुक्त सभासदांनी—विशेषतः ना. पारख यांनी—जी गैरसावधगिरी दाखविली, तिजबद्दल 'केसरी'ने त्यांजवर टीका केली व "खालसा करण्याचा हक्क जरी प्राप्त झाला तरी तो दुष्काळासारख्या आपत्तीमुळें, तेव्हां अशी संधि पाहून कायमचे मालकी हक्क बुडविण्याचा हा सरकारचा मार्ग अन्यायाचा, निर्दयतेचा आणि राजनीतीच्या दृष्टीनें रयतेच्या नुकसानीचा अतएव दांडगाईचा आहे", (९–७–०१) अशी स्पष्ट सूचना दिली. लोकनियुक्त सभासदांनी शेवटच्या वाचनाचे वेळी जी कामगिरी केली तिची 'केसरी'ने योग्य प्रशंसा केली. इतकेही करून शेवटी व्हावयाचे ते झालेच. "दुराग्रही सरकार व निर्बल लोकमत" व "आमची कायदेकौन्सिलें थट्टा आहे काय!" हे दोन अग्रलेख 'केसरी'नें अगदी संतापून झणझणीत लिहिले आहेत. यानंतरही रॉजर्स साहेबांची मते, 'जे'ची टाईम्समधील पत्रे, यांवरून या विषयावर स्फुटे येतच होती, व शेवटचे स्फुटात (१–१०–०१), "कायदा जरी पास झाला तरी झालेल्या ओरडीमुळे त्याचा अंमल सोईसोईने होईल, असे वाटते," असे आपले मत प्रदर्शित केले व हे खरे ठरलेही.

## दक्षिणेतील शेतकऱ्यांच्या कायद्यास विरोध

सन १९०१ चे बिलाचे वादात गहाणविक्रीचे हक्क शेतकऱ्यास दिले असल्यामुळे तो ऐपतीबाहेर कर्ज काढून शेवटी जमिनीसही मुकतो तेव्हा हे हक्कच मुळात काढून घ्यावे, असा सरकारतर्फेच युक्तिवाद करण्यात आला. अशा विचारसरणीस धरून दक्षिणेतील शेतकऱ्यांचा कायदा पास करण्यात आला होता. त्यास प्रथमपासून 'केसरी'ने विरोध केला. या कायद्यापासून काय फायदा झाला याची चौकशी करण्याकरिता १९९२ साली एक कमिशन नेमण्यात आले. तेव्हा याबाबत वर्तमानपत्रांतून विशेष चर्चा झाली. (२०–९–९२). एका स्फुटात, या कायद्याने हिशेबात गफलत असल्यास होणारी फसवाफसवी फार तर बंद होईल, पण एकंदर याने कुळाचे व सावकाराचे दोघांचेही तोटेच जास्त, असे मत प्रदर्शित केले आहे. तेच आजसुद्धा ग्राह्य मानावे लागते. 'स्टेट्समन'मध्ये आलेल्या लेखमालेच्या विचारसरणीस ता. २–२–९२ चे अग्रलेखात पुष्टी दिली आहे. यात सावकार हा दारिद्र्यास कारणीभूत नसून सरकारी

सारापद्धतीचा हा परिणाम, असे मत प्रतिपादन केले. पुढे शेतकऱ्यांच्या कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर दोन लेख 'केसरी'ने लिहिले. पहिल्यात सरकारास आपले धोरण कधीच चुकलेले कसे वाटत नाही व सावकारास जबाबदार धरून कायदा केला त्याचा फायदा काय झाला, याचे विवेचन केले आहे. गेल्या चौदा वर्षांत योग्य "कायद्यामुळें कर्ज कमी झालें कीं काय याची चौकशी करितां तें बिलकूल कमी न होतां मारुतीच्या शेपटाप्रमाणें आहे तितकेंच आहे. फायदा इतकाच कीं जमीन पूर्वी गहाण पडत नव्हती ती आतां गहाण द्यावी लागते आणि सावकार जुलूम करतो असें बोलण्याची सोय नाहीं!" असे सांगितले आहे. दुसऱ्यात कमिशनने सुचविलेल्या कायद्याची केवळ दुरुस्ती करून कार्य साधेल काय? दारिद्र्याचे मूळ किती खोलवर आहे व सारा पद्धतीच्या सुधारणेची किती जरुरी आहे याचा विचार आहे. पण या कमिशनच्या इतर सूचनांचा काही एक विचार न करता केवळ जुन्या कायद्यातच किरकोळ फेरफार करून तो आणखी इतर जिल्ह्यांस लागू करण्याचे बिल जेव्हा मुंबई सरकारने पुढे आणले तेव्हा साहजिकच 'केसरी'ने या धोरणाचा तीव्र निषेध केला. (१०-४-९४). १९०१ च्या बिलाचे वेळेस याच विषयावर 'केसरी'ने म्हटले की, "शेतकऱ्यांची आपल्या शेतावर पूर्ण मालकी असल्यामुळें एखादे वेळेस एखादा शेतकरी आपलें शेत अविचारानें विकील, नाहीं असें नाहीं; पण जगामध्यें असें कोणतें तत्त्व आहे कीं, ज्याचा कधींहि दुरुपयोग होत नाहीं?...उद्योगधंद्याचा नाश, साऱ्याची सक्ती वगैरे कारणांनी जमिनीवर निर्वाह होणें अशक्य होऊन शेतकरी लोकांस पोटाकरितां किंवा साऱ्याकरितां सावकाराकडे जावें लागतें हें खरें आहे. पण तेवढ्याकरितां जमीन दुसऱ्यांच्या नांवावर करून देण्याचा शेतकऱ्यांचा हक्क काढून घेणें या शहाणपणास काय म्हणावें? कसेंहि झालें तरी सावकार व शेतकरी एकाच गांवांत असल्यामुळें सावकारास शेतकऱ्यांचा बचाव कांहीं झालें तरी करावा लागतोच." (१८-६-०१). शेतकऱ्यावर गहाणविक्रीबद्दल अशा तऱ्हेने निर्बंध घातल्यामुळे त्याचा फायदा न होता त्याची एकंदर पत कमी होऊन तोटाच जास्त होण्याचा संभव फार, हा सिद्धांत आता सर्वमान्य होत चालला आहे.

## जमीनमहसुलाच्या पद्धतीबाबतची भूमिका

जमिनीचा मालक कोण याबद्दल प्रथमपासूनच केसरीचे धोरण अगदी निश्चित असे दिसते. पण जमीनमहसुलाच्या पद्धतीसंबंधी हे इतके निश्चित दिसत नाही. या बाबतीतला उपलब्ध असलेला पहिला महत्त्वाचा अग्रलेख म्हणजे ता. २-२-९२ चा 'शेतकऱ्यांचा फायदा' हा होय. यात कलकत्त्याच्या 'स्टेट्समन' पत्रातील एकंदर सूचनांस 'केसरी'ने आपली संमती दर्शविली आहे. "सरकारी धाराच मुख्यत्वेंकरून लोकांच्या दैन्यास कारण आहे व म्हणून तो कायमचा ठरवून न टाकितां रयतेच्या ऐपतीप्रमाणें घ्यावा व एखाद दुसऱ्या प्रांतांत तरी कमिशननें सुचविलेल्या उपायांचा अनुभव घेऊन पाहावा. एकंदरीत हल्लीच्या रीतीनें सर्वांचेंच नुकसान आहे......आम्ही म्हणतो त्याप्रमाणे सरकारदस्त पैशाच्या रूपानें न घेतां बताई किंवा उत्पन्नाच्या रूपानें घेतला म्हणजे ह्या व दुसऱ्या सर्व अडचणी दूर होतील." अशा प्रकारचे विचार या लेखात आहेत. पण पुढे १८९९ सालामधील 'फेरपाहणीचा जुलूम' या अग्रलेखात कॉंग्रेसने कायमधारापद्धतीचा पुरस्कार केल्याचा उल्लेख आहे. लॉर्ड कर्झन यांचा १९०२ चा ठराव प्रसिद्ध झाल्यावर यावर जास्त सविस्तर विवेचन झाले. त्यात अनेक स्फुटांतून रमेशचंद्र दत्तांच्या विचारांचे उद्‌घाटन केले आहे. कर्झनसाहेबांनी दत्त यांना उत्तर देताना बंगालची सुबत्ता कायमधारा पद्धतीचे फळ नसून कुळांच्या कायद्याचे फळ आहे, असे म्हटल्यावर आम्हांस कायमधारापद्धती व कुळांचे कायदे दिल्यास आम्ही ती पत्करू असे त्यांस उत्तर दिले आहे. (२८-१-०२) या सर्व वादात कायमधारापद्धतीबद्दल विशेष आग्रह 'केसरी'ने कधीच

धरला नाही. या काळात कायमधारापद्धतीवर असा एकच अग्रलेख आढळतो व तोही एकंदर हिंदुस्थान दरिद्री कसा बनला याविषयीच्या लेखमालेत 'कायम जमीन धाऱ्या पद्धतीस कायमची मूठमाती' या मथळ्याचा, ऐतिहासिक स्वरूपाचा आहे. पुढे नामदार दा. आ. खरे यांनी प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष या नात्याने केलेल्या भाषणातील मुद्दे अग्रलेखात दिले आहेत. लढाईनंतर जॉइंट कमिटीने जमीनसारा जास्त नियमबद्ध करावा अशी शिफारस केल्यामुळे त्या त्या प्रांतात चौकशी होऊन कायदे पास होऊ लागले, तेव्हा या विषयास पुन्हा रंग भरला. या वेळेसही 'केसरी'ने परंपरागत काँग्रेसने स्वीकारलेले कायमधारापद्धतीचे धोरण उचलून धरले. १९२० सालापुढे कायमधारापद्धतीवर लेख येऊ लागले. विशेषतः मुंबई इलाख्याची शेतसारा कमिटी १९२४ साली नेमली गेल्यावर तर सारखी लेखमालाच सुरू झाली. यातील मुद्दे जुनेच आहेत. 'कायमधाराबंदीची जादू' वगैरे लेखांत मागीलपेक्षा कायमधारापद्धतीवर जरा जास्त जोर देण्यात आला आहे. हाच फार तर थोडा फरक या अलीकडील धोरणात दिसून येतो.

केसरी महोत्सव मंडळ, *केसरी प्रबोध* आवृत्ती २, १९३१ पृ० ७१९-७३५

☆

# ४ . . महाराष्ट्रातील शेतकी समितीची कामगिरी

नवीन राज्यघटनेतील निवडणुकीत राष्ट्रीय सभेने भाग घ्यावयाचे ठरविल्यापासून या निवडणुकी चुरशीच्या होऊन त्यांस रंग चढेल, असे स्पष्ट दिसू लागले आहे. त्याबरोबरच राष्ट्रीय सभेलाही केवळ राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लक्ष्याची घोषणा चालू ठेवणे पुरे न पडून भावी राज्यघटनेतील आपल्या कार्यक्रमाबद्दल काहीसे तपशीलवार बोलणे अपरिहार्य झाले आहे. पहिल्या निवडणुकी ज्या होणार त्या प्रांतिक कायदेमंडळाच्या, तेव्हा प्रत्येक प्रांतिक राष्ट्रसभासमितीला आपला कार्यक्रम आखून तो मतदारांपुढे लगेच मांडणे आवश्यक झाले झाले आहे. या परिस्थितीकडे लक्ष देऊन महाराष्ट्र प्रांतिक राष्ट्रसभासमितीने गतवर्षीच शेतकऱ्यांच्या आर्थिक गरजा निश्चित करण्यासाठी एक समिती नेमली. तिचा वृत्तान्त नुकताच प्रसिद्ध झाला असून म. प्रां. राष्ट्रसभासमितीने याविषयी बराच दूरदर्शीपणा दाखविला, ही गोष्ट निर्विवाद आहे. इतर प्रांतांतील राष्ट्रसभासमित्या देखील महाराष्ट्राचे आता अनुकरण करीत आहेत. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासंबंधी शेतकी समितीच्या शिफारशींस अनुसरून काही योजना मतदारांपुढे मांडता आल्यामुळे राष्ट्रीय सभेच्या उमेदवारांस निश्चित फायदा होईल हे उघड आहे. परंतु शेतकी समितीच्या वृत्तान्ताचा राजकारणाशी काय संबंध आहे हे विचारात घेण्याचे आम्ही येथे योजिले नसून आम्हांस त्याची केवळ अर्थशास्त्रदृष्ट्या थोडी छाननी करणे आहे.

वृत्तांतात पत्करलेली भूमिका आधुनिक समाजवाद्यांची असून जुन्या गांधीवाद्यांची नसावी, हे समितीतील सभासदांची नावे वाचूनही कळण्यासारखे आहे. पण ही गोष्ट समितीने आपल्या वृत्तांताच्या प्रास्ताविक भागात अगदी स्पष्ट केली आहे. हिंदी शेतकऱ्यांपुढील प्रश्नांचे आकलन करण्यासाठी "जगांतील आर्थिक परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे" व त्यांचे मूळ "खेडेगावच्या शिवारांतून शोधीत बसण्यात कालाचा अपव्यय होतो" असे समितीचे मत आहे; आणि हल्लीची परिस्थिती अस्थिर असून शेवटी सामुदायिक शेतीशिवाय तरणोपाय नाही, असा तिचा अभिप्राय आहे. खेडी स्वावलंबी करून नव्हे, तर कृषिव्यवस्थेस आधुनिक वळण देऊन हा प्रश्न सुटणार, हाच पक्ष समितीने स्वीकारला आहे. ही विचारसरणी आम्हांस सर्वस्वी संमत असल्यामुळे यासंबंधी आणखी लिहिण्याचे कारण नाही. सांगावयाचे एवढेच की, समितीच्या प्रास्ताविक विवेचनातून राष्ट्रीय सभेमधील हल्लीच्या दोन पक्षांपैकी कोणत्या पक्षाकडे समितीचा कल झुकतो ते स्पष्ट होत आहे.

## समितीच्या शिफारशींचे स्वरूप

समितीच्या वृत्तांताची उभारणी ही हिंदी शेतकीविषयक अर्थशास्त्रावरील साहित्याचे वाचन व महाराष्ट्रातील जवळजवळ पन्नास खेड्यांची प्रत्यक्ष पाहणी यांवर झालेली आहे. या पाहणीत नवीन

अशी काही माहिती समितीस मिळाल्याचे दिसून येत नाही. व्यवस्थित आकडेशीर माहिती मिळविण्याचा प्रयत्न तिने केला, हे आम्हांस माहीत आहे. परंतु अनेक अडचणींमुळे असे काही विशेष उद्‌बोधक आकडे तिला मिळू शकले नाहीत. हे झाले नाही तरी या प्रत्यक्ष पाहणीमुळे एकंदर परिस्थितीचे आकलन करण्यास व वृत्तान्ताच्या लेखनास समितीच्या कार्यकारी सदस्यांना मदत झाली असलीच पाहिजे. जमीनमहसूल, खंड व शेतकऱ्याचे कर्ज या गोष्टींवरच समितीने विशेष भर दिला आहे. शेतकऱ्याचे उत्पादनसामर्थ्य वाढविणे, शेतकी मालाच्या विक्रीची पद्धती सुधारणे व शेतकऱ्यास जोडधंदे उपलब्ध करून देणे, या गोष्टी महत्त्वाच्या खऱ्या; पण कर्ज, खंड व सारा यांचा शेतकऱ्यावरील बोजा आज इतका असह्य झाला आहे की, तो थोडा तरी ताबडतोब कमी करण्याचा प्रथमोपचार झाल्याशिवाय शेतकरी जिवंतच राहतो की नाही, अशी भीती वाटू लागली आहे. समितीचे हे निदान तंतोतंत खरे आहे. ताबडतोबीचे उपाय करावयाचे ते शेतकऱ्याचे देणे हलके करण्याबद्दलचे केले पाहिजेत. जमीनमहसूलपद्धतीची सुधारणा हा प्रश्न मोठा गुंतागुंतीचा आहे. जमीनमहसुलाच्या पद्धतीची आमूलाग्र सुधारणा करून ती हळूहळू प्राप्तीवरील कराच्या पद्धतीप्रमाणे बनविली पाहिजे, हे मत आम्ही आज बरीच वर्षे प्रतिपादीत आहो. शेतकी समितीने याविषयी स्वीकारिलेली भूमिका जवळजवळ अशीच आहे. अर्थात पद्धतीत महत्त्वाची सुधारणा करणे इतक्यात फारसे शक्य दिसत नाही. कारण, प्रांतिक सरकारची मुख्य मदार जमीनमहसुलावर, व काहीही सुधारणा करू म्हटले म्हणजे हे उत्पन्न घटणार हे निश्चित. २५० रुपयांहून कमी सालिना उत्पन्न असणाऱ्यांस हा कर माफ असावा, ही समितीची सौम्य मागणी मान्य केली तरीही जमीन-महसुलाचे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर कमी होईल. तेव्हा आणखी कित्येक वर्षे कोणतेच सरकार ही गोष्ट करील असे वाटत नाही. पण सरकार थोडेबहुत जरी लोकमतानुवर्ती झाले, तरी त्यास या प्रश्नाचा विचार करून इष्ट दिशेने हळूहळू सुधारणा घडवून आणणे भाग पडेलच. समितीने जमीन-महसुलाविषयी केलेल्या बहुतेक शिफारशी अशा कायम स्वरूपाच्या आहेत. प्रस्तुत काळच्या एका महत्त्वाच्या गोष्टीकडे मात्र द्यावे तितके लक्ष दिलेले दिसत नाही. हीच गोष्ट सुटीच्या नियमांची. हल्लीच्या नियमांप्रमाणे सूट मिळते ती केवळ पीक अगदी कमी आले तर. पण खरे पाहिले तर पीक न आल्याने जशी सूट मिळणे आवश्यक आहे, तसेच पिकास भाव न आला तरीही ती मिळाली पाहिजे. प्रचलित मंदीच्या काळात हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. सुटीच्या नियमांत जर हा मुद्दा लक्षात घेतला असता, तर गेल्या पाच-सहा वर्षांतील शेतकऱ्यांवरील धान्याचा बोजा फारच हलका झाला असता.

## कर्जनिवारणासंबंधीच्या सूचना अपुऱ्या

खंड हा महाराष्ट्रात किती शेतकऱ्यांना भरावा लागतो व त्याचे प्रमाण काय याबद्दल उपलब्ध असलेली माहिती अत्यल्प आहे. शेतकी समितीलाही ही माहिती गोळा करता आलेली दिसत नाही. कोकण प्रांतभर खोतीची पद्धती असल्यामुळे तेथील बहुतेक शेती खंडावरच केली जाते. या पद्धतीचा विचार स्वतंत्रच झाला पाहिजे व तो तसा समितीने केलाही आहे. देशावर रयतवारी पद्धती आहे व रयतवारीचा अर्थ शेतकरी जेथे प्रत्यक्ष सारा भरतो ती, असा केला जातो. परंतु जरी अव्वल इंग्रजीत रयतवारी ही संज्ञा वस्तुस्थितिनिदर्शक असली, तरी आता परिस्थिती बरीच पालटलेली आहे. प्रमुख शहरांभोवती बऱ्याच जमिनी पांढरपेशांच्या हातांत गेल्या आहेत; व इतरत्र सर्वच ठिकाणी सावकार वाढत्या प्रमाणात जमीनदार होत आहे. तेव्हा प्रत्यक्ष शेती करणाऱ्यांपैकी बऱ्याच जणांस पूर्णपणे अथवा अंशतः खंडावर जमीन घ्यावी लागते. पण याचे देशावरील प्रमाण काय याबद्दल

आकडेसिद्ध बोलता येत नाही. कोकणातील कुळाची परिस्थिती अगदी निकृष्ट असली तरी देशावरही तशीच आहे असे म्हणवत नाही. जमिनीच्या मालकाकडून कुळास पडत्या काळात सवलती मिळविणे हे देशावर तितके कठीण नाही, असे आम्हांस वाटते; आणि देशावरील जमीनदारी जरी वाढत असली, तरी जमीनदार व कुळे असे दोन वर्ग पडून त्यांत झगडा होण्याची अजून वेळ आलेली नाही. समितीने या झगड्यांची दिलेली दोन्ही उदाहरणे कोकणातील आहेत, हे लक्षात घेण्याजोगे आहे. याविषयी समितीने केला आहे त्यापेक्षा जास्त बारकाव्याने विचार व्हावयास पाहिजे. आजचा खरोखर अत्यंत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कर्जाचा आहे. शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा आधीच किती मोठा होता हे मशहूर आहे. त्यातच गेली पाच-सहा वर्षे अतोनात मंदीची गेली; यामुळे हा बोजा कल्पनेबाहेर वाढला. १९२९ सालापासून पुढे कर्ज दुपटीने वाढले आहे, असा अंदाज नेहमी करण्यात येतो. या अवधीत शेतकऱ्याचे जवळजवळ सर्व व्यवहार कर्जावरच चालत असल्यामुळे कर्जाची रक्कम दुपटीने वाढणे अशक्य नाही. पण यासंबंधीही समितीस निश्चित आकडे गोळा करता आलेले नाहीत. असले आकडे गोळा होणे अत्यावश्यक आहे. कर्जाची रक्कम ही दुपटीने वाढली व शिवाय मालाच्या किमती अर्ध्यावर आल्या, तर खरोखर कर्जाचा बोजा चौपट वाढेल हे उघड आहे. १९२९ च्या तिप्पटचौपट कर्जाचा खरा बोजा महाराष्ट्रातील शेतकऱ्यावर आज आहे, असे मानण्यास हरकत नाही. जेव्हा शेती जेमतेम किफायतशीर होती तेव्हाच कर्ज भारी होते, तर आज शेती तोट्यात आल्यावर या वाढलेल्या कर्जाचा बोजा शेतकरीवर्ग कसा सहन करणार ! शेतकी व्यवस्थे-संबंधीचा आजचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे यातून काहीतरी वाट काढणे हा होय. इतर देशांत मंदीच्या सुरुवातीच्या काळातच फेड–तहकुबी, हप्तेबंदी, मुदलात सूट, व्याजाच्या दरात उतार, अशा निरनिराळ्या कायदेशीर उपाययोजना करून सर्व सरकारांनी या प्रश्नाचे स्वरूप जास्त जास्त भीषण होऊ नये असे प्रयत्न केले. आपल्याकडेच मात्र काही झाले नाही. यापुढेही काही न केले तर मंदी सरून तेजीचे दिवस आले तरी या कर्जाच्या वाढलेल्या दडपणामुळे शेतकऱ्यास आपले डोके वर काढण्यास सवड मिळणार नाही. शेतकी समितीने याविषयी सुचविलेले उपाय अगदी सौम्य व इतरत्र सर्व ठिकाणी आधीच अमलात आणिले गेलेले आहेत. हे पुरे पडतीलच असे म्हणवत नाही. पण कोणतेही सरकार असले तरी त्यास खरे देशहित कळत व पटत असल्यास निदान इतके तरी त्याजकडून झाले पाहिजे, हे निर्विवाद आहे.

## शेतकरी संघटनेचा प्रश्न

समितीने विचार केलेला आणखी एक प्रश्न महत्त्वाचा आहे. तो म्हणजे शेतकरी संघटनेविषयीचा. आपणांकडे ब्राह्मणेतर पक्ष बळावण्याचे कारण "वर्णभेद व जातिभेद एकमेकांशी काहीसे जुळते आहेत", हे समितीचे म्हणणे यथार्थ आहे. पंजाब व बंगालमधील हिंदू–मुसलमान वादाचे स्वरूपही काहीसे असेच आहे. ब्राह्मणेतर पक्षाने अधिकाराच्या काही जागा बळकावूनही शेतकरी वर्गाची स्थिती सुधारण्याकरिता प्रयत्न केले नाहीत हे खरे. परंतु त्यास विरोध करणाऱ्या पक्षानेही शेतकऱ्यांस पटेल असा कार्यक्रम आजपावेतो मांडला नसल्यामुळे, ही ब्राह्मणेतर पक्षाची गोम बहुजनसमाजाच्या लक्षात येण्यासारखी नव्हती. आता मात्र राष्ट्रीय सभेच्या उमेदवारांविरुद्ध खटपट करताना ब्राह्मणेतर पक्षास इकडे लक्ष द्यावे लागेल. पण निवडणुकी लढविण्यापलीकडील कार्यक्रम हाती घ्यावयाचा तो शेतकरी संघटनेचा. हे संघटन वैयक्तिक उत्पादकांचे, निरनिराळे मालकी हक्क सांगणाऱ्यांचे व या हक्कांकरिता भांडणाऱ्यांचे. मजूरवर्गाच्या किंवा पिळलेल्या कुळांच्या संघटनेपेक्षा हा प्रश्न अगदी निराळ्या प्रकारचा आणि जास्त बिकट असा आहे. रशियाचे उदाहरण लक्षात घेता सहकारी

संस्थांची जोपासना व वाढ करूनच हे कार्य होण्यासारखे आहे. पण राष्ट्रसभा कार्यकर्त्यांनी असे करण्यात बऱ्याच अडचणी आहेत आणि साध्या राजकीय चळवळीपेक्षा यात विचार, मनुष्यबळ व चिकाटी ही सर्वच जास्त प्रमाणात पाहिजेत. या पुढील प्रश्नाचा समितीने खोलवर विचार केलेला दिसत नाही. पण या समितीत कार्य केलेल्या मंडळीच्या विचाराची जी माणसे असतील त्यांच्याच हातात म. प्रां. राष्ट्रसभा समितीची सूत्रे पुढेही राहिली तर तोही विचार होईल, अशी आशा करण्यास हरकत नाही.

म. प्रां. राष्ट्रसभा समितीने शेतकी समिती नेमण्यात शहाणपणा दाखविला व शेतकी समितीनेही आपले काम उत्कृष्ट रीतीने पार पाडले, यात शंका नाही. समितीने केलेल्या वर्णनात अथवा शिफारशीत काही नवीन नाही, अगदी सोवळ्या अर्थशास्त्रज्ञालाही त्यात आक्षेपार्ह असे काही सापडणार नाही. कोणत्याही प्रगतिपर व विचारी माणसास अथवा राजकीय पक्षास पाठिंबा देता येईल, असा समितीचा कार्यक्रम आहे. किंबहुना समितीचा हा वृत्तांत वाचला असता हल्लीचे राजकीय पक्षभेद आहेत तसे पुढे का टिकावे हाच प्रश्न डोळ्यांपुढे उभा राहातो. सामाजिक व आर्थिक प्रकरणी प्रगतिपर धोरण स्वीकारणारे लोक राष्ट्रसभेच्या बाहेर बरेच आहेत; व या धोरणास अडथळा होईल अशी भूमिका असणाऱ्यांचा राष्ट्रसभेमध्ये एक मोठा वर्ग आहे. तेव्हा राजकारणाचा ओघ सरळ वाहिल्यास थोड्याच कालावधीत काही नवीन पक्षघटना होतील असे वाटू लागते. परंतु हा मुद्दा प्रस्तुत विचाराबाहेरचा आहे. शेवटी एवढेच म्हणावयाचे की, समितीच्या विचारात काही नवीन नसले, तरी असले विचार पुस्तकात किंवा अर्थशास्त्रज्ञाच्या डोक्यात राहण्यापेक्षा त्यांस प्रत्यक्ष राजकारणाच्या आखाड्यात स्थान दिले, ही समितीची कामगिरी बहुमोल समजली पाहिजे.

*लोकशिक्षण* ७ : १ जुलै १९३६ पृ० ५७–६१

☆

# ५ . . मुंबई प्रांतातील धान्य परिस्थिती कशी सुधारेल ?

मुंबई प्रांतातील धान्य परिस्थिती हा हिंदुस्थान देशभर बिघडलेल्या धान्यपरिस्थितीचा एक भाग आहे. त्यामुळे या प्रश्नाची चर्चा करण्याआधी देशातील सर्वसाधारण धान्यपरिस्थितीबाबत काही प्रास्ताविक विवेचन करणे आवश्यक आहे.

## अन्नधान्याची सार्वत्रिक तूट

आज सर्व देशभर खुल्या बाजारात धान्य दुर्मिळ झाले आहे. किमती भरमसाट वाढून जनतेच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत. यामुळे जनता अन्नास मोताद झाली आहे. तथापि वट्ट धान्यपुरवठ्यात मोठी घट आल्यामुळे वरील परिस्थिती निर्माण झालेली दिसत नाही. सर्व देशाचा साकल्याने विचार केल्यास एकंदर धान्यपुरवठ्यात पाच–सहा टक्क्यांहून जास्त घट झालेली नसावी. वट्ट धान्यपुरवठा जरी फार घटलेला नाही तरी जनतेस उपलब्ध होणारा माल कमी झाला आहे हे उघड आहे. सामान्यतः देशात पैदा होणाऱ्या एकंदर धान्यापैकी कुटुंबाच्या योगक्षेमासाठी व शेतीच्या कामासाठी लागणारे धान्य ठेवून बाकीचे धान्य शेतकरी विकतो. हे विकाऊ धान्य खेडेगावांतून शहरांत येते व व्यापाऱ्यांमार्फत जनतेस उपलब्ध होते. हा नित्यक्रम झाला. परंतु १९४२ सालच्या सुरुवातीपासून धान्याच्या किमती एकसारख्या वाढू लागल्या; व त्या अशाच वाढत राहतील अशी अपेक्षा निर्माण झाली. यामुळे जादा फायदा मिळण्याच्या आशेने शेतकरी व व्यापारी नेहमीपेक्षा जास्त प्रमाणात धान्य साठवू लागले व साहजिकच विकाऊ धान्याचा पुरवठा कमी झाला. गिऱ्हाइकांच्या मागणीपेक्षा हा पुरवठा बराच कमी पडला. किमती अधिकच चढल्या व पुरवठ्याबद्दल जनतेत तीव्र साशंकता निर्माण झाली. याचा परिणाम असा झाला, की गिऱ्हाईकही आपापल्या ऐपतीप्रमाणे धान्याचा जास्त साठा करण्यास प्रवृत्त झाले. त्यामुळे त्यांची मागणीही वाढली. तदनुषंगाने धान्याचे भावही आणखी वर चढले व साठे करण्याची सार्वत्रिक वृत्ती आणखीच बळावली. असे हे पुरवठा-किमतीचे चक्र सुरू झाले; व उपलब्ध धान्य भोवऱ्यात सापडल्याप्रमाणे साठे व काळाबाजार यांत शोषून जाऊ लागले. धान्याच्या किमती सारख्या चढत असल्या म्हणजे त्यांचे धान्याच्या उपलब्ध पुरवठ्यावर असे अनिष्ट परिणाम होतात, म्हणून किमती वाढण्याचे बंद झाले नाही तोपर्यंत केवळ उत्पादन अगर पुरवठा वाढविल्यामुळे सध्याची बिकट परिस्थिती सुधारेल असे म्हणता येत नाही. "हिंदुस्थानातील धान्यपरिस्थिती ही चलनवृद्धीचीच दुसरी बाजू आहे व हे दोन प्रश्न निरनिराळे सोडविता येणे शक्य नाही," असे उद्गार खुद्द अर्थसचिवांनी विधिमंडळात काढले आहेत. मूळ चलनवृद्धीला पायबंद घालणे ही मध्यवर्ती सरकारच्या अधिकारातील गोष्ट आहे. या लेखात मुंबई प्रांतातील परिस्थितीचा विचार करावयाचा असल्याने त्या विषयात येथे शिरत नाही. परंतु प्रांतिक सरकारास साधेल तेवढे किमतीचे नियंत्रण

करून त्या स्थिरावण्याचा प्रयत्न करणे हा धान्यधोरणाचा पाया आहे हे येथवरच्या विवेचनावरून स्पष्ट होईल.

## मुंबई प्रांतातील तूट

मुंबई प्रांत मुळातच तुटीचा प्रांत आहे. ग्रेगरी समितीच्या हिशेबानुसार प्रतिवर्षी या प्रांतात अंदाजे ४६ लक्ष टन धान्य पैदा होते. ते येथील जनतेच्या निर्वाहास अपुरे पडत असल्याने साधारणपणे ७ ते ८ लक्ष टन धान्य प्रतिवर्षी बाहेरून येते. स्थूल मानाने यापैकी ४ लक्ष टन तांदूळ व २ लक्ष टन गहू असतो. पुष्कळसा तांदूळ कोकणपट्टीसच लागतो. युद्धकाळात बाहेरून किती धान्य आयात करता येईल हे सर्वस्वी मध्यवर्ती सरकार व इतर शिलकीचे प्रांत यांच्या धोरणावरच अवलंबून आहे. त्यातच वाहतुकीच्या साधनांचा तुटवडाही लक्षात घेतला पाहिजे. एकंदरीत बाहेरून धान्याची आयात पुरेशी होईल अशी सद्यःस्थितीत अपेक्षा करता येत नाही. मुंबई प्रांतातील धान्यविषयक धोरण मुख्यतः येथील उत्पादन वाढविणे व पैदा होणारे धान्य जनतेस उपलब्ध करून पुरविणे या दृष्टीनेच आखले पाहिजे.

उत्पादन वाढविण्याच्या धोरणाबाबत विशेष चर्चा या लेखात केलेली नाही. कारण आता उत्पादन-हंगामाचा शेवट असल्यामुळे यंदापुरते तरी पीक जे काय आले तेवढेच हातचे असे धरून चालले पाहिजे. तात्कालिक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे हे पीक शेतकऱ्याच्या हातून निघून गरजू जनतेस कसे मिळेल हाच होय. काही जणांच्या मते सर्व घोटाळा नियंत्रणामुळे निर्माण झाला आहे. पैदा झालेले धान्य उपलब्ध करण्यासाठी खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारावे असे हे प्रतिपादतात. खुल्या व्यापारात मागणी व पुरवठा यांचे समीकरण किमतींच्या चढउतारामुळे होते. चढीच्या किमतीचा परिणाम पुरवठा वाढविण्यात होतो असे यात गृहीत आहे. परंतु बाहेरून पुरवठा येणे अशक्य झाल्यामुळे कितीही किमती वाढल्या तरी पुरवठा आजच्या परिस्थितीत वाढू शकत नाही. उलट चलनवृद्धीमुळे पुरवठा वाढण्याऐवजी धान्य बाजारातून अजिबात नाहीसे होते हा अनुभव आहे. पुरवठ्यात अशी तूट पडू लागली म्हणजे मागणी व पुरवठा यांचे समीकरण होणे याचा अर्थ एवढाच की, किमती बहुजनांच्या आवाक्याबाहेर जाऊन गरीब जनतेची उपासमार होणे. आज पुरवठा वाढत नाहीच. मग मागणी कमी होण्याचा एकमेव मार्ग लाखो माणसे भुकेने मरणे. या सर्वांचे दृश्य चित्र बंगालमध्ये स्पष्ट दिसलेलेच आहे. तेव्हा खुल्या व्यापाराचे तत्त्व येथे निदान उघड्या डोळ्यांनी अमलात आणणे शक्य नाही, हे निश्चित मानून पुढे विवेचन करण्यास हरकत नाही.

## सरकारमार्फत धान्यखरेदीची आवश्यकता

आजच्या परिस्थितीत पूर्ण अनियंत्रित व्यापार स्वीकारता येत नाही. एवढेच नव्हे, तर अर्धवट नियंत्रणानेही काम भागण्यासारखे नाही. धान्याच्या किमती स्थिरावणे हा प्राथमिक उद्देश केवळ सरकारी फर्मानाने साध्य होणार नाही हे उघड आहे. याकरिता सरकारच्या हातांत काहीतरी धान्य पाहिजे. शिलकी प्रांतांत सरकारच्या हातांतील धान्याचा साठा फार मोठा नसला तरी चालण्यासारखे आहे. कारण एकंदर प्रांतातील पैदास भरपूर असल्यामुळे तेथील सर्व साठेबाजांस आपल्या विवक्षित साठ्याच्या अभावी जनतेचे अगर सरकारचे नडेलच अशी खात्री नसते. यामुळे सरकारी खरेदी ठराविक प्रमाणात झाली तरी भावनियंत्रण करता येते. तुटीच्या प्रांतांची परिस्थिती निराळी आहे. पैदाशीपैकी काही थोडा भागही साठेबाजांनी अडकविला तरी तूट फार वाढून भावनियंत्रण कठीण होते. म्हणून अशा प्रांतांत सरकारने सर्वच उपलब्ध पीक आपल्या ताब्यात घेणे महत्त्वाचे आहे.

मुंबई प्रांत हा तुटीचा असल्यामुळे येथील धान्यप्राप्तीचे धोरण या दृष्टीनेच आखले पाहिजे. तुटीच्या प्रांतांत सरकारी धान्यखरेदी काही प्रमाणात तरी अटळ आहे असे आजवरच्या अनुभवावरून ठरल्यामुळे मुंबई सरकारने यंदाच्या खरीप हंगामापासून सरकारी साठा निर्माण करण्याच्या उद्देशाने धान्याची प्राथमिक खरेदी करण्याचे धोरण स्वीकारले. ही खरेदी प्रत्यक्षपणे सक्तीची नव्हती. परंतु सर्वसाधारणपणे जोंधळा-बाजरीच्या एकंदर पिकापैकी १० टक्के व तांदळाच्या पिकापैकी २५ टक्के सरकारास विकत घेणे आहे असे जाहीर करण्यात आले होते, व सरकारी खरेदी पुरी होईपावेतो प्रत्येक गावात पैदा झालेले धान्य तेथून बाहेर नेणे अगर त्याबाबत इतर व्यवहार करणे यास बंदी करण्यात आली. या नाकेबंदीमुळे निश्चित सक्ती पुरवली असे वाटू लागले. जिल्ह्यांतून खरेदी करावयाच्या धान्याचा एक इष्टांक ठरवून तो भरून काढण्याच्या धोरणाने ह्या खरेद्या झाल्या. या योजनेचा तपशील प्रांतिक सरकारने न ठरविता त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यांना बरेच स्वातंत्र्य देण्यात आले होते. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यातील खरेदीच्या योजनेचे स्वरूप निरनिराळे राहिले. परस्परांत काहीच मेळ राहिला नाही. काही जिल्ह्यांतून सरसकट सर्व शेतकऱ्यांकडून ठरलेल्या प्रमाणात धान्य घेण्यात आले व त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे धान्याचे वार्षिक उत्पादन त्यांच्या पोटापुरतेच अगर त्याहूनही कमी होते, त्यांच्याकडूनही खरेदी झाली. उलट काही जिल्ह्यांतून अशा शेतकऱ्यांवर सक्ती होऊ नये अशी योजना करण्यात आली होती. पुणे जिल्ह्यात वार्षिक सहा रुपये सारा भरणाऱ्या शेतकऱ्यांवर धान्य पिकवावयाची सक्ती नसावी असे धोरण जाहीर झाले होते. खेडेगावांतील बलुतेदार व मजूर यांना नेहमीप्रमाणे धान्यात मुशाहिरा देऊ नये असा हुकूमही काही जिल्ह्यांतून जारी केला गेला होता; तर काही जिल्ह्यांत असे कोणतेच बंधन घालण्यात आले नव्हते. याशिवाय महत्त्वाची गोष्ट म्हणजे या खरेदीच्या योजनांच्या तपशिलाबाबत कोणत्याही प्रकारची जाहीर माहिती मिळू नये व गुप्तपणे सर्व काम व्हावे अशी विनाकारण व्यवस्था सरकारी अधिकाऱ्यांनी केली होती. या विसंगत धोरणाच्या गोंधळामुळे लहान शेतकरी व अलुते-बलुते यांची परिस्थिती पुष्कळ ठिकाणी कठीण झाली. त्याचप्रमाणे या खरेदीच्या योजनेबद्दल गुप्तता बाळगल्यामुळे अन्याय व जुलूम होण्यास अधिकच वाव मिळाला; व सरकारी धोरणाबद्दल एकप्रकारचे संशयास्पद वातावरण निर्माण झाले.

## धान्यवसुलीची पद्धती

सरकारी खरेदीच्या आजवरच्या अनुभवावरून बऱ्याच गोष्टी निश्चित सांगता येण्यासारख्या आहेत. एक तर सक्ती नसून कुचंबणा होण्यापेक्षा प्रत्यक्ष सक्तीने साऱ्यासारखी धान्यवसुली जास्त श्रेयस्कर. दुसरे म्हणजे ही वसुली निश्चित प्रांतिक योजनेनुसार झाली पाहिजे. ही योजना जनतेस समजावून दिली पाहिजे. तीत स्थानिक फेरबदल करण्याची शक्यता असू नये. केवळ शेतकऱ्याचे विकाऊ धान्य शक्य तितके सरकारच्या हातात यावे या उद्देशाने योजनेची आखणी झाली पाहिजे. अर्थात स्वतःच्या गरजेपुरतेच अगर त्याहून कमी धान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेतून वगळले पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व शेतकऱ्यांकडून एका ठराविक प्रमाणात धान्यखरेदी न करता कमीजास्त पैदाशीच्या श्रेणीप्रमाणे चढत्या अगर पडत्या प्रमाणात धान्याची खरेदी झाली पाहिजे. ही धान्यखरेदी मुलकी अधिकाऱ्यांनी केलेलीच उत्तम.

ही प्राथमिक सक्तीची खरेदी झाली. या खरेदीमुळे मोठे सरकारी साठे एकदम निर्माण होतील. पण एवढ्याने काम भागणार नाही. प्रत्येक शेतकऱ्याचा शिलकी माल किती हे पूर्णपणे कळणे अशक्य आहे; व निरनिराळा वैयक्तिक हिशेब सक्तीच्या योजनेत करता येणार नाही. तेव्हा सर्व विकाऊ माल एकदमच सरकारच्या ताब्यात येणार नाही. याकरिता प्राथमिक खरेदीनंतरही धान्य-विक्रीवरचे

नित्याचे बंधन चालू राहिले पाहिजे. निर्बंधाचे प्रकार दोन. एक तर सरकार अगर विवक्षित परवाना असलेले व्यापारी अगर संस्था यांखेरीज धान्यखरेदीचा कोणासही अधिकार नसावा, व दुसरे म्हणजे धान्यवाहतूक नियंत्रित असावी. गावांतून धान्य बाहेर नेण्यासंबंधी जो निर्बंध घालण्यात आला आहे तो तसाच कायम ठेवला पाहिजे. कारण हा निर्बंध उठविल्यास हे धान्य खुल्या बाजारात न जाता काळ्या बाजारात नाहीसे होण्याचा संभव फार. गावातल्या गावात खाण्यास गिऱ्हाइकास किरकोळ विक्री करण्यास हरकत असू नये. यान्यतिरिक्त धान्य विकावयाचे असल्यास ते सरकारी परवानगीने अगर सरकारच्या अधिकृत अशा व्यापाऱ्यांस विकावयासच हालविता यावे. सरकारी केंद्रांत अगर व्यापाऱ्यांनी करावयाची अशा प्रकारची धान्यखरेदी हंगामापुरतीच न करता सर्व वर्षभर अखंडित केली पाहिजे.

धान्यखरेदी सक्तीने होते असे दिसल्यास शेतकरी अगदी जरुरीपुरतेच धान्य पिकवून धान्याव्यतिरिक्त पिके जास्त लावू लागेल असा संभव आहे. याकरिता सक्तीच्या योजनेत धान्य किती द्यावयाचे याचा एकंदर साऱ्याशी संबंध जोडला पाहिजे. म्हणजे धान्य कमी पेरण्याची भीती रहाणार नाही. इतकेच नव्हे, तर आज कमी प्रमाणात धान्य पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना जास्त धान्य पिकवावे लागेल; व त्यामुळे एकंदर धान्यपैदासही वाढेल.

## धान्यवाटपाचे स्वरूप

आणि यापुढचा प्रश्न म्हणजे धान्यवाटपाचा. सक्तीच्या धान्यखरेदीचे धोरण सरकारने आखले की, जनतेस लागणाऱ्या धान्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी सरकारवर आलीच. यासाठी धान्यखरेदीची योजना तदुत्तर होणाऱ्या वाटपास अनुलक्षून केली पाहिजे. शेती, धंदा व कुटुंबपोषण एवढ्यापुरतेच धान्य-उत्पादन होणाऱ्या शेतकऱ्यांना सक्तीच्या धान्यखरेदीतून माफी दिली म्हणजे त्यांना धान्य पुरविण्याच्या जबाबदारीतून सरकार मुक्त होते. त्याप्रमाणे अलुत्याबलुत्यांचे व मजुरांचे नेहमीचे मुशाहिरे धान्यरूपाने देण्यावर सरकारने निर्बंध घातला नाही म्हणजे त्यांना धान्य पुरविण्याच्या जबाबदारीतून सरकार अंशतः तरी मुक्त होते. खरेदीची योजना आखतानाच या गोष्टीची तरतूद केली म्हणजे वाटपाच्या कामाचा त्या त्या बाबतीतील प्रश्न सुटतो व एकंदर कामाचा बोजाही कमी होतो. परंतु यातून वगळलेल्या जनतेस, योगक्षेमास लागते त्याहूनही कमी धान्य पिकणाऱ्या शेतकऱ्यास व गरजेहून कमी धान्य वाट्यास येणाऱ्या अलुत्याबलुत्यास व मजुरास धान्य पुरविण्याची जबाबदारी सरकारवर पडते. ती कशी पार पाडता येईल इकडे आता वळू.

## शिधापद्धतीचा विस्तार आवश्यक

काही मोठ्या शहरांतून शिधापद्धती अमलात आलेली आहे व तेथे धान्याच्या वाटपाची जबाबदारी सरकारने घेतलीच आहे. परंतु लहान शहरांतून सध्या धान्याच्या बाबतीत फार हलाखीची स्थिती झाली आहे. तेथे सरकारने शिधापद्धती ताबडतोब अमलात आणणे आवश्यक आहे. बहुतेक शहरांतून गहू, साखर, रॉकेल वगैरे पदार्थांच्या रेशनिंगसाठी कुटुंबाची मोजदाद, त्यांच्या याद्या वगैरे तयार झालेल्या आहेत. त्यामुळे तेथे शिधापद्धतीसाठी लागणारी सर्व पूर्व तयारी झाली आहे. म्हणून तेथे शिधापद्धती ताबडतोब अमलात आणणे सुलभ होईल.

परंतु येथेच न थांबता ही घरटी वाटपाची पद्धती अंशमानाने तरी ग्रामीण भागांतूनही अमलात आणली पाहिजे. ही गोष्ट सकृत्दर्शनी दिसते तितकी अवघड नाही. आजसुद्धा साखर, रॉकेल वगैरे पदार्थांच्या वाटपासाठी खेडोपाडी विशिष्ट प्रकारची व्यवस्था पुष्कळ ठिकाणी चालू आहे. बहुतेक आठवड्याचा बाजार जेथे भरतो तेथून अशा वाटपाची व्यवस्था करता येईल. प्रत्येक

मध्यवर्ती दुकानातून भोवतालच्या आठ-दहा खेड्यांतील रहिवाशांस पुरवठ्याची व्यवस्था करता येईल. खेड्यास एक वार नेमून देऊन आठवड्यास त्या वारीच तेथील कुटुंबांची खरेदी होईल. कुटुंबे व त्यांतील माणसे यांची यादी करून धान्य ठराविक प्रमाणात यादीबरहुकूम विकता येईल. धान्यखरेदीच्या योजनेच्या वेळी प्रत्येक उत्पादक कुटुंबाची यादी व त्यांचे उत्पादन यांची यादी प्रत्येक गावी तयार करावीच लागेल. या यादीस बिगर उत्पादक कुटुंबांची यादी जोडून घरटी धान्य केव्हा, कसे व किती द्यावयाचे हे ठरविता येईल. या पद्धतीचा अवलंब केल्यास वाटपाचा प्रश्न सुकर व सोयिस्कर रीतीने सुटणार आहे. अर्थातच ही वाटप केंद्रे शक्यतोवर सरकारी अगर सहकारी पेढ्या, बँका अशांसारख्या संस्थांनी चालविलेली असावीत. खरेदीचे व वाटपाचे दुकान सोयीसाठी एकच असावयास हरकत नाही. परंतु खरेदीखाते व विक्रीखाते ही अगदी स्वतंत्र व अलग असली पाहिजेत. ही व्यवस्था स्वतंत्र नसल्यास घोटाळे उत्पन्न होतील व संधिसाधू लोक त्याचा अनिष्ट प्रकारे फायदा घेतील. यासाठी खरेदीखात्याने सरकारच्या लेखी हुकुमाशिवाय विक्रीखात्यास धान्य पुरविता कामा नये, असाही निर्बंध घालावयास हवा.

जिल्ह्याजिल्ह्यांतील धान्याच्या वाटपाची जबाबदारी खुद्द प्रांतिक सरकारनेच स्वीकारली पाहिजे. सध्या प्रत्येक जिल्ह्यातील कलेक्टरवर त्या त्या जिल्ह्याला इतर जिल्ह्यांतून धान्य आणविण्याची अगर पाठविण्याची जबाबदारी टाकलेली आहे. त्याचे परिणाम फार अनिष्ट होतात. आज हिंदुस्थानात धान्यतुटीचे व शिलकीचे प्रांत यांच्यांत जो लढा निर्माण झाला आहे तशाच प्रकारचा लढा एकाच प्रांतातील तुटीचे व शिलकीचे जिल्हे यांच्यांत वरील पद्धतीमुळे होतो; व त्यामुळे सर्व घोटाळा व गोंधळ निर्माण होतो. यासाठी सरकारी केंद्रांनी किती धान्य खरेदी केले, कोठे, किती धान्याची गरज आहे व तेथे ते सोयिस्कर रीतीने कोठून पाठविता येईल याबद्दल प्रांतिक सरकारने अगदी तपशीलवार माहितीचा आराखडा नेहमी तयार ठेवला पाहिजे; व त्याच्या अनुरोधाने धान्याची ने-आण वगैरे गोष्टी केल्या पाहिजेत. या गोष्टी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपवून भागणार नाही.

## धान्यखरेदीचे भाव

वरील सर्व चर्चेत धान्यखरेदी कोणत्या भावाने करावी व धान्यवाटपाच्या वेळी कोणती किंमत लावावी यासंबंधी काहीच लिहिले नाही. याचे कारण तो प्रश्न संपूर्णपणे प्रांतिक सरकारच्या अखत्यारातील नाही. शेतकऱ्याकडून ज्या भावाने धान्यखरेदी करावयाची त्या भावाच्या अनुरोधानेच इतर जनतेकडून त्याची किंमत घेणे न्याय्य आहे. परंतु खरेदी करताना शेतकऱ्यास द्यावयाचा भाव कसा ठरवावा ? ज्या मानाने इतर वस्तूंच्या किमती वाढलेल्या आहेत त्या मानाने वाढलेल्या धान्याच्या भावाने खरेदी केल्यास शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही. परंतु इतर वस्तूंचे भाव कमी न करता फक्त धान्याचे भाव कमी ठेवून तदनुसार खरेदी करणे म्हणजे शेतकऱ्याला पिळून काढणेच होय. तेव्हा ठरविलेल्या धान्याच्या भावामुळे शेतकऱ्यावर अन्याय होऊ नये यासाठी इतर वस्तूंचे भावही नियंत्रित केले पाहिजेत. धान्याचे भावनियंत्रण हा सर्वंकष भावनियंत्रणाचा एक भाग आहे ही गोष्ट स्पष्टच आहे. सर्वंकष भावनियंत्रण चलनवृद्धीस आळा घातल्याखेरीज यशस्वी होणे शक्य नाही. परंतु या दोन्ही गोष्टी मध्यवर्ती सरकारने करावयाच्या आहेत.

## संस्थानांतही भावनियंत्रणाची निकड

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भावनियंत्रण संस्थानांतूनही होईल अशी व्यवस्था करणे. मुंबई प्रांताच्या सरहद्दीत बरीचशी लहानसहान संस्थाने आहेत. परंतु ब्रिटिश मुलखातील भावनियंत्रण

व संस्थानातील भावनियंत्रण यांचा परस्पर संबंध राखण्याची कोणतीही व्यवस्था नाही. यामुळे सभो-वतालच्या खालसा भागापेक्षा या संस्थानांतून धान्याचे व इतर वस्तूंचे भाव काही प्रसंगी पुष्कळच जास्त होण्याचा संभव आहे. असे झाल्यास खालसातील धान्य ही संस्थाने आपल्याकडे ओढून घेतील व त्यामुळे खालसातील धान्याचा पुरवठा कमी होईल. यासाठी लगतच्या सर्व प्रदेशात एकसारखे धोरण स्वीकारले जाईल हेही पाहाणे फार महत्त्वाचे आहे.

सरकारी अधिकाऱ्यांच्या हाती इतक्या विस्तृत स्वरुपाचे नियंत्रण करण्याचे काम द्यावे की नाही याबद्दल पुष्कळांस शंका वाटते. लाचलुचपत वगैरे गोष्टींमुळे अशा नियंत्रणापासून फायद्याऐवजी तोटाच जास्त होईल, असे त्यांस वाटते. परंतु ही शंका अनाठायी नसली तरी एकंदर परिस्थितीचा विचार करता फारशी योग्य नाही असे दिसून येईल. अनिर्बंध व्यवहार व लाचलुचपत घेणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांकडून होणारे नियंत्रण यांपैकी जास्त फायद्याचे कोणते हे आपल्यास ठरवावयाचे आहे. सध्याच्या दोषयुक्त नियंत्रणामुळे अगदी अनिर्बंध व्यवहारापेक्षा आपला जास्त फायदा होत आहे ही गोष्ट नाकारता येणार नाही. अनिर्बंध व्यवहारामुळे होणारे हाल बंगाल्यात स्पष्ट झाले आहेत. आजचे अपुरे व दोषयुक्त नियंत्रणही अनिर्बंध व्यवहारापेक्षा केव्हाही जास्त चांगले.

## जनतेची जबाबदारी

दोषयुक्त नियंत्रणाची जबाबदारी फार मोठ्या प्रमाणात जनतेवरच येते हेही विसरून चालणार नाही. सर्व सरकारी योजनेत व्यत्यय आणण्यात शहाणपणा मानणे, सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रमादा-बाबत जागरूक नसणे व स्वार्थाकरिता स्वतः नियंत्रणभंग करून व्यापाऱ्यांस व अधिकाऱ्यांस मोह पाडणे हे सर्व सामान्य लोकांकडून होते. नियंत्रणासंबंधी प्रत्येक नागरिकाचे प्रथम कर्तव्य म्हणजे सरकारी योजनांशी संपूर्ण सहकार्य. याच्यात परकी सरकारास मदत करून देशद्रोही म्हणून शिक्का बसण्याचा प्रश्न नाही. जनतेवर आलेले भीषण संकट टाळण्यासाठी आप्तजनांसंबंधीचे हे प्रत्येक नागरिकाचे प्राप्त कर्तव्यच आहे. त्याचप्रमाणे विशेषतः सुखवस्तू नागरिकांचे दुसरे कर्तव्य म्हणजे त्यांच्याजवळ सुदैवाने असलेल्या थोड्या फार फाजील क्रयशक्तीचा दुरुपयोग न करणे. रेशनपेक्षा जास्त धान्य काळ्या बाजारात खरेदी करणे व साठवून ठेवणे, मोठमोठ्या मेजवान्या देणे ही सध्याच्या काळी प्रतिष्ठेची अगर श्रीमंतीची लक्षणे काही मानीत असतील. परंतु धान्य साठविणे अगर मेजवानी देणे ही गोष्ट आता पूर्वीसारखी वैयक्तिक राहिली नाही. स्वतःच्या गरजेपेक्षा जास्त धान्य साठवून ठेवणे अगर पाचपन्नास लोकांस जेवावयास घालणे म्हणजे तेवढे धान्य अगर शिधा अनाठायी फुकट घालविणे होय. आणि धान्य फुकट घालविण्यापेक्षा त्याचा घोर परिणाम म्हणजे काळ्या बाजारातील व्यापारी व लाचखाऊ अधिकारी यांस त्यामुळे उत्तेजन मिळते. असले वर्तन म्हणजे सध्याच्या काळात सर्वांत मोठा जनताद्रोह व पर्यायाने देशद्रोह होय.

ता. १ मार्च १८९२ च्या 'केसरी'त लोकमान्य टिळक त्या वेळच्या दुष्काळास उद्देशून लिहितात :– "दुष्काळाच्या वर्षी लग्नादिकांसारखे फाजील खर्चाचे समारंभ कमी होतात असा जगाचा साधारण नियम आहे. पण आम्हीं सर्वच साधारण नियमांना अपवाद आहोंत. तेव्हा यंदा येथें (पुण्यांत) लग्नकार्यांचें कमी तर नाहींच, पण उलट दर वर्षांपेक्षां थोडेंबहुत जास्ती प्रमाण आहे, ह्यांत आश्चर्य नाहीं! खेड्यापाड्यांतून हजारों गरीब लोक धान्याच्या टंचाईमुळे एन्हांपासून निवडुंगांवर उपजीविका-करू लागले आहेत. पोटाकरितां घरदार सोडून बाहेर जाणारांची संख्या उत्तरोत्तर वाढत आहे व ह्याहून अधिक वाढत जाण्याचा संभव दिसत आहे. यंदाचें साल सुखरूप कसें पार पडते व पुढील वर्षी काय स्थिति होते ह्याची सर्वांस मोठी काळजी लागली आहे. असे असूनहि

मोतीचूर-जिलब्यांचीं प्रयोजनांवर प्रयोजनें झोडण्यांत मंडळी गर्क झाली आहेत !...ह्यापेक्षां आमच्या परदुःखशीतलतेचे, अदूरदर्शित्वाचें व बेअकलेचें आणखी दुसरें निदर्शक कोणतें पाहिजे ? आणि खरेंच, पंचपक्वान्नांनीं ढेकर देत पोटावर हात फिरवितांना ज्यांच्या कष्टावर आपणाला फुकट खावयास मिळतें त्या बिचाऱ्या शेतकऱ्यांची व मजूरदारांची कशी अन्नान्न दशा झाली आहे किंवा लवकरच होण्याची भीति आहे त्याची आठवण आम्हांस कशानें होणार ?"

लोकमान्यांनी काहीशा भिन्न परिस्थितीत ओढलेले कोरडे आजही अनाठायी आहेत असे म्हणण्याचे धाडस निदान आमच्याने तरी करवत नाही.

*किर्लोस्कर* २४ : २९१ एप्रिल १९४४ पृ० ४१७–४२०

☆

# ६ . . अन्नधान्यांतील भाववाढ

तारीख १ एप्रिल १९५२ रोजी अन्नधान्यांच्या नियंत्रित सरकारी वाटपाखाली मिळणाऱ्या धान्यांचे भाव एकदम जवळजवळ दिडीने वाढले. ही वाढ बहुतेकांस भासली व सर्वांसच ती अयोग्य व अन्याय्य आहे असे वाटले. सर्वजणांस वाटणाऱ्या या भावनेचे दिग्दर्शन करावे व सरकारकडे ती रद्द करण्याकरिता एकमुखाने मागणी करावी याकरिता आपण येथे जमलो आहो. प्रसंग असामान्य आहे. धान्यभावाच्या वाढीने सर्वांच्याच पोटाला चिमटा बसला असल्यामुळे धर्म-पंथ, जातपात, धंदा-व्यवसाय, पक्ष-उपपक्ष असे काहीच भेद न बाळगता आपण लहान-थोर फार मोठ्या संख्येने एकत्र झाला आहा; व जणू काय प्रसंगाचे असामान्यत्व ठळकपणे दिसून यावे म्हणून जाहीर उत्कट मतप्रदर्शनात कधीही भाग न घेणाऱ्या अशा मजसारख्या व्यक्तीची आपण अध्यक्ष म्हणून निवड केली आहे. सार्वत्रिक बिकट प्रसंग आल्यावर प्रत्येकास त्याच्या निवारणार्थ अगर प्रतिकारार्थ काही ना काही तरी करावेसे वाटते. किमानपक्षी आपले हितसंबंध दुखावले, आपणांस अप्रिय अशी घटना घडून आली, आपणांवर अन्याय झाला हे उघडपणे दाखविणे एवढे तरी व्हावे असे राजकारण अगर इतर चळवळींपासून पराङ्मुख असलेल्या माणसासही वाटावे असा हा प्रसंग आहे. निरनिराळ्या व्यवसायजन्य अगर परिस्थितिजन्य बंधनांत वावरणारे असे अनेक येथे जमले आहेत; व अशा सर्वांस जमण्याची संधी मिळावी म्हणून त्यातल्या त्यात निरुपद्रवी अशा माझ्यासारख्याची आपण अध्यक्ष म्हणून योजना केली व मीही प्रसंग लक्षात घेऊन हा काहीसा अनपेक्षित व मला न मानवणारा मान स्वीकारला.

### भाववाढीस सरकारी धोरण कारणीभूत

ज्या घटनेचा आपण निषेध करीत आहोत तिचा उगम अस्मानीत नसून सुलतानीत आहे. भूकंप झाला, दुष्काळ पडला तर त्यास विरोध दर्शविण्यात अर्थ नसतो, त्याच्या परिणामाच्या निवारणार्थ काय करता येईल एवढेच पाहावयाचे असते. परंतु मानवी अर्थव्यवहाराची सर्व अंगे सरकारी हुकमतीखालील आहेत व तेजी-मंदीचे चक्र फिरले तर ते फिरण्यात अगर त्याच्या भ्रमणाच्या दिशेत किंवा वेगात सरकारी योजना असते अगर असू शकते असा आजचा विश्वास आहे. परंतु प्रस्तुतची भाववाढ ही तेजी-मंदीच्या चक्राचा परिणाम आहे असेही म्हणता येत नाही. तिचा उगम प्रत्यक्ष सरकारी धोरणात आहे. आजच्या भाववाढीचे मूळ कोरियन युद्धोत्तर झालेल्या किमतींच्या फेरबदलात आहे, असे काही म्हणतील व म्हणतात. या म्हणण्यात सकृद्दर्शनी तथ्य वाटले तरी विचारांती ते फोल आहे असे कळून येईल. कारण कोरियन युद्धोत्तर भाववाढ जी काही झाली ती होऊन बराच काळ लोटला. वाढलेल्या भावांत खरीदलेले धान्य देशात आज कैक महिने आयात होत आले आहे.

सरकारी पैसा वाढत्या भावाच्या आयातीत खर्च होत राहिला आणि सरकारने बुद्ध्या सरकारी नियंत्रित वाटपात विकल्या जाणाऱ्या धान्याचे भाव वाढवावयाचे नाहीत असे धोरण स्वीकारले, त्याची सतत अंमलबजावणी केली. हे अनवधानाने, गफलतीने घडले नाही; बऱ्याच वाटाघाटी होऊन घडले व तसे घडण्यास कारणेही सबळ होती व आहेतही.

भारतातील अर्थव्यवहाराची काही मर्मस्थाने मध्यवर्ती सरकारच्या ताब्यात निदान विशिष्ट काळापुरती असावी अशी भारतीय घटनेतील योजना आहे. महायुद्धकाली त्या वेळच्या बिकट परिस्थितीमुळे व महायुद्धोत्तर परिस्थितीचा बिकटपणा टिकून राहिल्यामुळे हे अधिकार आपोआपच मध्यवर्ती सरकारकडे आले होते. घटना घडविताना हे अधिकार तसेच चालू ठेवणे सर्वांसच इष्ट वाटले व योग्य तेच केले गेले. या अधिकारात धान्यवाटपाचे नियंत्रण ही बाब प्रामुख्याने समाविष्ट आहे. महायुद्धोत्तर अन्नधान्याबाबतची देशातील परिस्थिती सारखी बिघडत राहिली आहे, हे सांगण्यास अर्थशास्त्रज्ञाची जरुरी नाही. या बिघडलेल्या परिस्थितीत योग्य व न्याय्य कारभार चालविणे हे मध्यवर्ती सरकार करू जाणे. एकेकट्या राज्य सरकारास परिस्थिती झेपण्यासारखी नाही, हे उघड होते. म्हणून धान्याची आयात-निर्यात व अंतर्गत हालचाली, खरेदी-विक्री सर्व मध्यवर्ती सरकारच्या मूलभूत योजनेनुसार व्हावी, असा कारभाराचा दंडक आहे. असे असूनही अन्नधान्याच्या बिकट परिस्थितीची झळ देशात सर्वांना सारखीच लागली असे म्हणता येत नाही. कितीही ओरड झाली, कितीही प्रयत्न झाले तरी मध्यवर्ती सरकारास धान्य कारभारात एकसूत्रीपणा आणणे, वाटप पद्धतीत सारखेपणा उत्पन्न करणे कधीच जमले नाही. काही राज्यांत पुरवठा नेहमी मुबलक, तर इतरत्र तिन्ही त्रिकाळ दुष्काळ. काही ठिकाणी पुरवठ्याचे अनेक पर्याय तर काही ठिकाणी एकच पुरवठ्याचा मार्ग व तोही महागड्या, नको असलेल्या धान्याचा. काही ठिकाणी विक्री स्थानिक खरेदीच्या भावांत तर बाकीच्या ठिकाणी स्थानिक खरेदी व विक्रीच्या भावांत अतोनात तफावत. असे राज्याराज्यांत, स्थळास्थळांत अतोनात फरक या सकृत्‌दर्शनी एकतंत्री मध्यवर्ती कारभारात सारखे राहिले; व अनुभवांती ते काढून टाकणे हे मध्यवर्ती सरकारच्या कुवतीच्या पलीकडे आहे असेही जनतेस कळून आले.

## तुटीच्या प्रदेशांची दुःस्थिती

धान्यवाटपाची ही विषम परिस्थिती विशेषत्वे तुटीच्या प्रांतांतील जनतेसच भासली. जी राज्ये धान्यपुरवठ्याबाबत स्वयंपूर्ण होती, त्यांनी मध्यवर्ती सरकारच्या मदतीकडे पाहिले नाही. इतकेच नव्हे तर इतरांना मदत करण्याकरिता आपल्या राज्यातील परिस्थितीचे नियमन करण्याबाबत मध्यवर्ती सरकारने दिलेल्या आदेशांकडेही दुर्लक्ष केले. तुटीचे प्रांत सर्वस्वी परावलंबी व ते या नाजूक बाबतीत. तेव्हा त्यांना मध्यवर्ती सरकारकडे गाऱ्हाणी नेणे, विषम परिस्थितीबाबत तक्रार करणे, वारंवार मागण्या करणे व जेवढे सर्व उपाय योजून मिळेल तेवढ्यात कारभार चालविणे, याखेरीज गत्यंतर नव्हते. तुटीच्या राज्यांतही विशेष बिकट परिस्थिती त्यातील काही मोठ्या शहरांची होती. तुटीच्या राज्यांतील स्थानिक खरेदी अपुरी असली तरी एकंदर ग्रामीण विभागात व लहान शहरांत पुरवठ्याचा बराच भाग स्थानिक असू शकत होता. जेथे पुरवठा बरेच अंशी स्थानिक होता तेथे मिळणाऱ्या धान्याची जात, प्रत व किंमत ही बहुतांशी बहुजनांच्या गरजा व कुवत यांच्याशी जमण्यासारखी होती. पण ज्या शहरांत मागणी मोठी व आसपासचा प्रदेश कमी उत्पन्नाचा तेथे परिस्थिती विशेष कठीण; कारण तेथील पुरवठा सर्वच दुरून वाहून आणलेला. आणि असा पुरवठा सर्व बाबींत निवडकच असावयाचा, हे आपणा सर्वांच्या चिरपरिचयाचे आहे. मोठ्या शहरांत आयातीच्या प्रमुख बंदरांची परिस्थिती

काही अंशी बरी. कारण त्यांस भरपूर व त्यातल्यात्यात स्वस्त असा आयात माल मिळत असे. गेल्या दहा वर्षांतील माझ्या अनुभवावरून धान्यपुरवठ्याबाबत पुण्याइतकी वाईट परिस्थिती हिंदुस्थानातील कोणत्याच मोठ्या शहराची असेल असे मला वाटत नाही.

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे धान्यवाटपाच्या कारभारावरील सत्ता जरी एकत्रित होती तरी त्यात एकवटपणा न येता फरक फार राहिले; व याचे परिणाम तुटीच्या राज्यांना व त्यातल्या त्यात या राज्यांतील मोठ्या शहरांना विशेष भोगावे लागले. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन मध्यवर्ती सरकारने या शहरवासीयांचे हाल थोडे कमी व्हावे म्हणून मधून मधून काही गोष्टी केल्या. या गोष्टींपैकीच आयात केलेल्या धान्यांच्या भावांतील वाढीचा काही भाग सोसणे ही एक होती. मध्यवर्ती सरकारने ही जी गोष्ट गतवर्षी केली ती आपल्या एकंदर धान्यवाटप योजनेचा एक भाग म्हणूनच केली हे उघड आहे. राज्याराज्यांत, स्थळास्थळांत परिस्थिती भिन्न असल्यावर ती अगदी सारखी करता येत नाही तर निदान विशेष विषमता कमी करावी हे मध्यवर्ती सरकारचे कर्तव्य होते; व त्यांनी ते काही अंशी का होईना गतवर्षी बजावले. याबाबतीत आम्हांस पूर्णपणे समाधान होते असे नाही. कारण वर्षोवर्षी भाव थोडे थोडे वाढत होते; व त्यातल्या त्यात स्वस्ताईच्या धान्याचे वाटपात मिळणारे प्रमाण कमी होत होते. गेल्या तीन वर्षांत घडलेले फरक साकल्याने दर्शवावयाचे तर असे म्हणता येईल की, १९४९–१९५० साली जेथे दर माणशी आठवड्याचे १२ आणे नियंत्रित वाटपातील धान्याचे पडत असत ते १९५०–५१ साली १३ आणे पडू लागले व गतवर्षीच्या वाढीत हा आकडा १ रु. २ आणेपर्यंत गेला. म्हणजे अलीकडच्या भाववाढीच्या आधीच्या दोन वर्षांत आमच्यावरील बोजा बराच, माणशी ४–६ आण्याने आधीच वाढला गेला होता; व ही वाढ हिंदुस्थानातील इतर ठिकाणांच्या वाढीच्या मानाने विशेष भारी होती. असे असले तरी एकंदर देशातील बिघडती परिस्थिती पाहून व एकंदर बोजा पेलण्यात आपणास मध्यवर्ती सरकार थोडे बहुत साहाय्य करीत आहे हे लक्षात घेऊन आपण यापूर्वी संघटित रीतीने चळवळ अगर तक्रार केली नाही. गेल्या काही महिन्यांत काळ एकदम पालटला. मध्यवर्ती सरकारने करावयाची मदत त्यांनी पैशाच्या तुटवड्याच्या सबबीवर देण्याचे नाकारले; व आपल्या राज्य सरकारची याबाबतची कुचंबणा तर जगजाहीरच आहे. तेव्हा आजवर मदत का केली, ती न करण्याने काय परिणाम होईल, ती काढून घेण्यास काही स्थित्यंतर आज झाले आहे काय किंवा इतर काही सबळ कारणे आहेत काय याचा विचार न करिता ही भाववाढ अचानक आपणांवर लादली गेली.

## भाववाढीचे जनतेवरील परिणाम

या भाववाढीचे जनतेवर परिणाम काय होणार हे अगदी थोडक्यात सांगण्यासारखे आहे. ढोकळ हिशोब केला तरी हे परिणाम स्पष्ट दिसून येतील. पुण्यात मिळणाऱ्या तांदळचा भाव १ एप्रिलला शेरास ४ आण्याने व गहू ३ आण्याने वाढला आहे. धान्यवाटपात अडीच शेर धान्य मिळते. तेव्हा सरासरीने या महिन्यात दर माणशी आठवड्याचा खर्च आठ आणे अवश्य वाढला. म्हणजे चार रेशन युनिट असणाऱ्या कुटुंबांत मासिक जादा खर्च आठ रुपयांहून अधिक वाढला. स्पष्ट सांगायचे म्हणजे सरकारने मदत करण्याचे टाळून त्याची भरपाई या शहरांतील सर्व कुटुंबांवर सरासरी वार्षिक रु. १०० चा कर लादून केली. आणि हा कर लादला तो कमाल अन्याय्य स्वरूपाचा. भाववाढीचा परिणाम तात्पुरता धान्य खरेदी कमी होण्यात दिसला, यावरून गैरसमज करून घेऊ नये. सर्व खर्चात अन्नावरील व त्यातल्यात्यात धान्यांवरील खर्च सर्वांत अत्यावश्यक. याचे गमक राहणीच्या मानाचा तुलनात्मक अभ्यास केला असता स्पष्ट दिसून येते. जितकी गरिबी अधिक तितका एकंदर खर्चातील अन्नखर्चाचा भाग अधिक, व जितकी गरिबी अधिक तितके अन्नखर्चातले धान्य व

कडधान्ये यांवरील खर्चाचे प्रमाण वाढते. गेल्या दहा वर्षांतील हिंदुस्थान सरकारच्या मजूर खात्याने केलेल्या पाहणीचे आकडे अभ्यासले तरी ही प्रमाणे स्पष्टपणे कळून येतात.

| शहर | प्रकार | मासिक खर्च | अन्न खर्च | अन्नखर्चाची विभागणी धान्य | कडधान्ये |
|---|---|---|---|---|---|
| सोलापूर | औद्योगिक मजूर | ७७ रु. | ४९ टक्के | २१ टक्के | २·८ टक्के |
| जळगाव | ,, | ६१ रु. | ५७ टक्के | २६ टक्के | ५ टक्के |
| अकोला | ,, | ५८ रु. | ५९ टक्के | २८ टक्के | ५ टक्के |

(हे सर्व आकडे १९४४–४६ चे आहेत)

काही वर्षांपूर्वी मध्यवर्ती सरकारने मध्यमवर्गीयांच्या राहणीची पाहणी केली. त्यात मुंबई राज्यातील मुंबई खेरीज इतर शहरांतील कुटुंबांची माहिती दिली आहे. ती खालीलप्रमाणे:— यातील मासिक खर्च १९४५–४६ साली सरासरी रु. १४० असणाऱ्या कुटुंबांचा धान्यावरील मासिक खर्च सरासरी रु. १५ व कडधान्यावरील रु. ४–४॥ असे. या कुटुंबांतील माणसांची संख्या लक्षात घेता आजच्या भावाने त्यांना एकंदर खर्च रु. २५ ते ३० येईल. लक्षात घ्यावयाचा मुद्दा एवढाच की, भाववाढीची तात्पुरती प्रतिक्रिया काहीही झाली तरी अंती धान्याची मागणी किंवा विक्री भाववाढीमुळे फारशी कमी होण्याचा संभव नाही. गरीबात गरीब कुटुंबास धान्यावरील खर्च हा जास्तीत जास्त आवश्यक. तो खर्च वाढवला तर इतर गोष्टी कमी होणार. आज प्रत्येक कुटुंबास मासिक रु. ८ ते १० हे इतर बचत करून काढावे लागणार. हे रुपये ते कसे काढणार देव जाणे! पण आजची परिस्थिती आहे ही अशी आहे. हा बोजा पुरा बसणार नाही कोणावर तर ज्यांना इतर महागाईचे अन्न खाण्याची संवय व ऐपत असल्याने पुरे २॥ शेर धान्य ज्यांना आजच लागत नाही, किंवा ज्यांना रेशन दुकानाहून निराळे धान्य मिळविण्याचे मार्ग आधीच माहीत, मोकळे व सरावाचे आहेत त्यांवर. जितके कुटुंब जास्त गरीब व जितके जास्त पापभीरू तितका या करातून सुटण्याचा संभव कमी. तसेच कराचा बोजा पाहिला तर तो व्यस्त प्रमाणात. मासिक खर्च रु. ६० असो वा रु. ६०० असो, वाढत्या बोजाची रक्कम एकच. एकात ती प्राप्तीच्या १५ टक्के बसेल तर दुसऱ्यात १॥ टक्के. अर्थात जितके कुटुंब जास्त श्रीमंत तितका निरनिराळ्या मार्गाने बोजा टाळावयाचा संभव अधिक. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आयात धान्याच्या वाढत्या किमतीचा खर्च कोणावर लादावयाचाच तर जास्तीत जास्त अयोग्य व अन्याय्य प्रमाणात तो लादणे हे हल्लीची भाववाढ करून सरकारने साधले आहे.

## सरकारची जबाबदारी

यावर असे कोणी म्हणतील की ज्याला त्याच्या गरजेकरिता धान्य विकले आणि त्याला बाजारात पडले त्या दराने विकले तर हे कर लादणे होत नाही. गेल्या वर्षभर सरकारने कमी भावाने धान्य विकले ही मेहेरबानी झाली. आता सरकारास परवडत नाही, त्यास त्यांनी काय करावे? ही भाषा सकृद्दर्शनी बरोबर वाटते; कारण ती आपल्या फार आंगवळणी पडली आहे. खरोखरच हल्लीच्या युगात सरकारी मेहेरबानी या शब्दांस काही अर्थ नाही. सरकार कर रूपाने व इतर मार्गाने पैका गोळा करिते व त्याचा योग्य तो विनियोग आपल्या धोरणाप्रमाणे करिते. यात मेहेरबानीचा भाग काही नाही. धोरण बदलण्याचा असला तर तो स्पष्ट व्हावा. आज अर्थव्यवहारात खुला व्यवहार असा फारच

थोडा उरला आहे. बहुतेक सर्व व्यवहार, सर्व भाव सरकारी धोरणावर कमी-अधिक अवलंबून असतात. त्यांत धान्याचे भाव व वाटप ही तर पूर्णपणे सरकारी नियंत्रणाखालील. शेतकऱ्यांस धान्याकरिता कोणत्या हंगामात काय भाव द्यावयाचा हे सरकार ठरविते, धान्यवसूलीची सक्ती किती करावयाची व त्यात मोकळा बाजार किती राखावयाचा हेही सरकारच ठरविते. कोणत्या भागांतून किती धान्य कोठे न्यावयाचे, ते कोठे, कसे व किती विकावयाचे हेही सरकारच ठरविते. तेव्हा जेथे गिऱ्हाइकाच्या इच्छेचा भाग काही नाही तेथे त्याच्याकरिता आणलेल्या मालाची किंमत त्याजकडून घेतली ही भाषाच अप्रस्तुत. पुण्याच्या रहिवाशाने घोडनदीची बाजरी किंवा मावळचा तांदूळ यांऐवजी ऑस्ट्रेलिया–अमेरिकेचा गहू खावा हे निर्णय सरकारचे. पुणेकरांस फक्त न खाता राहावे किंवा जमल्यास काळाबाजार करावा एवढेच दोन इतर पर्याय उरलेले. हिंदुस्थानात एकंदर सरकारी वाटपाकरिता लागणाऱ्या धान्याच्या पुरवठ्यात तूट पडली, ती धान्य आयात करून भरून काढावी लागली. हे आयात धान्य महाग पडू लागले. हा धान्य महागण्यामुळे आलेला जास्त खर्च एकंदर धान्यवाटप व्यवस्थेकरिता, अखिल भारतीय व्यवस्थेकरिता लागला हे स्पष्ट आहे; व हिंदुस्थान सरकारला ते कळत नसले, पटत नसले तर वारंवार आग्रहाने सांगितले पाहिजे. केवळ मुंबई राज्याकरिता, अहमदाबाद, मुंबई, पुणे, सोलापूर येथील रहिवाशांकरिता, धान्य आयात केले नाही. सोय म्हणून आयात धान्य अमक्या स्थळीं वाटले. तेव्हा आयात धान्याची महागाई व या स्थळांचे गिऱ्हाईक यांचा काही विशिष्ट संबंध लावता येत नाही. नाहीतर मुंबई राज्याची गरज व मुंबई राज्याची पैदास येथील आयात–निर्यात या सर्वांचाच असा राज्यवार, स्थलवार विचार करावा लागेल. आणि मग अर्थव्यवहारात अनवस्था प्रसंग उत्पन्न होईल. तेव्हा वर सांगितल्याप्रमाणे गतवर्षी मध्यवर्ती सरकारने या बाबतची तूट सोसण्याचा निर्णय घेतला त्याचा अर्थ हाच होता की आयात धान्याच्या महागाईचे दुष्परिणाम विषम रीतीने कोणालाच विशेष भासू नयेत. आणि यंदा हे धोरण सोडले याचा अर्थ एवढाच की साकल्याने नीट विचार करावा, आपली जबाबदारी ओळखावी, व किमान राहणीच्या मानाकडे लक्ष पोचवावे याचा विचार आता भारतीय सरकारास करवत नाही अगर करावासा वाटत नाही.

विशिष्ट स्थळांतील जनतेवर विशेष अन्याय्य बोजा पडू नये असा विचार सरकारचे डोक्यात दोन प्रकारे येऊ शकतो. एकतर अन्याय दिसल्यामुळे असंतोष उत्पन्न होईल व त्यातून अशांतताही निपजेल अशी भीती असते म्हणून. अशी भीती बहुतेक परकी किंवा हुकमशाही अमलात राज्यकर्त्यांना वाटते. युद्धकाळी मुंबईतील मजुरवर्गात असंतोष उत्पन्न झाल्यास त्याचे परिणाम फार अपकारक होतील म्हणून मुंबई सरकार काही विशेष सवलती मध्यवर्ती सरकारकडून मिळवू शकले, अशी भाषा त्या वेळेस ऐकू येत असे. लोकशाहीत इतक्या थरास गोष्टी जाऊ नयेत, लोकशाहीत जनतेचा अनुनय करण्याकरिता, विशेषतः निवडणुकीचे आधी, विशेष सवलती देण्याचा मोह राज्यकर्त्यांस होण्याचा संभव सांगतात. अर्थात याचे उलट निवडणुकी नुकत्याच होऊन गेल्या असल्यास विशेष बेपर्वाई राज्यकर्त्यांत उत्पन्न होण्याचा संभव असावा. पण या गोष्टी अवांतर समजल्या पाहिजेत. लोकशाही सरकारच्या विशिष्ट योजना काही सर्वांगीण धोरणाच्या दृष्टीनेच आखल्या गेल्या पाहिजेत. तेव्हा येथे विशिष्ट स्थळी दिलेली सवलत किंवा विशिष्ट वर्गाकरिता केलेली योजना ही समग्र धोरणाचा भाग म्हणून अगर त्यास पूरक म्हणून केली जावी. या दृष्टीने विचार करता हिंदुस्थान सरकारने आम्हांस किमतींत गतवर्षी सूट दिली व ती यंदा काढली या दोन्ही गोष्टी काही तरी धोरणात बसवल्या पाहिजेत. याचे उलट आपण करीत असलेली मागणी ही काही व्यापक धोरणास अनुसरून पुढे मांडली पाहिजे. आमच्याजवळ पैसा होता म्हणून गतवर्षी मदत केली, यंदा शिल्लक नाही म्हणून मदत करू शकत नाही, असे म्हणणे

म्हणजे व्यापक धोरणाचा सरकारात विचारच होत नाही असे प्रतिपादण्यासारखे होईल. पैशाची टंचाई आधुनिक सरकारांची नित्याचीच समजली पाहिजे. थोडा पैसा व अनेक गरजा यांत गरजांचा क्रम लावून वाटणी करणे यातच सर्व सरकारी अर्थव्यवहार आला; व हे संगतवार, वर्षोवर्षी सहेतुक करणे हे निश्चित व सुसूत्रबद्ध आर्थिक धोरणाचे लक्षण होय.

## ब्रिटिश सरकारचे धोरण

हा मुद्दा ब्रिटिश अर्थमंत्र्यांनी जे अंदाजपत्रक पार्लमेंटला नुकतेच सादर केले त्याजवरून स्पष्ट होईल. ब्रिटिश अर्थव्यवहारात अन्नखर्चापोटी गिऱ्हाइकांस केलेली मदत ही काही वर्षे विवाद्य बाब होऊन बसली होती. ही मदत देण्याची पद्धती, तिचा खऱ्या गरजूंस होणारा उपयोग या सर्वच गोष्टींवर टीका होत होती. हुजूर सरकार अधिकारारूढ झाल्यावर ही मदत काढून घेतली जाईल असा अंदाज होता. तो मि. बटलर यांच्या अंदाजपत्रकावरून खरा ठरला. परंतु मि. बटलर यांनी मदत काढून घेण्याचे केवळ नकारात्मक धोरण अवलंबिले नाही. ही मदत काढून घेत असतानाच ज्यांना या मदतीची विशेष गरज भासली अशा गरीब व मध्यमवर्गीय मोठ्या कुटुंबांस मदत काढून घेण्याचे परिणाम भोवणार नाहीत अशीही योजना तातडतोब केली. मोठ्या कुटुंबास मिळणारी आर्थिक मदत व इतर प्रकारच्या सवलती वाढविल्यानंतरच अन्नखर्चाबाबतची मदत काढली. यामुळे मि. बटलर यांजवर विशेष टीका न होता उलट बऱ्याच जणांनी त्यांच्या योजकत्वाचे कौतुकच केले. ब्रिटिश आर्थिक धोरणात युद्धकाळापासून देशातील राहणीचे किमान मान टिकविणे हे उद्दिष्ट प्रमुख गणले जाते. मजूर पक्षाप्रमाणेच हुजूर पक्षालाही ते पूर्णपणे मान्य असून त्यास अनुसरूनच आर्थिक धोरण सतत राखले जाईल, हाच मि. बटलर यांच्या अंदाजपत्रकावरून बोध घ्यावयाचा.

## भारत सरकारचे विसंगत धोरण

आपल्या देशात अजून अशा व्यापक धोरणाचा विचार साकल्याने करण्याची शक्यता नाही. परंतु या दिशेने काही पावले गेल्या दहा वर्षांत पुढे पडली आहेत. नियंत्रित धान्यवाटप ही बाब किमान राहणीचे मान टिकविण्याच्या धोरणाचा एक भाग समजता येईल. भारतीय शेतकरी आपल्या धान्य पैदासीकरिता जास्त भाव मागत असता या भाववाढीचा परिणाम बिगर-शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनावर अनिष्ट होईल हे कारण वाढ न देण्यात नेहमी पुढे करण्यात येते. याचाही अर्थ हाच की, धान्याचे किमान प्रमाण काही ठराविक भावात पुरविल्याखेरीज सामान्य जनतेचे आर्थिक जीवन फार खालावेल अशी भीती सरकारला वाटते व ती टाळण्याकरिता अन्नवाटप स्वतःचे हाती मध्यवर्ती सरकार राखते. वर दर्शविल्याप्रमाणे आयात धान्याचे भाव वाढले असता त्याचा सर्व बोजा शहरी गिऱ्हाइकांवर पडू न देणे हेही याच धोरणाचे उपांग आहे. इतर धान्यापेक्षा आयात धान्याचे भाव विशेष वाढले व ते महाग धान्य वाढत्या भावांत विशिष्ट वर्गास घेण्यास लावले म्हणजे त्यांच्यावर जादा बोजा लादणे आहे. हा त्याजवर सरकारी धोरणाच्या अंमलबजावणीकरिता एखादा करच होईल. तो लादल्यास त्यातील गरीब वर्गाची परिस्थिती फार खालावेल अशा प्रकारचा विचार होऊनच गेल्या वर्षी मदत दिली गेली असली पाहिजे. हे गृहीत धरल्यास यंदा ही मदत काढून का घेतली हे कळणे कठीण आहे. आपल्या समाजातील दलित घटकांस आर्थिक सुरक्षितता वाटेल, स्वास्थ्य प्राप्त होईल याबाबत कोणत्याच योजना सरकारला हाती घेता येत नाहीत. जीवनावश्यक वस्तूंचे नियंत्रित वाटप ही एकच राहणीच्या मानाबाबतची गोष्ट सरकारने युद्धकालापासून हाती घेतली आहे. यांतील बऱ्याच वस्तूंचे वाटप म्हणा किंवा भावनियंत्रण म्हणा सरकारला निश्चित धोरणानुसार करता आलेले नाही.

त्यातल्या त्यात धान्य वाटपाचे धोरण बरेच टिकाव धरून आहे. धान्याचे अंतर्गत खरेदीचे भावही सरकारने इतर भावांचे मानाने बरेच काबूत ठेवले आहेत. असे असता ज्या एका बाबीत आयात धान्याच्या किमतींबाबत भावनियंत्रण आपणास करता येत नाही तेथे चढीच्या भावात सूट देण्याचे न्याय्य धोरण सरकारने एकदम सोडले ही गोष्ट समग्र धोरणास विसंगत झाली; व यामुळे सर्वांच्या राहणीचे किमान मान टिकविणे या उद्दिष्टाचे महत्त्व व त्याची व्याप्ती सरकारास नीटशी पटली आहे किंवा नाही याचीच शंका येऊ लागते.

सरकारी धोरणाचे काही अविवेकी पुरस्कर्ते भाववाढीच्या समर्थनार्थ हल्ली इतर काही पदार्थांच्या किमती उतरल्या त्यांजकडे बोट दाखवितात; व ही चढ व हा उतार परस्परविरोधी असल्यामुळे ऐन वाढ काहीच झाली नाही व तक्रार करण्यास काही जागा नाही असा दावा करितात. मध्यवर्ती सरकारने मदत काढून घेण्याचा निर्णय बऱ्याच महिन्यांपूर्वी घेतला. त्या वेळी मंदी केव्हा येईल व त्यामुळे किती भाव उतरतील याची कोणासही कल्पना नव्हती. तेव्हा ही सर्व मंदी सरकारी नियोजितच होती असे जे म्हणत नाहीत त्यांस भावांतील चढ व उतार एकाचवेळी येणे यात काकतालीय न्यायापलीकडे काही नाही असे कबूल करावे लागेल.

## गरीब व मध्यम वर्गांची हलाखी

याशिवाय दोन मुद्द्यांचा विचार या प्रकरणी प्रस्तुत आहे. एकतर हल्ली किमती उतरल्यामुळे जो काही फायदा गिऱ्हाइकांस झाला तो सर्व देशांतील गिऱ्हाइकांचा. केवळ मुंबई राज्यातील चार शहरांतील गिऱ्हाइकांचा नाही. तेव्हा सरकारी धान्यवाटपाच्या योजनेमुळे आमच्यावर जादा बोजा लादला जात आहे, यामुळे आमची आर्थिक परिस्थिती इतरांपेक्षाही सरकार असह्य करीत आहे, ही तुलनात्मक तक्रार इतर किमती कितीही कमी झाल्या तरी शिल्लकच राहते. याहूनही व्यापक प्रश्न एक विचारावयास हवा. अलीकडच्या वाढत्या विकट परिस्थितीत एखादे वेळेस गिऱ्हाइकावरील बोजे थोडे हलके होण्याचा संभव उत्पन्न झाला तर ते पूर्ववत कायम जड कसे राहतील हे पाहण्याचा सरकारने विडा उचलला आहे काय? खरे पाहिले तर गेल्या काही आठवड्यांत ज्या किमती थोड्याबहुत उतरल्या आहेत त्यांचा ऐन फायदा काय झाला किंवा होणार हे अजमावण्याची अजून वेळ आली नाही. किमती उतरल्या त्या काही विवक्षित गोष्टींच्याच. कापडाचे नियंत्रित भाव अजून कमी केले नाहीत, घरभाडे कोणाचे कमी झाले नाही, दूधही कोठे स्वस्त झाल्याचे ऐकले नाही. साखर उतरली ती मोकळ्या बाजारातील; म्हणजे ज्यांची नियंत्रित भावांत मिळणाऱ्या साखरेच्या मर्यादेपलीकडे साखर घेण्याची ऐपत, फक्त त्यांचेकरिता. सार्वजनिक खपाच्या गूळ, तेल वगैरे काहींच्या किमती तेवढ्या विशेष उतरल्या. पण एकंदर खर्चाचा विचार करिता या घटीमुळे कितीसा फरक सर्वांना जाणवणार? भाववाढीमुळे सामान्य कुटुंबाला किमान पेक्षा रु. आठ एवढ्या मासिक खर्चाच्या भासणाऱ्या चढीच्या मानाने ही घट महत्त्वाची वाटण्यासारखी नाही. येथेच दुसरा प्रश्न असा की, सरकारी प्रवक्ते किमतीच्या चढ–उताराचा हिशेब कोणता काल प्रमाण मानून करतात? १९५१ सालच्या कमाल महागाईचे दिवस हे या देशात आता नित्याचे समजून चालावयाचे व त्यात काही थोडी उसंत मिळाली तर सरकारला दुवा द्यावयाचा असा विचार त्यांच्या समर्थनात अभिप्रेत आहे काय? प्राप्तीला किमतींनी भागून जे राहील ते राहणीचे मान असे थोडक्यात सांगावयास हरकत नाही. यातील प्राप्तीचा विचार करता गेल्या तीन-चार वर्षांत गरीब व मध्यम वर्गांच्या कोणत्याच थराची प्राप्ती वाढण्याचे ग्रह नव्हते हे सर्वांनाच माहीत आहे. या वर्गांपैकी फार थोड्या जणांस राहणीच्या मानाच्या सूचकांकाप्रमाणे महागाई भत्त्यात वाढ मिळते. अनेकांस महागाई भत्ताच असा नाही; व ज्यांस आहे त्यांपैकी बहुतेकांचा गेल्या

तीन-चार वर्षांत स्थिरावलेला आहे. परंतु याच कालखंडात किमतीचे मान सारखे वाढत आहे. १९४६ सालापासून वार्षिक सरासरी सूचकांक घेतले तर वर्षोवर्षी थोडीबहुत सारखी चढच होत आहे असे त्यावरून दिसून येईल. प्राप्ती स्थिरावलेली व किमतीचे मान चढीचे, याचा अर्थ राहणीचे मान सारखे उतरत आहे हे स्पष्ट आहे. यात गेल्या वर्षात कमाल झाली. सर्वच किमती सारख्या चढत राहिल्या. बऱ्याबऱ्यानांही संसारात तोंडमिळवणी करणे अशक्य भासू लागले. आज किमती कितीही उतरल्या असल्या तरी त्या १९५० सालच्या सरासरीहून कमी झालेल्या नाहीत. म्हणजे किमती उतरल्यामुळे परिस्थिती सुधारली ती फार तर १९५१ मध्ये जेवढी जादा बिघडली होती तेवढ्यापुरती. नवीन भाववाढीमुळे या चार शहरांत आता गरिबांची परिस्थिती १९५१ पेक्षाही बिकट झाली आहे. तेव्हा १९५१ ची अगर १९५० ची स्थिती समाधानकारक होती, तीत गरिबांवर व मोठ्या कुटुंबांवर विशेषत्वे पडणारा हा भारी कर लादण्यास सरकारास काहीच वाटत नाही असेच म्हणणे आल्यास मग मात्र बोलणे खुटले.

शिवाय तात्पुरत्या कमी झालेल्या किमती अशाच कमी राहतील, पुन्हा वाढणार नाहीत असे तरी कोणी सांगतो काय? आजचे सरकारी धोरण या किमती आणखी कमी न होऊ देण्याकडे व परिणामी व्यापाऱ्यांस त्या वाढविण्याची संधी प्राप्त करून देण्याकडे आहे. तेव्हा किमती कमी झाल्यामुळे अमुक फायदा लगेच झाला आहे व तो अमुक काळ टिकेल असा हिशेब करण्याची परिस्थिती अजून आली नाही. धान्य भाववाढ ही निश्चित, अटळ व भयंकर. उलट किमती उतरल्याचा फायदा अल्प व अनिश्चित.

## किंमत घटीची कारणे व परिणाम

किंमत घटीबद्दल सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ही घट कोणत्या परिस्थितीमुळे उत्पन्न झाली व तिचे दूरवरचे परिणाम काय होणार या बाबतचा आहे. सरकारने प्रत्यक्ष नियंत्रण करून अगर अन्य उपायाने किमती हळूहळू उतरवल्यास व एकंदर किमतीचे मान उतरत्या पातळीवर स्थिरावेल, असे असते तर त्या परिस्थितीत भयदायक असे काहीच नव्हते. किंबहुना अशाप्रकारे हळूहळू विशेष चढलेल्या किमती उतरवून त्या काही समपातळीवर स्थिरावण्याचे धोरण सरकारने स्वीकारावे असा सल्ला सरकारला बरेच वर्षे देण्यात येत आहे. आजच्या किमती उतरल्या त्या बहुतेक बाह्य कारणांमुळे. विशेषतः परदेशांतील घडामोडींमुळे. कोरियातील युद्धामुळे व एकंदर शस्त्रास्त्रवाढीमुळे किमती खूप चढल्या. युद्ध थंडावले, शस्त्रास्त्रवाढीकरिता लागणारी मालाची खरेदी मंदावली म्हणून मागणी पडली व किमती उतरू लागल्या असा हा स्थूलमानाने इतिहास आहे. विशिष्ट किमती सट्टेबाजीमुळे फार वर गेल्या, त्या तात्पुरत्या फार उतरल्या हा त्यातील गौण भाग झाला. मूळ परिस्थिती ही अशी तेजीमंदीच्या चक्रातून जात आहे. आज किमती उतरल्या त्या मुख्यतः मंदीचा फेरा आला म्हणून उतरल्या. त्या उतरलेल्या अशाच राहिल्या तर मंदीही बराच काळ टिकून राहणार असाच संभव फार. तेव्हा आजच्या उतरलेल्या किमतीकडे लक्ष वेधल्याबरोबर या किमती ज्या मंदीच्या परिस्थितीच्या द्योतक अगर सूचक आहेत तिचाही विचार करणे प्राप्त आहे.

## भाववाढीचे धोरण युक्त आहे काय?

भाववाढीचे धोरण हे संभाव्य मंदीच्या दिवसांत युक्त आहे किंवा नाही या प्रश्नाला असंदिग्धपणे उत्तर देण्यास हरकत नाही. कारण मंदीच्या काळात सरकारी धोरण कसे असावे याबाबत तज्ज्ञांचे व सरकारी धोरणाचे सर्व जगभर एकमत आहे असे निश्चित म्हणता येते. १९३० सालानंतर सरकारांस व

अर्थशास्त्रज्ञांस विशेष भीती जर कशाची वाटत असेल तर ती मंदीची व मंदीजन्य बेकारीची. बेकारीचे प्रमाणावर सरकारने सारखे लक्ष ठेवावे व ते वाढू लागल्याबरोबर योग्य उपाययोजना करावी अशी राष्ट्रसंघाची आग्रहाची शिफारस असून ती सर्व सरकारांनी मान्य केली आहे. बेकारीविरुद्ध उपाय-योजनेचे मूळ उद्दिष्ट सामान्य जनतेची क्रयशक्ती व एकंदर भोग्य वस्तूंची मागणी कायम राखणे हे होय. याकरिता बेकारी दिसू लागल्याबरोबर समाजस्वास्थ्य व इतर योजनांद्वारा जनतेस मिळणारी आर्थिक मदत सरकारी जमाखर्चात तूट सोसूनही सरकारने वाढवावी अशी सर्वांची शिफारस आहे. आपल्या देशात नागर लोकसंख्येचे प्रमाण मोठे नसून नागर बेकारीचा परिणाम औद्योगिक देशां-इतका जरी तावडतोब दिसून येत नसला तरी या विशिष्ट लोकसमूहाबद्दल स्वीकारण्याच्या इष्ट आर्थिक धोरणात यामुळे फरक पडत नाही. मागासलेल्या देशांत शेती उत्पादनाच्या किमती स्थिरावण्याचे महत्त्व विशेष आहे. तेजी–मंदीमुळे शेतकऱ्याच्या प्राप्तीत उत्पन्न होणारे मोठे फेरबदल टाळणे यावर या किमती स्थिरावण्याच्या धोरणाचा मुख्य कटाक्ष आहे. याही बाबत आपल्या सरकारने विशेष काही केलेले नाही. इतर देशांतल्याप्रमाणे प्रमुख निर्यात माल सरकार किंवा सरकारी बोर्डातर्फे परदेशी पाठवून त्यांच्या किमतीतील फाजिल चढीचा फायदा हाती राखून मंदीतील काळात त्याचा विशेष विनियोग करणे असे हे धोरण आपले असावयास पाहिजे. परंतु आपले सरकार हे सरकारी कारभाराच्या कार्यक्षमतेबद्दल साशंक व खाजगी व्यवहाराच्या हिताबद्दल विशेष काळजी वाहणारे म्हणून त्यांनी असे काही न करिता मधूनमधून निर्यात-जकात लादण्यापलीकडे काही केले नाही. निर्यात-जकाती लादून कार्यभाग नीटसा होत नाही, त्यांच्या परिमाणाचे नियंत्रण अवघड आहे; व त्यांच्या संभाव्य फरकामुळे सट्टेबाजीस विशेष उत्तेजन मिळते. याशिवाय निर्यात-जकातीचे उत्पन्न सरकारी व्यापारी बोर्डाच्या फायद्यासारखे गंगाजळीत न जाता वार्षिक आवक म्हणून खर्च होऊन जाते; व याप्रमाणेच गतवर्षीचा: हिंदुस्थान सरकारचा कारभार झाला. सबंध कोरियन महायुद्धाच्या लाटेमुळे वाढलेले जवळजवळ ७५ कोटींचे जकातीचे उत्पन्न साध्या खर्चात विलीन झाले; व आता भाववाढ करून गरिबांवर बोजे टाकल्याशिवाय गत्यंतर नाही असे सरकार म्हणून लागले खरे! पाहिले तर निर्यात-जकाती लादण्याची शक्यता व आयात धान्याचे वाढीचे भाव ही दोन्ही एकाच घटनेच्या पोटी जन्मली. कोरियन युद्धामुळे कच्च्या मालाच्या किमती भरमसाट वाढल्या म्हणून आपल्या कच्च्या मालास आवाच्या सवा भाव येऊ लागले; व आयात धान्यास आपणांस महागाईचे दर द्यावे लागले. तेव्हा एकाचा जादा फायदा दुसऱ्याच्या जादा तोट्याकडे वळवावा हेच योग्य ठरले असते. वर सांगितल्याप्रमाणे पैसा नाही ही सरकारी सबब फोल आहे. अमक्या कामाकरिता तो खर्चावयाचा नाही, त्याकरिता पैसा काढावयास आम्ही तयार नाही, हे खरे सरकारचे म्हणणे आहे. पण सरकारी प्रवक्ते दुसऱ्यास निरुत्तर करण्याकरिता, मग तुम्ही काय केले असते, असे वारंवार विचारतात. असल्या प्रश्नांस खरे उत्तर म्हणजे आम्ही सरकार चालवीत असतो तर अशी परिस्थितीच येऊ दिली नसती, एवढे केव्हाही पुरे; पण सद्यःस्थितीत एक पाऊल पुढे जाऊन असेही म्हणता येईल की तेजीच्या भावामुळे उत्पन्न झालेली परिस्थिती मंदीच्या काळात टिकली तर योग्य धोरण म्हणजे मंदीच्या दुःखावर भाववाढीचा डाग न देता तेजीच्या काळात जादा मिळविलेल्या फायद्याचा संकटनिवारणार्थ उपयोग करावा हाच होय.

## राज्याराज्यांतील विषमता

हिंदुस्थानातील धान्याचा पुरवठा अपुरा पडत असल्यामुळे राज्याराज्यांत धान्य वसूल करणे, धान्याचे भाव नियंत्रित करून त्याचे समवाटप करणे व एकंदर देशातील धान्याची तूट जरूर तितकी आयात

करून भरून काढणे हे कार्य मध्यवर्ती सरकारने आपणाकडे घेतले आहे. या कार्यात यावे तितके यश मध्यवर्ती सरकारला आलेले नाही. स्वयंपूर्ण राज्ये व तुटीची राज्ये अशा प्रकारचे भेद धान्य धोरणाबद्दल जे आज ठळकपणे भासतात ते या अपयशाचे द्योतक आहेत. परिणामी, धान्याचा पुरवठा, धान्याच्या किमती या सर्वांबाबत अत्यंत विषमता राज्याराज्यांत व स्थळास्थळांत अस्तित्वात आली आहे. ही विषमता काढून टाकणे अगर तिची तीव्रता कमी करणे याचे सामर्थ्य किंवा अधिकार मध्यवर्ती सरकार-खेरीज कोणासही नाहीत. मुंबई राज्यातील मोठ्या शहरांस केवळ आयात केलेले धान्य मिळाले व ते महाग झाले हा प्रश्न या शहरांचा अगर मुंबई राज्याचा नसून अखिल भारतीय योजनेचा आहे. या वर्षीपावेतो धान्य किमतींबाबत साहाय्य करून मध्यवर्ती सरकारने ही जबाबदारी अंशतः तरी ओळखली. यंदा साहाय्य करण्याचे नाकारून ही रास्त जबाबदारी हिंदुस्थान सरकार टाळीत आहे. ही जबाबदारी हिंदुस्थान सरकारने टाळल्यामुळे या शहरांत धान्याचे भाव भरमसाठ वाढले आहेत. आयात केलेल्या धान्याबाबतचा जादा खर्च अखिल भारतीय योजनेचा जादा खर्च आहे. याचा सर्व बोजा विवक्षित शहरांतील गिऱ्हाइकांवर लादणे अन्याय्य आहे; आणि हा जादा खर्च धान्याचे भाव वाढवून भागविणे हे तर अत्यंत अयोग्य आहे. कारण धान्याचे भाव वाढविल्यामुळे दर कुटुंबामागे पडणारा बोजा जास्तीत जास्त गरीब व जास्तीत जास्त मोठ्या व गरजू कुटुंबांवर सर्वांत जास्त पडतो. जादा खर्चाचा बोजा विभागण्याचा, धान्यभाववाढीपेक्षा जास्त विषम व अन्याय्य मार्ग कल्पिणेच शक्य नाही. भाववाढ व संभाव्य मंदी ही दोन एकेवेळी आली; यामुळे भाववाढीची अनिष्टता विशेषच उत्कटपणे दिसून आली. मंदी जर आली असेल किंवा येणार असेल तर मोठ्या शहरांतील जनतेची क्रयशक्ती टिकविण्याचा शक्य तितका प्रयत्न करणे सरकारचे आद्य कर्तव्य ठरते. अशा वेळी अंदाजपत्रकात तूट आली तरी ती सरकारने सोसावी, असा तज्ज्ञांचा एकमुखी अभिप्राय आहे; व एकंदर भाववाढीमुळे जर सरकारला जादा उत्पन्न मिळाले तर त्या उत्पन्नातून भाववाढीमुळे पडणारी तूटही सोसता यावी.

एवंच, सरकारने केलेली भाववाढ अन्याय्य, अयोग्य व अनिष्ट आहे. ती अकालीही केली गेली. याकरिता ती शक्य तितक्या त्वरेने रद्द करण्याची मागणी आपण जोराने केली पाहिजे.

*धान्य भाववाढ विरोधी परिषद*, पुणे, अध्यक्षीय भाषण, २७–४–१९५२ (पुणे, १९५२)

☆

# ७ . . महाराष्ट्राचा ग्रामीण विकास

महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या एकमुखी मागणीच्या बुडाशी आपणा सर्वांच्या काही प्राथमिक आशा व आकांक्षा होत्या. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या विशिष्ट प्रश्नांचा साकल्याने विचार करता येईल व आपणांस इष्ट वाटणाऱ्या व रुचणाऱ्या मार्गाने ते सोडविता येतील ही अपेक्षा आपणा सर्वांचीच होती. तेव्हा नवीन राज्य निर्मितीची घोषणा झाल्याबरोबर प्रत्येक क्षेत्रातील कार्यकर्ते पुढील कामाची दिशा व तत्प्रीत्यर्थ नव्या संघटना यांविषयी साहजिकच विचार करू लागले. आधुनिक समाजांच्या व राज्यांच्या सर्वांत महत्त्वाच्या समस्या आर्थिक समस्या आहेत हे आज सर्वमान्य आहे. स्थूलमानाने आर्थिक क्षेत्रात शेती व ग्रामीण जीवन हा एक व उद्योगधंदे, व्यापार व नागर जीवन हा दुसरा असे दोन मुख्य विभाग मानले जातात. या दोन विभागांतील प्रश्न व हितसंबंध काहीसे निराळे; तेव्हा आर्थिक प्रश्नांचा विचार करण्याकरिता, त्यातील पुढील कार्याची दिशा ठरविण्याकरिता, या दोन्ही विभागांनी स्वतंत्र प्रयत्न करणे क्रमप्राप्त ठरते. सुदैवाने व्यापार-उद्योग क्षेत्रात द्वैभाषिक अस्तित्वात आले तेव्हाच एक अखिल महाराष्ट्रीय संघटना निर्माण करण्यात आली होती. मराठी भाषिकांच्या प्रदेशात काम करणाऱ्या प्रमुख व्यापार-उद्योग मंडळांनी एकत्र परिषद भरवून एक महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ स्थापले होते; व ते तीन वर्षे सतत कार्य करीत होते. तेव्हा या मंडळास नवीन राज्यनिर्मिती होताच आपल्या घटनेचा पाया बळकट करून, अखिल महाराष्ट्राची औद्योगिक-व्यापारी परिषद भरविणे सुकर झाले. कृषिविभागात मात्र हालचाली एवढ्या तत्परतेने होऊ शकल्या नाहीत.

तसे पाहिले तर आपल्या देशात, सर्वच गरीब व अविकसित देशांप्रमाणे, शेती व ग्रामजीवन यांस अग्रस्थान आहे. विस्ताराने, संख्येने हाच विभाग महत्त्वाचा वाटतो. परंतु तो विशेष गरीब व मागासलेला म्हणून दुर्बल व असंघटित असाच अजून राहिलेला आहे. नवीन आर्थिक तंत्र अवलंबिणारे, नवीन प्रकारचे संघटना-शास्त्र अवगत असणारे व आधुनिक साधनसामग्रीमुळे प्राप्त होणारे वाढते बल असणारे व्यापारी-कारखानदार यांना जे सहज साधले ते शेती विभागात घडवून आणणे सुलभ नव्हते महाराष्ट्रातील सर्व भागांत शेतीविषयक काम करणारी, शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व अंशतः, नामतः धारण करणारी एकही संघटना आज अस्तित्वात नाही. तसे पाहिले तर स्थानिक अगर प्रादेशिक व्यापारी-कारखानदार मंडळांच्या धर्तीवर ग्रामजीवनविषयक संघटित काम करणारी एखादी प्रादेशिक अगर विभागीय संस्था ही आज महाराष्ट्रात कोठे दिसत नाही. तेव्हा नवीन राज्यात सार्वत्रिक विचार-विनिमय व कार्यक्रम-आखणी यांच्या उपक्रमांस सुरुवात कशी होणार, होऊ शकणार हे एक कोडेच होऊन बसले. या उपेक्षित क्षेत्रात संघटनेची विशेष जरुरी आहे; व जर आपण काही करू शकलो नाही तर केवळ बोलघेवडे, अवास्तव मागण्या करणारे असा ठपका आपणांवर कायम राहील ही

भावना मात्र सार्वत्रिक राहिली. उच्चपदस्थ सरकारी अधिकाऱ्यांपासून, सामान्य सहकारी कार्यकर्त्यां-पर्यंत सर्वांनाच काही तरी केले पाहिजे असे कळकळीने वाटत होते. या परिस्थितीत डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन या जुन्या संस्थेच्या कार्यकर्त्यांनी आपण काही हालचाल याबाबत करावी असे ठरविले.

## डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनची कामगिरी

डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन या संस्थेची स्थापना १९१० साली झाली. यंदा तिला ५० वर्षे पुरी होत आहेत. काही प्रमुख सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रोत्साहनाने, विशेषतः डॉ. मॅन यांच्या प्रयत्नांमुळे, ही संस्था अस्तित्वात आली. कृषिविषयक आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करणे, त्याकरिता नियतकालिक चालविणे, अशा प्रकारचे काम संस्थेने प्रथम हाती घेतले. तदनंतरच्या काळात ग्राम पुनरुजीवनाचे काही पद्धतशीर प्रयोग संस्थेने केले. या सर्व कामी सहकारी क्षेत्रातील बिन सरकारी कार्यकर्ते व सेवानिवृत्त सरकारी अधिकारी यांचे विशेष साहाय्य संस्थेस लाभले. सुरुवातीस मुंबई प्रांताचे गव्हर्नर संस्थेचे अध्यक्ष होते; परंतु पुढे संस्था पूर्णपणे बिनसरकारी बनली. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर संस्थेच्या कार्यास एक नवीन वळण लागले. जुने प्रचाराचे, नियतकालिक चालविण्याचे कार्य चालू ठेवून त्याच्या जोडीस विशिष्ट सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाच्या प्रश्नांचा अभ्यास करणे, त्यांबाबत आपले अभिप्राय प्रकट करून जनमत बनविणे, सरकारकडे निवेदने पाठविणे व सर्व प्रकारच्या ग्रामजीवन-विषयक विधायक कार्यक्रमांत सरकारास व सार्वजनिक संस्थांस तज्ज्ञ सल्ला देऊन व इतर प्रकारे मदत करणे, अशा प्रकारचे व्यापक कार्यक्षेत्र संस्थेचे अलीकडे बनले. यामुळे संस्थेच्या कार्यकर्त्यांस नवीन राजकीय मांडणीचा फायदा होऊन सार्वत्रिक प्रयत्नास उठाव देण्याचा काही उपक्रम करावा असे सहज वाटले.

हे जरी स्वाभाविकपणे घडले तरी पुढील कार्याचे सर्वांगीण व व्यापक स्वरूप लक्षात घेता या प्रयत्नात जपून पावले टाकली पाहिजेत हेही त्यांच्या ध्यानात आले. संस्थेच्या कार्यकर्त्यांत कृषिविषयक अनेक प्रश्नांबाबतचे तज्ज्ञ व सहकारी कार्यकर्ते होते. परंतु त्यांचे कार्यक्षेत्र बहुशः पश्चिम महाराष्ट्रापुरतेच मर्यादित होते. तसेच अनेक नावाजलेले शेतकरी संस्थेचे सभासद असले तरी तिच्या नेहमीच्या कार्यात त्यांचा भाग प्रामुख्याने नव्हता. इतर क्षेत्रांतील सार्वजनिक कार्यकर्त्यांचाही संस्थेत फारसा समावेश नव्हता. अशा परिस्थितीत संस्थेने स्वतःच मोठ्या प्रमाणावर उपक्रम करण्याऐवजी एखादी बहुरूपी, व्यापक समिती अस्तित्वात आणून तिच्या मार्फत पुढील कार्य करावे असा बेत आम्ही केला. याबाबत अनेकांशी विचारविनिमय केला, काही सभा घेतल्या. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी निरनिराळ्या भागांत दौरा काढून आपल्या कल्पना सांगितल्या व स्थानिक परिस्थिती अभ्यासली. या सर्व खटपटींतून एवढे सिद्ध झाले की, काहीतरी व्हावे अशी सार्वत्रिक भावना आहे; व प्रत्येकाचे सहकार्य यात मिळेल. परंतु नवीन उपक्रमाकरिता तात्कालिक नवीन समिती अगर तत्सम संघटना निर्माण करण्याच्या ऐवजी डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशननेच हे काम ताबडतोबीने हाती घ्यावे हेच सर्वानुमते सोईचे आहे, हा निर्णय निश्चित झाल्याबरोबर असोसिएशनने अखिल महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्त्यांची एक सभा मुंबईस, महाराष्ट्र व्यापारी औद्योगिक परिषदेच्या वेळेसच बोलाविली; व तेथे हजर असलेल्यांच्या संमतीने विभागवार चिटणिसांची नियुक्ती करून पुढील कार्यास त्वरेने सुरवात केली.

सर्वांच्या सहकार्याने, अनेकांच्या कार्यतत्परतेमुळे आज ही पहिली अखिल महाराष्ट्र कृषि परिषद भरत आहे. येथवर केलेले निवेदन हे या उपक्रमाची पार्श्वभूमिका व त्यातील डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनचा भाग याबद्दल सर्वांस माहिती व्हावी एवढ्यापुरतेच होते. यापुढील कार्य परिषदेच्या

व परिषदेतून जी संघटना निर्माण होईल तिच्या हाती राहील. यात डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन करिता जो भाग नियोजित असेल तो ती संस्था आपल्या कुवतीप्रमाणे करण्यास सदैव झटेल, असे मी आपणांस संस्थेतर्फे आश्वासन देतो. भाषण येथेच आटोपते घेण्यास हरकत नव्हती. परंतु गेल्या काही महिन्यांच्या विचारविनिमयात पुढील भागाविषयी ज्या कल्पना सुस्पष्ट होऊ लागल्या त्यांबाबत दोन शब्द बोलण्याचा मोह मला आवरत नाही.

## परिषदेपुढील कार्याची रूपरेखा

या परिषदेपुढील कार्याची रूपरेखा व त्याती यांविषयींच्या स्वतःच्या कल्पना निमंत्रित कार्यकर्त्यांपुढे मांडाव्या या हेतूने मी काही महिन्यांपूर्वी एक पत्रक काढले होते. त्यातील काही भाग उद्धृत करून पुढील विवेचनास सुरुवात करतो.

"मध्यवर्ती सरकारने अगर नियोजन मंडळाने काही कायम ठशाचे कार्यक्रम निरनिराळ्या क्षेत्रांत ठरवावयाचे व त्यांच्याबरहुकूम देशभर जिल्ह्याजिल्ह्यांत अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करावयाचा, असे बहुतांशी आजच्या भारतीय आर्थिक नियोजनाचे स्वरूप आहे. यामुळे शेती व एकंदर ग्रामीण अर्थव्यवस्था यांची प्रगती हवी तशी, इष्ट दिशेने आणि खर्च व मेहनत यांच्या प्रमाणात होऊ शकत नाही, हे आज सर्वमान्य झाले आहे; व वरून कार्यक्रम लादण्याऐवजी स्थानिक स्थिती व गरजेनुसार ते घडवले गेले पाहिजेत अशा घोषणाही नियोजन मंडळ व भारतीय सरकार यांनी केल्या आहेत; परंतु खऱ्या अर्थी अजून प्रत्येक राज्याच्या विशिष्ट नियोजनास सुरुवातही झालेली नाही. त्यामुळे याहून लहान प्रदेश अगर विभाग दुर्लक्षिले गेल्यास नवल नाही. नवे महाराष्ट्र राज्य हे फार मोठ्या प्रमाणावर कृषिउत्पादनावर अवलंबून आहे; व हे उत्पादन वाढविणे, त्याचा पाया जास्त व्यापक व विस्तृत करणे व ग्रामीण अर्थव्यवस्था सर्व बाजूंनी विकसित करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हे काम एका दृष्टीने सरकारचे आहे, परंतु हे खरोखर सर्वव्यापी व सर्वदर्शी व्हावयाचे असल्यास व राज्याच्या कानाकोपऱ्यांत विकास योजनांचा प्रभाव दिसावयाचा असल्यास त्यांत लोकांनी पूर्णपणे सहभागी झाले पाहिजे. एवढेच नव्हे तर अनेक बाबींत लोकनेत्यांनी पुढाकार घेतला पाहिजे व मार्गदर्शन केले पाहिजे. असे झाले तरच स्थानिक परिस्थिती, लोकांच्या गरजा व आकांक्षा या योजनेत योग्य रीतीने प्रतिबिंबित होतील. पण हे घडवून आणणे, तत्प्रीत्यर्थ झटून संघटित प्रयत्न केल्याशिवाय होणार नाही. या कार्याचे मुख्यत्वे दोन टप्पे मानता येतील. पहिला म्हणजे जिल्हानिहाय जेवढी उपलब्ध असेल तेवढी सर्व आवश्यक माहिती गोळा करून प्रादेशिक व विभागीय अर्थव्यवस्थेचे यथार्थ रूप प्रदर्शित करणे; आणि या पायावर आणि भारताच्या नियोजित उद्दिष्टांच्या अनुरोधाने राज्याच्या आर्थिक धोरणांबाबत व प्रदेशांच्या संभाव्य योजनांबाबत निश्चित विचार सरकारपुढे मांडणे. दुसरे उद्दिष्ट म्हणजे ही प्राथमिक तयारी करण्याकरिता व मुख्यतः पुढे सतत योजनाक्षेत्रांत काम करण्याकरिता उत्पादक, सहकारी कार्यकर्ते, तज्ज्ञ इत्यादींची जिल्हानिहाय कायम संघटना निर्माण करणे. पहिला टप्पा परिषदेची तयारी करीत असता व परिषदेत गाठावयाचा आहे. दुसरा मुख्यतः तदनंतरच्या कार्याचा आहे."

वरील विवेचनात निर्देशिलेला पहिला टप्पा आज आपण गाठत आहो. परिषदेची पूर्वतयारी आम्ही मुख्यतः दोन प्रकारे केली आहे. पहिला भाग आकडेसिद्ध माहितीचा. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याची तालुकानिहाय ग्रामीण लोकसंख्या, पिके, पाणीपुरवठा, पशुधन इत्यादीं विषयी आकडेवार माहितीचे

एक प्रकाशन आज छापून तयार आहे. हे या परिषदेच्या निमित्ताने गोखले अर्थशास्त्र संस्थेने तयार केले व छापून घेतलेले आहे. तसेच अनेक जागते शेतकरी व कार्यकर्ते आणि तज्ज्ञ अधिकारी व संशोधक यांना विनंती करून आम्ही परिषदेपुढील विषयांच्या अंगोपांगांवर अनेक माहितीवजा लेख तयार करून घेण्याची योजना केली; व योजनेप्रमाणे अनेक लेख लिहिले गेले. परंतु या साहित्याचा विस्तार बराच झाला; व हे सर्व बाजूंनी सारखे परिपूर्ण झाले नाही. हे परिपूर्ण करून घेणे व छापण्याकरिता योग्य रीतीने त्याचे संपादन करणे या गोष्टीस कालावधी लागणार आहे. तेव्हा परिषदेकरिता जमलेल्या साहित्याच्या साहाय्याने विभागीय टिपणे तयार करणे एवढ्यावरच तात्पुरते भागवावे लागेल. हे सर्व काम अत्यंत घाईने करावे लागले. तेव्हा अनेक जाणत्यांस व तज्ज्ञांस त्रास देऊनही आम्ही शेवटी त्यांच्या लिखाणाचा पूर्ण लाभ परिषदेस करून देऊ शकलो नाही, ह्याची आम्हांस जाणीव आहे. आमच्या काही उणीवांमुळे तयारी मनाजोगती झाली नसावी हे ही खरे आहे. या सर्व बाबतींत आपण उदार अंतःकरणाने जे होऊ शकले ते बरे असे मानून घ्यावे व आम्हांस क्षमा करावी, अशी मी निमंत्रकांतर्फे आपणास विनंती करतो.

## ग्रामीण विकासासाठी संघटनेची निकड

परिषदेचा हा पहिला टप्पा केवळ प्रास्ताविक आहे. परिषदेत आपणांस खरी तयारी करावयाची ती पुढील कार्याची व त्याकरिता लागणाऱ्या संघटनेची. संघटनेच्या स्वरूपाबाबत दोन पर्याय संभवतात. पहिला पर्याय म्हणजे संघटनेचे स्वरूप पूर्णपणे व्यावसायिक असणे, म्हणजे ज्याप्रमाणे व्यापारी–कारखानदार यांची सर्वसाधारण अगर विशिष्ट व्यवहाराबाबत मंडळे किंवा संघ असतात त्याप्रमाणे शेतकऱ्यांची संघटना करणे. दुसरा पर्याय म्हणजे संघटनेचे स्वरूप केवळ व्यावसायिक न ठेवता व्यावसायिक उत्पादकांबरोबरच इतर संबंधितांचा या संघटनेत समावेश करणे. शेतकऱ्यांच्या केवळ व्यावसायिक संघटनेच्या मार्गात संभाव्य अडचणी कोणत्या व अशा संघटनेची उपयुक्तता काय या प्रश्नांचा मी येथे विचार करीत नाही. कारण माझ्या मते समर्थ व्यावसायिक संघटना होऊ शकली तरी दुसऱ्या प्रकारच्या व्यापक संघटनेची जरुरी कायमच राहील. याचे कारण थोडक्यात सांगावयाचे म्हणजे आपल्यासारख्या कृषिप्रधान गरीब देशातील शेतकरी समाजाचे सामर्थ्य हे काही झाले तरी तोटकेच पडणार; व सर्व प्रकारे बाहेरची मदत घेतल्याखेरीज या समाजास हल्लीची कोंडी फोडता येणार नाही. उदाहरणार्थ, सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारांकरिता सहकारी संघटनेचा शेतकऱ्यांस आश्रय घ्यावा लागणार; आणि या संघटनेच्या उभारणीकरिता शासनसंस्थेची आर्थिक व इतर मदत हरकामी लागणार. परंतु सरकारी संघटना राबवावयाची म्हटल्यास पूर्णपणे व्यावसायिक दृष्टिकोण ठेवून चालावयाचे नाही. व्यापक समाजहिताचा अल्प तरी विचार बाळगला पाहिजे. असे न केल्यास समाजाची प्रतिक्रिया प्रतिकूल होते व याचा शेती-समाज-हितविरोधी गैरफायदा घेतात. सर्वच अप्रगत व गरीब समाजांस शास्त्रीय ज्ञान व भांडवल यांच्या पुरवठ्याबाबत इतरांची मदत घ्यावी लागते; आणि कृषि समाज तर तौलनिक दृष्ट्या गरीब देशातही त्यातल्यात्यात गरीब. तेव्हा व्यापक संघटना करणे हेच शेती समाजाच्या हिताचे; आणि शेती व शेतकरी समाजाची प्रगती होणे राष्ट्रदृष्ट्या फार महत्त्वाचे असल्यामुळे ज्यांना शक्य असेल त्या सर्वांनी अशा संघटनेस हातभार लावणे हे त्यांचे कर्तव्य ठरते.

वर सांगितल्याप्रमाणे नियोजित अर्थव्यवस्थेत स्थानिक संघटनांचे महत्त्व फार आहे; व ही संघटना पूर्ण व्यावसायिक न ठेवता योजनांचा सर्वांगीण विचार करू शकेल इतकी व्यापक असावी, हेही उघड आहे. एवंच, भावी संघटनाव्यवस्थेची मुख्य लक्षणे मला दिसतात ती खालीलप्रमाणे :

संघटनेची सुरुवात स्थानिक घटकांपासून होऊन संघरूपाने तिचा विस्तार विभाग, राज्य, देश असा झाला पाहिजे. संघटनेत उत्पादकाचे स्थान मुख्य, महत्त्वाचे व मानाचे हवे; पण त्याबरोबरच इतर संबंधित कार्यकर्ते व तज्ज्ञ यांस योग्य जागा तीत मुद्दाम दिली पाहिजे. संघटनेचे लक्ष व्यावसायिक हिताबरोबरच सबंध स्थानिक समाजाच्या हितावर केंद्रित झाले पाहिजे; व तिचा रोख कोणताही विशिष्ट हितसंबंध टिकविण्यापेक्षा प्रगतिपर सर्वांगीण विकासावर पाहिजे. अशा संघटनेचा पाया क्रमाक्रमाने रचल्याखेरीज आपल्या विकास कार्यक्रमास खऱ्या अर्थाने सुरुवात होऊ शकणार नाही. भावी संघटनेच्या स्वरूपाचा विचार करणे व तिच्या रचनेचा श्रीगणेशा करणे, या गोष्टी आज भरत असलेल्या परिषदेसारख्या प्रातिनिधिक मेळाव्यातच होऊ शकतात. याकरिता आपल्या राज्याच्या व देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने या परिषदेचे महत्त्व फार मोठे आहे, असे मी मानतो.

महाराष्ट्र राज्य शेतकी व ग्रामीण परिषद, औरंगाबाद, १५–१०–१९६० निवेदन (डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन, *महाराष्ट्र राज्य शेतकी व ग्रामीण परिषद: प्रबंध व निवेदन*, पुणे, १९६२) पृ० २२–२७

☆

# ८ . . पुण्यातील घरे आणि गलिच्छ वस्त्या

पुण्यातील घरांच्या टंचाईचा प्रश्न, विशेषतः गलिच्छ वस्त्यांच्या निर्मूलनाचा प्रश्न हा प्रस्तुत लेखाचा विषय आहे. गोखले अर्थशास्त्र संस्थेने १९३६–३७ साली पुण्याची सामाजिक व आर्थिक पाहणी केली; आणि १९५४ साली फेर पाहणी केली. १९५७ साली शहराच्या १७ विभागांतील गृहयोजनेची पाहणी करताना वरील पाहण्यांची पुणे महानगरपालिकेला मदत झाली. या पाहण्यांतून मिळालेली माहिती प्रस्तुत लेखातील चार कोष्टकांतून समाविष्ट केली आहे. पाहणीसाठी निवडलेली कुटुंबे, राहात असलेल्या घरांची खोल्यांच्या संख्येनुसार विभागणी, प्रत्येक प्रकारच्या घरातून राहणाऱ्या माणसांची संख्या आणि त्यांचे दर खोलीस प्रमाण याची आकडेवारी पहिल्या कोष्टकात दिली आहे.

वरील सर्व पाहण्यांत, पाहणीसाठी घेतलेल्या कुटुंबांची निवड संख्याशास्त्रीय पद्धतीने केलेली असल्यामुळे या माहितीनुसार उपलब्ध झालेली प्रमाणे पाहणीखालील समग्र क्षेत्रातील परिस्थितीची निदर्शक आहेत असे मानता येईल. १९५४ च्या पाहणीच्या वेळचे पुणे महानगरपालिकेचे क्षेत्र १९३७ साली पाहणीसाठी घेतलेल्या क्षेत्रापेक्षा मोठे होते; तथापि १९५४ सालची आकडेवारी देताना १९३७ च्या पाहणीसाठी निवडलेल्या विभागापुरती ती फोडून घेतली आहे. आणि त्यामुळे त्या दोनही पाहण्यांच्या आकडेवारीची योग्य तुलना करता येणे शक्य झाले आहे. सन १९५६ च्या पाहणीचे क्षेत्र १९३७ व १९५४ सालच्या पाहणीमध्ये समाविष्ट केलेल्या क्षेत्राहून थोडे लहान होते. ज्या विभागात नगरयोजनेचे काम चालू होते ते विभाग या पाहणीतून वगळण्यात आले होते. त्यामुळे वगळलेल्या भागातील लोकसंख्येच्या दाटीच्या सरासरी प्रमाणापेक्षा १९५६ सालच्या पाहणीत हे प्रमाण थोडे जास्त दर्शविले जाईल. या आकडेवारीतून निष्कर्ष काढताना क्षेत्रातील तफावत दुरुस्त करण्यासाठी आकड्यात केलेला थोडा बदल आणि १९५६ च्या पाहणीतील माहिती न देणाऱ्या कुटुंबांचे मोठे प्रमाण या दोन गोष्टी ध्यानात ठेवणे जरूर आहे.

## राहत्या जागेतील गर्दीदाटी

पहिले कोष्टक पाहिल्यास, एकूण लोकसंख्येचा बहुतांश भाग एक किंवा दोन खोल्यांच्या जागेतून राहत असल्याचे आणि दर खोलीगणिक माणसांचे प्रमाण बरेच मोठे असल्याचे आढळते. सन १९३७ ते १९५४ या काळात एका खोलीच्या जागांची टक्केवारी पाहता काहीशी सुधारणा झाल्यासारखी वाटते. महानगरपालिकेच्या काही विशिष्ट नियमांची अंमलबजावणी झाल्यामुळे तसे झालेले असणे शक्य आहे. परंतु एक आणि दोन खोल्यांच्या जागांचे प्रमाण एकत्र घेतल्यास ही सुधारणा वाटत नाही. एक किंवा दोन खोल्यांत राहणाऱ्या माणसांचे प्रमाण पाहिल्यास १९३७ ते १९५४ या काळात

परिस्थिती निश्चितपणे खालावल्याचेच दिसते. खोलीगणिक माणसांची संख्या (density) पाहता १९३७ पेक्षा १९५४ सालची परिस्थिती खूपच बिघडली आहे आणि १९५४ सालच्या परिस्थितीशी तुलना करता १९५६ मध्ये ती अधिकच बिघडल्याचे दिसून येते. आधी निर्देश केल्याप्रमाणे या पाहणीच्या क्षेत्रात असलेल्या फरकामुळे सर्वसामान्य परिस्थितीत काही बदल असणेही शक्य आहे. त्यामुळे १९५६ मधील परिस्थिती तुलनेने १९५४ सालच्या परिस्थितीपेक्षा निश्चितपणे वाईट झाली आहे असे खात्रीपूर्वक म्हणता येणे शक्य नाही. तथापि १९५६ सालची माहिती पुण्याच्या लोकसंख्येचा सर्वाधिक भाग राहत असलेल्या १७ विभागांबद्दलच आहे. त्यामुळे पुण्यातील आजमितीची राहणीची परिस्थिती खूप दाटीची असल्याचे निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने ही माहिती महत्त्वाची आहे.

## भाड्यातील सतत वाढ

दुसरे कोष्टक भाडेकरू जागांसाठी देत असलेल्या भाड्याविषयी आहे. भाडेनियंत्रण कायद्याचा अंमल असल्यामुळे, पाहणीच्या वेळी किती वर्षे भाडेकरू त्या जागेत राहत होता, त्या मुदतीप्रमाणे या माहितीची विभागणी करण्यात आली आहे. भाडेनियंत्रण कायद्यामुळे जुन्या भाडेकरूला संरक्षण मिळते असे मानता येईल. अलीकडे बांधल्या गेलेल्या इमारतींत जागा शोधणाऱ्यांना मात्र त्या तऱ्हेचे संरक्षण मिळालेले नाही. जागेत राहण्याचा काळ जसजसा कमी होत जातो, तसतशी भाड्यात होत गेलेली वाढ पाहता हे सूचित होते. विशेष निदर्शनास आणून देण्यासारखी गोष्ट म्हणजे अलीकडे राहत्या जागांस देण्यात येणाऱ्या भाड्याची मध्यका (median)–प्रमाण–५० चौरस फुटांस फुटामागे, ४ रुपयांपेक्षा अधिक येते. याचा अर्थ असा की या दराप्रमाणे कुटुंबामागे किमान २०० चौरस फुटांस जागेचे भाडे १५ रुपयांपेक्षा जास्त पडेल.

तिसऱ्या कोष्टकात भाड्याच्या जागांतून राहणाऱ्या दर कुटुंबागणिक पाण्याचे नळ व शौचकूप यांच्या उपलब्धतेची परिस्थिती दिली आहे. १९३७ नंतर फक्त पाण्याच्या नळापुरत्या परिस्थितीत काही सुधारणा झाल्याचे त्यावरून दिसून येते. प्रत्यक्ष घरांचा दर्जा किंवा पुरवठा सुधारण्यापेक्षा घरांतील शौचकूपांच्या बाबतीत महानगरपालिकेच्या नियमांची अंमलबजावणी करून अधिक सहजतेने आणि सुलभतेने सुधारणा घडवून आणणे शक्य असूनही तशी सुधारणा झालेली नाही. प्रस्तुत लेखाच्या संदर्भात या कोष्टकाने दर्शविलेली अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे घरमालकांनी जेथे शौचकूप उपलब्ध करून दिलेच नाहीत अशा जागांची मोठी संख्या आणि तीन किंवा अधिक कुटुंबांत एकच शौचकूप वापरावा लागणाऱ्या कुटुंबांचे बहुसंख्य प्रमाण हे होय.

चौथ्या कोष्टकात १९५४ आणि १९५६ साली पाहणी केलेल्या कुटुंबांच्या उत्पन्नांची वर्गवारी दिलेली आहे. यांत एकूण वार्षिक उत्पन्न १००० रुपयांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबांचे अत्यधिक प्रमाण दिसून येते. उत्पन्नाची माहिती देताना ते कमी करून सांगण्याची प्रवृत्ती जमेस धरुनही पुण्यासारख्या शहराच्या राहत्या जागांपैकी अधिकांश भाग दरमहा १०० रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांच्या जागांचा आहे असे दिसेल. त्यावरून अलीकडे बांधण्यात आलेल्या घरांतील किमान जागांसाठी आकारण्यात येणारी भाडी, तसेच सरकारमार्फत मुद्दाम स्वतः भाड्याने देण्यात येणाऱ्या जागांची १५ ते २० रुपये इतकी भाडी न परवडणाऱ्या कुटुंबांना जागा मिळवून देणे हाच येथील मुख्य प्रश्न असल्याचे स्पष्ट होईल.

राहत्या जागांसंबंधीच्या या एकूण परिस्थितीच्या वरील पार्श्वभूमीवरच गलिच्छ वस्त्यांच्या प्रश्नाचाही विचार होणे आवश्यक आहे. घरांच्या पाहणीत उपयोजिल्या जाणाऱ्या व मान्य झालेल्या

प्रमाणांचा उपयोग करून वरील निष्कर्ष संक्षेपाने मांडले आहेत. पण गलिच्छ वस्त्यांतील जागांची किंवा पाणी, शौचकूप इत्यादी सार्वजनिक सोयींची परिस्थिती अशी असते की ही प्रमाणे लावून अशा वस्त्यांतील परिस्थितीचे वर्णन यथार्थ होणार नाही. जेमतेम सोसवेल अशी परिस्थिती जिला म्हणता येईल तिच्यापेक्षाही या वस्त्यांतील स्थिती फार खालच्या दर्जाला पोचलेली असते. घरांचे क्षेत्रफळ, घरांची उंची, आसऱ्यासाठी वापरलेल्या सामानाचा दर्जा आणि त्या जागेभोवतालचा परिसर या सर्वच बाबतींत हे म्हणावे लागेल. त्यामुळे वर दिलेल्या प्रमाणात किंवा मोजमापात त्यावर भाष्य करणे कठीण आहे. तथापि, याबाबतीतही सामान्यपणे उपलब्ध असलेल्या माहितीपेक्षा अधिक आकडेवारी सुदैवाने उपलब्ध आहे.

## जागेची टंचाई

१९३७ साली गोखले अर्थशास्त्र संस्थेने जेव्हा पुण्याची सामाजिक व आर्थिक पाहणी केली त्या वेळी गलिच्छ वाटणाऱ्या सर्व वस्त्यांची प्रत्यक्ष मोजणी केली आणि अशा वस्त्यांतून निवडलेल्या कुटुंबांची तपशीलवार पाहणीही केली. या माहितीवरून खात्रीने म्हणता येते की १९३७ साली गलिच्छ म्हणता येतील अशा वस्त्यांतून राहणाऱ्या कुटुंबांची संख्या १००० पेक्षा कमी म्हणजे जवळजवळ ८०० पर्यंत होती. सन १९५१ मध्ये महानगरपालिकेने या वस्त्यांची पाहणी केली होती ह्या पाहणीवरून अशा वस्त्यांत ६,३०४ कुटुंबे राहत असल्याचे निदर्शनास आले होते. एका खासगी संस्थेने पुण्यातील वस्त्यांच्या अलीकडे केलेल्या पाहणीत सध्या सुमारे ९००० कुटुंबे अशा वस्त्यांतून राहताना आढळल्याचे नमूद केले आहे. पाहणी करणाऱ्या या तिन्ही संस्था भिन्नभिन्न असल्याने आणि पाहणी करताना काटेकोर व्याख्या न केल्या गेल्याने, या तिन्ही अंदाजांची तुलना करता येईलच असे नाही. परंतु स्थूल मानाने त्यातून परिस्थितीचे सत्यदर्शन होते असे वाटते. गोखले अर्थशास्त्र संस्थेने १९३७ आणि १९५४ साली केलेल्या पाहण्यांच्या दरम्यान पुण्यातील कुटुंबांची संख्या साठ ते पासष्ट हजारावरून एक लाख ते एक लाख पाच हजारापर्यंत वाढल्याचे, म्हणजे त्यात चाळीस हजारांची निव्वळ वाढ झाल्याचे दिसते. या वाढीमुळे गलिच्छ वस्त्यांतून राहणाऱ्यांच्या संख्येत ५००० कुटुंबांची भर पडली असणे अनपेक्षित म्हणता यावयाचे नाही.

वर दिलेल्या घटनांच्या आधाराने पुढील निष्कर्ष काढता येणे शक्य आहे. पहिली गोष्ट अशी की, पुणे शहर आणि बहुधा भारतातील सर्व मोठी गावे आणि शहरे राहत्या जागेच्या टंचाईने ग्रासली गेली आहेत. आणि दुसरी गोष्ट अशी की शहरी कुटुंबांपैकी बहुतांश कुटुंबे अतिशय दाटीवाटीच्या जागांतून आणि अतिशय अपुऱ्या सोयींनिशी जीवन कंठीत आहेत. ही परिस्थिती सुधारण्याऐवजी वाढत्या प्रमाणात बिघडत आहे.

## कनिष्ठ वर्गाची अडचण

या प्रश्नाचा विचार करताना अधिकाधिक खालावत जाणाऱ्या या परिस्थितीस कारणीभूत होणाऱ्या काही मूलभूत गोष्टींचे आकलन प्रथमदर्शनीच होते. भारतातील शहरी लोकसंख्येच्या वाढीची गती आजमितीस ग्रामीण लोकसंख्येच्या वाढीपेक्षा पुष्कळच अधिक असल्याचे सर्वमान्य झाले आहे. भारतीय लोकसंख्येच्या वाढीची सरासरी वार्षिक गती १५ ते २० टक्के असल्याचा अंदाज करण्यात आला आहे. यावरून शहरी वाढीची सरासरी वार्षिक गती २.५ ते ३.० टक्क्यांच्या दरम्यान गृहीत धरण्यास हरकत नाही. सन १९५१ मध्ये पुण्यात साधारणपणे एक लक्ष कुटुंबे होती असे मानले तर त्यांत २५०० कुटुंबांची वार्षिक भर पडत होती असा अंदाज करणे अप्रस्तुत होणार नाही. सन १९५४

आणि १९५६ च्या आकडेवारीतून आढळणारे चित्र असे दिसते की, लोकसंख्येच्या वाढीमुळे राहत्या जागांची जी मागणी वाढली त्या प्रमाणात खासगी किंवा सरकारीरीत्या घरबांधणीचे कार्य झाले नाही. खासगी घरबांधणीच्या बाबतीतही महत्त्वाची गोष्ट अशी की तिचा अधिकांश भाग मध्यम आणि श्रीमंत वर्गापुरताच मर्यादित झाला आहे. एकीकडे खासगी आणि सहकारी घरबांधणीमुळे मध्यम आणि श्रीमंत वर्गांच्या गरजा साधारणपणे पुरेशा भागत असल्याने गरीब व कनिष्ठ मध्यम वर्गांच्या राहत्या घरांच्या गरजा मात्र अधिकाधिक अपुऱ्या राहात गेल्या असण्याचा फार संभव दिसतो. पुढील कोष्टकांतील अलीकडील भाड्यांच्या मध्यकेची पातळी आणि खोलीगणिक माणसांची वाढती संख्या यांचा एकत्र विचार केल्यास वरील निष्कर्षास दुजोरा मिळतो.

## घरबांधणीच्या दृष्टिकोणात बदल आवश्यक

अशी परिस्थिती असल्यामुळे गलिच्छ वस्त्यांत राहणाऱ्या कुटुंबांची संख्या वाढत जाणे मुळीच आश्चर्यकारक नाही. पुण्याच्या फेरपाहणीत दिसून आल्याप्रमाणे स्थलांतर करून शहरांत येणारी कुटुंबे बहुधा गरीब व बिनकसबी वर्गातील असतात. त्यांतील बहुतांश कुटुंबांना त्यांना उपयोगी पडतील अशा नव्या जागा मिळत नाहीत; आणि ती असलेल्या दाटीवाटीत आणखी भर घालतात. विशेषेकरून ही कुटुंबे अस्पृश्य किंवा तत्सम समाजांतील असल्यास त्यांना गलिच्छ वस्तीत राहण्याखेरीज दुसरा मार्ग उरत नाही.

धोरणाच्या दृष्टीने विचार करता घरबांधणीच्या आणि शहर सुधारण्याच्या चालू योजना अत्यंत अपुऱ्या आहेत असा निष्कर्ष निघतो. परिस्थिती वाढत्या प्रमाणावर एकसारखी बिघडत आहे; आणि बिघाड थोपवून धरण्यास या योजना असमर्थ आहेत. आहे या परिस्थितीत योग्य मुदतीत सुधारणा घडवून आणावयाची असेल तर चालू योजनांची संपूर्ण पुनर्रचना करावी लागेल; एवढेच नव्हे तर गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन आणि गरिबांसाठी घरांची व्यवस्था या प्रश्नाविषयीच्या एकूण दृष्टिकोणातच बदल करावा लागेल.

आपल्याला प्रथमच कबूल करावे लागेल की, सार्वजनिक संस्थांनी ही जबाबदारी पत्करल्यासच या प्रश्नांची उकल होऊ शकेल. खासगी प्रयत्न आणि गलिच्छ वस्तीत राहणाऱ्यांच्या आणि गरिबांच्या बाबतीत सहकारी प्रयत्नही परिणामकारक ठरण्याचा संभव नाही. दुसरी गोष्ट अशी की, हा प्रश्न अतिशय तातडीने हाती घेतला गेला पाहिजे. तिसरी गोष्ट, या वर्गाला नजिकच्या भविष्यकाळात द्यावयाच्या घरांची योजना तातडीची आणि स्वास्थ्य, टिकाऊपणा आणि सोयी यांची किमान परिपूर्ती करणारी असली पाहिजे. योग्य विचार आणि अंमलबजावणी झाल्यास ह्या किमान गोष्टीदेखील गलिच्छ वस्तीत राहणाऱ्यांच्या आजच्या परिस्थितीत फार मोठ्या सुधारणा ठरतील. निर्वासितांच्या पुनर्वसनाच्या आपत्कालीन प्रश्नासारखा किंवा नव्याने स्थापिल्या जाणाऱ्या औद्योगिक वस्त्यांच्या प्रश्नासारखा हा प्रश्न आहे, असे मुख्यतः मानून त्याबाबतचा दृष्टिकोण ठरविला गेला पाहिजे.

चालू योजना अपुऱ्या असण्याचे मुख्य कारण म्हणजे, त्या फारच महाग आहेत; आणि त्या ठरविल्या जाताना, बहुतांश शहरवासियांनाही घरांच्या टिकाऊपणाचे, बांधणीच्या दर्जाचे आणि सोयींच्या मुबलकपणाचे जे आदर्श दुर्मिळ आहेत असे वर दाखविले गेले आहे ते आदर्श समोर ठेवले गेल्यामुळेच त्या योजना अत्यंत महाग झाल्या आहेत. या गलिच्छ वस्त्यांचे आपल्या शहरांतून प्रथम निर्मूलन करणे, आणि त्याबरोबरच स्वच्छ, किमान क्षेत्रफळाची आणि समाईक वापर करता येईल अशा सोयी असलेली व जिथल्या सार्वजनिक सोयींकडे अधिकाऱ्यांचे पुरेसे लक्ष जात आहे अशी घरे गलिच्छ वस्तीत राहणाऱ्यांना तावडतोब देणे ही आज तातडीची गरज

आहे. कुटुंबागणिक १००० रुपयांपेक्षा कमी खर्चाच्या योजनेचा आराखडा तयार झाल्यानंतरच, गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन आणि घरांचा पुरवठा यांविषयी वास्तव परिस्थितीस धरून विचार करता येईल; आणि तो प्रश्नही फारसा विलंब न लागता समाधानकारकपणे सोडवता येण्याजोगा आहे.

**कोष्टक क्र. १**

**१९३७, १९५४ आणि १९५६ साली राहत्या जागांतील खोल्यांची आणि माणसांची संख्या**

| | राहत्या जागा संख्या | राहत्या जागा शेकडा प्रमाण | राहणारी माणसे संख्या | राहणारी माणसे शेकडा प्रमाण | खोलीगणिक माणसांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १९३७ | | | | | |
| एक खोली | २,५५५ | ५६ | ८२३२ | ४६ | ३·२२ |
| दोन खोल्या | १,१३ | २५ | ४८१५ | २७ | २·१२ |
| तीन खोल्या | ४०५ | ९ | २१०७ | १२ | १·७३ |
| चार खोल्या | १८५ | ४ | १०७८ | ६ | १·४६ |
| पाच किंवा अधिक खोल्या | २४९ | ६ | १६६३ | ९ | १·३४ |
| १९५४ | | | | | |
| एक खोली | २२८१ | ५२·५ | ८४५१ | ४२·९ | ३·७४ |
| दोन खोल्या | ११९१ | २७·४ | ६०७२ | ३०·८ | २·५९ |
| तीन खोल्या | ४४३ | १०·२ | २५९९ | १३·२ | १·९५ |
| चार खोल्या | २०० | ४·६ | १२५९ | ६·३ | १·५७ |
| पाच किंवा अधिक खोल्या | २३२ | ५·३ | १३४९ | ६·८ | १·१६ |
| १९५६ | | | | | |
| एक खोली | १०९३ | ३७·३ | ४३३० | ४९·६ | ३·९६ |
| दोन खोल्या | ४८५ | १६·६ | २४१९ | २७·७ | २·४९ |
| तीन खोल्या | १६१ | ५·५ | ९६४ | ११·० | २·०० |
| चार खोल्या | ७५ | २·६ | ५१३ | ५·९ | १·७१ |
| पाच किंवा अधिक खोल्या | ६४ | २·२ | ४९८ | ५·८ | १·३१ |
| माहिती मिळाली नाही | १०५० | ३५·८ | | | |

**कोष्टक क्र. २**

**वास्तव्याच्या मुदतीनुसार निवडलेल्या कुटुंबांनी, दर ५० चौरस फूट जागेसाठी दिलेल्या भाड्यांची मध्यका**

| | वास्तव्याचे प्रारंभ वर्ष १९५६ | १९५३ | १९५२ | १९५१ | १९४५–५० | १९३९–४४ | १९३८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| १९५४ ची पाहणी | — | ४·३९ | ४·३७ | ४·१९ | ४·०० | २·१९ | २·०० |
| १९५६ ची पाहणी | ४·४० | ४·२२ | ३·५४ | ३·५३ | २·८१ | १·९७ | १·७४ |

## कोष्टक क्र. ३

पाहणी केलेल्या कुटुंबांची पाण्याचे नळ आणि शौचकूप यांच्या उपलब्धतेनुसार विभागणी

| | १९३७ | १९५४ | १९५६ |
|---|---|---|---|
| | शेकडा प्रमाण | | |
| १. नळ नसलेल्या कुटुंबांचे प्रमाण | १८ | ९ | १० |
| २. एक किंवा अधिक नळ असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | १६ | ३४ | ४७ |
| ३. दुसऱ्या कुटुंबाबरोबर एकच नळ वापरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | १७ | ६ | ८ |
| ४. दुसऱ्या दोन कुटुंबांबरोबर एकच नळ वापरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | २१ | ६ | ७ |
| ५. दुसऱ्या तीन किंवा अधिक कुटुंबांबरोबर एकच नळ वापरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | २८ | ४५ | २८ |
| | १०० | १०० | १०० |
| १. शौचकूप नसलेल्या कुटुंबांचे प्रमाण | १८ | १० | ११ |
| २. एक किंवा अधिक शौचकूप असणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | ७ | ११ | ८ |
| ३. दुसऱ्या कुटुंबांबरोबर एकच शौचकूप वापरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | ११ | ६ | ७ |
| ४. दुसऱ्या दोन कुटुंबांबरोबर एकच शौचकूप वापरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | १२ | ९ | ६ |
| ५. दुसऱ्या तीन किंवा अधिक कुटुंबांबरोबर एकच शौचकूप वापरणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण | ५२ | ६४ | ६८ |
| | १०० | १०० | १०० |

## कोष्टक क्र. ४

निवडलेल्या कुटुंबांचे कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाप्रमाणे केलेले वर्गीकरण

| कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये | पुणे शहर आणि उपनगरे १९५४ ची पाहणी | | १९५६ ची पाहणी | |
|---|---|---|---|---|
| | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण | कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
| २५० पर्यन्त | २०६ | ४·७ | ५८ | १·७ |
| २५१ ते ५०० | ४४१ | १०·१ | ३१२ | ९·३ |
| ५०१ ते १,००० | १,३३२ | ३०·६ | १,१६८ | ३४·९ |
| १००१ ते २,००० | १,३४९ | ३१·० | ८२५ | २४·७ |
| २००१ ते ३,५०० | ५८८ | १३·५ | २५० | ७·५ |
| ३५०१ ते ५,००० | २२१ | ५·१ | १३७ | ४·१ |
| ५००० ते ७,५०० | ९० | २·१ | २७ | ०·८ |
| ७५०१ ते १०,००० | २९ | ०·७ | ७ | ०·२ |
| १०,००१ आणि अधिक | ३४ | ०·८ | ७ | ०·२ |
| फक्त मालाच्या रूपात उत्पन्न असणारी | ३ | ०·१ | — | — |
| उत्पन्न दिले नाही | ५४ | १·३ | ५५० | १६·६ |
| | ४,३४७ | १००·० | ३,३४१ | १००·० |

*केसरी*, २२-९-१९६१ (पुण्याच्या महापौरांना १९५९ मध्ये सादर केलेल्या टिपणाचा अनुवाद)

☆

# १ . . पुण्यातील पानशेत प्रलय व पुनर्वसनाच्या समस्या

पुणे पुनर्वसन परिषदेस आमच्या संस्थेतर्फे केलेल्या आमंत्रणास मान देऊन आपण सर्व येथे आला याबद्दल मी आपले मनःपूर्वक आभार मानून स्वागत करतो. या परिषदेचे नाव आम्ही पुणे पुनर्वसन परिषद असे व्यापक ठेवले, ते सहेतुक ठेवले आहे. आज व उद्या ज्या प्रश्नांचा विचार आपण करणार आहो त्या सर्वांचा १२ जुलै रोजीच्या जलप्रलयाशी निकट संबंध आहे. प्रलयपीडित कुटुंबे व धंदेवाले यांचा विचार आपणांपुढे प्रामुख्याने येणार आहे. परंतु या प्रलयातून उद्‌भूत झालेले प्रश्न व त्यांनी आपले लक्ष ज्यांकडे वेधले आहे त्या बिकट समस्या या तात्कालिक किंवा मर्यादित स्वरूपाच्या नसून, बहुतांशी पूर्वापारच्या व दीर्घकाल पावेतो टिकणाऱ्या अशा आहेत. म्हणून प्रलयपीडितांच्या प्रश्नांबाबत तात्कालिक उपयोजनांकडे विशेष लक्ष देतेवेळीच या मूलभूत समस्यांच्या सोडवणुकीविषयीही आपण विचार करण्यास सामूहिक रीतीने सुरुवात करावी अशी आमची इच्छा आहे.

आपले स्वागत करताना मला विशेष आनंद होत आहे तो दोन कारणांमुळे. प्रथम, आमच्या संस्थेस अशा सामूहिक प्रयत्नाचा उपक्रम करण्याचा मान आपण दिला यामुळे. विद्याभ्यास, संशोधन व व्यवहार यांची फारकत मानण्याची प्रथा फार जुनी आहे. पंडित ही संज्ञा व्यंग्यार्थानेच अनेक वेळ वापरली जाते. परंतु आधुनिक काळात विद्यावृद्धी व संशोधन यांवरच पुढील सर्वांगीण प्रगतीची मदार आहे, हे स्पष्टपणे प्रतीत होऊ लागले आहे. रूसी समाजाने केलेली शास्त्रीय प्रगती उत्कट रीतीने भासू लागल्याबरोबर अमेरिकी पुढाऱ्यांस रूसी शिक्षण व संशोधन व्यवस्थांकडे लक्ष देणे आवश्यक वाटू लागले, हे याचेच द्योतक आहे. तेव्हा आपल्या सर्वांच्या साहाय्याने ज्ञान व व्यवहार यांची, मर्यादित स्वरूपात का होईना, प्रत्यक्ष सांगड घालण्याचा योग आज आम्हांस लाभत आहे याबद्दल आनंद होतो.

आज येथे जमलेल्या समाजाचे बहुविध स्वरूप पाहून हा आनंद द्विगुणित होत आहे. सर्व थरांतील, अनेक व्यवसायांची, अनेक पक्षांची, अनेक पंथांची माणसे आज येथे एका विचाराने जमली आहेत. तो विचार म्हणजे आपल्या शहराचे उत्तमोत्तम पुनर्वसन कोणत्या प्रकारे व कोणत्या मार्गांनी करावे. भारतीय समाजाच्या परस्परांपासून दुरावलेल्या घटकांत एकात्मतेची भावना ज्यायोगे बळावेल ते सर्व प्रयत्न करून करावे असे आज सारखे बोलले जाते. सर्वांचे हित ज्यात साधेल अशा उद्योगाप्रीत्यर्थ सहविचार घडवून प्रत्यक्ष सहकार्य करणे याने जशी एकात्मतेची वाढ होईल तशी दुसऱ्या कशाने होणार नाही, असे माझे मत आहे. म्हणून आज आपण सर्व पुणेकर विविध दिशांनी येथे शहराच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या कार्याचा उपक्रम करण्यास जमला याबद्दल पुन्हा आपले आभार मानून व स्वागत करून परिषदेपुढील प्रमुख विषयांच्या व्याप्तीबद्दल थोडे विवेचन करतो.

## शहराच्या विकासाची पूर्वपीठिका

सुरुवात नगररचनेपासून करणे युक्त ठरेल. आपले शहर पुरातन आहे व त्याची वाढ निरनिराळ्या कालखंडात क्रमाक्रमाने झाली आहे. शहराचा मूळ गाभा म्हणजे कसबा पेठ आणि मंगळवार, सोमवार व शनिवार पेठेतील नदीलगतची वस्ती. पुणे मोठे झाले व महत्त्वास पावले ते पेशवाईच्या काळात. मुठानदीच्या दक्षिणेस या काळात अनेक नवीन पेठा वसल्या गेल्या. जुन्या म्हणून आज ओळखल्या जाणाऱ्या सर्व पेठा इ. स. १८०० च्या आधी अस्तित्वात आल्या. पेशवाईच्या अस्तानंतर एकोणिसाव्या शतकातील जुने पुणे हे फारसे वर्धिष्णू नव्हते. पुण्याची या कालखंडात जी वाढ झाली ती बहुतेक पूर्वेस लष्करी छावणीच्या अनुषंगाने. विसाव्या शतकात पुन्हा वाढीस हळूहळू सुरुवात झाली. ती प्रथम जुन्या पेठांत लोकवस्तीची दाटी वाढून व दक्षिणेच्या बाजूस घरबांधणीचे क्षेत्र विस्तारून व नंतर मुठा नदीच्या उत्तरेस नवीन पेठांत झपाट्याने वस्ती होऊन झाली. हे मुख्यतः पहिल्या महायुद्धापासून दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या काळात घडले. दुसऱ्या महायुद्धापासून या शहराच्या इतिहासात अगदी नवीन कालखंडास सुरुवात झाली. पूर्वीपेक्षा झपाट्याने लोकवस्ती व नगरविस्तार ही दोन्ही वाढली, एवढेच नव्हे तर विशेषतः गेल्या दहा वर्षांत शहराची व्यावसायिक रचना मोठ्या कारखानदारीच्या आगमनामुळे बदलू लागली.

## नगररचनेचा सुसंगत आराखडा आवश्यक

आज जुन्या निरनिराळ्या अवस्थांतील मांडणी जमेस धरून व भविष्यातील संभाव्य घटनांचा विचार करून नगररचनेचा संपूर्ण सुसंगत नवा आराखडा तयार करणे अत्यावश्यक व अगत्याचे ठरत आहे. शहराच्या वाढीमुळे उत्पन्न होणाऱ्या अडचणी निवारून नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक स्वास्थ्यास व सहजीवनास पोषक अशी परिस्थिती निर्माण करणे हे या आराखड्याचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे. याबाबतचे आजवरचे झालेले प्रयत्न आता अयुक्त व अपुरे ठरत आहेत असे म्हणण्यात कोणास दोष देण्याचा उद्देश नसून प्रस्तुत स्थिती काय हे स्पष्ट सांगावे एवढाच आहे.

जलप्रलयाने निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे भविष्यातील नगररचनेचा सर्वांगीण विचार करणे अनेक दृष्टींनी निकडीचे झाले आहे. प्रलयामुळे मुठा नदीच्या दोन्ही तीरांवरील वस्तीचा मोठा पट्टा उद्ध्वस्त झाला आहे. या पट्ट्यात पुन्हा वसाहत करावयाची, रस्ते, इमारती इत्यादी बांधावयाचे हे कसे करावयाचे हे तावडतोबीने ठरविले पाहिजे. अनेक शतकांत क्रमाक्रमाने आपाततः जशी जुनी वसाहत झाली तशीच ती पुन्हा उभारावी, किंवा दूरवरचा विचार न करता, काही सहेतुक योजना न करता, ज्यास वाटेल तसे बांधू द्यावे, असे कोणी म्हणणार नाही असे मला वाटते. नवीन वसाहत करण्यास फार विलंब लागू नये व पूर्वविचार करण्यास अवधी हवा या निमित्ताने कोणाची कुचंबणा, नुकसान होऊ नये हेही तितकेच खरे. म्हणून नगररचनाशास्त्राच्या व पुण्याच्या भावी जीवनाच्या दृष्टीने काय योग्य ठरते हे स्थूलमानाने, सर्वांच्या विचाराने व समजुतीने शक्य तितक्या लवकर निश्चित केले पाहिजे.

उद्ध्वस्त झालेल्या भागाचे पुनर्वसन पूर्वीप्रमाणेच करावयाचे असे नाही, हे मान्य केल्यास यातील निर्वासित झालेल्या कुटुंबांची फार मोठ्या प्रमाणात तात्पुरती राहण्याची व्यवस्था व काही प्रमाणात तरी कायमची व्यवस्था इतरत्र करणे ओघाने प्राप्त होते. हजारो कुटुंबांची नव्याने वसाहत करावयाची हेही विचारपूर्वक झाले पाहिजे. वसाहतीची जागा नवागतांस व्यावसायिक व सामाजिक दृष्ट्या सोईस्कर आहे किंवा नाही हा तावडतोबीचा महत्त्वाचा विचार झाला. परंतु या वसाहतींच्या स्थापनेमुळे दूरवरचेही अनेक परिणाम होणार; यांमुळे आजूबाजूच्या जमिनींच्या किमतींवर परिणाम होणार;

वाहतुकीच्या मार्गास व आर्थिक जीवनास विशिष्ट दिशेने वळण लागणार. तेव्हा या वसाहत स्थापनेचा संबंध भविष्यातील शहराची रचना व वाढ यांच्याशी सहेतुक जोडावयास हवा. तसेच नवीन वसाहत स्थापन करण्याच्या आवश्यकतेमुळे शहराच्या सामाजिक व आर्थिक जीवनास इष्ट वळण लावण्याची शक्यता प्राप्त झाली आहे, हेही महत्त्वाचे मानले पाहिजे.

अगदी नजीकच्या भविष्यकाळातील पुणे शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची संभाव्य घटना म्हणजे मोठ्या कारखानदारीची वाढ ही होय. आज ही वाढ बहुतांशी मुंबई-पुणे रस्त्यावर एकमार्गी अरुंद पट्टीत होत आहे. या प्रकारे वाढ होणे व ती अनियमित असणे, नियोजनपूर्वक नसणे, हे सर्वथा अनिष्ट आहे याबद्दल मतभेद नसावा. परंतु याचे नियोजन व नियमन कसे व्हावे, पुण्याच्या नगर-रचनेच्या व सर्व परिसराच्या विकासाची एकत्र योजना व नकाशा कसा तयार व्हावा या महत्त्वाच्या प्रश्नांकडे आपले लक्ष जावे तसे अजून गेलेले नाही. नदीच्या उद्ध्वस्त विभागाची मांडणी व निर्वासितांच्या नवीन वसाहतीची स्थापना या दोहोंचा उद्योगधंद्याच्या स्थापनेबाबतच्या भविष्यातील योजनांशी निकटचा संबंध आहे. तसेच यांपैकी कोणत्याही बाबतीत योजनापूर्वक कारवाई करावयाची असल्यास हे कार्य प्रभावी अधिकारमंडळ स्थापन झाल्याशिवाय साधावयाचे नाही. करिता, जलप्रलया-मुळे उत्पन्न झालेले पुनर्वसनाचे व नगररचनेचे प्रश्न यांचा विचार भविष्यातील औद्योगिक वाढीच्या योजनेसमवेत करून, पुणे-शहर व भोवतालच्या १०–१५ मैलांचा परिसर यांच्या विकासाची सर्वांगीण योजना बनविणे व ती कार्यवाहीत आणणे हे कसे साधेल, या करिता यंत्रणा कोणती उभारणे इष्ट आहे, तिचे अधिकार, कार्यपद्धती इत्यादी कशी असावी हे सर्व आपणांस पाहिले पाहिजे.

## युरोपीय राष्ट्रांचा अनुभव

आपल्या या प्रश्नांच्या चर्चेत आपणांस महायुद्धोत्तर युरोपीय शहरांच्या पुनर्रचनेच्या अनुभवाचा फार उपयोग होणार आहे. अनेक दृष्टींनी त्या वेळेच्या युरोपातील समस्या आपल्या सारख्याच होत्या. युद्धकालात अनेक शहरांचे मोठमोठे भाग उद्ध्वस्त झाले होते. पुष्कळ वेळा उद्ध्वस्त झालेले क्षेत्र शहराच्या अगदी मध्यवर्ती भागांपैकी होते; यामुळे मध्यवर्ती भागाची मांडण पुन्हा पूर्वीप्रमाणे करावी किंवा अगदी नव्याने करावी, हे पर्याय साहजिक उत्पन्न झाले. यांची उत्तरे निरनिराळ्या शहरांत निरनिराळ्या प्रकारांनी दिली गेली. ती कशी व का दिली हे आपल्या दृष्टीने उद्बोधक ठरेल. तसेच या जुन्या युरोपीय शहरांची पुनर्रचना करताना, नवीन वसाहती व घरबांधणी, भविष्यातील वाहतुकीची व कारखानदारीची वाढ यांचाही दूरवरचा विचार करणे इष्ट मानले गेले आणि त्यांच्या-पुढेही आपल्यासारखाच पुनर्रचना दीर्घकालीन योजनेत बसविताना ती त्वरेने अमलात आणणे फार जरुरीचे आहे असा पेच होता. या सर्व समस्यांची उकल इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली इत्यादी देशांत बहुतांशी समाधानकारकपणे केली गेली असे म्हणतात. तेव्हा आपणांस त्यांच्या प्रयत्नांची बैठक, मांडण, उभारणी यांचा अभ्यास करणे श्रेयस्कर ठरेल.

आपण व पाश्चिमात्य युरोपीय राष्ट्रे यांच्यांत आर्थिक बलाची तफावत फार मोठी, याकडे मात्र त्यांच्या अनुभवाचा विचार करताना लक्ष दिले पाहिजे. ते जगातील फार श्रीमंत राष्ट्रांपैकी, आपण अत्यंत गरिबांपैकी, हा विचार नवीन वसाहतीची मांडणी व नवीन घरबांधणी यांविषयीच्या योजना करताना विशेष महत्त्वाचा ठरतो. शहरात नव्याने येणाऱ्यांकरिता योग्य अशा नवीन घरांची पुरेशी बांधणी करणे व जुन्या गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन करणे हा भारतातील सर्वच वाढत्या शहरांपुढील कायमचा यक्षप्रश्न होऊन बसला आहे. शहरांची वाढ विशेष होत नव्हती किंवा मंद गतीने होत होती तेव्हा हा प्रश्न बिकट नव्हता. किंबहुना त्या वेळेस एकंदर परिस्थितीत थोडी सुधारणा झालेली

आढळून येत होती. उदाहरणार्थ इ. स. १८८० ते १९३५ या कालखंडात पुणे शहरात झोपड्यांत राहणाऱ्या लोकवस्तीचे प्रमाण कमी होऊन घरांत राहणाऱ्यांचे प्रमाण वाढले, असे तत्संबंधीच्या उपलब्ध आकड्यांवरून दिसते. परंतु १९३५—विशेषतः १९३९ नंतर ही स्थिती झपाट्याने बदलू लागली. १९६१ जून पूर्वी झोपड्यांत राहणाऱ्यांचे प्रमाण १९३५ पेक्षा बरेच वाढले होते. आणि अत्यंत निकृष्ट प्रकारच्या गलिच्छ वस्त्यांत राहणाऱ्या कुटुंबांची संख्या १९३५ मध्ये सुमारे १००० होती ती जून १९६१ पर्यंत निदान १०००० पर्यंत वाढली असावी, असा माझा अंदाज आहे. अर्थात ही परिस्थिती केवळ पुण्याचीच नाही. जेथे राजमार्गावरील पदपथ हेच अनेकांचे एकमेव विश्रांतिस्थान बनले आहे अशा मुंबईसारख्या शहरांत आपल्या समाज व अर्थव्यवस्थेवरील हा कलंक विशेष उत्कट रीतीने—निदान परदेशीयांस तरी—भासतो. नागर लोकसंख्येच्या वाढीवरील नियमनाचा अभाव हे प्रस्तुत परिस्थितीचे एक कारण आहे. याबरोबर, निदान तितकेच महत्त्वाचे कारण म्हणजे हा प्रश्न सोडविण्याचे आजपर्यंतचे झालेले प्रयत्न अत्यंत अपुरे व अवास्तव आहेत हे होय.

## व्यापक उपाययोजनेची आवश्यकता

जलप्रलयामुळे पुण्यात नवीन घरबांधणी व गलिच्छ वस्त्यांचे निर्मूलन या दोहोंबद्दल त्वरेने विचार करून व्यापक, बहुरूपी उपाययोजना अमलात आणणे अत्यावश्यक झाले आहे. ज्यांना गलिच्छ वस्त्या म्हणता येईल अशा दोन-तीन वस्त्या पुराने वाहून गेल्या आहेत; तसेच ज्यांचे पुनर्वसन करावयाचे ते मोठ्या प्रमाणात गरिबीच्या परिस्थितीतील, ज्यांना रु. १५-२० मासिक भाडेही परवडणार नाही अशांतले आहेत. तेव्हा आजवर ज्या प्रश्नांची उपेक्षा झाली ते आपणांस लवकर सोडवून दाखवावयाचे आहेत; आणि वेळेची, पैशाची मर्यादा संभाळून काही किमान सोयींचे मान राखून सोडवावयाचे आहेत. यात आपणांस यश आले तर पुण्यापुरता हा कलंक धुऊन टाकण्याच्या दिशेने आपण निश्चित पावले टाकू, एवढेच नव्हे तर अखिल भारतास याबाबत मार्गदर्शक ठरू शकू.

नवीन वसाहती व घरबांधणी यांविषयीच्या प्रश्नांचा आपणांस अनेक अंगांनी विचार करावयाचा आहे. स्थापत्य व वास्तुशिल्प शास्त्रांच्या दृष्टीने विचार करून राहण्याची किमान जागा, किमान सुखसोयींसह किमान खर्चात निरनिराळ्या स्तरांतील मंडळींस कशी उपलब्ध करून देता येईल हे पहावयाचे आहे. अर्थशास्त्राच्या दृष्टीने विचार करून विविध प्रकारची घरे व वसाहती या बांधण्याकरिता व्यक्तिशः अगर सामूहिक कसे प्रयत्न करावे, यंत्रणा कोणत्या निर्माव्या व या सर्वांस पैसा व साहित्य कसे उपलब्ध करून द्यावे हे ठरवावे लागेल. समाजशास्त्राच्या दृष्टीने जुनी जातवार, व्यवसायवार वस्ती मोडून नवसमाजाची ज्यांत घडण होऊ शकेल अशा वसाहतींची रचना कशी करावयाची व त्यांत सर्वांगीण जीवन विकास होईल याकरिता कोणत्या समाजसंस्था व साधने स्थापावयाची हे अजमावावे लागेल. नगररचना शास्त्राच्या दृष्टीने या नव्या लोकवस्त्या समग्र पुनर्रचनेच्या आराखड्यात कशा बसवावयाच्या, त्यांची सांगड औद्योगिक विकास-योजनांशी कशी घालावयाची व हल्लीप्रमाणे लहान लहान मंडळ्यांच्या अगर प्रत्येक कारखानदाराच्या अशा निराळ्या वस्तींची योजना न करता यांपैकी अनेकांस सहेतुक, सुसंगत रीतीने एकत्र आणून सर्वप्रकारच्या साधनांनी व सोयींनी युक्त अशा मोठ्या वसाहती कशा बनवावयाच्या हे पाहावे लागेल. या सर्व प्रश्नांची बिनतोड उत्तरे आपणांस लगेच सापडतील असा फाजील आशावाद मी बाळगत नाही. परंतु निरनिराळ्या प्रकारच्या तज्ज्ञांस एकत्र आणून त्यांस पूर्वानुभव व आपले ज्ञान यांच्या साहाय्याने प्रत्यक्ष प्रश्नांचा व्यावहारिक, सामुदायिक विचार करावयास उद्युक्त करण्याने उत्तरे सापडण्यास सुरुवात होऊ शकेल असे मला वाटते आणि अशी सुरुवात झाल्यावर सतत प्रयोगशीलता राखून अनेकांगी प्रयत्न सारखे करीत राहिल्यास यश

बरेचसे पदरात पडेल असाही माझा विश्वास आहे. या एकंदर उपक्रमाची सुरुवात आपल्या या परिषदेने व्हावी अशी माझी मनापासून इच्छा आहे.

नगराची पुनर्रचना व घरबांधणी यांप्रमाणेच प्रलयपीडितांच्या आर्थिक पुनरुत्थानाची समस्या महत्त्वाची आहे. या बाबतीत प्राथमिक अवस्थेत जी मदत पुणेकरांस बाहेरून पोहोचली तिचा अग्रस्थानी कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे हे मी आपले कर्तव्य समजतो. ही मदत देशाच्या अनेक भागांतून, महाराष्ट्रातून सर्व दिशांनी आणि विशेषतः मुंबई शहरातून सर्व प्रकारच्या सर्व थरांतून सढळ हाताने आली. हिच्यामुळे सुरुवातीच्या काळात सार्वत्रिक साहाय्य अपेक्षेपेक्षा लवकर मिळाले. लष्करी व मुलकी सरकारी यंत्रणांनीही शहर-सफाई, पूल व रस्तेदुरुस्ती, पाणीपुरवठा इत्यादी बाबतींत आपले काम त्वरेने पार पाडले. व्यावसायिकांस मदत देण्यात मुंबईच्या सहायक समितीने (Bombay Relief Committee) आपल्या व कच्छ-सुरत येथील अनुभवांच्या अनुरोधाने उपयुक्त योजना आखण्यात पुढाकार घेतला; व तत्सम योजनांचा पुरस्कार मराठा चेंबरनेही केला. सरकारच्या औद्योगिक खात्याने पुण्यास निराळे तात्पुरते केंद्रच उघडून भरीव मदत केली. व्यावसायिकांस व कुटुंबांस मिळालेली आजवरची मदत मुख्यतः मुख्य मंत्र्यांचा निधी व इतर खासगी निधींतूनच मिळाली आहे; व कर्जे मुख्यतः व्यापारी व सहकारी बँकांतर्फे मिळाली आहेत. मदतीबाबत सरकारी धोरण लवकर जाहीर व्हावे अशी आपणा सर्वांची मागणी होती. गेल्या सोमवारी मुख्य मंत्र्यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली आहे. या घोषणेचा तपशीलवार विचार परिषदेच्या आर्थिक विभागात होईलच.

## आधुनिक युगाचे आवाहन

आतापर्यंत उल्लेखिलेल्या सर्व प्रश्नांपेक्षाही मला महत्त्वाच्या वाटणाऱ्या प्रश्नाकडे आपले लक्ष वेधून हे निवेदन संपवितो. १२ जुलैच्या घटनेमुळे एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की आपण, आपला समाज, आपले सरकार यांस आधुनिक युगात पडत असलेल्या जबाबदाऱ्या पेलणे कठीण पडते. ब्रिटिश राजवटीत कारभार चालविण्याची सर्व प्रत्यक्ष जबाबदारी सनदी नोकरशाही व सरकारी तज्ज्ञ यांवरच होती. वरिष्ठ अधिकारी व सरकारी तज्ज्ञ यांतच सर्व अधिकार केंद्रित होते; व सर्व शहाणपणही असेच केंद्रित आहे असे निदान सरकार मानीत होते. यामुळे सरकारी कारभाराविषयीच्या कोणत्याही महत्त्वाच्या निर्णयाविषयी जाहीर पूर्वविचार व्हावा, ते लोकांस समजावून सांगावे, कारभाराच्या व्यवस्थेत लोकांची सोय पाहावी, याची इष्टता अगर आवश्यकता मानली जात नव्हती. या जुन्या परंपरेचे लोण अजून फार मोठ्या प्रमाणात टिकून आहे. शेवटी कोणातरी बड्या अधिकाऱ्याने अगर सरकारी तज्ज्ञाने काही म्हटले म्हणजे ते प्रमाण मानले पाहिजे, त्याबाबत युक्तिवाद करणे निरर्थक अशी परिस्थिती आजही बऱ्याच अंशी आहे. याचीच दुसरी बाजू ही की लोकनेत्यांस सार्वजनिक प्रश्नांचा सांगोपांग विचार करून त्यावर विवेकपूर्ण विवेचन करण्याकरिता पुरेशी माहिती वा संधी मिळत नव्हती व त्यामुळे त्यासंबंधी आपली जबाबदारीही त्यांस भासत नव्हती.

ब्रिटिश नोकरशाहीचा अमल चालू असता नोकरवर्गातील वरिष्ठांस राज्याची जबाबदारी आपणांवर आहे याची पूर्ण जाणीव होती; व कारभारावर सार्वत्रिक नजर ठेवण्याची ते दक्षता बाळगीत असत. आज जुन्या परिस्थितीतील गैरफायदे तेवढे सर्व उरलेले दिसतात. वरिष्ठ नोकरवर्गास आपणावरच जबाबदारी आहे असे वाटत नाही; पण ती खऱ्या अर्थाने मंत्रिमंडळाने उचललेली दिसत नाही. अधिकाऱ्यांच्या कारभारात हस्तक्षेप होतो अशा तक्रारी ऐकू येतात; परंतु सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाच्या बाबतीत कारभाराचे वळण अधिकाऱ्यांच्या हातीच दिसते. लोकनेत्यांचा प्रभाव आडवळणाने

थोडाबहूत कारभारावर पडतो. परंतु प्रत्यक्ष सर्वांस जबाबदारी भासेल अशा रीतीने त्यांचा सल्ला घेण्याची यंत्रणेत कोठेच सोय नाही. सरकारी कारभाराच्या हरतऱ्हेच्या अंगोपांगांत प्रत्येक क्षेत्रातील व स्थानातील पुढारी, तज्ज्ञ इत्यादिकांना आपले म्हणणे विचारपूर्वक सांगावेसे वाटेल असा अवसर नाही. परिणामी घोषणा व चळवळी यांचे सार्वजनिक जीवनातले स्थान कमी होत नाही; सामूहिक विचार व चर्चा या महत्त्व पावत नाहीत. अधिकारी व मंत्री, जनता व सरकारी नोकर, सरकार व विरोधी पक्ष, सरकारी तज्ज्ञ व बिनसरकारी तज्ज्ञ अशा सर्वांच्या परस्परसंबंधांचा नव्याने मूलभूत विचार होऊन त्याविषयी नवीन संकेत बांधले गेले पाहिजेत; व लोकशाही समाजव्यवस्था म्हणजे जेथे सर्व महत्त्वाचे निर्णय लोकांसमोर उघड चर्चा होऊन व त्यांस ते समजावून, पटवून घेतले जातात ती, हा विचार सर्व कारभारात प्रांजलपणे स्वीकारला पाहिजे. असे झाल्यासच क्रमाक्रमाने आपणांस आधुनिक युगाच्या जबाबदाऱ्या पेलता येतील, एरवी नाही, असा माझा स्पष्ट अभिप्राय आहे.

पुणे पुनर्वसन परिषद, प्रास्ताविक निवेदन, ९-९-१९६१ (पुणे, १९६१)

☆

# १० . . जमिनीच्या कमाल धारणेचे विधेयक

महाराष्ट्र राज्य सरकारने शेतजमीन धारण करण्याची कमाल मर्यादा ठरवून देण्याबाबतच्या विधेयकाचा मसुदा काही दिवसांपूर्वी प्रसिद्ध केला. नागपूरच्या अधिवेशनापुढे हे विधेयक मांडले जाईल अशी अपेक्षा होती; परंतु विधेयकाचे स्वरूप निश्चित होण्यास नियोजन मंडळाशी होत असलेल्या वाटाघाटीमुळे विलंब लागला. यावरूनच मुंबई राज्यसरकारने १९५९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या विधेयकाच्या मसुद्याहून नवीन मसुद्याचे स्वरूप बरेच निराळे असेल असा अंदाज करण्यात आला होता, तो खरा ठरला. अनेक दृष्टींनी १९५९ च्या मसुद्याहून आणि भारतात इतर काही राज्यांत स्वीकृत झालेल्या विधेयकाहून हे नवे विधेयक अगदी भिन्न स्वरूपाचे आहे. याची तोंडओळख करून देणे व नवीन विधेयकाचा पाया व त्यात अभिप्रेत असलेले आर्थिक धोरण यांचा व्यापक विचार करणे हे ह्या लेखात योजिले आहे.

## १९५९ च्या विधेयकातील उणीवा

१९५९ सालच्या विधेयकावर ते प्रसिद्ध झाल्याबरोबर मी काहीशी विस्तृत टीका केली होती. या टीकेमधील मुख्य मुद्दे असे :—शेतीपासून मिळणाऱ्या उत्पन्नावर मर्यादा घालावयाची ती तत्त्वतः सर्वच प्रकारच्या उत्पन्नावर जेव्हा कमाल मर्यादा घातली जाईल तेव्हाच घालण्यात यावी. कमाल मर्यादा लादण्यामुळे उपलब्ध झालेल्या जमिनीचे वाटप करण्याची पूर्वतयारी असल्याखेरीज हे विधेयक अनुपयुक्त ठरेल. शेतकऱ्याच्या उत्पन्नास कमाल मर्यादा घातल्यास शेतकरी कुटुंबांतील इसमांची शिक्षण, आरोग्य वगैरे बाबतची जबाबदारी सरकारास पत्करावी लागेल. शिवाय या विधेयकात अनेक प्रकारची जमीन कमाल मर्यादेतून वगळण्यात आली होती. त्यातल्या त्यात व्यापारी व औद्योगिक कंपन्यांच्या ताब्यातील जमीन कमाल मर्यादेतून वगळणे माझ्या मते विशेष अन्याय्य होते. शेती-उत्पन्नातील विषमता कमी करण्याचे अन्य मार्ग सुचवून मी माझ्या टीकेचा समारोप केला होता.

## नव्या विधेयकाचे स्वरूप

महाराष्ट्र राज्यसरकाराने प्रसिद्ध केलेल्या नव्या विधेयकाचे स्वरूप अनेक दृष्टींनी कमी आक्षेपार्ह आहे, असे वरील टीकेच्या अनुरोधाने विचार केला असता दिसून येते. नवीन विधेयकामधील एक महत्वाचा फरक म्हणजे कमाल मर्यादेची व्याख्या वार्षिक उत्पन्नात न करता प्रत्यक्ष जमिनीच्या क्षेत्रात केली आहे. जुन्या विधेयकात कमाल मर्यादा वार्षिक रु. ३६०० धरली होती; आणि वेगवेगळ्या विभागांतील व निरनिराळ्या शेतीप्रकारांतील शेतीपासून मिळणाऱ्या ऐन उत्पन्नाचा हिशेब करून विधेयकाची अंमलबजावणी करताना प्रत्यक्ष कमाल मर्यादाक्षेत्र ठिकठिकाणी ठरविण्यात येणार होते.

नवीन विधेयकात जिल्हा-तालुकानिहाय निरनिराळ्या वर्गांच्या जमिनीच्या कमाल क्षेत्राची मर्यादा परिशिष्टात स्पष्ट नमूद करण्यात आली आहे. यामुळे दोन गोष्टी साधल्या आहेत. एकतर क्षेत्राच्या बाबतची अनिश्चितता आता बिलकुल राहिली नाही. दुसरे असे की, प्रादेशिक कमाल मर्यादा जमिनीच्या क्षेत्रात मापल्यामुळे जास्त किफायतशीर वापर करणाऱ्यास कमी क्षेत्र, असे जे पूर्वीच्या योजनेत घडण्याचा संभव होता तसे आता होणार नाही. पूर्वकालीन कष्टांची व प्रयत्नांची नवीन व्याख्येमुळे जास्त दखल घेतली गेली आहे. विशेषतः सरकारने उपलब्ध करून दिलेला पाणीपुरवठा ज्या जमिनीत नाही तीस सरसकट कोरडवाहू मानल्यामुळे शेतकऱ्याने विहिरीबाबत वगैरे केलेल्या खाजगी खर्चाचा काही विचार झाला नाही हा आक्षेप आता उरत नाही.

या बरोबरच कमाल क्षेत्राची मर्यादा फार उंचावली असल्यामुळे नवीन विधेयकाचे रूप पूर्णपणे बदलले आहे. एका बाजूस बारमाही सरकारी पाटाखालील बागायतीस सोळा एकर, तर दुसऱ्या बाजूस कोकणातील वरकस जमिनीकरिता व देशावरील अनेक तालुक्यांत कोरडवाहू सामान्यपणे १५६ एकर एवढी मर्यादेची व्याप्ती आहे. शिवाय ही मर्यादा पाच माणसांच्या कुटुंबासच लागू आहे. कुटुंबात पाचापेक्षा अधिक इसम असल्यास प्रत्येक अधिक इसमास एक षष्ठांश वाढावा मिळून कमाल मर्यादा मूळ मर्यादेच्या दुपटीपर्यन्त जाऊ शकेल. अगदी वर वर आकडेमोड केली तरी या मर्यादा साधारण बऱ्या शेतकऱ्यासही नाडणाऱ्या नाहीत असे दिसून येईल. शेतीत उद्योगाला व कल्पकतेला काही वाव राहिला नाही व शेतकऱ्यांचे सरसकट उत्पन्न एकदम मोठ्या प्रमाणात कमी केले, हे जुन्या विधेयकाविरुद्ध घेतलेले आक्षेप नवीन विधेयकाने बहुतांशी कमजोर केले आहेत.

नवीन विधेयकाने शेतजमिनीची व्याख्या व्यापक करून जुन्या विधेयकात मुद्दाम वगळण्यात आलेल्या बहुतेक बाबींचा तीत समावेश केलेला आहे. जुन्या विधेयकातील या बाबतीतील वर्गीकरण तर्कदुष्ट व अन्याय्य होते; पण ते सर्वमान्य झाले होते, व त्यास नियोजनमंडळाचा पाठिंबा होता. विशेषतः व्यापारी व औद्योगिक कंपन्यांच्या शेतीस वगळण्याच्या मुद्द्याशी मोठ्या उद्योगपतींचे हितसंबंध निगडित झाले होते. यामुळे कोणत्याही राज्य सरकारास हे वर्गीकरण बदलता येईल असे वाटले नव्हते. ही अवघड गोष्ट साधून या विधेयकाच्या तरतुदींत सर्वांना सारखे लेखले, याबद्दल महाराष्ट्र राज्य सरकार निःसंशय अभिनंदनास पात्र आहे. याबरोबरच या कंपन्यांची शेती प्रत्यक्षाप्रत्यक्ष रीतीने चालवून त्यांना आवश्यक तो कृषि-उत्पादनाचा पुरवठा करण्याची जबाबदारी सरकारने स्वतः पत्करली हेही राष्ट्रीय उत्पादन व विकास यांच्या दृष्टीने योग्य असेच झाले. अर्थात, शेती धरून सर्व अर्थव्यवहाराबाबतचा कुशलतेचा व जाणकारपणाचा मक्ता हल्लीच्या उद्योगपतींच्या हातीच आहे व प्रयत्नेही इतरांस हे गुण अवगत करून घेता येणार नाहीत असे ज्यांना वाटते, त्यांच्या मते नवीन विधेयकातील तरतूद अनिष्ट ठरणार. इतरांस, न्याय, समता व राष्ट्राचा सर्वांगीण व सर्वस्पर्शी विकास या दृष्टीने ही तर्कशुद्ध परंतु अभिनव योजना स्वागतार्हच वाटेल.

या विधेयकाबाबत माझे मत अनुकूल होण्याचे मुख्य कारण म्हणजे त्यामुळे शेती व शेतीसमाज यांस कोणत्याही प्रकारे मोठा धक्का देणे किंवा त्यांवर अनिष्ट परिणाम घडवून आणणे असे होणार नाही. अनेकांच्या मते हेच विधेयकाचे वैगुण्य असेल. तेव्हा कमाल मर्यादा विधेयकामुळे काय साधावयाचे आहे याकडे थोडे लक्ष देणे आवश्यक आहे.

समाजवादाचे अंतिम ध्येय मान्य केल्यावर संपत्ती व उत्पन्न यांबाबतची विषमता कमी करण्याचे प्रयत्न सरकारास करावे लागतात. उत्पादन–साधनांचे स्वामित्व थोड्यांच्या हाती केंद्रित होणे हे या व इतर दृष्टींनी अनिष्ट ठरते; आणि म्हणून राष्ट्रीय उत्पादन–साधनांतील प्रमुख—जमीन—तिच्या धारणेवर कमाल मर्यादा कायद्याने घालण्याचे धोरण सरकार स्वीकारते. हे एक उद्दिष्ट. याचबरोबर भूमिहीन

किंवा अल्प जमीन धारण करणाऱ्यास जमीन वाटणे इष्ट मानल्यास या वाटपाकरिता जमीन मिळविणे हेही कमाल मर्यादा विधेयकाचे उद्दिष्ट होते. काही जणांच्या मते दुसरे उद्दिष्ट खरे महत्त्वाचे. शेतीचे उत्पादन आणि एकंदर आर्थिक रचना या दोनही दृष्टींनी नवीन असंख्य अत्यंत छोटे शेतकरी निर्माण करणे हे अनिष्ट आहे असे माझे मत आहे. तसेच कमाल मर्यादेबरोबर शेतीच्या क्षेत्राची किमान मर्यादाही आवश्यक मानून त्या दृष्टीने आजच्या अल्प जमीन धारण करणाऱ्यांस हरतऱ्हेने सहकारी शेती करण्यास उत्तेजन द्यावे असे मला वाटते. शिवाय कमाल मर्यादेचे इतर मान्य केलेले क्षेत्र हे स्वीकारल्यावरही प्रत्यक्ष वाटपास फार मोठ्या प्रमाणावर जमीन मिळणे संभाव्य नाही. थोडक्यात, शेतीव्यवस्थेचा प्रश्न वाटपाच्या मार्गाने सुटण्यासारखा नाही. तेव्हा माझ्या मते तत्त्वतः कमाल मर्यादा मान्य करून प्रत्यक्षात शेतीसमाजावर त्याचे अनिष्ट परिणाम घडून न येतील असे विधेयकाचे स्वरूप ठेवणे हेच आजच्या परिस्थितीत युक्त ठरते.

## कायद्याची अंमलबजावणी

नवीन विधेयकामुळे वाटपास काहीच जमीन मिळणार नाही असे नाही. अशी जमीन किती मिळेल हे अजमावणे कठीण आहे. जमीन धारणेबद्दल तपशीलवार आकडे अलीकडचे उपलब्ध नाहीत. तसेच कुळाने जमीन विकत घेतली असे मानावे, या कायद्यातील अलीकडच्या तरतुदींमुळे परिस्थिती किती बदलली आहे हे सांगता येत नाही. काही झाले तरी एकंदर क्षेत्राचा एखादाच टक्का 'अधिक' जमिनीचे क्षेत्र निघावे असा अंदाज आहे. वाटावयाची जमीन थोडी असली तरी वाटपाबाबतची सर्व व्यवस्था कायद्यात व नंतरची अंमलबजावणी सरकारास करावी लागेल. याबाबत विधेयकात केलेली योजना स्थूलमानाने समाधानकारक वाटते. वाटप कोणास करावयाचे ह्याविषयीच्या कलमांत सहकारी कृषि संस्थांस दिलेला अग्रहक्क योग्य आहे व प्रत्यक्ष अंमलबजावणीत वाटपामुळे नवीन छोटे शेतकरी उत्पन्न न होता अधिक जमीन सर्व कृषिसंस्थांसच मिळेल अशी खबरदारी घेण्यात यावी. ज्यांची अधिक जमीन निघेल त्यांस त्या जमिनीबद्दल देण्याच्या नुकसानभरपाईचे प्रमाण व पद्धतीही विधेयकात निश्चित केली आहेत. नुकसानभरपाईचे मान समाधानकारक आहे किंवा नाही याबद्दल मी अजून आकडेशीर विचार केला नाही. परंतु कायद्यात हे मान निश्चित करण्यात येत आहे हे माझ्या मते योग्य आहे. तसेच नुकसानभरपाई तावडतोब 'हस्तांतरयोग्य रोख्यांत' देण्यात येणार आहे हेही चांगले आहे. अलीकडच्या अनेक कायद्यांत कायद्याच्या प्रत्यक्ष योजनेपेक्षा अंमलबजावणीची अनिश्चितता व प्रत्यक्ष काही घडण्यास लागणारा कालावधी हीच लोकांस अधिक त्रासदायक भासलेली आहेत.

हे विधेयक मी पुढील धोरणाचा केवळ पहिला हप्ता समजतो. मी मानतो हे उद्दिष्ट असल्यास याच्या जोडीने इतर अनेक गोष्टी करावयास हव्या. उदाहरणार्थ, शेतकऱ्याच्या कर्तृत्वाला वाव ठेवावा व शेतीसमाजातील उत्पन्नांची पातळी फार खालावू नये म्हणून विधेयकातील कमाल मर्यादा वर ठेवली असल्यास शेतीउत्पन्नावर प्राप्तिकर न लादणे हे यापुढे न्याय्य ठरणार नाही. कमाल मर्यादा विधेयकाचे स्वरूप निश्चित होईपावेतो प्राप्तिकराचा विचार पुढे ढकलणे समर्थनीय होते. आता सुपरटॅक्सच्या मर्यादेपलीकडे शेतीचे उत्पन्न असणे कमाल मर्यादेच्या विधेयकाच्या अंमलबजावणीनंतरही संभाव्य ठरते. तेव्हा शेतीवरील उत्पन्नावर प्राप्तिकर लादून याबाबत समता प्रस्थापित करणे अत्यावश्यक आहे. असे न केल्यास कमाल मर्यादा विधेयकाची मांडणी विशिष्ट गटाच्या हिताच्या दृष्टीने केली आहे असा टपका सरकारावर येईल.

कमाल मर्यादा विधेयकाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शेतीच्या उत्पादन-व्यवस्थेविषयीच्या इतर

अनेक गोष्टी सरकारने हाती घ्यावयास हव्या. ताबडतोबीने करावयाची एक बाब म्हणजे जुन्या कूळकायद्याबाबतची. कमाल मर्यादा विधेयकाची अंमलबजावणी करताना जमीनमालकांपासून ज्यांनी जमीन विकत घेतली असे कायद्याने मानले जाते त्यांच्या क्षेत्राविषयीचा प्रश्न उदभवणार. जुन्या कूळकायद्यात नवीन विधेयकाप्रमाणेच किमतीची निश्चितता व कर्जरोख्यांत ताबडतोब व्यवहार पुरा करणे या दोन्ही गोष्टी करावयास हव्या होत्या असे माझे मत आहे. या गोष्टी निदान आता तरी व्हावयास हव्या. या दिशेने कूळकायद्यात दुरुस्ती करून जमिनीच्या मालकीबाबतची निश्चितता व जुन्या मालकांची सुटका दोन्ही एकसाथ घडवून आणाव्या. यामुळे कमाल मर्यादा विधेयकाची अंमलबजावणी सुकर होईल. 'अधिक' जमिनीचे वाटप फलदायी व्हावयाचे तर शेतांचे एकत्रीकरण मोठ्या प्रमाणावर व्हावयास हवे. कमाल मर्यादा, सहकारी शेती, जमीनधारणेची शाश्वती यांबरोबर शेतांचे एकत्रीकरण करून भूक्षेत्राची उत्पादनदृष्ट्या पुनर्मांडणी करणे हेही आवश्यक आहे. या सर्व गोष्टी एकसमयावच्छेदेकरून सुसूत्र साधल्या तरच शेतीउत्पादनास पूर्णपणे अनुकूल परिस्थिती प्राप्त होईल. आजवर या सर्वांचा निरनिराळा विचार होऊन सुसंगत, व्यावहारिक कार्यक्रम घडविणे हे कोठे झाले नाही. नवीन महाराष्ट्र राज्य सरकारने ज्या पद्धतीने कमाल मर्यादा विधेयकाची अभिनव मांडणी केली त्यावरून असा सर्वांगीण, सुसंबद्ध कार्यक्रम हे सरकार घडवू शकेल असा विश्वास वाटतो. महाराष्ट्र सरकार या कार्यास ताबडतोब उद्युक्त होईल व महाराष्ट्राच्या व भारताच्या आर्थिक विकासास इष्ट वळण लावील अशी आशा व्यक्त करून या नवीन विधेयकाचे मी स्वागत करतो.

*केसरी*, २२-१-१९६१

☆

# ११ . . कृष्णा-गोदावरी पाणीवाटप

गेली १५ वर्षे डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशनने महाराष्ट्रातील पाटबंधारे व विद्युत्‌निर्मिती यांबाबतच्या बहुविध प्रश्नांत सतत लक्ष घातले आहे. याकडे १९५१ सालीच असोसिएशनने लक्ष वेधले. महाराष्ट्रातील पाटबंधारे व कोयना योजना यांच्याविषयी नियोजन मंडळाकडे शिष्टमंडळ १९५२ साली नेण्यात असोसिएशनने महत्त्वाचा भाग घेतला. महाराष्ट्राचे हितसंबंध सुरक्षित राहावे याकरिता समित्यांपुढे साक्षी देणे, जाहीर निवेदन प्रसिद्ध करणे इत्यादीप्रकारे असोसिएशनचे कार्य एकसारखे चालू आहे. महाराष्ट्र सरकारने १९५१ सालच्या कराराबद्दल तक्रारीस सुरुवात केली. त्या वेळेस असोसिएशनने आपल्या जुन्या निवेदनांच्या आधाराने या तक्रारीस पाठिंबा आणि नंतर गुल्हाटी कमिशनला एक सविस्तर टाचण सादर केले. गेल्या मार्चमध्ये मध्यवर्ती पाटबंधारे व वीज खात्यांच्या मंत्र्यांचे निवेदन प्रसिद्ध झाल्यानंतर फार अवघड परिस्थिती निर्माण झाली आहे, असे असोसिएशनच्या लक्षात आले; व याबाबत लोकशिक्षण व लोकमत जागृत करणे आवश्यक आहे असे असोसिएशनच्या कार्यकर्त्यांस वाटले. यासंबंधात असोसिएशनने इतर अनेकांच्या सहकार्याने सुरू केलेल्या प्रयत्नांची परिणती म्हणून आजची ही परिषद भरत आहे.

## गुल्हाटी कमिशनची नेमणूक

कृष्णा-गोदावरीच्या पाण्याच्या वाटपाचा प्रश्न आपणा सर्वांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आहे. कृष्णा-गोदावरीच्या खोऱ्यात जवळजवळ सर्व महाराष्ट्राचा समावेश होतो; व पाणी, वीज इत्यादी अर्थोत्पादनाची मूलभूत साधने महाराष्ट्र समाजास या नद्यांच्या व उपनद्यांच्या प्रवाहांपासूनच मिळतात. आपणांसारखीच आंध्रप्रदेशाची व अंशतः म्हैसूर राज्याची परिस्थिती आहे. या सर्वांच्या गरजा व योजना यांस पुरेल इतके पाणी या खोऱ्यांत, विशेषतः कृष्णा खोऱ्यात, उपलब्ध नाही. तेव्हा सर्वांस न्याय्य वाटेल अशी असलेल्या पाण्याची वाटणी करणे हे क्रमप्राप्त आहे. या प्रश्नास प्रथम १९५१ साली चालना मिळाली. त्या वेळी भारत सरकारने बोलाविलेल्या एका परिषदेत पाण्याची वाटणी झाली असे म्हटले जाते. परंतु महाराष्ट्र सरकारने १९५१ च्या तथाकथित वाटप करारास हरकत घेतली. हा वाटप करार योग्य पूर्वसूचना न देता व पूर्ण माहिती न देता केला गेला म्हणून तो अमान्य, अशी महाराष्ट्र सरकारने बाजू मांडली. म्हैसूर सरकारनेही असेच निवेदन केले. भारत सरकारच्या कायदेसल्लागारांचे म्हणणेही या कराराची अंमलबजावणी करणे शक्य नाही, असे पडल्यामुळे या प्रश्नाचा फेरविचार होणे भाग पडले. हा विचार पूर्ण माहितीच्या आधारे व्हावा याकरिता भारत सरकारने मे १९६१ मध्ये एका तज्ज्ञ मंडळाची (गुल्हाटी कमिशन) नेमणूक केली व मंडळाने आपला अहवाल सहा महिन्यांत सादर करावा असा त्यास आदेश दिला. प्रत्यक्षात हा अहवाल ऑगस्ट १९६२ मध्ये

पूर्ण झाला. तदनंतर भारत सरकारच्या पाटबंधारे व वीज खात्याच्या मंत्र्यांनी निरनिराळ्या संबंधित राज्य सरकारांशी विचारविनिमय केला आणि या वादाबाबतचे आपले निवेदन भारतीय लोकसभेस २३ मार्च १९६३ रोजी सादर केले. आजची आपली परिषद या मध्यवर्ती मंत्र्यांच्या निवेदनामुळे उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा विचार करण्याकरिता बोलाविली आहे.

## कमिशनच्या शिफारशी

या निवेदनाचा विचार आपणांस दोन प्रकारे केला पाहिजे. प्रथम हे निवेदन कितपत सयुक्तिक, तर्कशुद्ध, पूर्वग्रहविरहित आहे हे पाहावयाचे आहे. मंत्र्यांच्या निवेदनात वारंवार गुल्हाटी कमिशनच्या अहवालाचा उल्लेख येतो. योग्य पाणीवाटप करण्यास आवश्यक अशी सर्व आकडेसिद्ध माहिती गोळा करण्याकरिता हे कमिशन नेमले गेले होते; व या कमिशनच्या अहवालाच्या अनुरोधानेच पुढील सर्व चर्चा होणार. तेव्हा या अहवालातील प्रमुख निष्कर्ष व शिफारशी यांचा निर्देश करून मी आपल्या विवेचनास सुरुवात करतो. गुल्हाटी कमिशनने आपल्या अहवालात आज या प्रश्नासंबंधी उपलब्ध असलेली माहिती फार अपुरी आहे व सर्व प्रश्नांचा योग्य विचार होण्याकरिता जास्त माहिती गोळा केली पाहिजे व संशोधन केले पाहिजे असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे कृष्णा खोऱ्यात फारसे पाणी शिल्लक असलेले आज निश्चित दिसत नाही. तेव्हा नवीन योजनांचा फार काळजीपूर्वक विचार करावा, इतकेच नव्हे तर काही जुन्या योजनांचाही फेरविचार व्हावा असे कमिशनचे मत आहे. तुटवडा लक्षात घेता पाण्याचा वापर फार काळजीपूर्वक झाला पाहिजे, उपलब्ध पाण्याचा सर्वोत्तम उपयोग होण्याकरिता समग्र खोऱ्यात संकलित योजना तयार व्हाव्या व हे कार्य नदीमंडळे निर्माण करून त्यांजवर सोपविण्यात यावे अशाही कमिशनने शिफारशी केल्या आहेत. पुढील संशोधनाची तरतूद करणे, नदीमंडळे निर्माण करणे इत्यादी बाबतींतील शिफारशींस पाटबंधारे व वीजमंत्र्यांनी मान्यता दिली आहे; व त्या कार्यवाहीत आणण्याची तरतूद केली आहे. याबाबत तत्त्वतः मतभेद होण्याचे कारण नाही. परंतु एवढ्यावरच मंत्री थांबले नाहीत. संशोधन, नदीमंडळे निर्मिती, वगैरे होईपर्यंत कामे चालू राहावी म्हणून पुढील १५–२० वर्षांपुरत्या प्रत्येक राज्याने हाती घ्यावयाच्या बांधकामाचे स्वरूप व त्यास लागणाऱ्या पाण्याच्या मर्यादा त्यांनी स्वमताने आपल्या निवेदनात निर्देशल्या, म्हणजे एक प्रकारे वाटप स्वतःच करून टाकले. हे जे त्यांनी वाटप केले तेच वाद-विषय झाले आहे. मंत्र्यांच्या वाटपामुळे महाराष्ट्रावर मोठा अन्याय झाला व हे वाटप आम्हांस मान्य नाही असे आम्हांस स्पष्ट जाहीरपणे म्हणावयाचे आहे. हे का याचे थोडक्यात विवेचन करतो.

## पाणीवाटपाबाबत मुख्य आक्षेप

मंत्र्यांच्या वाटपाबाबत मुख्य आक्षेप हे की, त्यांनी जे वाटप सुचविले ते कोणतीच एक सुसूत्र विचार-मालिका किंवा तत्त्वे यांच्यावर आधारलेले नाही; आणि दुसरे असे की, सर्वांची संमती असल्याखेरीज असे निर्णायक स्वरूपाचे वाटप सुचविणे अयोग्य आहे. मंत्र्यांनी आपल्या निवेदनात आपला निर्णय काही तत्त्वांनुसार दिला असे म्हटले आहे. ही तत्त्वे म्हणून म्हटली त्यांची यादी पाच कलमांची आहे. त्यांतील (अ) कलम नद्यांच्या पाण्याच्या प्रवाहासंबंधी माहिती गोळा करावयाच्या योजनांबाबत आहे, (ब) कलम गोदावरी नदीमधून कृष्णेच्या खोऱ्यात किती पाणी वळविता येईल याबद्दल 'प्रकल्प अहवाल' तयार करण्याविषयी आहे, (ड) कलम राज्य सरकारांच्या पाटबंधाऱ्यांची व्यवस्था व कारभार यांच्या पुढील धोरणाविषयी आहे, व (इ) कलम कृष्णा व गोदावरी खोऱ्यांतील सबंध प्रदेशाचे विस्तृत मास्टर प्लॅन तयार करण्याच्या दृष्टीने उपाययोजनेविषयी आहे. (क) कलम सबंध खालीलप्रमाणे आहे :

(क) "वरील (अ) व (ब) सूचना अमलात येईपर्यंत, नद्यांच्या खोऱ्यांतील विकासाचे कार्य स्थगित करण्यात येऊ नये. ज्या योजना यापूर्वीच सुरू करण्यात आल्या असतील व ज्या लगतच्या भविष्यकाळात हाती घेण्याचे ठरले असेल त्यांचे काम पुढे चालू करण्यात यावे. मात्र तसे करताना संबंधित राज्यांचे रास्त हितसंबंध सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने त्यांत फेरफारास योग्य तो वाव राहील हे त्यांत पाहावे."

मंत्र्यांनी ही जी पाच कलमी तत्त्वांची यादी म्हणून दिली त्यांतल्या चारांत गुल्हाटी कमिशनच्या पुढील कार्याविषयीच्या शिफारशी कार्यवाहीत आणण्याची तरतूद केवळ आहे, त्यांचा वाटप योजनेशी काही संबंध नाही. उरलेल्या कलमात वाटप करताना काय साधावे असे मंत्र्यांस वाटते एवढेच सांगितले. या वाटपाचा पाया किंवा मूलभूत तत्त्वे ह्यांचा बिलकुल उल्लेख केला नाही. म्हणजे मंत्र्यांनी सर्वमान्य तत्त्वानुसार मी वाटप करीत आहे असा आव आणून जी तत्त्वांची म्हणून यादी दिली त्यांत ज्याला वाटप योजनेचे तत्त्व म्हणता येईल असे एकही नाही, हे स्पष्ट आहे. मंत्र्यांनी यापुढे जाऊन जे वाटपाचे राज्यवार निवेदन केले आहे त्यातही युक्तिवाद कोठेच केलेला नाही. प्रत्येक राज्याने काय करावे अगर करू नये एवढेच सांगितले. परंतु पाण्याची जी कमी-अधिक वाटणी केली ती कोणत्या तौलनिक दृष्टीने केली याचे विवेचन कोठेच केले नाही. तेव्हा मंत्र्यांनी केलेली वाटणी तत्त्वशून्य आहे व 'मंत्रिवाक्यं प्रमाणम्' याखेरीज तिला काही आधार दिसत नाही असे म्हटल्यास वावगे मानू नये.

मंत्र्यांनी तात्त्विक वाटप-विचार करण्याचे टाळले. तो विचार त्यांच्या टीकाकारांनी करणे भाग आहे. कारण काही तत्त्वांनुसार, पद्धतशीर रीतीने हा प्रश्न सोडविता येतो, सोडविला पाहिजे, हा आमचा दावा आहे. विस्तृत विवेचन करण्याचे हे स्थळ नव्हे; म्हणून याबाबत एक दोन मार्ग थोडक्यात सुचवितो. अगदी सहज सुचणारा मार्ग म्हणजे विनियोगाच्या निरनिराळ्या पर्यायी योजनांचा तुलनात्मक विचार करून त्यांतून एक निवडक संकलित योजना तयार करावी. परंतु हे कार्य वाटते तेवढे सोपे नाही. कारण निरनिराळ्या योजनांत एकाच साधनाचा विनियोग भिन्न भिन्न परिस्थितींत, भिन्न भिन्न प्रकारे, निरनिराळ्या कामांकरिता करावयाचा असतो. या सर्वांची एकमेकांशी तुलना करणे दुरापास्त असते. गुल्हाटी कमिशनने शेतीकरिता किंवा विजेच्या उत्पादनाकरिता पाण्याचा उपयोग करण्याच्या योजनांचे गुणदोष एके ठिकाणी चर्चिले आहेत व अस्तिनास्ती पक्षी काय लक्षात घ्यावे याविषयीच्या मुद्द्यांची लहानशी यादी दिली आहे. ही यादी संपूर्ण नाही किंवा वादातीत नाही; परंतु तिजवरूनही तुलनात्मक विचार करणे किती कठीण आहे हे लक्षात येईल. कोणत्याच योजनेत सर्वच बाजू अनुकूल असणे शक्य नसते. तेव्हा अनुकूल-प्रतिकूल मुद्द्यांची सांगड घालून निर्णायक मापन कसे करावयाचे हा प्रश्न उरतोच.

याबाबत अलीकडे एका दिशेने विशेष प्रयत्न झाले आहेत. सर्व योजना व इतर खटाटोपांचा अंतिम उद्देश अर्थोत्पादन आहे असे मानल्यास निरनिराळ्या योजनांचा आर्थिक व्यवहारदृष्ट्या विचार करून प्रत्येकाचे एकंदर फल अजमावावे या दिशेने हे प्रयत्न झाले आहेत. अमेरिकेत जलसिंचन व विद्युत् निर्मिती प्रकल्प हाती घेण्याच्या आधी ठराविक पद्धतीने त्यांच्या संभाव्य आवक व जावक यांमधील प्रमाण अजमावावे हा संकेत झाला आहे. कृष्णा खोऱ्यातील काही प्रकल्पांचे मापन असल्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न गोखले अर्थशास्त्र संस्थेने गतवर्षी महाराष्ट्र सरकारकरिता केला. अर्थात तात्त्विकदृष्ट्या असेही म्हणता येते की, जेथे विनियोग फार भिन्न भिन्न परिस्थितींत भिन्न भिन्न प्रकारे केला जातो तेथे केवळ अर्थव्यवहारावर आधारलेली तुलना निर्णायक ठरतेच असे नाही. नफ्या-तोट्याच्या प्रत्यक्ष हिशेबात जे बसत नाही ते कामसुद्धा हाती घेणे अनेक वेळा योग्य समजले जाते, हे जुन्या दुष्काळनिवारणार्थ बांधलेल्या पाटबंधारे योजनांवरुन सिद्ध होते.

## पाणीवाटपाचे सयुक्तिक मार्ग

महाराष्ट्रापुरते बोलायचे तर गुल्हाटी कमिशनने वर्णिलेल्या गुणदोष पद्धतीने प्रकल्पांचा तुलनात्मक विचार केला किंवा आवक-जावकाचे प्रमाण काढण्याच्या अर्थशास्त्रीय पद्धतीने उत्तर काढले तरी दोन्ही बाबतीत आमची बाजू बळकट आहे. परंतु आज हा मार्ग राज्याराज्यांत वाटप करण्याकरिता स्वीकारणे शक्य नाही. याचे मुख्य कारण म्हणजे या करिता लागणारी तपशीलवार माहिती आज उपलब्ध नाही हे होय. गुल्हाटी कमिशनच्या अहवालावरून ही गोष्ट स्पष्ट होते. गुल्हाटी कमिशनने शिफारस केल्याप्रमाणे अधिक तपशीलवार माहिती मिळविण्याची जागोजाग व्यवस्था झाली, नदीमंडळे स्थापली, मास्टर प्लॅन तयार होऊ लागले, म्हणजे क्रमाने तपशिलात संशोधन व विचार होऊन बऱ्याच गोष्टींबाबत एकमत होण्याची शक्यता आहे. परंतु यास कालावधी लागणार. तोपर्यंत विवाद्य योजना हाती घेता येणार नाहीत. या गोष्टीस राज्य सरकारे कबूल होणार नाहीत. गुल्हाटी कमिशनच्या नेमणुकीमुळे आपल्या योजना स्थगित झाल्या याबद्दल आंध्र सरकारने मोठी हाकाटी केली; व आता तर काही झाले तरी आपल्या योजना पुढे रेटण्याचा आग्रह ते सरकार धरणारच. तेव्हा सर्व पर्यायी प्रकल्पांचा तपशीलावर विचार करून एक समग्र संकलित योजना तयार करण्याचा मार्ग आज तरी स्वीकारता येत नाही. कालांतराने याबाबत काय प्रगती होईल ती होवो.

प्राप्त परिस्थितीत हा प्रश्न सोडविण्याकरिता अन्य मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. दुसरा एक मार्ग राज्याराज्यांतील वाटपाच्या दृष्टीने विशेष योग्य असा उपलब्ध आहे. प्रत्येक प्रकल्पाचा तपशीलवार विचार करून एक साचेबंद योजना तयार केली तर प्रत्येक राज्याचे वैशिष्ट्य व विचार यांस फारसा वाव उरणार नाही. आपले संघराज्य आहे हे या प्रकरणी लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. निरनिराळ्या राज्यांतील आर्थिक व भौगोलिक परिस्थिती फार भिन्न आहे; एवढेच नव्हे तर संघराज्यघटनेप्रमाणे आर्थिक धोरणाच्या अनेक विभागांबाबत प्रत्येक राज्य बहुतांशी स्वायत्त आहे. प्रत्येक राज्य सरकारास स्वतंत्रपणे काही उत्पन्न तोडून द्यावे व त्याचा विनियोग त्या राज्यास स्वविचारे करू द्यावा हे तत्त्व संघराज्यकल्पनेच्या बुडाशी आहे. तेव्हा प्रत्येक राज्याच्या प्रत्येक प्रकल्पाच्या तपशीलवार विचारात न शिरता काही स्थूल गोष्टी विचारांत घेऊन प्रत्येक राज्यास पाण्याचा हिस्सा तोडून द्यावा व त्यास विनियोग योजना तयार करण्यास बरीच मुभा द्यावी, हा मार्ग प्रस्तुत प्रकरणी युक्त दिसतो.

हा मार्ग स्वीकारण्यास पंचवार्षिक फायनान्स कमिशनच्या कार्याचा आधार घेता येईल. निरनिराळ्या राज्य सरकारांचे एकंदर उत्पन्न व गरजा यांचा अदमास फायनान्स कमिशनला प्रथम घ्यावयाचा असतो; आणि तद्विषयक परिस्थितीचा आढावा काढून पुढील पाच वर्षांकरिता विशिष्ट करांच्या उत्पन्नाचे वाटप राज्याराज्यांत फायनान्स कमिशनने करण्याचे असते. हे वाटप करताना विविध सूचक आकड्यांचा अगर माहितीचा विचार केला जातो. उदाहरणार्थ, प्राप्तीच्या करावरील उत्पन्नाची विभागणी करताना राज्यांची लोकसंख्या व प्रत्येक राज्यात वसूल होणारे त्या कराचे उत्पन्न या दोन गोष्टी जमेस धरण्याची प्रथा पडली आहे. आजपर्यंत तीन फायनान्स कमिशने नेमली गेली. यांपैकी प्रत्येकाने या दोनच गोष्टी पण काहीशा भिन्न भिन्न प्रमाणांत आधारास घेऊन प्राप्तीच्या करांचे वाटप सुचविले. इतर काही करांच्या वाटपाच्या बाबतीत राज्यांचा मागासलेपणा निर्देशणाऱ्या काही आकड्यांचा विचार करण्यात येतो. काही वेळेस वाटपाचा मुख्य भाग लोकसंख्येच्या प्रमाणात विभागून अल्पसा भाग कमिशनला इष्ट वाटेल त्याप्रमाणे काही राज्यांस जादा भाग देण्याकरिता राखून ठेवतात. या सर्व प्रकरणी लोकसंख्या हे सर्वत्र सर्वांत प्रमुख गमक मानले जाते. फायनान्स कमिशने सर्व साधकबाधक विचार करतात; एवढेच नव्हे तर हे सर्व वाटप आपण कोणत्या विचारानुसार केले, निरनिराळे आकडे कशाचे सूचक म्हणून वापरले, त्यांचे तौलानिक महत्त्व कसे अजमावले व एकंदर

निष्कर्षास कसे पावलो याचे सांगोपांग विवरण दर फायनान्स कमिशनच्या अहवालात केलेले असते. यामुळे जरी कोणत्याही राज्यास आपला भाग पुरता मिळाला नाही असे वेळेस वाटले तरी पद्धतशीर रीतीने चार जाणत्या मंडळींनी निर्णय दिला म्हणून प्रत्येक राज्य तो मुकाट्याने स्वीकारते.

## केंद्रीय मंत्र्यांची भूमिका आक्षेपार्ह

वाटप करण्याच्या या पद्धतीची पाटबंधारे व वीज खात्याच्या मंत्र्यांना माहिती आहे. आपल्या निवेदनात तिचा त्यांनी उल्लेख केला; व असे वाटप करताना लक्षात घेण्याच्या बाबी म्हणून (१) लोकसंख्या, (२) लागवडीयोग्य प्रदेश व (३) क्षेत्र, (४) प्रवाहास मिळणारे पाणी व (५) दुष्काळी प्रदेशांच्या गरजा, याची नोंद घेतली. असे करून नंतर यावर असा शेरा मारला की, "ही तत्त्वे सकृद्दर्शनी योग्यच आहेत. परंतु ती व्यवहारात लागू करताना मोठ्या अडचणी निर्माण होण्याचा संभव आहे." राज्याराज्यांतील साधनसंपत्तीचे वाटप हे काम गुंतागुंतीचे आहे. ते एखाद्या साध्या गणिताचे उत्तर काढण्यासारखे सरळ किंवा सोपे नाही. हे जाणूनच आपली राज्यघटना तयार होताना पंचवार्षिक फायनान्स कमिशनची व्यवस्था करण्यात आली, तसेच २६२ कलमान्वये आंतरराज्य पाणीवाटप वाद मिटविण्याकरिता विशेष तरतूद करण्यात आली. पण अमुक तत्त्वानुसार विचार करणे युक्त असले तरी ते अडचणीचे आहे, म्हणून एका बाजूस तत्त्वांना डावलावयाचे व दुसऱ्या बाजूस आपणास वाटेल त्या प्रकारे काही तत्त्वांचा आधार न देता, समर्थनार्थ विवरण न करिता, वाटप जाहीर करून टाकावयाचे या मंत्र्यांच्या वर्तनास काय म्हणावयाचे तेच कळत नाही.

या परिषदेस मंत्र्यांचे निवेदन पटेल किंवा वाटप मान्य होईल असे वाटत नाही. परिषदेकरिता जे साहित्य तयार केले आहे त्यावरून महाराष्ट्राची मागणी किती सयुक्तिक व समजूतदारपणाची आहे हे लक्षात येईल. कोणत्याही प्रकारे विचार केला तरी आमच्या योजना फायदेशीर, आमची गरज निकडीची आणि आमची मागणी प्रमाणबद्ध आहे असेच दिसून येईल. मंत्र्यांनी आपल्या निवेदनात तुम्हाला जेवढे पाणी लागेल तेवढे सगळे मिळाले असे एका बाजूस म्हटले; आणि लगेच विद्युत निर्मिती करण्याकरिता नद्या पश्चिमवाहिनी करण्याचा निषेध दुसऱ्या बाजूस घातला. म्हणजे महत्त्वाच्या बाबतीत आम्हास जे आवश्यक त्यास मनाई करून सर्वांचे सारखे हित पाहतो असा आव आणला. यात वैषम्य वाटण्याचे कारण हेच की, आम्हांस अडसर घालून इतरांस पूर्ण मोकळीक केली; व तुमचे पुढे पाहून घेऊ असे मोघम आश्वासन दिले. हा सर्व प्रकार आम्हांस असमाधानकारक वाटतो. आमच्या राज्याचा विकास खुंटणार आहे, म्हणून हे वाटप बदलून घेण्याचा आम्हांस हरतऱ्हेने प्रयत्न केला पाहिजे.

हा प्रयत्न कसा करावयाचा याचा विचार मंत्र्यांनी जे निवेदन केले त्याचे स्वरूप काय, येथपासून केला पाहिजे. मंत्र्यांच्या निवेदनातील वाटपाचा भाग ही एक तडजोडीची सूचना म्हणून समजावयाची की हा त्यांचा निवाडा म्हणून समजावयाचा? मंत्र्यांना निवाडा देण्याचा अधिकार नाही हे स्पष्ट आहे. १९५१ चा करार किंवा तदनंतर झालेल्या सर्व वाटाघाटी यांत निर्णय एकमताने सर्वांच्या अनुमतीने झाले पाहिजेत, हे सर्वमान्य होते. गुल्हाटी कमिशनची नेमणूक होण्याच्या आधी सर्व राज्यांच्या प्रतिनिधींच्या परिषदा घेऊनच निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. २३ मार्च १९६३ च्या निवेदनाबाबत असे काहीच झाले नाही. एखादी संयुक्त परिषद किंवा सभा घेऊन निर्णय घेण्याच्या ऐवजी मंत्र्यांनी स्वतःच वाटप जाहीर केले. त्याने सर्वांचे समाधान झाले असते तर गोष्ट वेगळी होती. पण ज्याअर्थी महाराष्ट्रास निर्णय अन्यायकारक वाटतो त्याअर्थी आपल्या हक्काचे संरक्षण करण्याकरिता योग्य ती सर्व कारवाई महाराष्ट्र सरकारास केली पाहिजे.

## घटनेतील तरतुदी

भारतीय राज्यघटनेच्या २६३ व्या कलमान्वये आंतरराज्य पाणीवाटपाबद्दल वाद कसे मिटवावेत याविषयी स्पष्ट स्वतंत्र सोय केली आहे. या कलमाच्या आधारे पार्लमेंटने १९५६ साली असल्या वादात निवाडा देण्याकरिता लवादमंडळे नेमण्याविषयी एक कायदा केला आहे. १९५६ साली पास झालेल्या दुसऱ्या कायद्यान्वये आंतरराज्य नदीमंडळे नेमण्याची तरतूद केली आहे. परंतु या नदीमंडळांचे कार्य मुख्यतः सल्ला देण्याचे आहे. त्यांचा सल्ला प्रत्येक राज्य सरकारने मान्य केल्यासच तो कार्यवाहीत आणता येतो; एरवी नाही. याचा अर्थ असा की, प्रत्येक राज्याचे हितसंबंध या बाबतीत सुरक्षित राहावे म्हणून घटनेने व कायद्याने तरतूद भरपूर केली आहे. वेळ पडल्यास राज्य सरकारने या तरतुदीचा उपयोग केला पाहिजे एवढेच. शक्य तर सामोपचाराने सर्व वाद सुटावे हे तत्त्वतः सर्वच मान्य करतात. पण जेथे तडजोड आपसात होऊ शकत नाही तेथे लवादाचा निवाडा मागावा यात गैर अगर अनिष्ट काहीच नाही. या पाणी वाटपावर आपल्या राज्यातील पिढ्यानुपिढ्यांचे भवितव्य अवलंबून आहे. तेव्हा भिडेस्तव, तात्पुरत्या राजकीय अडचणीस्तव अगर इतर कोणत्याही कारणाकरिता अयोग्य, अन्याय्य, अमान्य वाटप स्वीकारावे हे बरोबर नाही. स्पष्ट म्हणावयाचे तर असे करण्याचा कोणास अधिकारच नाही.

या गंभीर प्रश्नाचा विचार येथे जमलेल्या अधिकारी मंडळींनी करावयाचा आहे. असा सांगोपांग विचार करून अन्याय होत आहे असे वाटल्यास त्याचे स्वरूप विशद करून त्याचे निवारण करण्याकरिता काय करावे याविषयीचा सल्ला आपण राज्य सरकारास द्यावयाचा आहे. कारण आपणांस या बाबतीत सरकारमार्फतच सर्व गोष्टी करावयाच्या आहेत.

कृष्णा–गोदावरी पाणीवाटप परिषद, पुणे, प्रास्ताविक भाषण, ३–८–१९६३ (डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन, *कृष्णा–गोदावरी पाणी वाटप परिषद : प्रबंध व निवेदन*, पुणे, १९६१)

☆

# १२ . . अन्नधान्य पुरवठ्याची गंभीर परिस्थिती

सध्या अन्नधान्याच्या पुरवठ्याबाबतची स्थिती अत्यंत गंभीर झाली आहे. पुढील चार महिन्यांत जर परिस्थिती आटोक्यात आणली गेली नाही तर ती आणखी शीघ्रगतीने बिघडण्याचा संभव आहे. त्यामुळे सर्व विचारी लोकांनी या प्रश्नावर लक्ष केंद्रित करणे जरूर आहे. गेल्या मार्चपासून बहुतेक सर्व राज्यांतील जनतेला ज्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या त्यांवरून सर्व राज्य सरकारे याबाबत काही व्यापक धोरण स्वीकारतील व परिस्थिती काबूत आणतील अशी आशा होती ती दुर्दैवाने निष्फळ ठरली आहे. केंद्र सरकारचीही या प्रश्नावरील पकड पूर्वीपेक्षा अधिक ढिली झाली आहे. सर्व प्रकारचे धान्यविभाग रद्द करण्यास मान्यता मिळण्याऐवजी प्रत्येक राज्याचा एक एक स्वतंत्र धान्यविभाग निर्माण झाल्याचे दिसत आहे. या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील खंबीर धोरणाची आवश्यकता अतोनात आहे. असे असले तरी प्राप्त परिस्थितीत सध्याच्या हंगामापुरते आपणास महाराष्ट्रातील धान्यपरिस्थितीकडे लक्ष केंद्रित करणे अपरिहार्य आहे.

## तांदळाची कहाणी

खरीपाची पिके उत्तम असल्याच्या वार्ता असूनसुद्धा महाराष्ट्र राज्यातील धान्यपरिस्थिती विकटच राहिली आहे. झा समितीने सुचविलेल्या व भारत सरकारने मान्य केलेल्या किमतींनुसार महाराष्ट्र सरकारने तांदळाच्या किमती विक्रीच्या विविध अवस्थांसाठी निश्चित केल्या आहेत. शेतकऱ्यांना भातास द्यावयाच्या किमती या किमान नसून, ठराविक आहेत; व त्यांवरूनच तांदळाची किरकोळ किंमत ठरवलेली आहे. या दोन किमतींतील तफावत ठरविताना तांदूळ सडण्याची पडतर व इतर आनुषंगिक खर्च वाजवी प्रमाणात ठरवून तांदळाच्या किरकोळ विक्रीच्या किमती बांधल्या आहेत. बाजारातील आवक समाधानकारक असली तरी त्यापैकी मोठा भाग व्यापाऱ्यांनी, ठरविलेल्या सरकारी किमतीपेक्षा बरीच जादा किंमत देऊन, आपल्या ताब्यात घेतल्याच्या वार्ता आहेत. यापुढील काही महिन्यांत हा तांदूळ सरकारने ठरविलेल्यापेक्षा पुष्कळ अधिक भावाने गिऱ्हाइकांस विकता येईल अशा खात्रीवर आजचे व्यापाऱ्यांचे व्यवहार आधारलेले आहेत. सरकारी किमतीपेक्षा जास्त किंमत देऊन व्यापारी सरकारी हुकूम मोडीत आहेत. तरीसुद्धा सरकारने त्यांच्याविरुद्ध काही कारवाई केलेली नाही किंवा योजलेली नाही हे खेदजनक आहे.

व्यापाऱ्यांनी नवा-तांदूळ विकत घेऊन टाकल्यानंतर सरकार तांदळाच्या किरकोळ किमतीवर नियंत्रण ठेवू शकणार नाही हे अगदी उघड आहे. म्हणून नव्या तांदळापैकी बराच माल सरकारने स्वतः विकत घेतला पाहिजे व नंतरच्या काळात त्याचे स्वस्त धान्य दुकानांतून वाटप केले पाहिजे.

सरकारच्या एका ताज्या घोषणेनुसार सरकार घाऊक व्यापाऱ्यांकडून सक्तीने धान्य वसूल करणार आहे. व्यापाऱ्यांच्या खरेदीस आळा घालावा व नंतर स्वस्त धान्य दुकानांसाठी पुरेसे धान्य मिळवावे, असा या घोषणेचा हेतू दिसतो. व्यापारी जोपर्यंत ठरविलेल्या किमतींपेक्षा जास्त किंमत देत आहेत, तोपर्यंत सरकारला प्रत्यक्ष खरेदी करून वा सहकारी सोसायट्यांमार्फत धान्य मिळण्याची शक्यता नाही. तसेच सक्तीच्या खरेदीच्या केवळ घोषणेचा काही उपयोग नाही. यापूर्वीच्या अशा सर्व घोषणांनी बाजारातील माल नाहीसा होतो असा अनुभव आहे. तेव्हा यापुढील तीन महिन्यांत सुसूत्र असा सक्तीच्या खरेदीचा कार्यक्रम अमलात आणून सरकारने नव्या तांदळापैकी बराच तांदूळ आपल्या ताब्यात घेणे आवश्यक आहे.

तांदळाबाबत एक अनुकूल गोष्ट अशी की सर्व भात अखेरीस सडण्यासाठी गिरणीतच येते. त्यामुळे सरकार भातगिरण्यांमध्ये तांदळाची सक्तीची खरेदी करू शकते. परंतु हे बोलणे सरकार काय करू शकेल यापुरते झाले; प्रत्यक्ष मात्र सरकार विशेष काही करीत नाही. उदाहरण द्यावयाचे झाल्यास व्यापाऱ्यांकडून जी निरनिराळी पत्रके सरकार मागविते त्यांच्या आधारावर सरकारला बाजारातील साठे हुडकून काढता यावेत. पण प्रत्यक्षात मात्र सरकारला काही करता येत नाही असाच अनुभव आहे. तेव्हा सक्तीने धान्य खरेदी करण्याचे अधिकार वापरण्याचा कार्यक्रम सुसूत्र, सातत्याने व राज्यव्यापी असा झाल्यासच उपयोगी पडतील अन्यथा नाही. याबरोबरच व्यापाऱ्यांकडून येणाऱ्या पत्रकांची छाननी करून बाजारातील साठेबाजीवर लक्ष ठेवण्याची मोहीमही अधिक परिणामकारक करावयास पाहिजे. तांदळापुरती तरी सध्या पूर्वीच्या अनुभवाचीच पुनरावृत्ती होत आहे. बाजारातील किमती चढत असताना, साठा ताब्यात घेण्याच्या नुसत्या घोषणांनी व्यापाऱ्यांच्या कारवायांना आळा बसत नाही, हेच सध्या दिसून येत आहे.

## ज्वारी खरेदीची योजना निष्प्रभ

ज्वारीबाबतची परिस्थिती काही बाबतींत तांदळापेक्षा चांगली तर काही बाबतींत वाईट आहे. ज्वारीच्या बाबतीत सरकारी उपाययोजना तांदळापेक्षा थोडी अधिक व्यापक झाली आहे. सरकारने ज्वारीचा अधिकृत भाव ठरवून दिला असून, ज्वारी खरेदीची मक्तेदारी आपणाकडे घेतली आहे. ज्वारीची किंमत ठरविताना महाराष्ट्र सरकारने झा समितीच्या शिफारशींकडे दुर्लक्ष केले असून, समितीने सुचविल्यापेक्षा ज्वारीची किंमत १५ ते २० टक्के जादा ठरविली आहे. यामुळे शेतकरी सरकारला ज्वारी घालतील अशी सरकारची अपेक्षा होती. परंतु ही योजना सुरू झाल्यानंतरचा अनुभव फारसा उत्साहजनक नाही. ज्वारीची बाजारातील आवक अतिशय कमी झाली असून, सरकारने ठरविलेली किंमत अगदीच कमी आहे असे मत काही राजकीय नेते व शेतकऱ्यांचे पुढारी व्यक्त करीत आहेत. खेड्यांमध्ये ज्वारीची किरकोळ विक्री करण्याच्या सवलतीचा दुरुपयोग होण्याची शक्यता व सरकारी यंत्रणेची नेहमीची ढिलाई यांमुळे ही ज्वारी खरेदी योजना निष्प्रभ ठरण्याचा धोका उत्पन्न झाला आहे. भाताप्रमाणे ज्वारी काही मोजक्या ठिकाणी केंद्रित होत नसल्याने ज्वारीची साठेबाजी आणि खेड्यांतील विक्रीद्वारा पुरवठ्याची पांगापांग त्या मानाने सोपी आहे.

आजच्या या अनुभवांमध्ये विशेष काही आश्चर्यकारक आहे असे मुळीच नाही. मे ६४ पासून बाजारात आलेला विस्कळितपणा, मालाची तीव्र टंचाई व अन्नधान्याच्या भडकत्या किमती यांमुळे उत्पादक व ग्राहक या दोहोंमध्ये साठा करण्याची प्रवृत्ती वाढली आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांच्या सट्टेबाजीस उपकारक वातावरण निर्माण झाले आहे. या परिस्थितीत सरकारने आपल्या खरेदीसाठी कितीही जास्त किंमत ठरविली असती तरी ती कमीच वाटली असती; व व्यापाऱ्यांनी कोणत्याही

किमतीच्या वर किंमत ज्वारीसाठी दिली असती. सरकारी उपाययोजना नेहमीच उशिरा होते व अपुरी असते; यामुळे दिवसेंदिवस सरकारी धोरण जरी अधिकाधिक कडक बनले तरी ते जास्त जास्त निष्प्रभ ठरून परिस्थिती सारखी बिघडत जाण्याचा दाट संभव आहे. प्राप्त परिस्थितीचे गंभीर सामाजिक परिणाम व अर्थ लक्षात घेऊन सर्वांनी एकवटून प्रयत्न करण्याची अत्यावश्यकता आहे ती यामुळेच !

## बाजारातील टंचाई व असमतोल

जेव्हा बाजारातील जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा मूलतः तोकडा असतो तेव्हा खुली बाजारपेठ ग्राहकांना या वस्तूंचे सम व न्याय्य वाटप करण्यास असमर्थ बनते. धान्याबाबतची परिस्थिती विशेष अवघड आहे. धान्याचा पुरवठा अल्पकाळात वाढविता येत नाही. दीर्घ मुदतीतसुद्धा धान्याचा पुरवठा फार मोठ्या प्रमाणात वाढविता येत नाही. धान्याच्या किमती कितीही चढल्या तरी त्यामुळे धान्याची मागणी विशेष कमी होणे अशक्य असते. धान्य ठराविक हंगामांत पिकते व त्याचे उत्पादन देशभर समप्रमाणात होत नाही. यामुळे धान्याचा पुरवठा ठराविक भागात केंद्रित व कालमानाच्या दृष्टीने खंडित असतो. परिणामी उत्पादक, ग्राहक व व्यापारी यांनी साठेबाजी केल्यास मागणी व पुरवठा यांत विशिष्ट स्थळी व काळी प्रचंड तफावत पडण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत सरकारजवळ सातत्याने काम करणारी वाटपयंत्रणा असल्याखेरीज एकदा किमती चढू लागल्या म्हणजे रोखणे अशक्य ठरते. एखादे वेळी एकदम बाजारात मोठ्या प्रमाणावर धान्य उपलब्ध करून देण्याने हा प्रश्न सुटू शकत नाही.

अशा परिस्थितीत व्यापारी पद्धतीतील अपयशास व्यापाऱ्यांचा एखादा कट जबाबदार आहे असे मानणे बरोबर नाही. प्रत्येक ग्राहक, उत्पादक व व्यापारी केवळ स्वतःला बचावण्यासाठी काही हालचाली करतो; व त्यामुळे किमती चढू लागल्या की ती प्रतिक्रिया एक प्रकारे स्वयंचलितच होऊ लागते. असे झाले की बाजारातील कोणतीही प्रेरणा परिस्थिती आणखी बिघडू न देण्यास अपुरी पडते. व्यक्तिगत स्वरूपाच्या साठेबाजीमुळे बाजारात निर्माण होणारा असमतोल मर्यादेत राहील इतक्या प्रभावीपणे सरकारी यंत्रणा काम करीत असेल तरच बाजाराचे कार्य सुरळीत चालू शकते. परंतु बाजारातील टंचाई व असमतोल जितकी जास्त तितकी जास्त परिणामकारक व व्यापक सरकारी कारवाईची गरज असते. वरील विवेचनाच्या अनुरोधाने हल्लीच्या सरकारी उपाययोजनांची फेरतपासणी करणे आवश्यक आहे. गेल्या सहा महिन्यांतील अनुभवाने प्रत्येक जण अतिशय साशंक झाला आहे; व प्रत्येकाच्या व्यक्तिगत बचावाच्या पवित्र्यांनी सर्वसाधारण परिस्थिती अधिकच बिघडत आहे. उत्पादक आणि सधन ग्राहक यांच्या साठेबाजीने मूळची परिस्थिती जास्त बिघडत आहे.

सध्याची सर्वांत तातडीची गरज जनतेतील घबराट कमी करण्याचा सरकारने व पुढाऱ्यांनी प्रयत्न केला पाहिजे ही आहे. तसेच जनतेपुढे लांब पल्ल्याचा एक समावेशक असा जीवनावश्यक वस्तुविषयक कार्यक्रम ठेवला पाहिजे. यामुळेच केवळ ग्राहक व उत्पादकांची मनोवृत्ती बदलेल आणि परिस्थिती झपाट्याने आटोक्यात आणता येण्याच्या दृष्टीने उपकारक असे त्यांचे व्यवहार होऊ लागतील. हे होऊ शकले नाही तर परिस्थिती सुधारणे तर दूरच राहिले पण आहे तेही धान्य नीटपणे संभाळले वा हाताळले जाणार नाही. सरकारी खरेदीतून सुटण्यासाठी धान्याचे साठे पांगविले जातील, अयोग्य जागी धान्य साठविले जाईल, वाकड्यातिकड्या नेआणीमध्ये बरेच धान्य वाया जाईल व आधीच अपुरा असलेला धान्यसाठा अधिकच अपुरा पडेल.

## राज्यपातळीवर कार्यवाही आवश्यक

सध्या कलेक्टर व महसूल अधिकाऱ्यांना धान्यखरेदीबाबत अतिरिक्त अधिकार देऊन, राज्याच्या धान्यपुरवठ्याच्या दृष्टीने जिल्हावार तुकडे करण्यात आले आहेत. हे धोरण चुकीचे असून त्वरित बदलले पाहिजे. अशा प्रकारचे धोरण ही पूर्वी ब्रिटिश सरकार दुष्काळाच्या वेळी अमलात आणीत असलेल्या उपायांची चुकीची व अनावश्यक नक्कल आहे. त्या वेळी एका ठिकाणाहून, दुसऱ्या ठिकाणी धान्य तातडीने हलविता येत नसे; व स्थानिक धान्यपरिस्थितीची माहिती बिनचूक मिळणे कठिण जात असे. त्यामुळे तेव्हा कलेक्टरांना जिल्ह्यापुरते सर्वाधिकार देणे आवश्यक होते. परंतु सध्या बाजारांची माहिती मिळविणे, खरेदी व विक्रीसाठी व्यापक यंत्रणा अस्तित्वात आणणे व धान्याची नेआण त्वरित करणे या सर्व दृष्टीने सरकारजवळील साधनसामग्री कोणत्याही परिस्थितीस तोंड देण्याइतकी समर्थ आहे. त्यामुळे स्थानिक मागणी व स्थानिक पुरवठा यांत समतोल राखणे ही सध्याची समस्या नसून संपूर्ण राज्यातील मागणी व पुरवठ्याचा समतोल राखणे ही आहे. राज्याचे धान्यदृष्ट्या आणखी लहान भाग पाडण्याचे धोरण अतिशय चुकीचे असून त्यामुळे तुटीच्या भागांचा प्रश्न अधिकच जटिल होऊन बसतो. महाराष्ट्रासारख्या तुटीच्या प्रांतासाठी तर हे धोरण अगदी अप्रस्तुत आहे. जिल्हाधिकाऱ्यांना जादा अधिकार दिल्याने सध्या सरकारी हुकमांचे अर्थ निरनिराळ्या प्रकारे लावले जात असून अन्नपरिस्थिती कार्यक्षमपणे हाताळली जात नाही. त्याचबरोबर जिल्हाधिकाऱ्यांना जिल्ह्यांतील अन्नपरिस्थितीबाबत जबाबदार धरणेही बरोबर नाही. कारण ही परिस्थिती सर्वसाधारण टंचाई व सरकारी धोरण यांतून उद्‌भवली आहे.

महाराष्ट्र हे अन्नधान्याच्या दृष्टीने तुटीचे राज्य आहे. या राज्यात दोन किंवा तीन धान्यांना प्रामुख्याने मागणी आहे. भाताच्या पाच जिल्ह्यांत व शहरी भागांतील काही वर्गांत तांदूळ हे धान्य प्रामुख्याने खपते. उरलेल्या बहुतेक ग्रामीण भागांत ज्वारी हे प्रमुख अन्न आहे. गेल्या दहा वर्षांत आयात गव्हाचा पुरवठा वाढल्याने शहरी लोकसंख्येपैकी बरेच लोक गहू खाऊ लागले आहेत. महाराष्ट्रात गव्हाचा स्थानिक पुरवठा अतिशय तोकडा असल्याने याबाबत आपणांस केंद्रावर अवलंबून राहावे लागते. तांदळाच्या बाबतीतही आपल्या राज्यात तूट आहे; परंतु ती गव्हाइतकी नाही. परंतु केंद्र सरकारजवळील तांदळाचा साठा फार अपुरा आहे. यामुळे महाराष्ट्र सरकारने तांदळाच्या स्थानिक उत्पादनातून राज्यातील गरज भागविण्याचा आटोकाट प्रयत्न केला पाहिजे. ज्वारीबाबत बाहेरून पुरवठा होण्याची यावर्षी शक्यता नाही. त्यामुळे सामान्य जनतेस मोठ्या प्रमाणात लागणाऱ्या या धान्याच्या पुरवठ्यासाठी महाराष्ट्र सरकारने राज्यातच पराकाष्ठेचे प्रयत्न केले पाहिजेत.

## अराजकाचा संभव

मार्च एप्रिलपर्यंत ज्वारी व तांदूळ यांचा मोठा साठा सरकारला करता आला नाही तर परिस्थिती खरोखरच अती भीतिदायक बनेल यात शंका नाही. सध्याच्या भरमसाठ किमती कायम राहिल्या, आणि शेतकरी व व्यापारी यांनी धान्यसाठा पांगविला व दडविला तर आपणांस ज्यावेळी धान्याची अत्यंत गरज असेल अशा वेळी म्हणजे पावसाळ्यात सरकारजवळ काहीही धान्यसाठा असणार नाही. सर्व धान्य बडे व्यापारी व शेतकरी यांच्या हाती एकवटले जाईल. मग मात्र अराजकसदृश परिस्थिती निर्माण होण्याचा संभव आहे.

शेतकऱ्यांच्या नेत्यांनी अशा अराजकसदृश परिस्थितीच्या संभाव्यतेकडे त्वरित लक्ष देणे हे अतिशय जरुरीचे आहे. अस्थिर अशा परिस्थितीत मोठ्यांत मोठ्या अशा शेतकऱ्यांसही शहरी भागांतील धनवंताप्रमाणे आपल्या हितसंबंधांचे रक्षण करणे शक्य होणार नाही. शेतकीचे व्यवहार यशस्वीपणे

पार पडण्यास काही किमान स्वरूपाची राजकीय व सामाजिक स्थिरता अत्यावश्यक असते. तसे पाहिले तर सामाजिक जीवनात शांतता टिकविण्याची जबाबदारी सर्वच वर्गांची आहे. परंतु काही वर्ग व्यक्तिगत फायद्यासाठी सामाजिक हिताकडे फार मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष करू शकतात. मोठ्यांत मोठ्या शेतकऱ्यांचीदेखील गणना या वर्गात होऊ शकणार नाही. शेतकऱ्यांचे हे म्हणणे सकृद्दर्शनी बरोबर दिसते की व्यापारी, कारखानदार जेव्हा शेतकऱ्यांना पिळून काढीत होते तेव्हा जर सरकार मध्ये पडले नाही तर आतादेखील सरकारने मध्ये न पडता शेतकऱ्यांस परिस्थितीचा फायदा उठवू द्यावा. परंतु शेतकऱ्यांच्या नेत्यांनी अशी भूमिका घेणे अत्यंत अदूरदृष्टीचे ठरणार आहे. सरकारने या परिस्थितीत काही न करणे हेदेखील तितकेच अदूरदृष्टीचे ठरणार आहे. चालू परिस्थितीत सर्वंकष किंमत व पुरवठा धोरण यांची आखणी, घोषणा व कार्यवाही त्वरित होणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्र सरकारने त्याच्या सर्व सामर्थ्यानिशी असे अन्नधोरण अमलात आणले पाहिजे की, ज्यायोगे शेतकऱ्यांच्या उत्पादनाच्या व दैनंदिन जीवनाच्या किमान गरजा भागतील व त्यांना सरकारी किमतीला बाजारात आवश्यक तितके धान्य आणण्यास चालना मिळेल.

हा असा प्रश्न आहे की, ज्यावर समाजातील सर्व वर्गांच्या नेत्यांनी एकत्र येऊन योग्य ती उपाय-योजना केली पाहिजे. या प्रश्नातील प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी स्पष्ट केली पाहिजे. दिखाऊ व अनावश्यक असा धान्याचा उपयोग व ग्राहकांची साठेबाजी यांचा समाजाने धिक्कार केला पाहिजे. सामाजिकदृष्ट्या उपकारक असे वर्तन जे शेतकरी व व्यापारी करतील त्यांचा योग्य गौरव झाला पाहिजे. सरकारने जनतेला पूर्णपणे विश्वासात घेतले पाहिजे. ह्या प्रश्नाकडे एक अपक्षीय प्रश्न या दृष्टिकोणातूनच सर्वांनी पाहिले पाहिजे. सरकार व सामाजिक मतांची घडण करणारे नेते यांच्यांत पद्धतशीर व सातत्याने विचारविनिमय होत राहिला पाहिजे. सरकार हे निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे आहे व सरकारचे विधानसभेत प्रचंड बहुमत आहे म्हणून त्याला सल्लामसलतीची जरूर नाही, असे सरकारने मानणे सर्वस्वी चूक आहे. युद्धाच्या कालखंडात ब्रिटिश सरकारही अशा प्रकारची सल्लामसलत घेत असे. सध्याच्या बिकट परिस्थितीत महाराष्ट्र सरकारनेही जबाबदार नेत्यांच्या सल्ल्याने त्वरित पावले टाकली पाहिजेत.

जनतेच्या नेत्यांच्या सहकार्याने सरकारने निदान एक वर्षापुरते तरी पुढे पाहून अन्नधोरणाची आखणी करावयास पाहिजे. केवळ तात्पुरते उपाय योजून हा प्रश्न सुटणार नाही. सर्वच जीवनावश्यक वस्तूंच्या किमती व पुरवठ्यासंबंधी विशेषतः अन्नधान्यासंबंधी सरकारने समावेशक धोरण निश्चित करून अत्यंत तातडीने त्याची अंमलबजावणी केली पाहिजे.

*केसरी*, २३-१२-६४

☆

# १३ . . महाराष्ट्र राज्य एकाधिकार ज्वारी खरेदी योजना

महाराष्ट्र सरकारने यंदाच्या हंगामात एक अभिनव ज्वारी खरेदी योजना घडविली; आणि राज्यातील सहकारी खरेदी-विक्री व्यवस्थेच्या तर्फे अमलात आणली. या योजनेत आतापर्यंत २० लाख पोत्यांहून अधिक ज्वारी खरेदी करण्यात आली आहे; व येत्या महिन्याभरात हा आकडा २५ लाखांवर जाईल असा अंदाज आहे. सुरुवातीच्या खरेदी संबंधीच्या अपेक्षा अवास्तव ठरल्या असल्या तरी, एकंदरीने योजना यशस्वी झाली आहे, असे म्हणण्यास काहीच हरकत दिसत नाही.

## महाराष्ट्राची अन्नधान्य समस्या

ज्वारी खरेदी योजनेचे महत्त्व कळण्याकरिता महाराष्ट्राच्या अन्नधान्य समस्येचे स्वरूप लक्षात घेतले पाहिजे. अन्नधान्याच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य तुटीचे आहे. महाराष्ट्रातील मुख्य अन्नधान्य-पिके जोंधळा, बाजरी, तांदूळ व गहू ही आहेत. गहू येथे अल्प प्रमाणात पिकतो; व गव्हाला मागणीही सामान्य जनतेकडून पूर्वापार फारशी नाही. तांदूळ पिकणारे विशिष्ट जिल्हे आहेत. तांदळाची मागणी मुख्यतः त्या जिल्ह्यांतील व इतर जिल्ह्यांच्या नागर भागांतील आहे. बहुसंख्य जिल्ह्यांत पिकणारी जोंधळा व बाजरी ही मुख्य अन्नधान्ये आहेत. जोंधळ्याच्या मानाने बाजरीचे पीक कमी व एकंदर उत्पादनापैकी विक्री होण्याचे प्रमाणही बाजरीत कमी; यामुळे बहुसंख्य जिल्ह्यांतील ग्रामीण व नागर भागांत मुख्यत्वे लागणारे अन्नधान्य ज्वारी हेच समजले पाहिजे. भारतात ज्वारीची आयात होत नाही. तसेच अन्नधान्याच्या नेआणीबाबत राज्यबंदी झाल्यानंतर इतर राज्यांतून जोंधळा, बाजरी मिळणे दुरापास्त झाले आहे. केंद्र सरकारकडून महाराष्ट्राची तूट भरून काढण्याकरिता परदेशी गहू व अल्प प्रमाणात तांदूळ मिळतो. गेल्या आठ दहा वर्षांत गव्हाचा खप विशेषतः महाराष्ट्रातील नागर विभागांत पुष्कळसा वाढला आहे; आणि तुटीची समस्या सोडविण्याकरिता केंद्राकडून मिळणाऱ्या गव्हाचा मुख्यतः उपयोग होतो.

## ज्वारी खरेदी योजनेमागील भूमिका

तुटीच्या राज्यांत तरी, खुला व्यापार ठेवून जनतेस अन्नधान्य योग्य प्रमाणात उपलब्ध होणे शक्य नाही हे अनेक कटू अनुभवांनी राज्य सरकारला कळले आहे. केंद्राकडून मिळणाऱ्या धान्याचे वाटप प्रमाणबद्ध रीतीने सरकारमान्य स्वस्त धान्याच्या दुकानांतून केले जाते. पण या धान्याचा पुरवठा पुरवणी-दाखल समजला पाहिजे. सामान्यांस नित्याचे लागणारे जोंधळा व तांदूळ यांच्या पुरवठ्याची व्यवस्था नीट केल्याखेरीज या पुरवणीचा फारसा उपयोग होत नाही. गतवर्षी हे विशेष रीतीने भासल्यामुळे

महाराष्ट्र सरकारास काही तत्संबंधी उपाययोजना करणे आवश्यक भासले व ज्वारी खरेदी योजना ही या धोरणाचा प्रमुख भाग म्हणून स्वीकारण्यात आली. ज्वारीचे वाटप किमान प्रमाणात वर्षभर सार्वत्रिक करता यावे हा या योजनेचा उद्देश. हा उद्देश साधण्याकरिता किमान २५ लाख पोती ज्वारी सरकारला या योजनेमुळे उपलब्ध झाली पाहिजे, असे गणित केले होते. मोठा साठा यंदा करता आला नाही तरी वाटपापुरती ज्वारी मिळाली आहे व या दृष्टीने योजनेने पहिला टप्पा गाठला असे म्हणण्यास हरकत नाही.

योजनेची सुरुवात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झाली. अन्नधान्याची टंचाई होती व ज्वारीचे भाव भडकले होते, अशा वेळी ज्वारी खरेदीस सुरुवात झाली. पण सरकारने ठरलेल्या धोरणात फरक पडू दिला नाही, खंबीरपणा स्वीकारला आणि परिस्थिती हळूहळू निवळली. पण आज केवळ पहिलाच टप्पा गाठला आहे. परिस्थिती पूर्णपणे काबूत येण्यास अजून पुष्कळ वाटचाल करावयाची आहे. यापुढील मार्गाचे थोडक्यात दिग्दर्शन करणे अप्रस्तुत ठरणार नाही.

सरकारने प्रथम निर्णय घ्यावयास पाहिजे तो हा की, अन्नधान्य योजनांचा विचार वर्षावर्षापुरता करावयाचा नसून दीर्घकालीन झाला पाहिजे. अन्नधान्याबाबत भारताची आणि विशेषतः महाराष्ट्राची परिस्थिती इतकी बिकट आहे की तात्कालिक सुधारणा कितीही दिसली तरी अडचणी पुन्हा केव्हा निर्माण होतील हे सांगवत नाही. तेव्हा तूट नित्याची असे गृहीत धरून अनेक वर्षांचे धोरण बांधले पाहिजे. याचा अर्थ असा की, जोंधळा व तांदूळ यांचा पुरवठा अंतर्गत खरेदी करून दरवर्षी मोठ्या प्रमाणात सरकारने आपल्या हाती ठेवला पाहिजे; आणि किमान प्रमाणात, बांधलेल्या भावात स्वस्त धान्य दुकानांतून या धान्यांचे वाटप केले पाहिजे. धोरणाची ही दोन्ही अंगे एकमेकांस पूरक आहेत. पुरेसा साठा उपलब्ध असला तर वर्षभर वाटप करता येते; आणि वाटप नित्याचे केल्यामुळे भाव स्थिरावले तर शेतकऱ्यांकडून योग्य भावात धान्य खरेदी करण्यास अडचण पडत नाही. तेव्हा आता खरेदी केलेली ज्वारी स्वस्त धान्य दुकानांतून ठराविक प्रमाणात वर्षभर वाटणार व पुढील वर्षी यंदाच्या पद्धतीने ज्वारी विकत घेणार, हा निर्णय सरकारने लवकर जाहीर करावयास हवा.

ज्वारी खरेदी योजनेत शेतकऱ्यांस स्थानिक विक्रीची बरीच मुभा दिली आहे. यामुळे जेथे ज्वारी पिकते तेथे ज्वारी खेडेगावांत पुरेशी मिळेल अशी कल्पना आहे. परंतु उलटपक्षी तक्रारी ऐकू येतात. तेव्हा याबाबतच्या धोरणाचा विचार करून ते वाटपाच्या धोरणाशी संलग्न केले पाहिजे. तसेच नागर भागांतून वाटप करावयाचे ते किमानपक्षी पुढील रब्बी हंगामापर्यंत समप्रमाणात करता येईल या हिशोबाने केले पाहिजे. अजूनही एकंदर वाटप धोरणात स्थानिक अधिकाऱ्यांवर फार जबाबदारी टाकण्यात येते. यापुढील ज्वारी-वाटप सर्व स्वस्त धान्य दुकानांतून कार्डावर होणार आहे. तेव्हा साखरेसारखे याबाबतचे प्रमाण निश्चित करून ते सार्वत्रिक वर्षभर चालेल अशी योजना सगळीकडे सारखी अमलात आणली पाहिजे. पुढील वर्षाच्या ज्वारी खरेदीच्या भावाविषयीही लवकरच विचार सुरू केला पाहिजे. यंदाचा निर्णय भारत सरकारशी पुरेसा विचारविनिमय केल्याशिवाय घेतला अशी महाराष्ट्र सरकारविरुद्ध तक्रार आहे. अशा तक्रारीस वाव न मिळावा म्हणून आतापासूनच या प्रश्नास हात घातला पाहिजे. खऱ्या अर्थी खरेदीचे भाव पावसाळ्याच्या तोंडासच जाहीर व्हावयास पाहिजेत; परंतु निदान ऑगस्टमध्ये ते जाहीर होतील व सर्व खरेदी योजनेचा तपशील ठरेल असे झाले पाहिजे. यंदाची योजना घाईने अमलात आणली गेली. तिच्या अनुभवाचे मूल्यमापन करून पुढील वर्षाकरिता योग्य ती सुधारणा तीत करावयास हवी. आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकसंधीपणा व एकसूत्रता येईल याकरिता काही यंत्रणा निर्माण केली पाहिजे. लढाईच्या काळातील अनुभवाची माहिती मुंबईच्या सचिवालयात आहे. तिचा फायदा घेऊन या नवीन आवश्यक यंत्रणेचा विचार व्हावा.

## ज्वारी खरेदी योजनेची वैशिष्ट्ये

यंदाच्या ज्वारी खरेदी योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये दोन. प्रथम सरकारने ज्वारी खरेदीचा एकाधिकार आपणाकडे घेतला हे आणि योजनेची अंमलबजावणी संपूर्ण सहकारी व्यवस्थेमार्फत केली हे दुसरे. योजनेचे मूल्यमापन करताना दुसऱ्याकडे लक्ष देणे जरुरीचे आहे. नेहमीच्या सरकारी कारभाराची पद्धती अशी की कारभार करावयाचा तो सहकारी संस्थांमार्फत प्रत्यक्ष संस्था अलग वाढवून करावयाचा. सहकारी संस्थांनी कोणतेही क्षेत्र अंशतःच व्यापले असल्यास संस्था-संस्थांशी निराळा संबंध ठेवणे साहजिक घडते. परंतु महाराष्ट्रात आज अनेक क्षेत्रांत सहकारी संस्था सार्वत्रिक असल्यामुळे त्यांत राज्याची सहकारी व्यवस्था निर्माण झाली आहे असे म्हणण्यास हरकत नाही. उदाहरणार्थ, जिल्हा सहकारी बँकांस जिल्हा परिषदांच्या बँका म्हणून नियोजिल्यामुळे राज्यातील समग्र सहकारी बँक व्यवस्था जिल्हा परिषदांस राबविता येते; आणि एखाद्या जिल्ह्यात काही अडचणी निर्माण झाल्यास त्यांचे निराकरण चटकन होऊ शकते. ज्वारी खरेदी योजनेत राज्य सरकारने सहकारी व्यवस्थेमार्फत काम करून घेण्याचे ठरविले आणि खरेदीची सर्व जबाबदारी राज्यातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांची शिखर संस्था या नात्याने महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग सोसायटीवर टाकली. यामुळे व्यवस्था एकसंधी व एकसूत्री करणे सुकर झाले. खरेदी, प्रतवारी, साठा, पैसा पुरवठा या सर्व जबाबदाऱ्या सहकारी व्यवस्थेवर पडल्यामुळे ठिकठिकाणी संस्था विशिष्ट कार्याकरिता नियुक्त करणे, सेवक वर्गास आवश्यक शिक्षण देणे, सहकारी बँकांस योजनेत निगडित करणे इत्यादी विविध प्रकारचे काम एकाहाती झाले. एवढेच नव्हे तर स्थानिक उणीवा भरून काढण्याकरिता मोठ्या यंत्रणेचा त्वरेने उपयोग करता आला. परिणामी, ज्वारी-खरेदी, ४०० केंद्रे व ३५० उपकेंद्रे मिळून एकंदर ७५० ठिकाणी होऊनही खरेदी, पैसा, कोठार, व्यवस्था इत्यादींबाबत किरकोळ तक्रारींखेरीज काही जास्त विरोधात्मक ऐकू आले नाही. महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग सोसायटीचे अध्यक्ष व इतर पदाधिकारी आणि मॅनेजिंग डायरेक्टर आणि त्यांचे सहायक हे या एकंदर घटनेबद्दल अभिनंदनास खचित पात्र आहेत. त्याबरोबर खरेदी कारभाराच्या पलीकडे खरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे महाराष्ट्रातील सहकारी व्यवस्थेने अवघड जोखीम पेलण्याचे दाखविलेले सामर्थ्य, हे मानणे युक्त ठरते.

## सहकारी व्यवस्था आणि सरकारी धोरण

या सहकारी खरेदी व्यवहाराच्या अनुषंगाने सहकारी व्यवस्थेविषयीच्या सरकारी धोरणाबाबत दोन शब्द लिहितो. आपल्या देशातील सर्व पक्षोपपक्षांनी भांडवलशाही किंवा साम्यवाद यांऐवजी सहकाराचा स्वीकार केला आहे आणि देशात सहकारी लोकराज्य अथवा सहकारी समाज निर्माण करण्याचे ठरविले आहे. पण हे कार्य किती अवघड आहे, त्याचा पाठपुरवठा किती सातत्याने केला पाहिजे आणि त्याबाबत किती पथ्ये पाळली पाहिजेत याचा जितका खोलवर विचार व्हावयास पाहिजे तितका होताना दिसत नाही. सहकारी समाजाची निर्मिती केवळ काही सहकारी संस्थांचा पुरस्कार करून व्हावयाची नाही; किंवा अनेक पद्धतीच्या पर्यायी व्यवहार पद्धतींपैकी एक अशा प्रकारे सहकाराकडे बघून व्हावयाची नाही. सहकारी समाज निर्माण करणे हे एका अर्थी नवीन समाज घडविण्याचे कार्य आहे. समाजास अर्थव्यवहारांबाबत एक नवीन दृष्टिकोण स्वीकारावयास लावणे व नवीन कार्यपद्धती अवलंबणे हे येथे करावयाचे आहे. प्रत्येक व्यवहारात कोणते फायदेशीर हे तात्कालिक पाहावयाचे नसून काय उचित व विहित आहे हे पाहावयाचे आहे. सहकारी मार्गाने नीती व व्यवहार ही दोन्ही अंती साधतात अशी एकदा खात्री पटल्यावर विशिष्ट व्यवहार खऱ्या अर्थी सहकारी व कार्यक्षम आहे एवढेच पाहणे उरते. प्रत्येक बाबतीत तात्कालिक फायद्याचे गमक

लावणे धोक्याचे ठरते. उदाहरणार्थ, व्यापाराच्या अनेक बाबतींत खाजगी व्यवहारात जे परवडते ते सहकारी व्यवहारात झेपत नाही. हे का याचा खोलवर विचार न करता तात्कालिक निर्णय घेतले तर नेमक्या ज्या प्रवृत्तींना विरोध करण्याकरिता सरकार व समाज सहकाराची कास धरतात त्यांना उत्तेजन दिले असे होईल.

राष्ट्रीय धोरण हे सहकारी समाजाच्या निर्मितीचे आहे असे ठरले म्हणजे त्याचा पाठपुरावा समग्र सरकारी यंत्रणेने केला पाहिजे. केवळ सहकारी खात्याने सहकारी व्यवस्थेचा पुरस्कार करावयाचा व इतरांनी आम्ही सहकारी व बिनसहकारी यांत भेद मानण्यास तयार नाही असे म्हणावयाचे, हे सर्वसामान्य उद्दिष्टांची उपेक्षा, अवहेलना करण्यासारखे आहे. धोरणाच्या विशिष्ट भागाविषयी कोणाच्या अडचणी असल्यास त्यांचे निराकरण करून घेणे हे योग्य व आवश्यक आहे. परंतु घोषित धोरणाबाबत विशिष्ट खात्यांनी किंवा अधिकाऱ्यांनी बेफिकिरी दाखविणे हे सरकारी कारभारास काही निश्चित दिशा नाही, त्यात एकसूत्रता नाही याचे प्रदर्शन करण्यासारखे आहे.

सरकारी धोरणाबाबत दुसरा महत्त्वाचा विचार हा, की सरकारने सतत, समग्र, एकसंधी व्यवस्था प्रत्येक क्षेत्रात प्रस्थापित करण्याकरिता झटले पाहिजे. सहकारी व्यवस्थेची विशिष्ट संघात्मक घटना आहे. तीत निरनिराळ्या स्तरांवरील संस्थांमधील परस्पर संबंधांविषयीचे संकेत बांधलेले आहेत. काही अंतर्गत शिस्त आहे. सगळ्यांचा उद्देश सहकारी व्यवस्थेत बळकटी यावी व सहकारी प्रवृत्ती पोसली जावी हा आहे. नवीन समाज-निर्मितीचे काम समग्र व्यवस्था प्रस्थापित झाल्याशिवाय होऊ शकणार नाही. त्याअर्थी एक स्वायत्त, स्वयंचलित व्यवस्था म्हणून सहकारी संघटना वाढेल अशा दृष्टीने तत्संबंधीचे सरकारी धोरण आखले गेले पाहिजे. सुदैवाने महाराष्ट्रात असा पायंडा आधीच अंशतः पाडला आहे. तो सर्व क्षेत्रांत कटाक्षाने स्वीकारावा एवढाच वरील लिखाणाचा उद्देश आहे.

सरकारी व्यवस्थेबद्दल एवढे व्यापक धोरण स्वीकारले म्हणजे उलटपक्षी सहकारी संघटनेविषयीच्या अपेक्षाही उंचावणे स्वाभाविक व रास्त आहे. सहकारी समाज व व्यवस्था या विषयी बोलावयाचे तर केवळ एखादी संस्था किंवा काही संस्थांचा गट कार्यक्षम रीतीने चालविला एवढे म्हणून भागत नाही. सहकारी व्यवस्थेतील खास अपेक्षित गुण व प्रवृत्ती यांवर भर द्यावा लागतो. सहकारी संस्थांत चढाओढ दिसली किंवा असहकार दिसला, आपल्या संस्थांपुरतेच मोठे सहकारी कार्यकर्ते पाहू लागले तर खऱ्या अर्थी सहकारी व्यवस्था कधीच निर्माण होणार नाही. बहुजन हिताय व बहुजन सुखाय यांचे शब्दशः प्रत्यंतर आले पाहिजे. सर्व स्थाने व सर्व स्तर यांचा सहकारी व्यवस्थेत सारखाच समावेश आहे. उपेक्षित व दुबळ्यांकडे त्यांत विशेषत्वे लक्ष पुरविले जात आहे आणि सहकारी पुढारी इतरांपेक्षा जास्त दूरदर्शी, समदर्शी आणि समन्वयी आहेत असे दिसेल तेव्हाच सहकारी व्यवस्थेस मानाचे स्थान मिळेल, हक्काने मागता येईल. याही दृष्टीने ज्वारी खरेदीच्या अखिल राज्य समावेशक योजनेने सहकाराचे एक पुढचे पाऊल टाकण्यास मदत केली, असे म्हणण्यास हरकत नाही.

*एकाधिकार ज्वारी खरेदी योजना* (मुंबई : दि महाराष्ट्र स्टेट को–ऑप. मार्केटिंग सोसायटी लि., १९६५) पृ० १–५

☆

# १४ . . शेतीसाठी पाणीपुरवठ्याच्या नियमनातील समस्या

शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याच्या नवीन योजना आखणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच सध्याच्या पाणीपुरवठ्याच्या सोयींचे नियमन व देखभाल करणे हेही महत्त्वाचे आहे. पिकांसाठी पाणीपुरवठा करण्याच्या ज्या सोयी सध्या उपलब्ध आहेत त्यांचे नियमन करताना, प्रथम उपस्थित होणारा प्रश्न म्हणजे अशा नियमनाचे उद्दिष्ट काय असावे? पाणीपुरवठा नियमनाची उद्दिष्टे निश्चित केल्याखेरीज, नियमनाची सुयोग्य पद्धत आखता येणार नाही. अशा नियमनाची उद्दिष्टे गेल्या काही दशकांत बदलत गेली आहेत. या शतकाच्या पहिल्या दशकात जे इरिगेशन कमिशन नेमले गेले त्या कमिशनने पाणीपुरवठा योजनांमध्ये संरक्षक पाणीपुरवठा योजना व उत्पादक पाणीपुरवठा योजना अशा स्वरूपाचा भेद कल्पिला होता. जेथे पाऊस निश्चित व पुरेसा नाही तेथील पाणीपुरवठा योजना संरक्षक स्वरूपाच्या व जेथे मुबलक पाऊस पडतो, पण जादा उत्पादनासाठी पाणीपुरवठ्याच्या सोयी केल्या आहेत, तेथील पाणीपुरवठा योजना उत्पादक स्वरूपाच्या असे या भेदाचे स्वरूप होते. परंतु नंतरच्या काळात शेतीव्यवसायाचे जसजसे व्यापारीकरण होत गेले, तसतशी पाणीपुरवठा योजनांची उत्पादक बाजू महत्त्व पावत गेली. निर्वाह–शेती–व्यवस्थेमध्ये उत्पादक पाणीपुरवठा योजनांना तसे स्थान नव्हते. परंतु परिवर्तनशील अशा शेतीव्यवसायाच्या संदर्भात उत्पादक पाणीपुरवठा योजनांचे महत्त्व वाढू लागले. ह्या बदलत्या संदर्भात, पाणीपुरवठा नियमनाच्या तत्त्वातही बदल होणे स्वाभाविक आहे. आज पाणीपुरवठा नियमनाच्या कामामध्ये भविष्यातील गरजांचा अंदाज घेणे व सध्याची गुंतवणूक संकल्पित कार्यासाठीच प्रायः उपयोगी कशी पडेल ते पाहणे महत्त्वाचे ठरते.

पाणीपुरवठा नियमनामधील एक मूलभूत प्रश्न म्हणजे एखाद्या धरणयोजनेपासून अधिकात अधिक फायदा व्हावा की अधिकांत अधिकांचा फायदा व्हावा? मुळात पाणीपुरवठ्याच्या सोयीची निर्मिती करतानाही हाच प्रश्न महत्त्वाचा ठरतो. एखाद्या धरणयोजनेपासून जास्तीत जास्त उत्पादकांना लाभ व्हावा हा हेतू ग्राह्य धरला तर अशा हेतूने केलेल्या पाणीपुरवठा नियमनामुळे एकूण शेतीउत्पादन जास्तीत जास्त होईलच असे नाही. शिवाय शेतीउत्पादन पाणीपुरवठ्याच्या सोयीमुळेच वाढले की अन्य काही घटकांमुळे वाढले हे कसे ठरवावयाचे? शेतीउत्पादनातील वाढीने काही शेतकऱ्यांचा फायदा झाला तरी राष्ट्रीय दृष्टिकोणातून एकूण अर्थव्यवस्थेस किती फायदा झाला हे कसे ठरवणार? सारांश, आर्थिक विकासातील केंद्रीकरण व विकेंद्रीकरण यांतील मूलभूत विरोध याही क्षेत्रात दृश्यमान होतो. पाणीपुरवठा नियमनाची सर्वसाधारण तत्त्वे असोत किंवा एखाद्या धरणाचे व्यवस्थापन असो, या मूलभूत विरोधाची दखल घ्यावीच लागते.

## महाराष्ट्रातील पाणीपुरवठ्याच्या समस्या

महाराष्ट्रातील बहुतेक जमीन कोरडवाहूच राहाणार आणि अशा भागामध्ये मर्यादित क्षेत्रासच विहिरीतून पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकेल असे महाराष्ट्र इरिगेशन कमिशनला (१९६०) आढळले. ज्या भागात कालव्याचे पाणी मिळते, विशेषतः जेथे बारमाही नगदी पिके घेता येतात तेथील शेतकरी राज्यातील इतर शेतकऱ्यांच्या मानाने विशेष संपन्न बनतात. ह्या समस्येची तीव्रता कमी करावी या दृष्टीने धरणयोजनांचा लाभ जेवढ्या विस्तृत क्षेत्रास देता येईल तितका देण्याचा प्रयत्न व्हावा अशी शिफारस कमिशनने केली. असे न केल्यास नव्या धरणयोजनांद्वाराही जुन्या धरणयोजनांप्रमाणेच शेतीचा एकांगी विकास होईल, असाही कमिशनने इशारा दिला होता. हा हेतू प्रधान मानल्यामुळे कमिशनने जमिनीवरील व जमिनीखालील पाण्याचा समतोल उपयोग करून घेण्यासाठी एक तपशीलवार योजना तयार केली. जमिनीवरील व जमिनीखालील पाण्याचा संयुक्त विनियोग करण्याच्या पद्धतीस अखिल भारतातही आता महत्त्व येत असून पाणीपुरवठा भरपूर असलेल्या भागातही ट्यूब-वेल वगैरे मार्गांनी जमिनीखालील पाण्याचा उपयोग करण्यास प्राधान्य मिळत आहे. या पद्धतीने उपलब्ध पाण्याचा पुरेपूर उपयोग तर होतोच, शिवाय दलदल वा पाणथळ होण्याच्या प्रक्रियेस आळा बसतो.

पाणीपुरवठ्याची एक पूरक सोय एवढ्याच दृष्टीने महाराष्ट्र इरिगेशन कमिशनने जमिनीखालील पाण्याचा विचार केलेला नाही. महाराष्ट्रातील भूपृष्ठाखाली खूप खोलपर्यंत खडकांचा स्तर आहे, आणि त्यामुळे विहिरींना पाणी लागणे अनिश्चित असते. मात्र याच खडकाच्या स्तरांमुळे कालव्याच्या लगतची जमीन पुष्कळ पाणी सामावून घेते. त्यामुळे महाराष्ट्र इरिगेशन कमिशनने लिफ्ट इरिगेशन व कॅनॉल इरिगेशन अशा दोन्ही पद्धतींच्या संयुक्त उपयोगाची (लिफ्ट-कम-फ्लो सिस्टिम) शिफारस केली. यातील मूळ कल्पना अशी की, कालव्याच्या क्षेत्रातील जमिनीखालील पाण्याचा, कालव्याच्या पाण्यास पूरक म्हणून उपयोग व्हावा व मर्यादित पाणीपुरवठ्यापासून जास्त क्षेत्रात फायदा व्हावा. निरनिराळ्या पद्धतींचा विचार करून इरिगेशन कमिशनने असे सुचविले की, कालव्यालगतच्या बारमाही पिकास एकाआड एक फेरपाळी (ऑल्टरनेट रोटेशन) या पद्धतीने कालव्याचे पाणी द्यावे व दोन पाळ्यांच्या दरम्यान विहिरीच्या पाण्याचा उपयोग करण्याची सक्ती उत्पादकांवर असावी. या पद्धतीत कालव्यामध्ये सतत पाणी वहात राहते व पोटकालव्यांमध्ये आळीपाळीने पाणी सोडले जाते. मुख्य कालव्यात सतत पाणी राहिल्याने आसपासच्या क्षेत्रातील विहिरींना पाणी चांगले राहते. ही पद्धत उचित असूनही महाराष्ट्र सरकारने अद्यापही अमलात आणलेली नाही. कालव्याच्या पाण्यापासून सध्या ज्यांना लाभ होत आहे ते शेतकरी व पाणीपुरवठ्याचे नियमन करणारी यंत्रणा या दोहोंचाही ही पद्धत अमलात आणण्यास विरोध आहे. परंतु धरणयोजनांचा लाभ जास्तीत जास्त लोकांना मिळावा असा जर सरकारचा हेतू असेल तर 'लिफ्ट-कम-फ्लो' पद्धतीस वास्तविक दुसरा कोणताही पर्याय नाही.

पाणीपुरवठा नियमनातील दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे निरनिराळ्या पिकांना व निरनिराळ्या हंगामांत पाणी देताना काय दर आकारावे! पाणीपुरवठा योजनांपासूनचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीनेही या प्रश्नास महत्त्व आहेच. सर्वंथ वर्षभर व सर्व पिकांना एकाच दराने पाणीपुरवठा करण्यापेक्षा पिकाची गुणवत्ता व पाणीपुरवठा करण्याचा काळ व हंगाम यांनुसार पाणीपुरवठ्याचे दर ठरविणे अधिक किफायतशीर ठरेल हे उघड आहे. जास्त किमती पिके घेणाऱ्या शेतकऱ्याने पाणीपुरवठ्यासाठी जास्त किंमत देण्यास तयार असणे आवश्यक आहे. तशी ती त्याला देता येणे शक्य आहे. त्याचप्रमाणे पाण्याच्या टंचाईच्या काळात होणाऱ्या पाणीपुरवठ्यासाठी जास्त दर लावणेही आवश्यक आहे. यासाठी पाणी वाटपावर व शेतीउत्पादनावर सध्यापेक्षा अधिक नियंत्रण असणे अर्थातच जरुरीचे आहे.

जेथे कालव्याखाली येणाऱ्या क्षेत्रातील शेतकऱ्यांची पाण्याची मागणी धरणयोजनापासून उपलब्ध होऊ शकणाऱ्या पाण्यापेक्षा जास्त आहे तेथेही अनेक प्रश्न उपस्थित होतात. बारमाही व जास्त पाणी लागणाऱ्या पिकांना किती पाणी पुरवठा करावयाचा व इतर हंगामी पिकांना किती पाणी पुरवठा करावयाचा यात काही समतोल राखणे आवश्यक आहे. पाणथळ वा दलदल वाढू नये यासाठी काही पिकांच्या लागवडीवर नियंत्रण घालणे, पाण्याचा पुरवठा मुबलक असताना त्याचा उपयोग जास्त व्हावा यासाठी प्रोत्साहन देणे, याही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. अन्नटंचाईच्या काळात धान्यपिकांस उत्तेजन मिळावे या दृष्टीने पाणीपुरवठा नियंत्रित करणेही आवश्यक आहे.

ज्या धरणयोजनांत उपलब्ध पाणीपुरवठा बदलता असतो, अशा धरणयोजनांत अल्प मुदतीचे व लांब मुदतीचे करार यांत समतोल राखण्याचा प्रश्न उपस्थित होतो. किंमती पिकांच्या लागवडीत जास्त गुंतवणूक करीत असताना एखाद्या वर्षी पाणीपुरवठा कमी पडणार नाही याची काळजी घेणे महत्वाचे आहे. या सर्व प्रश्नांमुळे महाराष्ट्रामध्ये पाणीपुरवठ्याच्या बाबतीत ब्लॉक पद्धतीचा विकास झालेला आहे. परंतु ब्लॉक पद्धतीमुळे निरनिराळी हायब्रीडची प्रायोगिक पिके घेण्यामध्ये अडथळा येत आहे, अशी महाराष्ट्रातील कित्येक प्रगत शेतकऱ्यांची तक्रार आहे. पाणीपुरवठ्याचे करार फार लांब मुदतीचे न केल्यास व कोणती पिके घ्यावयाची हे स्थूलमानाने ठरविल्यास ही अडचण दूर होण्यास मदत होईल.

पाणीवाटप व पोटकालव्यांची देखभाल आणि दुरुस्ती यांमध्ये स्थानिक व्यवस्थापनास वाव देण्याच्या प्रश्नाचा विचार करताना सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीचा विचार करणे अगत्याचे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे वसाहतवादी अर्थव्यवस्थेमधून लोकशाही विकेंद्रित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतर करीत असताना शासनकर्त्यांच्या मनोभूमिकेमध्ये व शासनाच्या पद्धतीमध्ये अनेक बदल होणे आवश्यक आहे, हे आपण पुरेसे जाणलेले नाही. शिक्षण, पाणीपुरवठा, जंगले, आरोग्य अशा कोणत्याही क्षेत्रातील व्यवस्थापन असो, त्याची कार्यक्षमता मुख्यतः स्थानिक जनतेच्या सक्रिय सहकार्यावरच अवलंबून असते. आज शासनाचे अधिकार बरेच कमी झाले आहेत. पण त्या प्रमाणात स्थानिक जनतेवरील जबाबदारीत वाढ झालेली नाही. स्थानिक नेतृत्वाखालील व्यवस्थापन कार्यक्षम व सचोटीचे ठरू शकते याचा पडताळा प्रवरा सहकारी साखर कारखान्याने अमलात आणलेल्या पाणी-व्यवस्थापन योजनेत आला आहे. या कारखान्याने उन्हाळ्यामध्ये, त्याच्या कार्यक्षेत्रातील सभासद, बिगरसभासद अशा सर्व शेतकऱ्यांना पाणीपुरवठा केला व त्या कामी चांगले यश मिळविले. स्थानिक व्यवस्थापनाला वाव देण्याचा प्रयोग यशस्वी होऊ शकतो एवढे या कारखान्याने सिद्ध केले आहे.

सारांशाने, शेती व्यवसायाकरिता पाणीपुरवठ्याच्या नियमनाचा विचार विविध सामाजिक-आर्थिक उद्दिष्टांच्या संदर्भामध्ये करावयास हवा. पाणीवाटपामुळे होणाऱ्या लाभाचे योग्य विभाजन व्हावयास हवे. त्याबरोबरच उपलब्ध जमीन व पाणी यांचे संधारण आणि पर्याप्त उपयोग कसा होईल हे पाहणे आवश्यक आहे. तसेच जमिनीचा मगदूर राखून किफायतशीर अशी पिके काढण्यास उत्तेजन द्यावयास हवे. याबरोबरच पाणीपुरवठ्याची योजना योग्य रीतीने राबविण्याकरता पाणीपुरवठ्याच्या नियमनामध्ये स्थानिक जनतेचा सहभाग मिळविणे महत्त्वाचे होय.

*केसरी*, १०–३–१९६८ (सेंट्रल बोर्ड ऑफ इरिगेशन अँड पॉवर, ४० वे वार्षिक अधिवेशन, नवी दिल्ली, उद्घाटनाचे भाषण, २३–११–१९६७, संक्षिप्त अनुवादावरून)

☆

# विभाग : ३

## आर्थिक
## नियोजन

# १ . . प्रादेशिक समाज व प्रादेशिक अर्थव्यवस्था

प्रादेशिक समाज व प्रदेशअर्थव्यवस्था यांविषयी स्वतंत्र विचार करणे कसे इष्ट व आवश्यक आहे हे सुरुवातीसच स्पष्टपणे नमूद केले पाहिजे. याबाबत विचारांत बराच गोंधळ दिसतो व बरेच गैरसमज आहेत. हे गैरसमज टिकून राहण्याचे मुख्य कारण असे दिसते की, मोठ्या क्षेत्रांबाबतचा अगर समूहांबाबतचा म्हणून मांडलेला विचार हा लहानांबाबतच्या मांडलेल्या विचारांपेक्षा व्यापक भूमिकेवरून झाला असलाच पाहिजे, अशी वरवर पाहणाऱ्यास खरी वाटणारी कल्पना. जरा खोलवर विचार केला तर ही कल्पना अत्यंत चुकीची आहे असे दिसून येईल. ब्रिटिश राज्यकर्ते खुल्या व्यापाराच्या तत्त्वाचे समर्थन अखिल विश्वहिताच्या भूमिके-वरूनच करीत असत. न्यायमूर्ती रानड्यांनी यावर टीका करताना संपन्न व मागासलेली राष्ट्रे यांतील व्यवहाराचा विचार ती दोन्ही एका पायावर आहेत असे समजून करता येत नाही व मागसलेल्यां-करिता धोरण आखताना त्यांची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन ते आखले पाहिजे असे प्रतिपादिले. पुढच्या काळात सर्व हिंदी राजकीय पुढाऱ्यांनी याच विचारसरणीचा जोराने पुरस्कार केला. हा न्याय सर्वत्र सारखाच लागू आहे. समर्थ व दुर्बल यांची गाठ पडता, माझ्या विशिष्ट परिस्थितीचा विचार करून मला संरक्षण हवे आहे अशी मागणी कोणत्याही व्यवहारात दुर्बलालाच करावी लागते; आणि मग तो कोत्या वृत्तीचा म्हणून दुर्बलाची हेटाळणी करण्यास समर्थ नेहमी तत्पर असतात. जागतिक, राष्ट्रीय अगर एखाद्या खेड्यातील कोणताही समाज घ्या. संपन्न, बलवान, सत्ताधारी सर्व प्रकारे शक्ती, युक्तीचा अवलंब करून आपले आसन टिकवणे आणि अधिकारक्षेत्र वाढविणे याकरिता सदैव उत्सुक असतात. त्यांना विरोध करणे, त्यांच्या कारस्थानांचा परिस्फोट करणे, दुर्बलांच्या हितांची जपणूक करणे हे केव्हाही समर्थांस व त्यांच्या पक्षपात्यांस रुचत नाही. पण या सर्व गोष्टी करणे अत्यावश्यक आहे; व त्या करावयाच्या तर विशिष्ट परिस्थितीच्या विचारापासूनच सुरुवात करावी लागते.

विषम परिस्थितीत जेवढा विशेष विचार आवश्यक तेवढाच तो समपरिस्थितीतही आहे. कोणत्याही मानवाची धारणाशक्ती व त्याचा अनुभव ही फार मर्यादित असतात. सर्व प्रकारच्या परिस्थिती, सर्व प्रकारचे विचारप्रवाह लक्षात आणू म्हटले तरी हे कोणास शक्य नाही. सामाजिक विचारांच्या इतिहासाच्या अलीकडील अभ्यासावरून व्यक्तींच्या विचारांचा एकांगीपणा व एकदेशीपणा उत्कटपणे ध्यानात आला आहे. अगदी अलिप्त असा भासणारा तत्त्वज्ञही जे सामाजिक विचार व्यक्त करतो त्यांवर बालपणचे संस्कार, सभोवारची परिस्थिती, निकटवर्तीयांचे हितसंबंध यांचा पगडा सदैव आढळतो. तटस्थ भूमिकेवरून लिहिणाऱ्या शास्त्रज्ञाची जेथे ही स्थिती तेथे स्वःताच्या व्यवहारात मग्न असलेल्या राजकारण्यांची अगर व्यावसायिकांची काय कथा! सहेतुक अगर अहेतुकपणे प्रत्येकाच्या विचारांत त्याची विशिष्ट परिस्थिती व हितसंबंध हे प्रतिबिंबित झालेले असतात. यांत कोणास दोष देण्याचा प्रश्न

नाही; केवळ मी मोठा व्यापक दृष्टीचा म्हणून कोणी इतरांस हिणवू लागला तर वरील विचार लक्षात आणणे महत्त्वाचे ठरते.

## लोकसहभाग हे लोकशाहीचे मर्म

प्रत्येक व्यक्तीचे विचार अशा रीतीने मर्यादित असतात हे मान्य झाल्यास या परिस्थितीत लोकशाही कशी चालू शकते याचा विचार करावा लागतो. लोकशाही म्हणजे पाच वर्षांत एकदा मतदान असे मी मानत नाही. एकदा प्रतिनिधी निवडून दिले म्हणजे राज्यकारभाराचा सारा मक्ता त्यांच्याकडे, हा विचार मला पटत नाही. दिल्लीहून सर्व देशभर सरसहा एकसारखी हुकमत चालावी हे मत मी पूर्णपणे लोकशाहीविरोधी समजतो. मग ही हुकमत बादशहाची असो अगर लोकनियुक्त प्रतिनिधींची किंवा एखाद्या लोकप्रिय पुढाऱ्याची असो. लोकशाही हे एक जीवनतत्त्व आहे व त्याचे मर्म प्रत्यही प्रत्येक व्यवहार अपण कोणत्या पद्धतीने करतो यात साठलेले आहे. ज्या प्रमाणात सर्व प्रकारचे राजकीय, आर्थिक, सामाजिक व्यवहार लोकांस समजावून, त्यांच्या संमतीने, त्यांच्या सहकार्याने अगदी लहानापासून अगदी विस्तीर्ण क्षेत्रसमूहापर्यंत प्रत्येक समूहात व खेड्यापासून वर प्रत्येक प्रादेशिक विभागात चालतील तेवढ्या प्रमाणात लोकशाहीचे प्रत्यक्ष दर्शन घडेल; आणि म्हणूनच वरिष्ठ सत्तेने कनिष्ठ सत्तेवर, मोठ्या समूहांनी लहान समूहांवर अन्याय केला तर त्याचा निषेध करणे, कायदेशीर प्रतिकार करणे हे अयोग्य तर नाहीच नाही, पण असे करणे म्हणजे लोकशाही दृष्ट्या व नैतिक दृष्ट्या आपले कर्तव्य ठरते.

काही तत्त्वज्ञ तर सर्वजण जेवढ्या कारभारात प्रत्यक्ष भाग घेऊ शकतात तेवढाच खरा लोकशाहीचा असे मानण्यापर्यंत मजल मारतात. प्रतिनिधींच्या द्वारा कारभार करणे ही खरी लोकशाही नाही असे त्यांचे मत आहे. आजच्या विस्तीर्ण राज्यात सर्वच कारभार प्रतिनिधिद्वारा चालतो. तेव्हा प्रतिनिधींची मध्यस्थीच नको हा विचार आत्यंतिक म्हणून सोडला तरी आधुनिक लोकशाही केवळ लोकनियुक्त प्रतिनिधींची अगर त्यांच्या पक्षाची हुकूमशाही होऊ नये याची काळजी घेणे अगत्याचे राहते. या संकटाच्या निवारणार्थ एकच उपाय म्हणजे लोकशाहीचा कारभार सांघिक करणे. याचा अर्थ कोठेच सारी सत्ता व सारा कारभार पूर्णतः केंद्रित न करता विभागाविभागाने, थराथराने, त्याची पद्धतशीर वाटणी करणे, आणि दर विभागाचा व दर थराचा व्यवहार त्याच्या अधिकारापुरता व क्षेत्रापुरता पूर्ण लोकशाही पद्धतीने स्वायत्त चालवू देणे हा होय. अशा लोकशाही व्यवहारात प्रत्येकजण आपापल्या मर्यादा संभाळून वागतो व मतप्रतिपादन करतो; आणि सर्व व्यापक धोरणे निरनिराळ्या प्रभावी मतांचा व विचारांचा समन्वय होऊन ठरली जातात.

हे घडून येण्यास, सर्वांची परिस्थिती व भावना जमेस धरण्यास सर्व विशिष्ट विचार निःसंकोच व्यक्त होणे इष्ट व आवश्यक ठरते. निरनिराळ्या धंदेवाल्यांचे अगर निरनिराळ्या वर्गांचे, उदाहरणार्थ, भांडवलवाले, मजूर, यांचे हितसंबंध जसे निरनिराळे असतात त्याप्रमाणे निरनिराळ्या प्रदेशांचेही. प्रत्येक प्रदेशाने आपल्या गरजा पाहणे, भवितव्याचा साधकबाधक विचार करणे, हे केवळ त्या प्रदेशाच्याच नव्हे तर सर्व राष्ट्राच्याही हिताचे आहे. विशिष्ट परिस्थितीचा अगर विशिष्ट भूभागाचा विचार करणे म्हणजे कोतेपणाचे लक्षण असे मला कधीच वाटले नाही. कोतेपणा म्हणजे खऱ्या अर्थी स्वार्थबुद्धी; आणि स्वतःच्या तात्कालिक स्वार्थाकडे लक्ष गरीबांपेक्षा श्रीमंतांचे, लहानांपेक्षा मोठ्यांचे कमी असते असा अनुभव जगात नमूद दिसत नाही. मला स्वतःला जगातील सर्व गरीब व अप्रगत राष्ट्रांच्या विकासाचा विचार करणाऱ्या राष्ट्रसंघाच्या समितीवर काम करण्याची संधी मिळाली. तसेच तालुक्या व जिल्ह्याएवढ्या राज्यांच्या विकासयोजना तयार करण्यातही भाग घ्यावा लागला. या भिन्नभिन्न

परिस्थितींत माहितीची व विषयांची व्याप्ती भिन्न होती. कोठे तपशील व प्रत्यक्ष व्यवहाराकडे लक्ष जास्ती द्यावे लागले तर कोठे तात्त्विक सर्वसाधारण विचार जास्त महत्त्वाचा ठरला. पण यामुळे काम करण्याच्या वृत्तीत अगर वैचारिक बैठकीत काही फरक झाला अगर होतो असे मला कधीच भासले नाही.

## प्रादेशिक एकतेचे महत्त्व

येथवर विशिष्ट प्रादेशिक विचार करणे हे सर्व दृष्टीने कसे श्रेयस्कर एवढे सांगितले. यापुढे महाराष्ट्राचे एकीकरण झाले म्हणून अखिल महाराष्ट्राकरिता विचार करणे हेही कसे ओघाने येते, युक्त ठरते याबद्दल दोन शब्द बोलतो. अनेक वर्षांच्या खटपटीनंतर सर्व भारतीय राज्यांची पुनर्घटना नुकतीच झाली आहे. प्रत्येक महत्त्वाच्या भाषकांचा असा गणला गेलेला प्रदेश शक्यतोवर एकत्र आणून विभक्त राज्ये बनवावयाची हे या पुनर्घटनेने साधले. यास प्रमुख अपवाद म्हणजे मुंबई राज्याचा. परंतु या राज्यासही त्याच्या निर्मितीच्या वेळेपासून द्वैभाषिक म्हटले आहे. याचा उघड अर्थ असा की, काही कारणास्तव मराठी व गुजराती भाषकांची वेगळी राज्ये इतरांप्रमाणे करणे शक्य झाले नाही म्हणून त्या दोघांचे मिळून एक जोडराज्य बनविले; मराठी भाषकांचा प्रदेश व गुजराती भाषकांचा प्रदेश हेच या जोडराज्याचे प्राथमिक घटक. तेव्हा या प्राथमिक घटकांपासून कोणत्याही प्रश्नाचा विचार करणे हे अपरिहार्य ठरते.

पण याहीपेक्षा महत्त्वाचे कारण अखिल महाराष्ट्राबद्दल विचार का करावा याबाबत सांगता येईल. लोकशाही—सामाजिक, राजकीय, आर्थिक—सर्व बाबींत प्रस्थापित करण्यास जेवढे मोठे एकजिनसी समाज निर्माण करणे शक्य आहे तेवढे करणे आवश्यक आहे. आज आपला समाज अनेक गोष्टींमुळे —विशेषतः जातिसंस्थेमुळे चिरफाळलेला आहे. तरी या सर्व ज्ञातींच्या मिळून बनलेल्या समाजास एक प्रकारची भाषिक प्रदेशाची मर्यादा आहे. महाराष्ट्रातील सर्व बहुसंख्य जातीजमातींचा विचार केल्यास त्या सर्वांचा बहुतेक महाराष्ट्रभर विस्तार आहे व आपापल्यापुरता त्यांचा समाज अखिल महाराष्ट्राचाच आहे. यापुढे जातिभेद शिथिल होऊ लागल्यास, धर्म, पंथ, इत्यादींमुळे आलेली भिन्नता कमी झाल्यास, पुढील साहजिकच स्थित्यंतर म्हणजे या सर्व प्रदेशाचा मिळून एक समाज होणे; आणि हे सुकर करण्याकरिता, सर्व महाराष्ट्राचा म्हणून एकजिनसी समाज निमाण करण्याकरिता अनुकूल परिस्थिती तयार करीत राहणे हे जरुरीचे आहे. याकरिता सर्व महत्त्वाच्या प्रश्नांचा महाराष्ट्र प्रदेशाचे प्रश्न म्हणून जेवढा विचार करू तेवढे इष्ट ठरते.

कोणत्याही समाजाला भौगोलिक मर्यादा असणे साहजिक आहे. समाजाची उभारणी ही मुख्यतः शेजारावर, निकट राहण्यावर झालेली असते. रोटीबेटी व्यवहार, देवघेव, शासन कारभार सर्व लगत-लगतच्या भूभागांत प्रामुख्याने होतात व त्यामुळे प्रत्येक प्रादेशिक जीवनास विशिष्ट वळण लागते. ऐतिहासिक घडामोडींमुळे या विशिष्ट वळणाचा त्या प्रदेशातील बहुसंख्याकांचे जीवन व विचार यांवर ठसा कायम उमटतो; त्यातून परंपरा निर्माण होते, तसेच विशिष्ट कूट प्रश्नही निर्माण होतात.

व्यक्ती व अखिल मानवजात यांच्या दरम्यान कोणताही सामूहिक विचार मनात आणू नये असे एकदा विनोबाजी म्हणाले. हा तत्त्वज्ञाचा विचार झाला. व्यवहारात आपणास आपले कुटुंब व गाव यांपासून, राष्ट्र व खंडापर्यंत सर्व विशेष विचार करावे लागतात. आज आपणांस भविष्याच्या दृष्टीने ठरवावयाचे एवढेच की, केवढा मोठा एकजिनसी प्रादेशिक समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. शक्याशक्यतेच्या मर्यादा काही आहेत असे मनात ठेवून विचार केला तर मराठी भाषकांच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या सर्व प्रदेशापुरता शक्य तेवढा एकजिनसी समाज निर्माण करण्याची कल्पनाच माझ्या मते फार व्यापक व दीर्घकालीन प्रयत्न लागणारी आहे. याहून लहान प्रदेशापुरता विचार

करण्याची जरुरी नाही; कारण मराठी भाषकांच्या सर्व प्रदेशात समाजरचना, परंपरा व मनोभूमिका यांबाबत महत्त्वाचे फरक कोठे आढळून येत नाहीत. याहून मोठ्या प्रदेशाचा विचार करावयाचा तर भाषा, परंपरा, परिस्थिती इत्यादी दृष्टींने विभागलेल्या समाजांचे एकीकरण घडवून आणणे शक्य आहे काय हा बिकट प्रश्न उद्भवतो. या प्रश्नास कायमचे नास्तिपक्षी उत्तर दिले पाहिजे असे मला वाटत नाही. पण याचा विचार भविष्यावर ढकलला पाहिजे, त्यास आज हात घालता येत नाही असे मात्र माझे निश्चित मत आहे. मोठमोठ्या एकभाषी प्रदेशांतील सर्व थरांचे, सर्व जमातींचे एकीकरण हेच आजचे फार मोठे महत्त्वाचे कार्य आहे, हेच खरे बिकट आहे. ते साध्य झाल्यास पुढील टप्पा गाठणे हे केवळ निरनिराळ्या प्रादेशिक समाजांतील वाढत्या दळणवळणावर अवलंबून राहील.

आपण सर्व भारतीयच, तेव्हा आपण व आपल्या शेजारचे समाज यांमध्ये अनेक साम्यस्थळे आहेत. गुजराती समाज व आपण यांच्यांत, भाषांतील व अर्थव्यवहारांतील निकट संबंध पुरातन आहेत. कर्नाटक व आंध्र यांच्यांत व आपणांत आचारविचारपरंपरेची अनेक क्षेत्रे व सामाजिक व आर्थिक परिस्थिती यांतील सारखेपणा उघड आहे. पण साम्याप्रमाणेच फरकही आहेत; आणि काही फरक फार महत्त्वाचे आहेत. उदाहरणार्थ, असे म्हणता येईल की, स्थूल मानाने गुजराती समाज संपन्न व व्यवहारकुशल तर आपला समाज गरीब व अर्थव्यवहारात प्रायः अडाणी आहे. भावना, परिस्थिती, परंपरा या सर्वांचा विचार करता सबंध महाराष्ट्रापुरता सामाजिक, आर्थिक इत्यादी धोरणांचा संकलित विचार करणे शक्य व सोईस्कर आहे. याहून विस्तृत प्रदेशात साम्यापेक्षा विभिन्नता जास्त बळावून कोणत्याही धोरणाच्या प्रश्नाचा प्राथमिक विचार सरळपणे मांडण्यास अडचण पडण्याचा संभव आहे.

आपणा सर्वांचे अंतिम साध्य एकच आहे. सर्व मानव जातीची पुष्टी, तुष्टी व शांती आपणांस साधावयाची आहे. याकरिता प्रयत्न करीत असता प्रत्येकास आपापल्या विवक्षित क्षेत्रात व भूभागात कार्य करावे लागते. साध्य एकच असले तरी विशिष्ट परिस्थिती व गरजा भिन्न आहेत हे विसरून चालत नाही. विभिन्नता ओळखून काम करणे, हे आमच्यांत काही फरक नाहीतच असा बहाणा करून वागण्यापेक्षा जास्त इष्ट व श्रेयस्कर, असा माझा स्पष्ट अभिप्राय आहे. भिन्न परिस्थिती व भिन्न प्रवृत्ती यांचा परिणाम, भिन्नता नाही हे म्हटल्याने नाहीसा होत नाही अगर कमी होत नाही. उलट भिन्नता आहे हे उघडपणे ओळखून डोळसपणे समन्वय केला तरच उत्तरोत्तर प्रगतीचा मार्ग सुकर होतो, असाच अनुभव आहे. अर्थात या सर्व बाबतीत तारतम्याचा विचार नेहमीच मनात बाळगला पाहिजे. भिन्नता ओळखायची हीसुद्धा समन्वय करण्याकरिता, याचे स्मरण सदैव राहिले पाहिजे.

या प्रास्ताविक विवेचनात मी फार खोलात शिरलो असे आपणांस वाटण्याचा संभव आहे. पण एवढे विवेचन मला आवश्यक वाटले. आपण आज एक नवीन प्रकारचा उपक्रम करीत आहो व तो एका नवीन राज्याच्या सुरुवातीस. अशा प्रसंगी आपल्या विचारांची मूळ बैठक ही सरळ, स्पष्ट व घट्ट मांडणे हे फार महत्त्वाचे आहे; व हे कार्य नीट झाले म्हणजे पुढील विवेचनाचा विस्तार न केला तरी चालते.

## महाराष्ट्राच्या विकासाचा प्रश्न

पुढील विवेचन मी मुख्यतः दोन भागांत करणार आहे. पहिला भाग महाराष्ट्र व त्यातील मुख्य प्रदेशांच्या गरजा व त्यांच्या विकासयोजना यांबाबतचा व दुसरा भाग व्यक्ती व संस्था आणि सरकारी आर्थिक धोरण यांसंबंधींच्या काही प्रश्नांचा. अखिल भारतीय परिस्थितीच्या व धोरणाच्या चौकटीतच आपणांस हा सर्व विचार करावयाचा आहे. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, अखिल भारतीय

धोरणाबाबत आपणांस विसंवादी सूर काढण्याची गरज भासू नये. हे धोरण गरीब व अप्रगत समाजाकरिता आखले गेलेले म्हणून महाराष्ट्रहिताला पोषक असेच ठरणार. कारण भारतापुरता विचार करताही महाराष्ट्र त्यातल्या त्यात गरीब व आर्थिकदृष्ट्या अप्रगत आहे. भारतातील धोरणासंबंधीचे काही मतभेद प्रदेशांप्रदेशांतील विषमतेमुळे उत्पन्न झाले आहेत. काही प्रदेश त्यातल्या त्यात संपन्न व विकसित आहेत, काही निसर्गाने संपन्न असले तरी आर्थिक विकासाच्या दृष्टीने मागासलेले आहेत, काही मागासले न गणले तरी गरीब आहेत. अशा निरनिराळ्या प्रकारच्या प्रदेशांच्या गरजा जमेस धरून अखिल भारतीय विकासयोजना आखावयाची. व्यवहारात केवळ एक तत्त्व स्वीकारून त्याप्रमाणे पूर्ण अंमलबजावणी करणे शक्य होत नाही. परंतु धोरणाचा एकंदर कल काय असावा याचा तात्त्विक दृष्ट्या निर्णय झालाच पाहिजे. तत्त्वाबाबत स्पष्ट निर्णय घेण्यास फारशी अडचण पडू नये असे मला वाटते. भारत हे जगातील एक गरीब व अप्रगत राष्ट्र आहे; गरीब व अप्रगत राष्ट्रांच्या विकासास हातभार लावणे हे संपन्न, प्रगत राष्ट्रांचे कर्तव्य आहे असे आपण मानतो; व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या सिद्धीकरिता इतरांकडून अशी मदत मिळेल हे आपण गृहीत धरले आहे. हे पाहता अंतर्गत विषमता कमी करण्याकरिता; मागासलेल्यांकडे विशेष लक्ष देणे व प्रगतांकडे कमी हे क्रमप्राप्तच आहे. हा विचार अर्थात तौलनिक दृष्ट्या सर्वत्रच लागू पडतो. महाराष्ट्र गरीब म्हणून त्याकडे इतर काहींपेक्षा जास्त लक्ष द्या म्हटले तर आमच्याहून जे गरीब व अप्रगत असतील त्यांकडे आणखी विशेष लक्ष देणे आम्ही योग्य मानले पाहिजे. तसेच महाराष्ट्रात अंतर्गत विचार करताना त्यातील काही प्रदेशांच्या गरजा जास्त असल्या अगर ते मागे जास्त उपेक्षित असले तर इतरांनी त्यांना अग्रहक्क दिला पाहिजे. भारतात सर्वांना शेवटी एकाच पायरीवर आणावयाचे, सर्वांना सारखेच संपन्न व प्रगत करावयाचे, हे उद्दिष्ट स्पष्टपणे मान्य करून त्याच्या अनुषंगाने दोन्हीपक्षी जे निर्णय सिद्ध ठरतील ते स्वीकारले पाहिजेत.

## महाराष्ट्रातील प्रादेशिक तफावत

महाराष्ट्र गरीब व अप्रगत या दृष्टीने त्याच्या विकासयोजनांचा विचार करावा हे म्हणणे मोघम झाले. याबाबत काही तपशील निर्देशिणे आवश्यक आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कोकण व देश या दोन भागांतील कोकण हा फार उपेक्षित आहे. देश हा तसा उपेक्षित नाही; परंतु त्याच्या परिस्थितीचे काही विशेष विकासयोजना तयार करताना लक्षांत घ्यावयास पाहिजेत. देशावरची खरी गरज मोठ्या धरणयोजनांची आहे. या धरणयोजना खर्चिक खऱ्या, पण तितक्याच फलदायी आहेत. इतकेच नव्हे तर देशावरील दारिद्र्य व आर्थिक असुरक्षितता यांवर त्यांखेरीज दुसरा उपायच नाही. या योजनांबाबत कधी कधी असा विचार सांगण्यात येतो की, कमी खर्चाच्या व त्वरित फळ देणाऱ्या योजनाच आपण प्रथम हाती घ्याव्या. हे जरी तात्पुरते खरे मानले तरी असे म्हणता येईल की, असले गमक सर्व प्रदेशांस सारखे लावता येत नाही. काही प्रदेशांत लहान-लहान सर्व प्रदेशभर विखुरलेल्या पाणीपुरवठ्याच्या, वीजउत्पादनाच्या योजना हाती घेणे शक्य असते; इतरांत भौगोलिक रचनेमुळे प्राथमिक योजना थोड्या स्थळी पण मोठ्या प्रमाणावर पुऱ्या केल्यानंतरच इतर विकासकार्यक्रम हाती घेता येतो, आधी नाही. सह्याद्रीच्या पूर्वेकडील आपल्या देशावरील परिस्थिती ही अशी आहे. त्या अर्थी या भागातील धरणयोजनांना अग्रहक्क मिळवून त्या शक्य तितक्या लवकर पूर्णतया पार पाडणे हे महाराष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. हा विचार राज्य सरकार व भारतीय नियोजनमंडळ यांजपुढे मुद्देसूदपणे व आग्रहाने मांडून त्यांस पटवून दिला पाहिजे.

कोकण, मराठवाडा व विदर्भ यांच्या प्रश्नांबाबत तपशील मांडू लागलो तर फार वेळ लागेल.

शिवाय परिषदेने करण्याच्या मुख्य कार्यापैकी असा तपशील मांडून विधायक सूचना करणे हे एक असल्यामुळे मी या विषयाचा विस्तार करीत नाही. केवळ या सर्व प्रदेशांच्या गरजांबाबत एक महत्त्वाची सर्वसामान्य विचाराची दिशा दिग्दर्शित करतो. आर्थिक प्रगतीला सुरुवात होणे, तपशीलवार विकासयोजना हाती घेणे हे किमान प्राथमिक तयारी झाली असल्याशिवाय करता येत नाही. ही प्राथमिक तयारी मुख्यतः दोन दिशांनी करावयाची असते. प्रदेशातील निसर्गसंपत्तीचे संरक्षण नीट तऱ्हेने होईल, तिचा नाश व दुरुपयोग थांबेल हे पाहणे ही एक दिशा; दुसरी, अर्थव्यवहारास जी आवश्यक प्रादेशिक साधने व संस्था लागतात त्यांची उभारणी करणे. यांना प्राथमिक गरजा म्हणण्याचे कारण हे की, त्यांच्याशिवाय भागशः विकासयोजना एक तर बऱ्याच अंशी हाती घेता येत नाहीत व हाती घेतल्या तरी इष्ट फलदायी ठरत नाहीत. जमीन व पाणी यांचे संरक्षण करणे, जंगले व खनिजे यांच्या उपयोगाचे दूरदृष्टया सुबुद्ध कार्यक्रम आखणे या गोष्टी साधल्या तरच पुढे या निसर्गसंपत्तीच्या साहाय्याने आर्थिक प्रगतीचा विचार करता येतो. तसेच, वाहतुकीची साधने, पाणी व वीज यांचा पुरवठा, बँका, सहकारी संस्था इत्यादींची व्यवस्था या सर्व गोष्टी प्रत्येक भागात किमान प्रमाणात उपलब्ध हव्यात. प्रदेशातील विकासयोजनांची पुढची पावले पडण्याच्या आधी विकासास आवश्यक अशा सर्व प्राथमिक गरजा भागविण्याची सोय हरएक प्रदेशात केली पाहिजे. कोकणात आगगाडी न्यावयाची याच्या विचारास ती लगेच किफायतशीर होईल किंवा नाही, येथून सुरुवात करावयाची हा मी विपरीत प्रकार समजतो. वाहतुकीची साधने नाहीत म्हणून व्यापार-उदीम वाढत नाही व व्यापार-उदीम पुरेसा नाही, म्हणून वाहतुकीची साधने होत नाहीत असे हे विचाराचे दुष्टचक्र आहे. ब्रिटिश राजवटीत असे बोलणे शोभून गेले. स्वराज्यात, सर्व देशाची सर्वांगीण उन्नती करण्यास उद्युक्त झालेल्या राजवटीत, हे टिकावयाचे नाही. आगगाड्या व रस्ते ही किमान प्रमाणात अस्तित्वात आल्याखेरीज कोठल्याच प्रदेशाचा आर्थिक विकास व्हावयाचा नाही. हा न्याय सगळीकडेच लागू आहे. मराठवाड्यात सर्वच प्रकारच्या वाहतुकीच्या साधनांची परिस्थिती मागासलेली आहे. विदर्भात याबाबतची परिस्थिती साधारण समाधानकारक असली तर दुसरी एक उणीव फारच मोठी भासते. ही उणीव म्हणजे, पाणी पुरवठ्याची साठवण करणे, जमिनीची धूप थांबविणे, इत्यादी मूलभूत प्रश्नांचा पद्धतशीर अभ्यास करण्यास येथे सुरुवातही झालेली दिसत नाही. मराठवाड्यातही या प्रश्नाचा विचार झालेला दिसत नाही. किंबहुना त्या प्रदेशात सगळेच करावयाचे राहिले आहे असे भासते. निसर्गसंपत्तीचे संरक्षण व तिचा योग्य उपयोग हा प्रश्न जितका महत्त्वाचा तितकाच बिकट व किचकट आहे. यासंबंधी महाराष्ट्र मध्यवर्ती दुष्काळनिवारण समितीच्या तज्ज्ञसमितीने घोडखोऱ्याची पाहणी करून एक अहवाल यंदाच प्रसिद्ध केला आहे, त्याकडे मी सर्वांचे लक्ष वेधतो. नियोजन अगदी खालपासून व्हावयास हवे अशी भाषा अलीकडे बरीच ऐकू येते. परंतु यातले प्रत्यक्ष काही घडू लागलेले नाही. घोडखोऱ्याची पाहणी म्हणजे स्थानिक परिस्थितीकडे बारकाव्याने पाहून प्रादेशिक विकासयोजना कशी आखता येईल हे दाखविण्याचा एक प्रयत्न आहे. आपल्या परिषदेने कोकण, मराठवाडा व विदर्भ या प्रत्येकात नमुना म्हणून एकेक अशी पाहणी अधिकृतरीत्या करून दाखविली तर पुढील कार्याची पूर्वतयारी म्हणून आपण एक पाऊल पुढे टाकले असे मी समजेन.

## नियोजनात लोकसहमतीचे महत्त्व

वरील चर्चेच्या अनुषंगाने एक महत्त्वाचा प्रश्न मी येथे उपस्थित करू इच्छितो. दुसरी पंचवार्षिक योजना तयार झाली तेव्हा आपण निरनिराळ्या राज्यांत होतो. त्या वेळी योजनेबाबतच्या कल्पना, भांडवली व चालू खर्चाचे कार्यक्रम, विशिष्ट क्षेत्रांतील उद्दिष्टे ही निरनिराळी होती व योजना बनविल्या

गेल्या त्या भिन्न भिन्न पायांवर बनविल्या. आता आपण एका राज्यात आलो असून यापुढील धोरण सर्वांस सारखेच लागू पडेल. पण हे पुढील धोरण यशस्वी व्हावयाचे असेल तर विशिष्ट बाबींतील जुन्या उणीवा भरून काढणे, सरकारी कारभाराची रचना, निरनिराळ्या खात्यांतील कार्यक्रमांचे स्वरूप, वेतनश्रेणी व निरनिराळ्या प्रकारच्या सरकारी मदतीचे मान व त्याबद्दलचे नियम यांतही सारखेपणा यावयास पाहिजे; व हे शक्य तितक्या लवकर झाले पाहिजे. याचा व पुढील धोरणाचा एक आवश्यक भाग म्हणून प्रादेशिक पंचवार्षिक योजनांची पुनः तपासणी करून त्यांत आवश्यक फेरबद्दल केले पाहिजेत. त्यांतील तपशिलाच्या भागावर सरकारचे लक्ष पूर्णपणे केंद्रित झाले असणारच. पण जनमताचा संबंध असलेल्या गोष्टीही या प्रश्नाशी निगडित आहेत. संस्थानांच्या विलीनीकरणाचा आपला अनुभव ताजा आहे. सर्वस्वी इष्ट गोष्ट घडत असताही संक्रमणावस्थेत काळजी न घेतल्यास हे झालेच कशाला असे वाटण्याची तात्पुरती तरी पाळी येऊ शकते, हा तो अनुभव आहे. याबाबत मुंबई राज्यातील महाराष्ट्राच्या भागावर माझ्या मते विशेष जबाबदारी आहे. मुंबई राज्यात इतर प्रदेश विलीन झाले असे नवीन राज्यरचनेचे स्वरूप आहे. तेव्हा नवीन अभ्यागतांस आपण कुठे भलतीकडे आलो असे वाटणार नाही, हे कटाक्षाने पाहणे महाराष्ट्राच्या जुन्या मुंबई राज्यातील भागांचे कर्तव्य ठरते. हे केवळ मंत्री, विधिमंडळाचे सभासद अगर सरकारी नोकर यांचेच कर्तव्य नसून, ही जबाबदारी प्रत्येक व्यावसायिक व प्रत्येक नागरिक यांची आहे असे मानणे जरूर आहे. या विचारातच दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत जे फरक घडवून आणावयाचे त्यांचाही समावेश होतो. हे फरक घडल्यामुळे कोणाचा तोटा व कोणाचा फायदा व्हावयाचा असे नाही. अंतिम प्रगती सर्वांचीच साधावयाची असल्यामुळे या तात्कालिक फेरबदलास खरोखर काही महत्त्व नाही. पण ते आपण किती तत्परतेने करतो, कोणत्या वृत्तीने करतो, हे खचित महत्त्वाचे आहे.

ओघाने, विषयच आला म्हणून सरकारलाही एक विनंती करतो. लोकशाही पद्धतीने व अगदी खालच्या थरांतून योजना बनवाव्या असे आपण पुष्कळ ऐकतो. पण विशिष्ट योजना खात्याखात्यांच्या, प्रदेशाप्रदेशांच्या कोणत्या, त्यांची उभारणी कोणत्या पायावर होत आहे याबद्दलची सार्वजनिक माहिती व चर्चा माझ्या मते आपणाकडे जवळजवळ अगदीच नाही. भारतीय नियोजनमंडळाने गेल्या वर्षांत नियोजनाबाबत विद्यार्थी चर्चामंडळाचा एक उपक्रम केला. देशभर कॉलेजा-कॉलेजांतून चर्चामंडळे स्थापली व शेवटी नेहमीप्रमाणे त्यांचा एक अखिल भारतीय मेळावा केला. पण या चर्चामंडळांत चर्चा झाली ती बहुशः सर्वसामान्य तत्त्वे व अखिल भारतीय आकडे यांची. यापेक्षा योजना तयार होत असता व तिची अंमलबजावणी होत असता, म्हणजे नेहमीच वर्षानुवर्षे, राज्यनिहाय, प्रदेश-निहाय योजना समजावणे व त्यांची विद्यार्थ्यांपासून प्रौढापर्यंत व सर्व प्रकारच्या व्यवसायाच्या लोकांत सार्वजनिक चर्चा होणे याबद्दल काही व्यवस्था व्हावयास पाहिजे. असे काही झाले तरच जनमत कळेल, एवढेच नव्हे तर योग्य रीतीने बनू लागेल. असल्या प्रकारच्या उपक्रमास नवीन राज्यातील वार्षिक योजनांच्या प्रादेशिक पुनर्विचारापासून सुरुवात करावी असे मी सुचवितो. म्हणजेच आम्ही हेतुपूर्वक पुनर्विचार करीत आहो तो इतका व या कारणांकरिता करीत आहो, असे सर्वांस कळून नवीन राज्याच्या सुपरिणामाबद्दल विश्वास वाटू लागेल.

## आर्थिक केंद्रीकरणावर नियंत्रण आवश्यक

सरकारी आर्थिक धोरणाचा विचार करण्याची सुरुवात या धोरणाच्या उद्घोषित उद्दिष्टांपासून करणे बरे. स्वतःची नियोजित आर्थिक प्रगती करून घेण्याकरिता प्रयत्नांची पराकाष्ठा करावयाची हे भारताचे सर्वमान्य धोरण आहे. आर्थिक विकास एवढे नियोजनाचे एकच उद्दिष्ट नसून त्याबरोबर समाजवादी

समाजरचना स्वीकारावयाची हेही महत्त्वाचे दुसरे उद्दिष्ट आहे. दुसरे उद्दिष्ट पहिल्याइतके सर्वसामान्यत्व पावले नसेल तरी त्याचा समावेश आपल्या आर्थिक योजनांत निश्चितपणे करण्याचे धोरण जाहीर झाले आहे. ही दोन्ही उद्दिष्टे सर्वांच्या सहकार्याशिवाय साधावयाची नाहीत. तेव्हा ही सहकार्याची भूमिका तयार करणे व त्याबद्दल काय अडचणी आहेत हे समजून घेणे, व त्या सत्ताधिकाऱ्यांस कळविणे हे आपणां सर्वांचे कर्तव्य आहे. नियोजित प्रगती व्हावयाची तर अर्थव्यवहाराचा विस्तार व त्याची विविध क्षेत्रांतील निश्चित दिशा ठरवून देणे हे विचारपूर्वक केले पाहिजे; इतकेच नव्हे, तर नियोजित मजल गाठण्याकरिता प्रत्येकाने काय केले पाहिजे व कसे वागले पाहिजे हेही, निदान स्थूल मानाने, योजनेत निर्देशिले पाहिजे. दुसरी पंचवार्षिक योजना नुकतीच प्रसिद्ध झाली आहे व काही महिन्यांपूर्वीच तीस विधिमंडळाची मान्यता मिळाली आहे. या योजनेबाबत आज प्रमुख तत्त्वाचा मतभेद समाजवादी विचारसरणीच्या स्वीकाराबाबतचाच दिसतो. मुख्य विरोधी सूर मोठे कारखानदार व व्यापारी यांचा आहे. हे संख्येने थोडे असले तरी आधुनिक पद्धतीच्या अर्थव्यवहाराची सर्व सूत्रे यांच्या हातांतच केंद्रित आहेत; व त्यांचे राजकारणातही साहजिकच मोठे वजन आहे. शिवाय आपल्या चेंबरच्या व आजच्या परिषदेच्या सदस्यांतही या मंडळींचे वजनदार प्रतिनिधी आहेत. तेव्हा समाजवादी रचना स्वीकारणे याचा अर्थ काय व ते कितपत व कसे सार्वजनिक हिताचे आहे, यावर मी आपले विचार सांगणे अप्रस्तुत ठरणार नाही. प्रथमतः खाजगी अर्थव्यवहाराच्या क्षेत्रात छोटे व मोठे हा भेद या विवेचनात का करावा लागतो हे सांगितले पाहिजे. आज मतभेद आहे तो मोठ्यांच्या व्यवहाराबाबतचाच. भारतीय समाजवादात शासनसंस्थेने प्रत्यक्ष अंगिकारिलेल्या व्यवहाराचे स्थान शक्य तितके मर्यादित राहणार. विकेंद्रीकरण व सहकारावर जोर देऊन खाजगी वैयक्तिक छोटे व्यवहार जितके पोसता येतील तेवढे पोसावे हे धोरण आता ठरलेले आहे. तेव्हा नियोजनामुळे अगर समाजवादी कल्पनांमुळे छोट्यांच्या स्वतंत्र अस्तित्वावर गदा येईल असे दिसत नाही. अर्थात नुसत्या आश्वासनाने भागत नाही. धोरणाचा तपशील व त्याची अंमलबजावणी यांचा प्रत्यक्ष परिणाम काय होतो हेही पाहिले पाहिजे. पण छोट्यांच्या क्षेत्रांत निदान कोणताही तात्त्विक विचार उद्भवत नाही. मोठ्यांच्या बाबत तसे नाही. मोठे जे क्षेत्र आज व्यापतात त्यातले त्यांच्याकडे, म्हणजे एकंदर खाजगी व्यवहाराकडे, केवढे ठेवायचे व जेवढे राहील तेवढ्यावर प्रत्यक्ष नियंत्रण केवढे ठेवावयाचे हे आर्थिक धोरणाच्या दृष्टीने आज मोठे महत्त्वाचे प्रश्न आहेत.

मोठे वावरतात त्या बहुतेक क्षेत्रांत खरी आर्थिक सत्ता एखाद दुसऱ्याच्या अगर फार थोड्यांच्या हातांत केंद्रित झालेली असते. म्हणून याला एकाधिकारी किंवा अल्पाधिकारी व्यवहाराचे क्षेत्र असे मी म्हटले तेव्हा मार्क्सवादाचा वास येऊन अनेक थोरांचा मजवर धुस्सा झाला. पण येथे शाश्वत समाजहितदृष्ट्या विचार करण्याचा प्रश्न आहे. कोणास बरे वाईट म्हणण्याचा नाही. अनेक उत्पादक चढाओढीने व्यवहार करीत असले व नवीनांस क्षेत्रांत शिरकाव करून घेण्यास वाव असला म्हणजे त्या आर्थिक क्षेत्रांतील व्यवहार खाजगी लोकांच्या हातांत असला तरी समाजहितास पोषक ठरतो असा एक सामान्य अर्थशास्त्रीय विचार आहे. याउलट जेथे सत्ता थोड्यांच्या हातांत जवळजवळ कायमची असेल तेथे आर्थिक व्यवहाराची चाल अगर वाढ इष्ट दिशेने होईलच असे सांगता येत नाही, व अशा आर्थिक व्यवहारात जनतेकडून वाजवीपेक्षा जास्त फायदा आकारून आपली संपत्ती व सत्ता वाढविणे या क्षेत्रस्थांच्या हातांत असते. नियोजनात हे दोन दृष्टींनी अनिष्ट असते. एक तर ठरलेल्या मार्गांने व्यवहार, ठरला इतका व्यवहार, ठराविक पद्धतीने होईल ही खात्री करून घेण्यास अल्पाधिकारी क्षेत्रांत नियंत्रण फार काळजीपूर्वक करावे लागते. विशेषतः ही क्षेत्रे अर्थव्यवहाराच्या मर्मस्थानी असल्यामुळे येथे व्यवहार कोणता व कसा होतो यावर इतर नियोजन कार्यक्रम फार अवलंबून असतो.

तेव्हा नियंत्रण पूर्ण परिणामकारी ठरत नसल्यास ही क्षेत्रे खाजगी राखणे धोक्याचे ठरते. तसेच ही क्षेत्रे विशेष फायदेशीर असतात. ती थोड्यांच्या हातांत असल्यास या विशेष फायद्याचा मोठा हिस्सा विशिष्ट लोकांच्या हाती राहून त्यांची संपत्ती व सत्ता सारखी वाढत राहतात. समाजवादी ध्येय डोळ्यांपुढे असल्यास ही गोष्ट फारच अनिष्ट ठरते. यावर असे म्हणता येईल की, सरकारी नियंत्रण कडक असल्यास व कर, भावनियंत्रण, इत्यादी द्वारा जादा फायदा थोड्यांच्या हातांत न राहील असे केल्यास हे क्षेत्रही सार्वजनिक करण्याचे कारण उरत नाही. परंतु हा मार्ग स्वीकारणे हे या सर्व गोष्टी व्यवहार्य आहेत किंवा नाहीत यावर अवलंबून राहील.

हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीत आणखी एक विचार उद्भवतो. तो म्हणजे एखादे क्षेत्र थोड्या व्यक्तींच्या हातांत राहिल्यास इतर काही नियंत्रण केले तरी त्या क्षेत्रात कार्य करण्याची संधी मिळण्याचे जे आनुषंगिक फायदे असतात ते सर्व काही विवक्षित गटांतच मर्यादित राहतात. आणि जेवढ्या प्रमाणात हे क्षेत्र महत्त्वाचे, तेवढ्या प्रमाणात ही स्थिती समाजदृष्ट्या गैरफायद्याची. विद्याव्यासंग किंवा शिपाईगिरी या कूळ, गोत व प्रदेश इत्यादिकांवर अवलंबून नसाव्या हे तत्त्व आता आपण स्वीकारले आहे; व त्यास अनुसरून धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. सर्व प्रमुख आर्थिक क्षेत्रांतही ही विचारसरणी स्वीकारणे अवश्य आहे. पिढीजाद वळण व संपत्ती यांमुळे यात आलेली व टिकलेली आजची अल्पाधिकारी अवस्था उघड दिसत आहे. निरनिराळ्या प्रदेशांतील कमीअधिक शिकलेल्या तरुणांस कशा प्रकारच्या क्षेत्रांत प्रवेश करून घेता येतो याचा तौलनिक विचार केल्यास सद्य:स्थितीचे स्वरूप लक्षात येईल.

याहून तपशिलात विवेचन करण्याची जरुरी नाही. मला सांगावयाचे एवढेच की, मोठे व छोटे हा भेद सरकारी धोरणाबाबत महत्त्वाचा आहे. मोठे व्यापतात ती क्षेत्रे राष्ट्रीय आर्थिक जीवनदृष्ट्या महत्त्वाची म्हणून त्यांवर सार्वजनिक सत्ता प्रस्थापणे आवश्यक आहे; ती विशेष किफायतशीर म्हणून त्यांतील जादा नफ्याचा विनियोगही शासनसंस्थेने नियंत्रित करणे आवश्यक आहे. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीत हे सर्व मोठे अल्पसंख्य व अत्यंत मर्यादित गटांतील, तेव्हा सर्व महत्त्वाच्या क्षेत्रांत बहुसंख्याकांस काम करण्याची संधी मिळण्याच्या दृष्टीनेही या क्षेत्रावर सरकारी पगडा बसणे जरुरीचे आहे. या सर्व गोष्टी समाजवादी समाजरचनेचे ध्येय स्वीकारल्यामुळे विशेषच आवश्यक ठरतात. म्हणून मोठ्यांचा याबाबत तीव्र मतभेद असणे साहजिक आहे.

## दुर्बलास साहाय्याची निकड

मला या प्रकरणी मोठ्यांनाही एक सूचना अत्यंत नम्रपणे करावीशी वाटते. सरकारी धोरणाच्या केवळ घोषणेमुळे त्यांजवर खरोखर कोणताही परिणाम झालेला नाही. त्यांच्या कार्याचे व सत्तेचे क्षेत्र गेल्या ८–१० वर्षांत संकोचले नाही, विस्तारलेच आहे. यापुढील विकासयोजनेतील कार्यक्रम एवढा मोठा आहे की, त्यांच्या कर्तबगारीला आणखी अनेक वर्षे पूर्ण वाव राहणार आहे. नियंत्रण क्वचित वाढेल, नफा काहीसा कदाचित कमी होईल, एखादे क्षेत्र हातचे जाईल; तरी परिणामी संपत्ती, सत्ता, कर्तृत्व यांत कोठेच हल्लीपेक्षा फारसा फरक पडणार नाही. नवीन युगाच्या खुणा ओळखून त्यांनी जर त्याप्रमाणे वागण्यास सुरुवात केली तर हे सर्व निश्चित घडून येईल. विशेषेकरून दोन गोष्टी त्यांजकडून अपेक्षित आहेत. एक तर समाजहितपोषक सर्व नियंत्रणांच्या बाबतीत सरकारशी त्यांचा पूर्ण सहकार दिसून यावा. कर देणे, नियंत्रणे पाळणे, इत्यादींबाबत त्यांच्याकडून जितके काटेकोर वर्तन होईल तितकी देशाची प्रगती वेगाने होईल व समाजातील त्यांच्याबाबतची सद्भावना वाढेल.

दुसरे असे की, इतरांस मदत करण्याच्या, पुढे आणण्याच्या सार्वजनिक धोरणास त्यांचा विरोध न

भासावा. याबाबतचे एक उदाहरण देऊन मी आपला आशय थोडक्यात स्पष्ट करतो. गेल्या दोन तीन वर्षांत नवीन साखर कारखाने काढावयाचे ते शक्यतोवर सहकारी तत्त्वावर, शेतकऱ्यांनी चालविलेले काढावयाचे असे सरकारने धोरण ठरविले. हे धोरण ठरविण्यात व धडाडीने पुरस्कारण्यात मुंबई राज्य सरकारने विशेष स्पृहणीय कामगिरी केली आहे. या धोरणामुळे आजच्या साखर कारखानदारांना वाईट वाटावे, आपल्या क्षेत्रात नवीन वाटेकरी उत्पन्न झाला याबद्दल खेद व्हावा हे स्वाभाविक आहे. परंतु जर त्यांनी थोडासा विचार केला असता तर आजवर महाराष्ट्रातील कालव्यांचा मुख्यतः आपणांसच कसा फायदा मिळाला, आपण कुठल्याचे कोठे आलो, आपली संपत्ती या कारखानदारीतून वाढून आपले सर्वच क्षेत्र कसे विस्तारले, हे मनात आणून झाले तेवढ्यावर समाधान मानून, स्थानिक शेतकऱ्यांच्या व त्यांच्या समाजाच्या उत्कर्षास प्रत्यक्ष मदत न केली तर निदान आशीर्वाद देऊन चांगुलपणा संपादला असता. काही नाही तर निदान तटस्थता स्वीकारता आली असती. यांतील काही न करता सर्व प्रकारच्या मार्गांनी त्यांनी या राष्ट्रहितैषी उपक्रमास विरोध सुरू केला. बरे, यातही काही मर्यादा पाळावी. खाजगी कारखाने एकमेकांच्या किती जवळ आपण स्थापले हे उघड दृश्य डोळ्यांआड करून सहकारी कारखाने मात्र खाजगी कारखान्यांच्या अमुक मैलांच्या आत स्थापू नयेत अशी मागणी केली; आम्ही स्वतःच्या क्षेत्रांतील उसावरच अवलंबून असून आमचा शेतकऱ्यांच्या उसाशी संबंध नाही, असे उसाचा भाव ठरविण्याच्या वाटाघाटीत आपणच आग्रहाने सांगितलेले न स्मरून आम्हांस शेतकऱ्यांचे क्षेत्र तोडून द्या असा दावा मांडला. सगळ्यांत मौज म्हणजे दोन सहकारी कारखाने जेमतेम चालू होतात न होतात तोच एक कारखाना काही वर्षे बरा चालला तो दैववशात व दुसरा ज्या अर्थी पहिल्या वर्षी दोन महिने चालल्यावर त्याला फायदा झाला नाही त्या अर्थी सहकारी साखर कारखाने तोट्याचे समजून सरकारने आपले याबाबतचे धोरण बदलावे असे अधिकृत रीत्या बोलू लागले. मला यावर एवढेच म्हणावयाचे आहे की, धनवानाने काहीही बोललेले चालते हे जरी खरे असले तरी जास्त विवेकाने बोलले तर सर्वांसच केव्हाही बरे. शेतकऱ्यांस किंवा त्यांच्या सहायकांस पिढीजाद व्यवहाराचे वळण नाही, त्यांचे लागेबांधे नाहीत, बाजार वळविण्याचे सामर्थ्य वा कसब त्यांच्या अंगी नाही, त्याअर्थी सहकारी कारखाना बरा चालला तर देवाने हात दिला म्हणूनच चालला, चालकांनी त्यावर फुशारून जाण्याचे कारण नाही, हा इशारा मी स्वतः पूर्णपणे स्वीकारतो व त्याबद्दल धन्यवादही देतो. पण अशा परिस्थितीत आपले कर्तव्य काय हे विचारण्यास हरकत आहे काय ? तुम्ही अडाण्याची, गरीबाची हेटाळणी व अडवणूक करणार की, त्यास आपला कारखाना चालविण्यास मदत करणार ? सरकारी धोरणाचा विवेकाने अभ्यास करणार की कारण असो वा नसो दर वेळेस त्यास उघड विरोध करून बुद्ध्या गैरसमज उत्पन्न करण्याचा प्रयत्न करणार ? वर्गकलह वाढतो तो चळवळ्यांच्या भाषणांपेक्षा सत्ताधाऱ्यांच्या वर्तनाने अधिक वाढतो, हे ऐतिहासिक सत्य आहे. हे आपल्यातील मोठ्यांनी लक्षात धरल्यास पुढे उघड दिसत असलेले स्थित्यंतर शांततामय होऊ शकेल अशी माझी खात्री आहे.

## विकेंद्रीकरण हे प्रगतीचे मुख्य गमक

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत विकेंद्रीकरण व सहकार यांचेही आग्रहाने प्रतिपादन केलेले दिसते. माझ्या स्वतःच्या मते भारताची राजकीय, आर्थिक व सामाजिक प्रगती इष्ट मार्गाने होते किंवा नाही हे पारखण्याचे मुख्य गमक म्हणजे या सर्व क्षेत्रांत विकेंद्रीकरण प्रत्यक्षात घडून येते किंवा नाही हे आहे. एका मोठ्या राज्यात अनेक नवीन भाग विलीन करताना आपण संक्रमणाची व्यवस्था फार काळजीपूर्वक केली पाहिजे हे मागे सांगितले आहे. याबाबतीतही थोडक्यात असे म्हणता येईल

की, ज्या प्रमाणात या नवीन सामील झालेल्या भागांतील कारभार जेथल्या तेथेच चालू राहण्याची व्यवस्था होईल तेवढ्या प्रमाणात मोठ्या राज्यात आल्याने तोटा झाला नाही असे तेथील लोकांस वाटेल. याची उलट बाजू अशी की, मुंबई शहरातील सरकारी अधिकारी व इतर सेवक यांची संख्या राज्य मोठे झाल्यामुळे पूर्वीपेक्षा वाढवावी लागली तर आपली वाटचाल केंद्रीकरणाच्या दिशेने होत आहे, विकेंद्रीकरणाच्या नाही, असे मानावे. आजचा आपला कारभार बऱ्याच अंशी केंद्रित आहेच; यापुढे तो कटाक्षाने विकेंद्रित करण्याचा प्रयत्न सुरुवातीसच केला तरच त्या दिशेने काही प्रगती होईल. जेवढा कारभाराचा विस्तार मोठा तेवढा तो जास्त केंद्रित होण्याची एक प्रकारे स्वाभाविक प्रवृत्ती असते. विस्तार मोठा झाल्यामुळे प्रमुख सत्ताधिकाऱ्यांस निरनिराळ्या प्रदेशांतील प्रत्यक्ष परिस्थितीचे ज्ञान असण्याचा संभव कमी असतो. दूरदूरचे अधिकारी, स्थानिक कार्यकर्ते, इत्यादींची माहिती नसल्यामुळे त्यांजवर जबाबदारी सोपविण्याविषयी साशंक वृत्ती असते; शिवाय जेवढी भिन्नता अधिक तेवढी सर्वसाधारण सामान्य-नियमानुसार काम करण्याचीही प्रवृत्ती वाढते. यामुळे साहजिकच एका केंद्रातून सरधोपटपणे कारभार चालविणे सोपे वाटते आणि अशी कार्यपद्धती एकदा अवलंबिली की, सहजच चांगला कारभार एका ठिकाणी बसून करीत आहो असा आभासही उत्पन्न होतो. या सगळ्याच्या बुडाशी अर्थात एक मोठी प्रबळ मानवी प्रवृत्ती आहे. ती म्हणजे सर्वत्र सत्ता चालविण्याचा मोह; आणि कर्तबगार राज्यकर्त्यांस तर हा मोह अनावर होतो, हा नेहमीचा अनुभव आहे. माझ्या मते खऱ्या लोकशाहीचा कारभार विकेंद्रितच असला पाहिजे. आणि विकेंद्रीकरणाचे एक ढोबळ चिन्ह म्हणजे केंद्रस्थानी सत्ता व सेवकसंख्या न वाढणे हे सांगितले.

## मुंबईच्या विस्तारावर निर्बंध आवश्यक

आर्थिक बाबींत हा विचार राज्यकारभाराहून जास्त महत्त्वाचा आहे. येथेही मुंबई शहरापासून विवेचनास सुरुवात करता येईल. मुंबईसारख्या शहरांच्या भवितव्याबद्दलची माझी मते अनेक वर्षांपासून जाहीर आहेत. अलीकडील वादात त्यांस विशेष प्रसिद्धी मिळालेली दिसते. वादात शिरावयाचे म्हणून नव्हे तर योग्य आर्थिक धोरणाचे मूळ नीट पाहण्याकरिता आवश्यक म्हणून याविषयी थोडे बोलतो. मुंबईतील धंद्यांपैकी काही मुंबईबाहेर सभोवारच्या प्रदेशांत शक्य तोवर हलवावे व यापुढे खुद्द मुंबईच्या मर्यादेत धंदे व लोकसंख्या यांची वाढ होऊ देऊ नये असे मी ८-१० वर्षांपूर्वी प्रतिपादले; व हेच माझे अजून ठाम मत आहे. माझ्या विवेचनातील गैरसमज करून घेतलेल्या पण खरोखर विषयास गैरलागू अशा एका मुद्द्याचा प्रथम खुलासा करून टाकतो. मुंबई शहरातील धंदे सभोवार न्या हे म्हणण्यात ते महाष्ट्रातच न्या असा माझा कटाक्ष होता व त्यामुळे बिगर महाराष्ट्रीयांचे हित-संबंधांवर मला घाला घालावयाचा होता, असे ध्वनित करण्यात आले आहे. धंदे बाहेर न्यावयाचे म्हणजे ते कोणाच्या मालकीतून काढून घ्यावयाचे असे मी सूचितही केले नव्हते; आणि कोणतेही मुंबईकर महाराष्ट्रात धंदे काढण्यास अगर चालविण्यास विचकतात असा आजवरचा अनुभव नाही. शिवाय मुंबईभोवती निदान ७५ मैल महाराष्ट्रच आहे व मी या विषयावरील लेख लिहिले तेव्हा मुंबईभोवती १५०-२०० मैलांच्या टापूतही महाराष्ट्र भागाखेरीज वीजपुरवठा नीटसा उपलब्ध नव्हता.

विकेंद्रीकरणाबाबत व्यापक रीतीने बोलण्याच्या आधी या वादातील आणखी एक मुद्दा विशद करणे आवश्यक आहे. मुंबईची लोकसंख्या अधिक वाढू देणे अनिष्ट असे म्हणण्यात मुंबईकरांवर काही अन्याय होतो, त्यांचे अनहित होते असे मला वाटत नाही. उलट येथील लोकसंख्येची वाढ थांबवा, शक्य तितके रोजगार दुसरीकडे उपलब्ध करून ती कमी करा, असे केल्याने मुंबईकरांस राहण्याची जागा, वाहतूक इत्यादी सर्व बाबतींत जीवन सुसह्य होईल असे म्हणण्यात मुंबईकरांचे खरे हित पाहणेच

आहे असे मी समजतो. मुंबईचे गोडवे कोणी कसेही गाइले तरी बहुसंख्यांकांच्या दृष्टीने येथील आजचे जीवन मला लोभनीय दिसत नाही. हा प्रश्न केवळ महाराष्ट्रीयांचाच नाही. फार लांबचा पल्ला गाठून मुंबईत जे उत्तर प्रदेश, आंध्र, इत्यादी राज्यांतील कामकरी मोठ्या संख्येने येतात ते पोटाला मिळावे म्हणून येतात. विकेंद्रीकरणाच्या धोरणाने सर्व देशभर रोजगार उपलब्ध केले व त्यांना आपल्या घराजवळ, गावाजवळ काम मिळाले तर त्यांच्यावर अनुपकार खास नव्हत. अर्थात हे बहुजनांबद्दल झाले. ज्यांची सत्ता व संपत्ती अर्थव्यवहार एके ठिकाणी केंद्रित करण्यावर अवलंबून आहे त्यांना हे म्हणणे पटू नये, आपल्या हितविरोधी वाटावे हे साहजिक आहे.

यावर कोणी असे म्हणतील की, कितीही लोकसंख्या वाढो त्यांना आवश्यक अशा सोयी करता आल्या म्हणजे झाले. पण सर्व देशांतील आजवरचा अनुभव असा आहे की, एखाद्या ठिकाणची लोकसंख्या मर्यादेबाहेर वाढली म्हणजे राहण्याची व वाहतुकीची व्यवस्था प्रत्यक्ष करणे उत्तरोत्तर दुरापास्त होते व करता आली तरी ती अधिकाधिक खर्चाची होते. राहत्या जागेची व्यवस्था करण्यास मुंबई व इतर मोठ्या शहरांत दर डोई विशेष जास्त खर्च येतो व वाहतुकीचा खर्च व दगदग ही व्यस्त प्रमाणात वाढत राहतात. मुंबईची परिस्थिती सर्व बाबतींत विशेषच प्रतिकूल आहे. पण सर्वसाधारणपणे हा नियम सगळीकडेच लागू आहे. लंडनमधील वाढ थांबविणे, तेथील धंदे शक्य तितके सभोवतालच्या नवीन नगरांत नेणे, सर्व देशभर नवीन नगरे स्थापणे व जुन्या बाजार-पेठांचे शक्य तेवढे पुनरुज्जीवन करणे या दिशेने पद्धशीर सरकारी प्रयत्न इंग्लंडमध्ये आज वीस-पंचवीस वर्षे सतत चालू आहेत. याबाबतचे गेल्या दहा वर्षांतील मुंबई सरकारचे धोरण मला योग्य वाटत नाही. युद्धोत्तर काळात मुंबई व इतर मोठ्या शहरांतील वाढ थांबविण्याबाबत प्रथम काहीच केले नाही. अलीकडे मुंबईत नवीन कारखान्यांनी आपल्या मजुरांच्या राहण्याची सोय केली पाहिजे असा नियम केला आहे. हाही सयुक्तिक दिसत नाही. एक तर वाढ अनिष्ट असल्यास खर्चाचा काही बोजा खाजगी कारखानदारांवर टाकल्याने ती इष्ट ठरत नाही. दुसरे असे की, कोणत्याही नवीन कारखान्यामुळे राहण्याची जागा व वाहतुकीची साधने यांवर ताण पडतो तो केवळ प्रत्यक्ष कारखान्यातल्या मजुरांबाबतचाच नसतो. कोणत्याही नव्या महत्त्वाच्या व्यवहाराच्या अनुषंगाने इतर अनेक बाबींत वाढ होते आणि तिचा बोजा शेवटी सर्व समाजावरच पडतो.

## विकेंद्रित नागरीकरण हितप्रद

मोठी शहरे फार मोठी होऊ नयेत म्हणून पुढारलेल्या देशांतही मान्य झालेल्या विचारांबाबतच येथवर विवेचन झाले. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीत दुसरे मुद्देही लक्षात घेण्याजोगे आहेत. आपला देश फार विस्तीर्ण आहे व लोकसंख्या फार मोठी आहे. गेल्या शंभर वर्षांत यात काही थोडेच नवीन उद्योगधंदे निघाले व बहुतेक नवीन अर्थव्यवहार काही थोड्या ठिकाणी केंद्रित झाले. हे सर्व ब्रिटिशांच्या धोरणामुळे झाले असे म्हणून आपण त्यांस दोषही दिला. पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतर यात काहीएक फरक पडलेला नाही; व अर्थव्यवहाराचे केंद्रीकरण वाढलेच असेल, काही कमी झाले नाही. पुढील विकासयोजनांच्या दृष्टीने ही परिस्थिती फार चिंताजनक आहे. आधुनिक कालात कोणत्याही देशात व्यवहारविकास सर्व भूभागावर सारखाच आढळत नाही. बहुतकरून काही केंद्रस्थानांभोवती विशेष विकसित क्षेत्रे आढळतात. नवीन उद्योगधंदे व व्यापार ज्यांत वाढत आहेत अशी जुनी अगर नवी लहान मोठी नागरकेंद्रे प्रथम निर्माण होतात व त्यांच्या सान्निध्यामुळे सभोवतालच्या प्रदेशांतही आर्थिक व्यवहाराचा विस्तार होतो व त्यात बदल घडून येतात. योजनापूर्वक व खास प्रयत्नाने विकास घडून आणावयाचा, तर नवीन व्यवहाराची केंद्रस्थाने ज्यायोगे शक्य तितकी अधिक व

सर्व देशभर निर्माण होतील अशी योजना व असे प्रयत्न झाले पाहिजेत. यासच मी अर्थव्यवहाराचे विकेंद्रीकरण म्हणतो. माझ्या मते साधारणपणे ५-१० लाख वस्तीवरच्या शहरांची वाढ थांबविणेच इष्ट ठरेल. नागर लोकसंख्या वाढावयाची ती ५ ते ५० हजार लोकसंख्या असलेल्या स्थळांची वाढणे इष्ट आहे; आणि सर्व आर्थिक धोरण या दृष्टीने आखले पाहिजे. पुणे शहर सारखे वाढण्याच्या ऐवजी सासवड, जुन्नर, तळेगाव, घोडनदी, इत्यादींची इष्ट दिशेने वाढ ही दीर्घकालीन धोरणाचे दृष्टीने हितप्रद ठरेल.

याच्या पुष्ट्यर्थ आणखी एक महत्त्वाचा मुद्दा सांगतो. आपल्या देशात नित्याची बेकारी अगर नैमित्तिक आपत्ती यांच्या निवारणार्थ, इतर अनेक देशांत असतात त्याप्रमाणे, लोककल्याण योजना जवळजवळ नाहीत; व कोणत्याही व्यापक योजना, ज्या बहुसंख्याकांस लागू पडतील अशा हाती घेण्याची आपणांस ऐपतही नाही. तेव्हा काही विवक्षित भागांत अगर केंद्रांत व्यवहार वाढला तर त्याचा फायदा इतरांस बऱ्याच अंशी साहजिक मिळेल असे आपल्याकडे घडत नाही. म्हणूनच आज काही भाग, विशेषतः नागर, उत्कर्षानी भरभराटीचे वाटले तर इतर अनेक अत्यंत निकृष्टावस्थेत आहेत. ही विषमावस्था कमी करण्याचा एकच उपाय म्हणजे आर्थिक विकास निरनिराळ्या प्रदेशांत ज्यायोगे सार्वत्रिक होईल असे धोरण स्वीकारणे. बुद्ध्या विकेंद्रीकरण करण्याखेरीज असे दुसरे धोरण नाही. आपली कुवत अल्प आहे. तेव्हा एका ठिकाणी खर्च केंद्रित झाला म्हणजे दुसरीकडे खर्चास काही उरत नाही. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत विकेंद्रीकरणाबद्दल पुष्कळ लिहूनही राहत्या घरांची सोय करण्याबाबतचा जवळजवळ सर्व खर्च मोठ्या शहरांतच करण्याची तरतूद केली आहे; यावरून वरील मुद्द्याचे महत्त्व लक्षात येईल. आज आपल्यापुढे उभ्या असलेल्या सर्व समस्यांत बेकारीची समस्या अत्यंत अवघड आहे. आणि ही समस्या सोडविण्याचा प्रारंभ विकेंद्रीकरणाचे धोरण स्वीकारल्याशिवाय होणार नाही असे मला का वाटते हे वरील विवेचनावरून कळून येईल.

## मराठी समाजाची वैशिष्ट्ये

शेवटी खाजगी व्यवहार करणाऱ्यांच्या व्यक्तिगत प्रश्नांबद्दल मी थोडे बोलतो. छोट्या व मध्यम प्रमाणावर व्यवहार करणाऱ्यांचाच मी विचार करणार आहे. त्यांचेच प्रश्न खरोखर जास्त बिकट व जास्त उपेक्षित आहेत. सुरवातीस एक खुलासा केलेले बरा. मी बोलणार तो आपल्या प्रादेशिक समाजाबद्दल. याच्या व्याप्तीची माझी स्वतःची कल्पना थोडक्यात सांगावयाची म्हणजे जे जे आपणांस येथले समजतात व त्याप्रमाणे वागतात ते सर्व यात येतात. मूळस्थान अगर मातृभाषा यांचा काही संबंध या प्रश्नाशी मी मानीत नाही. तसेच पाहिले तर शिवाजीमहाराजांचे घराणे मूळचे राजस्थानातले असेच समजतात. दुर्दैवाने आपली समाजरचना अशी आहे की, शेकडो वर्षे एखाद्या प्रदेशात राहून प्रादेशिक समाजाशी एकजीव न होता आपणांत जमाती स्वतंत्र टिकतात. इंग्लंडमधील व्यापारी व औद्योगिक उत्कर्षाचे कारण असे सांगितले जाते की, परदेशांतून आलेल्या साहसी मंडळींचा एक दोन पिढ्यांत इंग्रज समाजात समावेश झाला व त्यामुळे एकंदर समाजाची कर्तबगारी वाढली. मुख्यतः हिंदू समाजरचनेमुळे आपल्याकडे हे पुरतेपणे घडून येत नाही व यातच आपल्या अनेक वादांचे मूळ आहे.

आपल्या इतिहासाच्या आणखी एका वैशिष्ट्याकडेही लक्ष देणे अत्यंत जरुरीचे आहे. व्यापार-उदीमांत आपला समाज मागासलेला हे खरे; पण याचे कारण आपल्या स्वतःच्या वृत्तीतच आहे, इतर कोठे नाही, हे जाणले पाहिजे. कर्तबगार माणसे कोणता पेशा स्वीकारतात हे बहुतांशी प्रचलित समाजमूल्यांवर अवलंबून असते. पंडितगिरी, शिपाईगिरी, राज्यकारभार यांत खरी प्रतिष्ठा; शेती

असावी, वेळ पडल्यास करावी; इतर व्यवहारांचा मोठेपणा आपणांस कधीच फारसा पटला नाही. ऐतिहासिक काळातील शेकडो वर्षांत आमचे अर्थव्यवहार इतरांकडे राहिले ते त्यांनी आक्रमण केल्यामुळे नाही; आमची सत्ता असतांना त्यांस आम्ही सन्मानाने बोलावून आणले. विद्वत्ता व शौर्य यांचे महत्त्व कमी झाले व व्यवहारचातुर्याचे वाढले हे आपणांस अलीकडे समजले आहे, पण उमजले नाही. आजही आधुनिक अर्थव्यवहारांत बुद्धिमत्ता, दीर्घोद्योग व साहस या सर्वांचीच आवश्यकता असते. हे आपण ओळखत नाही. आपणांतील निवडक माणसे अजून या क्षेत्राकडे वळली नाहीत, आता नव्याने वळू लागली तर त्यांस शिरकाव करून घेण्यास, बस्तान बसविण्यास वेळ लागणार, हे उघड आहे.

सद्यःस्थितीत आपली परिस्थिती बरीच अवघड व आपल्यांतील बहुसंख्य सामान्यपणे लहान प्रमाणावर व्यवहार करणारे व काहीसे नवशिके हे धरूनच पुढील विचार करणे प्राप्त आहे. हा विचार करताना मी आणखी एक गोष्ट गृहीत धरणार आहे. ती अशी की, भविष्यातील भारतीय अर्थव्यवस्था ही मुख्यतः नियोजित असणार. असे झाले म्हणजे अर्थव्यवहाराचे वळण अशा अर्थव्यवस्थेस अनुरूप असावे लागेल. हे आपल्या दृष्टीने हितावहच आहे. आधुनिक व्यवहाराच्या क्षेत्रांत दोन प्रकारचे कौशल्य लागते. एक तर प्रत्यक्ष उत्पादन वगैरे करण्यास लागणारे ज्ञान व कसब, दुसरे बाजारी उलाढालीत लागणारी माहिती व चलाखी. या दुसऱ्या प्रकारच्या कौशल्यास अजून आपणांकडे फाजील महत्त्व आहे असा प्रवाद आहे. नियोजित अर्थव्यवसायांत बाजारी उलाढालीस थोडा वाव असावा. कारण यांत उत्पादनाचे प्रकार व परिमाण ही बहुतांशी ठरवावी लागतात व भावनियंत्रणही बऱ्याच प्रमाणात करावे लागते. स्वतःचें उत्पादनकार्य चांगले व काटकसरीने करणाऱ्याचे स्थान अशा व्यवस्थेत सुरक्षित असावे. आज ही परिस्थिती प्रत्यक्षात अवतरलेली नाही. परंतु आपला नवशिकेपणा लक्षात घेता ही संभाव्य परिस्थिती आपणांस इष्ट वाटावी. बाजारी उलाढालींतून पुढे येण्यास पिढीजाद वळण व लागेबांधे यांचे साहाय्य विशेष लागते. आपणांस ते नाही, त्याआर्थी कामाचा चांगुलपणा व सचोटी यांवर भर देणेच आपणांस आवश्यक आहे. याबद्दल बोलण्याचे कारण एवढेच की, आपणांतील अनेकांस चलाखीचे कौतुक वाटते व विनायासे संपन्न होण्याचा तो एक राजमार्ग वाटतो; आणि या गैरसमजामुळे 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' अशी अवस्था होते. असले मोह टाळून विशिष्ट कसब अगर शास्त्रीय ज्ञान यांचे जेथे महत्त्व आहे त्या क्षेत्रांत लहान प्रमाणावर शिरकाव करून घेणे हेच आपणांस मुख्यतः साधण्यासारखे दिसते; कोणत्याही अर्थव्यवहारात कसब व ज्ञान यांच्या जोडीला हिशेबीपणा अंगी पूर्ण बाणला असला तरच यश येईल, एरवी नाही, हेही अर्थात सदैव लक्षात ठेवणे जरूर आहे.

आपल्या परंपरेकडे पाहता आपणांस कोणत्या प्रकारच्या क्षेत्रांत प्रथम सुरुवात करावी लागेल याविषयी हा सामान्य विचार झाला. तपशिलात शिरावयाचे तर अनभिज्ञांस, आपणांस लायक अशी क्षेत्रे कोणती, त्यांत कोठे वाव असेल हेही कळावयास हवे. तरुणांस याबाबत काही मार्गदर्शन करता येईल काय याचा विचार आपणांस केला पाहिजे. हे कार्य सोपे नाही. काही वेळेस नियोजनामुळे एखाद्या व्यवहाराचे दालन नव्याने उघडत असेल किंवा सरकारने विवक्षित क्षेत्रविस्ताराच्या योजना आखल्या असतील तर असल्या सर्व उपक्रमांवर लक्ष ठेवून त्याबद्दलची माहिती मिळविणे, ती प्रसारित करणे हे सरकारही करू शकेल; आणि आपल्यासारख्या संस्थांनी हे अगत्य हाती घेण्यासारखे आहे. पण असे फारसे व मोठ्या प्रमाणावर घडत नाही. आर्थिक पाहण्या बारकाव्याने विशिष्ट प्रदेशांत करविल्या तर त्यांवरून काही सूचना करता येतील. पण बहुतांशी नवीन शिरकाव करू पाहणाऱ्यांस स्वतःची तयारी व सभोवतालची परिस्थिती यांचा विचार करून स्वतःच क्षेत्र

हुडकावे लागेल. त्याने योजिलेल्या क्षेत्रात कोणत्या प्रकारची तयारी लागते व कोणत्या अडचणी येतील याबद्दल सल्ला देण्याची व्यवस्थाही आपणांकडे नाही; ती होणे अगत्याचे आहे.

## भांडवल पुरवठ्याचा प्रश्न

कोठेही अल्पसा प्रवेश करून घेतला तरी लवकरच भांडवलाचा मोठा प्रश्न उभा राहतो. पिढीजाद व्यापारी व इतर यांच्या परिस्थितीत आज जर सर्वांत मोठा फरक असला तर तो भांडवल उभारण्याबद्दलचा आहे. काही थोड्यांच्या हातांत व काही स्थळी भांडवल बरेच केंद्रित झाले असल्यामुळे एकंदर व्यवहार केंद्रित होणे हल्ली जवळजवळ अपरिहार्य झाले आहे. स्वतःचे भांडवल पुरेसे उभारता न आल्यामुळे अनेक स्थानिक, कल्पक व उद्योगी माणसांस दूरस्थ भांडवलवाल्यांचाच आश्रय पाहावा लागतो व त्यांच्या आहारी जावे लागते. नवीनांस निरुत्साही करणारी अशी ही परिस्थिती आहे. आज बऱ्याच वर्षांपासून सरकारकडून लहान धंद्यांस भांडवल पुरविण्याबाबत योजना आखल्या गेल्या, कायदेही झाले. परंतु हा प्रश्न सोडविण्यात पाऊल विशेष पुढे पडलेले दिसत नाही. भारतीय इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन निघाल्यामुळे मोठ्या भांडवलाच्या काही योजनांस पैसा मिळू शकला. आता राज्यनिहाय फायनान्स कार्पोरेशने काम करू लागली आहेत व त्यामुळे मध्यम प्रमाणांच्या धंद्यांस काही मदत मिळेल. पण या सर्वांचा उपयोग कोणत्याही धंद्यात साधारणपणे स्थिरावलेले व स्वतःचे भांडवल बऱ्याच अंशी उभारू शकणारे अशांसच होतो. लहान प्रमाणावर धंदा करणारे व कल्पक परंतु भांडवल गाठी नसणारे अशांना त्यांचा काही उपयोग होऊ शकत नाही.

या भांडवलपुरवठ्याच्या मुद्द्याच्या अनुषंगाने एक व्यापक विचार मी आपणांपुढे मांडू इच्छितो. नियंत्रण, नियोजनाचा एक सार्वजनिक अनुभव असा आहे की, त्यामुळे हरएक क्षेत्रातील जुने व मोठे यांचा व्यवहार वाढू लागतो; इतरांच्या, विशेषतः नवीनांच्या व लहानांच्या अडचणीच वाढतात. दर ठिकाणी हा अनुभव येतो. परवाना मिळविणे, मालपुरवठा होणे, मदत मिळणे, इत्यादी सर्व बाबतींत मोठ्यांना, परस्पर वरच्या थरावर काम करता येते; हे सुकर होते, लवकर होते, कमी खर्चिक होते. लहानांस कामाच्या मानाने खर्च व दगदग दोन्ही व्यस्त प्रमाणांत पडतात. काही अंशी ही प्रवृत्ती साहजिक आहे. इंग्लंडमधील सरकार व उद्योग यांतील संबंधाचा अभ्यास करून P. E. P. ने एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. त्यात अशा प्रकारच्या अडचणींचा उल्लेख करून त्यावर नियंत्रण-कारभाराचे विकेंद्रीकरण हाच प्रमुख उपाय सुचविला आहे. आपल्या देशातील परिस्थिती इंग्लंड-पेक्षा बरीच भिन्न आहे; व ती मोठ्यांस व श्रीमंतांस पुष्कळच जास्त अनुकूल अशी आहे. तेव्हा आपल्याकडे वरील अनुभव विशेष प्रमाणात येत आहेत.

## योजनाकारांची जबाबदारी

यामुळे नियोजित व्यवस्थेबाबतचा एक फार महत्त्वाचा प्रश्न निर्माण होत आहे. नियोजनाने व्यवहारक्षेत्र एक प्रकारे सुरक्षित होते, त्यातील अनिश्चितता व धोके बरेच कमी होऊ शकतात. पण असे झाल्यावर व्यवहारांत समतोलपणा राखण्याची जबाबदारीही नियोजकाने पत्करणे जरुरीचे ठरते. सार्वजनिक व खाजगी यांतील विशिष्ट विभागणीप्रमाणेच खाजगी क्षेत्रांतील मोठे–मध्यम–लहान यांच्यांतही क्षेत्रविभागणी करणे व ती टिकविण्याची व्यवस्था करणे हे महत्त्वाचे आहे. हे केवळ लहानांच्या दृष्टीनेच नव्हे तर मोठ्यांच्या दृष्टीनेही अगत्याचे आहे. अर्थव्यवस्था नियोजित झाल्यावर व्यवहाराचे बरेच क्षेत्र खाजगी ठेवण्याचे मुख्य हेतू दोन. शासनसंस्थेच्या हाती सर्व आर्थिक व्यवहार गेल्यास ज्यांच्या हाती राज्ययंत्र त्यांची सत्ता अवास्तव वाढते आणि हे लोकशाहीस विघातक ठरण्याचा संभव आहे, म्हणून

खाजगी व्यवहारक्षेत्र मोठे राखावे. दुसरा तितकाच महत्त्वाचा हेतू हा की, खाजगी व्यवहाराचे क्षेत्र व्यापक असल्यास बहुसंख्य व्यक्तींच्या कर्तबगारीस वाव मिळतो व हे सर्वदृष्ट्या समाजास हितकारक ठरते. दुसरा हेतू साध्य व्हावयाचा तर खाजगी क्षेत्रात बहुसंख्याकांस वाव सारखा राहिला पाहिजे, ते थोड्यांनी आक्रमू नये याची काळजी घेतली पाहिजे. मोठ्या थोड्यांनी क्षेत्र व्यापले व इतर सर्व त्यांतील सेवक बनले, तर मग सरकारी व्यवहार व खाजगी व्यवहार यांत बहुसंख्याकांच्या दृष्टीने काही फरक उरत नाही. आपणांकडे तरी अलीकडे अशी तक्रार ऐकू येते की, येथील मोठे स्वतःच्या बळानेच नव्हे तर अत्यंत सामर्थ्यवान अशा परकी भांडवलवाल्यांच्या साहाय्यानेही सर्व क्षेत्रांत चढाई करून तेथील पूर्वीच्या मध्यम–लहानांस नष्ट करीत आहेत. ही तक्रार कितपत खरी आहे हे मला सांगता येत नाही. पण हल्लीच्या परिस्थितीत असे होण्याचा धोका आहे हे निश्चित; आणि अशी भीती असणे हेही अनिष्ट आहे.

प्रत्येक व्यवहारक्षेत्रातील उत्पादनतंत्र व इतर परिस्थिती यांस अनुलक्षून मूळ उत्पादक घटक शक्य व इष्ट तेवढे लहान ठेवणे व जेथे व्यवहार फार मोठ्या प्रमाणात एका घटकात करावा लागेल तेथे तो शक्य तितक्या अनेक घटकांच्या सहकारितेने करणे ही लोकशाही अर्थव्यवस्थेची प्रमुख लक्षणे आहेत. या दृष्टीनेही लोकशाही म्हणजे विकेंद्रीकरणच. जसे स्थल विचार करताना हल्लीच्या परिस्थितीत मोठ्या शहरांत व्यवहार केंद्रित होण्याची प्रवृत्ती बळावत आहे त्याचप्रमाणे मोठ्या घटकांतही व्यवहाराचे केंद्रीकरण होऊ पाहात आहे. या प्रवृत्तीस थांबवून मध्यम-लहानांचे अस्तित्व टिकवावयाचे, त्यांस पुरेसे क्षेत्र द्यावयाचे, व त्यास सुरक्षितता द्यावयाची तर असे धोरण व त्याबाबतची व्यवस्था यांचा समावेश योजनेतच झाला पाहिजे.

मी हा प्रश्न फार महत्त्वाचा समजतो. त्याकडे अजून जावे तेवढे लक्ष गेलेले दिसत नाही. भांडवल-पुरवठा, तज्ज्ञ मदत, तांत्रिक माहिती, खरेदी-विक्रीत साहाय्य, सरकारी यंत्रणेशी संबंध, इत्यादी सर्व बाबतींत लहानांची व काही वेळेस मध्यमांचीही बाजू लंगडी पडते. अलीकडे शेतकऱ्यांच्या व्यक्तिशः व सहकारी व्यवहाराची स्वतंत्र व्यवस्था रचण्याचे सरकारने ठरविले आहे. स्वतः पुढाकार घेऊन व मदत करून सरकार हे कार्य करणार आहे. ग्रामोद्योगांबाबतही अशाच प्रकारचे धोरण स्वीकारले जाईल असे दिसते. या लहान उत्पादकांच्या क्षेत्रांत फक्त प्रत्यक्ष उत्पादनाच्या जबाबदारीखेरीज इतर बहुतेक सर्व जबाबदारी सहकारी व सरकारी व्यवस्थेने घेतल्यासच मालाची पैदास भरपूर व सतत होऊ शकेल, हा विचार बळावू लागला आहे. शेतकरी व ग्रामोद्योग यांच्याविषयीचा न्याय तारतम्याने छोट्या व मध्यम खाजगी व्यवहारांस लागू केला पाहिजे. नियोजनव्यवस्थेत सर्वच बाबतींत निरनिराळ्या गटसमूहांस आपापले कार्यक्षेत्र आखून दिल्यावर ते पार पाडण्यास आवश्यक अशा संस्था व व्यवस्था-श्रेणीचीही तीत योजना व्हावयास पाहिजे.

## विकेंद्रित कार्यवाही यंत्रणेची गरज

परंतु एखाद्या व्यवस्थेचा आराखडा केवळ कल्पून किंवा रेखाटून कार्यभाग व्हावयाचा नाही. हिंदुस्थानातील बँकेच्या कायद्यात बँकांची एक श्रेणी कल्पिलेली दिसते. अखिल भारतीय बँका, प्रादेशिक बँका, जिल्हा बँका अशी भविष्यातील रचना कल्पिली असावी असे कायद्यावरून वाटते. पण प्रत्यक्ष इतिहास निराळ्या प्रकारेच घडला. काही अपवाद सोडल्यास जिल्हा व प्रादेशिक बँका निघू व टिकू शकल्या नाहीत. दिवसेदिवस बँकव्यवहाराचे केंद्रीकरणही सातआठ मोठ्या भारतीय बँकांच्या हाती झाले आहे, आणखी सारखे होत आहे. याचे अनिष्ट परिणाम मुख्यत्वे व्यवहारांत नवीन प्रवेश करणारे लहान व मध्यम यांसच भासणार. प्रथमपासूनच अमुक प्रकारे ही व्यवस्था बनत गेली पाहिजे असे ठरवून सरकार व रिझर्व्ह बँक यांनी त्यास अनुरूप धोरण निश्चयाने अमलात आणले असते तरच

आता घडले त्याहून निराळे घडले असते. त्याअर्थी भांडवलपुरवठा, तज्ज्ञ-मदत, खरेदी-विक्री साहाय्य व सरकारशी संबंध ठेवण्याची यंत्रणा यांबाबत पूर्ण विकेंद्रित व लहान-मध्यमांस अनुरूप अशी व्यवस्था निर्माण करण्याचे काम नुसत्या योजना करून व्हावयाचे नाही. प्रथम विचार तर झाला पाहिजे, पण पुढे अंमलबजावणी करण्याचे कटाक्षाने ठरविले तरच काही प्रत्यक्ष घडेल.

ज्याप्रमाणे नियोजकांची, म्हणजे शासनसंस्थेची याबाबतची जबाबदारी आहे, त्याचप्रमाणे प्रत्येक क्षेत्रातील घटकांचीही जबाबदारी ही की, त्यांनी जेवढे कार्य परस्पर सहकार्याने करता येईल तेवढे करावे; व जे शासनसंस्थेकडून व्हावयाचे त्याबाबत योजना मांडाव्या व मागणी करावी. मला आपल्या भिन्नभिन्न व्यवसायांबाबत व त्यांतील अडचणींबाबत बोलण्याचा अधिकार नाही. परंतु त्यांचा साकल्याने विचार करता जो एक सामान्य मूलभूत मुद्दा मला महत्त्वाचा वाटला तो मी आपणांपुढे मांडला आहे. तो आपणांस पटल्यास आपल्या चेंबरचे व तत्सम व्यावसायिक संस्थांचे कार्य उघड आहे. आपापल्या भागांत व व्यवसायांत शक्य तितके परस्पर सहकार्य घडवून आणणे व योजना-उद्दिष्टे साध्य करण्याकरिता कोणत्या संस्था व व्यवस्था यांची निर्मिती आवश्यक आहे त्याकरिता खटपट करणे व मागण्या करणे असे त्याचे स्वरूप आहे. नियोजित अर्थव्यवस्थेत सांघिक कार्याचे महत्त्व फार आहे. नियंत्रण जे करावयाचे ते संघद्वारा होणे श्रेयस्कर. तसेच प्रत्येक समूह-संघाचे स्थान व त्यास अनुरूप व्यवस्था यांची तरतूदही योजनेत होणे आवश्यक. असे झाले तरच प्रत्येक व्यक्तीस विवक्षित क्षेत्रांत वाव मिळून काही सुरक्षितता वाटेल; न झाल्यास अनिर्बंध व्यवहार व नियोजन या दोहोंचेही तोटे प्राप्त होऊन समाजस्वास्थ्य बिघडेल.

असो, भाषणाचा विस्तार फार झाला म्हणून आता एकच शेवटचा विचार सांगून आटोपते घेतो. हा विचार या परिषदेच्या कार्यापलीकडचा आहे. आपल्यासारख्या चेंबरने इतक्या व्यापक भूमिकेवरून परिषद बोलाविली असे पूर्वी घडल्याचे मी ऐकलेले नाही. आपण केले हे चांगले केले, एवढेच नव्हे तर त्यात पुढील महत्कार्याचे बीज आहे असे मी समजतो. अनिर्बंध व्यवहाराचे सूत्र चढाओढीत असेल, तर नियोजित अर्थव्यवहाराचे सहकार्यात आहे; आणि हे सहकार्य फार व्यापक, सर्व समाजाचे, त्यातील सर्व समूहांचे हवे. मोठे, मध्यम, छोटे यांचे अगर निरनिराळ्या प्रदेशांचे हितसंबंध नियोजित अर्थव्यवस्थेत परस्परविरोधी असू शकत नाहीत. कारण त्यांना योजनेच्या उद्दिष्टांनी एकात गोवलेले असते. तेव्हा ही उद्दिष्टे व तद्भूत आपापली कार्ये समजावून घेणे व योजनेत विसंगती असली, व्यवहारांत अडचणी आल्या तर त्या योजकांस समजावणे, याकरिता सर्वांनी एकत्र आले पाहिजे. हे जितक्या व्यापक भूमिकेवर, विस्तृत प्रमाणावर होईल तेवढे नियोजन निर्दोष होईल; व समज वाढला, संघर्ष कमी झाले म्हणून त्याची अंमलबजावणीही सहज व सुकर होईल. हे कोणा व्यक्तीचे काम नाही, तसेच राजकीय पक्षांचेही नाही. हे कार्य मुख्यतः अर्थव्यवहारांबाबत करावयाचे; त्यांत पुढाकार घेणे आपल्या चेंबरसारख्या संस्थांस इतर कोणाहीपेक्षा जास्त सोपे व शक्य आहे. तसेच हे कार्य सतत चालू ठेवले पाहिजे. यासही आपल्यासारख्या समर्थ संस्थेच्या पुरस्काराची गरज आहे. आजची परिषद ही भविष्यातील या कार्याची नांदी आहे असे मी समजतो. शेतकरी व ग्रामोद्योगी, त्यांच्या सहकारी संस्थांचे प्रतिनिधी, नियंत्रक व सरकारी अधिकारी अशा इतर अनेकांचा विचारविनिमयात भविष्यात समावेश होईल; व आपण फक्त व्यावसायिक दृष्टीतून प्रश्नांचा विचार न करता सगळ्यांस बरोबर घेण्याच्या बुद्धीने वागता हे कळल्यावर यात सगळ्यांचे आपणांस पूर्ण सहकार्यही मिळेल.

* महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषद, अधिवेशन आठवे, मुंबई, अध्यक्षीय भाषण, १५-१२-१९५६ (मुंबई, १९५६)

☆

# २ . . संयुक्त महाराष्ट्र, लोकशाही समाजवाद आणि आर्थिक नियोजन

**प्रश्न :** समाजवादी समाजाच्या दृष्टीने अनुकूल असे कोणते वैशिष्ट्य मराठी समाजात आहे? संयुक्त महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य समाजवादाच्या दिशेने वेगाने कूच करील म्हणून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला बड्या भांडवलदारांचा व उद्योगपतींचा विरोध होता, असे म्हटले जाते. त्यात कितपत तथ्य आहे? संयुक्त महाराष्ट्राचे समाजवादी नियोजन करणे कितपत शक्य आहे?

**उत्तर :** सामाजिक, आर्थिक व भौगोलिक परिस्थितीनुसार त्या त्या लोकसमूहांत काही विशिष्ट गुण निर्माण होतात. त्या लोकसमूहाच्या सर्वसामान्य आकांक्षांत या गुणांचे प्रतिबिंब आपल्याला पाहावयास मिळते. हळूहळू त्यांतूनच त्या त्या लोकसमूहाचा स्वभाव बनत जातो. मराठीभाषी लोकसमूहाचाही असा काही सर्वसामान्य स्वभाव आहे, असे दिसून येईल. कोणत्याही जातीजमातीचा मनुष्य असो, त्याच्यात तो सर्वसामान्य विशिष्ट स्वभाव आपल्याला हटकून आढळतो. राजकीय विचारप्रणाली भिन्न असली तरी हा जो स्वभाव, त्यात तसा विशेष मूलभूत फरक पडत नाही. मराठी माणसाचा हा जो स्वभाव तो ध्यानात घेतला तर मला असे वाटते की, समाजवादी समाजनिर्मितीचे काम येथे लौकर मूळ धरू शकेल. समाजवादी समाजनिर्मितीला येथे अनुकूलता अधिक आहे. समाजवादाला विरोधी शक्ती निर्माण व्हावी, अशी येथे परिस्थिती नाही. समाजवादी समाजात जे गुण विकास पावतील आणि जी कर्तबगारी फोफावेल असे गुण आणि कर्तबगारी मराठी लोकसमाजात आहे, असे मला वाटते. मराठी माणसात समाजवादाच्या दृष्टीने काही विशेष आहे असे नव्हे, पण मराठी समाजात मात्र तसे आहे.

पहिली गोष्ट म्हणजे मराठी समाजात वाणिज्य वृत्तीचा जवळजवळ अभाव आहे. येथील व्यापार फार प्राचीन काळापासून अन्य भाषकांच्या हातीच राहिला. पुष्कळसे कसबी कारागीरही कर्नाटक, गुजरात वा उत्तरप्रदेश या भागांतून आलेले आढळतील. मराठी विभागांतील व्यापारव्यवहाराचे नियंत्रण करणारा हा अन्यभाषी समाज आपल्या जातिसमाज–रचनेमुळे येथील लोकजीवनाशी पूर्णतः एकजीव झालेला नाही. मराठी समाजाला व्यापारविषयी ममत्वच नाही. त्यांना व्यापार-व्यवहार जमतो की नाही, हा मुद्दा नाही. पण त्यांना त्याचे आकर्षण वाटत नाही. त्यामुळे सधन किंवा धनसंचयाचा हव्यास असणारा वर्ग मराठी लोकसमूहात नाही. इतर भाषक समाजांत अशी स्थिती नाही, असे मला वाटते. येथे व्यापारी सत्ता अन्य भाषकांच्या हाती आहे. मराठी बुद्धिवान माणसांनाही त्या क्षेत्रात जागा मिळणे आज कठिण आहे. त्यामुळे समाजवादाला येथे विरोध नाही.

मराठी माणसाला चोख कारभार करता येईल. ती कर्तबगारी तो दाखवू शकेल. तो कल्पक आहे. चिकाटीने घेतलेल्या कामाच्या मागे लागणारा आहे. परंतु, व्यापारव्यवहारात आज लागणारे साहस

(एन्टरप्राइझ), धोका पत्करण्याची तयारी त्याच्यात नाही. त्याचे त्याला मनापासून आकर्षण नाही. सट्टेबाजी, तेजीमंदी, फ्यूचर ट्रेडिंग यांच्यावर आजचा पुष्कळसा धनसंचय होतो. या गोष्टी मराठी समाजाला आकलन होत नाहीत. आजच्या व्यापाराची भरभराट मुख्यतः या गोष्टींवर अवलंबून आहे. समाजवादी समाजात किंवा सहकारी पद्धतीच्या व्यवहारांत यांना स्थान राहात नाही; त्यामुळे समाजवादी समाजाच्या व्यवहारांत मराठी समाज कर्तबगारी दाखवू शकेल. बुद्धिमत्ता, कल्पकता, चोख कारभार, कष्टाळूपणा यांच्यावरच समाजवादी समाजातील व्यवहारांचे यश अवलंबून राहते. सरकारी नियंत्रणे वाढत गेली म्हणजे व्यापारातील 'साहसा'चे क्षेत्र आपोआप संकोच पावू लागते व त्यामुळे व्यापारव्यवहारांतील हेलकावे कमी होतात. सहकारी पद्धतीच्या व्यवहारांतही अशा प्रकारच्या व्यापारी साहसाला वाव नसतो. ज्याला नोकरपेशा किंवा कारभारीपेशा म्हणता येईल त्याला समाजवादी समाजात व सहकारी पद्धतीच्या संस्थांत अधिक वाव मिळतो. त्या वृत्तीचा सहजच परिपोष होतो. समाजवादी व्यवस्थेत मराठी समाजाच्या कर्तबगारीला योग्य वाव मिळून त्याची विशेष प्रगती होण्याचा अधिक संभव आहे.

महाराष्ट्रीय समाजाचा स्वभाव दर्शवणारे एक उदाहरण पाहा: भारतात रेशनिंग सर्वांत उत्तम रीतीने चालले ते मराठी प्रदेशात. धान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंचे नियंत्रण करावे, अशी मागणी मराठी समाजातील घटकांनी आपणहून केलेली आढळली. वाढत्या भावांचा फायदा उठवण्यापेक्षा नियंत्रणे अधिक श्रेयस्कर, अशी येथल्या बहुसंख्य लोकांची प्रतिक्रिया होती; व त्यामुळेच रेशनिंगव्यवस्थेचे येथे स्वागत झाले. वाटून सर्वांनी खावे, हीच बुद्धी याच्या मुळाशी होती. नियंत्रणाबद्दल लोकांची तक्रार होती, ती त्यामुळे आपण परावलंबी होतो, आपल्या कर्तबगारीला वाव मिळत नाही, अशी नव्हती. धान्य व वस्तू खराब आल्या किंवा वाटणी विषम झाली किंवा पक्षपात झाला तर लोक तक्रार करीत. नियंत्रणे गेली तर व्यापाराची उलाढाल करून खूप पैसा मिळवता येईल, ही कल्पना येथल्या समाजाला शिवली नाही. कोणी तसे केलेले येथील लोकांना रुचले नाही. मराठी माणसाने नियंत्रणाला स्वभावतःच विरोध कधी केला नाही. सर्व समाजाच्या भल्यासाठी स्वेच्छया नियंत्रणे पत्करायला येथील लोक स्वभावतःच तयार असतात. सरकारने गुळाचे कमाल भाव नियंत्रित केले त्यावेळची प्रतिक्रियाही ध्यानात घेण्यासारखी आहे. भाव नियंत्रित केल्यामुळे आम्हांला वाढत्या भावांचा फायदा घेऊन पैसा मिळवता येत नाही, अशी तक्रार बहुसंख्य बागायतदारांनीही केली नाही. त्यांचे म्हणणे एवढेच होते की, गुळाचे भाव जसे तुम्ही नियंत्रित केले त्याचप्रमाणे आम्हांला पेंडही नियंत्रित भावाने मिळेल अशी व्यवस्था करा. नियंत्रणे उठवण्याची मागणी करण्याऐवजी नियंत्रणे वाढवून सर्वांना सारखा वाव द्यावा, अशी येथील लोकांची मागणी होती, हे विशेष ध्यानात घेण्यासारखे आहे. मराठी समाजाचा स्वभाव यावरून दिसून येतो.

दुसरे उदाहरणही उद्‌बोधक आहे. मुंबई राज्यात कापडाचा धंदा फार मोठा आहे. अलीकडे गिरण्या बंद पडण्याची साथ सुरू झाली तेव्हा सरकारने त्याचा तपास करून उपाययोजना सुचवण्यासाठी एक समिती नेमली. ह्या जोशी-समितीने कापड गिरण्यांची पाहणी केली; व डबघाईला आलेल्या गिरण्या ताब्यात घेऊन चालवण्यासाठी एक बोर्ड नेमण्याची, ह्या समितीवर प्रमुख भांडवलदार सभासद असूनही, एकमताने सूचना केली. समितीची एकमुखाची शिफारस भारत सरकारने मान्य केली नाही! जर संयुक्त महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य असते तर येथील बहुसंख्य लोकप्रतिनिधींनी—मग ते कुठल्याही पक्षाचे असोत—ही सूचना उचलून धरली असती. तिचा पाठपुरावा केला असता. लोकसमूहाच्या स्वाभाविक प्रेरणांशी विरोधी वागून लोकप्रतिनिधी राहणे अवघड झाले असते. महाराष्ट्रात बहुमताने निवडून येऊन त्याच बळावर राज्य करायचे म्हटले तर बंद पडणाऱ्या गिरण्या ताब्यात घेऊन त्या

चालवण्याशिवाय गत्यंतरच राहिले नसते. आज जे कालहरण होते ते संयुक्त महाराष्ट्रात झाले नसते. याबाबत पक्षांचा प्रश्नच येत नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या राज्यात काँग्रेस जरी अधिकारावर असती तरी यापेक्षा त्वरेने याबाबत हालचाल निश्चित झाली असती.

आज द्विभाषिकात महाराष्ट्रीय जनतेच्या स्वाभाविक प्रेरणांचेही प्रतिबिंब कारभारात प्रभावीपणे पडू शकत नाही. मुंबई सरकारने ज्या गिरण्या ताब्यात घेऊन चालवायच्या ठरविल्या आहेत, त्या प्रायः सर्वच मराठी प्रदेशातल्या आहेत! सरकारने बोर्ड स्थापन करून बंद पडणाऱ्या गिरण्या ताब्यात घ्याव्यात, या कल्पनेची स्वाभाविकतः भांडवलदारांना भीती वाटते. त्यांना हवे त्या प्रकारचे साहस दाखवण्याला समाजवादी समाजात मुळीच वाव असणार नाही. जोशी-समितीच्या एकमुखी शिफारशींचाही सरकारने स्वीकार केला नाही, याच्या मुळाशी या सूचनेला असलेला भांडवलदारांचा विरोध हेच एक कारण संभवते. ह्या मंडळींचे आजच्या सरकारवर वजन आहे आणि ही मंडळी सरकार पक्षाचे आर्थिक आधारही आहेत.

मुंबईतील गलिच्छ आणि गलिच्छप्राय वस्त्यांतून राहणाऱ्या समाजाविषयी संयुक्त महाराष्ट्राच्या स्वतंत्र राज्याच्या सरकारचे धोरण आणि गेल्या बारा वर्षांतील मुंबई राज्याच्या सरकारचे धोरण यांतही खात्रीने तफावत दिसून आली असती. गेल्या दोन-तीन वर्षांत थोडा राजकीय फरक झाल्यामुळे या प्रश्नाचा विचार तरी होऊ लागला आहे. परंतु याबाबत इष्ट धोरण संयुक्त महाराष्ट्र झाल्याखेरीज अमलात येईल असे वाटत नाही. संयुक्त महाराष्ट्राचे वेगळे राज्य झाल्यावर मराठी समाजाच्या स्वभावाचे अधिक प्रतिबिंब अपरिहार्यपणेच येथील कारभारात पडले असते. अगदी कोणत्याही पक्षाचे मंत्रिमंडळ असते तरीही हे घडणे अपरिहार्यच होते. लोकशाही राज्यपद्धतीत लोकभावना व लोकप्रेरणा कारभारातही प्रभावी होतात. संयुक्त महाराष्ट्राच्या स्वतंत्र राज्यात समाजवादाचा कार्यक्रम धडाडीने आणि गतीने हाती घेणे अपरिहार्य झाले असते. मराठी माणसाच्या गुणांना समाजवादी समाजात योग्य बहर येणार असल्याने संयुक्त महाराष्ट्राचे समाजवादी नियोजन करणे सहज शक्य आहे, नव्हे ते अपरिहार्यच आहे.

**प्रश्न :** महाराष्ट्रात उद्योगधंदे कमी आहेत. शेती हाच येथला प्रमुख व्यवसाय आहे. शेतीत समाजवादी नियोजन कसे करता येईल? आणि त्याने उत्पादनवाढ कितपत साधेल?

**उत्तर :** व्यापार व उद्योगधंदे यांबाबत समाजवादाचा स्वीकार मराठी समाज तत्परतेने करील; परंतु ग्रामीण भागात तितक्याच सहज समाजवादाचा स्वीकार होण्याची शक्यता जरा कमी, अशी शंका येणे साहजिक आहे. इतर प्रांतांप्रमाणे येथे जमीनदारी नसल्याने त्याहीबाबत इतर प्रांतांपेक्षा येथे अनुकूलता अधिक आहे. परंतु भूधारणेची कमाल मर्यादा निर्धारित करताना येथेही कमाल मर्यादेपेक्षा अधिक क्षेत्र ज्यांच्याकडे आहे, त्यांचा विरोध होईल; व शेतकरी समाजातील धुरीण त्यांच्यांतील असल्यामुळे हा विरोध थोडा फैलावू शकेल. पण याहीबाबत योग्य पथ्य पाळले व लोक-शिक्षण केले तर फारशी अडचण येणार नाही. उदाहरणार्थ, सहकारी शेतीचे धोरण अमलात आणावयाचे म्हटले तर मध्यम शेतकऱ्याला स्वातंत्र्य ठेवावे लागेल. जमिनीच्या कमाल मर्यादेप्रमाणेच किमान मर्यादाही निश्चित करावी लागेल. फक्त किमान क्षेत्रापेक्षा कमी जमीन असेल त्यांनाच सहकारी पद्धतीने शेती करणे अनिवार्य करावे लागेल. कमाल क्षेत्रापेक्षा जी जमीन अधिक म्हणून काढून घेण्यात येईल ती आणि किमानपेक्षा कमी क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांची जमीन सहकारी पद्धतीने कसावी लागेल. कमाल क्षेत्राहून कमी क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांचा समाजवादी नियंत्रणांना विरोध होणार नाही; आणि किमान क्षेत्रापेक्षा कमी जमीन असलेल्यांना सहकारी शेती करण्यासाठी अधिक क्षेत्र मिळणार असल्याने

ते समाजवादी समाजरचनेचे स्वागतच करतील. परंतु त्यासाठी योग्य ते लोकशिक्षणाचे कार्य करावे लागेल. समाजवादाचा खरा अर्थ त्यांना समजावावा लागेल. भांडवलदारांविरुद्ध बोलले म्हणजे पान-पट्टीवाल्याला देखील आपल्याविरुद्ध काहीतरी बोलले जाते आहे असे वाटताना आढळते! पण त्याचे कारण समाजवादाविषयीचे त्याचे अज्ञान हेच असते. त्याचप्रमाणे कमाल भूक्षेत्रापेक्षा कमी जमीन-वाल्यांचा, म्हणजे फार तर ५-१० टक्के जमीन मालक सोडले तर इतरांचा, वास्तविक समाजवादी समाजरचनेला विरोध असायला नको. जर योग्य लोकशिक्षण दिले गेले तर तसा विरोध होणारही नाही.

लोकशाही मार्गाने म्हणजे बहुसंख्य जनतेच्या संमतीने समाजवाद निर्माण करायचा तर त्याला संयुक्त महाराष्ट्राचे स्वतंत्र राज्य हे सर्वात अनुकूल क्षेत्र ठरेल, असे मला वाटते. समाजवादी नियोजन यशस्वी करण्यासाठी लागणारी मनोवृत्ती आणि कर्तबगारी मराठी माणसात अधिक आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या स्वतंत्र राज्यात तिला अधिक वाव मिळेल. अर्थात हा महाराष्ट्राचा स्वभावविशेष असल्या-मुळेच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र होऊ देण्याला भांडवलदार वर्गाने विरोध केला. मुंबई हे व्यापारउदीम आणि उद्योगधंद्यांचे एक प्रमुख केंद्र आहे. समाजवादी समाजरचनेला विशेष अनुकूल अशा राज्यात मुंबई गेली की, स्वाभाविकच आजचे व्यापारउदीम आणि उद्योगधंदे यांचे स्वरूप सरकारी धोरणामुळे बदलेल व त्याचा परिणाम एकूण देशावर होईल, हे उघड आहे. त्यामुळेच मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राला भांडवलदारांचा विरोध झाला व होत आहे.

निसर्गाची अनुकूलता असेल, तर नियोजनाने उत्पादनवाढ होतेच. शेती-व्यवसायाचे उत्पादनही नियोजनाने वाढले पाहिजे, वाढू शकते. नियोजन म्हटले म्हणजे सामूहिक आणि समग्र दृष्टी आली. पण आर्थिक व सामाजिक न्यायाच्या भावनेशिवाय केलेले नियोजन कार्यवाहीत येऊ शकणार नाही. कारण तसे करावयाचे तर मोठ्या जमीनदाऱ्या निर्माण कराव्या लागतील. समाजवादाशिवाय शेतीचे नियोजनही शक्य होणार नाही, हाच याचा अर्थ होतो. आज शेतकरी जेमतेम निर्वाहापुरतेच मिळवीत असल्याने एक प्रकारची कोंडी झाली आहे. समाजवादी नियोजनाने ही कोंडी फोडता येऊ शकेल. नियोजनामुळे उपलब्ध साधनसामग्रीचा अधिक कसोशीने व काटकसरीने उपयोग केला जाऊ शकतो. सरकारची अनुकूलता असेल तर कामे त्वरेने आणि अधिक यशस्वी होऊ शकतात.

महाराष्ट्रात सहकारी साखर कारखाने निघाले आहेत. त्याबाबत सरकारचे धोरण अनुकूल नसते तर हे साधणे जवळजवळ अशक्य होते. जे साखर कारखान्यांबाबत शक्य झाले ते इतरही बाबतींत शक्य होईल. शेतीच्या जोडीला उद्योग-धंद्यांचेही नियोजन याच पद्धतीने करता येऊ शकेल.

मात्र हे करताना प्रत्येक पाऊल उद्दिष्टाच्या दिशेने पडेल हे डोळ्यांत तेल घालून पाहिले पाहिजे. सहकारी साखर कारखान्यांसाठी ऊस निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यांना पाण्याचे वाटप करताना अशी दक्षता बाळगून छोट्या शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक केली पाहिजे. कारखान्याच्या भागीदारांच्या भागीबद्दलही आम्ही मर्यादा ठेवलेली आहे. ती पाळून भाग-विक्रीबाबतही धोरण काळजीपूर्वक आखले पाहिजे. नाही तर हे कारखानेही पन्नास-पाऊणशे लोकांचे होणे शक्य होते. पण समाजवादी नियोजन म्हटले म्हणजे विचारपूर्वक काम करणे आणि धोरण ठरवणे हे गृहीतच आहे. सरकारने तांत्रिक बाबतींत सर्व प्रकारचे साह्य द्यावे, धोरणांची आखणी करताना समतेच्या दिशेने आर्थिक व्यवस्था प्रगत करण्याची दृष्टी ठेवावी, समग्र दृष्टी ठेवून उत्पादनाचे नियोजन करावे.

सहकारी कारखान्यांच्या योजनेमुळे छोट्या छोट्या शेतकऱ्यांनाही योग्य मदत मिळू लागल्याने त्यांचे उत्पादनही मोठ्या (जवळजवळ सधन) शेतकऱ्यांइतकेच वाढल्याचा आमचा अनुभव आहे. मोठ्या प्रमाणावर जमीन असली तर उत्पादनवाढ होते असे दिसते. पण त्याचे मुख्य कारण मोठी जमीन धारण करणाऱ्या सधन शेतकऱ्याला योग्य वेळी योग्य मेहनतमशागत करण्याच्या व करवून

घेण्याच्या सर्व सोयी मिळतात. छोट्या शेतकऱ्याला त्या मिळाल्या तर त्याचेही उत्पन्न वाढते. सहकारी पद्धतीने त्याला ह्या सोयी उपलब्ध होऊ शकतात. यामुळे काही किमान मर्यादेच्या पुढे छोटी मोठी शेती हा फरक, उत्पादनवाढीच्या संदर्भात गैरमहत्त्वाचा ठरू शकतो. पिकांची योग्य आणि शास्त्रीय दृष्टीने आखणी केली, योग्य नियंत्रणे ठेवली आणि जरूर ते साह्य मिळाले तर मध्यम शेतीही मोठ्या शेतीएवढी उत्पादनवाढ करू शकेल.

शेतीबाबत आणखीही एक गोष्ट महत्त्वाची आहे. शेतीचे केंद्रीकरण करू म्हटले तरी उत्पादनाचे साधन असलेली जमीन क्षेत्रदृष्ट्या एकत्र करणे शक्यच नसते. मोठी शेते करून देखरेख आणि संरक्षणासाठी नोकरवर्ग उभा करण्यापेक्षा मध्यम शेती अधिक सोयीची ठरेल. नोकरवर्गाच्या देखरेखीखालच्या मोठ्या शेतीपेक्षा बेताच्या विस्ताराच्या मालकीच्या शेतांत चोरी व नासधूस निश्चितच कमी होईल. याच कारणास्तव जेथे मोठ्या प्रमाणावर शेती करावयाची असेल तेथे कामकऱ्यांचे ममत्व टिकून राहील अशा पद्धतीवरची सहकारी शेतीच हवी.

**प्रश्न** : संयुक्त महाराष्ट्राचे समाजवादी नियोजन करताना कोणत्या गोष्टींकडे विशेष लक्ष देण्याची गरज आपणांस वाटते ?

**उत्तर** : बऱ्याच पुरोगामी गोष्टी सरकारी धोरणांत असूनही प्रभावी होत नाहीत, अमलात येत नाहीत, याचे कारण अज्ञान आणि दौर्बल्य. अज्ञान आणि दौर्बल्य कसे घालवायचे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यासाठी सामाजिक शक्ती निर्माण केली पाहिजे. अशी सामाजिक शक्ती निर्माण झाली नाही तर केवळ पुरोगामी कायदे करून आणि नियोजनाचे धोरण प्रगत ठेवून काहीही साधणार नाही. सामाजिक शक्तीच्या अभावी कायदा निष्प्रभावी ठरतो. आज कायदाच आमचा मार्गदर्शक, अशी स्थिती आहे. वास्तविक झाले पाहिजे उलटे. सामाजिक परिवर्तनाच्या ज्या ऊर्मी समाजात असतील, त्यांचे प्रतिबिंब कायद्यांत पडले पाहिजे. नियोजन काय किंवा कायदा काय, ते फल आहे—असायला हवे. परंतु आज आपल्याकडे स्थिती उलटच आहे. कायदा आणि नियोजन यांचे फल म्हणून समाजात नव्या ऊर्मी दिसाव्या, अशी अपेक्षा आपण बाळगून आहोत. आपल्या सर्व पुरोगामी गोष्टी वरून लादल्यासारख्या असल्याने त्या समाजजीवनाचे अंग बनत नाहीत. कारण त्या गोष्टी लोकशिक्षणाच्या फलस्वरूप झालेल्या नसतात. स्वातंत्र्योत्तर काळात लोकशिक्षणाकडे प्रायः पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. पुरोगामी कायदे केले म्हणजे झाले, अशी नेत्यांची आणि लोकप्रतिनिधींची समजूत झालेली दिसते. सर्व राजकीय पक्षांची अशी समजूत झालेली दिसते की, शासनसूत्रे हातांत आली आणि पुरोगामी कायदा केला की झाले समाजपरिवर्तन ! आला समाजवाद ! वाढले उत्पादन ! सहकारी संस्था भराभर उभ्या राहिल्या ! कायदा करणे एवढीच आपली जबाबदारी. तो एकदा झाला की सर्व गोष्टी घडून आल्याच. कायदा करणे हेच एक काम अशा भ्रमामुळे राजकीय पक्षांचे कार्यकर्ते लोकशिक्षणाचे कार्य करीत नाहीत. हे फार मोठे वैगुण्य आहे. राजकीय पक्षांच्या कार्यपद्धतीतील ही फार मोठी उणीव आहे. लोकशिक्षणाची चळवळ ही आजची फार मोठी गरज आहे. त्याशिवाय कायदा व नियोजन सार्थ होणार नाही.

गोखले अर्थशास्त्र संस्थेतर्फे कूळकायद्याच्या अंमलबजावणीची पाहणी करण्यात आली. ह्या पाहणीचे निष्कर्ष मोठे उद्बोधक आहेत. कूळकायद्यातील पुरोगामी बाबींचा प्रचार करण्याची कोणीच फारशी खटपट केली नाही. त्यामुळे कायद्यातील पुरोगामी भाग काय, कोणते नवे हक्क मिळाले आहेत, याची बहुसंख्य लोकांना बऱ्याच ठिकाणी कल्पनाही नाही. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती व्यवस्था नाही. कायद्यामुळे ज्या व्यावहारिक अडचणी उभ्या राहतात, त्या समजून घेऊन त्या दृष्टीने

कायद्यात योग्य त्या सुधारणा घडवून आणण्याची काहीही खटपट नाही. त्यामुळे कूळकायदा अपेक्षे-प्रमाणे परिणाम घडवून आणण्यात यशस्वी होऊ शकला नाही. त्यातील उणीवा दूर होण्याऐवजी त्यांचा फायदा घेऊन कायदा विफल करण्याचाच प्रयत्न झाला. याचा अर्थ असा मात्र नव्हे की, पुरोगामी कायदे करूच नयेत! उलट लोकशिक्षणाला किती अनन्य महत्त्व आहे, याकडे सर्वांनी, विशेषतः राजकीय पक्षांनी लक्ष द्यायला पाहिजे. समाजवादी नियोजनासाठी या गोष्टीची नितांत आवश्यकता आहे. नवचीनमध्ये कुठलाही नवा कायदा करण्यापूर्वी लोकशिक्षणाची मोहीम काढण्यात येते, ही गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे.

**प्रश्न :** आपला मुख्य प्रश्न उत्पादनवाढीचा आहे आणि त्यासाठी भांडवलउभारणी अत्यावश्यक ठरते. समाजवादी नियोजनात हे कसे जमणार?

**उत्तर :** समाजवादी नियोजनामुळे उत्पादन घटणार तर नाहीच, ते वाढेल. त्यातूनच नवे भांडवल उभारले जाईल. धंदा नियोजित पद्धतीने चालला व त्याला आवश्यक ते आर्थिक व तांत्रिक साह्य योग्य वेळी मिळाले तर त्यातून अधिक भांडवल निर्माण होते. सुरुवातीला लागणारे आर्थिक साह्य वेळेवर मिळाले पाहिजे. जर समाजवादी दृष्टी असेल तर असे साह्य मिळू शकेल. भांडवल उभारणी समाजवादी नियोजनाने अधिक विस्तृत प्रमाणावर होऊ शकेल. आमच्या प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याचे उदाहरण घेऊ. दहा वर्षांपूर्वी आमच्या साखर कारखान्याच्या हजार शेतकरी सभासदांचे दहा लाख रुपये भांडवल होते. आज त्याच सहकारी कारखान्याची मालमत्ता सव्वा कोटीची आहे! पंचवीस-तीस लाखांचे देणे वजा केले तर बाकीची भांडवल-उभारणी कारखान्याच्या उत्पादनातून सभासदांच्या मालकीचीच झाली आहे. याविषयी आणखी एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. ती ही की, जे भांडवलदार आज मराठी प्रदेशात आहेत तेही येताना काही भांडवल घेऊन आले असे नव्हे. ते रिकाम्या हातानेच आले होते. त्यांनी जमविलेले भांडवल येथल्या उत्पादनातूनच मिळालेले आहे. समाजवादी नियोजनात भांडवल उभारण्यात त्यांना आली त्याहून अधिक अडचण येईल, असे मुळीच नाही. उलट शोषण कमी होईल आणि उभारलेले भांडवल एका व्यक्तीचे न होता समूहाचे होईल; व त्याचा अधिक नियोजित पद्धतीने उपयोग करता येऊ शकेल. उत्पादन वाढते तसतसे भांडवलही अधिकाधिक उभारले जाते. सहकारी पद्धतीच्या उत्पादनात कोणाचेही शोषण न करता ते उभारले जाते हे विशेष. प्रश्न असतो सुरुवातीला लागणाऱ्या भांडवलाचा. सरकारी मदतीने हा प्रश्न सोडवता येऊ शकेल. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राला भांडवलाचा फार मोठा प्रश्न पडेल, असे मला वाटत नाही. समाजवादी नियोजन करूनही तो सुटू शकेल.

**प्रश्न :** संयुक्त महाराष्ट्राचे नियोजन करताना कोकण, देश, मराठवाडा, विदर्भ व मुंबई यांचा विचार वेगळा करावा लागणार नाही का?

**उत्तर :** कोकण, देश, मराठवाडा, विदर्भ आणि मुंबई हे मराठी प्रदेशाचे पाच भाग कल्पिले तर त्यांत फक्त कोकणचाच खास असा विचार नियोजनासाठी करावा लागेल. बाकीच्या भागांत सामान्यतः परिस्थितीत समानता आहे. कोकण खरोखरच गरीब आहे. निसर्ग अननुकूल असल्याने कोकणाला इतर प्रदेशांच्या समान पातळीवर ठेवायचे तर खास प्रयत्न करणे आवश्यक आहे. मराठवाड्यात आणि देश-भागात तसा फरक नाही. मराठवाड्यासाठी सुरुवातीस काही विशिष्ट दिशेने कार्यक्रम आखून प्रयत्न केला म्हणजे तो देश-भागाच्या सहज बरोबरीला येईल. वाहतुकीची त्वरेने व्यवस्था करावी लागेल, शिक्षणविषयक समता आणण्यासाठी खास सोयी उपलब्ध करून द्याव्या लागतील,

इत्यादी. विदर्भ इतर भागांपेक्षा अधिक संपन्न आहे असे समजले जाते. परंतु आकडेवारीवरून तसे सिद्ध होत नाही. विदर्भात विषमता फार आहे. तिथले श्रीमंत अधिक संपन्न आहेत. पण गरीबही देशावरच्या सर्वसामान्य गरिबांपेक्षा अधिक विपन्न आहेत. मुंबई हा एक वेगळाच प्रश्न आहे. व्यापाराचे ते एक प्रमुख केंद्र आहे. बँकिंग, परदेशी आयातनिर्यात व्यापार, वाहतूक या बाबींवर केंद्र सरकारचे नियंत्रण असल्याने त्याबाबत संयुक्त महाराष्ट्राच्या सरकारला काही विशेष करावयाचे नाही. परंतु संयुक्त महाराष्ट्राचे नियोजन करणाऱ्या सरकारला आजच्याप्रमाणे सामाजिक प्रश्नांकडे कानाडोळा करता येणार नाही. आज समाजवादी नियोजनाला काही वर्गांचा काही ठिकाणी विरोध दिसला तरी ते वर्ग येथील सर्वसामान्य लोकांच्या आकांक्षांशी येथील स्वतंत्र प्रांताच्या राजवटीत जुळवून घेतील. त्यांना येथेच जीवन कंठावयाचे असल्याने ते त्याला तयार होतीलही.

**प्रश्न :** लोकशाही नियोजनाच्या दृष्टीने आजची नियोजन पद्धती कितपत उचित आहे? त्यात कोणती सुधारणा केली पाहिजे? समाजवादी नियोजनाच्या यशाच्या दृष्टीने संयुक्त महाराष्ट्राकडून काही विशेष साह्य होईल, असे आपणांस वाटते काय?

**उत्तर :** अखिल भारतीय नियोजनाचा भाग म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राचेही नियोजन करावे लागणार आहे, हे उघड आहे. परंतु भारतीय नियोजनानेच समाजवादी समाजाचे उद्दिष्ट मान्य केलेले असल्याने येथील समाजवादी नियोजनात विशेष अडथळे आणले जाण्याचा संभव नाही.

आजचे भारतीय नियोजन हे खऱ्या अर्थाने लोकनियोजनच नाही. कारण योजनेसंबंधीचा प्रायः सगळा विचार आज दिल्लीत म्हणजे केंद्रातच होतो! नियोजनाच्या विकेंद्रीकरणाची भाषाही केंद्रातून बोलली जाते! पण प्रत्यक्षात राज्यसरकारेसुद्धा याबाबत निष्प्रभ ठरतात. तेव्हा नियोजन विकेंद्रित करण्याच्या आधी नियोजनाचा विचार विकेंद्रित होणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या प्रदेशांतील लोकांनी स्वतंत्रपणे नियोजनाचा विचार करून मग त्यांच्या सुसूत्रीकरणाचे काम केंद्राने केले पाहिजे. आज स्थानिक योजना होतच नाहीत. स्थानिक योजना म्हणून ज्या म्हणवल्या जातात त्या मूळ केंद्रित आराखड्याच्या शिक्कामोर्तबापुरत्याच असतात. दिल्लीचा तयार ठसा सर्वत्र उमटवला जातो! वास्तविक नियोजनाच्या अशा केंद्रित विचारामुळे कष्ट आणि साधनसामग्री यांचा फारच अपव्यय होतो. विकेंद्रित पद्धतीने नियोजनाचा विचार झाला तर ह्या गोष्टी टळतील.

मागच्या दुष्काळाच्या नंतर घोडखोऱ्याची दुष्काळनिवारण समितीने पाहणी केली होती. त्या एका घोडखोऱ्याचेच तीन वेगवेगळे भाग पडतात. आणि त्यांच्या विकासाचा विचार करताना निरनिराळ्या दृष्टीने योजना आखणे भाग आहे. सब घोडे बारा टक्के पद्धतीचे नियोजन तेथे उपयोगाचे नाही. एका भागात जंगलविकासाचे काम अगत्याचे ठरेल. दुसऱ्या विभागाच्या विकासासाठी विहिरी खणणे आवश्यक तर तिसऱ्या भागासाठी बंडिंगचे काम हाती घेण्याशिवाय गत्यंतरच नाही. परंतु नियोजनाचा विचार विकेंद्रित पद्धतीने झाला तरच ह्या विशिष्ट परिस्थितीची त्यात दखल घेतली जाण्याची काहीतरी आशा. जनतेचे खरे सहकार्य हवे ते या विकेंद्रित नियोजन व विचार यांतच मिळू शकेल. परंतु आज तसे होत नसल्याने तज्ज्ञांचे सहकार्यही वायाच जाते. दिल्लीत नियोजन-आयोगाच्या अर्थशास्त्र सल्लागार समितीची बैठक भरते. तेथे अखिल भारतीय पातळीवर सर्व देशातील तज्ज्ञ विचार करतात. परंतु, याच तज्ज्ञांना आपापल्या भागांतील विशिष्ट योजनेबद्दल सल्ला देण्याची काहीच सोय नाही.

आज जिल्ह्याच्या विकास मंडळात केंद्राचा कल पाहूनच योजना मांडल्या जातात. त्यामुळे लोकांच्या आकांक्षांचे प्रतिबिंब त्यात पडत नसल्याने त्यांना जनआंदोलनाचे रूप येत नाही. रशियानेदेखील नियोजनाचे १०० हून अधिक प्रादेशिक विभाग (प्लॅनिंग रीजन्स) नियोजन व्यवस्थेसाठी पाडले

आहेत. पोलंडमध्येही क्रांतिकारक उठावाने हेच साधले. नियोजनाचा अशा विकेंद्रित पद्धतीने विचार झाला म्हणजे स्थानिक समाजाला योजनेविषयी ममत्व वाटते आणि मग योजना म्हणजे नोकरशाहीचा कारभार न बनता लोकसहकार्याचे आंदोलन बनू शकते.

आज योजनेबद्दल लोकांना विशेष प्रेम नाही. त्यांचे उत्स्फूर्त सहकार्य मिळत नाही. योजनेचा विचारच त्यासाठी विकेंद्रित करावा लागेल. असा विकेंद्रित पद्धतीने व प्रादेशिक आकांक्षाची बूज राखणारा विचार सुरू झाला की, संयुक्त महाराष्ट्राची योजना स्वाभाविकच समाजवादाच्या दृष्टीने अधिक वेगाने प्रगती करणारी असेल. संयुक्त महाराष्ट्र हे वेगळे राज्य झाले तर अधिक पुरोगामी कार्यक्रम येथे सत्ताधारी पक्षाला हाती घ्यावा लागेल. कारण महाराष्ट्रातील प्रायः सर्वच पक्षांनी समाजवादाचे ध्येय मान्य केले आहे.

**प्रश्न :** द्विभाषिकात एकभाषिक राज्याचे सर्व फायदे देण्याचे सरकार आश्वासन देत आहे. मग आपल्याला नियोजनाबाबत द्विभाषिकाचा अडथळा का वाटतो?

**उत्तर :** संयुक्त महाराष्ट्राचे वेगळे राज्य झाले की, येथे नवे राजकारण आपोआप सुरू होईल. संयुक्त महाराष्ट्राचे वेगळे राज्य नसल्याने आज मराठी समाजाच्या कित्येक महत्त्वाच्या समस्याही उपेक्षितच राहिल्या आहेत. उदाहरणार्थ येथील हरिजन व नवबुद्धांचा प्रश्न. आज तो प्रश्न टाळूनही राज्य चालू शकत असल्याने त्याकडे हवे तेवढे लक्ष दिले जात नाही. पण संयुक्त महाराष्ट्राचे वेगळे राज्य झाले की, ब्राह्मणब्राह्मणेतर वाद जसा सुटण्याच्या मार्गाला लागत आहे, त्याच पद्धतीने मराठा–महार संघर्षही सोडविण्याचा हेतुपुरःसर, आटोकाट प्रयत्न करावा लागेल. असे अनेक प्रश्न आहेत की, जे या द्विभाषिकात सरळ रीतीने विचारात घेण्याचीच सोय किंवा शक्यता नाही. द्विभाषिकामुळे येथील लोकशाही अयथार्थ बनणार आहे. कारण द्विभाषिकामुळे कारभारही स्वभाषेतून होण्यास विलंब लागत आहे. सर्व शिक्षणाचे माध्यम मराठी करणेदेखील यामुळे अव्यवहार्य ठरत आहे. समाजवादी नियोजनाच्या बाबतीतदेखील द्विभाषिक हा मोठाच अडसर आहे. खरे म्हणजे द्विभाषिकाची खरी तत्त्वनिष्ठा कोणातच नाही. जर खरोखर द्विभाषिकाची निष्ठा असती तर दोन्ही भाषांचे शिक्षण येथे अनिवार्य केले गेले असते. सर्व अधिकारी व नेते ह्या दोन्ही भाषा नेटाने शिकले असते व त्यांत त्यांनी वाकबगारी संपादन केली असती. पण हे काहीच होत नाही, करण्याची कोणाची इच्छा नाही. त्यामुळे ही द्विभाषिकनिष्ठा बेगडी आहे. एका राज्यात राहूनही हे दोन लोकसमाज एकजिनसी बनण्याची शक्यता नाही. एका राज्यात हे दोन समाज वेगवेगळे राहाणार आणि आपापल्या गटाच्या हिताच्या जपणुकीसाठी झगडत-भांडत राहणार. संयुक्त महाराष्ट्राच्या वेगळ्या राज्यातील वेगवेगळ्या राजकीय पक्षांत जेवढे किमान साम्य दिसेल तेवढे ह्या द्विभाषिकात राज्यकर्त्या पक्षातच संभवत नाही. त्यामुळे एकभाषी राज्यातील बहुपक्षी लोकशाही व्यवस्येतही समाजवादी नियोजनाबद्दल जो उत्साह दिसेल व नियोजनाचा जो उठाव होईल तो या द्विभाषिकात दिसणार नाही. बहुमतवाल्या पक्षातच एकजिनसीपणा नसणार, हितभिन्नता असणार आणि त्यामुळे लोकशाही समाजवादी नियोजनात द्विभाषिक हाच एक मोठा अडसर होणार. समाजवादी नियोजनाच्या यशस्वितेच्या दृष्टीनेही एकभाषी राज्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते.

* *साधना* १२ : १-२, १५-८-१९५९, लोकशाही समाजवाद विशेषांक, पृ. १९-२४. ('साधने'च्या प्रतिनिधीने घेतलेली-खास मुलाखत)

☆

# ३ . . वर्धा जिल्ह्याची विकास योजना : उद्देश, स्वरूप व कार्यपद्धती

वर्धा जिल्ह्यात हल्ली चालू असलेल्या जिल्हा योजनेबाबतच्या उपक्रमाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :—सर्व योजना खालतून व्हाव्या, वरून लादल्या जाऊ नयेत असे नेहमी म्हटले जाते, हे प्रत्यक्षात साध्य कसे करता येईल याविषयी अनुभव मिळविणे हा एक उद्देश. अखिल भारतीय विकास योजना आज कोणत्याही प्रदेशात अगर जिल्ह्यात निरनिराळ्या खात्यांचे विशिष्ट कार्यक्रम या स्वरूपात दिसून येते. या निरनिराळ्या कार्यक्रमांचा एकमेकांशी संबंध किंवा त्यांच्या अंतिम यशस्वितेचे गमक यांविषयी सुस्पष्ट कल्पना आढळत नाही. हे दोष टाळून सुसंगत, सूत्रबद्ध व परिणामकारक योजना वा कार्यक्रम तयार कसे करता येतील ते अजमावणे हा आणखी एक उद्देश.

दोन पंचवार्षिक योजना पुऱ्या झाल्या तरी जनतेतील अनेक, विशेषतः निकृष्ट स्थितीतील, स्तरांस त्यांचा फायदा झालेला दिसत नाही ही तक्रार सार्वत्रिक आहे; आणि म्हणूनच अंत्योदय साधण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न कटाक्षाने केला पाहिजे, असे मत अलीकडे बळावले आहे. याही दृष्टीने काय, कितपत व कसे करता येईल, ते योजणे हा प्रस्तुत खटपटीचा प्रमुख उद्देश आहे. वर्धा जिल्हाविकास कार्यक्रमांविषयी कोठेही चर्चा, मांडणी अगर जुळणी करताना ही सर्व उद्दिष्टे लक्षात घेतली पाहिजेत.

१

## सूत्रबद्ध कार्यक्रमांची जरूर

योजनांतील निरनिराळे कार्यक्रम सूत्रबद्ध करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण याशिवाय हे कार्यक्रम परिणामकारक होणार नाहीत, किंवा त्यांच्या यशस्वितेचा पडताळाही पाहता येणार नाही. सूत्रबद्ध करणे याचा अर्थ निरनिराळ्या कार्यक्रमांचा प्रत्यक्ष, तपशीलवार संबंध एकमेकांशी आणि कोणत्यातरी प्रमुख उद्दीष्टांशी जोडणे हा होय.

उदाहरणार्थ, वर्धा जिल्ह्यात, विशेषतः आर्वी भागात, जंगल व पड जमीन हे आज अविकसित, पद्धतशीर उपयोगात न आणलेले एक प्रमुख साधन आहे. तेव्हा येथील विकास योजनांचे एक प्रमुख उद्दिष्ट या साधनांचा उपयोग करणे हे असले पाहिजे. जंगल व पड जमिनीपैकी काही अल्प भाग वहित जमिनीखाली येण्यासारखा असेल तो सोडून बाकी सगळ्याचा उपयोग गवत, चारा, हरतऱ्हेचे लाकूड व इतर जंगली माल यांच्या उत्पादनाकरताच होऊ शकेल. याबाबतचे प्राथमिक कार्य म्हणजे या साधनांचा सर्वोत्तम उपयोग हरतऱ्हेने कसा करता येईल याची तज्ज्ञांच्या सल्ल्याने दीर्घकालीन

योजना तयार करणे. परंतु अशी योजना सुरुवातीस तरी कच्ची राहील. कारण, अशा प्रकारच्या योजनांचा प्रत्यक्ष अनुभव आपलेकडे फारसा नाही. तेव्हा दीर्घकालीन आराखड्याची चौकट स्थूल मानाने कल्पून विशिष्ट कार्यक्रम प्रयोगादाखल ताबडतोबीने हाती घेण्याचे योजावे लागेल. हे करताना दोन दृष्टीने विचार झाला पाहिजे. जंगल व पड जमिनीच्या विकासात अनेक प्रकारची लक्ष्ये अभिप्रेत असू शकतात. उदाहरणार्थ, गवत-चाऱ्याचा व सरपणाचा पुरवठा यांचा अनेक दृष्टींनी आर्थिक जीवनाशी निकट संबंध आहे. गवत-चाऱ्याचा पुरवठा निदान तीन प्रकारे वाढविता येण्यासारखा आहे. (१) जंगलात अगर गुरचराईत गुरे चारण्याची नियंत्रित, शास्त्रीय व्यवस्था करून, (२) जंगलात व पड जमिनीवर गवत-चाऱ्याची पद्धतशीर लागवड करून व गवत-चाऱ्याच्या कापणीची व साठ्याची व्यवस्था करून, आणि (३) जंगलात व पड जमिनीवर चाऱ्याच्या पाल्यायोग्य झाडांची लागवड करून. गवत-चाऱ्याची वाढ योजावयाची तर वाढलेल्या चाऱ्याचा उपयोग कोठे व कसा करावयाचा याचीही योजना झाली पाहिजे. तेव्हा स्थानिक किंवा दूरच्या पशुसंवर्धन योजनांचा यांशी संबंध जोडला पाहिजे. प्रथम चारावाढीच्या योजनांचे वर्गीकरण करून प्रत्येक बाबीत निश्चित स्वरूपात कोणती योजना हाती घेता येईल हे अजमावून कशी कोठे व कोणत्या प्रमाणात सुरुवात करावयाची ते ठरविले पाहिजे. तसेच अशी प्रत्येक योजना परिमाण व काल या दोन्ही प्रकारे चारा वापराच्या योजनांशी संलग्न केली पाहिजे. चारापुरवठा किती त्वरेने, केवढा वाढेल या दृष्टीने त्याच्या वापराची योजना आखली पाहिजे. तसेच वापर दूर अंतरावर असल्यास चाऱ्याची साठवण व वाहतूक यांचा समावेश योजनेत झाला पाहिजे. एवंच कोणत्याही कार्यक्रमाचा स्वतंत्र, एकाकी विचार करता यावयाचा नाही. तो हाती घ्यावयाचा तर एका समग्र अंगाच्या योजनेत तो कोठे बसतो हे प्रथम ठरवावे लागेल.

सरपणाचा प्रश्न आजवर मानला गेला त्याहून फार महत्त्वाचा वाटतो. झाडाझुडपांचे संरक्षण व वाढ होण्यात सरपणाचा तुटवडा व त्याची महर्घता या प्रमुख अडचणी आहेत. यामुळे तोड अनावर होते. तेव्हा सरपणाचा पुरवठा वाढविण्याचा कार्यक्रम पद्धतशीर, मोठ्या प्रमाणावर हाती घेणे आवश्यक आहे. तसेच जंगल, चारा, सरपण इत्यादींविषयक संरक्षणाची जबाबदारी स्थानिक संस्थांवर टाकणे इष्ट वाटते. सरपण ही केवळ कौटुंबिक गरजेची बाब नसून वाढत्या औद्योगिक गरजेचीही बाब आहे. स्थानिक विटांच्या धंद्यात आजच गवऱ्यांचा उपयोग फार मोठ्या प्रमाणावर होतो व शेणखताची तूट फार मोठी असताना हे होते. यावरून विकासकार्यात सर्व प्रकारच्या साहित्याचा पुरवठा वाढविणे हे नेहमी कसे परस्पर पूरक ठरते हे लक्षात येईल. वृक्षसंरक्षणाबाबत बकऱ्यांचा प्रश्नही महत्त्वाचा आहे. तेव्हा पशुपालनाच्या योजनांचा विचार करताना बकऱ्यांच्या पालनाचे कडक नियमन करणे, अशा प्रकारच्या उपायांचा विचार झाला पाहिजे.

जंगल व पड जमिनीप्रमाणेच इतर अनेक बाबतींतही आजवरचे ज्ञान व अनुभव वर्धा जिल्ह्याच्या परिस्थितीच्या दृष्टीने अपुरे आहेत. प्रमुख बाब भूसंरक्षणाची. पश्चिम महाराष्ट्रातील अनुभव बऱ्याच अंशी येथे गैरलागू आहे. तेव्हा निरनिराळ्या प्रकारे प्रयोग करून सामुदायिक योजना कोठे हाती घेता येईल, व्यक्तिशः प्रयत्न कोठे व कसे करावयाचे हे ठरविले पाहिजे; व हे घडवून आणण्याकरता प्रयत्न झाले पाहिजेत. म्हणजे यातही योजनेच्या प्रथमावस्थेत अमुक परिस्थितीत सामुदायिक व अमुक परिस्थितीत वैयक्तिक हे ठरवून विशिष्ट कार्यक्रम कसे, कोणी, कोठे सुरू करावयाचे याची तपशिलात तयारी केली पाहिजे.

पशुपालन व दुग्धव्यवसाय यांबाबत पुढील प्रयत्नांची दिशा विचारपूर्वक ठरविणे आवश्यक आहे. बैलांची पैदास व दूध उत्पादन हे दोन व्यवसाय नेहमी निराळे चालवावयाचे काय? बैलांच्या संख्येत सहकारी उपक्रमांनी काट होण्याचा संभव आहे काय? भाकड व अनुपयुक्त जनावरांची संख्या कमी

कशी होईल ? अवलादीत सुधारणा करण्याकरता कोणत्या स्थानिक जाती निवडाव्या अगर बाहेरून आणाव्या ? सुरुवातीस योजना आखतानासुद्धा या प्रश्नांचा, निर्णायक नव्हे तरी, प्राथमिक विचार व्हावा.

## पूर्वानुभव लक्षात घेणे आवश्यक

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे कोणताही कार्यक्रम हाती घेण्यापूर्वी त्या बाबतचा आजवरचा अनुभव जमेस धरणे आवश्यक आहे. शेती उत्पादनात खतास फार महत्त्व आहे. याबाबतचे नेहमीचेच कार्यक्रम सुपरिचित आहेत. उदाहरणार्थ, कंपोस्ट खड्डे, सोनखताचा वापर, सोनताग लागवड, रासायनिक खतांचा प्रसार, इत्यादी. या सर्वांबाबत आज काही कार्य चालू आहेच. हेच मागून पुढे नेण्यात अर्थ नाही. उदाहरणार्थ, सोनताग लागवडीबाबत काही व्यावहारिक अडचणी किंवा रासायनिक खतवापराबाबत काही गैरसमज असल्यास त्यांचे निवारण कसे करावयाचे याचा विचार प्रथम झाला पाहिजे. अगर, पैसा उपलब्ध नाही किंवा पुरवठा वेळेवर खात्रीपूर्वक नाही म्हणून जर वापर नसला तर याविषयी तरतूद झाल्याखेरीज नवीन कार्यक्रम हाती घेणे इष्ट नाही. आणि घ्यावयाचा तो जेथे पूर्वानुभवावरून आलेल्या सर्व अडचणींचे निवारण करणे शक्य आहे तेथेच घेतला पाहिजे. दुसरे उदाहरण विहिरींबाबतचे. जिल्ह्यातील बहुतेक भागांत फार मोठ्या प्रमाणावर विहिरी आज उपयोगात नाहीत. याविषयी नुसते त्या उपयोगात आणल्या तर पाणीपुरवठा वाढेल असे म्हणून चालणार नाही. मुळात पाणीपुरवठा पुरेसा उपलब्ध आहे किंवा नाही, विहिरींस पुरेसे पाणी लागण्यास जादा खर्च किती लागणार, त्याचे पाण्यावरील जादा उत्पन्नाशी प्रमाण काय पडते, अशा प्रश्नांचा प्रथम विचार झाला पाहिजे. अनेक भागांत हल्लीच्या विहिरींनाच पुरवठा पुरेसा नाही, हे अपुऱ्या वीजवापरावरून सिद्ध झाले आहे. विहिरींबाबतचा कार्यक्रम कोठे व कसा हाती घ्यावयाचा याचा विचार वरील अनुभवांच्या अनुरोधानेच केला पाहिजे.

## औद्योगिक विकासाचा विचार

कार्यक्रमाच्या आराखड्यात आजपर्यंत औद्योगिक विकासाचा विचार झाला नाही. ही उणीव लवकरच भरून काढली पाहिजे. या विचारातील मुख्य बाबी खालीलप्रमाणे : (१) हल्लीच्या पारंपरिक ग्रामोद्योगांची आर्थिक व तांत्रिक सुधारणा. सांप्रतच्या प्रशिक्षण किंवा सहकाराच्या योजना सफळ न होण्याची कारणे म्हणजे ग्रामोद्योगाचा आर्थिक पायाच कच्चा आहे. तंत्र सुधारून, नवीन उत्पादन-प्रकार शोधून, भांडवल व विक्रीची योजना अमलात आणून हा पाया प्रथम मजबूत केला पाहिजे. जेथे हे शक्य असेल तेथेच विकास योजनांचा विचार प्रस्तुत ठरतो. (२) ग्रामोद्योगाच्या कार्यक्रमाचा दुसरा भाग म्हणजे सर्व प्रकारच्या शेत व जंगल मालाच्या प्रक्रियांबाबतचे उद्योग ग्रामीण सहकारी व्यवस्थेत बसवून पुढील औद्योगिक विकासाची पूर्वतयारी करणे. हे काम पहिल्या अवस्थेत हल्ली खाजगी उद्योगधंदे करीत आहेत त्या प्रकारचे आहे; पण पुढील प्रगती बहुतांशी संशोधन व प्रयोग यांजवर अवलंबून आहे. (३) रस्ते, घरे व एकंदर बांधकाम यांचा, स्थानिक अनुकूलतेचा विचार करून ग्रामोद्योगांत समावेश करणे. याबाबतही संशोधन व प्रयोगाची बरीच जरुरी आहे. (४) स्थानिक ग्रामजनतेच्या नेहमीच्या वापरातील पदार्थ-वस्तू नागर उद्योगधंद्यांच्या पैदाशीच्या असतील त्यांचे उत्पादन ग्रामोद्योगद्वारा कितपत होऊ शकेल याचा विचार करणे, याबाबत संशोधन करणे. (५) मोठी कारखानदारी जिल्ह्यात प्रस्थापित असेल तर तिच्या अनुषंगाने काही ग्रामोद्योग उभारणे.

## सर्व स्तरांचा अभ्युदय अभिप्रेत

योजनांची प्राथमिक बांधणी मूळ उत्पादक व्यवसायांनुसार होईल. यातील मुख्य भाग म्हणजे बागायत शेती, जिरायत शेती, पशुपालन व ग्रामोद्योग हे होत. यांचा विचार होताना कोणते प्रश्न उद्भवतात हे टिपणांत व चर्चेत दर्शविले आहे; व काही पूरक बाबींचा उल्लेख वर केला आहे. परंतु या व्यावसायिक योजनाही एका मोठ्या चौकटीत बसविल्या पाहिजेत. विकास योजना ही साधनांवर आधारित असली तरी ती माणसांकरिता आहे, या दृष्टीने ही चौकट बनविली पाहिजे. विशिष्ट उत्पादन-व्यवसायांत स्थिरावलेल्या कुटुंबांबाबत व्यावसायिक योजनेपलीकडे विशेष विचार न केला तरी भागण्यासारखे आहे. मोठ्या बागायतदारांस बागायत शेतीच्या विकास योजनेचा पूर्ण फायदा घेता येतो; त्याकरिता निराळे काही करण्याची आवश्यकता नाही. परंतु ज्यांच्यापाशी काही उत्पादन-साधने नाहीत किंवा विशिष्ट कसब नाही त्यांच्या विकासाचा म्हणजे अभ्युदयाचा विचार व्यावसायिक विकास योजनांत अंतर्भूत असेल असे नाही. तसेच ज्यांच्यापाशी असलेली आजची संपत्ती अगर साधने फार अपुरी आहेत त्यांच्याबाबत व्यावसायिक पुनर्घटनेची अगर पूरक व्यवसायाची योग्य सोय केली पाहिजे. हेही केवळ व्यावसायिक योजनेत सहसा साधत नाही. तेव्हा साधने व व्यवसाय यांच्या विकासाच्या योजना व्यापक प्रादेशिक योजनेत बसवाव्या लागतील; आणि याबाबत विचार प्रदेशातील सर्व कुटुंबांच्या हिताच्या दृष्टीने करावा लागेल.

प्रादेशिक योजनेतील एक प्राथमिक विचार म्हणजे प्रदेशाच्या सर्व भागांचा विकास हा होय. प्रदेशातील सर्व भागांतील निसर्ग-साधनांचा विचार केला म्हणजे एकप्रकारे सर्व प्रदेशाबाबत तरतूद होते. परंतु आधुनिक अर्थव्यवस्थेत एवढ्याने भागत नाही. कारण अर्थव्यवहाराच्या प्रमुख केंद्रांशी ज्या मानाने कोणताही भाग संलग्न असेल त्या मानानेच सर्व प्रदेशाच्या आर्थिक विकासाचा त्यास फायदा मिळतो. यामुळे वाहतुकीच्या साधनांची योग्य वाढ होऊन सर्व भागास आर्थिक व्यवहारांत पूर्णपणे सहभागी होता येईल हे पाहिले पाहिजे. या दृष्टीने वाहतूकविकासाची योजना हा समग्र योजनेचा एकप्रकारे सांगाडाच आहे. तसेच वीज व पाणी, शिक्षण व आरोग्य यांचा पुरवठा वाहतुकीसारखाच आधुनिक जीवनविकासास आवश्यक असल्यामुळे याबाबतच्या योजनांचा विचारही प्राथमिक सांगाड्याच्या विचाराबरोबर व्हावयास हवा.

ही प्रादेशिक–भौगोलिक दृष्टी झाली. कौटुंबिक दृष्टीने वर सांगितल्याप्रमाणे शेती व ग्रामोद्योगांची आजची परिस्थिती ध्यानात घेता हरतऱ्हेचे पशुपालन एवढाच एक सार्वत्रिक पूरक व्यवसाय सांगता येतो. पशुपालनाच्या मर्यादा ध्यानात घेता या सर्व कुटुंबांकरता मुख्य योजना म्हणजे वाढत्या मजुरीची योजना करावी लागेल. विकास कार्यांत मजुरीचे काम कसे, कोठे, कोणत्या प्रमाणात वाढेल व त्यामुळे आजच्या पूर्ण व निम-मजूरवर्गाच्या रोजगारीचे उत्पन्न किती वाढेल हे पाहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शेती अगर औद्योगिक विकास योजनांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारी वाढण्याचा प्रथम तरी संभव नाही. तेव्हा निसर्ग-साधनांचे संरक्षण व संवर्धन व प्रादेशिक विकास यांबाबतच्या सर्वसाधारण योजनांवर भर देऊन रोजगारी वाढवावी लागेल. निसर्गसंपत्तिसंवर्धक व वाहतुकीच्या साधनांची वाढ ही अशा प्रकारची प्रमुख कार्ये आहेत. तेव्हा जेथे अनुकूलता असेल तेथे शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात अशा कार्यक्रमांचा योजनेत समावेश झाला पाहिजे. सर्व कुटुंबांस शक्य तितक्या लवकर योजनांचा फायदा मिळेल याकरता हे करावयाचे, तसेच प्रादेशिक विकासाची पूर्वतयारी व पाया म्हणून निसर्ग-साधनांचे संवर्धन जितके प्रगत होईल तितके इष्ट म्हणूनही या कार्यक्रमात त्यास अग्रस्थान द्यावयाचे.

परंतु असा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावयाचा व बहुसंख्य कुटुंबांस त्याचा फायदा

मिळावयाचा तर मनुष्यबळाच्या संघटनेचे नियोजन झाले पाहिजे. कोणत्याही व्यवसायात जो स्थिरावला आहे त्याला व्यावसायिक योजनेचा फायदा चटकन मिळू शकतो. पण ज्याचे स्थान डळमळीत आहे त्याच्याविषयी विचार करावा लागतो असे वर म्हटले. हे शेतीत विशेष महत्त्वाचे आहे. कारण ज्याची शेती छोटी त्याचे मनुष्यबळ मोठ्या प्रमाणात अनुपयुक्त ठरते; परंतु शेतीच्या पुनर्रचनेखेरीज या मनुष्यबळाचा इतरत्र उपयोग करता येत नाही. बैल वगैरे साधनांचेही असेच होते. शिवाय आर्थिक दुर्बलतेमुळे छोटा शेतकरी जमिनीचाही योग्य उपयोग करू शकत नाही. करिता, छोट्या शेतकऱ्यांचे परस्पर सहकार्य घडवून आणवून त्यांची जमीन, इतर साधने व मनुष्यबळ यांचा योग्य उपयोग करण्याचे योजिले पाहिजे. असल्या प्रयत्नांचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे एका गावातील अगर शेजारातील सर्व छोट्या शेतकऱ्यांची सहकारी शेती. पण हे टप्प्याटप्प्याने साधेल. याकरता अनेक दिशेने प्राथमिक प्रयत्न झाले पाहिजेत. सहकारी शेतीच्या आधी शेतकामांत बैल व मनुष्यबळाचे परस्पर सहकार्य किती लाभेल हे पाहता येईल. तसेच अशांचे सहकारी मजूर-गट तयार करता येतील. या दिशेने प्रयोग किती व कोठे करावयाचे व अशा गटांस विकास योजनांतील कोणत्या प्रकारचे काम देता येईल हा एक महत्त्वाचा विचार आहे.

छोट्या शेतकऱ्यांच्या संघटनांस काही मजुरी काम पत्करता येईल व त्यामुळे या कुटुंबांचे मजुरीचे उत्पन्न निश्चित वाढेल. परंतु ही सर्व शेतकरी कुटुंबे असल्यामुळे त्यांची मजुरी करण्याचे स्थळ व काळ ही मर्यादित असणार. मोठ्या विकास योजना त्वरेने व कार्यक्षमतेने पार पाडावयाच्या तर याहून व्यापक व प्रभावी मजूर संघटना हव्यात. या अर्थात आजच्या भूमिहीन मजुरांच्या असणार. यांचा उपयोग दोहोंपक्षी होईल. भूमिहीन मजूर संघटित झाले म्हणजे पद्धतशीर रीतीने शक्य तेवढे जास्त दिवस त्यांस मजुरी मिळवून देण्याचे प्रयत्न करता येतील. उलट विकास कार्यक्रमांत मजुरांचा पुरवठा जेथे व ज्या प्रमाणात हवा तेथे भूमिहीन मजुरांच्या संघटनांच्या द्वारा तो उपलब्ध करून देता येईल.

छोट्या शेतकऱ्यांचे परस्पर सहकार्य व भूमिहीनांची सहकारी संघटना या साध्य झाल्याखेरीज वर्धा योजनेतील एक प्रमुख उद्दिष्ट-अंत्योदय-साधू लागणे कठीण आहे. पण याबाबतचा कार्यक्रम आखावयाचा तो काळजीपूर्वक आखला पाहिजे. असल्या प्रकारच्या संघटनांविषयीचा उपलब्ध अनुभव इतका मर्यादित आहे की, या सहकारी संघटनांबाबतही निरनिराळ्या प्रकारच्या प्रयोगांचा प्राथमिक कार्यक्रम ठरवावयास हवा. तसेच या संघटनात्मक प्रयोगांचा विकास योजनांशी परस्पर संबंध सुस्पष्ट झाला पाहिजे. विकास कार्यक्रमांत त्या उपयुक्त व फलदायी ठरतील अशा रीतीनेच त्यांची घटना व कार्यपद्धती बनविली पाहिजे.

## विकास योजनेचे टप्पे

विकास योजनेची मांडणी व जुळणी यांचा क्रम सारांशाने दर्शविणे आवश्यक आहे. पहिला टप्पा भौगोलिक-प्रादेशिक योजनेचा. याची सुरुवात वाहतुकीच्या साधनांच्या विचारापासून होईल. यांचा विचार करताना शिक्षण, आरोग्य, अनेक प्रकारचे अर्थव्यवहार—उदाहरणार्थ, बाजारपेठ, बँका इत्यादी—सरकारी तांत्रिक मदत, यांची केंद्रे—अस्तित्वात असलेली किंवा योजलेली—ही जमेस धरली पाहिजेत. म्हणजे वाहतूक आणि अर्थ व समाज-व्यवहारांचा सांगाडा यांचा एकत्र विचार प्रथम झाला पाहिजे. दुसरा टप्पा निसर्गसाधनांच्या संरक्षण व संवर्धन योजनांचा. याचे दोन भाग कल्पिता येतील. पहिला भाग एकंदर साधने किती व कशा प्रकारची आहेत याची माहिती संकलित करणे. दुसरा भाग निरनिराळ्या प्रकारच्या साधनांविषयीच्या संरक्षण-संवर्धन कार्याच्या प्रत्येक अंगाची सुरुवात कशी करावयाची, प्रयोग कोठे योजावयाचे, याबाबतचा. दुसऱ्या भागाचा तपशील सुरुवातीस एक-दोन वर्षांच्या पुरताच पूर्ण योजलेला असेल. या दुसऱ्या टप्प्यातच एका बाबीचा प्रस्तुत परिस्थितीत विशेषत्वे समावेश केला

पाहिजे. ही बाब म्हणजे पहिल्या दोन टप्प्यांतील कार्यक्रमांत मजूर-रोजगारीची वाढ कोठे व किती होईल याचा हिशेब काढणे, आणि यातील छोट्या शेतकऱ्यांच्या संघटनेच्या वाट्यास किती भाग येईल व भूमिहीनांच्या संघटनेच्या वाट्यास रोजगार किती येईल हे अजमावणे. तिसरा टप्पा निरनिराळ्या व्यवसायांबाबतच्या विकास योजनांचा समजला पाहिजे. यांतील काही बाबी सार्वत्रिक तर काही निवडक ठिकाणी हाती घेण्याच्या किंवा प्रायोगिक असतील. सर्वमान्य अनुभवसिद्ध गोष्टींबाबत सार्वत्रिक अंमल-बजावणी होणे, याकरता कार्यक्रम असणार. परंतु ज्या बाबी सर्वमान्य नाहीत किंवा व्यवहारात सिद्ध करून दाखविलेल्या नाहीत, त्यांच्याविषयी विशिष्ट प्रयोगांपासून सुरुवात करावी लागणार. इतरत्र दर्शविल्याप्रमाणे व्यावसायिक विकास योजना परिपूर्ण होण्याकरिता त्यांच्या सर्वांगांचा सर्व प्रकारचा तपशील लक्षात घेतला पाहिजे व व्यावहारिकदृष्ट्या तपासला पाहिजे.

अशा रीतीने टप्प्याटप्प्याने कार्यक्रमाची उभारणी केली तरी तो सर्व सुसंगत व सूत्रबद्ध होण्या-करता शक्य तितक्या ठिकाणी अंतर्गत परस्परसंबंध व परस्परपूरक हिशेब तपासले पाहिजेत. योजना किंवा तिचे एखादे अंग यांमधील विशिष्ट बाबीबाबत एकंदर कार्यक्रम व्यवहार्य आहे किंवा नाही हे त्याचा तपशील एकत्र करून पाहिले पाहिजे. तसेच निरनिराळ्या व्यवहारांतील मिळून विशिष्ट वस्तुविषयी उत्पादन, मागणी व पुरवठा यांचे अंदाज पडताळून पाहिले पाहिजेत.

*पुणे :* गोखले अर्थशास्त्र संस्था, १९६१

☆

# ४ . . जिल्हा परिषदांच्या कारभारातील संभाव्य धोके

"राष्ट्रीय सभेच्या प्रयत्नाला यश यावें असें जर लोकांना खरोखर वाटत असेल, तर तिच्याच नमुन्यावर गांवोगांव व खेड्यांतूनहि प्रयत्न सुरू झाले पाहिजेत. राष्ट्रीय सभेनंतर प्रांतिक सभा उत्पन्न करणारांचा हाच हेतु होता व म्हणूनच कांहीं अंशानें राष्ट्रीय परिषदेपेक्षां प्रांतिक सभेला आम्ही जास्त महत्त्व देतो. इतकेंच नाहीं तर प्रांतिक सभेप्रमाणें प्रत्येक जिल्ह्यांतून व गांवांतूनहि पोटसभा स्थापन करण्याचा काळ लवकरच येईल अशी आम्ही उमेद बाळगतों. राष्ट्रीय सभेंत ऐकमत्य होण्यापूर्वी प्रत्येक प्रांतांत, त्यापूर्वी प्रत्येक खेड्यांत तें झालें पाहिजे. ह्या नैसर्गिक क्रमानें ज्या दिवशीं आमचे प्रयत्न चालू लागतील तेव्हांच आम्ही राजकीय हक्क भोगण्यास खरोखर पात्र होऊं व सरकारहि आमचें म्हणणें ऐकेल, हें प्रत्येक देशहितचिंतकानें लक्षांत बाळगलें पाहिजे."

—लो. टिळक, (केसरी, १८ ऑक्टोबर १८९२).

आपला समाज राजकीय हक्क भोगण्यास खरोखर पात्र कसा होईल याचे वरील मार्मिक विवेचन लोकमान्यांनी सत्तर वर्षांपूर्वी केले. लोकमान्यांनी दर्शविल्याप्रमाणे राष्ट्रीय चळवळ खेड्यापाड्यापर्यंत पोचली तेव्हाच परकी सरकारने तिजपुढे मान वाकविली आणि आपणांस स्वराज्यप्राप्ती झाली. परंतु स्वराज्य मिळाले ते उलथापालथ न होता मिळाल्यामुळे राजसत्तेचा पालट झाला तरी राज्यकारभाराचा साचा पूर्वीप्रमाणेच राहिला. हा साचा परकी राज्यकर्त्यांनी, लंडन-दिल्लीहून खंडप्राय देशाचा कारभार मूठभर अधिकाऱ्यांकरवी चालविण्याकरिता बनविलेला होता. या कारभारात स्थानिक व प्रादेशिक समाज बलशाही करण्याची दृष्टी नव्हती. तो नेहमी निष्प्रभ कसा राहील याकडे लक्ष होते.

## परकी राजवटीचा घोर परिणाम

परकी राजवटीचा सर्वांत घोर परिणाम हा की, जितांची मनोवृत्ती बदलते, आणि परकी राजवटीस अनुसरून असलेले विचार व व्यवस्था त्यांस स्वाभाविक वाटू लागतात. राष्ट्रीय एकात्मता परकी भाषेच्या साहाय्याने साधावयाची हा राजमान्य होऊ बघत असलेला सिद्धांत या जित मनोवृत्तीचाच निदर्शक आहे. लोकांत सत्तेचे वितरण न करता लोकशाही साधता येते हा विचारही परकी राजवटीतील रूढ कल्पनांवर आधारलेला आहे. भाषावार राज्यरचनेचा वाद चालला असता सर्व राज्यसत्ता पूर्ण केंद्रित असावी व घटनेतून स्वायत्त राज्येच काढून टाकावी अशी सूचना काही विशिष्ट वर्गाच्या लोकांनी केली होती. हिच्या बुडाशी स्वराज्य म्हणजे काही थोड्या लोकांच्या हातात सत्ता राखून

दिल्लीहून चालविलेले राज्य अशी भूमिका होती. तत्त्वतः किंवा प्रत्यक्षतः लोकशाहीत असा भेद करता येत नाही हे अजून सर्वांस पटलेले नाही. संघराज्यात प्रत्येक राज्य बऱ्याच अंशी स्वायत्त असून भागत नाही, तर राज्यातील प्रत्येक थरावर स्थानिक परिस्थितीस अनुरूप स्वायत्त कारभार जिल्हा, तालुका, गावापर्यंत पोचविला पाहिजे. हे स्वाभाविक न वाटता अनेकांस साहसी, धोक्याचे वाटते. भाषावार राज्यरचनेस विरोध करणाऱ्यांस भाषिक समाजाबद्दल ज्याप्रमाणे अविश्वास वाटत होता त्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या निर्मितीस विरोध करणाऱ्यांस स्थानिक समाजाबद्दल वाटतो असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

## स्वराज्याचे प्रकटीकरण

लोकशाहीची इमारत मजबूत उभारावयाची तर ती नैसर्गिक क्रमाने गाव, जिल्हा, प्रदेश, यांतील संघटन व ऐकमत्य साधून उभारली पाहिजे हा लोकमान्यांचा सिद्धांत मान्य केल्यास जिल्हा परिषदांच्या स्थापनेने स्वराज्याचे प्रकटीकरण होत आहे असे म्हणणे ओघानेच आले. हे म्हणणे समाजव्यवस्था आणि लोकशाही कारभार या विषयींच्या काही मूलभूत सिद्धांतांवर आधारलेले आहे. स्थानिक समाज हा राष्ट्रसमाजाचा पाया आहे, सत्तेचे वितरण सर्व थरांत सारख्याच तत्त्वानुसार झाले पाहिजे, हे करताना वर्गावर्गामध्ये भेद मानू नये, या गोष्टी वरील मांडणीत अभिप्रेत आहेत. त्या तत्त्वतःच नव्हे तर व्यवहारात सुद्धा अमान्य करता येणार नाहीत. उदाहरणार्थ, विद्यापीठ व नगरपालिका नागर जनतेला चालवू देण्यात जेवढा धोका आहे त्याहून जास्त धोका जिल्हा परिषदांस दिलेल्या अधिकारामुळे उद्भवतो असे म्हणणे धाडसाचे होईल. तसेच निदान महाराष्ट्रात तरी शिक्षणसंस्था व सहकारी संस्था उभारण्यात व चालविण्यात स्थानिक लोकपुढाऱ्यांनी भरपूर कर्तबगारी दाखविली आहे, हे कोणासही नाकबूल करता येणार नाही.

समाजाचा प्रत्येक भाग सारखा बलशाही झाला नाही तर सर्व समाज दुर्बलच राहणार; आणि प्रत्येक घटकास समर्थ करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सत्ता पेलण्याची व कारभार चालविण्याची त्यास संधी देणे हा होय. यास लागणाऱ्या शहाणपणाचे, स्वनियमनाचे धडे प्रत्यक्ष काम करूनच मिळवावयाचे असतात. एरवी ते कळत नाही; किंवा आत्मसात करता येत नाही. परकी राज्यामुळे आपले स्थानिक पुढारीपण खचले व त्यास करण्यास काही न उरल्यामुळे कलह व गुंडगिरी माजू लागली असे म्हणण्यात येते. स्थानिक पुढारीपण पुन्हा निर्माण होण्याला अनुकूल परिस्थिती उत्पन्न करणे आणि स्थानिक समाजास आपली कर्तबगारी दाखविण्यास वाव देणे हे जिल्हा परिषदेने अंशतः तरी साधणार आहे असा आमचा स्पष्ट अभिप्राय आहे. या साऱ्या मांडणीत फाजील आशावादाचा काही भाग नसून काय योग्य व क्रमप्राप्त आहे एवढाच विचार समाविष्ट आहे. अर्थात स्वराज्यात नेहमीच सुराज्य असेल असे ज्याप्रमाणे म्हणता येत नाही त्याप्रमाणे जिल्हा परिषदा प्रस्थापित केल्या म्हणजे त्यांचा कारभार चांगला चालेलच अशी ग्वाही देता येत नाही. कोणालाही नवीन उपक्रमाबाबत पूर्वविचार करून काळजी घेणे आवश्यक असते, तसेच जिल्हा परिषदांबाबतही आहे. येथे दोन तीन संभाव्य धोक्यांविषयी विवेचन करतो.

## राजकीय पक्षांची भूमिका

पहिला धोका राजकीय पक्षांच्या कारभारविषयक धोरणाबाबत आहे. स्थानिक निवडणुकीत अगर कारभारात वरील थरावरील पक्षभेद आणू नयेत हा विचार सत्ताधारी पक्षाला पटला नाही आणि परिणामी तो कोठेच प्रभावी ठरला नाही. ज्याअर्थी राष्ट्रीय संघटनेचा पाया स्थानिक संघटनाच आहे

त्याअर्थी स्थानिक शासनसंस्थांतील निवडणुकी पक्षीय भूमिकेवरूनच लढविल्या पाहिजेत ही सत्तारूढ पक्षाची भूमिका आहे. या भूमिकेचा विस्तार कोठे व कसा होतो हे पाहणे महत्त्वाचे आहे. मूळ दृष्टी पक्षसंघटनेची मानली गेली तर सर्व कारभार तीस पोषक चालविला जाईल. असे झाल्यास कारभारातील कार्यक्षमता व अपक्ष भूमिका या दोहोंस बाध येण्याचा संभव आहे. स्थानिक कारभारात हा धोका अधिक आहे. कारण जसजसा कारभाराच्या क्षेत्राचा संकोच होतो तसतसें सामान्य नियमांस अपवाद वाढतात व व्यक्ती–स्थल विचार महत्त्व पावतात. अशात पक्षदृष्टी महत्त्वाची मानली गेल्यास कारभार विकृत होऊन कलह व अशांतता पसरण्याची भीती वाढते. जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांजकडे विकास योजना बनविणे व अमलात आणणे यांविषयी व्यापक अधिकार दिले आहेत. स्थानिक समाजास बरोबर घेऊन, स्थानिक समाजास त्यात आपलेपणा वाटेल अशा रीतीने हे कार्य केले पाहिजे हे सर्वसंमत आहे. परंतु व्यक्ती-स्थल-पक्ष-निरपेक्ष हे कार्य झाले तरच समग्र समाजाचा विश्वास संपादिता येईल व त्याचे खरे सहकार्य मिळेल. तेव्हा निवडणुकांपुरते पक्षभेद मानले तरी नंतरच्या कारभारात विशेषतः महत्त्वाच्या विकासकार्यात, ते संपूर्ण विसरले जाणे आवश्यक आहे. हे कितपत साधते, विशेषतः अशा प्रयत्नांस उच्चपदस्थ कितपत उत्तेजन देतात, यावर बऱ्याच अंशी जिल्हा परिषदांची यशस्विता अवलंबून राहील.

## पगारदार पदाधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या

महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांच्या कायद्यान्वये परिषदा व पंचायत समित्यांत प्रमुख पदाधिकाऱ्यांस वेतन देण्याची सोय केली आहे. वेतन देण्याच्या कल्पनेस तत्त्वतः विरोध करता येत नाही. अशी व्यवस्था न केल्यास सर्व कारभार नेहमीच सुखवस्तूंच्या हाती राहील व हे कोणत्याच दृष्टीने इष्ट नाही. प्रत्यक्षात पगाराच्या तरतुदीचे परिणाम काय होतात हे आजच सांगता येत नाही. कोणत्याही पदाधिकाऱ्यांनी पगार स्वीकारला म्हणजे त्यांनी मोबदला पुरेसे सार्वजनिक काम करण्याचे बंधन निदान नैतिक तरी, त्यांजवर सहज पडते. हे सर्व पदाधिकारी परिषदसमितीच्या कामास किती वेळ देतात आणि कारभाराचे एकंदर वळण व कार्यक्षमता यांवर त्यांचा काय प्रभाव पडतो हे यामुळे विशेष महत्त्वाचे ठरते. कारण पगाराबरोबर काही महत्त्वाच्या जबाबदाऱ्या अंगावर पडतात व त्या पार पाडणे आवश्यक असते अशी जाणीव झाल्याखेरीज नुसत्या मानाच्या आणि पगाराच्या जागेबद्दल सर्वांस लोभ वाटून सुंदोपसुंदी साहजिक माजेल. असे झाल्यास सर्व कारभारात अस्थिरता निर्माण होऊन अनिष्ट प्रवृत्ती वाढीस लागतील. हे सर्व टाळण्याकरिता पगारदार पदाधिकाऱ्यांची कर्तव्ये त्यांनी आपल्या कामात घालविण्याचा किमान वेळ, शिकण्याच्या व करण्याच्या किमान गोष्टी यांविषयी योग्य संकेत शक्य तितक्या लवकर बनविण्यात आले पाहिजेत; आणि त्यांच्या पालनाविषयी सरकार व पक्षप्रमुख यांनी प्रथमपासून काळजी बाळगिली पाहिजे. असे झाल्यास पुढील कारभार नीट चालेल, एवढेच नव्हे तर भविष्यातील पदाधिकाऱ्यांबाबत निश्चित अपेक्षा निर्माण होवून त्यांच्या निवडीचा प्रश्न सुकर होऊ शकेल.

## स्थानिक विकास योजनांचे महत्त्व

या पदाधिकाऱ्यांची लायकी व कार्यक्षमता ही महत्त्वाची मानण्याचे मुख्य कारण म्हणजे विकास कार्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती यांचा वाटा होय. सर्व योजना खालून बनवाव्या, वरून लादल्या जाऊ नयेत असे अलीकडे सर्वत्र बोलले जाते. नियोजन मंडळाने हे तत्त्वतः बरीच वर्षे मान्य केले आहे. पण प्रत्यक्षात खालून योजना कोठेच तयार होत नाही. कायम ठशाचा खातेवार कार्यक्रम

म्हणजे नियोजन असेच सगळीकडे दिसून येते. पंचायती राज्याच्या कल्पनेचा पुरस्कार, मुख्यतः हे सर्व बदलावे याकरिता होतो असेही म्हणण्यात येते. परंतु जरा सूक्ष्म विचार केला तर खालून योजना करावयाची म्हणजे काय हे अजून कोणी मांडलेले नाही किंवा अनुभविलेले नाही. किंबहुना या विषयी काही अनुभव नसल्याने मांडणी करणे कठीणच आहे हेच खरे.

अविकसित राष्ट्रांचे योजनाशास्त्र आज हळूहळू अनुभवाने बनत आहे. नियोजनबाबतचा सर्वांत दीर्घकालीन अनुभव आजवरचा रशियाचा आहे. पण तो संपूर्ण नियंत्रित साम्यवादी व्यवस्थेचा आहे. शिवाय युगोस्लाव्हिया व काही अंशी पोलंड सोडल्यास साम्यवादी राष्ट्रांतील नियोजन हे मोठ्या प्रमाणावर केंद्रित असते, विकेंद्रित नसते. इतर देशांतील नियोजनाचे अनुभव काही विवक्षित क्षेत्रांपुरते आहेत. सर्व देशभरच्या अर्थव्यवस्थेचे, तिचे संमिश्र स्वरूप कायम ठेवून, नियोजन करण्याचा प्रयत्न भारतातच प्रथम होत आहे; आणि आजवरचा आपलाही अनुभव काही अंगांपुरता व केंद्रित नियोजनाचा आहे. स्थानिक परिस्थिती, साधने, गरजा व अपेक्षा या सर्वांचा अभ्यास करून, सार्वदेशीय व प्रादेशिक चौकटीत बसणारी स्थानिक विकास योजना तयार करण्याचे काम फार अवघड आहे. त्याची कार्यपद्धती व त्याचे तंत्र ही आपणांस विचाराने, परिश्रमाने व अनुभवाने अवगत करून घ्यावयाची आहेत. यावर येथे भर देण्याचे कारण हे की, हे अवघड काम परिषदा व समित्या यांजवर कायद्याने सोपविले आहे, त्यांच्या कार्यक्षेत्रातील हे सर्वांत महत्त्वाचे कार्य आहे. हे कसे पार पडते यावर महाराष्ट्र समाजाचे भवितव्य बहुतांशी अवलंबून आहे. तेव्हा सत्तेचे विकेंद्रीकरण करून स्थानिक पुढाऱ्यांवर जबाबदारी टाकली आहे म्हणून इतरांस स्वस्थ बसता येणार नाही. सर्वांसच या विकास योजना बनविण्यास व अमलात आणण्यात शक्यतो सहभागी झाले पाहिजे.

राज्य सरकारची याबाबत अनेक प्रकारची विशेष जबाबदारी आहे. विकास योजना बनविण्याच्या प्रयोगावस्थेत स्वतः स्वतंत्र प्रयत्न करणे, जिल्हा परिषदांच्या अधिकारीवर्गास व पदाधिकाऱ्यांस याबाबतचे शिक्षण देणे, त्यांस निरनिराळ्या प्रकारचे प्रयोग करण्यास उत्तेजन देणे, या कामी इतरत्हेचा तज्ज्ञ सल्ला व इतर मदतीचे साह्य देणे अशा अनेक गोष्टी राज्य सरकारास करावयाच्या आहेत. जुन्या योजना व त्याबाबतचे पैसे हे परिषदांस सुपूर्त केल्याने भागले असे समजून चालणार नाही. कारण परिषदांची निर्मिती जुन्या योजना चालविण्याकरिता नसून नवीन प्रकारे योजना करण्याचे शिकवून त्या प्रत्यक्षात उतरविण्याकरिता आहे. तेव्हा या संक्रमण अवस्थेत इतर मदतीप्रमाणे जादा द्रव्यसाह्य करण्याची तयारीही राज्य सरकारने ठेवली पाहिजे. दूरवर पाहता इतर सर्व गोष्टींपेक्षा विकास योजनेबाबत परिषदा व पंचायत समित्या किती कार्यक्षम व यशस्वी ठरतात यांवरच आपल्या देशातील अर्थव्यवहाराचे व लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे. तेव्हा या कामी जागरूक राहून सर्वांनी मदत करणे हे फार महत्त्वाचे ठरेल.

*केसरी*, २४–१०–१९६२

☆

# ९ . . लोकशाही विकेंद्रीकरण व आर्थिक नियोजन

लोकशाही विकेंद्रीकरणाबाबतची माझी भूमिका थोडीशी निराळी आहे. याबाबत प्रथमपासून माझी भूमिका अशी आहे : विकेंद्रित लोकशाही राज्यकारभार ही स्वराज्यप्राप्तीनंतर क्रमाने आलेली साहजिक आणि आवश्यक अशी गोष्ट आहे. विकेंद्रीकरण हा प्रयोग नाही. 'स्वराज्याचे, टप्प्याटप्प्याने होत असलेले हे प्रकटीकरण' आहे. पंचायत राज्याच्या म्हणजेच विकेंद्रीकरणाच्या कल्पनेचा पुरस्कार मी या वास्तविक भूमिकेतून करीत आहे. जन्मभरच्या अभ्यासू दृष्टीतून, परंतु त्यापेक्षाही गेली अनेक वर्षे जे ग्रामीण जीवन मी पहात आलो, थोडेफार अनुभवीत आलो त्यावरून माझे जे विचार बनले ते व्यक्त करीत आहे व पूर्णपणे आशावादी वृत्तीतून ते मी व्यक्त करीत आहे. विशेषतः सहकार, शेती, प्राथमिक शिक्षण-प्रसार इत्यादी क्षेत्रांतून मला जे अनुभव आले त्यांतून व एकंदर ग्रामीण समाज व अर्थकारणाचा अभ्यास करून माझी ही भूमिका तयार झालेली आहे. विकेंद्रीकरणाचे पाऊल उचलण्यात आपण काही धोका घेत आहोत असे म्हटले जाते. परंतु सर्वसाधारण काळजी घेतली व काही पथ्ये पाळली, तसेच खंबीर तात्त्विक भूमिका कायम ठेवून जबाबदारीने व पुढारीपणाने सरकारी अधिकाऱ्यांच्या साहाय्याने आपले कार्य पार पाडीत राहिलो तर आपण याबाबत काही धोका घेत आहोत असे मी मानीत नाही. १० वर्षांपूर्वीपेक्षा लोकांची जाणीव, आत्मविश्वास व कार्यक्षमता ही आज निश्चितपणे वाढली आहेत. आज अगदी लहान खेड्यांतही सत्ता वा श्रीमंती नसताना एकटा माणूसही काम करू शकतो. पण त्यासाठी त्याला दोन गोष्टींची गरज असते. खंबीर तात्त्विक भूमिका व आवश्यक ते ज्ञान. तसेच व्यवहार व तत्त्व यांची सांगड घालण्याचीही वृत्ती असावी लागते. अशा प्रकारचा आत्मविश्वास व उत्साह आज खेड्यांतून दिसून येऊ लागला आहे.

कोणत्याही गोष्टीची तात्त्विक चर्चा मी अत्यंत महत्त्वाची मानतो. तत्त्व व व्यवहार दोन्ही अंगे सारखीच महत्त्वाची आहेत. कोणत्याही नव्या बाबतीत तत्त्वापासून प्रथम सुरुवात होते. अमुक इकडे जायचे आहे हा विचार सुरुवातीसच, शिदोरी बांधतानाच, करायला पाहिजे. नाहीतर दिशाभूल होते. प्रत्यक्ष समाजव्यवहारांत मात्र तत्त्व व व्यवहार यांची फारकत होऊ देता कामा नये. लोकशाही विकेंद्रीकरणाचे असेच आहे.

लोकशाही विकेंद्रीकरण हे स्वराज्यप्राप्तीनंतर साहजिक रीत्या पडलेले, स्वराज्याच्या प्रकटीकरणाचे पाऊल आहे. थोडे सूक्ष्म दृष्टीने सिंहावलोकन केले तर असे दिसून येईल की, ब्रिटिश राजवटीत समाजातील परंपरागत सामाजिक नेतेपण नष्ट झाले. समाजाचा जिवंतपणा जाऊन तो निर्जीव व विस्कळित झाला. त्या योगाने अनेक दुष्परिणाम घडून येऊ लागले. सरकारकडे पाहण्यावाचून गत्यंतर नाही, आपल्या हातांत काही नाही अशा अवस्थेत लोकांच्या पिढ्यान् पिढ्या गेल्यानंतर आजच्या-

सारखा दुर्बल, विस्कळित, नियंत्रण व पुढारीपण नसलेला समाज शिल्लक राहतो; व त्यातून काही नवे निर्माण होणे पण अवघड होऊन बसते. पण हे गेलेले पुढारीपण लो. टिळक, म. गांधी यांनी गावां-गावांतून निर्माण केले. ब्रिटिशांना येथून जाण्याची सुबुद्धी होण्याइतके समाजाचे बळ निर्माण झाले. परंतु हे तात्कालिक पुढारीपण होते. आता स्वराज्यानंतर मुख्य समस्या नवीन आहे. आपल्या गरीब, दुर्बल व विस्कळित समाजाला उपलब्ध व आवश्यक अशा सर्व साधनांनी सबळ, संघटित, विकसित कसे करता येईल; तो संपन्न, समर्थ कसा होईल हाच प्रमुख प्रश्न स्वराज्यानंतर आपणांपुढे उभा राहिला आहे. समाजाच्या सर्व थरांतील सर्व प्रकारची माणसे अमुक एका शिस्तीत, शिक्षेत व संस्कृतीत वागून व्यवहार करू लागतील व विशिष्ट दिशेने बांधलेली त्यांची संघटना सामाजिक–आर्थिक पुनरुत्थानाच्या कार्याला कशी लागेल यावर या समस्येची सोडवणूक अवलंबून आहे.

## विकासकार्य व जनता

विकास योजनांचा काही वर्षे अनुभव पाहिल्यानंतर त्यांतून जी फलनिष्पत्ती अपेक्षित होती ती दिसून न आल्याने सरकारने बलवंतराय मेहता समिती नेमली. या समितीने स्थानिक जनतेला विकासकार्याबद्दल काय वाटते याबद्दल आपले मत दिले आहे. ते म्हणतात की कुणाला अजून, "आमचे काही काम आहे, आमचा काही त्यात भाग आहे व तो आम्ही घेतला पाहिजे," असे या कार्यक्रमाबाबत वाटत असल्याचे सार्वत्रिक दिसून आले नाही. योजनेच्या द्वारा कायापालट घडवून आणण्याच्या कामात आपला काही भाग आहे याची जाणीव झाल्याखेरीज त्याबद्दल आपलेपणा निर्माण होणार नाही. सर्वांच्या सल्ल्याने काम करावे, सर्वांच्या शहाणपणाला वाव देऊन त्या पुढारीपणाचा सर्वांच्या हितासाठी उपयोग करून घ्यावा हा हेतू ह्या नव्या विकेंद्रीकरण कल्पनेत आहे व तो लोकशाही कारभाराला मदत करणाराच आहे. सत्तेचा दुरुपयोग होऊ नये या अर्थाने सत्तेचे विकेंद्रीकरण समर्थनीय असले तरी ते अपुरे आहे. यापेक्षाही, समाज समर्थ व्हावा, त्यातील सर्व घटक समर्थ बनावेत हे महत्त्वाचे आहे. सर्वांना बरोबर घेऊन जाण्याने लोकशाही कारभाराची कार्यक्षमता वाढते हा लोकशाहीतील दुसरा विश्वास आहे. सामान्य व्यवहारज्ञान व सर्वांचे सहकार्य असल्यानंतर केंद्रित, थोड्या लोकांच्या हातांतील कारभारयंत्रणेची जरुरी नाही. राष्ट्रीय एकात्मतेबद्दल सध्या खूप बोलले जाते. पण एकतंत्री कारभार म्हणजे एकात्मता नाही. कारण तो कारभारीही विवक्षित अनुभवाचा, विशिष्ट परिस्थितीतून आलेला, संवेदना असलेला मनुष्यच असतो. पूर्णपणे व साकल्याने होणारे ज्ञान कोणालाही असणे शक्य नाही. पण विकेंद्रित कारभार चालविणे आपल्याला सहज शक्य आहे. म्हणून स्थानिक कारभार तिथल्या तिथे, तिथल्या लोकांनी सहभागी होऊन व्हावयास पाहिजे.

ही तात्त्विक भूमिका एकदा मान्य केली की मग यातून आपल्या काय अपेक्षा आहेत हे पाहता येते. आजपर्यंत, कारभार हा गरजा व परिस्थितीला अनुरूप नव्हता. तो तसा होऊन व लोकांना त्यात सहभागी होता येऊन तो आपला आहे असे त्यांना वाटेल; प्रत्येक क्षेत्रात, भागात, अगर गावात आजपर्यंत याबाबत जी आत्मीयता वाटत नव्हती ती आता निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.

## स्थानिक नेतृत्वाची जबाबदारी

हे मान्य झाल्यावर-मग तुमच्या या स्थानिक नव्या नेतृत्वावर काय जबाबदारी येते हे कळून घेणे महत्त्वाचे ठरते. आपल्यावरची जबाबदारी दोन प्रकारची आहे. एक, शासनसंस्थेचे प्रतिनिधी म्हणून अधिकारात्मक जबाबदारी. प्रतिनिधी झाल्याने प्रथमतः आपल्याला जेवढे साधेल तितक्या प्रमाणात

आपल्या भागाची व जनतेची समग्र माहिती करून घेणे. स्थानिक गरजा कळण्याच्या दृष्टीने तसेच कारभारदृष्ट्याही ही मूलभूत बाब आहे. आपला समाज इतर (देशांतील) समाजांपेक्षा एकजिनसी कमी आहे; म्हणून कळवून घेणे व कळविणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. दुसरी म्हणजे, विकासकार्याची जबाबदारी. यासाठी भौगोलिक व इतर परिस्थितीची प्रत्यक्ष व समग्र माहिती गोळा करण्याची फार आवश्यकता आहे. या दोनही जबाबदाऱ्या प्राथमिक आणि महत्त्वाच्या आहेत.

सबंध समाज हा मानवी शरीररचनेप्रमाणे एकजिनसी असून निरनिराळ्या भागांशी सूत्रबद्धतेने जोडला गेलेला असला तरी त्याचे शासन व नियंत्रण शरीरातल्या प्रमाणे केंद्रित होऊ शकत नाही. शासनविषयक तसेच इतर अनेक सामाजिक क्रियांच्या बाबतींत केवळ केंद्रातून त्यांचे नियंत्रण व नियमन करता येत नाही. म्हणून विकेंद्रित शासनव्यवस्था व नियमन ही मानवी समाजाच्या रचनेशी विसंवादी नसून सुसंवादीच आहेत. या दृष्टीने थोडे मागे जाऊन पाहिले तर असे दिसून येईल की, आपल्या समाजरचनेचा, अर्थव्यवस्थेचा पूर्वी एक 'गावगाडा' म्हटला जात होता. एल्फिन्स्टन्च्या मताप्रमाणे महाराष्ट्राचे ग्राम म्हणजे जणू काही एक ग्रामराज्य होते. ह्याचा अर्थ आपल्याकडची पूर्वीची ग्रामे ही स्वायत्त, वेगळी, स्वतंत्र राज्य-केंद्रांसारखी होती. पण आज तो जुना जमाना, जुना स्वायत्त गावगाडा राहिलेला नाही व तो आता पुनः आपणास उकरूनही काढावयाचा नाही. आज वाहतूक–वाढ, परस्परसंबंध–वाढ झालेली असली तरी सबंध भागातील, देशातील परिस्थितीत सर्वत्र सारखवटपणा आलेला नाही. देशाच्या इतर भागांत काय चालले आहे हे कळणे व कळवणे पूर्वीपेक्षा जास्त सुकर झालेले असले तरी भौगोलिक व अंतर्गत परिस्थिती आणि प्रवृत्ती यांच्या दृष्टीने देशाच्या भागाभागांत बरेच फरक आहेत. यासाठी स्थानिक समाजरचनेची व परिस्थितीची मूलतः माहिती करून घेऊन राज्यकारभार करणे अवश्य आहे हे नीट समजावून घेतल्याखेरीज, गिरवल्याखेरीज व त्या त्या स्थानिक लोकांकडून प्रत्यक्ष गोष्टी पार पाडल्याखेरीज कार्यभाग होणार नाही.

## स्थानिक नेतृत्व कसे असावे ?

तुम्हांला दिलेले अधिकार व जबाबदाऱ्या विकेंद्रीकरणाचा हेतू साध्य करण्यासाठीच दिलेल्या आहेत. तुम्ही त्या सर्वांची नीट माहिती करून घेऊन विचाराने व विवेकाने त्यांचा उपयोग करून, स्थानिक विचारविनिमयाचा व सहकार्याचा फायदा घेऊन व सर्वांना बरोबर घेऊन कारभार करावयाचा आहे. आपला कारभार आपणच करावयाचा आहे ही भावना स्थानिक समाजात तुमच्यासारखे लोकच जास्त चांगल्या रीतीने आणू शकतील. स्थानिक नेतृत्व याचा अर्थ स्थानिक पुढाऱ्यांना वाव देण्याबरोबरच त्यांतील एखाद्या पुढाऱ्याची हुकूमशाही वागणूक चालू देता कामा नये हेही लक्षात ठेवले पाहिजे. नाहीतर स्थानिक समाज प्रबळ करता येणार नाही. स्थानिक समाजाला बरोबर घेऊन कारभार करायचा म्हणजे शंभर गावच्या पुढारी लोकांनी एकत्र येऊन सर्वांचे विचार, गरजा जमेस धरून विकास योजना आखणे व इतर कारभार चालवणे अत्यावश्यक आहे. कायद्यात ह्या गोष्टी सांगितलेल्या नाहीत. लोकशाही समाज समर्थ करण्याचे आपण बोलतो त्या वेळी हुकूमशाही प्रवृत्ती टाळून, लोकांना समजावून सांगून व त्यांची सुखदुःखे लक्षात घेऊन प्रत्यक्ष कार्य कसे करता येईल हे पाहणे महत्त्वाचे आहे. लोकांना बरोबर घेऊन, तात्त्विक खंबीर भूमिका त्यांना कळवून, पटवून देऊन, नुसत्या 'मताने' कारभार न चालवता, तो चांगला म्हणजे बहुसंख्यांच्या हिताचा कसा होईल हे पाहिलेत तर लोकांना त्यांबद्दल आपलेपणा वाटून त्यांचे अपेक्षित सहकार्य जरूर मिळेल; व ही नवी शक्ती मिळाल्याने विकेंद्रित लोकशाही राज्यपद्धतीची कल्पना यशस्वी होईल.

## सरकारी अधिकारी कसे असावेत ?

वरील विचाराची बैठक एकदा नीट समजली की, मग त्यातून आपल्यावर जनतेने सोपविलेल्या जबाबदारीची व कार्यांची तुम्हांला जाणीव होईल. अनेकविध कार्यांचा बोजा असलेली अशी अधिकारी माणसे आपण आहात. तसेच कायद्याने सरकारी अधिकाऱ्यांवरही तुम्ही घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सोपविलेली आहे. तुमचे अधिकार, तुमचे व सरकारी अधिकाऱ्यांचे परस्परसंबंध, तुमच्यावरील कायद्याने ठरवून दिलेल्या आणि इतर आनुषंगिक जबाबदाऱ्या यांची पूर्णपणे माहिती घेऊन, एकमेकांच्या सहकार्याने व कळकळीने तुम्ही कार्य करणे अत्यावश्यक आहे. सरकारी श्रेणीतील कायम अधिकाऱ्यांची मुख्य जबाबदारी म्हणजे नित्याच्या कारभाराचा हा गाडा नीट रीतीने आणि 'लोकाभिमुख' असा चालवणे. ही त्यांची प्राथमिक जबाबदारी आहे. त्यांची दुसरी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी म्हणजे, लोकनेत्यांनी मार्गदर्शन केलेल्या व ठरवलेल्या योजनांची पद्धतशीर, विलंब न लावता परिपूर्ती करणे. सरकारी अधिकारी व लोकनियुक्त पदाधिकाऱ्यांमधील ही श्रमविभागणी योग्य विचारांती ठरविलेली आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या कामाची एक ठेवण असते. मागची माहिती, अनुभव व कारभाराच्या निरनिराळ्या श्रेणी इत्यादी नित्याच्या गोष्टींत ते वाकबगार असतात. कारभारात शिस्तीचा, सरळपणाचा भाग असावा लागतो आणि मुरलेला, अनुभवशील माणूसच तेथे लागतो. अर्थात या माणसाला फाजील महत्त्व असता कामा नये, म्हणून मूलभूत महत्त्वाचे अधिकार व जबाबदाऱ्या आता तुमच्यावर सोपविलेल्या आहेत. लोकाभिमुख कारभार होण्याच्या दृष्टीने कायद्यात अपेक्षित त्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. यापुढेही अनुभवाने आवश्यक वाटल्यास त्यांत काळजीपूर्वक फेरबदल करण्याचाही अधिकार तुम्हांला दिलेला आहे. तुमच्या दिमतीला दिलेले सरकारी अधिकारी बरेचसे तरुण असून जुन्या चाकोरीत ते फारसे न मुरलेले असे देण्यात आले आहेत. त्यामागेसुद्धा काही 'नवीन'पणाचा उद्देश असावा. आपल्यापैकीसुद्धा काही पदाधिकारी लोकल बोर्डाच्या कारभाराचे अनुभवी असतील; परंतु त्यांनीसुद्धा बऱ्याच नवीन गोष्टी शिकावयाच्या, करावयाच्या आहेत. आता आपल्यावरची ही नवीन जबाबदारी दुहेरी आहे. एका बाजूने तुम्ही सरकारी नोकरयंत्रणेला धोरणविषयक योग्य मार्गदर्शन करावयाचे आहे आणि दुसऱ्या बाजूने लोकप्रतिनिधित्व यशस्वी करून दाखवावयाचे आहे. मार्गदर्शन, विशेषतः नवीन कामांबद्दल करावयाचे आहे. त्याचप्रमाणे एखाद्या सरकारी अधिकाऱ्याला काही नवीन गोष्ट करावयाची असल्यास किंवा कोणत्याही बाबतीत तशी त्याला गरज भासल्यास तो ती अध्यक्षांच्या सल्ल्याने, संमतीने, करू शकेल. पदाधिकारी आणि सरकारी अधिकारी यांनी परस्पर विचाराने, प्रतिष्ठेची खोटी भावना न ठेवता, सामंजस्याने व परस्परांच्या अधिकार व कर्तव्यक्षेत्रांत अतिक्रमण वा ढवळाढवळ होऊ न देता दैनंदिन कर्तव्ये पार पाडणे ही गोष्ट विकेंद्रित लोकशाही कारभाराच्या यशासाठी अत्यंत निकडीची आहे. कारण, यावरच सर्व यश अवलंबून आहे.

## विकास कार्यांचे नियोजन कसे करावे ?

जिल्हा परिषदेने विकास कार्यांचे नियोजन कसे करावे ह्या थोड्याफार महत्त्वाच्या विषयाची आता मी चर्चा करीत आहे. अगदी प्राथमिक बाबींपासून सुरुवात करावयाची म्हटली तर आपण नियोजन का करतो येथपासून विचार करावयास हवा. आपण गरीब आहोत, अप्रगत आहोत, पाश्चिमात्य देशांच्या बरेच पाठीमागे आहोत; पाश्चिमात्य देशांत शास्त्रीय सुधारणा होऊन त्यांनी उत्पादनाची नवी तंत्रे अवगत करून घेतली, आपण ती घेतली नाहीत म्हणून मागे राहिलो, गरीब राहिलो आणि

याची आपणांस जाणीव झाल्यामुळे आपण आता विकास योजना हाती घेत आहोत. पण आपण इतके गरीब व मागासलेले आहोत की अनेक वर्षे सतत काही सुसंगत व सूत्रबद्ध कार्यक्रम हाती घेऊन तो चालू ठेवल्याखेरीज आपला विकास व्हावयाचा नाही. ब्रिटिशांच्या गुलामगिरीत आपला देश १५० वर्षे होता. त्या काळात इतर पाश्चिमात्य राष्ट्रांतून शास्त्रीय प्रगती झपाट्याने होत होती. त्याचे थोडेफार परिणाम आपाततः आपल्यावर घडत; पण ते केवळ अपवादात्मक असल्याने आपली फारशी प्रगती न होता आपण गरीबच राहिलो. अप्रगत गरीब राष्ट्रांना योजनापूर्वक आपली प्रगती करून घेता येते हा नवीन विचार जगात प्रथम, ४० वर्षांपूर्वीच्या रूसी राज्यक्रांतीनंतर पुढे आला. अप्रगत राष्ट्रांना योजनेनुसार आपली प्रगती करून घेता येते हा विचार आता जगमान्य झाला असून आपणही तो आता स्वीकारलेला आहे. योजना बनविणाऱ्याला ती सतत, अनेक वर्षे, सुसंगत रीतीने कार्यवाहीत कशी राहील याचा विचार करावा लागतो व त्यासाठी संघटितरीत्या त्याचे शासन व मार्गदर्शन करण्याचीही जबाबदारी घ्यावी लागते. साहजिकच ही जबाबदारी शासनसंस्थेकडे येते. शासनसंस्थेला योजना तयार करणे, त्यातील क्रम लावणे व तिचा दीर्घकालीन कार्यक्रम आखून देणे या गोष्टी कराव्या लागतात. योजनेचा मूळ आराखडा अगर चौकट एकहाती असली तरच या सर्व गोष्टी सुसूत्रपणे पार पाडता येतात. सर्व राष्ट्राकरता योजना असल्यामुळे राष्ट्रीय शासनसंस्थेच्या हातात किमान सत्ता केंद्रित होणे अवश्य आहे. मुख्य सूत्र केंद्रसत्तेकडेच राहिले पाहिजे. पण याचा अर्थ असा नव्हे की सगळे केंद्राने चालवावयाचे आहे. सुरुवातीच्या प्रयोगावस्थेच्या काळात केंद्रसत्तेकडे सगळे अधिकार राहिल्यामुळे नियोजन म्हणजे सर्व कारभार केंद्रित करणे असे वाटण्याचा संभव आहे. आधुनिक नियोजनाचा जेथे उगम झाला त्या रशियातील कारभारही फार मोठ्या प्रमाणात केंद्रित झालेला होता. पण गेल्या १५।२० वर्षांतील अनुभव असा की योजना तयार करताना विचार केंद्रित होणे आवश्यक असले तरी योजना तयार करणे आणि त्या अंमलबजावणीत आणणे या दोन्ही गोष्टी केंद्रित झाल्यास योजना असफल होते. विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर जी नवीन कम्युनिस्ट राष्ट्रे उदयास आली त्यांपैकी पोलंड व युगोस्लाव्हिया ही प्रयोग करून या निर्णयाप्रत आलेली आहेत की, योजना कार्यवाहीत आणताना तिची अंमलबजावणी विकेंद्रित झाली पाहिजे. म्हणजे आधुनिक नियोजन-शास्त्राबाबत आज असा सिद्धांत मांडता येईल की, योजना सुसूत्र होण्यासाठी तिचा विचार केंद्रित झाला तरी अंमलबजावणी विकेंद्रित झाली पाहिजे. हिंदुस्थानचे नियोजनशास्त्र जगापेक्षा वेगळे नाही. तेव्हा इतर देशांचे अनुभव जमेस धरून आपण पुढे गेले पाहिजे. ब्रिटिश राजवटीत राज्यकारभार केंद्रित होणे साहजिक होते. लंडनहून दिल्लीच्या प्रतिनिधीमार्फत आलेला आदेश जिल्हाप्रमुखाने कार्यवाहीत आणावयाचा असे पूर्वीचे वळण होते व त्यालाच आपण नोकरशाहीचा कारभार म्हणतो. शासनयंत्रणेतील नोकरवर्गाला ब्रिटिश राजवटीत जी सवय लागली ती अजून गेलेली नाही. १५० वर्षांचे हे वळण एकाएकी जाणे कठीण आहे. म्हणून सुरुवातीस, वरून खाली येण्याचा, वरचे आदेश राबविण्याचा क्रम राहिला. त्यामुळे पहिली पंचवार्षिक योजना तयार केली ती मुख्यतः केंद्र सरकारने आणि तीही आधीच्या सरकारने ज्या मोठमोठ्या योजना केल्या होत्या त्यांतच काटछाट करून प्रामुख्याने बनविण्यात आली. म्हणून पहिली पंचवार्षिक योजना म्हणजे केंद्र सरकारने करावयाची मोठमोठी कामे-त्या कामांची यादी असेच तिचे स्वरूप होते. ज्याला आपण 'कम्युनिटी डेव्हलपमेंट' म्हणतो ती ग्रामीण विकास योजना प्रथम याच कालात सुरू झाली. पण या सर्व विकास योजनांची आखणी केंद्र मंत्रालयातून झाली. स्थानिक स्वरूपाच्या ग्रामीण विकास योजनाही तेथूनच आखल्या गेल्या. स्थानिक समाजाचे पुनरुत्थान करणे, त्यांचे बळ वाढविणे, त्यांमध्ये स्वावलंबन व स्वसंवर्धनाची वाढ करणे हे ग्रामीण विकास योजनांचे प्रमुख उद्दिष्ट मानले गेले तरी प्रत्यक्षात त्यांची आखणी करताना ग्रामीण

समाजाचे हे गुण वाढतील इकडे लक्ष न देता, दिल्लीहून ठराविक साच्याच्या योजना आखून त्या अधिकाऱ्यांकरवी पार पाडावयाचे सर्वसामान्य सरकारी धोरण राहिले. म्हणून बलवंतराय मेहता समितीने या विकास योजनांची पाहणी करून जो निष्कर्ष काढला तो असा की, स्थानिक समाजाच्या संवर्धनाकरिता जरी त्यांची आखणी झालेली असली तरी त्यामुळे स्थानिक समाजात कोठेही चैतन्य आलेले दिसत नाही; स्थानिक समाजाला ही योजना आपली आहे असे फारसे वाटत नाही. या निष्कर्षातून मग पुढे विकेंद्रीकरणाच्या विचाराला सुरुवात झाली. सचिवालयात अगर कोणत्याही खात्यात बसून योजनांची आखणी करावयाची म्हणजे त्या कार्यक्रमांचा सांगाडा निराळा बनतो. ज्या अधिकाऱ्याचा जसा अनुभव त्याप्रमाणे तो आखणी करतो व तोच सगळीकडे पाठविला जातो. त्यामुळे निरनिराळ्या खात्यांच्या योजनांमध्ये परस्पर–मेळ अगर सुसूत्रता राहत नाही. तसेच स्थानिक गरजा व परिस्थिती यांकडे विशेष लक्ष देऊन स्थानिक विकास कसा साधेल यापेक्षा खातेवार दृष्टीने सबंध राज्यासाठी त्यांची आखणी केली जाते. उदाहरणार्थ, अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेतील कार्यक्रमाबाबत असे दिसून आले की, बी–बियाणे वाटपाचा व खत वाटपाचा कार्यक्रम दोन वेगळ्या खात्यांमार्फत स्वतंत्र रीतीने चालले व त्यांमध्ये परस्पर–मेळ कोणताही नाही. अशा मोहिमांची पाहणी करण्याबाबत नेमलेल्या सरकारी समित्यांनीही हाच निष्कर्ष काढला की, या योजनांमध्ये कोणतीही सुसूत्रता नाही. तसेच या मोहिमांतून प्रत्यक्ष फलनिष्पत्ती काय झाली हे पडताळून पाहण्याचीही त्यांत काही सोय नाही. केंद्राकडून सर्व ठरविले जाण्याच्या पद्धतीचाच हा दोष म्हणावा लागेल. आणि हा आपल्या देशातीलच अनुभव आहे नव्हे तर जेथे या केंद्र–पद्धतीने कारभार चालतो तेथील अनुभवही असाच आहे. युगोस्लाव्हियाचे एक शिष्टमंडळ येथे आले होते. त्यांनी केंद्रीय नियोजनाचे गैरफायदे कोणते याबाबत स्वतःचे जे अनुभव सांगितले त्यांवरून हीच गोष्ट कळून आली. जिल्हा योजना ज्याप्रमाणे जिल्ह्यांतून ठरविली जात नाही त्याचप्रमाणे राज्याची योजना देखील प्रत्यक्षात पाहिले तर राज्यांतून ठरविली जात नाही. दिल्लीच्या नियोजन मंडळाच्या काय योजना आहेत, त्यांना कोणत्या पचतात, रुचतात हे सगळे नीट पाहून राज्याची योजना त्यात बसविण्याच्या दृष्टीने तयार केली जाते. पुण्यातील पूरग्रस्तांचे पुनर्वसन करताना सरकारी ओटा योजनेबाबत हाच अनुभव आलेला आहे. स्थानिक परिस्थितीप्रमाणे त्यात फेरफार करणे जरूर असले तरी केंद्रीय चौकटीत ती बसविल्याखेरीज काही करता येईना. पूरग्रस्तांची गरज तर निकडीची होती. फरक करण्याचा विचार व्हायला अनेक महिने लागतील; तेव्हा ताबडतोब काही करावयाचे असेल तर आहे तशीच ती स्वीकारावी लागेल; फारतर काही थोडे थातुरमातुर इकडे तिकडे त्यात करता येईल असे सांगण्यात आले. नियोजन पद्धतीचाच हा दोष आहे. केंद्राकडून सर्व ठरविले जाण्याच्या या पद्धतीत स्थानिक गोष्टी अजमावून व त्यांची पाहणी करून जरूर त्याप्रमाणे फरक करण्याइतका लवचिकपणा त्यांत राहात नाही. जिल्ह्याजिल्ह्यांचा जसा निराळा विचार व्हायला हवा तसा राज्याराज्यांचाही होणे जरूर आहे. राज्यातील रस्त्यांची आखणी त्या राज्याच्या गरजा लक्षात घेऊनच व्हायला हवी. भारतीय रस्त्यांचा विकास कसा व्हावा हे केवळ केंद्राने आपल्या कल्पनेप्रमाणे ठरविणे इष्ट नाही. ब्रिटिशांनी रेल्वेची बांधणी केली त्या वेळी देशातील कच्चा माल बंदरापर्यंत कसा पोचवावयाचा व आयात केलेला परदेशी माल देशात कसा पसरावयाचा हाच प्रमुख विचार ठेवून त्यांनी बांधणी केली. केंद्र सरकार ज्या वेळी दळणवळणाच्या साधनांचा विचार करते त्या वेळी देशातील अर्थव्यवहाराची, समाजव्यवहाराची, राज्यव्यवहाराची केंद्रे एकमेकांशी कशी जोडली जातील या दृष्टीने प्रामुख्याने विचार करते. राज्याच्या गरजेच्या दृष्टीने रस्त्यांची आखणी थोडीफार वेगळी होईल. महाराष्ट्राचेच उदाहरण घ्यावयाचे झाल्यास, आजचे सर्व मोठे रस्ते मुंबईस जोडलेले आहेत.

राज्याच्या गरजा लक्षात घेऊन आखणी करावयाची झाल्यास कोल्हापूर नागपुरास कसे जोडले जाईल याचा विचार व्हावयास हवा. राज्यातील अर्थव्यवहाराची जी प्रमुख केंद्रे आहेत ती एकमेकांशी जोडण्याचा विचार राज्ययोजनेत प्रामुख्याने व्हावयास हवा; तसा तो आज झालेला दिसत नाही.

## नियोजनात परस्पर-समन्वय व सातत्य आवश्यक

याचा अर्थ असा नव्हे की नियोजन करण्याची सर्व जबाबदारी जिल्ह्यावर किंवा राज्यावर सोपवून द्यावी. नियोजन ही वस्तुतः दुहेरी क्रिया आहे. वरून खाली व खालून वर अशा दोन्ही रीतीने, परस्पर–समन्वयाने ते होत गेले पाहिजे. नियोजनाचे सार्वत्रिक व दीर्घकालीन उद्दिष्ट कोणते हा एक भाग व ते साध्य करण्याचे मार्ग कोणते हा दुसरा भाग. देशाचे औद्योगीकरण झाले पाहिजे हे सार्वत्रिक धोरण झाले. पण कोणत्या उद्योगाला त्यात प्राधान्य द्यावयाचे, कोणता उद्योग देशाच्या कोणत्या भागात सुरू करावयाचा, त्यांचा क्रम कोठे कसा राहावयाचा ह्या सर्व गोष्टी देशाच्या निरनिराळ्या विभागांतील नैसर्गिक परिस्थिती, साधनसंपत्तीची सुलभता, स्थानिक समाजाच्या गरजा इत्यादींची तपशीलवार पाहणी करून औद्योगीकरणाचा प्रत्यक्ष कार्यक्रम व त्यांचे क्रम ठरवावे लागतील. औद्योगीकरण करावयाचे ही गोष्ट ठरली, पण पहिल्यांदा कोणते धंदे घ्यावयाचे? देशात भरपूर मागणी आहे अशा उपभोग्य वस्तूंच्या (उदाहरणार्थ, कापड इत्यादी) निर्मितीचे कारखाने प्रथम उभारावयाचे की, लोखंड, पोलाद, जड यंत्रसामग्री इत्यादी उत्पादक वस्तूंच्या निर्मितीचे कारखाने काढावयाचे हा प्रश्न येतो. याबाबत निरनिराळी मतेही असतील; पण या वादातून मार्ग काढून आपणांस त्याबाबतची दीर्घकालीन योजना तयार करावी लागेल व त्यातील निरनिराळे टप्पे ठरवावे लागतील. या दीर्घकालीन योजनेत आपण टप्प्याटप्प्याने केव्हा कोणत्या गोष्टी करीत जाणार हे ठरवून द्यावे लागेल. म्हणजे औद्योगीकरणाबाबतचे मूलभूत धोरण केंद्र सरकारने ठरवावे लागेल. पण त्या धोरणानुसार देशाच्या निरनिराळ्या विभागांत, जिल्ह्यांत अगर गावांत जे कार्यक्रम हाती घ्यावयाचे त्यांबाबतचा तपशील त्या त्या स्थानिक विभागाने ठरविणे जरूर आहे. उदाहरण घेऊन सांगावयाचे म्हटले तर, निसर्गसाधनांचे संरक्षण करावयाचे हा सर्वसाधारण कार्यक्रम अगर धोरण झाले. परंतु कोणत्या ठिकाणी बांधबंदिस्ती करावयाची, जंगलाची वाढ कोठे करावयाची, बंधाऱ्यांनी पाणी कोठे अडवायचे, तर कोठे पाण्याचा निचरा करण्याचा प्रश्न असेल, म्हणजे हा तपशील त्या त्या जिल्ह्याला ठरवावा लागेल; निव्वळ राज्यावरही या गोष्टी सोपविता येणार नाहीत. म्हणून हा तपशील स्थानिक मंडळींनीच ठरविणे इष्ट आहे. पैशाचा अपव्यय न होता निसर्गसंपत्तीचे संरक्षण करावयाचे तर हा दृष्टिकोण आवश्यक आहे. म्हणून, मी वर म्हटल्याप्रमाणे, हा दुहेरी मार्ग आहे. स्थानिक मंडळींनी आपल्या गरजा काय आहेत, आपल्यास कोणते शक्य आहे, साधनसामग्रीबाबत आपल्या येथे कोणती अनुकूलता आहे हे सांगावे व आपणाला दीर्घकालीन जे साधावयाचे आहे त्याबाबतचे धोरण केंद्राने ठरविलेले असेल त्या संदर्भात टप्प्याटप्प्याने आपण प्रगती करीत गेले पाहिजे. आणि आपण गरीब आहोत, तेव्हा आपले उपलब्ध द्रव्यबळ व उत्पादक सामग्रीचे बळ लक्षात घेऊनच म्हणजे आपला आवाका पाहूनच चालावे लागेल आणि हा आवाका किती याबाबत पुष्कळ वेळा विचार करूनच सांगावे लागेल. योजनेची सार्वदेशिक चौकट कायम राहिली तरी कार्यक्रम प्रत्यक्ष पार पाडीत असताना स्थानिक गरजा, परिस्थिती व उपलब्ध साधनसंपत्ती यांच्या संदर्भात येणाऱ्या प्रत्यक्ष अनुभवाच्या अनुरोधाने योजनेत बदलही करावे लागतील. तसेच नवीन शोध, नवीन उपलब्ध साधने यांच्या संदर्भातही आपले धोरण बदलण्याची गरज भासेल. म्हणजे एकदा योजना ठरविली म्हणजे

झाले असे न समजता प्रतिवर्षी त्याबाबत विचार करून जरूर त्याप्रमाणे त्यामध्ये बदल घडवून आणावे लागतील; म्हणजे, नियोजन ही सतत चालणारी क्रिया आहे.

## सहकाराचे व संघटनेचे महत्त्व

सरकारी अधिकाराचे जसे निरनिराळे स्तर असतात, त्याप्रमाणे विकास योजनेचा कारभारही निरनिराळ्या स्तरांवरून चालतो. काही कारभार केंद्र सरकारच्या हाती राहतो. उदाहरणार्थ, सर्व मोठे कारखाने आणि मोठे उत्पादन–व्यवहार भारत सरकारकडे राहतात. लोखंड, पोलाद, तेल, कोळसा इत्यादी खनिज व इतर मौल्यवान निसर्गसंपत्तीचा वापर करणारे मोठे कारखाने, जड यंत्रसामग्री किंवा सर्व प्रकारच्या उत्पादक यंत्रांचे कारखाने, रेल्वे, सागरी वाहतूक, बँकिंग इत्यादी अखिल भारतीय स्वरूपाच्या आर्थिक व्यवहारांचे नियंत्रण करणे व त्यांच्या विकासाच्या योजना आखणे हे केंद्र सरकारकडे जाते. राज्य सरकारकडे त्या मानाने प्रत्यक्ष उत्पादनाचे काही लहान व्यवहार, उदाहरणार्थ पाटबंधाऱ्यांच्या योजना, विजेचे उत्पादन, इत्यादी गोष्टी येतात. राज्य सरकार स्वतः आर्थिक उत्पादनाच्या व्यवहारांत फारसे शिरत नाही. पण अविकसित देशांत आर्थिक व्यवहारांना चालना मिळेल अशा सर्व सोयी उपलब्ध करून देण्याची मुख्य जबाबदारी राज्य सरकारला घ्यावी लागते. आर्थिक विकासाचे दृष्टीने रस्ते, वीज, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य या सर्व गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. त्यामुळे त्यांच्या विकासाच्या योजना राज्य सरकारने हाती घेणे जरूर असते. शास्त्रीय ज्ञानाची व आधुनिक यंत्र–तंत्रज्ञांची आर्थिक विकासास अत्यंत गरज असल्याने शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणाला फार महत्त्व आहे. मजुरांनी तसेच शेतकऱ्यांनीही आपल्या शास्त्रीय ज्ञानाची वाढ करून व आधुनिक तंत्र शिकून आपले कसब वाढविणे आवश्यक आहे. निरोगी राहणीलाही तितकेच महत्त्व आहे. म्हणून रस्ते, पाटबंधारे, वीजपुरवठा, यांच्याइतकेच शिक्षण व आरोग्याच्या सुखसोयींना आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्व येते. म्हणून, या सगळ्यांची वाढती तरतूद करण्याची जबाबदारी राज्य सरकारवर येते. शिक्षण देणे, साहित्य, तंत्रज्ञ, पुरविणे त्याबरोबरच विकासयोजना प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्याचे दृष्टीने संघटनेला तेवढेच महत्त्व आहे. विकास योजनेचा फायदा सर्वांना मिळत नाही ही आपल्याकडे एक तक्रार आहे. याबाबत असे दिसून येते की, जे श्रीमंत आहेत, मोठे आहेत व संघटित आहेत तेच या योजनांचा बराचसा फायदा उठवतात. देशभर विखुरलेले असंख्य लहानलहान शेतकरी, छोटे कारागीर व इतर लहान व्यावसायिक त्याचा फारसा फायदा घेऊ शकले नाहीत हा अनुभव आहे. तेव्हा या सर्वांची संघटना घडवून आणून हे फायदे त्यांच्यापर्यंत पोचतील इकडे लक्ष देणे जरूर आहे. यासाठी सहकाराला, संघटनेला फार महत्त्व आहे. यादृष्टीने विकास योजना कार्यवाहीत आणण्यासाठी लोकशाही विकेंद्रीकरणाइतकेच सहकाराला महत्त्व आहे. म्हणून पदोपदी सहकारी संघटनेचा उपयोग करून व नसतील तेथे त्या निर्माण करून आपणांस विकासाचे फायदे खालच्या थरापर्यंत पोचवावे लागतील; आणि निव्वळ सहकारी संस्था स्थापून भागणार नाही तर या संघटनांमार्फत निरनिराळ्या व्यावसायिकांना जी मदत पुरविली जाईल त्या मदतीचा ते योग्य रीतीने वापर करीत आहेत की नाही इकडेही लक्ष द्यावे लागेल. पिकासाठी कर्ज दिले तर त्याचा योग्य वापर होतो की नाही, झालेले पीक कोठे विकले जाते व कर्जाची परतफेड होते की नाही या सर्वांकडे लक्ष द्यावे लागेल. पैसा वसूल होण्याची खात्री असली म्हणजे पिकासाठी वाटेल तेवढ्या मोठ्या प्रमाणावर कर्ज देता येते, हे सहकारी साखर कारखान्यांच्या उदाहरणावरून दिसून येईल. ऊस कारखान्याकडे आल्यावर त्यातून कर्ज वसूल होण्याची खात्री असल्यामुळे एकरी १२०० रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. त्यासाठी लावणीचा, तोडणीचा सर्व कार्यक्रम संघटनेमार्फत

ठरवून दिला जातो. पिकांबाबत काही नवीन प्रयोग करावयाचे असल्यास अगर एखादे नवे पीक घ्यावयाचे असल्यास त्यासाठी कदाचित् वेगळ्या प्रकारे संघटना करावी लागेल. म्हणजे, कोणत्याही एकाच प्रकारच्या सहकारी संघटनेने सर्व काम भागणार नाही. निरनिराळ्या कामांसाठी निरनिराळ्या सहकारी संघटना उभाराव्या लागतील. पण कोणत्या का प्रकारची होईना सहकारी संघटना उभारल्याशिवाय, विशेषतः आपली परिस्थिती लक्षात घेता, आपणांस फारशी प्रगती करता येणार नाही. निसर्ग-संपत्तीचे संरक्षण व संवर्धन हा आपणांपुढे मोठा प्रश्न आहे. त्यांतील जंगलवाढीच्या कार्यक्रमाचा भाग घेतला किंवा विदर्भातील मालगुजारी तलावांचा प्रश्न घेतला, तर सहकारी संघटनांचेद्वारा पद्धतशीर कार्यक्रम आखल्याशिवाय त्यांची सोडवणूक होणार नाही.

## जिल्हा विकास योजनेचे स्वरूप

आता जिल्हा परिषदा स्थापन झाल्यावर राज्य सरकारकडे असणाऱ्या विकासाच्या बऱ्याच बाबी जिल्हा परिषदेकडे येत आहेत. तेव्हा आता जिल्हा परिषदेने कोणत्या गोष्टी करावयाच्या ते समजून घेणे अवश्य आहे. जिल्हा परिषदेने करावयाच्या कार्याचे या दृष्टीने तीन भाग पडतात. पहिला भाग म्हणजे निसर्गसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन करणे. यामध्ये शेतीचा पाणीपुरवठा, जमिनीची धूप थांबविणे, बांधबंदिस्ती, वनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन या गोष्टी येतात. गोपालन, दुग्धव्यवसाय, चराऊ रानांची वाढ यांबाबतच्या योजनांचाही त्याबरोबरच विचार करावा लागेल. आजवर आपल्याकडे जंगलांची, चराऊ रानांची फार हेळसांड झालेली आहे. राखीव जंगले आज जिल्हा परिषदेच्या कक्षेत येत नाहीत. पण लोकांचे प्रतिनिधी म्हणून राखीव जंगलांसंबंधीच्या योजनांबाबत सरकारला तुम्ही योग्य तो सल्ला दिला पाहिजे. यानंतर दुसरा भाग म्हणजे विकासास उपकारक अशा सार्वजनिक सुखसोयी निर्माण करून देणे. या योजनांचे विकासात केवढे महत्त्व आहे हे वर सांगितलेलेच आहे. वाहतुकीची साधने, वीजपुरवठा, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य यांसंबंधीच्या योजना यांमध्ये प्रामुख्याने येतात. आणि तिसरा भाग म्हणजे व्यावसायिक योजनांचा. ग्रामीण भागांत शेती हाच आपला मुख्य व्यवसाय असल्यामुळे शेतीउत्पादनवाढीच्या अगर शेतीविकासाच्या योजनांचा यांमध्ये प्रामुख्याने समावेश होतो. पशुपालन व दुग्धव्यवसाय यांचाही शेतीविकासाच्या योजनेत समावेश होतो. अर्थात, या योजना कशा करावयाच्या त्याचे तंत्र आपणांस शिकून घ्यावे लागेल. त्यासाठी स्थानिक योजना म्हणजे काय हे समजावून घेणे अवश्य आहे. कारण या स्थानिक योजना अगर जिल्हा योजना करण्याचे तंत्र अजून भारतात कोणास फारसे अवगत झालेले नाही. म्हणून ते आपणांस तयार करावयाचे आहे व अनुभवाने शिकावयाचे आहे. या जिल्हा योजना कशा कराव्यात या दृष्टीने अलीकडे आम्ही थोडे प्रयत्न चालविले आहेत. वर्धा जिल्ह्यामध्ये इतरांच्या सहकार्याने याबाबत आम्ही थोडा अनुभव घेत आहोत. जिल्हा योजना करताना प्राथमिक योजना कशी करावयाची याला फार महत्त्व आहे. प्राथमिक योजना म्हणजे सबंध जिल्हा योजनेची सर्वसामान्य चौकट होईल. भौगोलिक योजना असेही तिला म्हणता येईल. अर्थव्यवहार वाढण्यासाठी वाहतुकीच्या मार्गांची, रस्त्यांची फार आवश्यकता असते. शहरांशी रस्त्यांनी संबंध जोडला गेला की त्याच्या पंचक्रोशीतील अर्थव्यवहारांत आपोआप वाढ होते. रस्त्यांमुळे नगरांतील शिक्षण, इस्पितळे इत्यादी सुखसोयी बाजूच्या प्रदेशांस उपलब्ध होतात; एवढेच नव्हे तर रोजगारही मिळण्याची सोय होते. म्हणून विकसित भागाशी अविकसित भागाचा अर्थव्यवहार अगर संबंध जोडल्याखेरीज अविकसित भागाचा विकास होणे शक्य नाही. रस्त्यांमुळे महाबळेश्वरातील स्ट्रॉबेरी मुंबईस जाऊ शकते. महाबळेश्वर एवढीच बाजारपेठ असल्यावर तेथे स्ट्रॉबेरीची लागवड किती वाढणार? पण आता मुंबईशी संबंध जोडल्यामुळे तीनचार महिने चालेल इतका हा धंदा तेथे वाढला आहे.

म्हणून हा भौगोलिक आराखडा, वाहतुकीचा आराखडा अत्यंत महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर अर्थव्यवहाराची तसेच समाजव्यवहाराची केन्द्रे म्हणून जी समजली जातात ती जिल्ह्यात कोणत्या ठिकाणी काढावयाची याचाही विचार व्हावयास हवा. ही केन्द्रे बाजूच्या प्रदेशांशी रस्त्यांनी जोडली जाऊन त्या भागाच्या आर्थिक विकासास मदत करतील. अशा केन्द्रांच्या ठिकाणी बाजारपेठ, इस्पितळे, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, यंत्रदुरुस्तीचे लहान कारखाने, लघुउद्योग, इत्यादी विकासोपकारक सोई असल्यास त्या सबंध विभागाचा आर्थिक विकास जलदीने घडवून आणता येतो. पण जिल्ह्यात अगर तालुक्यात ही केन्द्रे कोठे व किती असावयाची याचे नीट नियोजन केले पाहिजे. त्याबाबत आपसात चढाओढ करून वाटेल त्या रीतीने ती होऊ दिल्यास पैशाचा अपव्यय होईल. म्हणून, आपण गरीब आहोत, आपणाजवळ द्रव्यबळ व साधने थोडी आहेत ही गोष्ट लक्षात घेऊन योजनापूर्वक हा आराखडा निश्चित केला पाहिजे. प्रत्येक गोष्ट आपल्या गावी आणण्याचा मोह टाळला पाहिजे. तज्ज्ञांच्या साह्याने याबाबत निर्णय घेऊन कोणती गोष्ट कोठे करणे श्रेयस्कर ते ठरवून दिले पाहिजे. निर्विकारपणे व मोहरहित होऊन या गोष्टी करण्यास आपण शिकले पाहिजे. अर्थव्यवहाराची केन्द्रे व ती परस्परांशी जोडणारे वाहतुकीचे मार्ग यांचा प्राथमिक आराखडा अशा रीतीने तयार केल्यानंतर मग व्यावसायिक विकासाच्या योजनांकडे वळावे लागेल. व्यावसायिक योजनांत शेतीविकास योजनांना केवढे महत्त्व आहे हे वर सांगितलेच आहे. पण या योजनांचा फायदा ज्यांना थोडीफार शेती आहे अशा शेतकऱ्यांनाच घेता येईल. त्यांतही सहकारी संघटना उभारल्याशिवाय लहान शेतकऱ्यांना त्याचा फारसा फायदा घेता येत नाही हे वर सांगितलेच आहे. पण भूमिहीनांचा जो प्रचंड वर्ग ग्रामीण भागात आहे त्यांना व्यवसाय पुरविण्याची काय योजना करणार? अल्पभूमीवाले व भूमिहीन मिळून जवळजवळ ४० ते ६० टक्क्यांपर्यंत हा वर्ग ग्रामीण भागात आहे. अल्पभूमिधारीही बऱ्याच प्रमाणात मजुरीवरच अवलंबून असतात; आणि आज ग्रामीण भागात बेरोजगार केवढ्या मोठ्या प्रमाणात आहे, म्हणून या लोकांना रोजगार मिळवून देणाऱ्या योजनांचा विचार व्यावसायिक योजनेत अगत्याने व्हावयास हवा. यासाठी ज्या कामांत रोजगारी वाढेल अशा योजनांचा विचार करावयास हवा. अर्थात दुष्काळासारखी ही परिस्थिती नसल्यामुळे निव्वळ रोजगार देणे हेच उद्दिष्ट ठेवून भागणार नाही. रोजगार वाढला पाहिजे पण त्याबरोबरच त्या भागाच्या आर्थिक विकासास मदत होईल, त्याचा आर्थिक पाया रुंदावेल अशा कामाच्या योजना हाती घ्याव्या लागतील. या दृष्टीने निसर्गसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन, दळणवळणाची वाढ व इतर सार्वजनिक सोयी या कामांत ग्रामीण भागात बऱ्याच प्रमाणावर नवा रोजगार उपलब्ध करून देण्याची योजना आपण केली पाहिजे. स्थानिक रोजगारी व स्थानिक कामाच्या योजना यांची व्यावहारिक सांगड कशी घातली जाईल याचाही विचार केला पाहिजे. यासाठी अल्पभूमीवाल्या व भूमिहीनांच्या मजूरसंघटना निर्माण करून कोठे, कोणत्या कामावर, किती मजूर, केव्हा पुरवावयाचे याचे पद्धतशीरपणे नियोजन करण्याचीही गरज आहे. कारण याप्रमाणे संघटना केल्याखेरीज स्थानिक रोजगारीची वाढ व स्थानिक विकासाची म्हणजे रस्ते, पाटबंधारे, इमारती इत्यादी प्रकारची विविध कामे यांची, नीट सांगड घालता येणार नाही.

जिल्हा योजनेचे वर सांगितलेले तीनही भाग महत्त्वाचे असल्याने त्यांचा साकल्याने विचार करून जिल्हा योजना बनविल्या पाहिजेत. प्रत्येक भागातील परिस्थितीची सर्व दृष्टींनी संपूर्ण माहिती मिळवून, अधिकारी, तंत्रज्ञ तसेच संबंधित क्षेत्रांतील बाहेरच्या जाणत्या अनुभवी मंडळींचा सल्ला घेऊन हा जिल्हा योजनेचा आराखडा तयार केला पाहिजे. प्रत्येक पंचायत समितीकडून याबाबत जी माहिती आली असेल व त्यांनी ज्या योजना सुचविल्या असतील त्यांची व्यावहारिक व शास्त्रीयदृष्ट्या छाननी करून, त्यांच्याशी विचारविनिमय करून सबंध जिल्ह्याची सूत्रबद्ध योजना करावी लागेल. अशा

रीतीने योजना तयार करण्याच्या कामास एकीकडून गाव व पंचायत समितीपासून सुरुवात होईल व पुढे देशाच्या, राज्याच्या नियोजनाची जी सार्वदेशिक चौकट तयार झाली असेल ती लक्षात घेऊन सबंध जिल्ह्याची एकत्र व सूत्रबद्ध अशी योजना त्यातून तयार होईल. आणि हे काम केवळ जिल्हा परिषद व पंचायत समितीतील मंडळींचे नाही. ज्या कारणासाठी केवळ केंद्र सरकार विकास कार्याच्या योजना कार्यवाहीत आणू शकणार नाही त्याच कारणासाठी निव्वळ जिल्हा परिषदाही एकट्या हे कार्य यशस्वी रीतीने पार पाडू शकणार नाहीत. दोघांच्या सहकार्याने ही जबाबदारी पार पाडावयाची असून लोकांच्या सर्व प्रकारच्या साहाय्याने, त्यांना बरोबर घेऊन, याबाबत पावले टाकावी लागतील.

मागास भागाची जास्त प्रमाणावर व अगोदर सुधारणा करणे यालाही आपल्या योजनेत अग्रक्रम द्यावयास पाहिजे. आपण लोकशाहीत समानतेचा उच्चार नेहमी करतो. सर्वांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे असे आपण बोलतो, तेव्हा मागास भागाच्या विकासाकडे त्या त्या भागाच्या स्थानिक परिस्थितीनुसार थोडेफार अधिक लक्ष पुरवणे समतेला धरून होईल. उदाहरणार्थ, एकाच पुणे जिल्ह्यात विभिन्न परिस्थितीच्या दोन भागांत—शिरूर व बारामती तालुक्यांत–दुष्काळी परिस्थिती व संपन्नता अशी दोन टोके दिसून येतात. विदर्भात याप्रमाणे भंडारा–अकोल्याचे उदाहरण देता येईल. यासाठी मागास भागावर प्रथम व जास्त भर देऊन प्रदेशाचा एकंदर विकास साधला जाणे अत्यंत आवश्यक आहे.

## गट विकास योजनेतील दोष

आज आपल्याला राज्यांतून चाललेल्या योजनेचे चित्र काय दिसते? जिल्ह्याची आजची योजना ही तशी योजना नाहीच. आपल्याकडे युद्धकालापासून निसर्गसाधनांची हेळसांड होत आलेली आहे. जंगल व वनसंपत्तीची तूट होत गेली आहे व त्याला आळा बसलेला नाही. जंगलसंवर्धन–लागवड हे धंदे आज कुणी करत नाही. स्थानिक लोकांच्या सहकार्याभावी सरकारलाही आजपर्यंत हे करता आले नाही. रस्त्यांचे आत्यंतिक महत्त्व लक्षात घेऊनही महाराष्ट्रातील आजचा त्यांचा विकास अत्यंत मर्यादित आहे. राज्याचा खरा आर्थिक विकास मुंबईतच्च दिसतो व सारे रस्ते तिकडेच केंद्रित झालेले दिसतात. शाळांच्या इमारती, पाटबंधारे, आरोग्य केंद्रे इत्यादी बाबींकडे पाहिजे तितके लक्ष पुरविलेले दिसत नाही. तसेच याबाबत योजना खरोखर आधी काही होऊन बसली आहे हे म्हणणेही बरोबर नाही. गट विकास योजनेतील दोन ठळक दोष म्हणजे : (१) ती परिस्थितिसापेक्ष नाही. वरून आलेले ठराविक साच्याचे असे सर्व आराखडे; आणि (२) आत्मीयता नसल्याने त्यांच्या अंमलबजावणीत जिवंतपणा नाही. त्यामुळे या गट विकास योजनांना म्हणावे तसे यश आलेले नाही.

या दृष्टीने ज्यास 'योजना' म्हणता येईल असे काही आजच्या जिल्हा योजनेत नाहीच. कारण त्याबाबतच्या काही प्राथमिक कसोट्या आधी ठरवून नंतर आखणी केलेली अशी आढळतच नाही. प्रथम, आपल्याकडे शास्त्रशुद्ध योजना करण्याची प्रक्रिया तर अगदी नवीनच आहे. विशेषतः योजना खालून तयार करण्याच्या तंत्राची खरी माहिती कुणाला फारशी नाहीच. असा प्रयोगही कुठे अजून झालेला नाही. आपल्या देशाच्या विशिष्ट गरजेनुसार दीर्घकालीन उद्दिष्टे लक्षात घेऊन परिस्थितिसापेक्षपणे खालून वर जाण्याच्या पद्धतीनेच योजना करणे आवश्यक आहे. हे अतिशय अवघड काम आहे आणि तुम्हांला ते करून दाखवावयाचे आहे. तेव्हा तुम्ही जिल्हा योजनेसाठी पाठवणार असलेला व राज्याच्या अंतिम योजनेत समावेश होणारा योजना कार्यक्रमांचा आराखडा अतिशय काळजीपूर्वक तयार केला पाहिजे. तालुक्या-तालुक्यांतील निरनिराळी परिस्थिती व गरजा पाहून, तसेच कोणत्या गोष्टींना अग्रक्रम द्यावयाचा ते ठरवून, पद्धतशीरपणे आपण जिल्हा योजना तयार केल्या पाहिजेत.

योजना तयार करण्याचे हे नवीन तंत्र हळूहळू अनुभवाने आपणास खात्रीने शिकता येईल. एकदम जरी काही नवीन करून दाखविता आले नाही तरी अशा रीतीने प्रयोगावस्थेतून जात जात, लोकांच्या तसेच सरकारच्या साहाय्याने, आपण आत्मविश्वासाने आपला सर्वांगीण विकास घडवून आणू शकू यात संदेह नाही.

## जनतेचे सहकार्य मिळविणे महत्त्वाचे

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या दैनंदिन कारभारात अनेक गोष्टींबरोबरच तुमच्या जाणतेपणाची जरुरी फार आहे. त्याबरोबरच तुमच्या कामात स्वयंस्फूर्ती आणि आपलेपणा ही पण दिसून आली पाहिजेत. पंचायत समित्या व जिल्हा परिषदांना कारभार देणे ह्याचा अर्थ स्थानिक परिस्थितीची माहिती असलेल्या जाणत्या मंडळींच्या पुढारपणाकडे तो देणे असे मी धरून चालतो. परंतु असे केवळ धरून चालून भागणार नाही. त्याने काही पंचायतसमितीच्या विकास योजनेचे बजेट तयार करता यावयाचे नाही. सर्व योजनांची, गरजांची, तांत्रिकदृष्ट्या नव्या पद्धतीने आकडेवार माहिती मिळवण्याचे प्राथमिक, महत्त्वाचे आणि कष्टाचेही काम या स्थानिक पुढाऱ्यांना करावे लागेल. त्या दृष्टीने तज्ज्ञ अधिकाऱ्यांचा सल्ला मिळणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. ही जाणती व तज्ज्ञ माणसे स्वतःला, तसेच तुम्हांला, स्थानिक कार्यात—विकेंद्रीकरणाच्या कार्यात—अधिक जाणकार कशी बनवितात यावर हा तुमच्या कर्तृत्वाबाबतचा अभिप्राय अवलंबून राहील. त्याचप्रमाणे लोकांनाही तुम्ही सर्व जवळची माणसे वाटून त्यांच्या प्रेमाचा व सहकार्याचा कारभार चालवायला उपयोग होईल. तुम्ही मंडळी सर्व निवडून आलेली असल्यामुळे तुमच्याबद्दल जनतेत प्रेमादर राहील व तुमच्या कार्यामुळे आणखी तो वाढतही जाईल असे धरून चालण्यास काहीच हरकत नाही.

रोजच्या प्रश्नांबाबत तुम्ही निश्चयाने पुढील दोन गोष्टी पाळल्या पाहिजेत : (१) कार्यामागची तात्त्विक भूमिका खंबीर ठेवणे; आणि (२) ही भूमिका लोकांना समजावून, पटवून देऊन, कार्यक्षमतेने ती पार पाडणे. हे सर्व बहुजनांच्या हिताचे, बहुसंख्यांच्यासाठीच आहे असे जर तुम्हांला पटवून देता आले, विशेषतः विकास योजनांबाबत तुम्ही त्यांचा सल्ला घेत आहात, रोजच्या प्रश्नांबाबत त्यांना बरोबर घेऊन जात आहात असे लोकांना वाटायला लागले तर आपल्या सर्व कारभारात त्यांची सक्रिय सहानुभूती तुम्हांला मिळत राहील. स्थानिक पुढाऱ्याकडे सत्ता आली आहे एवढ्यानेच स्थानिक जनतेला आपल्याबद्दल आपुलकी-आत्मीयता वाटेल असे मला वाटत नाही. सरकारी पैसा, सल्लागार समित्या, अधिकारी नोकरवर्ग हे सर्व असूनसुद्धा ही सर्व यंत्रणा आपल्यासाठी काम करत आहे अशी भावना आतापर्यन्त लोकांमध्ये निर्माण होऊ शकली नाही. बलवंतराय मेहता समितीचा याबाबतचा अभिप्रायही हेच दर्शवितो. विकास योजनेच्या कार्याबाबत लोकांमध्ये सर्वसाधारणपणे आपलेपणाची भावना दिसून येत नाही असेच त्यांना आढळून आले. तुम्हांला ही भावना आता लोकांमध्ये निर्माण करावयाची आहे. त्यांची सुखदुःखे जाणून घेऊन आत्मीयतेने तुम्ही त्यांच्यासाठी कारभार करताना दिसलात तर त्या तालुक्यातील जनतेला तुमच्याबद्दल आपुलकी वाटेल. नुसत्या मत देण्याने 'आपलं राज्य' ही भावना निर्माण होणार नाही. लोकांच्या गरजांप्रमाणे, लोकांच्या इच्छेनुरूप हे राज्य कितपत चालते, त्यात लोकांना कितपत भाग घेता येतो, प्रत्यक्ष कारभार जनतासंपर्क साधून कसा चालवला जातो ह्यावर ते अवलंबून आहे. जनतासंपर्क ह्याचा जरा व्यापक अर्थ सांगायचा म्हटला तर तो असा की, आपण कारभार चालविण्यासाठी जे प्रतिनिधी नेमले आहेत ते त्या लोकांचे मत ऐकून घेऊन कारभार करीत आहेत. उदाहरणार्थ, गट-अर्थसंकल्प पंचायत समितीला करावयाचा आहे. तो करताना जर सभा घेऊन, चर्चा करून, परिसंवाद घडवून आणून तालुका पातळीवर सर्व पक्षांचा व

बाजूंचा विचार घेतलात तर सामान्य माणसाला, 'प्रत्यक्ष कार्यात आम्हांला काही आवाज आहे, अप्रत्यक्षरीत्या का होईना आम्ही काही भाग घेऊ शकतो' असे वाटेल व आत्मीयतेची भावना निर्माण होईल. नुसते पंचायत समितीतील दहा-बारा माणसांच्या एकत्र येण्याने हे होणार नाही. त्याने लोकशाही यशस्वी होणार नाही. शेवटी, लोकशाहीचा अर्थ, गाभा, 'हे राज्य, हा कारभार आपला हा विश्वास आणि सर्वांना समान संधी' हा आहे. सर्वसाधारणपणे सर्व माणसे सर्व थरांत, सरासरीने, सर्व बाजूंनी, सारखी आहेत आणि यासाठी त्यांना समान संधी मिळणे हे लोकशाहीचे प्रमुख अंग आहे. याकरिता लोकांना स्थानिक कारभारात लक्ष घालायला, विचार करायला व सहभागी होण्याला प्रवृत्त करणे, त्यांचे शिक्षण करणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे व याची जबाबदारी तुम्हा लोकनेत्यांवर आहे.

## विकासाचा वास्तविक अर्थ

विकासाचा अर्थ वास्तविक रीतीने तुम्ही समजावून घेतला पाहिजे. माझ्या मते सोप्या शब्दांत ह्याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे : 'विकास' म्हणजे वाढ, उत्पादनवाढ, रोजगारवाढ, शेतीउत्पादनवाढ आणि त्याबरोबरच अर्थव्यवहार व अर्थव्यवस्था यांचे तंत्र, रूप आवश्यक त्याप्रमाणे बदलणे. जुने कार्य जुन्याच पद्धतीने न करता काहीतरी नवीन करून दाखविण्यासाठी, परंतु चालू कार्याला खीळ न पाडता, सर्वांच्या सर्वसामान्य गरजांसाठी स्थानिक निसर्गसाधने, मनुष्यबळ व इतर साधनसामग्री यांचा स्थानिकदृष्ट्या समग्र विचार करून, सर्वांच्या सहकार्याने, सर्वांगीण विकास, त्या त्या भागाचा, पर्यायाने राज्याचा, राष्ट्राचा कसा होईल हा प्रमुख विचार या सगळ्या विकास योजनेत अभिप्रेत आहे. स्थानिक जीवनाचे पुनरुत्थान हा स्थानिक विकासाचा आत्मा आहे. आपला देश परंपरागत कृषिप्रधान आहे. त्यामुळे आपली समस्या बहुशः कृषिप्रधान समाजाच्या सर्वांगीण विकासाची आहे. आजही औद्योगिक क्रांती होत असताना कृषिउत्पादनावरच आपला भर आहे. कारण अजूनही हा देश कृषिप्रधान अर्थव्यवस्थेचा आहे आणि आपल्या योजनांचे प्रमुख दीर्घकालीन सार्वत्रिक उद्दिष्ट औद्योगीकरणाचे, राष्ट्रीय उत्पादनवाढीचे व तद्द्वारा जीवनमान उंचावून सर्वांचा सर्वांगीण विकास साधावयाचे आहे. हा विकास काही चटकन होणारा नाही. आपल्यासारख्या गरीब देशात, कालांतराने फार प्रयासाने अपेक्षित गोष्टी घडून येणार आहेत. त्यासाठी खऱ्या अर्थाने सर्वांगीण विकास झालेला स्थानिक समाज निर्माण करण्यासाठी दूरदृष्टीने आपल्याला योजना करावयाची आहे. ही दृष्टी आता आपल्या सरकारला व समाजाला येत आहे. विकासाची क्रिया दीर्घकालीन असते. बीजापासून झाड त्याप्रमाणे आमच्यातील सुप्त असे सद्गुण व शक्ती क्रमाक्रमाने विकसित होऊन दृढ कशा होतील व त्या समाजजीवन बळकट कशा करतील ही दीर्घकालीन क्रिया ह्या विकास शब्दात अभिप्रेत आहे. त्यासाठी आम्ही किती झटतो हा प्रश्न आहे. तेव्हा दीर्घकालीन उद्दिष्टे डोळ्यांपुढे ठेवून सहज व स्वाभाविकपणे उपलब्ध असणाऱ्या सर्व स्थानिक बाबींचा स्थानिकदृष्ट्या विचार करून सर्व प्रकारची माहिती मिळवून घेऊन व देऊन सर्वांच्या सहकार्याने, सर्वांच्या सर्वांगीण विकासासाठी योजना बनवून तिच्याद्वारा टप्प्याटप्प्याने आपली सतत प्रगती करीत राहिले पाहिजे. आपला देश अत्यंत गरीब आहे आणि त्याच्या प्रगतीची जबाबदारी आता आपल्यावर आलेली आहे हे तुम्ही लोकनेत्यांनी नेहमी लक्षात ठेवले पाहिजे.

## जबाबदारीची जाणीव ठेवणे जरुरीचे

अध्यक्षपद अगर दुसरे पदाधिकारीपद स्वीकारल्याने आपल्यावर केवढी जबाबदारी येत आहे, या स्थानांचे किती महत्त्व आहे याची आपणांस स्पष्ट जाणीव असणे अवश्य आहे. अध्यक्षपद हे सत्तेचे नवे केंद्र होऊ नये. 'मी अमक्या गावचा पाटील आहे' या पूर्वीच्या भावनेतील मान व जबाबदारी

आता राहिलेली नाही. ज्या समाजात प्रतिष्ठा आणि कर्तव्य यांची सांगड आहे तोच समाज जिवंत होय. या दृष्टीने आपण मानाला जितके हपापलेले आहोत तितके जबाबदारीला दिसत नाही. स्थानिक बाबतीत लोकहिताच्या गोष्टी सर्वांच्या विचाराने करता येणे शक्य असता, स्थानिकदृष्टया महत्त्व नसलेले भेदाभेद, पक्षबाजी वगैरे गोष्टी तेथे माजू देण्यात अर्थ नाही. त्यामुळे कार्यक्षमतेला धक्का बसेल. सत्तेची व मानधनाची एक जागा याच दृष्टीने एकाधिकारीपदाकडे पाहून आपले आसन कसे स्थिर राहील याचाच आपण विचार करीत राहणार असल्यास आपली ती मोठी चूक होईल. लोकशाही विकेंद्रीकरण यशस्वी व्हायचे असेल, त्यातून काही बरे निघावे असे वाटत असेल तर, 'हे स्थळ डावपेच खेळण्याचे नाही, तर इथल्या लोकांची दुःखे दूर करण्यासाठी, त्यांचे प्रतिनिधी म्हणून इथे पाठवलेली आम्ही मंडळी आहोत' हे तुम्ही स्पष्टपणे बोलून दाखविले पाहिजे व त्याप्रमाणे वागले पाहिजे. यात पक्ष वगैरे गोष्टी आणता कामा नये. 'सर्व समाजाने ही माझ्यावर टाकलेली जबाबदारी आहे.' या जाणिवेने आपण काम करावयास पाहिजे. तसेच सरकारी अधिकाऱ्याप्रमाणे, 'हे माझे, मला नेमून दिलेले काम नाही किंवा ही फार मोठी अवघड जबाबदारी आहे' अशा शंकाकुल अगर भीतिग्रस्त वृत्तीनेही वागता कामा नये; तर आपणांस काही लोककल्याणाच्या गोष्टी करावयाच्या आहेत, समाजात नवीन चैतन्य निर्माण करावयाचे आहे ही जाणीव, दृष्टी ठेवून कर्तव्यबुद्धीने तुम्ही कामाला लागणे आवश्यक आहे.

सरकारी अधिकारी आपली कर्तव्ये बजावतीलच; परंतु तुमच्याकडून होणारे मार्गदर्शन, सल्ला ही जास्त महत्त्वाची आहेत. तुम्ही अपेक्षेप्रमाणे कारभार करू शकला नाहीत तर जरूर त्या ठिकाणी सरकारी अधिकाऱ्यांना तो करावा लागेल. परंतु तुमच्या सल्ल्यानुसार प्रामुख्याने त्यांनी तो हाकावयाचा आहे. स्वशिक्षण, लोकशिक्षण, अधिकाऱ्यांशी सहकार्य, वेळीप्रसंगी त्यांना समज देणे पण त्याबरोबरच समजूतदारपणा ठेवणे—या सर्व गोष्टी तुम्हांला करावयाच्या आहेत. त्या कितपत जमतात यावर तुमच्यावरील जबाबदारीचे यश प्रामुख्याने अवलंबून आहे.

पदाधिकाऱ्यांना मेहनताना अगर मानधन देणे तात्त्विकदृष्टया फारसे चुकीचे नाही. हा प्रश्न अलीकडे बराच चर्चिला जातो. लोकशाहीत वेतने, मानधन देण्याचे समर्थन करता येते ते त्यामागील समताप्रधान विचारामुळे. कोणालाही अमुक एका सामाजिक वा आर्थिक गटाचा, स्तराचा, पेशाचा म्हणून विशेष महत्त्व न देता, समान भूमिकेवरून, त्याच्यावर सोपविलेली जबाबदारी पेलणे सुलभ जावे इतके त्यास आर्थिक साहाय्य देणे ही जरुरीची गोष्ट आहे. आतापर्यंत सुखवस्तूंनी राज्यकारभार करावा ही भूमिका होती. पण समाजाच्या गरीब स्तरांतून नेतेपण पुढे येऊन ते कारभाराची जबाबदारी पाहू लागते त्या वेळी दैनंदिन योगक्षेमाची त्यांच्यामागे चिंता राहू नये, याच हेतूने ही मानधनाची तरतूद ठेवलेली आहे.

अर्थात मेहनताना घेतल्यावर मात्र कोणत्याही पदस्थाने अपेक्षित वेळ आणि श्रम त्या कामासाठी दिलेच पाहिजेत. तुमच्यावर नवीन कार्याची जी विशिष्ट जबाबदारी सोपविली आहे ती तुम्ही सातत्याने मन देऊन, पार पाडावी यासाठी मानधनाची तरतूद हेतुपुरस्सर केलेली आहे हे ध्यानात घेतले पाहिजे.

## सहकारी संस्थांशी संबंध

सहकाराबाबत तुमच्याकडून मोठ्या जबाबदारीच्या कार्याची अपेक्षा आहे. फार मोठ्या प्रमाणावर जनतेत सहकारी भावना निर्माण करणे, रुजवणे, निरनिराळे प्रयोग करणे आणि सहकार ही रजिस्ट्रारची चळवळ नसून जनतेची चळवळ आहे हे दाखवून देणे, ही सर्व अवघड जबाबदारी तुमची आहे. सहकारी अर्थव्यवस्थेच्या गोष्टी प्रत्यक्ष कृतीत आणून दाखवावयाच्या आहेत. केवळ सहकाराचे

प्रचारात्मक बोलणे सोपे आहे, पण सहकाराची गावगंगा निर्माण करणे फार अवघड कार्य आहे. सर्व प्रकारच्या व आवश्यक अशा नवीन सहकारी प्रयोगांना उचलून धरून त्यांना उत्तेजन द्यावयाचे तर हे सर्व कार्य स्थानिक पुढारीपणाचेच आहे आणि सहकारी क्षेत्रातही महत्त्वाच्या सर्व कार्यांची जबाबदारी तुमची, तुमच्या पंचायत समितीची आहे.

सहकारी संस्था व आपण पदाधिकारी यांच्यांत दुवा राहून कार्ये पार पडावीत अशी अपेक्षा आहे. हा दुवा कसा साधता येईल ? सहकारी संस्थांच्या व्यवहारांत तुम्ही ढवळाढवळ करू नये अशी अपेक्षा आहे—म्हणजे जिल्हा परिषदेच्या कायद्याची रचना तशी केलेली आहे. सहकारी संस्थांचा कारभार त्या संस्थांनाच करू द्यावयाचा आहे. सहकारी संस्था या स्वायत्त, स्वतंत्र व एका सूत्रबद्ध आखणीच्या संस्था आहेत व तशाच त्या राहिल्या पाहिजेत. सहकारी कायद्याच्या चौकटीने त्यांच्या व्यवहारावर आवश्यक ते नियंत्रण येतच असते. लोकशाही विकेंद्रीकरण संस्थांनी लोकशाही सुदृढ करण्याच्या दृष्टीने, आपल्याला आखून दिलेल्या मर्यादा न सोडता, कोणत्याही प्रकारचे दडपण न आणता व आणवून न घेता, आपल्याकडून ढवळाढवळ होऊ न देता, आपल्या कल्पनेने, इष्ट संकेतानुसार कार्य करीत राहिले पाहिजे. शाळा, विद्यापीठे यांच्याप्रमाणेच सहकारी संस्था या कायद्याने निर्मित अशा स्वतंत्र स्वायत्त संस्था आहेत व त्यांची स्वायत्तता राखून तुम्ही सहकाराच्या वाढीस मदत करावयाची आहे.

शेती सहकारी होणार असे नागपूर कॉंग्रेसच्या ठरावाने म्हटले. परंतु पुढे दोनतीन वर्षांत, नुसते बोलून ते सहज शक्य होणार नाही असे दिसून आले. बळकट संघटनेच्या प्रयत्नाशिवाय ते होऊ शकणार नाही. उदाहरणार्थ, स्थानिक कामासाठी भूमिहीन मजुरांच्या संघटना उभारून कायदेशीररीत्या रोजगार मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू जावे तो मजूरच येत नाहीत असे दिसून येते. एकंदर परिस्थिती, स्थानिक साधनसामग्री व मजुरीची आवश्यकता या गोष्टी पाहून संघटनेच्याद्वारा हे प्रयत्न करावे लागतील.

सहकारी साखर कारखान्यांनी या दृष्टीने उत्कृष्ट अशी कामगिरी बजावून नवा आदर्श, पायंडा घालून दिलेला आहे. या क्षेत्रातल्या बऱ्याच वर्षांच्या अनुभवानंतर जी प्रक्रिया निर्माण झाली आहे ती आशादायक अशीच आहे. सहकारी साखर कारखान्यांचा कारभार चालवणे हा पण एक विकेंद्रीकरणाचाच प्रयोग आहे. याचा अनुभव फार चांगला आला आहे. हा धाडशी प्रयोग कितपत यशस्वी होईल अशी प्रथम शंका घेतली जात होती. अनेक अडचणी आम्हांला यात आल्या. पण नवीन प्रयोगामधील तत्त्व, उद्देश आणि व्यवहाराची दिशा पटल्यावर ज्या जोमाने व विश्वासाने कार्य झाले त्यामुळे गेल्या ५–६ वर्षांत आम्ही मोठ्या प्रमाणावर या क्षेत्रात यश मिळविले. मग इतरत्रही याबाबत विश्वास निर्माण होऊन सरकारनेही सहकारी पद्धतीवरच साखर कारखाने काढण्याचा निर्णय घेतला. 'हे होऊ शकते व आपल्या कुवतीत आहे.' हे एकदा लोकांना पटले की त्यांचे सहकार्य जरूर मिळते. मात्र काय शक्य आहे, कितपत व्यवहार्य आहे, नेमकी कुठे, काय उणीव आहे इत्यादी गोष्टींची नीट कल्पना येऊन, अडचणी दूर करून, पुढे जाण्यासाठी योग्य ते नेतृत्व, पुढारीपण मिळाले पाहिजे. हे नेतृत्व तुम्हा मंडळीतून मिळून सहकारी क्षेत्रातील तुमची जबाबदारी पार पाडण्यासाठी योग्य ते वातावरण व संधी आता उपलब्ध झालेली आहे.

## आशावादी दृष्टिकोण

या विकेंद्रीकरण उपक्रमावर माझा विश्वास आहे आणि ह्या सर्व कार्याकडे मी आशावादी दृष्टिकोणातून पाहात आहे. आजचे ग्रामीण समाजचित्र बदलते आणि आशादायक आहे. सर्वसाधारण

शिक्षित ग्रामीण समाजसुद्धा आता पद्धतशीरपणे, उमजून गोष्टी करू लागला आहे. औरंगाबादेस दोन वर्षांपूर्वी शेतकी परिषद भरली असता तेथे जो परिसंवाद झाला व त्यात सुबुद्ध शेतकऱ्यांनी जो भाग घेतला त्यावरून हे स्पष्ट दिसून येत आहे. माझा आशावाद निव्वळ या नव्या कायद्यातून निर्माण झालेला नाही. तुमच्या सारख्यांच्या योग्य अशा नेतृत्वाकडून, लोकसंमतीने व लोकजागृतीने, माहिती देऊन व घेऊन, कष्टपूर्वक, जनतेच्या व अधिकाऱ्यांच्या मदतीने या गावगाड्याला पुढे रेटावयाचे आहे या जाणिवेतून तो निर्माण झालेला आहे. सामर्थ्य असलेला लोकशाहीप्रधान समाज आपल्याच उद्धारासाठी आवश्यक आहे हे आता तुमच्यासारख्या लोकनेत्यांनी समजावून घेतले पाहिजे व दिले पाहिजे. आपल्यासारख्या विस्कळित, दुर्बल समाजाला प्रबळ करण्यासाठी तुमची गरज आहे. ठिकठिकाणी, गावोगाव, अशी माणसे तयार होण्याची आवश्यकता आहे. हे नेतृत्व निर्माण करण्याची आजपावेतो अशक्य असलेली संधी या कायद्याने आता दिली आहे. लोकशाही दृढ करण्याचे हे साधन आहे. आता आपणांस कार्यक्षमतेबरोबरच सर्व लोकांना बरोबर घेऊन जायचे आहे. आपुलकी निर्माण करून समाजनेतेपण नीट, खंबीरपणे व सुबुद्धतेने, दुष्ट, अहितकारक प्रवृत्तींना थारा न देता, करावयाचे आहे.

मानवी समाजाचा कारभार हा एकंदरीने विकेंद्रित असाच चालत असतो. सुव्यवस्थित पण नियंत्रित रीतीने, लोकांनी, लोकांसाठी तो चालवावा अशी ही योजना आहे. आणि अपेक्षेप्रमाणे तो चालत आहे यावरच विकेंद्रीकरणाचे यश अवलंबून आहे. विकेंद्रित लोकशासनाच्या यशातच लोकशाहीचे अंतिम यश आहे आणि ह्याची जबाबदारी तुम्हा लोकनेत्यांवर आहे. तुम्ही हे लोकशाही विकेंद्रीकरण यशस्वी करून दाखविलेत, म्हणजेच खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात ‘स्वराज्याचे प्रकटीकरण’ तुम्ही घडवून आणलेत, असे थोड्याच काळात दिसून येईल.

गोखले अर्थशास्त्र संस्था, *महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद व पंचायती राज्य परिसंवाद, पुणे, १९६१* (पुणे, १९६२, मराठी प्रकाशन, ९) पृ० २०–४३

☆

# ६ . . कोकणचा आर्थिक विकास

कोकण हा उपेक्षित अविकसित प्रदेश आहे या गोष्टीकडे कोकणवासीयांचे लक्ष अलीकडे वेधू लागले आहे ही घटना मी सर्व दृष्टीने इष्ट मानतो. विकासाच्या प्रयत्नाची सुरुवात आपण अविकसित आहो या जाणीवेतूनच होते. अशी जाणीव उत्पन्न झाली म्हणजेच विकास घडवून आणण्याकरिता किती विविधांगी कार्यक्रम आखले पाहिजेत, ते परस्पर पूरक व सहाय्यक होतील हे कसे साधले पाहिजे, हे कार्यान्वित होण्यास कोणास, कोणत्या मार्गांनी प्रेरित अगर उत्तेजित केले पाहिजे किंवा प्रसंगी भाग पाडले पाहिजे, इत्यादी बाबतींत दीर्घकालीन बेत करणे, व्यूह रचणे याचा विचार होऊ लागतो. या विचार-मंथनातून विकास योजना मूर्त होऊ लागतात आणि त्यांस आवश्यक पाठिंबा उपलब्ध होऊ शकतो. अलीकडे कोकण आणि भारतातील इतर अविकसित भागांसंबंधी अशा प्रकारच्या अनेक हालचाली होऊ लागल्या आहेत. त्यांपैकी आपली ही आजची परिषद एक महत्त्वाचा टप्पा आहे असे मी मानतो, आणि तिचे स्वागत करतो.

आजचे युग नियोजित विकास प्रयत्नांचे आहे. असल्या सर्व प्रयत्नांच्या बुडाशी अर्थव्यवहार—प्रक्रियांबाबतचे काही गृहीत सिद्धांत आहेत. यांतील सर्वांत महत्त्वाचा सिद्धांत म्हणजे कोणत्याही समाजाने विचारपूर्वक दीर्घकालीन व्यूहात्मक कार्यक्रम आखून अमलात आणल्यास आर्थिक विकासाची गती पुष्कळ वाढविता येते आणि अर्थव्यवस्थेची इष्ट घडण करिता येते हा होय. अर्थात हे साधावयाचे तर योजना सर्वव्यापी हवी आणि तीस सर्व घटक-स्तरांची मान्यता मिळून त्यांच्या सहकार्याने ती कार्यान्वित व्हावयास हवी. आजच्या राज्यघटनेत हे कार्य करण्याची शक्ती फक्त शासन संस्थेतच असते आणि म्हणून नियोजित विकासाची प्राथमिक जबाबदारी सरकारची मानली जाते. साहजिकच, कोणत्याही घटकास, विभागास, प्रदेशास नियोजित विकास प्रयत्नांत आपणांकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही, चालू विकासक्रमाचा फारसा लाभ आपणांस मिळत नाही असे वाटल्यास त्याचा दोष शासनाचा आहे असे म्हटले जाते; व विकास योजनेच्या रचनेत अगर कार्यवाहीत असलेल्या उणीवांमुळे हे घडत आहे असा निष्कर्ष काढणे अपरिहार्य ठरते. गेल्या पंधरा-वीस वर्षांत भारताची आर्थिक प्रगती झाली ती सर्वत्र सारखी दिसून येत नाही आणि काही वर्ग अगर प्रदेश उपेक्षित राहिले याची जबाबदारी अंशतः योजना आयोगावरही येते हे प्रथम प्रांजलपणे कबूल करणे मी आपले कर्तव्य समजतो.

## विकासातील विषमता

अशी मान्यता देणे ही केवळ पहिली पायरी झाली. खरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, हे असे का झाले याचे निदान करणे हा होय. याकरिता अप्रगत राष्ट्रांतील सर्वसाधारण विकास योजनांचे, विशेषतः भारतीय विकास योजनेचे, स्वरूप काय हे पाहिले पाहिजे. आपल्या विकास योजनेची प्रमुख अंगे तीन

आहेत. निसर्गसंपत्तीचे संरक्षण व विकास हे पहिले अंग. यातील मुख्य बाब मोठ्या व छोट्या जलसिंचन योजना. दुसरे अंग देशभर अर्थव्यवहाराचा विकास होण्यास आवश्यक अशा साधनसोयींच्या राष्ट्रीय व स्थानिक व्यवस्था निर्माण करणे. यात हरतऱ्हेच्या दळण-वळणांच्या साधनांची व्यवस्था, पैसा व पतपुरवठ्याची व्यवस्था, बीजनिर्मिती व वितरण, सामान्य व तांत्रिक शिक्षण व संशोधन, आरोग्य-संवर्धन इत्यादी सर्वांचा समावेश होतो. देशाच्या दीर्घकालीन औद्योगिक विकासास आवश्यक अशा मूलभूत औद्योगिक व खनिज उत्पादनाचा सरकारी क्षेत्रात उपक्रम हे तिसरे अंग होय. ब्रिटिश आमदानीच्या सुरुवातीस दीडशे वर्षांपूर्वीच औद्योगिक क्रांतीचे आधुनिक स्वरूप इंग्लंडमध्ये स्पष्ट दिसू लागले. पण या क्रांतीचे केवळ अनिष्ट परिणाम भारतावर झाले. नवीन तंत्र आत्मसात करणे, यांत्रिक उद्योग वाढीस लागणे, साधनसोयींच्या व्यवस्था निर्माण होणे, निसर्ग संपत्तीची पद्धतशीर पाहणी होऊन तिचा विकास करणे यांपैकी जेवढे थोडे ब्रिटिशांच्या हिताचे किंवा राज्यकारभार चालविण्यास आवश्यक तेवढेच घडले. आणि एकंदर सर्व बाबतींत आमचा मागासलेपणा वाढतच गेला. यामुळे आपल्या विकास योजनेस सुरुवात झाली, तेव्हा शिलकी कार्य फार मोठे व ते करण्याचे आपले सामर्थ्य अत्यल्प अशी परिस्थिती होती. या परिस्थितीत मोठ्या देशव्यापी योजनांस अग्रहक्क देऊन त्यांवर लक्ष केंद्रित करणे हे स्वाभाविक घडले. मोठ्या जलसिंचन व विद्युत् योजना, मोठे मार्ग, मोठी बंदरे, मोठ्या संशोधन संस्था, मोठे औद्योगिक प्रकल्प यांवर भारत सरकारने भर दिला व राज्याराज्यांतूनही त्यातल्या त्यात मोठ्या योजना निवडल्या गेल्या. परिणामी, अर्थव्यवहार केंद्रित झालेली मोठी शहरे व सर्व प्रकारच्या मोठ्या योजनांच्या कार्यक्षेत्रांतील समाविष्ट प्रदेश येथेच विकास द्रुतगतीने झाला. पण जे प्रदेश मुख्य अर्थव्यवहार-प्रवाहापासून अलग पडले अगर ज्यांवर मोठ्या योजनांचा असर पडला नाही ते उपेक्षित, अविकसित राहिले. शिवाय विकास-प्रक्रिया एकदा निश्चित गतिमान झाली म्हणजे ती अंतःशक्तीने सारखी चालू राहून वर्धिष्णु होते. पण जेथे सुरुवातच झाली नाही तेथे स्वयंप्रेरित असे फारसे घडताना दिसत नाही. असे दोन्ही बाजूनी होत राहिले म्हणजे विषमता साहजिक वाढत जाते.

थोडक्यात म्हणजे विकास कार्यक्रम सुरुवातीस विशिष्ट स्थली व विशिष्ट क्षेत्रात केंद्रित झाला म्हणजे आपल्यासारख्या अप्रगत समाजात त्याचे परिणाम चटकन इतरत्र पसरत नाहीत, आणि काही प्रदेशांत व व्यवहारांत व काही वर्गांची आर्थिक प्रगती होत आहे, पण इतरांची नाही असे दृश्य दिसू लागते. आर्थिक विकासाचा दीर्घकालीन व्यूह रचताना काही श्रेणी व क्रम ठरविणे व अमुक घडविले असता स्वाभाविकपणे इतर घटना त्यांतून निघतील असे कल्पिणे अपरिहार्य असते. मुद्दा एवढाच की अनुभवान्ती विकासाचे क्षेत्र मर्यादित राहिले आहे व त्यामुळे विषमता वाढते हे दिसून आल्यावर नियोजकांनी व शासनाने याकडे तातडतोब लक्ष पुरविले पाहिजे. शासनाचे लक्ष वेधण्याचा लोकशाही मार्ग म्हणजे संबंधितांनी संघटितरीत्या प्रश्नाचे महत्त्व व समस्येचे स्वरूप विशद करणे हा होय. हे आवश्यक कार्य आपण या परिषदेच्या द्वारा करीत आहा हे युक्त व अभिनंदनीय आहे.

## सार्वत्रिक व सर्वांगीण विकास आवश्यक

सद्यःस्थितीचे वरील निदान योग्य असल्यास आजवर झालेली उपेक्षा ही बुद्ध्या झालेली नसून प्रथम मर्यादित कार्यक्रम अपरिहार्यपणे स्वीकारल्यामुळे व तदनंतर त्याचे अनिष्ट परिणाम टाळण्याकरिता उपाययोजना न झाल्यामुळे हे घडले असे म्हणता येईल. पण मग यापुढे तरी प्रत्येक प्रदेशाच्या व व्यवहारक्षेत्राच्या विकासाकडे तपशीलवार लक्ष दिले पाहिजे असे नियोजकांनी व शासनाने मान्य करणे हे ओघाने आले. असे तपशीलवार लक्ष द्यावयाचे तर निदान दोन नवीन दिशांनी

विचार झाला पाहिजे. एकतर राज्याच्या विकास योजना बनविणे व प्रादेशिक योजनांकरिता साधनांचे व पैशाचे वाटप करणे, याविषयी निश्चित भूमिका व कार्यपद्धती स्वीकारल्या पाहिजेत. दुसरे असे की, जे प्रदेश अगर वर्ग विशेष उपेक्षित, मागास राहिले आहेत त्यांचा मागासलेपणा काढण्यास सुरुवातीस काही विशेष सवलती व प्रयत्न आवश्यक आहेत हे मान्य केले पाहिजे.

यांपैकी पहिल्या बाबीत काही प्रगती आधीच झाली आहे. भारतीय विकास योजना बनविणे, नियोजित विकासाच्या प्रयत्नांचे महत्त्व राष्ट्रास पटविणे, योजनांकरिता देशातून व परदेशांतून पैसा व साधने जमविणे या सर्वांची सुरुवात केंद्र सरकारने केली. यथाक्रम या उपक्रमांचे महत्त्व राज्य सरकारांस अधिकाधिक पटले आणि प्रत्येक राज्यात याबाबत स्वतंत्र विचार होऊ लागला. विकास योजनांबाबत विविध प्रकारच्या मागण्या पुढे आल्या व राज्याच्या परिस्थितीनुरूप योजना बनविण्यास जास्त अवसर हवा असे राज्य सरकारे प्रतिपादू लागली. हे सर्व इष्ट आहे व यास आपणांकडून शक्य तितका प्रतिसाद द्यावा अशी योजना आयोगाची विचारसरणी आहे. याच प्रक्रियेचा पुढचा टप्पा म्हणजे प्रदेशनिहाय व जिल्हानिहाय विकास योजनांबाबत मागण्या होणे हा होय. आपल्या लोकशाही समाजात हेही म्हणणे मान्य करणे क्रमप्राप्त आहे; आणि यापुढे अपरिहार्यपणे स्थानिक व प्रादेशिक संघटना व जनता यांचे महत्त्व व जबाबदारी वाढतील अशी कारवाई व्हावयास हवी.

महाराष्ट्रांत तरी ही भूमिका तत्वतः स्वीकारली गेली आहे. जिल्हा परिषदेच्या कायद्याप्रमाणे जिल्हा परिषदांना स्थानिक योजना बनविण्या-राबविण्याबाबत काही अधिकार दिले गेले आहेत; व प्रत्येक जिल्हा परिषदेत एक नियोजनाधिकाऱ्याची जागा काही वर्षांपूर्वीच निर्माण केली गेली. १९६६–७१ ची पंचवार्षिक योजना बनविण्याच्या वेळेस जुन्या पद्धतीप्रमाणे जिल्हा परिषदांनी काही कार्यक्रमांच्या याद्या बनविल्या, पण व्यवस्थित जिल्हा योजना बनविण्याच्या कार्यास त्यावेळेस सुरुवात झाली नाही. गेल्या वर्षात पुनश्च हालचाल सुरू झाली असून जिल्हानिहाय एका आराखड्यानुसार माहिती गोळा होत आहे असे कळते. या माहितीच्या आधारावर जिल्हा योजना तयार होतील. घडत आहे हे इष्ट दिशेनेच आहे. परंतु हे कार्य केवळ अधिकाऱ्यांपुरते मर्यादित न राहता त्यात जिल्हा परिषदा व सहकारी संस्था प्रामुख्याने भाग घेतील आणि याबाबत लोकांतही चर्चा व विचारविनिमय सुरू होईल अशी व्यवस्था झाली पाहिजे. आपल्या या परिषदेनंतर एखादी स्थायी समिती निर्माण करून कोकणच्या प्रत्येक जिल्ह्यात या प्रकरणी एखाद्या बिगर-सरकारी यंत्रणेकडून पंचवार्षिक योजना बनविण्यात कसा हातभार लावता येईल हे आपण पाहिले पाहिजे.

## केंद्रीय मदत-वाटपाचे सूत्र

प्रादेशिक अगर जिल्हा योजना बनविताना प्रामुख्याने दोन दृष्टींनी असा उपक्रम करावा लागेल. दूरगामी विचार करून या योजनेची चौकट कशी बनवावयाची हा एक विचार. दुसरा, हीस मूर्त स्वरूप देण्याकरिता आपणांस सर्व प्रकारची साधनसामग्री किती व कशी उभारता येईल हा आहे. साधनांपैकी प्रमुख भाग म्हणजे सरकारी योजनेतील तरतुदीचा प्रादेशिक हिस्सा. हा ठरविण्याकरिता नवीन पद्धतशीर विचार व्हावा लागेल व याबाबत आपले म्हणणे सरकारपुढे साधार मांडावे लागेल. १९६९–७४ सालच्या भारतीय पंचवार्षिक योजनेविषयी विचारविनिमय होत असता संघराज्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा निर्णय घेतला गेला. केंद्र सरकारने राज्य सरकारांस विकास योजनांकरिता जी मदत द्यावयाची तिची वाटणी कशी करावयाची याबाबतचा हा निर्णय होता. लोकसंख्या, दरडोई उत्पन्न अशा काही ठराविक बाबी जमेस धरून त्यांस तौलनिक महत्त्व देऊन ही वाटणी करावी असे राज्य मुख्यमंत्र्यांनी एकमताने ठरविले. या वाटाघाटींत मान्य झालेली दोन तत्त्वे राज्यांतील जिल्हावार

वाटणीतही उपयुक्त ठरावी. एक म्हणजे, बाहेरून आलेल्या मदतीची वाटणी निश्चित गमकानुसार केली तर तिची न्याय्यता पटविणे सुलभ होते. हा विचार प्रादेशिक अगर जिल्हानिहाय योजनांबाबतही ग्राह्य धरण्यास हरकत नसावी. मोठ्या व्यापक योजनांवरील राज्य सरकार प्रत्यक्ष करणारा खर्च बाजूस करून जिल्हानिहाय जो विकासखर्च वाटावयाचा तो अशा ठराविक पद्धतीने वाटल्याने जिल्हा योजना बनविण्याच्या कार्यात निश्चितता येईल. दुसरे तत्त्व, राज्यवार वाटणी करताना दरडोई उत्पन्न ही बाब स्वतंत्रपणे जमेस धरण्यात आली ते. ज्या राज्यांचे दरडोई सरासरी उत्पन्न राष्ट्रीय दरडोई उत्पन्नाच्या सरासरीपेक्षा कमी होते त्यांस केंद्रीय मदतीपैकी काही भाग खास निराळा काढून देण्यात आला. राज्यांच्या विकास-खर्चाची प्रादेशिक वाटणी होत असताना या निर्णयाकडे लक्ष वेधून गरीब जिल्ह्यांना काही अधिकांश मिळावा अशी मागणी करणे अयोग्य ठरू नये. आपल्या परिषदेने विधायक भूमिका पत्करून कोकण योजनेस किती कसे मिळावे याविषयी मागणी करण्याच्या दृष्टीने हे विचार थोडक्यात आपणांपुढे मांडले आहेत.

## कोकण मुंबईवर अवलंबून

कोकण विकास योजनेच्या चौकटीचा विचार करताना मुंबई शहराचा विचार मी फार महत्त्वाचा समजतो. मुंबई शहर व कोकण यांचे अन्योन्य संबंध फार निकटचे आहेत. भौगोलिक दृष्ट्या मुंबई शहर कोकणचाच भाग आहे आणि आकडेमोडीसाठी मुंबई धरून हिशेब केल्यास हा प्रदेश विकसित आहे असे सिद्ध करता येईल. प्रत्यक्षात, एखादा अवयव फार पुष्ट झाला म्हणजे इतर क्षीण व्हावेत तद्वत कोकणच्या इतर भागांची अवस्था मुंबईच्या फाजील वाढीमुळे झाल्यासारखी दिसते. उपजीविकेकरिता इतर ठिकाणी, मुख्यतः मुंबईस, निर्गमन करावे लागणे हा कोकणच्या आर्थिक व्यवस्थेचा पुरातन विशेष आहे. अशा निर्गमनामुळे अनेक वेळा प्रदेशाचा फायदा होऊ शकतो. पंजाब्यांची सतत लष्कर भरती होणे हे पंजाबच्या विकासाचे एक प्रमुख कारण समजले जाते. बाहेर गेलेल्यांनी परत आणलेली संपत्ती व कसब यांमुळे इतर अनेक प्रदेशांची आर्थिक प्रगती झाल्याची उदाहरणे आहेत. कोकणात मात्र असे न होता परावलंबित्व वाढतच गेलेले दिसते. यावर उपाययोजना दोही पक्षी झाली पाहिजे. एकतर मुंबईतील अर्थव्यवहार विकेंद्रित झाले पाहिजेत आणि दुसरे, कोकण प्रदेशाच्या आर्थिक विकासाकरिता कोकणवासीयांनी दीर्घकाळ प्रयत्न करण्याचा चंग बांधला पाहिजे.

## मुंबईची वाढ रोखणे आवश्यक

मुंबई शहर विकासाबाबत नव्याने काही न सांगता सुमारे तेरा वर्षांपूर्वी मी मुंबईतच केलेल्या एका अध्यक्षीय भाषणातील काही उतारे उद्धृत करतो.

"मुंबईची लोकसंख्या अधिक वाढू देणे अनिष्ट असे म्हणण्यात मुंबईकरांवर काही अन्याय होतो, त्यांचे अनहित होते असे मला वाटत नाही. उलट येथील लोकसंख्येची वाढ थांबवा, शक्य तितके रोजगार दुसरीकडे उपलब्ध करून ती कमी करा, असे केल्याने मुंबईकरांस राहण्याची जागा, वाहतूक इत्यादी सर्वबाबत जीवन जास्त सुसह्य होईल असे म्हणण्यात मुंबईकरांचे खरे हित पाहणेच आहे असे मी समजतो. मुंबईचे गोडवे कोणी कसेही गाइले तरी बहुसंख्यांकांच्या दृष्टीने तेथील आजचे जीवन मला लोभनीय दिसत नाही. हा प्रश्न केवळ महाराष्ट्रीयांचाच नाही. फार लांबचा पल्ला गाठून मुंबईत जे उत्तर प्रदेश, आंध्र इत्यादी राज्यांतील कामकरी मोठ्या संख्येने येतात, ते पोटाला मिळावे म्हणून येतात. विकेंद्रीकरणाच्या धोरणाने सर्व देशभर रोजगार उपलब्ध केले व त्यांना आपल्या घराजवळ, गावाजवळ काम मिळाले तर हे त्यांच्यावर अनुपकार खास नव्हत. अर्थात हे बहुजनांबद्दल झाले.

ज्यांची सत्ता व संपत्ती अर्थव्यवहार एके ठिकाणी केंद्रित करण्यावर अवलंबून आहे, त्यांना हे म्हणणे पटू नये, आपल्या हितविरोधी वाटावे हे साहजिकच आहे."

"यावर कोणी असे म्हणतील की, कितीही लोकसंख्या वाढो त्यांना आवश्यक अशा सोयी करता आल्या म्हणजे झाले. पण सर्व देशांतील आजवरचा अनुभव असा आहे की, एखाद्या ठिकाणची लोकसंख्या मर्यादेबाहेर वाढली म्हणजे राहण्याची व वाहतुकीची व्यवस्था प्रत्यक्ष करणे उत्तरोत्तर दुरापास्त होते व करता आली तरी ती अधिकाधिक खर्चाची होते. राहत्या जागेची व्यवस्था करण्यास मुंबईत व इतर मोठ्या शहरांत दरडोई विशेष जास्त खर्च येतो व वाहतुकीचा खर्च व दगदग ही व्यस्त प्रमाणात वाढत राहतात. मुंबईची परिस्थिती सर्व बाबतींत विशेषच प्रतिकूल आहे. पण सर्वसाधारणपणे हा नियम सगळीकडेच लागू आहे. लंडनमधील वाढ थांबवणे, तेथील धंदे शक्य तितके सभोवतालच्या नवीन नगरांत नेणे, सर्व देशभर नवीन नगरे स्थापणे व जुन्या शहरापेठांचे शक्य तेवढे पुनरुज्जीवन करणे या दिशेने पद्धतशीर सरकारी प्रयत्न इंग्लंडमध्ये आज वीस-पंचवीस वर्षे सतत चालू आहेत."

"मोठी शहरे फार मोठी होऊ नयेत म्हणून पुढारलेल्या देशांतही मान्य झालेल्या विचारांबाबतच एथवर विवेचन झाले. हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितीत दुसरे मुद्देही लक्षात घेण्याजोगे आहेत. आपला देश फार विस्तीर्ण आहे व लोकसंख्या फार मोठी आहे. गेल्या शंभर वर्षांत यात काही थोडेच नवीन उद्योगधंदे निघाले व बहुतेक नवीन अर्थव्यवहार काही थोड्या ठिकाणी केंद्रित झाले. हे सर्व ब्रिटिशांच्या धोरणामुळे झाले असे म्हणून आपण त्यांस दोषही दिला. पण स्वातंत्र्य प्राप्तीनंतर यात काहीएक फरक पडलेला नाही व अर्थव्यवहाराचे केंद्रीकरण वाढलेच असेल, काही कमी झाले नाही. पुढील विकास योजनांच्या दृष्टीने ही परिस्थिती फार चिंताजनक आहे. आधुनिक कालात, कोणत्याही देशात व्यवहारविकास सर्व भूभागावर सारखाच आढळत नाही. बहुतकरून काही केंद्रस्थानांभोवती विशेष विकसित क्षेत्रे आढळतात. नवीन उद्योगधंदे व व्यापार ज्यांत वाढत आहेत अशी जुनी अगर नवी लहान मोठी नागर केंद्रे प्रथम निर्माण होतात व त्यांच्या सान्निध्यामुळे सभोवतालच्या प्रदेशांतही आर्थिक व्यवहाराचा विस्तार होतो व त्यांत बदल घडून येतात. योजनापूर्वक व खास प्रयत्नाने विकास घडवून आणावयाचा, तर नवीन व्यवहाराची केंद्रस्थाने ज्यायोगे शक्य तितकी अधिक व सर्व देशभर निर्माण होतील अशी योजना व असे प्रयत्न झाले पाहिजेत. यासच मी अर्थव्यवहाराचे विकेंद्रीकरण म्हणतो."

"याच्या पुष्ट्यर्थ आणखी एक महत्त्वाचा मुद्दा सांगतो. आपल्या देशात नित्याची बेकारी अगर नैमित्तिक आपत्ती यांच्या निवारणार्थ, इतर अनेक देशांत असतात त्याप्रमाणे, लोककल्याण योजना जवळजवळ नाहीत; व कोणत्याही व्यापक योजना, ज्या बहुसंख्यांकांस लागू पडतील अशा हाती घेण्याची आपणांस ऐपतही नाही. तेव्हा काही विवक्षित भागांत अगर केंद्रांत व्यवहार वाढला तर त्याचा फायदा इतरांस बऱ्याच अंशी साहजिक मिळेल असे आपलेकडे घडत नाही. म्हणूनच आज काही भाग, विशेषतः नागर, सकृद्दर्शनी भरभराटीचे वाटले तर इतर अनेक अत्यंत निकृष्टावस्थेत आहेत. ही विषमावस्था कमी करण्याचा एकच उपाय म्हणजे आर्थिक विकास निरनिराळ्या प्रदेशांत ज्यायोगे सार्वत्रिक होईल असे धोरण स्वीकारणे. बुद्ध्या विकेंद्रीकरण करण्याखेरीज असे दुसरे धोरण नाही. आपली कुवत अल्प आहे. तेव्हा एका ठिकाणी खर्च केंद्रित झाला म्हणजे दुसरीकडे खर्चास काही उरत नाही. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत विकेंद्रीकरणाबद्दल पुष्कळ लिहूनही, राहत्या घरांची सोय करण्याबाबतचा जवळ जवळ सर्व खर्च मोठ्या शहरांतच करण्याची तरतूद केली आहे, यावरून वरील मुद्द्याचे महत्त्व लक्षात येईल. आज आपल्यापुढे उभ्या असलेल्या सर्व समस्यांत बेकारीची

समस्या अत्यंत अवघड आहे. आणि ही समस्या सोडविण्याचा प्रारंभ विकेंद्रीकरणाचे धोरण स्वीकारल्याशिवाय होणार नाही."

मुंबई शहरातील अर्थव्यवहाराचे खऱ्या अर्थाने विकेंद्रीकरण झाल्याखेरीज कोकणचा आर्थिक विकास होणे कठीण आहे. या माझ्या मताच्या स्पष्टीकरणार्थ या जुन्या विवेचनाची थोडी उजळणी येथे केली.

या परिषदेमार्फत आपण कोणत्या मागण्या कराव्या यासंबंधात मला काही सांगावयाचे नाही. परंतु परिषदेनंतर जे कार्य हाती घेतले पाहिजे त्याविषयी एक-दोन विचार मी आपणांपुढे मांडतो. विधायकरीत्या कोकण विकास समस्यांचा सतत पाठपुरावा आपणांस करावयाचा असल्यास दीर्घकालीन विचारांबरोबर पुढील पाच-दहा वर्षांबद्दलचा विचारही महत्त्वाचा मानावा लागेल. उदाहरणार्थ, मुंबई-मंगळूर लोहमार्गाची मागणी करीत असताच कोकणच्या वाहतुकीच्या साधनांची समस्या तातड-तोबीने कशी सोडविता येईल याचाही विचार व्हावयास हवा. याकरिता प्रामुख्याने राज्य सरकारच्या अधिकार क्षेत्रातील रस्ते व छोटी बंदरे यांच्या वाढीची समग्र प्रदेशाच्या दृष्टीने सुसूत्र योजना कशी असावी याच्या तपशिलाकडे लक्ष द्यावयास हवे. तसेच मोठ्या प्रकल्पावर सर्व लक्ष केंद्रित न करिता सर्व प्रदेशाच्या दृष्टीने महत्त्वाची व अनेक दशके अत्यंत उपेक्षित अशी डोंगर-पठारे व जंगले यांचे संरक्षण व जोपासना यांच्या दीर्घकालीन योजनांचाही खोलवर विचार प्रस्तुत असावा.

## कोकणवासीयांचे प्रयत्न आवश्यक

शेवटी एक माझ्या मते महत्त्वाचा विचार आपणांपुढे मांडतो. कोकण प्रदेशाची उपेक्षा झाली हे सत्य आहे. पण ही उपेक्षा इतर कोणापेक्षा कोकणवासीयांनीच अधिक केली असे अनेक वेळा वाटते. कोणत्याही प्रदेशाचा विकास होतो तो प्रमुखत्वे बाहेरून काही आले अगर कोणी केले म्हणून होत नाही. ज्या त्या प्रदेशातील नैसर्गिक संपत्ती व परंपरागत ज्ञान व कसब यांच्या साहाय्याने तद्देशीयांनीच प्रयत्न केले म्हणजे कोणताही प्रदेश संपन्न होतो, एरवी नाही. पंजाब आज पुढारलेला समजला जातो. काही दृष्ट्या तेथील परिस्थिती आर्थिक विकासास अनुकूल आहे हे खरे, पण पंजाब्यांची जिद्द व उद्यमशीलता यांचा वाटाही फार मोठा आहे.

बाहेरून एखादा मोठा प्रकल्प आला तरी स्थानिक समाजाची ऊर्जितावस्था होतेच असे नाही. रांची सारख्या ठिकाणी मोठे मोठे कारखाने असून भोवतालच्या प्रदेशातील समाज निकृष्टावस्थेतच आहे. या संदर्भात महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्याचे अलीकडील उदाहरण देता येईल. येथे खाजगी साखर कारखाने १९२० नंतर एकामागून एक बरेच निघाले. पण तेथील सर्वांगीण आर्थिक-सामाजिक विकासाच्या पर्वास स्थानिक शेतकऱ्यांनी सहकारी कारखाने काढले तेव्हापासूनच सुरुवात झाली. म्हणून केंद्र सरकार, राज्य सरकार या सर्वांकडे मागण्या करण्याबरोबरच कोकण विकासात कोकणवासीयांचा वाटा काय, तो ते कसा उचलणार, त्याकरिता आज अस्तित्वात असलेल्या स्थानिक संस्थांचा कसा उपयोग करणार, नवीन कोणत्या संस्थांमार्फत कोणते उपक्रम हाती घेणार, या सर्वांचे धुरीणत्व, चालकत्व पत्करण्यास मनुष्यबळ कसे उभे करणार याचाही विचार महत्त्वाचा समजावा. त्यास अग्रहक्क द्यावा.

कोकण परिषद, मुंबई, उद्घाटनाचे भाषण, ३०-११-१९६९ (टंकमुद्रित)

☆

# विभाग : ४

## सहकारी
## अर्थव्यवहार

# १ . . सहकारी चळवळीचे समालोचन

महाराष्ट्र सहकारी परिषदेचे यापूर्वीचे अधिवेशन बरेच वर्षांपूर्वी झाले असल्यामुळे सहकारी चळवळीच्या अलीकडील इतिहासाचा प्रथम आढावा घेणे हे आवश्यक आहे. मी आपल्या भाषणात या बाबतीत फार तपशीलवार विचार करणार नाही. सहकारी चळवळीच्या सर्वांगीण प्रगतीचे अगदी अलीकडील जिल्हावार आकडे प्रसिद्ध झाले नसल्यामुळे महाराष्ट्राबाबत असे काही निराळे आकडेसिद्ध सांगणे शक्य नाही. थोड्याच महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या नानावटी समितीच्या अहवालाच्या परिशिष्टांत काही जिल्हावार आकडे दिले आहेत, ते १९४५-४६ सालाचे आहेत. हे जिल्हावार आकडे जिल्हा मध्यवर्ती बँका, प्राथमिक मॉर्टगेज बँका व खरेदी-विक्री संघ यांबाबतचे आहेत. प्राथमिक पतपेढ्यांबाबत जिल्हावार फोड या परिशिष्टांत दिलेली नाही. तरी, मुंबई प्रांतातील निरनिराळ्या भागांची परिस्थिती फारशी भिन्न नाही, असे मानल्यास नानावटी समितीच्या पाचव्या परिशिष्टात प्राथमिक पतपेढ्यांबाबत दिलेल्या आकड्यां-वरून काही ठोकळ विधाने करता येतील. लढाईचे काळात प्राथमिक पतपेढ्यांची संख्या, त्यांच्या सभासदांची संख्या, पेढ्यांचे स्वतःचे भांडवल, त्यांची प्रतिवार्षिक कर्जवसुली या सर्वांत वाढ झाली असून थकबाकी पुष्कळ अंशी कमी झाली आहे. ही सर्वच प्रगतीची चिन्हे समजली पाहिजेत. याबरोबरच सबंध कालखंडाचा विचार करता सभासदांच्या ठेवींच्या रकमेत काही वाढ झालेली नाही हे लक्षात घेण्याजोगे आहे. हे आकडे आणि मला उपलब्ध असलेली इतर आकडेवार माहिती यांवरून प्रगतीबाबत अभिप्राय द्यावयाचा तर तो असा:—युद्धकाळाचा पतपेढ्यांरीवल मुख्य परिणाम म्हणजे थकबाकी पुष्कळ वसूल होऊन पतपेढ्यांचे कार्य बरेच सुरळीतपणे चालण्याची शक्यता निर्माण झाली. तसेच सरासरीने पाहता दर सभासदावरील कर्जाचा बोजा काहीसा कमी झाला. मात्र हे कर्ज कमी होण्याचे सरासरी प्रमाण अल्पच आहे व ते सगळीकडे सारखेच कमी झालेले नाही, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. कर्जाची रकम सर्वत्र कमी झाली नसली तरी आज तरी कर्जाचा बोजा सर्वांवरीलच पूर्वीच्या मानाने पुष्कळ उतरला आहे. याचे कारण एकंदर किंमतवाढ. जोपावेतो चालू शेतीमालाच्या किमती किफायतशीर आहेत तोपावेतो आजचा शेतकऱ्यावरील बोजा सर्वसाधारण वाढलेल्या किमतींच्या मानाने दहा वर्षांपूर्वीपेक्षा फार कमी झाला आहे हे निर्विवाद आहे. मात्र घटनेची दुसरी बाजू म्हणून पुढील विचार येथेच मांडला पाहिजे. शेतकऱ्याने काढलेल्या कर्जाच्या रकमेत वाढ झाली नाही याचा अर्थ त्यास तितकीशी कर्जाची वस्तुतः नड नाही असा दिसतो. पूर्वीप्रमाणे कर्जाची नड लागू लागली म्हणजे खर्च सगळेच फार वाढल्यामुळे या कर्जाची रकम पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने जास्त होईल. आवक व जावक दोन्ही आकडे सारखेच फुगीर असल्यास वाढत्या रकमेच्या कर्जाची परतफेड शेतकरी करू शकेल. परंतु आवक घटण्याचा, एकदम किमती उतरल्यामुळे,

जर प्रसंग आला तर मात्र एकंदर चक्राचे परिभ्रमण पुरे झाल्यावर शेतकऱ्याचे कर्ज त्याच्या परतफेडीच्या ऐपतीच्या मानाने जादा झालेले दिसेल; म्हणजे युद्धपूर्वकालीन परिस्थितीच पुन्हा प्राप्त होईल. या भविष्यातील संभाव्य घडामोडीकडे लक्ष वेधण्याचे कारण हे की, यथाक्रम प्राप्त होऊ पाहणाऱ्या मंदीच्या दिवसांकरिता काहीही तरतूद सहकारी मंडळ्यांच्या सभासदांनी करून ठेवलेली दिसत नाही. शेतकऱ्यास युद्धकालात इतर म्हणतात तितका फायदाच झाला नाही म्हणा, अगर त्या फायद्याचा उपयोग त्याने योग्य रीतीने करून घेतला नाही म्हणा, युद्धकालातील तेजीच्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे आर्थिक सामर्थ्य बरेच वाढले आहे असे सहकारी पतपेढ्यांबाबतचे अगर इतर कोणतेच आकडे दर्शवीत नाहीत.

## प्रगतीचा आढावा

प्राथमिक पतपेढ्यांचा कारभार युद्धकालात फार वाढला नसला तरी एकंदर जास्त सुस्थितीत आला. प्राथमिक मॉर्टगेज बँकांचा व्यवहार याच काळात इतका रोडावला की काही जिल्ह्यांत त्या चालू ठेवण्याचे प्रयोजनच काय, असा प्रश्न उद्भवला. खरेदी-विक्री संघांनी मात्र गेल्या दहा वर्षांत फार मोठी प्रगती करून दाखविली. सकृद्दर्शनी याबाबतचे आकडे फार समाधानकारक वाटतात. पण ही सर्व वाढ नियंत्रित व्यवहार व सरकारी पुरस्कार यांमुळे झाली आहे, हे आपणा सर्वांस पक्के माहीत आहे; व आज नियंत्रणे उठल्यामुळे या खरेदी-विक्री संघ व्यवस्थेचे पुढे काय होणार याच्या विवंचनेत आपण सर्वजण आहो. तेव्हा हे आकडे भविष्यकालीन परिस्थिती अजमावण्यास उपयोगी नाहीत हे उघड आहे. याचबरोबर या आकड्यांवरून जी एक गोष्ट सिद्ध झाली आहे तिजकडे सहकारी कार्यकर्त्यांनी सर्व जनतेचे प्रामुख्याने लक्ष वेधणे जरूर आहे. अनुकूल परिस्थिती व उचित सरकारी पाठिंबा मिळाला असता, सहकारी संस्था, वाहतूक व व्यापार (घाऊक-किरकोळ) फार मोठ्या प्रमाणावर थोड्या अवधीत हाती घेऊ शकतात. पद्धतशीर, नियंत्रित व्यापारी व्यवहारांत सहकारी संस्थांस प्रगती फार लवकर करता येते, एवढेच नव्हे तर असल्या परिस्थितीत त्यांचे कार्य खाजगी व्यवहारांपेक्षा जास्त चोख व कमी खर्चिक होऊ शकते. अर्थात हे शेवटचे विधान सिद्ध करण्यास आकडे लगेच देता येणार नाहीत. पण ज्यांना युद्धकालीन व्यवहाराचा दोन्ही पक्षी अनुभव आहे ते त्रयस्थदेखील हे विधान चटकन मान्य करतील एवढी याची बाजू बळकट आहे. शिवाय सहकारी संस्थांचा व्यवहार आणखी थोडा अवधी व स्वस्थपणा मिळाला तर याहूनही पुष्कळपणे सुधारून दाखविणे सोपे आहे, असे यातील सर्व अनुभविक सांगू शकतील.

गेल्या काही वर्षांचा आढावा घेताना सहकारी संस्थांच्या प्रगतीबरोबर काही सहकारी कायद्यांचा विचार करणेही जरूर आहे. मुख्यतः दोन कायदे सहकारी व्यवहारांशी विशेष निगडित आहेत. पहिला ऋणविमोचन कायदा अमलात येऊन जरी बरीच वर्षे झाली तरी तो अलीकडेच सगळीकडे लागू करणेत आला आहे. सहकारी पतपेढ्यांनी सभासदांस दिलेल्या कर्जांवर या कायद्याचा विशेष परिणाम होईल अशी अपेक्षा नाही. तसेच सहकारी पतपेढ्यांच्या ज्या सभासदांनी ऋणविमोचन कायद्याखाली अर्ज केलेले नाहीत त्यांच्या नित्याच्या व्यवहारांतही काही फरक होत नाही. परंतु अनेक सभासदांनी व बिगरसभासद शेतकऱ्यांनी या कायद्याखाली अर्ज केलेले असून यांचा कायम निकाल होण्यास बराच अवधी लागण्याचा संभव आहे. अर्जदारांच्या अर्जांचा निकाल लागल्यावर त्यांची पत काय राहील व त्यांस कर्जे कोठून व कधी मिळतील याचा अजून स्पष्ट विचार करणे शक्य नाही. आजचा मुख्य प्रश्न संक्रमणावस्थेचा आहे. या संक्रमणावस्थेत कर्जदारांस जमीन तारण लावता येत नाही, तेव्हा त्यांची पैशाची गरज भागविण्याची निराळी योजना करण्यास हवी. या योजनेत सहकारी संस्थांनी प्रामुख्याने

भाग घ्यावा अशी सरकारची अपेक्षा आहे. ऋणविमोचन कायद्याचे दूरवर परिणाम काय होतील ते होवोत; या कायद्याच्या अमलामुळे तात्काळ शेतकरी सावकारी व्यवहारांत तंगी निर्माण झाली असून ती निवारण्याचा प्रयत्न करणे सरकारदृष्ट्या अत्यावश्यक आहे. या प्रयत्नांत सहकारी संस्थांस मदत करून आपले कार्यक्षेत्र पुष्कळच वाढविण्याची शक्यता आहे. तसेच हे करीत असता काही नवीन प्रकारची व्यवहार—पद्धतीही स्वीकारावी लागेल. यामधून उद्‌भवलेले प्रश्न आज फार महत्त्वाचे होऊन बसले आहेत.

सावकारी नियंत्रण कायदा, ऋणविमोचन कायद्याहूनही जास्त महत्त्वाचा समजला पाहिजे. या कायद्यामुळे खाजगी सावकारीवर बऱ्याच प्रकारची नियंत्रणे घातली गेली आहेत. या सर्व नियंत्रणांचा येथे विचार करण्याची जरूरी नाही. सहकारी संस्थांचे दृष्टीने महत्त्वाचे नियंत्रण व्याजाच्या दराबद्दलचे. याचे परिणाम दोन प्रकारचे आहेत. प्रत्यक्ष परिणाम सहकारी पतपेढ्यांच्या व्याजांच्या दराबाबतचा. सरकारी नियंत्रण कायद्यातील दरांहून अधिक दर सहकारी कर्जाचे पडत नाहीत याबाबत आपण खबरदारी घेणे अर्थात आवश्यक आहे. हे करण्याकरिता आपणांस पुढे मागे सरकारी मदतही कदाचित मागावी लागेल; आजच परिस्थिती तशी आली नाही, त्यामुळे प्रत्यक्ष परिणाम फार महत्त्वाचा नाही. अप्रत्यक्ष परिणाम खाजगी सावकारीचा व्याप व तिचे भविष्यातील स्वरूप याबाबतचा. सरकारने कायद्यात घातलेले व्याजाचे दर हे इतके कमी आहेत की यापुढे कायदेशीररीत्या चाललेल्या सावकारी व्यवहाराचे क्षेत्र महाराष्ट्रात तरी फार संकुचित होईल याबद्दल मला खात्री वाटते. तेव्हा यापुढे सावकारी काळाबाजार माजून कायद्यामुळे शेतकऱ्यांचा फायद्याऐवजी तोटा होण्याचाच संभव अधिक. हा परिणाम टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे खाजगी सावकारांऐवजी कोणत्यातरी संस्थेमार्फत शेतकऱ्यास आपल्या ऐपतीप्रमाणे कर्ज मिळण्याची व्यवस्था तावडतोब झाली पाहिजे. सहकारी संस्थांवर होणारा हा सावकारी नियंत्रण कायद्याचा अप्रत्यक्ष परिणाम आहे. आता सहकारी संस्थांस आपले क्षेत्र वाढविण्याची मोठी संधी चालून आली आहे, एवढेच नव्हे तर सहकारी व्यवहार सार्वत्रिक होऊ शकतो किंवा नाही हे पुढील दोन तीन वर्षांत कायद्यांनी निर्माण केलेल्या परिस्थितीमुळे प्रत्यक्ष अजमावलेच जाणार आहे.

## सहकारी चळवळीच्या पुनर्घटनेची गरज

सहकारी संस्थांपुढील काही महत्त्वाच्या प्रश्नांचा विचार करण्यास उपयोग व्हावा म्हणून सद्यःस्थितीचे वरील त्रोटक वर्णन केले आहे. सहकारी चळवळीची आजची परिस्थिती फारशी समाधानकारक नाही. तिची पुनर्घटना झाली पाहिजे हेही आज सर्वमान्य आहे. तसेच ही पुनर्घटना योजनापूर्वक झाली पाहिजे असे सर्व म्हणतात. या प्रांताचे आजचे सहकार-मंत्री ना० वैकुंठलाल मेहता यांनी सहकारी चळवळीच्या नियोजनाबद्दल आग्रहाची व मुद्देसूद मागणी पुणे येथेच एका जाहीर व्याख्यानात जवळजवळ सहा वर्षांपूर्वी केली. अलीकडच्या काळात आपल्या देशात या मागणीस सर्वत्र दुजोरा मिळाला आहे, एवढेच नव्हे तर एका सरकारी समितीकडून पुढील योजनेचा आराखडाही तयार करण्यात आला आहे. सहकारी प्रगतीच्या सर्व योजनांत एक अडचण सुरुवातीसच भासते. सहकारी संघटना ही स्वेच्छेने सहकार्य करणाऱ्यांची संघटना. त्यात सक्तीचा लेशही नाही हे मूलतत्त्व. या तत्त्वानुसार वागायचे तर ठराविक काळात अमुक क्षेत्रांत इतक्या नवीन सहकारी संस्था अस्तित्वात आल्या पाहिजेत किंवा प्रस्तुत संस्थांची निश्चित मर्यादेनुसार प्रगती झालीच पाहिजे असे जरी म्हटले तरी ते घडवून कसे आणावयाचे? नियोजन व सहकारी चळवळीचे सनातन तत्त्व यांतील विसंगती कोणाच्याही लक्षात येण्यासारखी ढोबळ आहे.

हिंदुस्थानातील सहकारी परिषदांनी इकडे नेहमी लक्ष दिलेच असे मात्र नाही. बऱ्याच परिषदांतून नियोजनपूर्वक प्रगतीची मागणी आणि अंतर्गत सक्ती व बाह्य मार्गदर्शन व नियंत्रण यांपासून सहकारी चळवळीची अलिप्तता या सर्वच मुद्द्यांवर निरनिराळ्या ठरावांतून भर दिलेला आढळतो. अर्थात, परिषदांस हा प्रश्न जरी टाळता आला तरी सहकारी प्रगतीची योजना करण्यास नेमलेल्या समितीस तो डावलणे शक्य नव्हते. तेव्हा या समितीचे (सरैय्या समिती) अहवालात याचे निराकरण करण्याचा अल्पसा प्रयत्न झाला आहे. कोणासही सहकारी संस्थेचे सभासद होण्यास भाग पाडू नये या तत्त्वाची समितीने पुनर्घोषणा केली आहे. परंतु काही सरकारी सवलती अगर मदत सहकारी संस्थेचे सभासद झाल्याशिवाय न मिळाव्या अशा अप्रत्यक्ष सक्तीच्या योजनेस समितीची आडकाठी नाही. याखेरीज नियोजित प्रगती करण्यास शिक्षण आणि प्रचार हीच मुख्य साधने असा अभिप्राय आहे. शिक्षण व प्रचार यांवर समितीची भिस्त किती व अप्रत्यक्ष सक्तीवर किती हे स्पष्ट कळणे कठीण आहे. परंतु नियंत्रित आर्थिक व्यवहार हे समितीचे एक गृहीत प्रमेय असल्यामुळे अप्रत्यक्ष सक्तीने बराच कार्यभाग होईल असे समितीस वाटले असण्याचा संभव आहे. या प्रश्नाचा विचार आणखी पुढे करण्यात येईल. येथे सहकारी चळवळीची नियोजित प्रगती निश्चित कशी साधावयाची याचे धडसे उत्तर सरैय्या समिती, नानावटी समिती इत्यादी सरकारी समित्यांनी दिले नाही एवढेच नमूद केलेले पुरे.

नियोजित पुनर्घटनेत निश्चित प्रगती किती व कशी होईल हे स्पष्ट नसले तरी पुनर्घटनेच्या एकंदर उद्दिष्टाबद्दल बरीच एकवाक्यता आढळून येते. सहकार्याचा अवलंब केल्याने आर्थिक प्रगती लोकशाहीच्या मार्गास अनुसरून साधता येईल असाच सर्वांचा अभिप्राय आणि हेच मुख्य उद्दिष्ट. अर्थात हा फार व्यापक विचार झाला. प्रत्यक्ष कार्यकर्त्यांस याहून बऱ्याच तपशिलात शिरणे आवश्यक आहे. सहकारी चळवळ सर्वव्यापी असल्यामुळे सर्वच तपशिलाचा मर्यादित अवधीत विचार करणे शक्य नाही, तरी मी आज आपणांपुढील निकडीच्या अशा दोन तीन मुद्द्यांकडे लक्ष देण्याचे योजिले आहे. नागर प्रश्नांकडे दुर्लक्ष करून शेतकी व शेतकरी यांशी निगडित असलेल्या प्रश्नांचाच मी आज सावकारी व्यवहार व व्यापारी व्यवहार या दोन दृष्टींनी विचार करणार आहे. शेतकीच्या सावकारी व्यवहाराबाबतच्या सद्यःस्थितीचे मी थोडक्यात दिग्दर्शन वर केले आहे. गेल्या काही वर्षांच्या विशिष्ट परिस्थितीमुळे शेतकऱ्यास कर्जाची नड पूर्वीइतकी तात्पुरती तरी राहिली नाही हे खरे असले तरी, आजची गरज भागविणे व पुढील संभाव्य वाढत्या गरजांची तरतूद करणे हे क्रमाक्रमाने जास्त अवघड व महाग होत आहे हेही तितकेच उघड आहे. या स्थितीस सरकारी कायदेच बहुतांशी कारणीभूत आहेत. हे कायदे मूलतः वाईट नव्हेत, किंबहुना अशा प्रकारच्या कायद्यांच्या जरूरीबद्दल दुमत जवळजवळ नाहीच. परंतु हे कायदे स्वयंपूर्ण नसून एकंदर पुनर्घटना योजनेचा तो एक भाग आहे व पुनर्घटना योजना समग्र हाती घेतल्याशिवाय केवळ कायद्यांच्या अंमलबजावणीचा फायदा होण्याऐवजी दुष्परिणामच अधिक घडण्याचा संभव आहे. जुन्या कर्जाची हप्तेबंदी करून खाजगी सावकारीवर नियंत्रण घालण्याच्या वेळेसच शेतकऱ्यास आवश्यक व योग्य कर्ज मिळण्याची तरतूद न केल्यास त्यास पुन्हा जुन्या सावकारांचा आसरा पाहावा लागणार, पण तो मिळणे बिकट होणार. खाजगी सावकारीची जागा सहकारी पेढीने घ्यावी हे उद्दिष्ट पुढे ठेवून आपली चळवळ आज ३०–४० वर्षे सुरू आहे; या दिशेने थोडीबहुत प्रगतीही झाली आहे. परंतु नवीन कायद्यांचा अंमल सार्वत्रिक सुरू झाल्यानंतर कोणाही व कोठल्याही शेतकऱ्यास त्याच्या पतीप्रमाणे आवश्यक रक्कम सुलभतेने मिळू शकेल इतकी प्रगती सहकारी चळवळीची खास झालेली नाही. यामुळे शेतकऱ्याच्या सावकारी व्यवहाराबद्दलचा प्रस्तुतचा मुख्य प्रश्न उद्या खाजगी सावकाराचे उच्चाटन केले असता, त्याची जागा

कोण घेणार हाच आहे. खाजगी सावकाराचे पूर्णतया उच्चाटन न करिता त्याचे व्यवहार खरोखर नियंत्रित व व्यवस्थित करावयाचे म्हटले तरी हाच मुख्य प्रश्न उभा राहतो. प्रत्येक शेतकऱ्यास खाजगी सावकाराचे ऐवजी सरकार, निमसरकारी संस्था किंवा सहकारी व्यवस्था यांपैकी कोणाचा तरी आधार निश्चित असल्याशिवाय सावकारी नियंत्रण कायद्याची अंमलबजावणी देखील नीट होऊ शकत नाही हा आजचा अनुभव आहे. आज शेतकरी अनन्यगतिक आहे. सावकाराशिवाय त्यास गत्यंतर नाही. ऋणविमोचन कायदा, सावकारी नियंत्रण कायदा हे अमलात आणण्याच्या वेळेस, किंबहुना त्याचे आधीच, या अडचणीचे निराकरण करणे सरकारचे कर्तव्य ठरते. या परिस्थितीत सहकारी संस्थेची जबाबदारी काय हा आपल्यापुढील प्रश्न आहे.

## दोन पर्याय

येथे दोन पर्याय संभवतात. सहकारी संस्थांची कार्यपद्धती व प्रगतीची दिशा ही पूर्वापार ठरलेली आहेत. यांत विशेष बदल केला असता सहकारी तत्त्वांची हानी होण्याचा संभव फार, त्याअर्थी प्राप्त परिस्थितीत सहकारी संस्थांची संख्या व कार्यक्षेत्र वाढविण्याचा जरी निकराने प्रयत्न झाला, तरी निश्चित सार्वत्रिक कर्ज वाटपाची योजना सरकारने स्वतंत्र अलग योजनेनुसार करणेच इष्ट; इतकी मोठी व भानगडीची जबाबदारी सहकारी संस्थांनी घेऊ नये. हा एक विचार झाला. दुसरा विचार असा की, सहकारी संस्था त्यांतल्या त्यांत पुष्कळ फैलावलेल्या, त्यांची कार्यपद्धती शेतकऱ्यांस बरीच परिचित, त्यांत कार्यकर्ते अनेक, एकंदर व्यवस्था अल्पखर्चिक, व पूर्ण सरकारी योजनेपेक्षा पुष्कळच जास्त लोकशाहीस पोषक. म्हणून ही सरकारवर पडलेली जबाबदारी सहकारी संस्थांनीच पार पाडण्याचे काम पत्करावे हे देशहितदृष्ट्या श्रेयस्कर. अर्थात हे होणे म्हणजे बरीच सरकारी मदत आवश्यक, तसेच काम सार्वत्रिक व निश्चित करावयाचे तर काही मार्गदर्शन व नियंत्रण पत्करून सहकारी तत्त्वांस मुरड घालणे अपरिहार्य.

याबाबत कोणता मार्ग पत्करावा हे मुंबई प्रांतातील सहकारी कार्यकर्त्यांनी गतवर्षीच ठरविले. एखादी सहकारी संस्था शेतकऱ्यास पैसा पुरविण्याचे कार्य जितके करील तितके करण्याची सहकारी संस्थांची तयारी असून या प्रीत्यर्थ सहकारी संस्था–विशेषतः बँका–यांची पुनर्घटना किती व कशी करावी हे सरकारने एक समिती नेमून निश्चित करावे असा मु. प्रां. स. बँकांच्या मंडळाने ठराव केला. या ठरावानुसार सरकारने सर मणीलाल नानावटी यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व या समितीचा अहवाल काही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झाला आहे. नानावटी समितीची मूलभूत शिफारस मुं. प्रां. स. बँकेस मध्यवर्ती मानून पुढील व्यवस्था व कारभार करावा अशी आहे. सहकारी मंडळाचे कार्य व प्रगती, सहकारी मंडळ्या व जिल्हा बँकांचे संबंध, जिल्हा बँकांची कार्यपद्धती व विस्तार या सर्व बाबी प्रांतिक सहकारी बँकेचे अधिकारक्षेत्रात आल्या म्हणजेच इष्ट कार्य घडून येईल असा या समितीचा अभिप्राय आहे. या नवीन धोरणानुसार प्रांतातील सहकारी संस्थांची पुनर्व्यवस्था करताना ज्या अनेक घडामोडी क्रमप्राप्त आहेत त्यांचा सांगोपांग तपशीलवार विचार नानावटी समितीने दुर्दैवाने केला नाही. यामुळे नवीन जबाबदारी पत्करावयाची म्हणजे आपल्या सद्यःस्थितीत काय फरक करावा लागेल याची स्पष्ट कल्पना समितीचे कार्य चालले असता किंवा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतरही जिल्हा बँका, अगर प्रां. बँक यांस आली नाही. या सर्व गोष्टींची आवश्यकता, नानावटी समितीच्या शिफारसींच्या विचाराप्रीत्यर्थ सहकारी मंत्र्यांनी प्रां. बँकेच्या प्रतिनिधींशी वाटाघाटी सुरू झाल्यावरच पटली व आज सहकारी बँकांवरच पुनर्घटनेची तपशीलवार योजना करण्याचा प्रसंग आला आहे. या योजनेचा एक मसुदा सर्व बँकांकडे विचारार्थ पाठविलेला असून आपल्या परिषदेत त्याचा

सागोपांग विचार होईल अशी माझी अपेक्षा आहे. माझ्या प्रास्ताविक भाषणात या योजनेचा खल करणे मी अप्रस्तुत मानतो. मात्र परिषदेत विचार करीत असता तो कोणत्या दृष्टीने मुख्यतः करणे आवश्यक आहे, या विषयीचे माझे मत येथे नमूद करणे अयोग्य नाही. सनातन सहकारी तत्त्वे व निरनिराळ्या सहकारी संस्थांचे अधिकारस्वातंत्र्य एवढ्याच भूमिकांवरून आपणांस या प्रश्नाकडे पाहणे शक्य नाही. सरकारी अगर निम-सरकारी स्वतंत्र शेतकी बँक काढण्याऐवजी सहकारी संस्थांमार्फत हे कार्य करावे असे म्हटले म्हणजे त्यातूनच यथाक्रम बिगर सभासदांशी व्यवहार, ठराविक योजने-प्रमाणे प्रगती, निरनिराळ्या श्रेणीच्या सहकारी संस्थांच्या परस्पर संबंधांचे स्पष्टीकरण व दृढीकरण, प्रांतिक बँकेचे मध्यवर्ती स्थान, सरकारचे मार्गदर्शन व नियंत्रण या सर्व गोष्टी आल्या. अर्थात कार्याच्या दृष्टीने यांतील कोणत्या बाबी कितपत आवश्यक व अनावश्यक याचा तपशीलवार विचार करणे योग्यच. परंतु सरकारने कार्य तर आमच्याकडे सोपवावे, आम्ही मात्र पुनर्व्यवस्था करण्यास अगर नियंत्रण पत्करण्यास तयार नाही ही, अगर तपशिलाचा विचार आज कशाला, जसा प्रश्न उद्भवेल तसे पाहून घेऊ ही, यांपैकी कोणतीच भूमिका आपणास पत्करणे शक्य नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

## सहकारी कर्ज-पुरवठ्याचे प्रश्न

सहकारी संस्थांची अंतर्व्यवस्था व परस्पर संबंध यांबद्दल जरी काही बोललो नाही तरी त्यांच्या व्यवहार-पद्धतीबाबत एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे मी आपले लक्ष वेधणार आहे. सहकारी सावकारी व्यवहार परस्पर साहाय्यावर अवलंबून असून शेतकऱ्याच्या जिंदगीपेक्षा त्याच्या पतीवर तो चालतो ही मांडणी जुनी आहे. यास अनुसरून कर्ज जमिनीच्या तारणावर दिले असता सहकारी तत्त्वास सोडून व्यवहार होत आहे अशी टीका करण्याचा प्रघात पडला आहे. जोपावेतो वाद शाब्दिक होता तोपावेतो त्याकडे लक्ष देण्याचे विशेष कारण नव्हते. जिंदगी पत्रकांकडे उघड लक्ष दिले अगर न दिले तरी अंती जमिनीवरच दृष्टी सर्वांची राहात होती. बरेच वर्षेपावेतो सर्व प्रकारच्या मुदतीची कर्जेही एकाच संस्थेकडून दिली जात असल्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात तात्त्विक वादामुळे काही अडथळा उत्पन्न होत नव्हता. परंतु अलीकडील दहापंधरा वर्षांत लांब मुदतीची कर्जे जमिनीच्या तारणावर देण्याकरिता अगदी वेगळ्या सहकारी बँका काढण्यात आल्या आहेत व दिवसेदिवस सामान्य सोसायट्या व बँका यांचा व्यवहार छोट्या मुदतीचा व जमिनीवरील बोजावर अवलंबून नसलेला असा असण्याबद्दल आग्रह वाढला आहे. मुंबई प्रांतात ह्यातच ऋणविमोचन कायद्याने निर्माण केलेल्या परिस्थितीची भर पडली आहे. या कायद्याखाली अर्ज केलेल्यास अर्जाचा कायम निकाल लागेपावेतो जमिनीवर बोजा उत्पन्न करिता येत नाही व नवीन कर्ज केवळ पतीवर अगर पिकावर बोजा ठेवूनच काढावे लागणार. पीक-कर्जाचा नवा प्रकार आता सहकारी चळवळीत रूढ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे व त्याबाबत सरकार व सहकारी खाते यांजकडून जोराने प्रचार चालू आहे. पीक-कर्जाचा अनुभव फार अल्पकालीन आहे. काही जिल्ह्यांत या कर्जांची रकम मोठी आहे तर काहींत अजून लहान आहे. तेव्हा याबाबत आजच निर्विवाद मत बनविणे कठीण आहे. हे जरी खरे, तरी याबाबत बरेच सहकारी कार्यकर्ते ज्या शंका काढतात त्यांकडे लक्ष देणे जरूर आहे. ज्या कर्जास जमिनीचे तारण काही अंशी होते अशांचीही वसुली अलीकडची काही वर्षे सोडल्यास समाधानकारक होत नसे. थोडे दुर्लक्ष झाले तरी थकबाकी वाढे व मंदीच्या काळात अगर लवादात बरीच प्रकरणे गेल्यास जिंदगी भरपूर असूनही सोसायट्यांचा कारभार जवळ जवळ स्थगित होई. या अनुभवाकडे पाहता पीक-कर्जाच्या वसुलीबाबत सहकारी मंडळ्यांच्या चालकांस भीती वाटल्यास नवल नाही. सालोसाल पूर्ण वसुली होण्यावरच पीक-कर्जाची पद्धती चालू राहण्याची शक्यता. सालोसाल पूर्ण वसुली महाराष्ट्रातील शेतकीत

कितपत शक्य आहे? अर्थात पीक-कर्जाची मर्यादा फार आखूड ठेवली तर गोष्ट निराळी, पण साधारण गरजेपुरते कर्ज दिल्यास पिकांची पैदास व पिकांचे भाव हे दोन्ही जेथे अनिश्चित तेथे इच्छा असताही फेड करण्याची ऐपत व शक्यता दरवर्षी असेलच असे म्हणवत नाही. आणि एकदा पीक–कर्ज थकले म्हणजे सर्वच अनवस्था प्रसंग. तसेच पीक-कर्जाच्या सदरात घातलेल्या सर्वच बाबी एका सालात पूर्णपणे उत्पादक होऊन परतफेडीचे सामर्थ्य वाढवतील अशा नाहीत. बी, अगर खताबाबत केलेला हंगामी पिकावरचा खर्च सालाचे आत परत निघावयास पाहिजे हे खरे. पण ज्या शेतीचे उत्पन्न वर्षाहून अधिक काळात निघते तिजबाबत अडचण होणार. तसेच बैल, आउते अशा बाबींकरिता कर्ज काढल्यास ते एका वर्षाच्या उत्पन्नातून कसे फेडणार? जोपावेतो सावकार व सहकारी मंडळी या दोन्ही मिळूनच शेतकऱ्याची गरज भागते असे मानले जात होते तोपावेतो हा तपशिलाचा विचार फार महत्त्वाचा नव्हता. पण सर्व गरज सोसायटीमार्फत भागावयाची म्हटल्यास तपशील अवश्य पाहिला पाहिजे. मोठ्या प्रमाणावर, सुरक्षित बाजारभावांवर लक्ष ठेवून, एक किफायतशीर व्यवसाय म्हणून जेथे शेती चालते तेथे कर्जाची थोड्या मुदतीत व्यवस्थित उलाढाल होईल असे धरता येते. पण जेथे दरसाल तर नव्हेच पण लांब मुदतीवरही जेमतेम तोंडमिळवणी होते तेथे इतक्या वक्तशीर व्यवहारावर अवलंबित असलेली पद्धती कितपत टिकेल याची शंका वाटते. महाराष्ट्रासारख्या अनिश्चित शेतीच्या प्रदेशात जमीन अगर ती कसण्याचा हक्क यांवरच शेतकऱ्याची पत अंती आधारलेली असावयाची. अशा परिस्थितीत निरनिराळ्या मुदतीची कर्जे व त्यांच्या निरनिराळ्या पद्धतीच्या परतफेडीच्या योजना असा पोकळ डोलारा उभारणे माझ्या मते अयोग्य आहे.

एकाच पद्धतीच्या संस्थांमार्फत शेतकऱ्यांस लागणारी सर्व सरकारची कर्जे पुरवून वाईट सालांत वसुली निश्चित घटणार हे लक्षात धरूनच परतफेडीचा अंदाज बांधावा. निरनिराळ्या संस्थांत विभागलेला व्यवहार अशा प्रकारे होवू शकणार नाही. हल्लीच्या पद्धतीने परिणामी शेतकऱ्याचे नुकसानच होईल असे माझे मत आहे. ज्या प्रदेशांत जमीनमहसुलाच्या पद्धतीतही सूट व तहकुबीचे महत्त्व फार मानले जाते, तेथे पीक–कर्जाच्या वसुलीत वेळोवेळी निदान तहकुबी द्यावी लागेल हे गृहीत धरणे प्राप्तच आहे.

## कर्जवसुली

पीक–कर्जाचा विचार केला म्हणजे सावकारी व व्यापारी व्यवहाराची सांगड घालण्याचा प्रश्न साहजिकच उद्भवतो. पीक–कर्जाची वसुली बहुतांशी ही सांगड नीट घालण्यावर अवलंबून आहे. छोट्या प्रमाणावर मुसार मालाचे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याच्या मालविक्रीवर देखरेख ठेवणे फार कठीण व त्याच्या पीक–कर्जाची वसुली—विशेषतः यातच बैलाकरिता लागणाऱ्या कर्जाचा समावेश झाला असल्यास—केव्हाही काहीशी दुरापास्तच होणार. पण जेथे पीक किफायतशीर, भरपूर व सुरक्षित तेथे सुद्धा कर्जवसुलीची सोय मालविक्रीमधून परस्पर होणे हेच आजकालच्या अनुभवावरून श्रेयस्कर समजले जाते. केवळ सहकारी सावकारीची वाढ होऊन तादृश काही फायदा नाही; त्याचे जोडीस खरेदी–विक्रीचा व्यवहारही वाढला पाहिजे हा सिद्धांत फार जुना आहे. या सिद्धांताची अलीकडील सुधारलेली मांडणी म्हणजे सहकारी चळवळीची ही दोन्ही अंगे सारखीच वाढून भागणार नाही तर ती परस्परावलंबी व एकमेकांस प्रत्यक्ष पूरक आहेत अशीही योजना झाली पाहिजे. ही मांडणी अलीकडील सर्व समित्यांचे अहवाल, परिषदांचे ठराव इत्यादिकांतून समावेशलेली आढळते. हा सिद्धांत सर्वमान्य झाला आहे एवढेच नव्हे तर युद्धकाळात त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी मोठ्या प्रमाणात अनेक प्रांतांतून झाली आहे, असे वारंवार म्हणण्यात येते. मद्रास प्रांतातील प्रगती

विशेष उल्लेखनीय समजली जाते; नुसते आकडे पाहिले तर मुंबई प्रांतातील वाढही भरीव वाटते. आज आपणांस मान्य सिद्धांत अगर गत वाढीचे आकडे यांजकडे पाहावयाचे नसून ही उभारणी भक्कम पायावर झाली आहे किंवा नाही इकडे लक्ष द्यावयाचे आहे. सुरवातीस दर्शविल्याप्रमाणे सहकारी खरेदी-विक्री व्यवहाराची आजची वाढ सहकारी मदत व नियंत्रित व्यवहार यांमुळे केवळ घडून आली. ही मदत व हा व्यवहार निदान काही वर्षे असा टिकेल व तोवर या नवीन संस्था आपले पाय मजबूत रोवू शकतील असा सहकारी कार्यकर्ते व अधिकारी यांचा समज होता. हा समज निराधार ठरला आहे व दोन महिन्यांत परिस्थितीत कल्पनातीत बदल होऊन या सहकारी संस्था आज उघड्या पडल्या आहेत. यांना कसे व कितपत सावरता येईल याचा भरपूर ऊहापोह आपल्या परिषदेत होईलच. या प्रयत्नाच्या ठळक मर्यादा मी थोडक्यात दर्शविणार आहे. मर्यादा दोन प्रकारच्या मानता येतील. एकतर संस्थांचे आजचे बळ काय व दुसरे आजची परिस्थिती त्यास कितपत अनुकूल आहे. संस्था फार दुबळ्या असल्यास नवीन घटनेत परिस्थिती साधारण अनुकूल असूनही त्यांची फारशी प्रगती व्हावयाची नाही. पण या मुद्यावर मला काही म्हणावयाचे नाही. नवीन परिस्थिती मूलतः या संस्थांना कितपत मानवेल ही बाब खरी महत्त्वाची आहे. ही नवी परिस्थिती सरकारच्या पालटलेल्या धोरणाने निर्माण झाली आहे. नियंत्रित व्यवहार सोडून अनिर्बंध व्यवहाराचे तत्त्व निदान व्यापाराचे बाबतीत हिंदुस्थान सरकारने स्वीकारले आहे. व्यापारी नियंत्रण फारसे प्रांतिक सरकारच्या कक्षेत येत नसल्यामुळे प्रांतिक सरकारला ही व्यापारी नियंत्रणे काढणे भाग पडले आहे. अर्थात ही गोष्ट काही प्रांतिक सरकारांनी काहीशी नाखुषीने केली असेल, परंतु सर्व प्रांतिक सरकारांनी साकल्याने विचार करून नवीन धोरण मान्य केले आहे असे म्हणणे आज प्राप्त आहे. कारण प्रश्न अत्यंत महत्त्वाचा, सर्व आर्थिक जीवनाच्या रचनेचा असूनही, कोणी प्रांतिक मंत्री सेवानिवृत्त झाले नाहीत.

## सरैय्या समितीचा अभिप्राय

नियंत्रित व्यवहार व नियोजित आर्थिक प्रगती यांचे अन्योन्यसंबंध निकटचे आहेत व सहकारी संस्थांचा स्वखुषीच्या व्यवहारावर कटाक्ष असला तरीही सहकारी प्रगती व नियोजित अर्थव्यवस्था परस्परविरोधी नाहीत असेच प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांचे मत आहे. भांडवलशाहीतील खुल्या व्यवहाराबद्दल सार्वराष्ट्रीय सहकारी चळवळीचे मत सार्वराष्ट्रीय सहकारी समितीच्या अहवालातील खालील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल. "स्वातंत्र्याच्या सबबीखाली राष्ट्रीय किंवा सार्वराष्ट्रीय व्यवहाराची मुख्य सूत्रे मोठ्या भांडवलदारांच्या हाती देण्यास सहकारी कार्यकर्त्यांचा विरोध आहे. तसेच ज्या मोठ्या भांडवलदारांचे उद्दिष्ट खाजगी नफा आहे त्यांचा व्यवहार व केवळ जनसेवेसाठी निर्माण झालेल्या लहानमोठ्या सहकारी संस्था यांचा व्यवहार या दोहोंमधील मूलभूत फरकाची दखल सरकारी धोरणात घेतलेली जेव्हा दिसत नाही तेव्हा याचे त्यांना सखेदाश्चर्य वाटते." (I. L. O. : Co-operative Movement and Present-Day Problems 1945, पृ. १८७) आपल्या दृष्टीने याहूनही महत्त्वाचा अभिप्राय सरैय्या समितीचा. आपल्या अहवालाच्या पहिल्या प्रकरणात सरैय्या समितीने सहकारी संस्थांच्या यशस्वितेला आवश्यक पार्श्वभूमी कल्पिली आहे. सहकारी चळवळीच्या वाढीस अनुकूल परिस्थितीची तीन लक्षणे समितीने सांगितली आहेत. एक लोकशाही सरकार आणि दुसरे शैक्षणिक प्रगती; पण सर्वांहून महत्त्वाचे, विशेष विस्ताराने व आग्रहाने मांडलेले तिसरे लक्षण, अनिर्बंध व्यवहारांचा शेवट व शेतीमालाच्या किमती इत्यादींबाबत सरकारचा सक्रिय पाठिंबा. सरैय्या समितीचा याविषयीचा परिच्छेद आजच्या परिस्थितीत इतका महत्त्वाचा आहे की, त्याचे समग्र भाषांतर मी येथे उद्धृत करितो.

" हिंदुस्थान सरकारने आजवर अवलंबिलेल्या व हिंदुस्थानच्या राहाणीचे मान वाढविण्यास असमर्थ ठरलेल्या खुल्या व्यापाराच्या धोरणाचा शेवट झाल्याखेरीज नियोजन शक्य नाही. म्हणजेच सरकारने शिक्षण, वाहतूक, आरोग्य, शेती, उद्योगधंदे इत्यादी क्षेत्रांत व्यापक प्रमाणावर कार्य हाती घ्यावयास हवे. आजच्या परिस्थितीत खाजगी व्यक्तींना मोठ्या प्रमाणावर आर्थिक व औद्योगिक योजना हाती घेण्यात बराच धोका पत्करावा लागत असल्याने केवळ त्यावरच अवलंबून राहून चालणार नाही. सहकारी संघटनेचा अर्थच हा की पत्करावयाचा धोका व जबाबदारी विभागणीच्या पद्धतीने कमी करणे. परंतु हे करण्याची संघटकाची शक्ती बरीच मर्यादित आहे. म्हणून आर्थिक व्यवहारात खाजगी व्यक्तींना पत्करावा लागणारा धोका, त्यांना सहज अंगावर घेता येईल इतका कमी करणे हे सरकारचे कर्तव्य आहे व यासाठी सरकारने आर्थिक प्रश्नांत लक्ष घालून आवश्यक ते उपाय योजले पाहिजेत. उत्पादनाच्या सर्वच क्षेत्रांत धोका आहे हे खरे, परंतु शेतीत तर त्याचे प्रमाण विशेष जास्त असते. याला अनेक कारणे आहेत. पावसाचा भरवसा नाही, उत्पादन मागणीनुसार चटकन् कमीजास्त करिता येत नाही, लहान प्रमाणावर शेती करणाऱ्यांची फार मोठी संख्या, व बाजारभावांतील विलक्षण चढउतार. शिवाय शेती उत्पादनाच्या बाजारभावांतील चढउतारीचा एकंदर देशाच्या आर्थिक जीवनावर फार मोठा परिणाम होतो. कारण सत्तर टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्येच्या उत्पन्नावर व त्यामुळे बहुतेक सर्व वस्तूंच्या मागणीवर यांचा परिणाम होतो. राहणीच्या मानावर व कच्च्या मालाच्या किमतीवर होणाऱ्या या चढउताराच्या परिणामांमुळे औद्योगिक उत्पादनाच्या किमतींनाही झळ लागल्याशिवाय रहात नाही. शेती उत्पादनाच्या किमतीत मंदी झाल्यास शेतकऱ्यांची परिस्थिती विशेषच वाईट होते. जर पुढील काही वर्षांत येणारी मंदी टाळावयाची असेल, एकंदर आर्थिक व्यवहारात स्थैर्य आणावयाचे असेल, उत्पादन, व्यापार व शेतीच्या मालाच्या रूपांतरांतील व्यवहारांत पत्करान्या लागणाऱ्या धोक्याचे प्रमाण सह्य करावयाचे असेल व सहकारी चळवळीने खाजगी उद्योगधंद्यांशी चढाओढीत टिकून राहावयाचे असेल तर, सरकारने शेतकरी व गिऱ्हाईक या दोहोंनाही न्याय्य वाटेल अशा ठराविक प्रमाणातच शेतकी उत्पादनाच्या बाजारभावांत चढउतार होतील यासाठी कसून प्रयत्न केला पाहिजे. सहकारी चळवळीचे यश झपाट्याने आर्थिक प्रगती करण्याकरिता सरकारने स्वीकारलेल्या धोरणावरच अवलंबून राहील." (पृ. ६–७)

आजची निर्माण झालेली परिस्थिती भयावह आहे असे वारंवार आग्रहाने मी का म्हणत असतो हे वरील उताऱ्यात केलेल्या समर्पक विवेचनावरून स्पष्ट लक्षात येईल. सहकारी संस्था रुजण्यास व व वाढण्यास जो निवारा पाहिजे तो आता पूर्णपणे नाहीसा झाला आहे. आर्थिक तेजीमंदीच्या झंझावातात आपण तगून राहू ही आशा फोल आहे. त्यातल्या त्यात महाराष्ट्रासारख्या उजाड मुलखात तिला काहीच धर नाही. गुजराथेसारख्या नजीकच्या प्रदेशाशी तुलना केली असताही आपली आजची परिस्थिती फार खराब आहे असे आढळून येईल. शेती असुरक्षित व अल्प फायद्याची, शेतकरी अज्ञानी व गैरहिशेबी, मुळची फुटीर वृत्ती, त्यातच सावकार व व्यापारी आमच्या समाजाशी समरस न झालेले आणि म्हणून विशेष आक्रमक, अशा परिस्थितीत खरेदी-विक्री संघ टिकून राहतील, शेतीमालाचा व्यापार सहकारी संस्थांच्या हाती जो थोडाबहुत आला आहे तो कायम राहील हे संभवत नाही.

## अनिर्बंध व्यवहार सहकारास मारक

अनिर्बंध व्यवहारात केवढे मोठे धोके निर्माण होतात हे आजच्या गुळाच्या उदाहरणावरून दिसतच आहे. आमच्या सरकारला दिव्य दृष्टी प्राप्त होऊन त्यांनी लेखणीच्या फटकाऱ्यासरशी

व्यवहार खुला केला; पण त्याबरोबर खुला व्यवहार साधारण नीट चालण्यासही जी परिस्थिती आवश्यक आहे ती निर्माण करणे त्यांस साध्य झाले नाही. पेठेत माल येऊ लागला पण त्याचा उठाव नाही. सर्व कोठारे भरली तरी परगावी पाठविण्याची सोय काहीच नाही. किमती दोन आठवड्यांत भलतीकडे उतरल्या व माल मातीमोल झाला तरी त्याबद्दल दाद नाही. ही परिस्थिती अपवादात्मक मानावयाची नाही. ही भविष्यातील नित्याची होण्याचाच धोका आहे. खुल्या व्यापारात दोन पैसे मिळाल्यामुळे तात्कालिक बरे वाटत असणाऱ्यांनी गुळाच्या शेतकऱ्याची सद्यःस्थिती जरूर लक्षात आणावी. अर्थात परिस्थितीचा धोका खाजगी व्यापारी व सहकारी संस्था या दोहोंस सारखाच आहे हे खरे, परंतु खाजगी व्यापाऱ्यास उपलब्ध असलेले भांडवल व मार्ग सहकारी संस्थांस उपलब्ध नाहीत. आणि खरा महत्त्वाचा विचार म्हणजे व्यवस्था कोणती शाश्वत राहणार याबाबतचा. खाजगी व्यापारी धोका पत्करून व्यक्तिशः कोणी बुडले अगर तरले तरी व्यवस्था खाजगी व्यवहाराचीच राहते व जितका धोका अधिक तितकी अडत्याची दलाली अधिक या न्यायाने धोका पत्करणाऱ्या भांडवलदार व व्यापाऱ्यांच्या हाती दिवसेंदिवस जास्त संपत्तीचा व सत्तेचा संचय होतो. याच्या उलट न्याय सहकारी संस्थांस लागू असतो. त्यांच्यापैकी डोके वर काढू पाहत असलेल्या एका दोघांची जरी पीछेहाट झाली तरी परिणाम सर्वांवरच होतो. सहकारी संस्था काढणे व चालविणे हे मूलतःच अनिर्बंध व्यवहारी समाजात धारेविरुद्ध पोहण्यासारखे आहे. त्यांतच लाटा मोठ्या, भोवरे अनेक, हिंस्र जलचरांची गर्दी म्हणजे पैलतीर गाठणारा भाग्यवानच समजावयाचा.

शेतमालाचा व्यापार सहकारी संस्थांच्या हाती आला नाही अगर राहिला नाही म्हणजे त्याचा परिणाम सावकारी व्यवहारावरही खचित होणार. पीक-कर्जे तर राहोतच पण पूर्वीचा सावकारी व्यवहारही पूर्वीइतका टिकून राहणे शक्य नाही. म्हणजे जुन्या काळाप्रमाणेच तेजीचा फायदा अशाश्वत, आळवावरील पाण्याप्रमाणे; मंदीच्या वेळचा बुडता पाय मात्र दर खेपेस जास्त खोल जाणार अशी स्थिती राहणार. यातच नवीन कायद्यांच्या परिणामांची भर. आजचेच धोरण कायम राहिल्यास आणखी चार पाच वर्षांत मराठी शेतकऱ्याच्या वरचा कर्जाचा बोजा १९३५-३६ सालइतकाच निदान पूर्ववत झाला आहे व तो जमिनीवरचे हक्क अधिकाधिक गमावून स्वतःच्याच राज्यात (!) परका ठरू पाहत आहे असे घडून आल्यास मला तरी बिलकुल आश्चर्य वाटणार नाही.

असो, विवेचन लांबविण्याचे कारण नाही. माझ्या मते आजच्या परिस्थितीत सहकारी उत्पादक व व्यापारी संस्थांचा व्यवहार टिकून राहणे दुरापास्त आहे. अर्थात सहकारी सावकारी व सहकारी व्यापार यांची फलदायी सांगड घालून सर्व सहकारी संस्था शाश्वत पायावर उभारणे हेही अशक्य. ब्रिटिश अमदानी असो की स्वराज्य येवो अनिर्बंध व्यवहाराचे तत्त्वज्ञान राज्यकर्त्यांस सारखेच मानवते, आणि म्हणून आमच्या सहकारी संस्था या राष्ट्रीय व्यवस्थेचा गाभा नसून पूर्वीप्रमाणेच एका दिखाऊ चळवळीचे अंग आहेत असेच मानले पाहिजे. माझा सूर फाजील निराशेचा आहे असे आपणांपैकी बरेच जणांस वाटेल हे मी जाणतो. मी आपणाकडून आग्रह व अत्युक्ती ही दोन्ही टाळण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे.

## नियंत्रणाविना तरणोपाय नाही

• आजचे हल्लीचे सरकारी धोरण कायम आहे तोपावेतो सहकारी संस्थांची पायाशुद्ध उभारणी अशक्य व त्यांच्याकडून शाश्वत कार्य काही होणार नाही हा वरील विवेचनाचा निष्कर्ष आहे. यामुळे सहकारी पुनर्घटनेचा व नियोजनाचा विचार करण्याच्या ऐवजी त्यांसाठी लागणारी आवश्यक पूर्वस्थिती अस्तित्वात आणणे हाच खरा महत्त्वाचा प्रश्न ठरतो. माझे भाषण संपविण्यापूर्वी सरकारी धोरण कसे

बदलले पाहिजे व सहकारी नियोजनाच्या एकंदर प्रश्नाबद्दल आपली दृष्टी काय असावी याबद्दलची माझी मते मी थोडक्यात आपणांपुढे मांडणार आहे. अनिर्बंध व्यवहार ही प्रकृती व नियंत्रण ही विकृती हे सरकारी धोरणाचे आजचे सूत्र दिसते. सरैय्या समितीने या धोरणाचा स्पष्टपणे निषेध केला आहे, तसाच सर्व सहकारी कार्यकर्त्यांनी तो केला पाहिजे. तसेच सहकारी संस्था व खाजगी व्यापारी व भांडवलदार यांच्या व्यवहारांतील खरा फरक सरकारने ओळखून तो आपल्या धोरणात ठळक रीतीने दाखविला पाहिजे, याचीही आपण आग्रहाने मागणी केली पाहिजे. या सर्वसाधारण बाबी झाल्या. यापुढे जाऊन महाराष्ट्रातील सहकारी संस्थांच्या दृष्टीने सरकारी धोरणाचा मूळ पाया कसा बसवावा याबद्दलही आपण विचार केला पाहिजे. शेतीमालाच्या किमतीस स्थैर्य लाभावे व व्यापारी पद्धतीमुळे शेतकरी लुबाडला जाऊ नये हे उद्दिष्ट कोणासही पटेल. हे महाराष्ट्रापुरते साधण्याचा एकच मार्ग म्हणजे शेतीमालाचा घाऊक व्यापार, त्याचा साठा व त्यावरील प्राथमिक क्रिया यांचे राष्ट्रीयीकरण, असे माझे मत पूर्ण विचारांती बनले आहे. राष्ट्रीयीकरण हा शब्द खाजगी नफ्यासाठी होत असलेल्या व्यवहाराचे पूर्ण उच्चाटन होऊन विवक्षित क्षेत्रांतील सर्व व्यवहार समाज-नियंत्रणाखाली येणे या क्रियेस उद्देशून मी वापरीत आहे. या दृष्टीने युद्धकाळात अनेक प्रकारच्या व्यापारांचे व व्यवहारांचे राष्ट्रीयीकरण झाले होते. राष्ट्रीयीकरण सर्वांशी सहकारी संस्थांच्या साहाय्याने होणे शक्य आहे, एवढेच नव्हे तर इष्टही आहे. शेतीमालाच्या भावांत वारंवार अगर मोठा फेरबदल न होऊ देणे हे सरकारचे आद्य कर्तव्य समजल्यास शेतीमालाची खरेदी, साठा, रूपांतर व पुढे क्रमाने शेतीमालाची कमी-अधिक विक्री यांची जबाबदारी सरकारवर येते. ही जबाबदारी पार पाडण्यास सहकारी संस्था हे एकच प्रभावी व समाजहितपोषक साधन आहे. सरकारने घालून दिलेल्या किमतीच्या मर्यादेत सहकारी संस्थांनी सर्व शेतमालाची खरेदी करावी, सरकारी साहाय्याने बांधलेल्या कोठारांत या मालाचा आवश्यक संचय इष्ट काळापर्यंत करावा, ज्या कच्च्या मालाचे काही रूपांतर आवश्यक आहे ते यंत्रसाहाय्याने किंवा इतर मार्गाने घडवून आणावे आणि यथाक्रम त्याच्या विक्रीची व्यवस्था करावी. यांपैकी कोणत्याच व्यवहारात खाजगी व्यापाऱ्याचा शिरकाव होणे अत्यंत अनिष्ट आहे. शेतीमालाच्या व्यापारातील खाजगी नफेबाजीचे स्थान हेच माझ्या मते मराठी शेतकऱ्यांचे दारिद्र्य व विघटना यांचे खरे कारण आहे. शेतमालाच्या किमतींची हंगामातील घट व तो पूर्णपणे व्यापाऱ्यांच्या हातांत गेल्यावर भावांत होणारी मोठी वाढ हे वार्षिक चक्र खाजगी व्यापाऱ्यास जोपर्यंत या व्यवहारात स्थान आहे तोपर्यंत थांबणार नाही. एका विवक्षित कालातच सर्व शेतीमाल बाजारात येतो याचा अनिष्ट परिणाम घालविण्यास मालकोठारांची तरतूद झाली पाहिजे. परंतु ही मालकोठारे सरकारच्या किंवा सहकारी संस्थांच्या ताब्यात राहिली तरच या योजनेचा खरा फायदा शेतकऱ्यांस होईल. नाहीतर इतर सरकारी योजनांप्रमाणे त्यामुळे खाजगी व्यापाऱ्यांचाच नफा जास्त वाढेल. हल्ली मुंबई सरकारतर्फे जी कोठार-योजना पुढे मांडण्यात आली आहे त्यातील याबाबतचे धोरण अनिश्चित व गुळमुळीत वाटते. नवीन सर्व कोठारे सरकारी मदतीने बांधण्यात येऊन ती सर्व सहकारी संस्थांचे ताब्यात देण्यात येतील व एखादे वेळेस सहकारी संस्था उपलब्ध नसल्यास त्यांची व्यवस्था सरकारमार्फत होईल असे स्पष्ट धोरण सरकारने स्वीकारणे अत्यावश्यक आहे. हाच न्याय शेतीमालाचे रूपांतर करणाऱ्या अनेक व्यवसायांना लागतो. सडणे, दळणे, फोडणे इत्यादी अनेक क्रिया करणाऱ्या व्यावसायिकांचे स्थान शेतीच्या अर्थव्यवस्थेत फार महत्त्वाचे होऊन बसले आहे. काही अंशी कोठारी व व्यापारी या दोहोंची भूमिका हे स्वीकारतात. अनेक टापूंत व व्यवसायांत याची संख्या विशेष वाढलेली असूनही एकमेकांशी संगनमत करून यंत्रसामग्री बंद ठेवून आपली उत्पन्ने हे फाजील वाढवितात अशी यांजबद्दल तक्रार आहे. याबाबतही सहकारी संस्था कार्यक्षम बनू शकतात, परंतु अनिर्बंध व्यवहारांत त्यांना डोके

वर काढणे दुरापास्त आहे हाच आजवरचा अनुभव आहे. कोठारे व शेतीमालाचे रूपांतर करणारे कारखाने यांची संख्या व स्थलनिश्चिती या गोष्टी बहुतांशी पिकांचे क्षेत्रांवर अवलंबून असतात. पिकांच्या क्षेत्रांबद्दलची परिस्थिती वारंवार बदलणारी नसते; यामुळे यांची तरतूद व वाढ ही खाजगी व्यक्तींच्या हाती न ठेवता ती नियोजित करणे हेच सोय व खर्च या दोन्ही दृष्टींनी योग्य आहे. एवंच, अडाणी व गरीब शेतकऱ्यास धूर्त व संपन्न खाजगी व्यावसायिकांच्या कचाट्यातून सोडविणे व वाहतूक व यांत्रिक साधनांचा यथायोग्य उपयोग होणे या दोन्ही दृष्टींनी या सर्व क्षेत्रांचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे. ज्यावेळीं हा साधा व शुद्ध विचार राज्यकर्त्यांस पटेल तेव्हाच आपल्या समाजास स्थैर्य लाभेल व सहकारी संस्थांचे कार्य भरीव होईल व टिकून राहील.

सरकारच्या धोरणात याप्रमाणे बदल घडवून आणण्याची खटपट करीत असतानाच सरकारी नियोजन कार्यक्रमात सहकारी संस्थांचे स्थान काय हेही आपण स्पष्ट केले पाहिजे. याबाबत सहकारी कार्यकर्त्यांची भूमिका अजून सुस्पष्ट नाही हे मी वर दाखविलेच आहे. नियोजित व्यवस्थेत कार्य करावयाचे तर विवक्षित कार्यपद्धती व निश्चित केलेले इष्टांक गाठण्याची तयारी व जबाबदारी आपणांस पत्करली पाहिजे. बिगर सभासदांशी व्यवहार करणे व सभासद नावापुरते करून घेणे इत्यादी गोष्टी आपण आधीच करू लागलो आहो. पण याहीपलीकडे जाऊन बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या कार्याच्या अंतिम उद्दिष्टांबद्दलच्या कल्पनाही आपण नव्या मांडल्या पाहिजेत. अगदी थोडे का होईना पण पूर्णपणे स्वतंत्र व स्वेच्छेने घडून आलेले कामच खरे महत्त्वाचे या जुन्या कल्पनेचा त्याग करून, सबंध समाजाचे परिवर्तन—आर्थिक व नैतिक—घडवून आणण्यात मोठा भाग उचलण्याची आज केवढी निकड आहे, याची जाणीव आपण दाखविली पाहिजे. आज सोवळी वृत्ती सोडून, व्यापक व लोकसंग्राहक दृष्टी स्वीकारणे अगत्याचे आहे. प्रत्येक संस्थेने आपल्या क्षेत्रापुरते पाहून आपला स्वयंभूपणा टिकविण्याचा अट्टाहास न धरिता सहकारी संस्थांची सर्व व्यवस्थाच जास्त बळकट व कार्यक्षम कशी होईल इकडे लक्ष दिले पाहिजे. कोणत्याही कार्यांत आपणांकडे माणसांची वाण फार भासते. तेव्हा नियोजित आर्थिक प्रगतीचे कार्य सरकारी, निमसरकारी अगर सहकारी कोणत्याही मार्गाने होवो, जी मूठभर अनुभविक माणसे दर टापूत आहेत त्यांनीच त्याचा भार उचलला पाहिजे. हे कार्य शक्य तितके सहकारी मार्गांने होणे इष्ट अशी आमची श्रद्धा आहे, विश्वास आहे. सहकारी कार्यकर्त्यांनी आपण होऊन त्यात मोठा भाग उचलला तर नियोजनास योग्य वळण लागेल हेही उघड आहे. तेव्हा लोकशाहीच्या व सहकारी कार्यपद्धतीच्या तत्त्वांबाबत आग्रह धरूनही आर्थिक नियोजनाचे साच्यात बसविण्यास आवश्यक इतका त्यांत बदल करण्याची तयारी दर्शविली पाहिजे. केवळ जुन्या सहकारी मांडणीच्या आग्रहास्तव आर्थिक प्रगतीचा सर्वमान्य मार्ग सोडणे शक्य किंवा इष्ट नाही. तेव्हा संकुचित वृत्तीने, सोवळेपणाने अगर स्वतःच्या संस्थेच्या स्वायत्ततेबद्दलच्या आग्रहाने आपण यावेळेस बाजूस राहिलो तर घरी गंगा येऊनही तीत स्नान न करण्याचे करंटेपण आपण पत्करू. असा अविचार महाराष्ट्रातील सहकारी कार्यकर्त्यांचे हातून होणार नाही याबद्दल मला भरवसा वाटतो. सरकारने योग्य ते धोरण स्वीकारले, महाराष्ट्र—जीवनाचा गाभा जो मराठी शेतकरी त्याच्या निश्चित, नियोजित उन्नतीची योजना आखली म्हणजे सर्व पूर्वग्रह व संकुचित हितसंबंधांच्या कल्पना सोडून देऊन ही योजना यशस्वी करण्याकरता महाराष्ट्रातील सहकारी कार्यकर्ते अहोरात्र झटण्यास उत्सुक आहेत अशी ग्वाही या परिषदेच्या कार्याने सर्वांस मिळो, अशी इच्छा प्रकट करून मी आपले भाषण संपवितो.

महाराष्ट्र विभाग सहकारी परिषद, पुणे, अध्यक्षीय भाषण, १७-१-१९४८ (पुणे, १९४८)

☆

# २ . . लोणी येथील सहकारी साखर कारखाना

**प्रश्न :** लोणी[1] येथील सहकारी साखर कारखान्याचा प्रारंभ कसा झाला?

**उत्तर :** १९४५ च्या अखेरीला उसाच्या शेतकऱ्यांचा सहकारी तत्त्वावर चाललेला कारखाना काढण्याचा संकल्प करण्यात आला. १९४७ मध्ये भांडवल गोळा करण्यास सुरुवात झाली व १९४९ मध्ये सहकारी मंडळ्यांच्या कायद्यान्वये ऊस-शेतकऱ्यांची आमची सोसायटी नोंदण्यात आली व सहकारी साखर कारखान्याचा संकल्प केल्यापासून बरोबर पाच वर्षांनी ३१ डिसेंबर १९५० ला शुभ्र दाणेदार साखर तयार होण्याला प्रारंभ झाला. १९५०–५१ च्या हंगामामध्ये सभासदांचा एकूण ७६६ एकर ऊस साखर करण्याच्या कामी उपयोगी पडला. या क्षेत्रात ३२४७९ टन ऊस मिळाला व एकरी उसाचे सरासरी पीक ४२·४ टन मिळाले.

**प्रश्न :** सोसायटीच्या सभासदांखेरीज इतरांचा ऊस तुम्ही घेतला की नाही?

**उत्तर :** प्रथमतः सभासदांचा ऊस घेऊन शक्य झाल्यास कारखान्याच्या टापूतील इतर शेतकऱ्यांचाही ऊस घेण्याचा आमचा मानस आहे. परंतु १९५०–५१ हे पहिलेच वर्ष होते. यंत्रउभारणी होऊन ऊस गाळावयास प्रारंभ उशिरा झाला; म्हणून बाहेरचा ऊस फारसा घेणे शक्य झाले नाही. सभासदांचाच सर्व ऊस घेता येतो की नाही याचीच शंका होती! तरीही कारखान्याच्या जवळपासच्या भागातील एकर-अर्धा एकरवाल्या लहान शेतकऱ्यांचा व एंजिन बिघाडामुळे वा अन्यकारणामुळे ज्या इतरांचा ऊस वाळून चालला होता अशा २० बिगरसभासदांचा ५७६ टन ऊस आम्ही गाळला. ३३०५५ टन उसापासून ३७५०१ पोती साखर मिळाली. जास्तीत जास्त 'रिकव्हरी' १२·०२ टक्के व सरासरी ११·४९ टक्के मिळाली.

**प्रश्न :** आपला कारखाना उसाच्या शेतकऱ्यांचा हे खरे; परंतु लहानमोठ्या सर्वच अशा शेतकऱ्यांना आपल्या सोसायटीत प्रवेश आहे का?

**उत्तर :** आमच्या संकेताप्रमाणे सभासद शेतकऱ्याला पंचवीस एकरांपेक्षा जास्त ऊस लावता येणार नाही. बड्या शेतकऱ्यांकरिता हा खटाटोप नाही. केवळ शेतीतीलच नव्हे तर, साखर-उत्पादनातीलही फायदा लहान शेतकऱ्यांना मिळावा व त्यामुळे त्यांनी शेतीसुधारणेकडे अधिक लक्ष देण्यास प्रवृत्त व्हावे म्हणून हा उद्योग आहे.

**प्रश्न :** १९५० च्या अखेरीस आपला कारखाना सुरू झाला. म्हणजे गुळाच्या हंगामाचा दीड

१ अहमदनगर जिल्ह्यात श्रीरामपूर तालुक्यात प्रवरा लेफ्ट व प्रवरा राईट या कालव्यांच्या हेडपासून जवळच एका सोयिस्कर ठिकाणी हा कारखाना आहे.

महिना होऊन गेला होता; व त्यावेळी गुळाचा भावही तेजीत होता. असे असताही आपल्या सोसायटीच्या सदस्य शेतकऱ्यांनी दम काढला हे विशेष होय.

**उत्तर :** सहकारी संस्थांचे यश व बळ सभासदांच्या निष्ठेत साठवलेले असते. तात्पुरत्या फायद्याकडे नजर न देता संस्थेच्या हिताकडे म्हणजेच स्वतःच्या सामुदायिक हिताकडे अढळ लक्ष देण्यातच आपले अंतिम वैयक्तिक हित आहे, हे सभासदांना समजून त्यांच्या वागणुकीत ते प्रतिबिंबित झाले म्हणजेच सहकारी संस्थेचा पाया दृढ होतो.

**प्रश्न :** सहकारी तत्त्वावरील कारखानदारी या दृष्टीने लोणीच्या साखर-कारखान्याची योजना परिपूर्ण मानता येईल का?

**उत्तर :** तुम्ही विचारलेला प्रश्न महत्त्वाचा आहे. साखरेच्या उत्पादनाचे स्वरूप एका दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. साखरेच्या उत्पादनखर्चापैकी सुमारे तीनपंचमांश खर्च कच्च्या मालाचा म्हणजेच उसाचा असतो. त्या मानाने नोकर-पगार खर्च कमी असतो. असे असले तरी कामगारवर्ग हाही उत्पादनातील महत्त्वाचा घटक आहे. कारखाना पूर्णांशाने सहकारी तत्त्वावर चालवावयाचा तर कामगार व व्यवस्थापकीय नोकरही उसाच्या शेतकऱ्याप्रमाणे शेअरहोल्डर हवेत व डायरेक्टर बोर्डातही त्यांचे प्रतिनिधी यथा-प्रमाण यावयास हवेत. तशी व्यवस्था या कारखान्यात अजून नसली तरी, कामगारांपैकी जे ऊस आज लावीत नसतील परंतु शेतकरी असतील अशांना देण्याकरिता आम्ही काही उत्पादक-शेअर्स ठेवले आहेत.

**प्रश्न :** शेतकऱ्यांकडून ऊस घ्यावयाचा व साखर करावयाची एवढ्यापुरतेच आपल्या सोसायटीचे क्षेत्र मर्यादित आहे का?

**उत्तर :** तसे नाही. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाकरिता कर्ज देण्याची जशी व्यवस्था केली आहे, त्याप्रमाणेच शेतीसुधारणेची योजनाही आखली आहे. त्याकरिता शेती-सुधारणा-निधी बाजूला काढला असून, पिकांची नियोजनपूर्वक आखणी करण्यात येत आहे. गटसमित्यांच्या सहकार्याने कंपनीचे तज्ज्ञ, शेतकी अधिकारी शेतकऱ्यांच्या करवीच शेती-सुधारणा घडवून आणीत आहेत. सहकारी तत्त्वावर शेती करणे हे कर्म महाकठीण आहे. त्याला पर्याय म्हणून ज्या त्या शेतकऱ्याकडून त्याच्या पिकात सुधारणा घडवून आणण्याची ही योजना, आम्ही आखली आहे. आम्ही एंजिने घेण्यासही शेतकऱ्यांना साहाय्य केले आहे. असेच काम पाच-सहा वर्षे चालले म्हणजे या सोसायटीच्या कक्षेत येणाऱ्या प्रदेशातील एकंदर वातावरणच सहकारप्रधान बनेल. आमचा हा एक प्रयोग आहे. प्रत्यक्ष अनुभवाने अडीअडचणी कळून येऊन त्यात पुष्कळच सुधारणा होईल.

**प्रश्न :** या कारखान्याला लागणाऱ्या भांडवलाची व्यवस्था कशी केलीत? केवळ लहान ऊसवाल्या शेतकऱ्यांना पुरेसे भांडवल उभारणे अशक्यप्रायच वाटते.

**उत्तर :** ते तर खरेच. केवळ शेतकऱ्यांना साखर कारखान्याला पुरेसे भांडवल पुरविणे शक्य नव्हते. ३० जून १९५१ अखेरचा ताळेबंद पाहिल्यास आमचे एकूण भांडवल व देणी रुपये ६८ लाखांच्यावर होती. त्यापैकी रुपये १४ लक्षांची रक्कम शेअर्सपोटी जमा झालेली दिसली तरी, त्यात मुंबई सरकारने घेतलेले रुपये ६ लक्षांचे शेअर्स समाविष्ट आहेत. इंडस्ट्रियल फायनॅन्स कॉर्पोरेशनकडून रुपये २० लक्षांचे दीर्घ मुदतीचे कर्ज मिळाले असून मुंबई प्रॉ. को. बँकेने सुमारे रुपये ९ लक्षांचे कर्ज खेळत्या भांडवलाकरिता दिले होते. पहिल्याच वर्षी नफ्यातून आम्ही रुपये ८ लक्ष घसारा निधी म्हणून बाजूला काढले. शिवाय इतर देणी, सुमारे रुपये ११ लाखांची होती. यावरून स्पष्टच होते की, मुंबई सरकार, मध्यवर्ती इंडस्ट्रियल फायनॅन्स कॉर्पोरेशन व मुंबई प्रॉ. को. बँक यांनी भांडवलपुरवठा केला म्हणूनच हा प्रयोग होऊ शकला. एकट्या शेतकऱ्यांकडून तो होण्याची शक्यता नव्हती.

**प्रश्न :** सहकारी तत्त्वावर मोठे धंदे लोणीच्या कारखान्याप्रमाणे चालू करण्याची शक्यता आपल्याकडे कितपत आहे?

**उत्तर :** हा प्रश्न फारच गुंतागुंतीचा आहे. आपल्याकडे गिऱ्हाइकांच्या सहकारी संस्थांचे प्रमाण फार कमी आहे. कारण आपले आर्थिक जीवन प्रधानतः ग्रामीण आहे. विलायतेत गिऱ्हाइकांच्या सहकारी स्टोअर्सच्या साखळ्या आहेत. त्यांनी स्वतःला लागणाऱ्या प्रमुख वस्तू तयार करणारे कारखाने सुरू केले आहेत. तसे आपल्याकडे होण्याची शक्यता कमी आहे. येथे व्हावयाच्या तर उत्पादकांच्या सहकारी संस्था निघून लोणीच्या साखर कारखान्यासारखे धंदे निघू शकतील. शेतीच्या मालापासून 'प्रोसेसिंग'ने पक्का माल करण्याचे धंदे सहकारी पद्धतीने चालू करण्याची शक्यता आहे. कपाशीतील सरकी काढून गठ्ठे बांधणे, धान्य कांडणे, तेल गाळणे, साखर तयार करणे हे या प्रकारचे धंदे होत; परंतु त्यांतही साखरेचा धंदा हा सहकारी तत्त्वावर चालविण्याच्या दृष्टीने सोपा होय. कारण साखरेची गिरणी चालविण्याकरिता लागणारा पुरेसा ऊस सलग अशा लहानशा क्षेत्रातून मिळू शकतो. तेलाची तशी गिरणी काढावयाची तर, कच्च्या मालाच्या उत्पादनाचे क्षेत्र विस्तृत होते व ते जितके दूरवर पसरलेले, तितकी परस्पर सहकार्याची भावना ठेवून काम करणे अवघड. म्हणून लोणीच्या प्रयोगाच्या आवृत्त्या भराभर निघणे कठीण आहे; परंतु मर्यादित क्षेत्रात नीट आखणी करून सहकारी तत्त्वावर कारखाने काढणे अशक्य मात्र नाही.

**प्रश्न :** आपल्या राष्ट्राचे ध्येय 'को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थ' असे असल्याने सहकारी जीवनाची वाढ झपाट्याने व्हावयास नको काय?

**उत्तर :** परंतु ते आपोआप घडेल असे जे मानीत असतील त्यांचा तो भ्रम आहे. 'अनियंत्रण-वादी' (लेसेफेअर) धोरण अवलंबून सहकारी जीवनाची वाढ करणे अशक्य आहे. एकाच जातीचे खाजगी मालकीचे व सहकारी पद्धतीचे कारखाने वा विक्रयसंस्था काढून सहकारी लोकराज्य स्थापन होणार नाही. कारण सहकारी संस्था सरकारी साहाय्याखेरीज खाजगी व्यापारी-उदमी कंपन्यांशी चढाओढीत कधीच टिकणार नाहीत; व तसे साहाय्य मिळूनही अशा संमिश्र संघटनेमुळे सहकारी जीवनाचा परिपोष होत नाही.

औद्योगिक जीवन जर सहकारप्रधान व्हावे असे वाटत असेल तर, सरकारने क्रमशः विशिष्ट उद्योगधंदे केवळ सहकारी संस्थांकरिताच राखून ठेवले पाहिजेत व त्याकरिता सरकारने त्यांना भांडवलाचे व तांत्रिक साहाय्य देऊन त्याखेरीज सहकारी उत्पादन-मालाला किमान भाव मिळतील अशीही व्यवस्था केली पाहिजे; तरच सहकारी पद्धतीने उद्योगधंदे चालू शकतील.

*संपदा* ८ : १ एप्रिल १९५२, पृ० ७–९ (श्री. आ. रा. भट यांनी घेतलेली मुलाखत)

☆

# ३ . . महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अध्यक्षीय भाषणे

## १

...गेल्या वर्षात या राज्यातील सहकारी बँक व्यवस्थेत पूर्वी ठरल्याप्रमाणे बदल होऊन ती आता नवीन अखिल भारतीय संकल्पित साच्याप्रमाणे पूर्णपणे बनविण्यात आली आहे. ऑक्टोबर १९६१ मध्ये कुलाबा जिल्हा बँकेने त्या जिल्ह्याचा कारभार आपणाकडे घेतला आणि विदर्भाच्या आठही जिल्ह्यांत प्रत्येक जिल्ह्याची एक बँक याप्रमाणे पुनर्रचना करण्याचे काम २६ जानेवारी १९६२ या सुमुहूर्तावर पुरे करण्यात आले. हे पुनर्रचनेचे काम बरेच अवघड व नाजुक होते. ते सर्वांच्या सहकार्यामुळे, संकल्पित वेळात विनाकलह घडून आले याबद्दल सर्व संबंधितांचे मी अभिनंदन करतो आणि राज्य बँकेच्या वतीने त्यांस धन्यवाद देतो. ज्यांना नियोजित बदलाचे स्वागतपूर्वक स्वीकार करणे अयुक्त वाटले त्यांनीही याविषयीचा निर्णय पक्का झाल्यानंतर कोणताही अडवणुकीचा मार्ग पत्करला नाही हे त्यांच्या सहकारी व्यवस्थेविषयीच्या निस्सीम निष्ठेचे द्योतक आहे असे मी मानतो. या वृत्तीने आपण सतत कार्य करीत राहिलो तर सहकारी समाजाच्या संपूर्ण प्रस्थापनेस आपणांस फार कालावधी लागू नये.

### जिल्हा परिषदा व सहकारी बँका

सर्व भारतात काही वर्षांपूर्वी ठरलेल्या धोरणाप्रमाणे सबंध राज्यातील सहकारी बँक-व्यवस्था बनविण्याचे श्रेय महाराष्ट्र राज्यास आता मिळाले आहे. हे धोरण तत्त्वतः योग्य म्हणून सर्व अडचणी दूर करून ते आपण अमलात आणले. योगायोग असा की हे आपले प्रयत्न थोड्या महिन्यांच्या अवधीतच अगदी अनपेक्षितरीत्या सुफलदायी ठरले. महाराष्ट्रात १ मे १९६२ पासून जिल्हा परिषदा स्थापन झाल्या. तत्पूर्वी थोडे दिवस या नवीन मोठ्या व महत्त्वाच्या शासन-संस्थांचा बँक व्यवहार सहकारी बँक-व्यवस्थेवर सोपवावा असा निर्णय महाराष्ट्र राज्य सरकारने घेतला. असे करण्याचा विचार राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांस प्रथम सुचला आणि त्यांनी स्वतःहून राज्य बँकेशी याबाबत वाटाघाटी सुरू केल्या. ही सर्वच घटना ज्यायोगे आपणांस फार समाधान वाटावे, अशी घडली.

याप्रकरणी बरेच साधक बाधक बोलले गेलेले ऐकू येते, म्हणून नवीन व्यवस्थेसंबंधी काही विचार आपणांपुढे याप्रसंगी मांडतो. प्रथम लक्षात घेण्याची बाब म्हणजे आपल्या जुन्या धोरणानुसार बँक-व्यवस्थेची रचना व विकास ही घडून आली नसती तर राज्य सरकारास जिल्हा परिषदांचा कारभार सर्वस्वी सहकारी बँक व्यवस्थेवर सोपविणे अशक्य झाले असते. प्रत्येक जिल्ह्यापुरती एक स्वतंत्र बँक व तिची व्याप्ती सबंध जिल्हाभर असल्यामुळे, प्रत्येक जिल्हा परिषदेस आपला सर्व बँक-कारभार एकहाती एका संस्थेस सहज देता आला. ही दोन्ही दृष्ट्या फार मोठी सोय झाली. तसेच अनेक वर्षे जिल्हा बँकेच्या शक्य तितक्या नवीन शाखा काढण्याचे धोरण आपण अवलंबिले

असल्यामुळे, जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांस जितक्या निरनिराळ्या ठिकाणी बँक शाखांची जरुरी भासली त्यांपैकी, बहुतेक ठिकाणी जिल्हा सहकारी बँक शाखा आधीच होत्या. सरकारने याबाबत निर्देशिलेल्या स्थलांची एकंदर संख्या २३६ होती. त्यांपैकी १८१ टिकाणी बँक शाखा स्थापित होत्या. जेथे जिल्हा बँक थोड्याच वर्षांपूर्वी निघाली होती अशा काही जिल्ह्यांत नवीन काढाव्या लागलेल्या शाखांची संख्या एकाहून अधिक होती. अशी संख्या सर्वांत जास्त (८) रत्नागिरी जिल्ह्यात होती. अशा जिल्ह्यांतही नवीन आवश्यक शाखा काढण्याबाबत त्वरा करून, प्रत्येक बँकेने परिषदेच्या कारभाराची गरज भागविली आहे.

सहकारी बँक-व्यवस्था म्हणजे प्रत्येक जिल्ह्याची एक स्वतंत्र बँक एवढीच नव्हे तर राज्य बँक समवेत सर्वांची एक सूत्रबद्ध व्यवहार रचना आहे. तेव्हा या व्यवस्थेकडे बँक व्यवहार सोपविल्यामुळे, प्रत्येक जिल्हा परिषदेस स्वतंत्रपणे आणि सर्व परिषदा व राज्य सरकार यांस मिळून सर्व प्रकारचे परस्परांतील व्यवहार एकाच संघटनेमार्फत करता येतात. हे सर्व व्यवहार सुसूत्र व्हावे व निरनिराळ्या जिल्ह्यांतील कारभारात सारखेपणा यावा याकरिता आपल्या बोर्डाने एक खास सल्लागार समिती नियुक्त केली आहे.

झाले हे सर्व प्रकारे सोयीस्कर झाले, एवढेच नाही तर दुसरी कोणतीच पर्यायी बँक-व्यवस्था या कारभाराकरिता उपलब्ध नव्हती व नाही हेही लक्षात घेण्याजोगे आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांत सार्वजनिक बँक व्यवहार आज फक्त स्टेट बँक ऑफ इंडिया करते. परंतु या बँकेच्या शाखांची स्थापना राज्य सरकारच्या ट्रेझरी कामाच्या दृष्टीने मुख्यतः झाली आहे. महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांत मुंबई शहराबाहेर स्टेट बँकेच्या एकूण शाखा ८६ इतक्याच असून त्या जिल्हा परिषदांस हव्या तितक्या प्रमाणात वाढविता येतील, अशा प्रकारचे स्टेट बँकेचे धोरण नाही. तेव्हा वरच्या पातळीवर सर्व प्रकारचा सरकारी व्यवहार अखिल भारतात करणाऱ्या या प्रचंड संस्थेस एका राज्यातील जिल्हा संस्थांचा कारभार सहकारी बँक-व्यवस्थेकडे आला याबद्दल वैषम्य वाटण्याचे कारण नाही, आणि त्या बँकेस असे वैषम्य वाटणारही नाही याची मला खात्री आहे.

जिल्हा परिषदांचा व्यवहार सहकारी बँक व्यवस्थेकडे आला यात अनुचित अगर अस्वाभाविकही काही नाही. जिल्हा परिषद कायद्यान्वये जिल्ह्यांतील सहकारी व्यवस्था व परिषदा यांचा निकट संबंध जोडला असून, अनेक कार्यांत सहकारी संघटना ही परिषदेचे कार्यकारी अंग असे मानले गेले आहे. तसेच, १३ वर्षांपूर्वीच्या ग्रामीण अर्थ व विकास व्यवहारांत बँक व्यवहाराची बाजू सहकारी संघटनांवरच सोपविली पाहिजे असा आग्रह धरलेला होता. तसेच, जेवढा सरकारी व्यवहार, सरकार अगर त्या वेळची इम्पिरियल बँक यांस करणे शक्य नाही तेवढा सर्व खाजगी बँकांकडे न देता सहकारी बँकांकडे द्यावा, त्या तो सर्व करण्यास तयार, तत्पर व समर्थ आहेत असेही त्या वेळेस ठासून प्रतिपादिले होते. तदनंतर नेमलेल्या रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीने हा दृष्टिकोण बहुतांशी स्वीकारला. एवंच, जिल्हा परिषदांचा व्यवहार आपणांकडे सोपविणे हे योग्य, पूर्वसंकेतानुसार झाले, त्याखेरीज अन्य इष्ट मार्ग नव्हता हे कोणाही विचारी माणसास पटेल अशी माझी खात्री आहे.

## रिझर्व्ह बँकेचे धोरण

एकंदर बरेचसे समाधानकारक घटनांचे निवेदन करीत असता काही थोडे तक्रारीवजा त्यात येणे अपरिहार्य आहे. पैशाच्या पुरवठ्याबाबत आपला मुख्य आधार रिझर्व्ह बँकेवरचा. रिझर्व्ह बँक व तिचे अधिकारी यांनी आपणांस आपल्या व्यवहारात प्रथमपासून हरप्रकारे मदत केली, हे आपणा सर्वांस माहीत आहे. माझ्या गतवर्षीच्या भाषणात रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकांस करण्याच्या मेहता समितीच्या कर्ज-पुरवठ्याविषयीच्या शिफारशींचा उल्लेख केला होता व त्या येत्या वर्षी अमलात आणल्या जातील

अशी आशा व्यक्त केली होती. हे काही अंशी घडूनही आले आहे. पण या शिफारशींची अंमलबजावणी करीत असता रिझर्व्ह बँकेचे पूर्वकालीन धोरण एका महत्त्वाचे बाबतीत बदलत आहे की काय असा संशय येतो. रिझर्व्ह बँकेने जिल्हा बँका व राज्य बँक यांच्या व्यवहाराचे साकल्याने निरीक्षण करून, काही गमकांस अनुसरून, वार्षिक कर्जे देण्याच्या विविध बाबतींत मर्यादा ठरवाव्या हा आजवरचा दंडक आहे. मेहता कमिटीच्या शिफारशींची अंमलबजावणी करीत असता वाढविलेल्या प्रमाणानुसार कर्जमर्यादा पूर्वीच्या पद्धतीनुसार ठरविल्या जातील अशी आमची अपेक्षा होती. परंतु वार्षिक व्यवहाराचा समग्र अंदाज घेऊन अशा वार्षिक मर्यादा प्रमाणबद्ध ठरविण्याच्या ऐवजी त्या तात्कालिक थोड्या वाढवून, गरज भासल्यास पुढे वाढविता येतील असे म्हणण्याचा नवीन प्रघात रिझर्व बँक पाडणार की काय अशी अलीकडील काही घटनांवरून शंका वाटू लागली आहे. या विषयी आपली बाजू बँकेपुढे मांडीत आहो व तिचा सहानुभूतिपूर्वक विचार होईल अशी खात्री वाटते. तेव्हा याविषयी विस्ताराने विवेचन न करता केवळ एक महत्त्वाचा मुद्दा थोडक्यात नमूद करतो.

सहकारी बँक-व्यवस्थेवर सर्व प्रकारच्या सहकारी आर्थिक व्यवहारांस पैसा पुरविण्याची जबाबदारी आहे. या व्यवहारांची विविधता व परिमाण ही झपाट्याने वाढत आहेत व सहकारी समाज-व्यवस्थेच्या शीघ्र प्रस्थापनेकरिता या सर्वांस योग्य प्रमाणात भांडवल पुरविणे अत्यावश्यक आहे. नवीन सहकारी संस्था स्थापणे व त्यांचा व्यवहार वाढविणे हे नियोजित प्रगतीचे एक प्रमुख अंग असून, याकरिता अनेक दिशेने सरकारी व बिन-सरकारी प्रयत्न चालू आहेत. हे सर्व समप्रमाणात नियुक्त दिशेने चालावे व सहकारी बँक-व्यवस्थेने करण्याचा पैशाचा पुरवठा मधेच कमी पडून त्यांची प्रगती खुंटू नये म्हणून सर्वांनी मिळून सर्वांगीण सहकारी वार्षिक कार्यक्रम राज्य बँकेच्या नेतृत्वाखाली तयार करण्याचा पायंडा आपण दोन वर्षांपूर्वी पाडला. या नवीन उपक्रमानुसार कोणत्याही वर्षात हाती घेण्याच्या कार्यक्रमाचा आराखडा आपण ते वर्ष सुरू होण्यापूर्वी सहा महिने निश्चित करतो. रिझर्व बँकेकडून मिळणारी कर्जे ही आपल्या पैसापुरवठ्यातील मुख्य बाब असल्यामुळे त्याच्याविषयी निश्चित अंदाज बांधता आल्याखेरीज आपणांस हे वार्षिक कार्यक्रम बनविणे दुरापास्त ठरेल. शिवाय रिझर्व बँकेकडून मिळणारी सवलतीच्या दराची कर्जे ही केवळ ठराविक प्रकारच्या व्यवहारांकरिताच मिळतात. आपणास कार्यक्रम ठरवावयाचा तो सर्व व्यवहाराकरिता मिळून आणि सबंध वर्षाकरिता, अशा परिस्थितीत रिझर्व बँकेकडून मंजूर होणाऱ्या वार्षिक मर्यादांबाबत आजवर नव्हती तशा प्रकारची अनिश्चितता उत्पन्न झाली तर वार्षिक कार्यक्रम बांधणे व त्याची अंमलबजावणी कसोशीने करणे हे नव्याने हाती घेतलेले कार्य पाया अस्थिर झाल्यामुळे कोलमडेल अशी भीती वाटते, ही भीती निराधार ठरेल अशी मला आशा आहे.

रीफायनान्स कॉर्पोरेशनने आपणास, आपण औद्योगिक संस्थांस दिलेल्या मध्यम मुदतीच्या पैशाच्या पोटी मदत करण्याचे कबूल केल्याचे गेल्या अहवालात नमूद केले होते. अशा प्रकारच्या मदतीचे अनेक अर्ज यंदा तयार झाले असून, त्यांपैकी, काहींस कॉर्पोरेशनने मंजुरीही दिली आहे. याबाबत एक अडचण आपणांस प्रामुख्याने भासते ती अशी की, सरकारतर्फे औद्योगिक कर्जाची योजना ज्या पाच जिल्ह्यांत लागू आहे, त्या जिल्ह्यांतील अर्जांचाच विचार आज रीफायनान्स कॉर्पोरेशनमार्फत होत असतो. औद्योगिक वाढीच्या दृष्टीने हा जिल्ह्या-जिल्ह्यांतील भेद अनिष्ट असा आहे. तेव्हा कॉर्पोरेशनने सर्व जिल्ह्यांतील अर्जांचा सारख्याच पद्धतीने विचार करावा अशी मागणी आम्ही केली आहे, तिला लवकरच मान्यता मिळेल अशी आशा आहे.

## औद्योगिक मंडळासाठी निधी

...आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे औद्योगिक मंडळाच्या पुढील कार्याकरिता निधी तयार

करणे. औद्योगिक मंडळाची स्थापना करून, गतवर्षी आपण एक महत्त्वाचे पाऊल पुढे टाकले. राज्य सहकारी बँकेमध्ये सहकारी व्यवस्थेतील पैशाचा पुरवठा केंद्रित होतो व ती राज्यातील सर्व संस्थांत जुनी व समर्थ अशी आहे. साहजिकपणे या नियोजित विकास युगात हरतऱ्हेच्या विकास योजना सहकारी क्षेत्रात तयार करणे व त्यांचा सक्रिय पुरस्कार करणे याची प्रमुख जबाबदारी आपल्या बँकेवर आहे, असे मानले जाते. या जबाबदारीची जाणीव बँकेला आहे हे औद्योगिक मंडळाच्या नियुक्तीने आपण दाखविले. या मंडळाचे कार्य एखादी पाहणी किंवा चौकशी करून, अहवाल लिहून मोकळे व्हावे या प्रकारचे नाही. प्राथमिक सार्वत्रिक पाहणी करून, दीर्घकालीन विकास योजनांचा कार्यक्रम सतत तयार करीत राहणे व यथावकाश, यथाशक्ती त्यांचा पुरस्कार करणे, एवढे व्यापक कार्य या औद्योगिक मंडळाचे आहे असे मी समजतो. औद्योगिक उत्पादनाच्या क्षेत्राबाहेरील उत्पादन व इतर आर्थिक व्यवहारांबाबतच्या विकास योजनाही या मंडळास लक्षात घ्याव्या लागतील असा संभव आहे. परिणामी याचे परिवर्तन इतर संस्थांच्या सहकार्याने सहकारी विकास योजना मंडळात होण्याची शक्यता आहे. प्राथमिक पाहणीचे काम पुरे करून, एक-दोन व्यवसायांचा बारकाईने अभ्यास करण्यापर्यंत औद्योगिक मंडळाने या वर्षात मजल गाठली आहे. पुढील कामात शास्त्रीय तंत्राचा भाग प्रामुख्याने असल्यामुळे तज्ज्ञ समितीचे पूर्ण साहाय्य असले तरी तज्ज्ञ सेवक बँकेने नेमणे आवश्यक वाटू लागले आहे व याबद्दल काही व्यवस्थाही करण्यात आली आहे. काम झपाट्याने व पायाशुद्ध व्हावे म्हणून पाहणीबरोबर प्रसंगी संशोधनात्मक प्रायोगिक व्यवहार करून पाहणे हे महत्त्वाचे ठरेल. याकरिता बँकेस स्वतः भांडवल-गुंतवणीच्या रूपाने धोका व झीज सोसावी लागेल. हे करण्याकरिता मोठा निधी आवश्यक आहे. ज्याप्रमाणे पैशाच्या व्यवहाराविषयीचा वार्षिक कार्यक्रम सर्वांच्या सहकार्याने आपण ठरवितो, त्याप्रमाणे सहकारी उद्योगांची स्थापना, व्यवस्था, स्थळ-निश्चिती इत्यादींविषयी जिल्हानिहाय तपशीलवार योजना सहकारी खात्याच्या साहाय्याने आपण तयार करावी असे ठरविण्यात आले आहे. या उपक्रमास लवकरच सुरुवात होईल.*

## २

### सहकारी क्षेत्र विस्ताराची आवश्यकता

...आपले राष्ट्र अजून कृषिप्रधान आहे. तेव्हा कृषिउत्पादनाचे महत्त्व विशेषतः सहकारी व्यवस्थेत मोठे आहे. गेली काही वर्षे कृषिव्यवस्थेबाबतच्या पैशाच्या व्यवहारावर आपले लक्ष केंद्रित झाले होते. सरकारने व रिझर्व बँकेनेही विशेष सवलती या क्षेत्रात दिल्या. हे सर्व योग्यच झाले; व त्यामुळे सहकारी बँक-व्यवस्थेस शेतकऱ्यास वाढत्या प्रमाणावर व पद्धतशीर रीतीने पैशाचा पुरवठा करता येऊ लागला आहे. या क्षेत्रातील सर्व समस्या सुटल्या असे अर्थात अजून बिलकुल झालेले नाही. पीक-कर्जाची पद्धती सार्वत्रिक करणे व तिचे यथार्थ स्वरूप सर्वांस समजावून देऊन तिची काटेकोर अंमलबजावणी करणे याबाबत अजून पुष्कळ मजल गाठावयाची आहे. तसेच पीक-कर्जपद्धतीमुळे अनेक वर्गांच्या, उदाहरणार्थ छोट्या शेतकऱ्यांच्या गरजा पूर्णपणे भागविता येत नाहीत. याबाबत निराळ्या तऱ्हेने विचार व्हावयास पाहिजे. महाराष्ट्रात अवर्षणाचा धोका अनेक जिल्ह्यांत सतत भासतो.

* मुंबई, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, २२–९–१९६२

यामुळे निर्माण झालेल्या अनिश्चित परिस्थितीत सहकारी पैसा व पतपुरवठ्याचा कारभार वर्षोवर्षी सुरळीत कसा चालवावा हे प्रयत्न करून अनुभवाने आपणास शिकावयाचे आहे. असे असले तरी गेल्या सात आठ वर्षांत कृषिविषयक पैसा-पुरवठ्याबाबत आपण बरीच प्रगती केली हे निर्विवाद आहे. गेल्या तीन वर्षांत भू-विकास बँकांनी केलेली प्रगती तर आपल्या प्रगतीपेक्षाही आश्चर्यजनक व स्पृहणीय आहे. परंतु इतर क्षेत्रांत महाराष्ट्र अजून आघाडीवर नाही. ग्रामीण व्यवस्था परिपूर्ण होण्याकरिता सहकारी खरेदी-विक्रीचे कार्य सुव्यवस्थित होणे व विस्तारणे अत्यावश्यक आहे. कृषीशिवाय इतर व्यवहारांकडे सहकारी बँकांचे दुर्लक्ष आहे अशी तक्रार वेळोवेळी ऐकू येते. नागर बँका, ग्राहक संस्था, सहकारी उद्योगमंडळे या सर्वांच्या तक्रारी आहेत; व या सर्व क्षेत्रांतील कार्यकर्ते आमची बँक-व्यवस्था निराळीच असावी असे कधी कधी वैतागाने सुचवितात.

सहकारी व्यवस्था अभेद्य आहे. सहकारी समाजाची निर्मिती करावयाची तर सहकाराचे स्थान आर्थिक व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रात सारखे दृढ झाले पाहिजे असे मी मानतो. ओघानेच असे आले की सहकारी बँक-व्यवस्थेने सर्व क्षेत्रांतील सहकारी व्यवहारास सारखे लेखून योग्य रीतीने पैशाचा पुरवठा करावा.

## बँकेच्या उद्योगमंडळाचे प्रयत्न

...औद्योगिक प्रगती साधण्याकरिता बँकेच्या उद्योगमंडळाचे प्रयत्न वाढत्या प्रमाणावर चालू आहेत. अहवालाच्या साली सांगली जिल्ह्यात भुईमुगाच्या पिकाकरिता व्यापक प्रक्रिया-योजना स्थानिक कार्यकर्ते व मंडळाचे तज्ज्ञ यांच्या साहाय्याने तयार करण्यात आली व ती कार्यवाहीत आणण्याचे कामही हाती घेण्यात आले. यंदाचे साली याबाबत प्रगती होईल अशी अपेक्षा आहे. भंडारा जिल्ह्यात तांदूळ सडणे व कोंड्यापासून तेल काढणे या विषयीच्या योजनेचा सांगाडा तयार असून येथेही बरेच प्राथमिक काम झाले आहे. या दोन्ही योजनांबाबतचा अनुभव लक्षात घेता सहकारी उद्योगमंडळाचे तज्ज्ञ सभासद व अधिकारी यांस तयार केलेल्या योजनांच्या पूर्ततेकरिता व संकल्पित उद्योगधंद्यांच्या उभारणीकरिता बरीच खटपट करावी लागेल असे दिसते. धंदा प्रस्थापित होऊन सुरळीत चालू लागेपावेतो तज्ज्ञांचे सतत मार्गदर्शन, आर्थिक साहाय्य, व्यवस्थापक व तज्ज्ञ सेवकांचा पुरवठा इत्यादी अनेक प्रकारे उद्योगमंडळास साहाय्य देण्याची तयारी ठेवावी लागणार आहे. सांगली व भंडारा येथील उपक्रम प्रयोगदृष्ट्या यशस्वी ठरत आहेत. आता तत्सम कार्य इतर ठिकाणी व इतर प्रकारे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावे अशी सार्वत्रिक अपेक्षा आहे. विशेषतः आजवर उपेक्षिलेल्या मराठवाडा व कोकण यांसारख्या प्रदेशांत काही तरी उपक्रम करणे विशेष अगत्याचे आहे. याजबरोबर उद्योग मंडळाच्या कार्याची विविधता वाढत आहे. मंडळाने भाज्या सुकविण्याविषयी एक लहानसा प्रयोग एका संशोधन संस्थेस हाती घेण्यास सांगून शास्त्रीय संशोधनाच्या पुरस्कारास सुरुवात केली आहे. संशोधनफलित प्रत्यक्ष व्यवहारात उतरविण्यातही मंडळाने लक्ष घातले आहे. पुणे विद्यापीठात झालेल्या गुळाबाबतच्या संशोधनाचा व्यापक प्रमाणावर उपयोग करून पाहणे इष्ट आहे, असा तज्ज्ञ-सल्ला मिळाल्यावरून यंदा या नवीन पद्धतीने गुळाचे उत्पादन एका प्रक्रिया-संस्थेत होण्याकरता मंडळाने सर्वप्रकारे साहाय्य देण्याचे ठरविले आहे. जंगल कामगार संस्थेचे प्रश्न, बांबू-लागवड इत्यादी विषयही उद्योगमंडळ हाताळीत आहे. या सर्व खटाटोपात कृषी व उद्योग यांचा फार निकटचा संबंध आहे हे स्पष्ट झाले व उद्योगाच्या वाढीकरिताही शेतीचा पाया बळकट करणे आवश्यक आहे हे दिसले. काही महिन्यांपूर्वी रिझर्व्ह बँकेत प्रस्थापित झालेल्या शेती रीफायनान्स कॉर्पोरेशनने नवीन प्रयत्न करण्याची आणखी एक दिशा मोकळी केली. मोठ्या प्रमाणावर सामूहिक शेती-विकासयोजना हाती घेणे

आता सुकर होणार आहे. पण हे कार्य तज्ज्ञांचा सल्ला व तज्ज्ञ सेवकांची देखरेख यांशिवाय शक्य होणार नाही. एवंच, विकास-कार्य विविधांगी आहे व या सर्व अंगांचा परस्परांशी अत्यंत निकटचा संबंध आहे हे वाढत्या व्यापाबरोबर जास्त उत्कटपणे प्रतीत होऊ लागले. तसेच विकास-कार्य कोणी एकाने करण्याचे नसून, सरकारी, सहकारी, प्रत्यक्ष कार्यकर्ते व सल्लागार तज्ज्ञ, शेतकरी व इतर व्यावसायिक या सर्वांनी मिळून करण्याचे आहे हेही स्पष्ट झाले आहे. तेव्हा उद्योगधंद्यांच्या कार्यात शेती-तज्ज्ञ व सेवक यांचा समावेश करावा व शक्य तितके हे कार्य सरकारी यंत्रणा व इतर संस्था यांच्या सहकार्याने करीत जावे अशा निर्णयाप्रत आपली बँक येत आहे.*

## ३.

### बँकेच्या व्यवहाराचा आढावा

सहकारी क्षेत्रातील कर्ज व पत व्यवहाराच्या एकंदर यंत्रणेतील राज्य बँक ही केवळ शिखर संस्था आहे. जिल्हा मध्यवर्ती बँका व प्राथमिक सेवा सहकारी सोसायट्या हे या व्यवस्थेचे प्रमुख घटक आहेत. राज्य बँकेची सुस्थिती व प्रगती खऱ्या अर्थी या सर्व व्यवस्थेच्या सुस्थितीवर अवलंबून आहे. तेव्हा याबाबतच्या सद्यःस्थितीचा थोडक्यात आढावा या भाषणात घेणे अप्रस्तुत ठरणार नाही. गेल्या दोन तीन वर्षांत रिझर्व बँक व इतर अधिकारी संस्था व समित्यांमार्फत अखिल भारतीय सहकारी व्यवस्थेची निरनिराळ्या दृष्टीने पाहणी झाली आहे. या सर्वांवरून असे आढळते की, महाराष्ट्राने सहकारी क्षेत्रात गेल्या दहा वर्षांत भरीव प्रगती केली असून आज आपले स्थान आघाडीवरचे आहे. संख्यात्मक व गुणात्मक या दोन्ही दृष्टींनी आपले कार्य उठून दिसत आहे. अशा रीतीने सर्व पाहणीचा निष्कर्ष आपल्यापुरता बराच समाधानकारक असला तरी त्यावरून आपली अनेक वैगुण्येही लक्षात आली आहेत. त्यांकडे लक्ष देणे जरुरीचे आहे. महाराष्ट्रातील सहकारी कर्ज-व्यवहारांत अलीकडे आढळून येणारा मोठा दोष म्हणजे थकबाकीचे प्रमाण हा होय. १९६१–६२ व १९६२–६३ साली हे प्रमाण फार मोठे, फार काळजी करण्यासारखे होते. १९६३–६४ साली थकबाकी कमी करण्यात आपणांस बरेच यश आले आहे हे खालील आकड्यांवरून दिसून येईल.

| | येणे बाकी (रु. लाखांत) | थकबाकी (रु. लाखांत) | थकबाकीचे येणेबाकीशी (शे. प्र.) |
|---|---|---|---|
| ३०–६–६२ | ३,९६०·५३ | १,०४२·४२ | २६·३ टक्के |
| ३०–६–६३ | ४,४२५·९१ | १,२७९·४१ | २८·९ टक्के |
| ३०–६–६४ | ५,२९८·४९ | १,००९·४३ | १९·१ टक्के |

असे झाले तरी आता सर्व ठीक आहे असे मी मानत नाही. याचे एक कारण असे की, थकबाकीचे प्रमाण यंदा कमी झाले ते फार मोठ्या प्रमाणावर कायद्याचा अवलंब करून सक्तीची वसुली केली म्हणून झाले आहे. आणि ही कायदेशीर अंमलबजावणी करीत असता असे आढळून आले की बाक्या फार

* कित्ता, २५-९-१९६३

मोठ्या प्रमाणावर ऐपतदार कर्जदारांकडेच थकल्या होत्या. थकबाकी वाढली म्हणजे कायदेशीर इलाज करणे अपरिहार्य ठरते; पण जेथे असे इलाज वारंवार करावे लागतात ती व्यवस्था निकोप आहे असे म्हणता येणार नाही. याकरिता कर्जवसुली वर्षानुवर्षे पुरती व वेळेवर कशी होईल याकडे आपणां सर्वांस लक्ष पुरविले पाहिजे.

## पीक–कर्जाची योजना

पीक-कर्जाच्या योजनेची उभारणी, वैयक्तिक अगर सार्वत्रिक आपत्तीचा अपवादात्मक काल सोडला तर मालाची विक्री होताच पीक–कर्ज १०० टक्के परत होईल या समजुतीवर झालेली आहे. प्रत्यक्ष व्यवहार याहून फार निराळा झाला तर ही योजना टिकू शकणार नाही. पीक-कर्ज योजनेचा पाया भक्कम करण्यासाठी निदान दोन प्रकारे योजना केली पाहिजे. महाराष्ट्रातील काही भागांत पीक थोड्या-फार प्रमाणात बुडणे हे वारंवार घडते. अशा भागांत अवर्षणाच्या वर्षी पीक-कर्जाचे रूपांतर मध्यम मुदतीच्या कर्जात करणे आवश्यक आहे. असे न केल्यास पुढील व्यवहार खुंटतो, थकबाकीचे प्रमाण वाढते व शेती उत्पादन व बँकेचा कारभार या दोहोंवर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो. आपत्तीच्या काळी मध्यम मुदतीच्या कर्जाचा आधार देता यावा म्हणून एखादा विशिष्ट निधी निर्माण करण्याची कल्पना अनेक वर्षे चर्चिली जात आहे. तिला लवकरच मूर्त स्वरूप येऊन हा प्रश्न सुटण्याच्या मार्गास लागेल अशी मला आशा आहे.

याहूनही महत्त्वाचा आणि नित्याच्या नडीचा प्रश्न विक्री–योजनेचा आहे. तत्त्वतः सेवा सोसायटीच्या प्रत्येक कर्जदारावर आपल्या मालाची विक्री सहकारी संस्थांमार्फत करण्याचे बंधन असते. परंतु अनेक कारणांमुळे याची अंमलबजावणी होत नाही. सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा कारभार आज आहे त्यापेक्षा बराच जास्त व्यापक व कार्यक्षम झाल्याखेरीज ही अंमलबजावणी करणे सुकर अगर श्रेयस्कर होणार नाही. या अर्थी सहकारी कर्जव्यवहाराची सुस्थिती व सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा व्याप व कार्यक्षमता ही एकमेकांशी फार निगडित आहेत. सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा कारभार त्वरेने सर्वव्यापी होण्यास अनुरूप सरकारी धोरणाचा त्यास पाठिंबा हवा. शेतमालाच्या किमती स्थिरावणे व अन्नधान्यांचा पुरवठा व भाव यांवर वर्षभर योग्य नियमन ठेवणे या गोष्टींचे महत्त्व सरकारला यंदाच्या अनुभवावरून पूर्णपणे पटले असेल, असे मानण्यास हरकत नसावी. ही उद्दिष्टे साधण्याजोगी नियंत्रण-योजना सरकारने ताबडतोब हाती घेतल्यास राज्य व जिल्हा पातळीवरील सहकारी खरेदी-विक्री संस्थांस मोठ्या प्रमाणावर संघटित कार्य करण्यास संधी मिळेल. व्यापक सहकारी व्यवस्थेच्या प्रस्थापनेचा एक भाग म्हणून आणि सहकारी कर्जव्यवहाराच्या स्थैर्यास पोषक घटना म्हणून सहकारी खरेदी-विक्रीची वाढ मला फार महत्त्वाची वाटते. आणि याबाबतच्या सर्व हालचालीस सहकारी बँक व्यवस्था पूर्णपणे आर्थिक साहाय्य करण्यास तत्पर आहे असे मी या प्रसंगी आश्वासन देतो.

अलीकडे झालेल्या पाहणीमुळे पीक-कर्जयोजनेच्या एका मोठ्या अपुरेपणाकडे लक्ष वेधले आहे. ज्यांची शेती मोठी व पिके मोलाची त्यांसच पीक-कर्जाचा लाभ मोठ्या प्रमाणावर साहजिकपणे होतो. छोटे, कोरडवाहू भुसार पीक काढणारे शेतकरी यांना या पद्धतीत कर्ज अल्प प्रमाणात प्राप्त होते. एकंदरीत, निकृष्ट आर्थिक स्थितीतील उत्पादकास पीक-कर्जाची योजना फारशी अनुरूप नाही असा निष्कर्ष अपरिहार्यपणे निघतो. हे मान्य झाल्यावर अशा उत्पादक वर्गाकरिता किंवा ज्यास पीक-कर्ज योजना अजिबात लागूच नाही अशा मजूर, कारागीर वर्गाकरिता सहकारी कर्जयोजना कशी उभारता येईल हा प्रश्न साहजिक उद्‌भूत होतो. या सर्व निकृष्ट आर्थिक स्थितीतील व्यावसायिकांचा आर्थिक

व्यवहार बहुतांशी अस्थिर, कोत्या आणि संमिश्र पायावर उभारलेला असतो. तेव्हा अशांकरिता एखादी साधी, सोपी व सार्वत्रिक योजना काढणे कठीण दिसते. सर्व व्यवहार व्यक्तिगत तपासणे व संपूर्ण देखरेखीखाली त्यास नवीन वळण देणे अशा दिशेने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे असे सकृत्दर्शनी वाटते. प्रयोग करून अनुभव मिळविल्याखेरीज याबाबतच्या व्यवहार्य योजना बनविता येणार नाहीत. हे सर्व लक्षात घेऊन आपल्या बँकेने यंदा याविषयी थोडे प्रयोगात्मक प्रयत्न करण्यास सुरुवात केली. काही निवडक लहान गावांतील सेवा सोसायटींतील प्रत्येक सभासदाच्या आवकजावकीची संपूर्ण माहिती घेऊन त्यास ठराविक अंदाजपत्रकानुसार कर्ज पुरवठा मालाच्या रूपाने अगर रोखीने करावयाचा व सबंध मालविक्री व इतर योजनेनुसार परतफेडीची व्यवस्था करावयाची असे या प्रयोगाचे स्वरूप आहे. हा प्रयोग नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सहकार्याने होत आहे. प्रयोगासाठी निवडलेल्या चार सोसायट्यांनी त्यांच्या ३३६ सभासदांना दिलेल्या कर्जाचा तपशील पुढीलप्रमाणे :

| नवीन योजनेप्रमाणे मंजूर झालेली कर्जमर्यादा | रुपये | अंदाजी उत्पन्नाचे आकडे | रुपये |
|---|---|---|---|
| १) शेती कर्ज | १०२०७९ | १) शेती उत्पन्नातून | २७४०६० |
| २) लावटी व इतर-प्रापंचिक खर्च | ११४२६८ | २) शेतमजुरीतून | ३५३६५ |
| | | ३) दुग्धव्यवसायातून | ३५५५ |
| | | ४) इतर | ८३१८ |
| एकूण | २१६३४७ | एकूण | ३२१२९८ |

हे प्रयोग यशस्वी व्हावयाचे तर सभासद पूर्णपणे शिस्त पाळणारे व कार्यवाह अत्यंत कार्यदक्ष हवेत. या उपक्रमास नुकतीच सुरवात झाली असल्यामुळे इतक्यात काही अभिप्राय व्यक्त करणे शक्य नाही. यातून थोडेबहुत यश प्राप्त होईल आणि पुढील वर्षी आणखी मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारे प्रयोग करिता येतील एवढीच आशा मी आज व्यक्त करतो.*...

४

## थकबाकीची समस्या

...महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांतील पाऊसपाणी नेहमी अस्थिर असते हे थकबाकी कमी न होण्याचे प्रमुख कारण दर्शविले जाते. या बाबतीत काही उपाय योजण्याचा विचार बरीच वर्षे चालू आहे. ज्यावर्षी एखाद्या भागात पीक बुडेल त्यावर्षी तेथील कर्जदारास थकलेल्या कर्जाचे रूपांतर मध्यम मुदतीच्या कर्जात करून मिळावे व पुढील वर्षी मामुली पीक-कर्ज मिळण्याची व्यवस्था व्हावी; हा या विषयीच्या योजनेचा उद्देश असला पाहिजे. अशा प्रकारे व्यवहार स्थिरावण्याकरिता एखादा मोठा निधी उभारणे आवश्यक आहे हे अलीकडे सर्वमान्य झाले होते. परंतु निधी उभारणीचा तपशील ठरविणे आणि या दिशेने प्रत्यक्ष कार्य करणे हे अजून झाले नव्हते. आपल्या संस्थांतील भाग-भांडवलावर सरकारला मिळणाऱ्या उत्पन्नामधील काही अंश या निधीकरिता आजवर वेगळा ठेवला जात असे. ही रक्कम इतकी अल्प होती की, तीतून आवश्यक निधीचा संचय होणे किंवा

* किता, २६-९-१९६४

वार्षिक अडचणींचा परिहार होणे हे काहीच घडत नव्हते. रिझर्व्ह बँकेने यंदा सर्वांच्या विचाराने एक नवीन योजना बनविली आहे. नवीन योजनेनुसार प्रथम एकवट मोठी रक्कम जमा करून निधीस सुरुवात करावी हे निश्चित झाले आहे. भारत सरकारच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र सरकारने याकरिता आपणांस रु. १ कोट देऊन निधि–स्थापना केली हे नमूद करण्यास मला फार आनंद होत आहे. महाराष्ट्रातील एकंदर सहकारी शेती कर्जव्यवहार जवळ जवळ रु. ६७ कोटींचा आहे. या मानाने रु. १ कोट ही रक्कम पुरेशी वाटत नाही. परंतु काहीतरी सुरुवात झाली ही गोष्ट समाधानाची मानली पाहिजे. आता राज्य बँक व जिल्हा बँका या सर्वांनी मिळून हा निधी सतत वाढविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या नफ्यापैकी १५ टक्के एवढी रक्कम प्रतिवर्षी या निधीत जमा करावी असा आपल्या बँकेचा विचार आहे. जिल्हा बँकांनी हेच प्रमाण स्वीकारावे अशी त्यांस शिफारस करण्यात येत आहे.

पिकाची अशाश्वती याबरोबरच बहुसंख्य छोट्या शेतकऱ्यांची निकृष्ट आर्थिक स्थिती हीही थकबाकीस जबाबदार आहे. स्वतःच्या नित्याच्या व्यवहाराची ज्यांस नीट तोंडमिळवणी करता येत नाही त्यांनी बचत करणे व विकास योजनांत सहभागी होणे हे दूरच राहाते. या मोठ्या वर्गाच्या समस्यांकडे सहकारी संस्थांनी दुर्लक्ष केले आहे याची जाणीव अलीकडे विशेष भासू लागली आहे. अर्थात छोट्या शेतकऱ्यांहूनही ज्यांची परिस्थिती हलाखीची, असे ग्रामीण भागांतील शेतमजूर, कारागीर, अलुतेबलुते व आदिवासी यांच्यापर्यंत आपण अजून जवळ जवळ पोचलोच नाही. या सर्व असमर्थ वर्गाच्या समस्या एकजातीय नाहीत, अवघड आहेत. हे लक्षात घेऊन गतवर्षीपासून आपल्या बँकेने या उकलण्याकरिता अनेक लहान लहान प्रायोगिक उपक्रम करण्याचे ठरविले. नाशिक जिल्ह्यातील चार गावांत जिल्हा बँकेच्या साहाय्याने सुरू केलेल्या एका प्रयोगाचा मी गतिवर्षी उल्लेख केला. सभासदांच्या सर्व गरजा पूर्णपणे योग्य नियमानुसार भागविणे हा योजनेचा उद्देश होता. निवडलेल्या चार गावांपैकी तीन गावांत योजना इतकी यशस्वी झाली की, ती अधिक व्यापक स्वरूपात चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नाशिक जिल्ह्यातील ही गावे मुख्यतः आदिवासींची होती. छोट्या शेतकऱ्यांच्या समस्यांच्या दृष्टीने गतवर्षी वर्धा जिल्ह्यातील एका गावाची सखोल पाहणी बँकेने करविली आणि यंदा काही विकासात्मक कार्यक्रमांचा समावेश करून संपूर्ण पैसापुरवठ्याची नियंत्रित योजना या गावास लागू करण्यात येत आहे.

## असमर्थ वर्गाचे प्रश्न

आजवर आलेल्या अनुभवांवरून असमर्थ वर्गाचे प्रश्न सोडविण्याकरिता प्रयत्न करणे आपल्या आवाक्याबाहेर नाही व मर्यादित प्रमाणात हे सोडविणे अशक्य नाही असे प्रत्ययास आले आहे. त्याचबरोबर हे प्रश्न बहुरूपी, विविधांगी व विलक्षण गुंतागुंतीचे आहेत हेही लक्षात आले आहे. तेव्हा असमर्थ वर्गाच्या प्रश्नांचा व त्यांना साहाय्य देणाऱ्या योजनांचा विचार करणे व पाठपुरावा करणे यासाठी बँकेत एक स्वतंत्र विभाग उघडावा असा निर्णय यंदा घेण्यात आला आहे. ग्रामीण कारागिरांच्या, मच्छीमारीच्या, जंगल कामगारांच्या व इतर मजुरांच्या सहकारी संस्था, सहकारी शेती संस्था, छोट्या शेतकऱ्यांकरिता काढलेल्या दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन संस्था इत्यादी सर्वांचे प्रश्न या विभागात हाताळले जातील. तसेच या वर्गाच्या सहाय्यार्थ प्रयोगादाखल जे जे नवीन उपक्रम करण्यात येतील त्यांवरही या विभागाची देखरेख राहील. काही उपक्रमांचा उगम येथेच होईल. पण हे काम मोठ्या प्रमाणावर व्हावयाचे तर सर्व जिल्हा सहकारी बँकांनी यात तत्परतेने सहभागी झाले पाहिजे. प्रत्यक्ष कार्य सर्वच जिल्हा बँकांच्या क्षेत्रात, त्यांच्यामार्फत करावयाचे आहे. शिवाय स्थानिक परिस्थितीस अनुरूप असे नवीन प्रयोग आखणे व कार्यान्वित करणे हेही त्यांनी हाती घेतल्यास या कार्यास उठाव

येईल व ते लवकर सफल होईल. असल्या सर्व उपक्रमांस लागणाऱ्या पैशाचा व तज्ज्ञ सल्ल्याचा पुरवठा राज्य बँकेमार्फत होऊ शकेल असे मी त्यांस आश्वासन देतो. तसेच यांतील कोणत्याही प्रयोगात जिल्हा बँकेस घस सोसावी लागली तर त्यातील अर्धा वाटा उचलण्याची राज्य बँकेची तयारी आहे या गेल्या वार्षिक परिषदेत केलेल्या घोषणेचा या प्रसंगी पुनरुच्चार करतो.

असमर्थांस समर्थ करणे हे सहकारितेचे प्रमुख कार्य समजले जाते. समर्थ होण्याकरिता सहकारितेत असमर्थांस अनेक पथ्ये पाळावी लागतात. स्वार्थास मुरड घालण्याची तयारी, सामूहिक हिताबाबत जागरूकता, संयमी वर्तन ही यांतील प्रमुख समजली जातात. परंतु सहकाराची कास धरून जे समर्थ होतात त्यांनीही पथ्यपालन चालू ठेवावे की नाही, तसेच आपण सर्वच समाज सहकारी बनविण्याची भाषा बोलू लागलो म्हणजे या पथ्यकर, संयमी वर्तनाची व्याप्ती किती वाढवावी लागते अशा प्रश्नांचा आजवर आपण फारसा विचार केला नाही. गेल्या दहा वर्षांत सहकारितेने जी झपाट्याने प्रगती केली आणि अनेकांस समर्थ बनविले त्यामुळे हे नवे प्रश्न महत्त्वाचे ठरू लागले आहेत. सहकारी कारखानदारी हे महाराष्ट्राचे भूषण आहे. या समर्थ कारखानदारांनीही सहकारी कार्यक्षेत्र विभागणीच्या योग्य सीमा पाळल्या पाहिजेत. नहून सर्व व्यवस्थेचा तोल बिघडेल हे अलीकडे आग्रहाने सांगावे लागले. तसेच देशव्यापी सहकारी व्यवस्था बांधू पाहणाऱ्यांनी व्यक्तिस्वार्थाप्रमाणेच विशिष्ट समूहाच्या हितासही मुरड घालून व्यापक राज्य व देशहिताकडे पाहणे किती अत्यावश्यक आहे हेही अलीकडील अनुभवांवरून सुस्पष्ट झाले. सहकारितेचे सामर्थ्य संघशक्तीत आहे आणि ज्यामुळे सांघिक एकोपा भंगेल वा दुरावेल असे वर्तन सहकारी पुढाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी त्याज्य गणले पाहिजे असा या अनुभवाचा अर्थ आहे.

महाराष्ट्र राज्यातील अलीकडील अन्नधान्य समस्येच्या अनुषंगाने, सहकारी वृत्तिप्रवृत्तींचा अधिक व्यापक भूमिकेवरून विचार करण्याची गरज मला विशेष भासू लागली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग सोसायटीच्या एकाधिकारी ज्वारी खरेदी योजनेस आपल्या बँकेने पैसा पुरविल्याचा उल्लेख मी आधीच केला आहे. इतर अनेक प्रकारे आपण या योजनेत सहभागी झालो. किंबहुना समग्र सहकारी व्यवस्थेने पुरस्कारिलेली व राज्यभर राबविलेली भारतातील पहिली मोठी योजना असे मी तिचे वर्णन करतो. ही योजना बऱ्याच अंशी यशस्वी झाली हे जितके खरे तितकेच ती काही अंशी अयशस्वी झाली हेही खरे. आणि जे अपयश आले ते समर्थांच्या असहकारामुळे हेही आता सर्वमान्य आहे. सहकारी कर्जवाटप महाराष्ट्रात सार्वत्रिक आहे आणि ते मुख्यतः सधन व मध्यम शेतकऱ्यांस होते असा आजवरच्या सर्व पाहण्यांचा निष्कर्ष आहे. यावरून ज्या समर्थांनी ज्वारी विक्रीबाबत असहकार केला ते मोठ्या प्रमाणात सहकारी संस्थांचे सभासद व कर्जदार होते असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा. शासन त्यांचे नियमन करण्यास असमर्थ दिसते. अशा वेळी आपणांतील समर्थांचे नियमन करण्याची शक्ती सहकारी व्यवस्थेत तरी आहे किंवा नाही हे पाहणे अत्यंत अगत्याचे ठरते. सहकारितेचे नियमन शासनाच्या नियमनाहून अगदी भिन्न प्रकारचे असते. त्यात सामर्थ्याचा, सक्तीचा भाग अत्यल्प, नैतिक बळाचाच अधिक. बुद्धीस पटवून, माणुसकीस आवाहन करून, समाज विघटनेचे धोके समजावून हे नियमन करावयाचे असते. या समर्थांच्या नियमनाच्या अवघड कार्याकडे आता सहकारी पुढाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी या प्रसंगी मी जाहीर कळकळीची विनंती करीत आहे. मोठ्या बागाइत-दारांच्या वाढत्या द्राक्षोत्पादनाचे वाढते उत्पन्न सतत टिकावे म्हणून गरीब देशातही दारूचे उत्पादन वाढवावे असे जर सांगता येते, तर या राज्यात गोरगरिबांस पोटभर अन्न मिळावे म्हणून मोठ्यांनी तांदूळ, ज्वारी सरकारास विकावी, एवढेच नव्हे तर धान्योत्पादनाखाली जास्त क्षेत्र कटाक्षाने आणावे असा आग्रह धरणे अयुक्त ठरेल काय ? अन्नधान्य समस्या सोडविण्याच्या दृष्टीने सगळ्यांची वाटचाल व्हावी म्हणून सहकारी बँका व इतर संस्था यांस काय उपाययोजना करता येईल याचा आपण गंभीरपणे

विचार करण्याची पाळी आली आहे असे माझे मत आहे. आजच्या आणीबाणीच्या प्रसंगी हा मोठा प्रश्न सोडविण्यास आपण मदत करू शकलो तर सहकारी व्यवस्था खरोखर समर्थ आहे आणि ती वाढणे व समर्थ होणे हे समाजहितास पोषक आहे असे पूर्णपणे सिद्ध होईल.

## व्याजाचे दरातील वाढ

बँकेच्या एकूण व्यवहार–परिस्थितीत गेल्या वर्षात फार महत्त्वाचे फरक घडून आले. रिझर्व्ह बँकेने आपला व्याजाचा दर दोनदा वाढविला. यामुळे तो वर्षात साडेचार टक्क्यांऐवजी ६ टक्के झाला. सहकारी बँक-व्यवहाराच्या दृष्टीने महत्त्वाचा फरक म्हणजे शेती कर्जावरील रिझर्व्ह बँकेचा सवलतीचा दर वर्षाच्या सुरुवातीस अडीच टक्के होता तो १९६५ फेब्रुवारी अखेर ४ टक्के झाला हा होय. रिझर्व्ह बँकेने केलेली ही करवाढ या क्षेत्रातील समग्र सरकारी धोरणास मिळालेल्या नवीन वळणाची द्योतक आहे. विकास योजनांची प्रगती जोराने होत असताना व्याजाच्या दराची पातळी खाली ठेवणे हे अप्रस्तुत, एवढेच नव्हे तर धोक्याचे आहे, हा विचार नवीन सरकारी धोरणाच्या बुडाशी आहे. त्यामुळे आपल्या कर्जावरील व्याजाचा दर वाढवितांना रिझर्व्ह बँकेने व्यापारी बँकांस ठेवीवरील व्याजाचे दर वाढविण्याचाही आदेश दिला. परिणामी सर्व पैशाची उलाढाल पूर्वीपेक्षा दीड-दोन टक्के उंचीच्या दरांवर होऊ लागली. ठेवीच्या दरांवरील आदेश आपल्या बँकेस प्रत्यक्ष दिला नसला तरी इतर बँकांच्या बरोबरीने आपणांसही ठेवीचे दर वाढविणे भाग पडले. ठेवीरूपाने मिळणारा पैसा व रिझर्व्ह बँकेची कर्जे दोन्ही महागल्यामुळे आपणांस आपल्या व्याजाचे दर वाढवणे प्राप्त झाले.

झाले हे सर्व अपरिहार्य व सरकारी धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने आवश्यक असेच झाले. परंतु या सर्व घडामोडींशी निगडित असा सहकारी कर्ज-व्यवहाराबाबत एक महत्त्वाचा प्रश्न अजून अनिर्णीत आहे. त्याचा लवकर समाधानकारक निकाल लावणे मी महत्त्वाचे समजतो. सहकारी कर्जव्यवहारांतील खरा महत्त्वाचा दर बँक-कर्जाचा नसून सेवा व इतर प्राथमिक सहकारी संस्था आपल्या सभासदांस जो आकारतात तो आहे. आज अनेक वर्षे हा दर ७$\frac{1}{2}$ असा आहे. महायुद्धोत्तर हा ठरला गेला, तेव्हा रिझर्व्ह बँकेचा व्याजाचा दर ३ टक्के होता. १९५१ ते १९६३ या कालात रिझर्व्ह बँकेचा दर क्रमक्रमाने ३ टक्क्यांपासून ४$\frac{1}{2}$ टक्यांपर्यंत वाढला. तरी प्राथमिक सोसायट्यांना आपला दर वाढवावा लागला नाही. कारण वाढलेले दर जिरवण्यास बँक-व्यवहारांत माया होती. ही माया नाहीशी झाली आणि एका वर्षाच्या आत दीड टक्क्याने रिझर्व्ह बँकेचे व इतर सर्व दर वाढले. यामुळे सहकारी बँक-व्यवस्थेस आपले सर्व व्याजाचे दर वाढवावे लागले. असे असूनही प्राथमिक सोसायट्यांनी आपले दर वाढवू नयेत किंवा अत्यल्प वाढवावे असा एक सूर ऐकू येतो. या प्रश्नाचा विचार दीर्घकालीन परिस्थिती लक्षात घेऊन केला पाहिजे. हिंदुस्थान सरकारच्या मते पैशाच्या व्यवहाराच्या दराची एकंदर पातळी कायमची वाढविणे श्रेयस्कर आहे असे दिसते हे वर सांगितले. यावरून हल्लीची वाढ तात्पुरती आहे, ती लवकरच कमी होईल असे मानण्यास बिलकूल जागा नाही. तसेच एखाद्या टक्क्याने दर कमी ठेवला तर त्याचा खरा फायदा हजारांत कर्ज काढणाऱ्यास मिळतो, ज्यांचे कर्ज शेकड्यांत आहे त्या बहुसंख्यांकांस नाही हे उघड आहे. आणि हल्ली मोठ्या रकमेने कर्ज काढणाऱ्यांचा दर मुद्दाम कमी करणे आवश्यक वाटावे अशी परिस्थिती नाही. शिवाय या विषयाचा विचार करताना खरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सहकारी व्यवस्थेच्या स्थैर्य व कार्यक्षमतेबाबतचा आहे. रिझर्व्ह बँकेचा दर व प्राथमिक संस्थांच्या सभासदांस आकारलेला दर यांतील मोठा वाटा प्राथमिक संस्थांकडे जातो आणि हा टिकवणे त्यांच्या नित्याच्या कार्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. प्राथमिक सेवा-संस्था या सहकारी कर्जव्यवस्थेत पायाभूत आहेत. त्यांचा कारभार बिनधोक

चालल्याखेरीज बँकव्यवहारात स्थैर्य व सुरक्षितता नाही. अनेक सेवा-संस्थांस आज सेवकांना पुरेसे पगार देता येत नाही. व त्यामुळे कर्जव्यवहार, वाटप व वसुली, हे समाधानकारक होत नाहीत अशा तक्रारी चोहोकडे ऐकू येतात. अलीकडे संमत झालेल्या व्यवस्थेप्रमाणे बँकांकडे देखरेखीबाबत काही अधिकार येणार आहेत व त्यांसंबंधी त्यांजवर काही आर्थिक जबाबदारीही पडणार आहे. परंतु मूलतः सेक्रेटरीची व्यवस्था भक्कम असल्याशिवाय या व्यवस्थेचा उपयोग होणार नाही. तेव्हा या प्राथमिक संस्थांच्या उत्पन्नाच्या व कारभाराच्या मूलभूत प्रश्नाबाबत खात्याने अगर सरकारने एकतर्फी निर्णय न घेता त्याची सखोल, सर्वांगीण चर्चा करावी अशी माझी आग्रहपूर्वक सूचना आहे.

## रिझर्व बँकेचे नियंत्रण

सहकारी बँक-व्यवस्थेची व्याप्ती व व्यवहार ही दोन्ही अलीकडेपावेतो मर्यादित होती. तेव्हा पैसा व पत या विषयीच्या अखिल भारतीय धोरणात त्याकडे लक्ष न देता केवळ राज्य सरकारांच्या नियमनात सहकारी बँक-व्यवस्था ठेवण्यात आली होती. अलीकडे सहकारी बँक-व्यवहाराची वाढ पुष्कळ झाली आहे व पुढे हा व्यवहार झपाट्याने योजनात्मक वाढविण्याचा विचार आहे. या बदलत्या परिस्थितीत खाजगी व्यापार बँकांप्रमाणे सहकारी बँकांसही रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली आणण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला आणि काही महिन्यांपूर्वी तत्संबंधी एक विधेयक पार्लमेंट पुढे मांडले. हे लोकसभेने मान्य केले असून राज्यसभेत ते लवकर मान्यता पावेल असा अंदाज आहे. राज्य सहकारी बँकांच्या अखिल भारतीय संघाने या विधेयकाचा काळजीपूर्वक विचार केला आणि त्यास जरी तत्त्वतः विरोध केला नाही तरी त्यातील काही तरतुदी व विशेषतः विधेयकाची अंमलबजावणी याविषयी महत्त्वाच्या सूचना अर्थमंत्र्यांस केल्या. महाराष्ट्रातील सहकारी बँक असोसिएशननेही असेच विचार प्रकट केले. अर्थमंत्र्यांनी सर्व सूचनांचा विचार करून बरीच समाधानधारक आश्वासने त्याबाबत दिली. नियंत्रण आले तरी याच्या अनुषंगाने येणाऱ्या विमा-योजनेचा फायदा सहकारी बँकांस ताबडतोब मिळणार नाही ही एक आमची या विषयीची प्रमुख तक्रार आहे. विधेयकास मान्यता मिळाल्याबरोबर महाराष्ट्र सरकार आवश्यक तो बदल सहकारी कायदेशीर तरतुदींत करील व सहकारी बँकांचा विमा-योजनेत समावेश लवकरच होईल अशी मला आशा आहे. दिवसेंदिवस ठेवीबाबतची स्पर्धा अधिक तीव्र होत आहे; तेव्हा विमा-योजनेचे संरक्षण मिळणे हे सहकारी बँकांच्या विशेषतः नागरी सहकारी बँकाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे.

रिझर्व बँकेकडून शेतीकरिता मिळणारी कर्जे यांजवर आपला व्यवहार फार मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. ही कर्जे प्रत्येक जिल्हा बँकेस तिचे भाग–भांडवल, सोसायट्यांचा कर्जव्यवहार इत्यादींच्या प्रमाणात, राज्य बँकेमार्फत मिळतात. विदर्भ व मराठवाडा विभागांतील जिल्हा बँकांस आजवर ही कर्जे मिळण्याकरिता राज्य सरकारची हमी शिवाय द्यावी लागे. हा फरक ऐतिहासिक परिस्थितीमुळे घडून आला होता. परंतु महाराष्ट्र राज्य बनल्यानंतर निरनिराळ्या विभागांतील जिल्हा बँकांची विश्वासार्हता व कार्यक्षमता ही बहुतांशी एकसारखी झाली आहेत व कोणत्याही विशिष्ट विभागाबाबत आता सरकारी हमी मागण्याची जरुरी नाही असे आपण रिझर्व बँकेस अनेक वर्षे सुचवीत आलो. आपली सूचना रिझर्व बँकेने मान्य केली आहे व चालू वर्षापासून कोणत्याच जिल्हा बँकेस या कर्जाच्या हमीकरिता राज्य सरकारकडे जावे लागणार नाही हे नमूद करण्यास मला आनंद होत आहे....*

* किस्ता, २५-९-१९६५

## ५

### थकबाकीचा प्रश्न

गेल्या दोन वार्षिक भाषणांत महाराष्ट्र राज्यातील सहकारी कर्जव्यवहारातील थकबाकीच्या प्रमाणाचा मी उल्लेख केला होता व हे प्रमाण हळूहळू उतरत राहील अशी आशा व्यक्त केली होती. परंतु अहवालाच्या साली या दिशेने काही प्रगती होऊ शकली नाही हे नमूद करणे प्राप्त आहे. याबाबतचा मुख्य दोष सहकारी संस्थांचा नसून निसर्गाचा आहे असे म्हणणे युक्त होईल. गतवर्षीच्या भाषणात एखाद्या भागात पीक बुडाले तर तेथील कर्जदारास थकलेल्या कर्जाचे रूपांतर मध्यम मुदतीच्या कर्जात करून मिळावे व पुढील वर्षी मामुली पीक-कर्ज मिळण्याची व्यवस्था व्हावी, याकरिता एक मोठा स्थैर्यनिधी उभारणे आवश्यक आहे हे सर्वमान्य झाल्याचे नमूद केले होते. तसेच याविषयीच्या नवीन योजनेप्रमाणे भारत सरकारच्या शिफारशीवरून महाराष्ट्र सरकारने एक कोट रुपये आपणास देऊन निधी स्थापण्यास सुरुवात केली असेही नमूद केले होते. निधि-स्थापनेनंतर तिचा विनियोग करण्याची वेळ इतक्या लवकर येईल याची गतवर्षी भाषण करीत असता मला कल्पना नव्हती. परंतु सप्टेंबर महिन्याच्या मध्यानंतर जवळ जवळ सर्व राज्यभर पाऊस एकदम थांबला आणि पावसाळी पिकांस बराच धोका उत्पन्न होऊन हिवाळी पिकांच्या पेऱ्याबद्दलही अनिश्चितता उत्पन्न झाली. यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांतून कर्जवसुली करणे फार अवघड होणार असून फार मोठ्या प्रमाणावर कर्जाचे रूपांतर करण्याकरिता स्थैर्य निधीचा उपयोग करावा लागेल असे वाटू लागले. आपली बँक व रिझर्व बँक या दोन्ही संस्थांनी संभाव्य परिस्थितीचा अंदाज घेऊन पुढील योजनांच्या विचारास तातडतोबीने सुरुवात केली. ज्या जिल्ह्यांतून परिस्थिती विशेष बिकट आहे असे आढळून आले तेथे तपशीलवार पाहाणी करून एकंदर मध्यम मुदतीत रूपांतर कराव्या लागणाऱ्या कर्जाचे प्रमाण, हे रूपांतर करण्याची पद्धती व त्याकरिता आवश्यक प्राथमिक तयारी यांविषयी अहवाल तयार केले. हे काम जिल्हानिहाय सुरू केले व काही प्राथमिक पाहणीच्या अहवालाच्या आधाराने समग्र विषयाबाबत एक टाचण बँकेच्या संचालक मंडळाच्या डिसेंबर महिन्याच्या सभेपुढे विचारार्थ ठेवण्यात आले. टाचणात अवघड परिस्थितीत सर्वांनी मध्यम मुदतीच्या कर्जात पीक-कर्जाचे रूपांतर करून घेणे हे शक्यतोवर कमी प्रमाणात करावे व जेथे जेथे ज्यांस जशी ऐपत असेल तशी त्यांनी शक्यतोवर परतफेड पूर्णतया करावी असे झाल्यासच ज्या भागाची आणि ज्या वर्गाची परिस्थिती विशेष बिकट आहे त्यास स्थैर्यनिधीतून भरपूर मदत करता येईल असे दर्शविण्यात आले. संचालक मंडळाने हे धोरण मान्य करून त्यानुसार अंमलबजावणी करण्याचा आदेश दिला. सर्वच जिल्हा सहकारी बँकांनी याचे शक्यतोवर पालन करून आपल्या बँकेस धोरणाच्या अंमलबजावणीत फार मोठी मदत केली. यामुळे अवर्षण जवळजवळ सार्वत्रिक असूनसुद्धा ज्या ज्या बँकांचा कारभार सर्वसामान्य बरा चालला होता त्या सर्वांस मध्यम मुदतीच्या कर्जात रूपांतर करून अगर वसुलीस तात्पुरती तहकुबी देऊन, या ना त्या प्रकारे, जरूर ती मदत आपणांस पूर्णपणे करता आली. महाराष्ट्र सरकारकडून स्थैर्यनिधीत गतवर्षी एक कोटीची रक्कम आली होती. त्यात यंदा आणखी दोन कोटींची भर पडल्यामुळे मध्यम मुदतीच्या कर्जात रूपांतर करण्यास पुरेसा निधी आपणाजवळ उपलब्ध झाला.

### सहकारी बँकांचे नियंत्रण करणारा मध्यवर्ती कायदा

...अहवालाच्या सालातील एक प्रमुख घटना म्हणजे सहकारी बँकांचे नियंत्रण करण्याचा संमत

झालेला मध्यवर्ती कायदा ही होय. या कायद्यान्वये सहकारी बँकांवरील देखरेख आणि त्यांच्या व्यवहाराचे नियमन यांविषयीच्या परिस्थितीत मोठा बदल झाला असे म्हणण्यास हरकत नाही. गतवर्षीच्या भाषणात हा कायदा संसदेत विचारार्थ असल्याचा मी उल्लेख केला होता; आणि त्याबाबत राज्य सहकारी बँकांच्या अखिल भारतीय संघाने मा. अर्थमंत्र्यांस केलेल्या सूचनाही नमूद केल्या होत्या. अहवालाच्या सालात संसदेने याबाबतचे विधेयक मान्य केले आणि १ मार्च १९६६ पासून त्याची अंमलबजावणी होऊ लागली. सहकारी बँकांच्या अखिल भारतीय संघाने केलेल्या सूचनेत एक महत्त्वाची सूचना अशी होती की प्राथमिक अगर जिल्हा पातळीवरील बँकांची पाहणी रिझर्व बँकेने प्रत्यक्ष स्वतःच्या अधिकाऱ्यांमार्फत न करता ज्या त्या राज्यांतील राज्य बँकेच्या मार्फत करावी. रिझर्व बँकेने ही सूचना तत्त्वतः मान्य केली असून महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक बँकांची तपासणी करण्याचे काम आपल्या बँकेवर सोपविण्याची तयारी दर्शविली आहे. या तपासणीच्या कार्याची दिशा निश्चित व्हावी व तीत सुसूत्रता येऊन पद्धत एकसारखी सार्वत्रिक व्हावी याकरता प्रथम रिझर्व बँकेचे अधिकारी व आपल्या बँकेचे अधिकारी मिळून मुंबईतील काही प्राथमिक बँकांची तपासणी करीत आहेत. या तपासणीत मिळालेल्या अनुभवावरून निश्चित पद्धत बसविण्यात आली, आणि आपल्या या शाखेतील अधिकारी वर्ग या कामात पूर्णपणे शिक्षित झाला म्हणजे हे काम आपल्या बँकेवरच सोपविण्यात येईल. काम जबाबदारीचे व जोखमीचे आहे व हे पत्करल्यामुळे काही अंशी आपणास घसही सोसावी लागेल. परंतु एकंदर सहकारी व्यवस्थेचा कारभार आणि मांडण एकसंघ राहणे या दृष्टीने ही जबाबदारी व घस सोसणे अत्यंत आवश्यक आहे. किंबहुना शिखरसंस्था या पदाच्या अनुरोधाने ती आपणावर स्वाभाविकपणे येऊन पडते असे मी मानतो.

नवीन संमत झालेल्या विधेयकास अनुसरून रिझर्व बँक कायदा कलम ४६ अन्वये आपली बँक व इतर काही राज्य सहकारी बँका शेड्यूल बँका म्हणून गणण्यास पात्र ठरल्या. आपली बँक १६ जुलै १९६६ पासून शेड्यूल बँक म्हणून काम करण्यास मान्यता पावली आहे. अहवाल साली केंद्र सरकारने बोनस कायदा संमत केला याचाही उल्लेख येणे आवश्यक आहे. सदर कायद्यात "बँकिंग कंपन्या" व त्या व्यतिरिक्त सर्वप्रकारच्या संस्था "इतर संस्था" अशी वर्गवारी केली असून "इतर संस्था" या सदरात सहकारी बँकांचा समावेश केला गेला होता. सहकारी बँका "इतर संस्था" या सदरात मोडत असल्यामुळे "बँकिंग कंपन्या" या सदरात मोडत असलेल्या बँकांना मिळत असलेल्या खास सवलतींना मुकत होत्या. हा भेदभाव दूर करून सहकारी बँकांना "बँकिंग कंपन्या" म्हणूनच गणले जावे अशा अर्थाची मागणी सहकारी बँकांच्या अखिल भारतीय संघाने केंद्र सरकारकडे केली. केंद्र सरकारने ही मागणी आता मान्य केली आहे.

## पैशाची चणचण

अहवालाच्या सालात महाराष्ट्र राज्यावर अवर्षणामुळे आलेल्या आर्थिक अरिष्टाचा मी वर उल्लेख केला आहे. याच्या जोडीस पैशाची चणचण हीही वर्षभर वाढत गेली. अहवालाच्या साली भारताची आर्थिक परिस्थिती क्रमाक्रमाने सारखी बिघडत होती; परिणामी वर्षअखेर रुपयाचे अवमूल्न करावे लागले. अवमूल्न करण्याआधी सरकारने जे निरनिराळे बचावात्मक उपाय योजिले, त्यांत सर्वप्रकारच्या पत व्यवहाराचा संकोच करणे हा एक प्रमुख उपाय होता. या धोरणामुळे अल्प मुदतीच्या वाढत्या व्यवहारालाही पुरेसा पैशाचा पुरवठा मिळणे दुरापास्त झाले. याहीपेक्षा ज्यांची गरज मुख्यतः मध्यम मुदतीची व दीर्घ मुदतीची कर्जे मिळविण्याची होती ते व्यवहार फारच अडचणीत सापडले. भू-विकास बँकेस याची झळ मोठ्या प्रमाणावर लागली. आणि त्या बँकेस आपण अल्प मुदतीकरिता करीत

असलेल्या कर्जांचा पुरवठा आणखी वाढविणे आपणांस प्राप्त झाले. याहून खरी अडचण झाली म्हणजे नवीन उभारलेल्या मोठ्या सहकारी प्रक्रिया संस्थांची. महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागांतून नवीन सहकारी साखर कारखान्यांबाबत अनेक अर्ज बरीच वर्षे मध्यवर्ती सरकारच्या विचाराधीन होते. त्यांपैकी काहींस शेवटी अहवालाच्या सालात परवाने मिळाले. पण परवाने मिळाले तरी दीर्घ मुदतींचे कर्ज देणाऱ्या संस्था त्यांना कर्ज मंजूर करण्यास असमर्थ आहेत असे दिसून आले. यामुळे या कारखान्यांच्या उभारणीकरिता लागणाऱ्या भांडवलाची तरतूद करण्याची योजना तयार करण्यात आपल्या बँकेस विशेष भाग घ्यावा लागणार अशी चिन्हे दिसत आहेत. साखर कारखान्यांपेक्षाही विकट असा सहकारी सूत गिरण्यांचा आजचा कार्यक्रम आहे. राज्य सरकारने काही वर्षांपूर्वी हा हाती घेण्याचे ठरविले होते. त्यावेळेस सहा गिरण्यांना आम्ही भांडवली कर्ज देऊ शकू असे आपल्या बँकेने सरकारला कळविले होते. राज्य सरकारचा हा कार्यक्रम हळूहळू फार विस्तारला आणि भांडवली कर्जे कोठून तरी मिळतील या भरवशावर निरनिराळ्या ठिकाणच्या सहकारी सूत गिरण्यांची नोंदणी करण्यात आली. यांपैकी अनेक गिरण्या उभारणीच्या किंवा यंत्र–सामग्रीबाबत करार करण्याच्या स्थितीप्रत अहवालाच्या सालात येऊन पोहोचल्या. परंतु आपण आश्वासिलेल्या सहा गिरण्यांखेरीज इतर गिरण्यांची दीर्घ मुदतीच्या कर्जांची अजून काही सोय होऊ शकली नाही. याबद्दल काही विचार करणे आपणांस आवश्यक झाले आहे.

आज अनेक वर्षे कोणतीही प्रक्रिया अगर मोठ्या भांडवलाची औद्योगिक संस्था सहकारी खात्याने नोंदण्याच्या आधी प्रकल्प योजनेचा कसोशीने अभ्यास व तपशिलाची छाननी करून मूळ आर्थिक पाया भक्कम आहे, योजना शास्त्रशुद्ध व संगतवार आहे, आणि पुढील कार्यक्रम व्यावहारिकदृष्ट्या संभाव्य कोटीतील आहे याची खात्री करून घ्यावी असे आपण वेळोवेळी सरकारास कळवीत आलो होतो. बँकेच्या उद्योग मंडळाने या कार्यात सहकार्यही देऊ केले होते. आपण आग्रहाने मांडलेल्या या विचाराकडे सरकार आणि सहकारी खाते हे नेहमीच लक्ष देते असे होत नाही. तरी आमचा सल्ला न घेताही नोंदल्या गेलेल्या सहकारी संस्था, सहकारी आणि मोठ्या म्हणून साहजिकच राज्य बँकेकडून आर्थिक साहाय्याची अपेक्षा करतात. अशा वेळेस अस्थिर पायावर उभारलेल्या, कार्यक्रम व कार्यपद्धती यांची मांडण शास्त्रशुद्ध न झालेल्या अशा संस्थेस साहाय्य करणे आपणांस कठीण जाते. परंतु नोंदलेल्या संस्थेस साहाय्य करीत नाही असे म्हटल्यास तिकडूनही आपल्यावर ठपका येतो. असे पेचप्रसंग शक्यतोवर टाळावे अशी माझी सरकारास व सहकारी खात्यास आग्रहाची व कळकळीची विनंती आहे. सहकारी सूत गिरण्यांच्याबाबत प्रत्यक्ष दीर्घ मुदतीची कर्जे देण्यास पैसाच कोठे उपलब्ध नाही ही विशेष अडचण आपणापुढे आज उभी झाली आहे. एकंदर आर्थिक परिस्थिती हळूहळू सुधारेल, नवीन संस्थांचे संचालक संयम व सावधानता दाखवितील व आजच्या या पेचप्रसंगातून सावकाशीने आपण मार्ग काढू अशी आशा आहे....*

* कित्ता, २१-९-१९६६

☆

# ४ . . ज्वारी खरेदी योजनेतील सहकारी संस्थांची कामगिरी

महाराष्ट्रातील सहकारी संस्थांनी राज्यसरकारच्या एकाधिकार पद्धतीने ज्वारी खरेदी करण्याच्या योजनेखाली बजावलेल्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी आपण आज जमलो आहोत. अशा वेळी ह्या योजनेमागील अन्नधान्यांच्या धोरणासंबंधी उल्लेख करणे जरूर आहे. कारण त्यामुळे एकूण भूमिका स्पष्ट होईल व भावी काळातील वाटचालीबद्दल मार्गदर्शन होईल.

## अन्नधान्यांसंबंधी सरकारी धोरण

१९५७ सालच्या अन्नधान्य चौकशी समितीला असे दिसून आले, की धान्याच्या खुल्या व्यापाराच्या बाजूने लोकमत प्रबळ असल्याने व शासनाच्या सर्वोच्च स्थानी ह्या बाजूने अनुकूल मतप्रवाह असल्याने अन्नधान्य धोरण आखण्यामध्ये व त्याच्या अंमलबजावणीमध्ये बरेच अडथळे निर्माण झाले. १९५७ नंतर लोकमत कोणत्या बाजूचे होते याचा अंदाज घेणे कठीण आहे, परंतु शासनाच्या सर्वोच्च स्थानी मात्र १९६४ पर्यंत खुल्या व्यापाराच्या बाजूने कल स्पष्टपणे दिसून येतो. वरील समितीने धान्याचे भाव स्थिर राखण्याच्या बाजूने व धान्यव्यापाराच्या सरकारीकरणाची जोरदार शिफारस केली असूनही ती डावलली गेली. १९५७ ते ६४ ह्या काळात धान्यव्यापार सरकारी क्षेत्रात आणण्याला केंद्रीय मंत्रालयाने सातत्याने विरोध केला. ह्या खात्याची अमेरिकेतून आयात होणाऱ्या धान्यपुरवठ्यावर सर्व भिस्त होती. विशेषतः गव्हाच्या आयातीमुळे तुटीच्या भागांना पुरवठा करता आला. खाजगी व्यापाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबून राहणे शक्य नसल्याचे आढळून आल्यावर स्वस्त धान्याच्या दुकानांच्या योजनेचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. तसेच गव्हासाठी व तांदळासाठी विभाग पाडण्यात येऊन तुटीचे प्रदेश शिलकी धान्याच्या प्रदेशांना जोडण्यात आले व त्यांच्या आंतरराज्य व्यापारातून तुटीच्या प्रदेशांच्या गरजा भागवण्याची तरतूद करण्यात आली. ह्या उपाययोजनांमुळे खाजगी व्यापाऱ्यांच्या हितसंबंधांना कुठल्याही प्रकारे धक्का पोहोचला नाही.

## अमेरिकन गव्हाचा आतापर्यंतचा परिणाम

गहू पिकविणाऱ्या प्रदेशांमध्ये अमेरिकन गव्हामुळे इतर धान्यांच्या पुरवठ्यावर व किमतीवर फार परिणाम झाला. भरडधान्ये पिकवणाऱ्या प्रदेशांमध्ये अमेरिकन गव्हामुळे धान्यांच्या किमती पडल्या व पुरवठ्यावर विपरीत परिणाम झाला. भात पिकवणाऱ्या प्रदेशांमध्ये आयात केलेले धान्य दुकानांना अपुरे पडल्याने तेथे भात गिरण्यांवर लेव्ही बसविण्यात आली. थेट शेतकऱ्यांकडून भात खरेदी करण्याची यंत्रणा न उभारता व्यापाऱ्यांमार्फत ही खरेदी झाली. सरकारी लेव्हीमुळे झालेला तोटा

व्यापाऱ्यांनी इतर भाताच्या विक्रीतून भरून काढला. अशा तऱ्हेने खाजगी व्यापाऱ्यांवर विसंबून राहण्याचे व मोजके ठिकाणीच हस्तक्षेप करण्याचे सरकारचे धोरण होते. धान्याचा राखीव साठा करून ठेवण्याचे सरकारी धोरणात बसत नव्हते. आयातीवर आपण विसंबून राहिलो. धान्यांच्या पुरवठ्यासंबंधाने नियोजनपूर्वक धोरण आखणे बाजूला राहिले व ह्यामुळे धान्यांच्या किमती घसरून अंतर्गत उत्पादनावर विपरीत परिणाम झाला. १९६४ पर्यंत अन्नधान्याचे हे धोरण असताना काही अडचणी उद्भवल्या, परंतु त्यांतून आपण कसेबसे निभावलो. १९६४ मध्ये मात्र धान्यपरिस्थिती फार बिघडली व ह्या धोरणाला जबरदस्त तडाखा बसला. सर्वत्र टंचाई असताना केंद्र सरकारजवळचा अल्प साठा कितीसा पुरा पडणार? भरडधान्ये पिकवणाऱ्या प्रदेशांमध्ये ह्या धान्यांचे भाव इतके कडाडले, की त्यांचा गव्हाच्या व तांदळाच्या किमतींशी संबंधच राहिला नाही. अशा वेळी प्रत्येक राज्याला आपले स्वतःचे धोरण असणे आवश्यक वाटू लागले. महाराष्ट्रामध्ये इतर राज्यांपेक्षा परिस्थिती अधिक गंभीर होती. भरडधान्यांचे महत्त्वही महाराष्ट्रात जास्ती आहे. त्यामुळे सर्वांत महत्त्वाच्या भरडधान्याची म्हणजे ज्वारीची खरेदी व वाटपव्यवस्था आपल्या हाती घेणे राज्य सरकारला भाग पडले.

धान्यांसंबंधीचे एकूण धोरण अद्याप सुस्पष्ट नाही. देशव्यापी धोरण ठरविले जाणार आहे, की राज्यपातळीवर ते आखले जाणार आहे, धान्यव्यापारात सरकार उतरणार आहे, की खाजगी व्यापाऱ्यांवरच भरवसा ठेवण्यात येणार आहे ह्या मूलभूत बाबींसंबंधाने अद्याप खुलासा व्हावयाचा आहे. शेतीमालाच्या किमती स्थिर पातळीवर ठेवण्याच्या दृष्टीने शिफारशी करण्याची शेतीमाल किमती-मंडळावर जबाबदारी टाकलेली असता त्या मंडळाने अगदी अलीकडे केलेल्या शिफारशी किमान किमतींबद्दलच आहेत. धान्य खरेदीची व वाटपाची व्यवस्था, ह्या व्यवहाराची व्याप्ती, किमती स्थिर ठेवावयाची पातळी ह्या संबंधित अशा मूलभूत गोष्टींचा पुरेसा खोलवर विचार झालेला नाही. केंद्र सरकारच्या धोरणातील अनिश्चितता राज्य सरकारच्या धोरणामध्ये प्रकट झाली आहे. त्यामुळेच ज्वारीच्या खरेदीची योजना पूर्वीच जाहीर झाली पण वाटपाचे धोरण अद्याप जाहीर झालेले नाही. परंतु आम्ही असे धरून चालतो की, दीर्घ मुदतीसाठीचे धोरण लवकरच आखले जाईल; आणि ते आखताना राष्ट्रीय, सामाजिक उद्दिष्टे ध्यानात ठेवली जातील व धोरण सुसूत्र राहील.

ह्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सहकारी व्यवस्थेने बजावलेल्या कामगिरीचा आपणांला विचार करावयाचा आहे; आणि भावी धोरणाच्या आखणीमध्ये व अंमलबजावणीमध्ये सहकारी व्यवस्था महत्त्वाची कामगिरी बजावू शकेल इकडे लक्ष वेधण्यात येत आहे.

## सहकारी यंत्रणेमार्फत ज्वारीची खरेदी

महाराष्ट्र सरकारने ज्वारी योजनेची अम्मलबजावणी राज्यातील समग्र सहकारी व्यवस्थेमार्फत करण्याचा निर्णय घेतला. समग्र सहकारी व्यवस्थेमार्फत असे म्हणण्याचे कारण असे की, राज्य सहकारी मार्केटिंग सोसायटी ही सरकारची मुख्य एजंट म्हणून नेमली गेली. परंतु इतर सर्व सहकारी संघटनांचा अंमलबजावणीसाठी उपयोग करण्यात आला. उत्पादकांकडून स्थानिक केंद्रांतून माल खरेदी केल्यापासून तो ग्राहकांना स्वस्त धान्यांच्या दुकानामार्फत विकेपर्यंतच्या मधल्या काळातल्या, माल हाताळणे, साठवण करणे, त्याची वाहतूक करणे वगैरे सर्व जबाबदाऱ्या संबंधित सहकारी सोसायट्यांनी आपल्या शिरावर घेतल्या. ही केवळ संघटनात्मक व्यवस्था न मानता राज्य सरकारने सर्व जबाबदारी सहकारी व्यवस्थेवर जाणीवपूर्वक व विश्वासाने टाकली आणि सहकारी क्षेत्राने त्याला सुयोग्य असा प्रतिसाद दिला. सहकारी व्यवस्था कशी होती हे स्पष्ट होण्यासाठी पुढील उदाहरणे पाहिली पाहिजेत.

मोठ्या प्रमाणावरील खरेदीचा व्यवहार पार पाडण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर पैका व हिशेबाची पद्धतशीर व्यवस्था आवश्यक होती. सहकारी बँकिंग व्यवस्थेने ही जबाबदारी आपल्याकडे घेतली. ह्यासाठी दोन गोष्टी आवश्यक होत्या. पहिली म्हणजे राज्य, जिल्हा व ग्रामीण पातळीवर खरेदीच्या वेळी साठवण करण्यासाठी, ठोक व किरकोळ वाटप करण्यासाठी वगैरेंसाठी वेळच्या वेळी पैशाचा पुरवठा करण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. ही जबाबदारी शिखर सहकारी बँक आणि जिल्हा-मध्यवर्ती बँका ह्यांनी अत्यंत एकसूत्रीपणाने पार पाडली. दुसरी गोष्ट म्हणजे खरेदी संबंधाने, पोत्यांची व पैशाची माहिती कळविणे, ह्या व्यवहारांचे हिशेब ठेवणे आणि ते वरच्यावर जुळवून घेणे वगैरेसाठी फार मोठ्या प्रमाणावर कुशल सेवकवर्गाची गरज होती. खरेदी-विक्री संस्थांकडे असा सेवकवर्ग अपुरा असल्याने सहकारी बँकिंगच्या क्षेत्रातून कुशल सेवकवर्ग वेगवेगळ्या पातळीवरील सहकारी खरेदी-विक्री संस्थांना पुरविण्यात आला.

सहकारी खरेदी-विक्रीची यंत्रणा खालपासून वरपर्यंत एकसूत्रीपणाने उभी होती, ही मुद्दा फार महत्त्वाची गोष्ट आहे. प्रत्यक्ष खरेदीचे काम जवळजवळ ८०० केंद्रांतून करण्यात आले. पण सर्व जबाबदारी शिखर मार्केटिंग संस्थेकडे होती. ह्याचा अर्थ असा होतो, की कुठल्याही एखाद्या केंद्राची कमतरता राज्यसंस्थेने स्वतः भरून काढली पाहिजे. एका अर्थाने सरकारला हे फार लाभदायक होते. कारण लहान लहान शेकडो केंद्रांकडे लक्ष ठेवण्याऐवजी एका (शिखर) संस्थेमार्फत व्यवहार करणे सुलभ गेले. सरकारने शिखर मार्केटिंगवर निश्चितपणे मोठी जबाबदारी टाकली पण सहकारी संस्थांच्या बांधणीसाठी तिचा चांगलाच उपयोग झाला. समग्र सहकारी व्यवस्थेत एकसूत्रीपणा निर्माण झाला व प्रत्येक केंद्राने आपली कामगिरी चोखपणे बजावली पाहिजे, अशी जाणीव निर्माण झाली. सरकारी व निमसरकारी संस्थांच्या व्यवहाराचे हे महत्त्वाचे अंग आहे. ज्या वेळी खाजगी क्षेत्रातील एखादी संस्था बुडीत ठरते तेव्हा ते त्या संस्थेचे वैयक्तिक अपयश समजण्यात येते; पण जेव्हा सहकारी अथवा सरकारी क्षेत्रातील एखादी संस्था बुडीत ठरते तेव्हा ते समग्र सहकारी अथवा सरकारी व्यवस्थेचे अपयश समजण्यात येते. एका अर्थी हे ठीकच आहे; कारण सरकारी अथवा सहकारी घटकांपुढील सामाजिक उद्दिष्टे सामूहिकपणेच पार पाडली जाऊ शकतात.

राज्य मार्केटिंग संस्थेवर सर्व जबाबदारी टाकण्यात आली असली तरी एखाद्या केंद्रावरील हालचालीची जबाबदारी त्या तालुक्याच्या खरेदी-विक्री संघावर एजंट म्हणून सोपविण्यात आली व ह्यामुळे विकेंद्रीकरण साधले गेले. खरेदीसाठी उपकेंद्रे उघडण्यात आल्यानंतर तर ज्वारी जमा करून ती केंद्रांवर नेण्याची जबाबदारी मोठ्या खेडेगावांमधील विकास सोसायट्यांनीही पार पाडली.

## धान्य खरेदीसाठी विकसित सहकारी यंत्रणा आवश्यक

सहकारी व्यवस्थेवर अशी जबाबदारी टाकण्यापूर्वी तिचा काही किमान पातळीपर्यंत विकास झालेला असणे अत्यावश्यक आहे. उदाहरण म्हणून महाराष्ट्रातील, जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या भांडवलामध्ये गेल्या दशकात झालेल्या वाढीचे व नवीन शाखा उघडण्याचे धोरण विचारात घेऊ. ज्वारी खरेदी योजनेच्या सुरुवातीस महाराष्ट्रामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या ५५० ठिकाणी शाखा होत्या. खरेदी यंत्रणा लवकर उभी करण्यासाठी ह्या शाखांचा फार उपयोग झाला. खरेदीसाठी, पैशाच्या पुरवठ्यासाठी, विक्रीची रक्कम जमा करण्यासाठी व हिशेब ठेवण्यासाठी बँकेची शाखा खरेदी केंद्राला जवळ उपलब्ध असणे अत्यंत महत्त्वाचे असते. कारण ह्यामुळे व्यवहार करणे सुलभ जाते. खरेदी-विक्री संघाची पुरेशी भक्कम संघटना ह्यासाठी उपलब्ध होती, हीही तितकीच महत्त्वाची गोष्ट आहे. वेगवेगळ्या पातळीवर अशा संस्था उपलब्ध असल्याने राज्य मार्केटिंग संस्थेला सुरुवातीची ४०० खरेदी केंद्रे

निश्चित करणे सुकर झाले. थोडक्यात म्हणजे अशा योजना हाती घेण्यासाठी स्थानिक पातळीवर पुरेसे अनुभवी व नवीन जबाबदाऱ्या स्वीकारण्यास तयार असलेले नेतृत्व आवश्यक असते.

महाराष्ट्रामध्ये वर सांगितल्याप्रमाणे तुलनात्मकरीत्या काही अनुकूल गोष्टी उपलब्ध असल्या तरी संपूर्ण यंत्रणा उभी करण्यासाठी सर्व पातळीवरील सहकारी कार्यकर्त्यांना व सहकारी सेवकवर्गाला अतोनात परिश्रम करावे लागले. राज्य सरकारने जाणीवपूर्वक धोका पत्करून सहकारी व्यवस्थेवर सर्व जबाबदारी टाकली व सहकारी क्षेत्राने ते आव्हान स्वीकारून आपल्या परीने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन मी करू शकत नाही. त्यांच्याकडून काही चुका झाल्या, काही ठिकाणी यंत्रणा अपुरी पडली, काही ठिकाणी त्यांना अपयश आले. ह्या गोष्टी अनपेक्षित नाहीत. परंतु एकूण गोष्टींचा सारासार विचार करता असे म्हणावेसे वाटते की, राज्य सरकारला येत्या वर्षी ही योजना चालू ठेवावयाची असेल तर ती सहकारी क्षेत्रावर सोपविण्याइतपत त्या क्षेत्राची कामगिरी समाधानकारक आहे.

ह्यासंबंधाने खर्चाच्या मुद्द्याकडे वळतो. सहकारी संस्था होणारा सर्व खर्च व्यवहारातून भरून काढतात. सहकारी क्षेत्राची स्वतःची अशी कडक शिस्त व बंधने आहेत. त्याच्या व्यवहाराची सरकारमार्फत तपासणीही होते. त्यामुळे ह्या संस्थांना खाजगी संस्थांप्रमाणे हातचलाखी करता येत नाही. तसेच त्यांना एखाद्या सरकारी खात्याप्रमाणे फक्त चालू खर्च भरून काढून चालत नाही, तर भांडवली खर्चासहित सर्व खर्च भरून काढावा लागतो. सहकारी यंत्रणेच्या खर्चाचा विचार करताना ह्या दोन्ही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. एकूण व्यापाचा विचार करता मला असा विश्वास वाटतो की, सहकारी संस्थांचा कारभार एकंदरीत चोखपणे व कमी खर्चात चालवला जाईल. एकंदरीत म्हणण्याचे कारण असे की, अशा योजनेखाली १।२ वर्षासाठी गुदामे बांधणे, यंत्रसामग्री आणणे, कुशल कर्मचारी तयार करणे सहकारी संस्थांना शक्य नाही. ही योजना पुरेशा दीर्घ मुदतीसाठी राबविण्याकरिता मिळणार असेल तर सहकारी संस्था अशी गुंतवणूक जरूर व त्वरेने करतील आणि ह्यामुळे खर्चातही बचत होईल.

सहकारी संस्थांनी ही जबाबदारी स्वीकारताना मालाचे चोख वजन करणे, तावडतोब रोखीने किंमत देणे, उत्पादकांच्या जास्तीत जास्त जवळ खरेदी–व्यवहार करणे, प्रतवारी लावणे, साठवणाची व्यवस्था करणे, पद्धतशीर वाटप करणे, चोख हिशेब ठेवणे ही उद्दिष्टे समोर ठेवली होती. ह्या गोष्टी त्यांनी फार उत्तम रीतीने पार पाडल्या असा दावा मी करीत नाही. आमच्याकडे पुरेसा अनुभव, वेळ आणि इतर गोष्टी नव्हत्या. परंतु थोडासा अवधी मिळाल्यास आम्ही आमचा कारभार पुष्कळच सुधारू शकू आणि आम्ही समोर ठेवलेले उद्दिष्ट गाठू शकू. मात्र त्यासाठी भावी धोरणाचा पुरेसा आधी अंदाज आला पाहिजे.

## खुल्या चर्चेचे महत्त्व

आमच्या कामगिरीचा आढावा घेतल्यास दोन गोष्टी साध्य होतीलसे वाटते. पहिली गोष्ट, सरकारी धोरणावर पुरेशा उच्च पातळीवर दुर्दैवाने साधकबाधक चर्चा होत नाही. त्यावर दररोज टीका मात्र वाचावयास मिळते. तेव्हा ह्या दिशेने आजची चर्चा म्हणजे चांगली सुरुवात होऊ शकेल. आणि दुसरी गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील अनुभवाची अखिल भारतीय दृष्टीने उपयुक्तता वाटते. येती अनेक वर्षे धान्याचे वाटप स्वस्त धान्याच्या दुकानांतून करावे लागेल; आणि त्यासाठी सर्व राज्य सरकारांना मोठ्या प्रमाणावर खरेदी करावी लागेल ही गोष्ट गृहीत धरून चालले पाहिजे. केंद्रीय अन्न व शेती मंत्रालय आणि धान्य महामंडळ ह्यांनी राष्ट्रीय पातळीवर काम पाहावे, धान्य आयातीची

व त्या वाटपाची व्यवस्था पाहावी आणि मूलभूत राष्ट्रीय धोरण आखून आंतरराज्य व्यापारामार्फत शिलकी विभागांतील धान्य तुटीच्या विभागांना पुरवावे. केंद्रीय धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारांना प्रत्येक उत्पादकापर्यंत पोहोचले पाहिजे आणि ह्याचा व्याप ज्वारी योजनेप्रमाणे फार प्रचंड राहील. मला असे वाटते की, भात गिरण्यांवर लेव्ही बसवून वसुली करण्याऐवजी थेट शेतकऱ्यांशी संपर्क साधला जावा. सर्व उत्पादकांना भाव बांधून देऊन त्यांच्याकडील धान्य खरेदी करण्याच्या व्यवहाराचा व्याप इतका मोठा आहे, की तो केंद्र सरकारच्या वा धान्य महामंडळाच्या आटोक्याबाहेरचा आहे. तेव्हा सर्व राज्यांमध्ये सहकारी व्यवस्थेचा ह्या कामी जरूर उपयोग करावा, हे महाराष्ट्रातल्या अनुभवावरून मी नम्रपणाने सुचवू इच्छितो. ही यंत्रणा समत्वाने चालणारी आहे. तिचे व्यवहार चोख ठेवता येतील आणि ती कमी खर्चिकही राहू शकेल. ह्या व्यवस्थे-समोर सामाजिक उद्दिष्टे आहेत. त्याचबरोबर आपली स्वायत्तता अबाधित राखून सरकारला ती हरतऱ्हेने उपयुक्त ठरेल. तिची घडणच अशी आहे, की तिचे सर्व व्यवहार खुले राहतील. सरकारतर्फे म्हणून काम करताना सरकारच्या हिताकडेही ती लक्ष पुरवील; म्हणून शासनाने तिचा उपयोग बिनदिक्कत-पणे करावा. ह्यामुळे विकेंद्रीकरणाच्या व स्थानिक नेतृत्वाला वाव देण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टांना चालना मिळेल.

वर सांगितल्याप्रमाणे घडण्यासाठी सहकारी क्षेत्राचा पुरेसा विकास झाला असला पाहिजे व शासनाने त्याकडे एक व्यवस्था म्हणून पाहिले पाहिजे व त्यांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ करू नये. सहकारी क्षेत्राच्या विचारांना पुरेसा मान दिला गेला तर सहकारी क्षेत्र आपली जबाबदारी समाधानकारकरीत्या पार पाडील. ह्या दृष्टीने गतवर्षीच्या व्यवस्थेतील ठळक उणीव मी नजरेस आणू इच्छितो. शासनाच्या सर्वोच्च पातळीपर्यंत सहकारी क्षेत्राचा आवाज पोहोचण्यासाठी यंत्रणा उपलब्ध नव्हती. आगामी वर्षात ही ऊणीव भरून काढली जाईल अशी मी आशा व्यक्त करतो.

*एकाधिकार ज्वारी खरेदी योजना* (मुंबई : दि महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटिव्ह मार्केटिंग सोसायटी लि., १९६५) पृ० ६–११

☆

# ५ . . 'सहकारी अर्थव्यवस्था' [प्रस्तावना]

भारतात सहकारी चळवळीची स्थापना विसाव्या शतकाच्या सुरुवातीला झाली. सावकारशाहीतून शेतकऱ्याची सुटका करणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट त्या वेळी होते. स्वातंत्र्योत्तर काळात फलित म्हणून सहकारी चळवळीचे रूपांतर सहकारी अर्थव्यवस्थेत झालेले आपण पाहात आहोत. सहकारी संस्थांची संख्या व कार्य यांत झालेली वाढ व सहकारी व्यवस्थेचा विविधांगी विस्तार गेल्या ८ वर्षांत बराच झालेला आहे. रिझर्व्ह बँकेच्या ग्रामीण पत-पाहणी समितीने सुचविलेला कार्यक्रम अनेक राज्यांत बहुतांशी पूर्णपणे अमलात येऊन समितीने सुचविल्याप्रमाणे पतपेढ्या व बँका यांची पुनर्व्यवस्था झाली आहे. तसेच पीक-कर्ज योजनेस तत्त्वतः सर्वत्र मान्यता मिळून प्रत्यक्षात ती अमलात आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. परिणामी, ग्रामीण भागातील सहकारी पत-यंत्रणेमार्फत पुरविण्यात आलेल्या कर्जाचे प्रमाण अनेक पटींनी वाढले आहे. काही राज्यांतील काही जिल्ह्यांत आता सहकारी अर्थव्यवस्था ही ग्रामीण भागातील विविध पत-संस्था व यंत्रणा यांत प्रमुख ठरली आहे. म्हणजे काही प्रदेशांत तरी रिझर्व्ह बँकेच्या वरील समितीचा कार्यक्रम पूर्णपणे यशस्वी ठरला आहे. त्याचबरोबर शेतीमालावरील प्रक्रिया आणि ग्रामीण भागातील खरेदी-विक्री सहकारी संस्था यांचीही सर्वांगीण प्रगती झाली आहे. प्रक्रिया संस्थांत सहकारी साखर-कारखान्यांची कामगिरी विशेष उठावाने दिसून येते. तसेच दुग्ध-व्यवसाय, भातगिरण्या, कापसावरील प्रक्रिया संस्था आणि सूत-गिरण्या इत्यादी बाबतही पुष्कळच प्रगती झालेली आहे व होत आहे. खरेदी-विक्री संस्थांचा व्यवहार मोठ्या प्रमाणात वाढला असून त्यांच्या व्यवहाराचा संबंध पत-व्यवहाराशी जोडण्याचे प्रयत्न काही अंशी यशस्वी झाले आहेत. याप्रमाणे १९५९–६० सालच्या सुमारास ज्या कार्यक्रमाच्या यशस्वितेबद्दल खात्री देता येत नव्हती तो बऱ्याच प्रमाणात प्रत्यक्ष यशस्वी झाला असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

सरकारी भागीदारीचा सर्वत्र स्वीकार झाला असून योग्य पथ्य पाळल्यास नवीन उपक्रमांची त्वरेने वाढ होण्यास सरकारी भागीदारीचा उपयोग होतो, ती अनिष्ट ठरत नाही, हे आता सर्वमान्य झाले आहे. सहकारी प्रक्रिया संस्थांत जी मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकली त्याचे एक कारण म्हणजे सरकारने त्या प्रीत्यर्थ केलेला भाग-भांडवलाचा पुरवठा हेच होय. तसेच प्राथमिक ग्रामसंस्थेच्या व्याप्तीबाबतचा वादही आता मिटल्यासारखा आहे. त्या छोटया असाव्या की मोठ्या असाव्या, त्यांनी एका खेड्यापुरतेच, एका क्षेत्रापुरते काम करावे की विविधांगी मोठे क्षेत्र व्यापावे या वादांचा निकाल होऊन सर्वसामान्यपणे सर्वत्र मध्यम तडजोडीची भूमिका मान्य झाली आहे.

सरकारी धोरण हे अनिश्चित व बिनसरकारी मताची आणि कार्यकर्त्यांची उपेक्षा करणारे, असे जे सुरुवातीस वाटत होते ते बहुतांशी बदललेले आहे. अजून अंमलबजावणीत जरी निश्चितता आणि

सुसूत्रता सर्वत्र सारखी दिसली नाही तरी घोषित धोरण बहुतांशी स्थिर आहे. तसेच बिनसरकारी पुढाऱ्यांच्या मतास व कार्यास सरकार, रिझर्व्ह बँक वगैरेंकडून अधिक मान्यता मिळत आहे. हे परिवर्तन होण्याचे एक कारण म्हणजे ठिकठिकाणी स्थानिक नेतृत्व जास्त प्रभावी होऊन नवीन संस्था काढणे व चालविणे याची जबाबदारी ते मोठ्या प्रमाणात पत्करीत आहे हे होय. आता नवीन उपक्रमांचा उगम बहुतांशी वरून व्हावा आणि बरेचसे संचालकत्व बाहेरचे असावे ही परिस्थिती पुढारलेल्या व विकसित राज्यांत बहुतांशी बदलली आहे. या परिवर्तनाचे दृश्य फळ म्हणून सहकारी सांघिक संघटनाही अनेक व समर्थ झाल्या आहेत. निरनिराळ्या सहकारी क्षेत्रांत ७-८ अखिल भारतीय संघटना स्थापन झाल्या असून त्या एकमेकींशी सहकार्य करून एक संयुक्त फळी निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. या सर्व घडामोडींचा सरकारी कारभार व धोरण यांवर निश्चित परिणाम झाला आहे.

अर्थात काही जुन्या समस्या शिल्लक आहेत, तसेच नवीन निर्माण झाल्या आहेत. सहकारी प्रवृत्तीची कक्षा व कार्यक्षमता यांत राज्याराज्यांत व विभागाविभागांत फार मोठा फरक अजून टिकून राहिला आहे. विकासाच्या क्रियेत जे इतरत्र आढळते ते येथेही घडत आहे. विशिष्ट दिशेने कोठे एकदा प्रगती झाली म्हणजे तेथेच तिचा वेग वाढतो आणि मागचे मागासलेलेच राहून दोहोंतील तफावत जास्त उत्कटपणे दिसून येते हे सहकारी क्षेत्रात आजही घडत आहे. सहकारी अर्थव्यवस्थेत हा फरक फारच मोठा दिसून येतो. जो कार्यक्रम काही राज्यांत जवळजवळ पूर्ण यशस्वी झाला, त्यापासून इतरांस काहीच फलनिष्पत्ती न झाली की काय असे भासण्यासारखी परिस्थिती आहे. सहकारी पत-व्यवस्था ही सहकारी ग्रामीण व्यवस्थेची रचना व प्रगती यांच्या केंद्रस्थानी आहे. म्हणून जेथे प्राथमिक पतपेढ्यांची संख्या व कार्यक्षमता यांची वाढ खुंटल्यासारखी दिसते तेथे सरकारी कृषि-पत मंडळ स्थापून त्याच्याद्वारा कर्जवाटप करावे व सहकारी व्यवस्थेच्या पुनर्मांडणीचा दरम्यान प्रयत्न करावा या जुन्या कल्पनेने अलीकडे पुन्हा उचल घेतली आहे. खरेदी-विक्री संस्था अगर प्रक्रिया संस्था या बाबतही अशीच तफावत दिसून येते. तेव्हा काही राज्यांतील आणि काही विभागांतील सहकारी व्यवस्थेची निष्क्रियता अगर मंदगती यांवर उपाययोजना शोधणे ही आज मोठी निकडीची गरज होऊन बसली आहे. सहकारी अर्थव्यवस्थेच्या वाढीस सरकारी पूरक धोरण योग्य नाही, हीही अडचण अनेक ठिकाणी कायम आहे. त्याचबरोबर पूरक धोरण योग्य असल्यास अल्पकाळात फार मोठ्या प्रमाणावर प्रगती होऊ शकते, हे गेल्या तीन वर्षांत एकाधिकार धान्य खरेदीच्या साहाय्याने महाराष्ट्रातील सहकारी खरेदी-विक्री संघटनेने जी मोठी शाश्वत फलदायी कामगिरी बजावली त्यावरून सिद्ध होते.

प्रगतीबरोबर अनेक नवीन समस्याही उत्पन्न झाल्या आहेत. प्रगत राज्यांत मोठ्या सहकारी संस्था या सामाजिक व आर्थिक सत्तांची केंद्रस्थाने बनल्यासारख्या झाल्या आहेत. त्यामुळे सत्तेचे केंद्रस्थान काबीज करणे किंवा ताब्यात ठेवणे याकरिता होणाऱ्या उलाढाली आणि त्यांतून निर्माण होणारे अनिष्ट प्रघात यांचा उपसर्गही सहकारी संस्थांस पोहोचू लागला आहे. सहकारी लोकराज्य निर्मितीकरिता संघा-संघांत आणि स्तरा-स्तरांत पूर्ण सहकार्य हवे ही गोष्ट अजून नवीन संस्था-चालक व संघ-चालक यांस पटली आहे असे दिसत नाही. शिवाय आर्थिकदृष्ट्या लवकर यशस्वी झाल्यामुळे तत्त्वाचा विसर पडावा असे अनेक ठिकाणी होताना दिसते. यश सुलभतेने मिळाल्यामुळे कार्यक्षमतेवरील कटाक्षही ढळलेला दिसतो. या सर्व समस्यांवर एकच उपाय म्हणजे शिक्षण व चिंतन यांवर भर देणे. सहकारी तत्त्वे, त्यांचे व्यावहारिक स्वरूप, सहकारी लोकराज्य निर्मितीकरिता सर्वत्र आवश्यक वृत्ती व पथ्ये यांविषयी सतत विचार व चर्चा होणे व त्यांचे शिक्षण मिळणे हे आवश्यक आहे. संचालक व सभासद,

सेवक व तंत्रज्ञ, सर्वांसच तात्त्विक, तांत्रिक व व्यावहारिक शिक्षण योग्य प्रमाणात सतत मिळत राहण्याची दक्षता घेतली पाहिजे. याच संदर्भात समर्थ संपादक-मंडळाच्या मार्गदर्शनाखाली प्रकाशित होणाऱ्या 'सहकारी अर्थव्यवस्था' या वार्षिकाचे मी स्वागत करतो. सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या दृष्टीने त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे असे मी समजतो.

*सहकारी अर्थव्यवस्था*, कृषि-औद्योगिक वार्षिक, प्रथम वर्ष, १९६७-६८ (कोल्हापूर : सहयोग प्रकाशन मंडळ, १९६८) पृ० ४-५

☆

# ६ . . महाराष्ट्रातील सहकारी अर्थव्यवस्थेचे बदलते स्वरूप

महाराष्ट्रामध्ये गेल्या २५ वर्षांत सहकारी बँक व्यवसायाने किती प्रगती केलेली आहे याचा आढावा प्रस्तुत लेखात घ्यावयाचा आहे. तसेच सहकारी व्यवस्थेतील कामकाज, व्याप्ती, कार्यक्षमता, आणि सहकारी यंत्रणेची उपयुक्तता यांविषयी चर्चा करणे आवश्यक वाटते.

स्वातंत्र्योत्तर काळात संस्थानांच्या विलिनीकरणामुळे आणि १९५६ व १९६० च्या दोन महत्त्वाच्या पुनर्रचनांमुळे राज्याच्या सीमारेषेमध्ये जे बदल झाले त्यांमुळे सहकारी चळवळीचा ऐतिहासिक आढावा घेणे बरेच अवघड झालेले आहे. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील बऱ्याच जिल्ह्यांच्या सीमारेषा बदलल्या असल्याने आजची स्थिती १९३९ सालापेक्षा वेगळी झालेली आहे. त्यामुळे सुसंगत आकडेवारी गोळा करताना अनेक अडचणी आल्या. सहकारी अर्थव्यवहाराचा राज्य आणि जिल्हा पातळीवरील विकास पाहता एकंदर द्रव्यबलात व व्यवहारात भरीव वाढ झालेली आढळते. धंद्याच्या उलाढालीतही महत्त्वाचे फेरबदल झालेले आहेत. १९३० च्या मंदीनंतरच्या दशकात शेतकी कर्जांची रक्कम फारशी वाढताना दिसत नव्हती. आणि जरी कर्जांची वसुली नियमितपणे होत असली तरी पहिल्या युद्धाच्या समाप्तीपासून १९४० पर्यंत सहकारी बँक व्यवसायाचा विकास मुख्यत्वे शेतीमालाच्या तारणावर दिलेल्या व्यक्तिगत कर्जांवर अवलंबून होता. ही परिस्थिती १९४८ मध्ये सहकारी बँक व्यवसायाची पुनर्रचना झाल्यानंतरच मूलतः बदलली. व्यक्तिगत कर्जे देण्याची प्रथा कमी करून पीक-कर्ज योजना हळूहळू अंमलात आणली गेली. त्यामुळे शेतकी कर्जांत अधिक प्रगती करता येणे शक्य झाले. १९५१ मध्ये रिझर्व्ह बँकेने जी अनौपचारिक परिषद बोलाविली त्यानंतर या नव्या विचाराला रिझर्व्ह बँकेने मान्यता दिली आणि ग्रामीण पत-पाहणीच्या मार्गदर्शक समितीच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्यामुळे राष्ट्रीय धोरण म्हणून हा विचार विस्तृतपणे मांडला गेला.

मार्गदर्शक समितीच्या शिफारशीनुसार मुंबई राज्यातील सहकारी बँक व्यवसायातील पुनर्रचना होत असताना रचनात्मक बदल कटाक्षाने करण्यात आला. १९३९ साली राज्य बँक बऱ्याच जिल्ह्यांत मध्यवर्ती बँक म्हणून काम करीत होती. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा बँकांची स्थापना करण्याच्या धोरणाचा १९४८ साली पुनर्रचनेच्या वेळी पाठपुरावा करण्यात आला. तथापि नव्या प्रदेशाची जोडणी आणि विदर्भ सहकारी बँकेचे सामीलीकरण यांमुळे नव्या पद्धतीनुसार पुनर्रचनेच्या कामाला १० वर्षांहून अधिक काळ लागला.

## विभिन्न पातळींवरील सहकारी यंत्रणा

सहकारी यंत्रणा तीन पातळींवर काम करीत आहे. प्राथमिक, ग्रामीण आणि नागरी सहकारी

संस्था पायाभूत, जिल्हा मध्यवर्ती बँका मधल्या पातळीवर आणि राज्य सहकारी बँक राज्य पातळीवर कामकाज करीत आहे. या यंत्रणेच्या कामकाजाचे वैशिष्ट्य प्रथम लक्षात घेतले पाहिजे. या व्यवस्थेत जमा झालेल्या बहुतेक ठेवी जिल्हा बँक आणि राज्य बँकेकडे गोळा होतात. प्रत्यक्ष उत्पादक शेतकरी आणि धंदेवाइकांना देण्यात येणारी कर्जे बहुतांशी प्राथमिक सहकारी संस्थांतून देण्यात येत असतात. बाहेरची उसनवारी मुख्यतः रिझर्व्ह बँकेकडून राज्य सहकारी आणि जिल्हा सहकारी बँकांमार्फत प्राथमिक सहकारी संस्थांना उपलब्ध होते. सहकारी व्यवस्थेमधील या यंत्रणेचा अभ्यास करताना वरील वैशिष्ट्य लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

सहकाराच्या इतर तत्त्वांप्रमाणे सहकारी पत-यंत्रणेचा उद्देश असमर्थास आर्थिक स्थैर्य लाभण्यासाठी मदत करणे हा होय. हा वर्ग आपल्या देशात मोठ्या संख्येने विविध व्यवसायांतून पसरलेला असल्यामुळे या वर्गाला सोयी उपलब्ध करण्यासाठी केंद्रेसुद्धा बरीच आणि सर्वत्र विखुरलेली असणे आवश्यक आहे. ग्रामीण विभागांतील ही गरज भागविण्यासाठी आपण एक तत्त्व मान्य केलेले आहे. "प्रत्येक खेड्याला एक सहकारी संस्था" अथवा अगदी अलीकडे "प्रत्येक ३०० लोकवस्तीला एक सहकारी संस्था" हे नवीन तत्त्व स्वीकारण्यात आलेले आहे. छोट्या शहरांतून देखील प्राथमिक सहकारी संस्था काही विशिष्ट वर्गांसाठी अथवा ठिकाणाकरिता स्थापन होतात. नागरी बँकांची स्थापना आणि वाढ महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांतच झालेली आहे. परंतु व्यापारी बँकांच्या मानाने त्यांची संख्या कमी आहे. तथापि सहकारी क्षेत्रात प्राथमिक सहकारी संस्थांचे वैशिष्ट्य म्हणजे त्या संख्येने अधिक परंतु लहान आणि सर्वत्र पसरलेल्या आहेत. याच संस्थांमार्फत प्रत्यक्ष शेतकऱ्याला आणि व्यावसायिकांना कर्जपुरवठा होत असतो. अन्यथा इतर कोणत्याही संघटनात्मक मार्गाने त्यांना आपल्या गरजा भागविणे अशक्य असते.

## प्राथमिक संस्थांच्या गरजा

प्राथमिक संस्था लहान असल्यामुळे त्या स्वावलंबी असू शकत नाहीत. ह्या संस्था बँक-व्यवसायाची केंद्रे नसल्याने द्रव्यबलाचा त्यांच्याकडे अभाव असतो. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक त्यांना कर्जपुरवठा करून बँक व्यवसायाची संधी उपलब्ध करून देते. त्यामुळे त्यांच्या बहुसंख्य गरजा दूर होतात. अशा प्रकारे प्राथमिक सहकारी संस्थांना तपासणी, देखरेख, बँकेच्या सोई आणि कर्जपुरवठा उपलब्ध होत असतो. द्रव्यबलाचे विविध मार्ग हाताळण्याचे महत्त्वाचे काम राज्य सहकारी बँक करीत असते. रिझर्व्ह बँकेशी मध्यस्थाची आणि सहकारी पत-यंत्रणेतील मध्यवर्ती केंद्र म्हणून राज्य सहकारी बँकेची भूमिका सहकारी अर्थव्यवस्थेत महत्त्वाची समजण्यात येते. महाराष्ट्रातील सहकारी बँकांच्या संघाने मान्य केलेली परस्पर साहाय्य योजना महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने अमलात आणलेली आहे. याच संदर्भात या योजनेचा सध्या होत असलेला विकास आपण लक्षात घेतला पाहिजे.

सहकारी पत-यंत्रणा तीन पातळीवर काम करीत असली तरी प्राथमिक सहकारी संस्था बँक-व्यवसायाची केंद्रे होऊ शकत नाहीत. राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती बँक हीच फक्त सहकारी बँक-व्यवसायाची केन्द्रे होत. सहकारी पत-यंत्रणेसाठी रिझर्व्ह बँकेकडून द्रव्यबल मिळविण्याकरता या संस्था तांत्रिक दृष्ट्या आवश्यक आहेत. सहकारी पत-यंत्रणा तीन पातळींवर काम करीत आहे म्हणून ती तांत्रिकदृष्ट्या कमकुवत आहे असे म्हणता येणार नाही. कारण, राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती बँक या दोन संस्था नसत्या तर रिझर्व्ह बँकेला लागणारे दोन जामीन मिळणे अवघड झाले असते. तसेच प्राथमिक सहकारी संस्थांबरोबर व्यवहार करण्यासाठी राज्य सहकारी बँकेप्रमाणे जिल्हा बँका प्रत्यक्ष कर्जपुरवठा करू शकतील काय? अर्थातच जिल्हा मध्यवर्ती बँकांची क्षमता

राज्य सहकारी बँकेइतकी नाही, म्हणून हे काम त्यांना करता येणार नाही. याकरता राज्य सहकारी बँक अत्यावश्यक आहे. त्याचप्रमाणे खेडे पातळीवर प्रत्यक्ष कर्ज पुरवठा करण्याकरता प्राथमिक सहकारी संस्थांची आवश्यकता आहे. कर्ज घेणाऱ्याशी प्रत्यक्ष संबंध जिल्हा बँका ठेवू शकत नाहीत. पूर्वी या राज्यात जिल्हा बँकाच प्रत्यक्ष कर्जपुरवठा करीत होत्या. सहकारी विभागात सुरुवातीच्या काळात जेव्हा एकंदर व्यवहार लहान स्वरूपात होता आणि सहकारी कार्यकर्त्यांची चणचण होती तेव्हा ही व्यवस्था ठीक होती. तथापि याही बाबतीत मर्यादा आहेत हे उघड आहे. महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती बँकांचा व्यवहार बराच वाढला आहे. भारतातील काही राज्यांतील राज्य सहकारी बँकांपेक्षा आपल्या काही जिल्हा बँकांचा व्यवहार मोठा आहे. एकंदर व्यवहार वाढता आहे आणि त्याचा सतत विस्तार होत असल्याने उत्स्फूर्त ग्रामीण नेतृत्वाची आवश्यकता भासते. महाराष्ट्रातील जिल्हा बँकांचे काम पाहता जिल्हा पातळीवरील विकेंद्रीकरणाचे महत्त्व आपल्या लक्षात येईल. त्यामुळे स्थानिक ठेवी आकर्षित केल्या जातात; स्थानिक उद्योगधंदे भरभराटीला येतात आणि बँकांच्या सोईमुळे प्राथमिक सहकारी संस्थांबरोबर निकटचा आणि कार्यक्षम संबंध निर्माण करता येतो.

मधल्या पातळीवर काम करणाऱ्या जिल्हा बँकांचे स्वरूप विकासात्मक व्यावसायिक प्रयत्नाला वाव देण्याइतपत मोठे आणि ग्रामीण नेतृत्वाला आवाहन करण्याइतपत लहान असते. ह्या बँका ग्रामीण पातळीवर संबंध प्रस्थापित करून व्यावसायिक माहिती गोळा करू शकतात. देशाच्या महसूल-यंत्रणेचे जिल्हा हे मूळ केंद्र आहे आणि त्या पातळीवर विचार करता सहकारी व्यवस्था त्याही दृष्टीने सोईची वाटते. 'एका जिल्ह्यासाठी एकच बँक' ह्या तत्त्वामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना जिल्हा परिषदांच्या बँका म्हणून मान्यता देण्यास महाराष्ट्र सरकारला भाग पडले. जिल्हा बँक जिल्ह्यासाठी असली तरी सहकारी पत-यंत्रणेमुळे राज्य सहकारी बँक धरून समस्त सहकारी बँकांतून मिळणाऱ्या सोयीसवलतींचा उपयोग जिल्हा परिषदांना होऊ लागला.

## केंद्रीकरण घातक

सहकारी पत-यंत्रणेमागील सहकारी विकासाचा मूलभूत दृष्टिकोण जिल्हा सहकारी बँकांच्या शाखांची संख्या वाढविण्याचा आहे. ३०-६-६४ अखेर महाराष्ट्रातील २५ जिल्हा सहकारी बँकांच्या एकूण ५६० शाखा होत्या. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या १७ शाखा मुंबई आणि नागपूर या शहरांतून व्यवहार करीत आहेत. काही अपवादात्मक ठिकाणी जिल्हा बँकांच्या एकापेक्षा अधिक शाखा आहेत. महाराष्ट्रातील सहकारी बँक-यंत्रणा शहरे, तालुक्यांची गावे व खेडी मिळून सुमारे ५५० ठिकाणी काम करीत आहे. प्राथमिक सहकारी संस्थांना बँकेची सेवा उपलब्ध करून देणे, त्यांच्याशी जवळचे संबंध स्थापन करणे आणि त्यांच्यावर देखरेख ठेवणे इत्यादी गोष्टी शाखांच्या वाढत्या विस्तारामुळे शक्य होत आहेत. या सर्व शाखांची आणि त्यांच्या धंद्याची देखभाल एकाच केंद्रामार्फत करणे तात्त्विकदृष्ट्या शक्य आहे. तथापि त्यामुळे कार्यक्षमतेच्या दृष्टीने बरीच मोठी हानी होईल. परंतु अकार्यक्षमतेपेक्षाही अधिक गंभीर बाब म्हणजे यायोगे सहकारी तत्त्वांना आणि उद्दिष्टांना हरताळ फासला जाईल. अशा प्रकारचे केंद्रीकरण झाल्यास ते सहकारी वृत्तीला निश्चितच घातक ठरेल.

सहकारी चळवळीचा मूळ उद्देश म्हणजे सहकारी संस्थांमार्फत आर्थिक प्रयत्न संघटित करून असमर्थांना समर्थ करणे, सहकाराचे लोण सर्वव्यापी व्हावे, आणि या प्रयत्नातून स्वावलंबन व सहकार्य वाढीस लागावे असा आहे. त्या दृष्टीने आपल्या सहकारी बँक-व्यवसायात कामकाज चाललेले दिसून येते. राज्य सहकारी बँक ठेवी स्वीकारते आणि खातेदारांसाठी सर्व प्रकारची सेवा उपलब्ध करते. ही बँक फक्त मुंबई शहरातील प्राथमिक सहकारी संस्थांना प्रत्यक्ष आर्थिक साहाय्य करीत असली तरी

२५ जिल्हा मध्यवर्ती बँका, सोलापूरची औद्योगिक बँक, इतर राज्य पातळीवरील संस्था आणि विशेष प्रसंगी एकमेकांच्या संमतीने जिल्हा बँकेच्या कार्यक्षेत्रात असणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांसारख्या इतर संस्थांना कर्जपुरवठा करते. जिल्हा मध्यवर्ती बँका आपल्या कार्यक्षेत्रातील प्राथमिक सहकारी संस्थांना संपूर्णपणे कर्जपुरवठा करतात. यामध्ये औद्योगिक, व्यापारी, वाहतूक अशा व्यावसायिक संस्था, विकास संस्था, नोकरदारांच्या संस्था, नागरी बँका यांचा समावेश होतो. सहकारी क्षेत्रातील व्यक्तिगत उसनवारीतील बराच मोठा भाग ग्रामीण आणि नागरी भागांतील या कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था आणि नागरी बँका यांनी व्यापलेला आहे.

महाराष्ट्रातील सहकारी बँक-यंत्रणेमार्फत सर्व प्रकारच्या व्यावसायिकांना कर्जपुरवठा करण्यासाठी द्रव्यबल जमा होते आणि त्याबरोबरच आपल्या सभासदांना कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी पत-संस्थांना मोठ्या प्रमाणावर द्रव्यबलाचा पुरवठा करण्यात येतो. तसेच सहकारी क्षेत्राबाहेरील असंख्य व्यक्तींना आणि संस्थांना या सहकारी बँकांचा उपयोग होतो. बऱ्याच ठिकाणी जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शाखेशिवाय दुसरी कोणतीही बँक यंत्रणा असत नाही.

आपल्या लोकसंख्येचा बराच मोठा भाग खेड्यांतून पसरलेला आहे. म्हणून सर्वव्यापी सोई उपलब्ध करण्यासाठी जी पद्धत स्वीकारावयाची असते ती प्रामुख्याने ग्रामीण दृष्टिकोणातून असावी लागते. महाराष्ट्रातील सहकारी पत-यंत्रणेने त्या दृष्टीने सर्वव्यापी स्वरूप धारण केले आहे. आणि ९५ टक्के खेड्यांतून सहकारी संस्था काम करीत आहेत. या सहकारी संस्थांचे २० लाखांपेक्षा अधिक सभासद आहेत. हे सभासदत्व नामधारी नाही. नुकतीच जी पाहणी झाली त्यावरून जवळजवळ दोन तृतीयांश सहकारी सभासदांनी कर्जाची मागणी केलेली आढळली. त्यांच्या उसनवारीची रक्कम सरासरीने २०० रुपयांहून थोडीफार अधिक पडते. सभासदांच्या अल्प मुदतीच्या आणि मध्यम मुदतीच्या कर्जमागणीपैकी बराच मोठा भाग सहकारी पत-यंत्रणा पुरवीत आहे. प्रायः ही कर्जे लहान रकमांच्या स्वरूपात दिली जातात. ग्रामीण सहकारी संस्थांच्या कामकाजाचे स्वरूप पाहता राज्याच्या कोनाकोपऱ्यातून लहान रकमेचे सुमारे १५ लाख व्यवहार झालेले आढळले. यावरून एक गोष्ट उघड होते की प्राथमिक सहकारी संस्थांवाचून कार्य करण्याची आणि हा व्यवहार प्रत्यक्षपणे हाताळण्याची ताकद जिल्हा मध्यवर्ती बँकांमध्ये नाही. सरकारी पातळीवर व इतर कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांचा ग्रामीण कर्जवाटपातील अनुभव लक्षात घेतल्यास खेडे पातळीवरील व्यवहार हाताळण्यासाठी जबाबदार स्थानिक संस्थांचे महत्त्व लक्षात येते.

## व्याजाचे दर

व्यावसायिक खर्चासंबंधी अधिक खोलात न शिरता मी काही मुद्दे मांडणार आहे. नाणेबाजारातील इतर संस्थांप्रमाणे सहकारी बँक-यंत्रणेचा द्रव्यनिधी त्यांच्या संलग्न संस्थांकडून आणि जनतेकडून गोळा होत असतो. शेतकी कर्जपुरवठ्यासाठी रिझर्व्ह बँकेकडून सवलतीच्या दराने आर्थिक मदत मिळते. राज्य सहकारी बँकेला सव्वादोन टक्क्यांनी (रिझर्व्ह बँकेच्या व्याजाच्या दरात अलीकडे बदल होण्यापूर्वी) हा कर्जपुरवठा होतो आणि तो पैसा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सावळी दराने पावणे तीन टक्क्यांनी दिला जातो. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या शेतकीविषयक गरजा किती आहेत याचा अंदाज घेऊन राज्य सहकारी बँक सावळी व्याजाच्या दरात थोडीफार वाढ करीत असते. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती बँकांना उसनवारीतून मिळणारा पैसा ३·५ टक्क्यांनी पडतो. रिझर्व्ह बँकेकडून अशा प्रकारे जिल्हा बँकांना मिळणारा सवलतीचा कर्जपुरवठा जवळजवळ ०·७५ टक्क्याने उपलब्ध होतो. त्यामुळे एकूण द्रव्यबल उपलब्ध करण्यासाठी लागणाऱ्या खर्चात बचत होते. १९६३–६४ सालात राज्य

बँकेचा कारभारी खर्च एकूण येणे कर्जाच्या व खेळत्या भांडवलाच्या अनुक्रमे ०·८ टक्के आणि ०·५ टक्के होता. त्याच प्रकारची आकडेवारी जिल्हा बँकांची २·० व १·४ टक्के अशी होती. ग्रामीण प्राथमिक सहकारी पत-संस्था आपल्या कर्जदारांना आकारीत असलेल्या व्याजाचा दर राज्यभर ७$\frac{1}{2}\frac{3}{6}$ टक्के होता. अशा प्रकारचा कारभारी खर्च करणाऱ्या इतर बँकांच्या व्याजांच्या दराबरोबर या व्याजाच्या दराची तुलना केल्यास हा दर किती कमी आहे याची कल्पना येईल. तसेच राज्य सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती बँका बिगर सहकारी संस्थांना त्यांच्या विविध व्यवसायांसाठी जे दर आकारतात त्या दरांची शेड्यूल्ड बँकांच्या दराबरोबर तुलना केल्यास हा दर किती कमी आहे याची कल्पना येईल.

## सहकारी संस्थांचे स्थान

गेल्या ३–४ महिन्यांत बऱ्या लोकांच्यात सहकारी व्यवस्थेसंबंधी थोडाफार वैरभाव निर्माण होत असल्याचे दिसत आहे. काही सहकारी संस्थांची खेड्यांतून झालेली कामगिरी अगदीच मामुली आहे, तसेच १० वर्षांमध्ये झालेल्या विकासापेक्षा अधिक प्रगती सहकारी संस्थांना करता आली असती, असे आणि अशा प्रकारचे आरोप केले जात आहेत. काही हितसंबंधी लोकांच्याकडून तसा प्रचारदेखील केला जात आहे. या सर्व गोष्टींमुळे आज सहकारी व्यवस्थेची उद्दिष्टे आणि सहकारी यंत्रणेमार्फत पार पाडण्यात आलेले कार्यक्रम मांडणे उचित वाटते. सहकारी मार्केटिंग आणि २२ सहकारी साखर कारखाने असलेल्या प्रक्रिया संस्थांच्या विकासासाठी, सहकारी पत-संस्थांचा विस्तार करण्यासाठी आणि भूविकास बँकांच्या मदतीकरता लागणारा कर्जपुरवठा करूनही महाराष्ट्राच्या ग्रामीण जनतेची निम्म्याहून अधिक उसनवारी सहकारी क्षेत्रांमध्ये आणण्यात सहकारी यंत्रणेस यश आलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या विकासातील ही कामगिरी निश्चित उल्लेखनीय आहे.

सहकारी क्षेत्रातील ही कामगिरी भरीव असली तरी तेवढ्यावरून आत्मसंतुष्ट राहण्याचे कारण नाही. आपण बराच मार्ग आक्रमण केलेला आहे आणि बरीच वाटचाल अजून करावयाची आहे. महाराष्ट्रातील कोरडवाहू आणि छोट्या शेतकऱ्यांसाठी आपणांस बऱ्याच गोष्टी साध्य करावयाच्या आहेत. शेतमजूर, बलुतेदार यांसारख्या असमर्थ वर्गाला सहकारी पतयंत्रणेमार्फत थोडीफार मदत होऊ लागली आहे. या लोकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न अवघड असला तरी तो सोडविण्यासाठी सहकारी कार्यकर्त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावावयाची आहे. आपले कार्यक्रम आणि कामकाजाच्या पद्धतीत आणखी सुधारणा करणे आवश्यक आहे. थकबाक्यांचे वाढते प्रमाण, कर्जपुरवठ्याची खरेदी-विक्रीशी सांगड घालण्यात होणारी कसूर या किंवा अशा प्रकारच्या प्रश्नांना नजीकच्या काळात तोंड देणे आवश्यक आहे.

*सहकारी अर्थव्यवस्था*, कृषि-औद्योगिक वार्षिक, प्रथम वर्ष, १९६७-६८ (कोल्हापूर : सहयोग प्रकाशन मंडळ, १९६८) पृ० १२१-१३० (अनुवादित)

☆

# विभाग : ५

## सामाजिक व
## शैक्षणिक प्रश्न

# १ . . पुणे युनिव्हर्सिटी कशी असावी ?

पुणे युनिव्हर्सिटी कशी असावी या प्रश्नाचा बराच खल मागील वर्षी झाला. मुंबई युनिव्हर्सिटी कमिटीने केलेल्या शिफारशींविरुद्ध बरीच चळवळ झाली व शेवटी पुण्यास युनिव्हर्सिटी पाहिजे याबद्दल जरी दुमत नव्हते तरी या युनिव्हर्सिटीच्या घटनेबद्दलच्या निरनिराळ्या योजना वर्तमानपत्रांतून व व्याख्यानांद्वारा मांडण्यात आल्या. या वादाला पुन्हा तोंड लागणे इष्ट आहे. नवे कौन्सिल निवडले गेले आहे, नवीन शिक्षणमंत्री अधिकारारूढ झाले आहेत, व इतके दिवस लांबणीवर टाकलेला मुंबई युनिव्हर्सिटी सुधारणेचा प्रश्न सरकारास आता हाती घेतलाच पाहिजे. पुणे युनिव्हर्सिटीच्या घटनेचा प्रश्न मुंबई युनिव्हर्सिटी सुधारणेचे एक अंग म्हणून समजला गेला आहे, तेव्हा या प्रश्नाचा विचार प्रथम मुंबई युनिव्हर्सिटीच्या सुधारणांच्या व्यापक दृष्टीने केला पाहिजे.

युनिव्हर्सिटी शिक्षणास हिंदुस्थानात १८५७ साली सुरुवात झाली. या साली कलकत्ता, मुंबई व मद्रास या तीन युनिव्हर्सिट्या निघाल्या. यानंतर १८८२ साली पंजाब व १८८७ साली अलाहाबाद या दोन नवीन युनिव्हर्सिट्या स्थापण्यात आल्या. १९१६ सालापर्यंत हिंदुस्थानात फक्त या पाचच युनिव्हर्सिट्या होत्या. या सर्व अर्थात समावेशक (Affiliating) पद्धतीच्या होत्या. या वेळी साधारण कॉलेजांचा असा एक साचा बसून गेला होता व उच्च शिक्षणाची वाढ करणे म्हणजे मोठमोठ्या शहरी नवीन कॉलेजे उघडणे असे समजले जात असे. युनिव्हर्सिटीला परीक्षा घेण्याशिवाय इतर फारसे काम नव्हते. सुरुवातीस ही पद्धती बरी होती, व पदवीचा मुख्य उपयोग म्हणजे नोकरी मिळविणे हा असल्यामुळे युनिव्हर्सिटीला संशोधनाच्या कार्याकडे लक्ष देण्याची फारशी जरुरी वाटत नव्हती. पण ही स्थिती नेहमी टिकणे अशक्य. निदान गेली २० वर्षे तरी ही स्थिती असमाधानकारक आहे असे बरेच जणांना दोन प्रकारे वाटू लागले. एक तर युनिव्हर्सिटी पदवीने नोकरीही चटकन मिळेनाशी झाली व त्या शिक्षणाचा इतरत्रही उपयोग होत नाही. शिवाय युनिव्हर्सिटीचे ज्ञानप्रसाराबरोबर जे खरे ज्ञानवृद्धीचे कार्य तेही होत नाही. या जुन्या पद्धतीच्या समावेशक युनिव्हर्सिटीत शिक्षणाचे कार्य एकएकट्या कॉलेजावरच अवलंबून राहते. ही कॉलेजे सर्व प्रांतभर पसरली असल्यामुळे त्यांत एकमेकांत सहकार्य फार थोड्या प्रमाणात घडून येते, नाही म्हटले तरीही चालेल. नवीन परिस्थितीमुळे सारखा बदल होण्याऐवजी जुन्यास चिकटून राहण्याचीच प्रवृत्ती वाढते व युनिव्हर्सिटीत मुख्य जे संशोधनाचे कार्य त्यास उत्तेजन अथवा नीटसा वाव न मिळाल्यामुळे एकंदर शिक्षण फार हलक्या दर्जाचे राहते. म्हणून केवळ परीक्षा घेणाऱ्या समावेशक युनिव्हर्सिट्यांनी जरी गेल्या शतकात उत्कृष्ट कामगिरी बजावली तरी आता नवीन प्रकारची युनिव्हर्सिटीची योजना केली पाहिजे ही गोष्ट बहुतेक शिक्षकवर्गास पटली आहे.

## समावेशक युनिव्हर्सिटीतील दोष

समावेशक युनिव्हर्सिटींचा मुख्य दोष म्हणजे त्यांचा बोजडपणा. सबंध हिंदुस्थानातील सर्व कॉलेजे पाच युनिव्हर्सिट्यांत वाटलेली, त्यामुळे प्रत्येक युनिव्हर्सिटीचे अधिकारक्षेत्र फार मोठे होते. अशा स्थितीत युनिव्हर्सिटीच्या केंद्राचा सर्व कॉलेजांशी संबंध ठेवणे अथवा निरनिराळ्या कॉलेजांतील शिक्षकवर्गाच्या विचारविनिमयाची सोय करणे फार कठीण. त्यातल्या त्यात काही युनिव्हर्सिटयांत निरनिराळ्या भाषासमूहांचा व कमीजास्त प्रमाणात शिक्षणप्रगती झालेल्या प्रांतांचा समावेश झालेला. असे असल्यावर तर कोणत्याही एका विवक्षित दिशेने सारखी प्रगती करणे अथवा सुधारणेची अमुक एकच दिशा आखणे अशक्य होते. जुन्या पाच युनिव्हर्सिट्यांपैकी प्रत्येक युनिव्हर्सिटीत हे दोष थोड्याबहुत प्रमाणात आढळत असत. हे दोष काढून टाकण्याकरिता गेल्या पंधरा वर्षांत बरेच प्रयत्न झाले आहेत. जुन्या युनिव्हर्सिट्यांच्या घटनेत काही ठिकाणी फरक करण्यात आला आहे व बऱ्याच नवीन युनिव्हर्सिट्या काढण्यात आल्या. मुंबई युनिव्हर्सिटीखेरीजकरून बाकी प्रत्येक जुन्या युनिव्हर्सिटीचे अधिकारक्षेत्र गेल्या दहा वर्षांत कमी झाले आहे. पंजाबचे दिल्ली युनिव्हर्सिटी निघाल्यामुळे; अलाहाबादचे बनारस, अलीगड, लखनौ, नागपूर व नवीन अलाहाबाद येथे युनिव्हर्सिट्या निघाल्यामुळे, कलकत्याचे डाका व पाटणा येथे युनिव्हर्सिट्या निघाल्यामुळे व मद्रासचे म्हैसूर व आंध्र या युनिव्हर्सिट्या निघाल्यामुळे. म्हणजे सुधारणेची एक दिशा युनिव्हर्सिट्या जास्त सुटसुटीत करण्याकडे आहे. दुसरे, जुन्या युनिव्हर्सिट्यांतील सरमेसळ काढून प्रत्येक युनिव्हर्सिटीत एकच भाषा विभागाचा समावेश करण्याची प्रवृत्ती जिकडे तिकडे दिसून येते. पंजाबमध्ये अशी सरमेसळ कधीच नव्हती, अलाहाबादमध्ये मराठी मध्यप्रांत येत असे तो आता नागपुराकडे गेला, पाटणा युनिव्हर्सिटी निघाल्यामुळे कलकत्ता युनिव्हर्सिटी पूर्णपणे बंगाली बनली व आंध्र युनिव्हर्सिटी केवळ भाषावारच निघाल्यामुळे मद्रास युनिव्हर्सिटी आता जवळजवळ तामिळीच होईल. अजून कर्नाटकाचा काही भाग व मलबार यांचा तीत समावेश आहे, पण तामिळ प्रांताच्या मानाने हे अगदी क्षुल्लक आहेत. शिवाय नवीन निघालेल्या युनिव्हर्सिट्यांत सरमेसळ शक्य तितकी टाळली आहे. पाटण्यात बिहारी व उडिया आणि नागपुरात हिन्दी व मराठी असे दोन दोन विभाग आहेत. सारांश, हल्लीचा ओघ युनिव्हर्सिटया लहान, आटपशीर करण्याकडे व त्या कोणत्या तरी एका विवक्षित पायावर उभारण्याकडे आहे. बनारस व अलीगड येथे पाया धर्माचा घेतला, पण बहुतेक भाषावार प्रांतांच्या पायावरच युनिव्हर्सिटया स्थापण्यात येत आहेत. याशिवाय गेल्या पंधरा वर्षांत खुद्द युनिव्हर्सिटीची शिकविण्याकडे व संशोधनाचे कार्य हातो घेण्याकडे प्रवृत्ती विशेष होऊ लागली. ही प्रवृत्ती तीन प्रकारे दिसून येते. एक तर नवीन एकमुखी शिक्षण सर्वस्वी स्वतःच देणाऱ्या युनिव्हर्सिटया काढणे अथवा नवीन समावेशक युनिव्हर्सिट्यांनी संशोधनकार्य हाती घेणे, अथवा जुन्या समावेशक युनिव्हर्सिटयांनी संशोधनखाती उघडणे, या प्रकारे गेल्या पंधरा वर्षांत हिंदी युनिव्हर्सिटयांत हे तीन ओघ स्पष्टपणे दिसून येत आहेत. मुंबई युनिव्हर्सिटीला मात्र या सर्व चळवळी शिवून सुद्धा गेलेल्या दिसत नाहीत. (नाही म्हणावयास युनिव्हर्सिटीने अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांचे संशोधनखाते काही वर्षांपूर्वी उघडले आहे.) मुंबई युनिव्हर्सिटीचा अफाट विस्तार होता तेवढाच आहे, कर्नाटकापासून सिंधपर्यंत सर्व उच्च शिक्षण–कारभार ही युनिव्हर्सिटी चालविते. युनिव्हर्सिटी बोजड आहे हे निर्विवाद. केवळ मुंबईपासून धारवाड अथवा हैद्राबाद अथवा जुनागड येथे जाण्यास किती वेळ लागतो हे लक्षात घेतले की पुरे. कलकत्ता अथवा पंजाब युनिव्हर्सिट्यांच्या परीक्षांस जितके विद्यार्थी बसतात तेवढे मुंबई युनिव्हर्सिटीच्या परीक्षांस बसत नाहीत हे खरे. पण उलट भाषा व विचारवैचित्र्य अथवा शिक्षणविषयक परिस्थितीतील निरनिराळ्या भागांतील फरक इतके दुसऱ्या कोणत्याच युनिव्हर्सिटीत

सापडणार नाहीत. या बाबतीत मुंबई युनिव्हर्सिटीत सुधारणा झाली नाही म्हणूनच मुंबई युनिव्हर्सिटी इतर युनिव्हर्सिट्यांच्या पेक्षा जास्त मागासलेली आहे.

## मुंबई युनिव्हर्सिटीची सुधारणा

आता मुंबई युनिव्हर्सिटीची सुधारणा व्हावयाची ती हिंदुस्थानात इतर ठिकाणी होत असलेल्या सुधारणेच्या दिशेने होणार हे उघड आहे. म्हणजे या अफाट व बोजड युनिव्हर्सिटीतून लहान, सुटसुटीत व एकरूपी अशा युनिव्हर्सिट्या निघाल्या पाहिजेत आणि या नवीन युनिव्हर्सिट्यांचा पाया भाषावार प्रांतांचा असणार. सिंध मुंबईपासून फार लांब. सिंध प्रांतच वेगळा करावा अथवा पंजाबला जोडावा असे बोलणे चालू आहे. तेव्हा त्या प्रांताचा व मुंबई युनिव्हर्सिटीचा संबंध फार दिवस टिकणे शक्य नाही व सिंधच्या दृष्टीने ते हितावहही नाही. आजच कराचीस तीन कॉलेजे व हैद्राबादेस एक कॉलेज आहे. तेव्हा थोड्याच वर्षांत कराची येथे सिंध युनिव्हर्सिटी प्रस्थापित होईल असे धरून चालण्यास हरकत नाही. गुजराथेत गुजराथ युनिव्हर्सिटीकरिता फार जोराने मागणी करण्यात येत आहे. बडोद्याशिवाय इतर कोठेच एकमुखी (Unitary) युनिव्हर्सिटी गुजराथेत निघणे शक्य नाही. म्हणून गुजराथ युनिव्हर्सिटी समावेशकच असावी व तीत गुजराथ व काठीयावाडमधील सर्व कॉलेजांचा समावेश व्हावा अशी सर्वांची इच्छा आहे. कर्नाटकात तर सबंध कर्नाटक एकीकरणाची चळवळ जोराने सुरू आहे आणि मद्रास व मुंबई इलाख्यांतील कर्नाटकातील कॉलेजे म्हैसूरसारख्या समावेशक कानडी युनिव्हर्सिटीस जोडण्यास काहीच हरकत दिसत नाही. राहता राहिला महाराष्ट्रातील कॉलेजांचा व मुंबईतील कॉलेजांचा प्रश्न. दूरवर विचार करता याप्रमाणे मुंबईबाहेरच्या कॉलेजांची जर वासलात लागत असली तर मुंबई युनिव्हर्सिटी पुढेमागे मुंबईची नगर युनिव्हर्सिटी बनावी हेच योग्य दिसते. बाहेरील इतर सर्व कॉलेजे जर निरनिराळ्या युनिव्हर्सिट्यांत वाटली जात असली तर मुंबईने महाराष्ट्रातील कॉलेजांचेच लोढणे का बाळगावे! पुणे युनिव्हर्सिटी कशी असावी याचा विचार करताना मुंबई युनिव्हर्सिटीची ही अशी वाटणी पुढे होण्याचा संभव आहे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. समजा, जरी आणखी दहा पंधरा वर्षे या सर्व नवीन युनिव्हर्सिट्या निघत नसल्या तरी आज एखादीसुद्धा नवीन युनिव्हर्सिटी काढण्याच्या वेळेस, पुढे हल्लीच्या सर्व कॉलेजांची वाटणी कशी होणार याचा विचार केला पाहिजे. हिंदुस्थानातील युनिव्हर्सिटी सुधारणेचा ओघ, पुणे युनिव्हर्सिटी ही 'महाराष्ट्र' युनिव्हर्सिटी म्हणूनच काढली पाहिजे आणि महाराष्ट्रातील इतर ठिकाणची काही कॉलेजे आजच पुण्यास मिळण्यास जरी नाखूष असली तरी या पुणे युनिव्हार्सिटीच्या घटनेत पुढेमागे महाराष्ट्रातील सर्व कॉलेजांचा समावेश होऊ शकेल अशी योजना केली पाहिजे, असे स्पष्ट दर्शविते. अर्थात आजच पुण्याबाहेरील कॉलेजांस पुण्यास मिळण्याची सक्ती केली पाहिजे असे आमचे म्हणणे बिलकुल नाही.

पुण्याची युनिव्हर्सिटी 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी' असावी असे म्हणणाऱ्यांवर काहीजण कोतेपणाचा आरोप लादतात हे आम्हांस ठाऊक आहे. पण वर दर्शविल्याप्रमाणे हल्ली प्रांतिक युनिव्हर्सिट्यांशिवाय गत्यंतरच नाही. जोपर्यंत निरनिराळ्या टिकाणी कॉलेजे पसरलेली आहेत, तोपर्यंत त्यांच्याकरिता समावेशक युनिव्हर्सिट्या पाहिजेतच व या समावेशक युनिव्हर्सिट्या भाषावार प्रांतांच्या पायावर उभारल्याशिवाय मुंबई युनिव्हर्सिटीचा प्रश्न सुटावयाचा नाही. खुद्द मुंबई शहरातील परिस्थिती विशेष प्रकारची आहे व म्हणून मुंबईकरिता एक निराळीच नगर युनिव्हर्सिटी हवी, यात कोतेपणा अथवा फाजील प्रांतिक अभिमानाचा प्रश्न कोठेच उद्भवत नाही. हिंदुस्थानातील सर्व चळवळींचा ओघ हल्ली हिंदुस्थानातील पोटराष्ट्रांना जास्त महत्त्व देण्याकडे आहे. कॉंग्रेसनेसुद्धा सरकारी कारभाराकरिता

भाषावार प्रांतरचना पाहिजे अशी जोराची मागणी सुरू केली आहे. मग शिक्षणपद्धतीकरिता तर हिंदुस्थानची भाषावार विभागणी झाली पाहिजे हे निर्विवाद आहे. शिवाय पुण्याची युनिव्हर्सिटी 'महाराष्ट्र' युनिव्हर्सिटी पाहिजे असे म्हणणाऱ्यांवर जर कोतेपणाचा आरोप लादावयाचा असेल तर तो आरोप आंध्र युनिव्हर्सिटी नवी बनविणाऱ्यांवर अथवा गुजराथ युनिव्हर्सिटी नवी पाहिजे असे म्हणणाऱ्यांवरसुद्धा लादला पाहिजे हेही उघड आहे.

## पुणे युनिव्हर्सिटीच्या घटनेबाबतचे दृष्टिकोण

पुणे युनिव्हर्सिटी 'महाराष्ट्र युनिव्हर्सिटी' पाहिजे असे ठरविले तरी घटनेचा वाद राहतोच. या वादात मुख्यतः दोन पक्ष दिसतात. एक पक्ष आम्हांस एकमुखीच युनिव्हर्सिटी पाहिजे असे म्हणतो. या पक्षाचे म्हणणे असे की, हल्लीसारख्या समावेशक युनिव्हर्सिट्या वाढविण्यात काही अर्थ नाही. युनिव्हर्सिटी घटनेत काही नवीन असे पाहिजे. एकमुखी एकतंत्री युनिव्हर्सिटीच पुण्यासारख्या ठिकाणी योग्य आहे. मुंबईचीच प्रतिमा पुण्यास उतरविण्यापेक्षा युनिव्हर्सिटी नसलेलीच बरी. हे सर्व मुद्दे अर्थात फार महत्त्वाचे आहेत. उलटपक्षी दुसरा पक्ष समावेशक युनिव्हर्सिटीच चांगली व चांगली नसली तरी जशी मिळेल तशी पदरात पाडून घ्या अशा मताचा आहे. आमच्या मते या प्रश्नाचा विचार व्यावहारिक दृष्ट्या केला पाहिजे. आज महाराष्ट्रात कोणकोणत्या शिक्षणसंस्था अस्तित्वात आहेत, व या संस्थांचा व युनिव्हर्सिटी घटनेचा मेळ कसा जमवावयाचा हाच मुख्य प्रश्न आहे.

खुद्द पुण्यात आज सहा कॉलेजे आहेत. यांपैकी तीन सरकारी व तीन खाजगी संस्थांची. सरकारी कॉलेजांपैकी निदान दोन तरी सरकार आजला पुणे युनिव्हर्सिटीला देण्यास तयार होईल असे वाटत नाही. तेव्हा पुणे युनिव्हर्सिटी एकमुखी नगर युनिव्हर्सिटी म्हणून काढावयाची तर एक सरकारी व तीन खाजगी संस्थांची कॉलेजे ही मिळून काढावी लागेल. या नगर युनिव्हर्सिटीतही दोन प्रकार असू शकतील. एक तर हल्लीची सर्व कॉलेजे युनिव्हर्सिटीनेच चालवावयाची व या कॉलेजांतील शिक्षकवर्ग सर्व युनिव्हर्सिटीचा गणला जावयाचा, अथवा दुसरा प्रकार म्हणजे या कॉलेजांनी आपले अस्तित्व निराळे राखून केंब्रिज किंवा ऑक्सफर्डप्रमाणे काही थोडेच युनिव्हर्सिटी शिक्षक असे गणले जाऊन बाकीचे कॉलेजांतील शिक्षक म्हणूनच राहावयाचे. आमच्या मते यातील पहिला मार्ग अशक्य आहे. डेक्कन एज्युकेशन सोसायटी अथवा शिक्षण प्रसारक मंडळीसारख्या जुन्या संस्था आपले अस्तित्व गमावण्यास तयार होतील हे संभवनीय दिसत नाही व कोणत्याच दृष्टीने ते इष्टही नाही. महाराष्ट्रातील शिक्षण प्रसाराचे जंगी कार्य मुख्यत्वे अशा खाजगी संस्थांच्या हातूनच झालेले आहे व महाराष्ट्राच्या अर्वाचीन इतिहासातील या संस्थांचे स्थान फार महत्त्वाचे आहे. अशा संस्थांनी आपले निराळे अस्तित्व राखून शिक्षणविषयक कार्य अव्याहत करावे हेच योग्य. तेव्हा पुण्यास जरी पुण्याचीच अशी एक नगर युनिव्हर्सिटी निघाली तरी ती केवळ एकमुखी व एकतंत्री असू शकणार नाही. असली युनिव्हर्सिटी साधारण केंब्रिज किंवा ऑक्सफर्ड यांच्या नमुन्यावर काढावी लागेल. म्हणजे युनिव्हर्सिटीतील निरनिराळ्या कॉलेजांना आपला अंतरस्थ कारभार वाटेल तसा चालविण्यास पूर्ण मोकळीक, प्रत्येक कॉलेजचा शिक्षकवर्ग निराळा व तो ज्या त्या कॉलेजाने नेमावयाचा, दर विषयात एक युनिव्हर्सिटी प्रोफेसर व एकदोन व्याख्याते हे कॉलेजातील शिक्षकवर्गातून निवडून अथवा वेळेस बाहेरून आणून युनिव्हर्सिटीने नेमावयाचे. कॉलेजातील शिक्षक आपल्या कॉलेजात शिकवोत अथवा युनिव्हर्सिटीच्या इमारतीत शिकवोत, त्यांच्या व्याख्यानांस हजर राहण्याची युनिव्ह-र्सिटीतील प्रत्येक विद्यार्थ्यास मोकळीक असावयाची व प्रत्येक विषयाच्या बोर्डाने प्रत्येक कॉलेजात तेच

तेच शिकवू न देता युनिव्हर्सिटीतील त्या विषयाच्या सर्व शिक्षणाचा योग्य उपयोग करण्याकडे लक्ष देऊन व्याख्यानमाला तयार करावयाची इत्यादी या पद्धतीतील महत्त्वाच्या बाबी आहेत. या पद्धतीत प्रत्येक कॉलेजाचे अस्तित्व निराळे राहील, पण व्याख्यानद्वारा शिक्षण देण्यात मात्र सर्व युनिव्हर्सिटीतील शिक्षकवर्ग एकवटला जाईल. आज निरनिराळ्या कॉलेजांच्या ताब्यात असलेली खाती तशीच कॉलेजांच्या ताब्यात ठेवून नवीन खाती युनिव्हर्सिटीला काढता येतील. कॉलेजांच्या व पुण्यातील इतर संस्थांच्या, पुस्तकालयांचा युनिव्हर्सिटीच्या सर्व शिक्षकवर्गास आणि विद्यार्थीवर्गास उपयोग करता येईल अशी सोय सहज होऊ शकेल. साधारण अशा पद्धतीवर पुण्यास नगर युनिव्हर्सिटी काढणे शक्य आहे हे खरे, पण आमच्या मते या योजनेविरुद्ध बरेच आक्षेप घेता येतील. सर्वात महत्त्वाचा आक्षेप म्हणजे वर दर्शविल्याप्रमाणे पुण्यास नगर युनिव्हर्सिटी काढली असता महाराष्ट्रातील इतर कॉलेजांचे काय करावयाचे हा प्रश्न राहतोच. दोन युनिव्हर्सिट्या काढून चालविण्याइतके पैशाचे बळ आज महाराष्ट्रात खात्रीने नाही. सर्व महाराष्ट्राचा उच्च शिक्षणकारभार चालविण्यास एकच युनिव्हर्सिटी पाहिजे व ती पुण्याची महाराष्ट्र युनिव्हर्सिटी. म्हणून पुण्यास केवळ पुण्यापुरती युनिव्हर्सिटी काढून चालावयाचे नाही. हा पैशाचा प्रश्न दुसऱ्या एका बाजूनेही महत्त्वाचा आहे. केवळ समावेशक युनिव्हर्सिटीपेक्षा एकमुखी युनिव्हर्सिटीस खर्च फार जास्त लागतो हे उघड आहे. व्याख्यानमंदिरे, प्रयोगशाळा, पुस्तकालये, शिक्षकवर्ग यांचा सर्वांचाच बोजा युनिव्हर्सिटीवर पडतो. समावेशक युनिव्हर्सिटीत यांपैकी खर्च बराच कमी होऊन उलट परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्यामुळे फीद्वारा होणारे उत्पन्नही बरेच वाढेल. शिवाय सर्व महाराष्ट्राची अशी युनिव्हर्सिटी पुण्यास निघाल्याने पुण्याबाहेरील महाराष्ट्रातून या युनिव्हर्सिटीस अधिक मदत जास्त जोराने होईल असेही मानणे सयुक्तिक दिसते. तसेच सर्व महाराष्ट्राचा या युनिव्हर्सिटीत समावेश झाल्यास युनिव्हर्सिटीच्या कार्यकारी मंडळाकरिता अथवा प्रत्येक विषयातील शिक्षणाकरिता योग्य माणसांची वाण पडण्याचीही भीती युनिव्हर्सिटीस उरणार नाही.

युनिव्हर्सिटी घटनेत तीन ठळक प्रकार आहेत. एक एकमुखी युनिव्हर्सिटी, दुसरी केवळ समावेशक आणि तिसरी मिश्र पद्धतीची. सर्व महाराष्ट्राची अशी पाहिजे म्हणून व बाहेरील कॉलेजांचा तीत समावेश करण्याची सोय पाहिजे म्हणून पुणे युनिव्हार्सिटी केवळ एकमुखी असणे शक्य नाही. केवळ परीक्षा घेणारी अशी मुंबई युनिव्हर्सिटीच्या पद्धतीची युनिव्हर्सिटी पुण्यात काढण्यात काही अर्थ नाही. तेव्हा उरली मिश्रपद्धती. मुंबई युनिव्हर्सिटी रिफॉर्म कमिटीने या मिश्रपद्धतीचा प्रश्न फारसा विचार न करिता अगदी थोडक्यात फेटाळून लावला आहे. त्यांच्या मते असल्या युनिव्हर्सिटीत पुण्याबाहेरील कॉलेजांचे महत्त्व फार कमी होऊन ती शेवटी मृतप्राय होण्याचेही भय आहे. या भीतीत काही अर्थ नाही. इतर बऱ्याच ठिकाणी मिश्र युनिव्हर्सिट्या आहेत व त्यांतील काही तर—लंडन युनिव्हर्सिटीसारख्या—आज कित्येक वर्षे नीट चालत आहेत. बाहेरील कॉलेजांस जर युनिव्हर्सिटीच्या कारभारात महत्त्वाचे स्थान दिले व त्यांचे शिक्षणक्षेत्र अगदी आकुंचित न केले तर बाहेरील कॉलेजांचे महत्त्व राहून शिवाय पुण्यातील कॉलेजांचा एकमेकांशी जास्त निकट संबंध आणता येईल. बाहेरील कॉलेजांच्या शिक्षण-क्षेत्राची मर्यादा ठरविण्यास खुद्द या रिफॉर्म कमिटीनेच मुंबई युनिव्हर्सिटीकरिता पॅरा ८१ मध्ये सूचना केली आहे. या सूचनेप्रमाणे योजना झाल्यास बाहेरील कॉलेजांचे महत्त्व कमी होण्याची बिलकुल भीती नको. आमच्या मते उच्च दर्जाचे शास्त्रीय शिक्षण सर्व एकाच जागी द्यावे. हल्ली पुण्याबाहेरील महाराष्ट्रातील कोणत्याच कॉलेजात शास्त्रीय शिक्षणाची सोय नसल्यामुळे असे करण्यास फारशी अडचण पडणार नाही. पुण्याबाहेर सर्व कॉलेजांस शास्त्रीय शिक्षणाकरिता इंटर सायन्स-पर्यंत वर्ग काढण्यास उत्तेजन द्यावे व हल्ली ज्यास आर्टस कोर्स म्हणतात त्यातील सर्व विषयांचे

पूर्णपणे शिक्षण देण्यास बाहेरील कॉलेजांस मोकळीक असावी. हे शिक्षण देण्याची प्रत्येक कॉलेजाची मर्यादा त्या त्या कॉलेजच्या शिक्षकवर्गाच्या लायकीवर अवलंबून राहील. ज्या दर्जाचा शिक्षकवर्ग असेल त्याप्रमाणे निरनिराळ्या विषयांत निरनिराळ्या इयत्तेपर्यंत शिक्षण देण्यास युनिव्हर्सिटीने परवानगी द्यावी. एखाद्या विषयात विशेष योग्यतेची माणसे असल्यास संशोधक विद्यार्थीसुद्धा तयार करण्यास बाहेरील कॉलेजांस मुभा असावी. अशा योजनेने बाहेरील कॉलेजांचे महत्त्व कायम राहील व सीनेट, सिंडिकेटमध्ये बाहेरील कॉलेजांचे प्रतिनिधी नेमण्याची सोय केल्यास या कॉलेजांच्या हितास धक्का पोहोचेल अशीही भीती उरणार नाही.

## मिश्रपद्धती युनिव्हर्सिटीचे स्वरूप

मिश्रपद्धतीची युनिव्हर्सिटी हितावह आहे असे धरून चालल्यास ही युनिव्हर्सिटी कशी असावी याचा विचार केला पाहिजे. मिश्रपद्धतीच्या योजना बऱ्याच आहेत. त्यांपैकी तीन प्रकारांचाच येथे विचार करू. अगदी एका टोकास अलाहाबाद युनिव्हर्सिटीची योजना पाहा. या एकाच युनिव्हर्सिटीत दोन अगदी वेगवेगळ्या संस्था आहेत. एक एकमुखी शिक्षणसंस्था व दुसरी मुंबई युनिव्हर्सिटीसारखी परीक्षक संस्था. पण अशा प्रकारची द्विदल पद्धती नीटशी चालत नाही. अगदी तुटक व भिन्न प्रकारच्या दोन संस्था एकाच युनिव्हर्सिटीतर्फे चालल्या असता कोणाचेच काम नीटसे होत नाही असे अलाहाबाद युनिव्हर्सिटीच्या उदाहरणावरून दिसते. (डॉ. गंगानाथ दत्त यांची मुंबई युनिव्हर्सिटी कमिटीपुढील साक्ष पाहा.) तेव्हा केवळ पुण्याकरिता एक नगर युनिव्हर्सिटी व बाहेरील कॉलेजांकरिता एक परीक्षक युनिव्हर्सिटी अशी जोडगोळी काढणे योग्य होणार नाही. प्रत्येक मिश्र युनिव्हर्सिटीत आतील कॉलेजे व बाहेरील कॉलेजे हे दोन विभाग असतात. अलाहाबाद युनिव्हर्सिटीत या दोन विभागांचा एकमेकांशी जवळजवळ काहीच संबंध नाही. लंडन युनिव्हर्सिटीत हा संबंध जास्त निकट आहे. लंडन युनिव्हर्सिटीची घटना थोडक्यात अशी आहे :– लंडनमधील मोठी कॉलेजे आतील कॉलेजे म्हणून गणली जातात. लंडनमधील इतर लहान कॉलेजे व बाहेरची कॉलेजे मिळून बाहेरील कॉलेजांचा समूह बनतो. अंतर्गत विद्यार्थ्यांकरिता व बाह्य विद्यार्थ्यांकरितां निरनिराळ्या परीक्षा घेण्यात येतात. अंतर्गत कारभार एक ॲकॅडेमिक कौन्सिल पाहते व बाहेरील कॉलेजांचा कारभार पाहण्यास एक निराळे कौन्सिल आहे. मुख्य सत्ता सीनेटच्या हातात आहे व ही दोन्ही कौन्सिले सीनेटच्या कमिटी-वजा आहेत. बाहेरील कॉलेजांच्या विद्यार्थ्यांशिवाय इतरांनासुद्धा बाहेरील परीक्षांना बसता येते व या परीक्षा ब्रिटिश साम्राज्यात ठिकठिकाणी घेतल्या जातात. तसेच अंतर्गत कॉलेजांच्या शिक्षणाच्या बाबतीत एकमेकांत सहकार्य फार थोडे आहे, इतकेच नव्हे तर हाल्डेन कमिशनने, ॲकॅडेमिक कौन्सिलने निरनिराळ्या कॉलेजांत शिक्षणविषयक संबंध घडवून आणून त्यांस सहकार्य करण्यास भाग पाडावे अशा केलेल्या शिफारशीस बऱ्याच अंतर्गत कॉलेजांनी जोराचा विरोध केला. (डॉ. लिटल यांचा नाइन्टींथ सेंचरी (ऑगस्ट १९२६) मधील लेख पाहा). लंडन युनिव्हर्सिटीच्या सीनेटमध्ये खालील तीन वर्गांचे प्रतिनिधी सारख्याच प्रमाणात आहेत. (१) शिक्षक वर्ग, (२) रजिस्टर्ड ग्रॅज्युएट्स, (३) काही प्रमुख शिक्षणसंस्था अथवा शिक्षणाशी संबंध असलेल्या संस्था. ॲकॅडेमिक कौन्सिलवर बहुधा पहिल्या वर्गाच्या प्रतिनिधींची संख्याच फार असते, पण बाहेरील कॉलेजांचे हितसंबंध रक्षण करण्याकरिता एक्सटर्नल कौन्सिलवर रजिस्टर्ड ग्रॅज्युएटच्या सर्व प्रतिनिधींना जागा दिलेली आहे. लंडन युनिव्हर्सिटीच्या घटनेत पुण्याच्या दृष्टीने दोन ठळक दोष आहेत. एक तर आतील व बाहेरील कॉलेजांच्या परीक्षासुद्धा वेगळ्या असल्यामुळे त्यांचा एकमेकांशी फारच थोडा संबंध येतो, व दुसरे आतील कॉलेजांची एकमेकांस शिक्षणाचे बाबतीत काहीच मदत होत नाही. तेव्हा ही घटना पुण्यास योग्य नाही.

आता अंतर्गत कॉलेजे व बाहेरील कॉलेजे यांचा बराच निकट संबंध येईल अशी योजना करणाऱ्या एका घटनेचा विचार करू. असली एक घटना एका वर्षापूर्वी पाटणा युनिव्हर्सिटीच्या सीनेटने पास केली. पाटण्याच्या व पुण्याच्या या बाबतीतील परिस्थितीत बरेच साम्य आहे. पाटणा युनिव्हर्सिटीने नेमलेल्या पोटकमिटीचासुद्धा पाटणा येथे एक युनिटरी युनिव्हर्सिटीच स्थापन करावी असा प्रथम आग्रह होता. परंतु विचारांती नगर युनिव्हर्सिटी शक्य नाही असे या कमिटीने खालील मुद्द्यांवर ठरविले :– (१) बांकीपूरमधील कॉलेजातील विद्यार्थ्यांची संख्या फार मोठी आहे, (२) बांकीपूरमधील चार कॉलेजे धंदेशिक्षण देणारी आहेत व या कमिटीच्या मते धंदेशिक्षण (मेडिकल, इंजिनीअरिंग वगैरे) देणे नगर युनिव्हर्सिटीच्या कक्षेबाहेर आहे, (३) आर्ट्स कॉलेजे एकमेकांपासून फार दूर आहेत, (४) एकमुखी युनिव्हर्सिटीमुळे कॉलेजांच्या वैशिष्ट्याला व परंपरेला धक्का बसण्याचा संभव आहे. पण नगर युनिव्हर्सिटी नको असे ठरविल्यावर बांकीपूरमधील कॉलेजांचा एकमेकांशी निकट संबंध कसा आणावयाचा याचा या कमिटीने विचार केला तेव्हा कमिटीने अंतर्गत कॉलेजांचा (बांकीपूरमधील) असा एक वेगळाच संघ असावा असे ठरविले. या कॉलेजांच्या हल्लीच्या घटनेत अथवा त्यांच्या व्यवस्थापक मंडळींतही काही फरक करण्याची जरुरी नाही असे कमिटीचे मत पडले. फक्त अंतर्गत कॉलेजांच्या व युनिव्हर्सिटीच्या संबंधांत दोन ठळक फरक करावेत असे या कमिटीने सुचविले. (१) या अंतर्गत कॉलेजांतील शिक्षकांच्या सर्व नेमणुका पाटणा युनिव्हर्सिटी सिंडिकेटने कराव्या, व (२) अंतर्गत कॉलेजांतील व्यवस्थेवर देखरेख करण्याकरिता एक मध्यवर्ती बोर्ड निर्माण करण्यात यावे. या मध्यवर्ती बोर्डाकडे खालील प्रकारचे कार्य सोपविण्यात यावे : (अ) अंतर्गत कॉलेजांतील शिक्षणाची योजना ठरविणे, (आ) निरनिराळ्या कॉलेजांतील विद्यार्थीवर्गात जास्त सहकार्य घडवून आणणे. याखेरीज इतर सर्व बाबतींत अंतर्गत व बाह्य कॉलेजांत काहीच फरक नाही. युनिव्हर्सिटीचा सर्व कारभार पूर्वीप्रमाणेच सीनेट व सिंडिकेटच्या ताब्यात राहील व परीक्षांच्या बाबतीत अंतर्गत व बाह्य कॉलेजांत काहीच फरक केला जाणार नाही.

## पुणे युनिव्हर्सिटीची घटना कशी असावी

आमच्या मते पुणे युनिव्हर्सिटीने पुण्याबाहेरील कॉलेजांकरिता इतर समावेशक युनिव्हर्सिट्यांप्रमाणे सोय करून शिवाय पुण्यापुरता पुण्यातील कॉलेजांचा एकमेकांशी बराच निकट संबंध आणणे, व युनिव्हर्सिटीने स्वतःतर्फे निरनिराळी खाती काढणे या गोष्टी केल्या पाहिजेत. पुणे युनिव्हर्सिटीच्या कार्याची ही कल्पना मान्य केल्यास पाटणा युनिव्हर्सिटी कमिटीने सुचविलेल्या धर्तीचीच एखादी योजना पुण्यास योग्य आहे. युनिव्हर्सिटीचा कारभार चालविण्यास मुख्य सीनेट व एक कार्यवाहक सिंडिकेट असावी. सीनेटमध्ये (१) अंतर्गत कॉलेजे व युनिव्हर्सिटीशिक्षक यांचे प्रतिनिधी (२) बाहेरील कॉलेजांचे प्रतिनिधी, (३) रजिस्टर्ड ग्रॅज्युएटांचे प्रतिनिधी, व (४) शिक्षणाशी संबंध असलेल्या प्रमुख संस्थांचे प्रतिनिधी, इतक्यांचा समावेश व्हावा. याशिवाय अंतर्गत कॉलेजांकरिता कौन्सिल असावे. पुण्यातील कॉलेजे ही शिक्षणाकरिता हल्लीप्रमाणे अगदी निराळी लेखून चालावयाचे नाही. साधारण हल्लीच्या इंटर इयत्तेपावेतो प्रत्येक कॉलेजाने आपापले शिक्षण निराळे द्यावे. असे केल्यास या इयत्तेपर्यंत देण्यात येणाऱ्या शिक्षणात निरनिराळे प्रयोग करण्यास वाव सापडेल. हल्लीच्या पुण्यातील दोन्ही शिक्षणसंस्था मोठमोठ्या शाळा चालवीत आहेत, तेव्हा शाळांत इंटरपर्यंत वर्ग नेणे वगैरे प्रयोगही करणे असल्यास सोईचे पडेल. इंटरच्या पुढील शिक्षणाकरिता मात्र सर्व पुण्यातील शिक्षकवर्ग एकत्र केला पाहिजे व या शिक्षणाची तरतूद प्रत्येक कॉलेजने निरनिराळी न करता ती अंतर्गत कौन्सिलने करावी. दर कॉलेजला आपला शिक्षकवर्ग नेमण्यास जरी हक्क ठेवला

तरी प्रत्येक नेमणुकीस अंतर्गत कौन्सिलची संमती कॉलेजने घ्यावी असे बंधन ठेवणे जरुरीचे आहे. पुण्यापुरते इंटरपर्यंतचे शिक्षण प्रत्येक कॉलेजने स्वतंत्र द्यावे, यापुढील युनिव्हर्सिटीपरीक्षांचे शिक्षण निरनिराळ्या कॉलेजांच्या शिक्षकवर्गाच्या सहकारित्वाने व्हावे, व संशोधनाचे कार्य खुद्द युनिव्हर्सिटीने हाती घ्यावे. हिंदुस्थानातील काही युनिव्हर्सिटींनी संशोधक प्रोफेसर नेमण्याचा हल्ली प्रघात सुरू केला आहे. या प्रघातात आम्हांस फारसा अर्थ दिसत नाही. संशोधनाचे कार्य व शिक्षणाचे कार्य यांची फारकत होणे फार घातुक आहे. प्रत्येक संशोधकाने व्याख्यानद्वारा थोडेबहुत शिकविण्याचे काम करणे हे संशोधकांस व सामान्य विद्यार्थीवर्गास दोघांसही हितावह आहे. उलट युनिव्हर्सिटीतील प्रत्येक शिक्षकास आपल्या परीने संशोधन करण्यास वेळ, संधी व उत्तेजन मिळाले पाहिजे. संशोधन हे प्रत्येक कॉलेजातील प्रत्येक शिक्षकाचे कार्य आहे. तेव्हा संशोधनखाती व संशोधक प्रोफेसर निराळे नकोत. इतकेच की, युनिव्हर्सिटी प्रोफेसर व व्याख्याते यांजवर संशोधनाची जबाबदारी विशेष प्रमाणात पडेल. बाकी एक केंब्रीजसारखे रिसर्च बोर्ड असल्यास पुरे. संशोधन करू इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या विशिष्ट विषयातील तज्ज्ञाकडे सोपविण्याचे काम बोर्डाने करावयाचे. या बाबीत वर दर्शविल्या-प्रमाणे बाहेरील कॉलेजांतील शिक्षकवर्गाचाही शक्य तितका उपयोग युनिव्हर्सिटीने केला पाहिजे.

शिवाय खुद्द युनिव्हर्सिटीची अशी काही खाती असावयाचीच. वर दर्शविल्याप्रमाणे उच्च दर्जाचे सर्व शास्त्रीय शिक्षण एके ठिकाणी केंद्रीभूत करणे अवश्य आहे. तेव्हा बाहेरील कॉलेजांना इंटर सायन्सच्या इयत्तेपुढे वर्ग काढण्यास उत्तेजन न देणे बरे. पुण्यातील निरनिराळ्या कॉलेजांतील शिक्षकांस एकमेकांच्या शास्त्रालयांचा फायदा घेऊ देण्याची सोय करणे व वेळेस आणखी युनिव्हर्सिटीने स्वतःची शास्त्रालये काढणे अवश्य होईल. तसेच सबंध प्रांतात एकाहून अधिक न निघू शकणारी कॉलेजे—म्हणजे धंदेशिक्षणाची, मेडिकल, इंजिनीअरिंग वगैरे कॉलेजे—युनिव्हर्सिटीच्याच ताब्यात पाहिजेत. आज जरी सरकारने शेतकी व इंजिनीअरिंग कॉलेजे पुणे युनिव्हर्सिटीच्या ताब्यात न दिली तरी ही पुण्याहून हलविणे शक्य नसल्यामुळे पुढेमागे ती पुणे युनिव्हर्सिटीच्या ताब्यात येणारच. ही चालविण्याचा बोजा युनिव्हर्सिटीवरच पडण्याचा संभव आहे. तेव्हा हा एक निराळा युनिव्हर्सिटी कॉलेजांचाही समूह बनेल.

सर्व मिश्र युनिव्हर्सिट्यांप्रमाणे वर सुचविलेल्या योजनेतही दोन विभाग आहेतच. इतकेच की, बाहेरील व अंतर्गत कॉलेजांचा हल्ली मुंबई युनिव्हर्सिटीत सर्व कॉलेजांचा एकमेकांशी जितपत संबंध येतो तेथे निदान तेवढा राखून शिवाय अंतर्गत कॉलेजांचा एकमेकांशी केंब्रिज अथवा ऑक्सफर्ड येथील कॉलेजांइतका संबंध असणे जरूर आहे, या भावनेने ही योजना सुचविली आहे. याविरुद्ध जो मुख्य आक्षेप की, मिश्र योजनेमुळे बाहेरील कॉलेजे मृतप्राय होतील त्याचा वर विचार केला आहे. बाहेरील उच्च शिक्षणकेंद्रांचा पुण्याशी निकट संबंध ठेवणे जरूर आहे. या युनिव्हर्सिटीबद्दल सर्व महाराष्ट्रास आपलेपणा वाटला पाहिजे, व सर्व महाराष्ट्रातील विचारविनिमय या युनिव्हर्सिटीद्वाराच झाला पाहिजे. उलट, पुण्यातल्या पुण्यात एवढा मोठा शिक्षकवर्ग व विद्यार्थीवर्ग असता त्यांची निरनिराळ्या कॉलेजांत फारकत होणे व निरनिराळ्या संस्थांचा एकमेकांस उपयोग होण्याची व त्यांचे कार्य संघटित करण्याची संधी न मिळणे हेही रास्त नाही. त्याअर्थी केवळ मुंबईसारखी समावेशक अथवा केवळ पुण्यापुरती एकमुखी अशा युनिव्हर्सिटीपेक्षा वर दर्शविलेल्या मिश्र पद्धतीची युनिव्हर्सिटी पुण्यास काढणे जास्त इष्ट व हितावह आहे असे आम्हांस वाटते.

केवळ घटनेपुरता हा विचार झाला. घटना कितीही उत्तम केली तरी नवीन युनिव्हर्सिटीचा प्रश्न सुटत नाहीच. पुणे युनिव्हर्सिटीची योग्यता ती कोणत्या दर्जाचे काम बजावते यावर अवलंबून राहील. देशी भाषांचा बोधभाषा म्हणून जास्त प्रमाणात उपयोग करण्याचे प्रयोग, हल्लीच्या मुंबई युनिव्हर्सिटी-

पेक्षा जास्त चांगला शिक्षणक्रम आणि विशेषतः विद्यार्थ्यास व जनतेस आपलेपणा वाटू लागेल अशी युनिव्हर्सिटीची शिकवण अशा विविध बाबींवर युनिव्हर्सिटीचा दर्जा अवलंबून राहील. युनिव्हर्सिटी उत्कृष्ट बनली म्हणजे आपोआपच आज नाखुष असलेली बाहेरील कॉलेजेसुद्धा पुण्यास मिळण्यास उत्सुक होतील व आजचा बराच वाद मिटेल. वरील सर्व गोष्टींचा विचार निराळाच झाला पाहिजे. आज फक्त महाराष्ट्र युनिव्हर्सिटीचा पूर्ण विकास होण्यास हल्लीच्या परिस्थितीत सर्वोत उत्तम घटना कोणती याबद्दलचेच विचार नमूद केले आहेत.

*रत्नाकर* २ : ६ जून १९२७ पृ० ३९०–३९७

☆

# २ • • 'बहुजन समाजातील कर्मवीर' [प्रस्तावना]

कोणत्याही पुस्तकास प्रस्तावना फक्त ग्रंथकर्त्यांची स्वतःचीच असलेली बरी असे माझे मत असल्यामुळे हे काम कोणी सांगू पाहिल्यास मी ते बहुतेक टाळतो. परंतु रा. दरेकर यांच्या पुस्तकाचा विषय माझ्या जिव्हाळ्याचा, त्याबाबत आपले काही विचार नमूद करण्यास ही संधी चांगली व कदाचित त्यामुळे चरित्रे वाचत असता जरा व्यापक दृष्टीने वाचकही विचार करतील असे वाटून पुढील दोन शब्द लिहिण्याचे मी पत्करले.

रा. दरेकर मला बहुजन समाजापैकी समजणार नाहीत, मी समाजसेवकही नाही. या चरित्र ग्रंथाला प्रस्तावना लिहिण्याचा माझा अधिकार केवळ आपल्या समाजसंस्थांचा एक अभ्यासक एवढाच. कोणाही अभ्यासकास, विशेषः महाराष्ट्रातील पुढारल्या समजल्या जाणाऱ्या वर्गातील अभ्यासकास, या ग्रंथापासून बरेचसे शिकण्यासारखे आहे. चरित्रनायकांपैकी बऱ्याच जणांची माहिती सामान्य वाचकांस तरी पहिल्यानेच होण्याचा संभव आहे. ओळखीच्या व्यक्तीबद्दलही पूर्ववृत्तांत, कार्यक्षेत्र व कार्यपद्धती यांची नीटशी कल्पना नेहमी असते असे नाही. परंतु कोणाही व्यक्तीच्या कार्याचे खरे महत्त्व, विशेषतः समाजेतिहासातील त्याचे स्थान, ही असल्या माहितीशिवाय ठरविता येत नाहीत. घराणे, बालपण, सोयरीक इत्यादी सामान्यतः उपेक्षिलेल्या गोष्टींवरील रा. दरेकर यांचा कटाक्ष म्हणून उल्लेखनीय आहे. रा. दरेकर यांनी चरित्र विषयक मजकूर साधा, सरळ लिहिला आहे, विशेष तात्त्विक विवेचनात शिरण्याचा प्रयत्न केलेला नाही. तसेच अमुक पक्षाच्या किंवा मतप्रणालीच्या समर्थनार्थही ग्रंथ लिहिलेला दिसत नाही. यामुळे वाचकांची सोय झाली आहे. अर्थात चरित्रनायकांची निवड व निरनिराळ्या प्रसंगांची सजावट यांवरून ग्रंथकर्त्याची विशिष्ट मनोभूमिका कळून येते, तीही चरित्रांप्रमाणेच अभ्यासकांस मननीय वाटावी.

रा. दरेकर यांनी बहुजन समाजात—विशेषतः मराठा समाजात—जन्मून ज्यांनी त्या समाजाची मोठी सेवा केली अशांची चरित्रे या ग्रंथात गोविली आहेत. बहुतेक चरित्रनायकांची घरची गरिबी, त्यांस सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती प्रतिकूल, असे असता त्यांनी मोठमोठी कार्ये केली ही खचित आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे. प्रतिकूल परिस्थितीशी करावा लागलेला झगडा या चरित्र-भागावर ग्रंथकर्त्यांनी भर दिलेला आहेच, पण चरित्रनायक कर्मवीर हे बहुजन समाजातले म्हणूनच त्यांजकडून अशा प्रकारची कामे होऊ शकली यावरही त्यांचा तितकाच कटाक्ष आहे. ग्रंथात एके ठिकाणी अण्णासाहेब कर्वे व भाऊराव पाटील यांच्या कार्याची तुलना ओघाने आली आहे. त्यात ग्रंथकर्त्याचा भाऊरावांचे कार्य जास्त व्यापक व मूलगामी असा अभिप्राय दिसतो. बुद्धिमत्ता, चिकाटी, कार्यक्षमता, कळकळ या कोणत्याच बाबीत अण्णासाहेब भाऊरावांहून कमी नाहीत. ओघाने त्यांच्या कार्यास शहरी वळण लागले, भाऊराव शेतकऱ्यांतून वाढले व त्यांच्याच चळवळीत सहज पडले.

एकाचे कार्य पुढारलेल्या लहानशा समाजात झाले, दुसऱ्याने गाभ्यासच हात घातला. यामुळेच दिसतो तो फरक घडून आला असे म्हणता येईल.

आज महाराष्ट्रात शिक्षण, अधिकाराच्या जागा, काही अंशी पैसा या अनेक दृष्टींनी ब्राह्मण वर्गाची स्थिती इतर वर्गांपेक्षा चांगली आहे. सर्व क्षेत्रांतील पुढारी बऱ्याच अंशी ब्राह्मणवर्गातील आहेत. असे असून बहुजन समाजसेवेचे प्रत्यक्ष कार्य ब्राह्मणवर्गाकडून घडावे तसे घडले नाही. याचे कारण पाहता गेल्या शंभर सव्वाशे वर्षांत ब्राह्मणवर्गाच्या बहुजन समाजापासून झालेल्या फारकतीत ते सापडेल. ब्राह्मणांस दिवसेंदिवस बहुजन समाजाचे अंतरंग कळणे व त्याशी समरस होणे दुष्कर झाले. बहुजन-समाजाचे हित व पुढारलेल्यांचे हित ही वेगळी अगर परस्परविरोधीही वाटू लागली. हा भेद कोठवर गेला हे रा. दरेकर यांच्या साहजिक भाषाप्रयोगांवरूनही कळेल. ग्रंथ वाचीत असता पदोपदी ब्राह्मण कार्यकर्ते "आपल्यांतले" नाहीत असे त्यांस वाटते हे उघड दिसते. ही परिस्थिती अर्थात् अनिष्ट आहे. यामुळे समाजशक्ती बरेच अंशी फुकट जात आहे. समाजाचे पुढारी म्हणवावयाचे तर आपण पूर्णपणे त्या समाजातलेच असे स्वतः समजले पाहिजे व बहुजन समाजही तसे मानील असे वागले पाहिजे. हे जेव्हा पांढरपेशा पुढारलेल्या जातींस उमजेल तेव्हाच या मोठ्या प्रश्नाच्या उकलीस सुरुवात होईल.

रा. दरेकर यांच्या पुस्तकाने ज्याप्रमाणे ब्राह्मण समाजाच्या आजच्या स्थितीवर प्रकाश पडतो, त्याचप्रमाणे बहुजन समाजाच्या चळवळी व त्यांतील पुढाऱ्यांचे अंतरंग ही समजण्यासही मदत होते. रा. दरेकर ज्यांस बहुजन समाजाच्या चळवळी म्हणतात त्या सर्व ब्राह्मणेतर किंवा ब्राह्मणविरोधी असून त्यांचे स्वरूप प्रतिक्रियात्मक दिसते. सामाजिक व धार्मिक बाबतींत ब्राह्मण-विरोधावर जोर देणे अपरिहार्य आहे. परंतु राजकीय व आर्थिक बाबींत असे असण्याचे तितके सबळ कारण निदान आज तरी दिसत नाही. ब्राह्मणेतर चळवळीची सामाजिक बैठक जशी विनायासे बसू शकते तशी आर्थिक व राजकीय बसत नाही. ब्राह्मणेतर पुढारी जरी बहुजन समाजातले तरी त्यांचे स्वतःचे आर्थिक हितसंबंध बहुजनांचेच असे नाही. शिवाय सुरुवातीचे लागलेले प्रतिक्रियात्मक धोरण व कडवेपणा ही जाण्यास कालावधी लागणार व नवीन विचाराची माणसे आल्याखेरीज हे घडणेही कठीण. म्हणून मराठी राजकारणाची परंपरा व मराठ्यांचे, म्हणजे शेतकरी व मजूर यांचे, आर्थिक हित यांवर ज्या चळवळीचे खरोखर अधिष्ठान हवे ती या प्रतिक्रियात्मक उगमामुळे या दोहोंसही अगदी विरोधी असणाऱ्या अशा ओघात विलीन झालेली दृष्टीस पडते. शिवाय 'मराठा' शब्दाने बहुजन समाज स्थूलमानाने अभिप्रेत झाला तरी तो शब्द संकुचित जातिवाचकही आहे. तेव्हा मराठ्यांच्या जातिवाचक चळवळींचा पगडा जितका जास्त तितके व्यापकत्व व सर्वसंग्राहकत्व कमी होणार व त्यामुळे गैरसमज व फूट यांसही जागा राहणार. ही गोष्ट कर्मवीरांच्याही सर्वांशी लक्षात आलेली नसावी असे रा. दरेकर यांच्या ग्रंथाच्या काही भागांवरून वाटते. शिवाय 'मराठा' बहुजनांच्याही पलीकडे महार व इतर अस्पृश्य मानलेल्यांचा मोठा वर्ग आहे. काही अंशी त्यांचा लढा ब्राह्मणांपेक्षाही मराठ्यांशीच जास्त. आजच्या लोकशाहीच्या युगात बोलावयाचे तर बहुजन चळवळीत यांचा समावेश झाल्याखेरीज ती खरी बहुजनांची व खऱ्या दलितांची होणार नाही. रा. दरेकर यांच्या ग्रंथातील आधुनिक चरित्रांवरून या दृष्टीने विशेष प्रगती झालेली दिसत नाही. जोतिरावांच्या अनुयायी म्हणणाऱ्यांत जी वृत्ती दिसते त्यावरून स्त्रियांपासून महारांपर्यंत सर्वांची उन्नती करण्यास झटणाऱ्या त्या कर्मवीरांचे माहात्म्यच विशेष पटू लागते.

या काही उणीवा जरी उघड असल्या तरी रा. दरेकर यांच्या पुस्तकाच्या वाचनाने एकंदर आशा-जनक वृत्ती निर्माण होते. हिंदुस्थानातील इतर भागांशी तुलना केली असता काही अंशी महाराष्ट्राची

परिस्थिती फार चांगली आहे. कारण आपला समाज पुष्कळच एकजिनसी आहे. आपल्या समाजाचा मुख्य घटक जो मराठा समाज त्याची पूर्वापार वृत्तीही फुटीर नसून संग्राहक आहे. गेल्या तीस चाळीस वर्षांत जुना 'कुणबी' शब्द वापरातून जाऊन त्याची जागा 'मराठा' या जास्त व्यापक व मानाच्या शब्दाने घ्यावी या कौतुकास्पद घटनेकडे समाजाभ्यासकांचे जितके लक्ष जावे तितके गेलेले दिसत नाही. या मध्यवर्ती गटाच्या बाहेरचे मुख्य मराठी समाज म्हणजे ब्राह्मण व महार. सकृद्दर्शनी अवघड वाटले तरी या दोन्हींस पचवून आत्मसात करणे मराठी परंपरेस अशक्य नाही. कारण वंश, परंपरा, संस्कृती या सर्व बाबींत या तिहींत भिन्नत्व फार कमी दिसते. हे सर्व होण्यास स्वतंत्र बुद्धीचे व धडाडीचे समाजनायक हवेत. आणि आज तरी हे पुढारी मध्यवर्ती मराठा गटातीलच असणे जरूर आहे. केवळ प्रतिक्रियात्मक धोरण असणे हे आत्मविश्वासाच्या अभावाचे द्योतक आहे. रा. दरेकर यांच्या पुस्तकाच्या वाचनाने हा अभाव अकारण आहे हे लक्षात येईल. इतकी प्रतिकूल परिस्थिती व इतकी तुटपुंजी सामग्री असूनही जर चरित्रनायक एवढी कामगिरी करू शकले तर आजच्या परिस्थितीत बहुजन समाजाच्या विशिष्ट गरजेपुरतेच नव्हे तर सबंध महराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीस पोषक अशा कार्यक्रमाची उद्‌घोषणा करून ते हाती घेणे बुद्धिमान व विचारी 'मराठा' कार्यकर्त्यांस खचित अशक्य नाही. रा. दरेकर यांच्या पुस्तकाने हा आत्मविश्वास व ही प्रेरणा उत्पन्न होण्यास साहाय्य होईल अशी आशा प्रकट करून ही लांबलेली प्रस्तावना संपवितो.

दरेकर, द. स., *बहुजन समाजातील कर्मवीर*, (पुणे, १९४२) पृ० ९–१३

☆

# ३ . . ब्राह्मण जातीतील व्यक्तींचे पुढील धोरण

महाराष्ट्रातील—विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील—आजच्या घडामोडींची उपपत्ती बाह्य परिस्थितीकडे पाहून लावता येत नाही. या घडामोडींची कारणे पूर्णपणे अंतर्गत असून, बाह्य घटना ती उघडी पाडण्यास निमित्तमात्र झाली आहे.

२. आजची प्रकट झालेली परिस्थिती येणेप्रमाणे आहे. सर्व ब्राह्मण हे ब्राह्मणेतरांहून अगदी निराळे व त्यांना आपले हितविरोधी वाटत असावेत. तेव्हा प्रसंगोपात्त ब्राह्मणांच्या संपत्तीचा नाश करणे व त्यांची मानहानी करणे, हे ब्राह्मणेतरांपैकी अनेक इष्ट, निदान सह्य समजतात.

३. परिस्थितीचे मूळ अर्थात—हिंदुसमाजघटनेचा आत्मा—जातिसंस्थेच्या अस्तित्वातच आहे. जातींनी विभागलेला समाज कधीही एकजीव होऊ शकत नाही. व्यक्ती किंवा वर्ग यांच्या सत्ता, धन, शिक्षण यांतील प्रगतीतील भिन्नतेप्रमाणे जातीजातींतील विषम प्रगती, जातिभेदाधिष्ठित समाजात सर्वांनाच सारखी जाणवते व त्यातूनच वैषम्य व वैमनस्य उत्पन्न होते.

४. यावर मूलभूत दुहेरी उपाय म्हणजे जातिसंस्था नष्ट करणे व समाजात सर्व बाबतींत शक्य तितकी समता प्रस्थापित करणे.

५. जातिसंस्था नष्ट करणे हे कार्य फार अवघड आहे. कारण आजच्या हिंदू समाजातील सर्वच व्यवहार जातीच्या वळणाने चालतात. तसेच ज्या जातींतील लोकसंख्या अल्प किंवा निकृष्ट स्थितीतील असते, त्यांतील व्यक्तींस जातिबांधव व ज्ञातिसंस्था यांशिवाय दुसरा आधार नसतो. जातिसंस्था नाहीशी करावयाची तर ही परिस्थिती बदलून प्रत्येकास आपापल्या शेजाऱ्याचा जातिबांधवांइतकाच भरवसा वाटू लागला पाहिजे; इतकेच नव्हे तर सर्व सामाजिक व्यवहारांत—प्रामुख्याने बेटीव्यवहारांत—जातीचा विचार उद्भवत नाही, अशीही परिस्थिती निर्माण केली पाहिजे.

६. केवळ जातिभेद मानू नये किंवा आम्ही मानीत नाही अशा घोषणा करण्याने आजची परिस्थिती सुधारण्यासारखी नाही. किंबहुना जातिभेद फारसे नाहीतच किंवा दुर्लक्ष्य झाले आहेत, असा प्रचार केला गेल्यानेच परिस्थितीचा निचरा होण्यास अजून सुरुवात झाली नाही. जातिभेद आहेत, ते बरेच काल कायम राहणार, बहुसंख्य लोक जातिनिविष्ट विचार करण्याच्या मोडणीतून चटकन बाहेर पडणार नाहीत, हे लक्षात ठेवले पाहिजे. तसेच आज जातीचा विचार करू नका म्हणण्यात वरिष्ठ जातींचाच स्वार्थ आहे, असा संशय उत्पन्न होतो, हाही विचार मनात बाळगला पाहिजे.

७. जातिभेद मोडण्याची मुख्य जबाबदारी ज्यांना जातिनिष्ठ समाजात विशेष फायदा व मान मिळतो, त्यांच्यावर म्हणजे ब्राह्मणांवर पडते. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रीतीने ब्राह्मणांकडे जन्माने ब्राह्मण म्हणून समाजव्यवहारात जो मान येतो, तो त्यांनी सोडला पाहिजे. नित्याच्या व्यवहारात कोठेही जातींतून

उद्भूत झालेल्या विशिष्ट हक्कांची जाणीव, अपेक्षा व अंमलही करता कामा नये. ही व्यक्तिगत जबाबदारी. याहूनही महत्त्वाची जबाबदारी म्हणजे कोणत्याही कार्याकरिता ब्राह्मण जाती किंवा त्यांतील कोणतीही उपजाती यांची निराळी संघटना करण्याची किंवा तिजकरिता वेगळी तरतूद करण्याची जरुरी आहे, असे ब्राह्मणांस वाटता कामा नये. समाजातील सर्वसामान्य सोय एवढीच आपणास पुरी आहे. इतर जातींकरिता काही विशिष्ट सोय केली तरी ती ते आज मागासलेले म्हणून आवश्यक आहे. सर्वांमध्ये काही काळाने समता प्रस्थापित व्हावयाची तर मागासलेल्यांकरिता समाज अथवा शासनसंस्था जी विशेष सोय करील ती आपणापुरती खाजगी संघटनेने करू पाहणे हे समताप्रस्थापनेस विरोधी आहे, हे कळू लागले पाहिजे. ब्राह्मणाचा इतरांच्या मानाने जो आजचा सामाजिक व आर्थिक दर्जा आहे तो टिकविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे विषमता कायम हवी असे म्हणणे आहे. तदर्थ आपणाकरिता आपल्या विशिष्ट परिस्थितीचा फायदा घेऊन विशेष काही न करिता सामान्य सोयींवर भागवून घेणे, हेच शहाणपणाचे. यानेच क्रमाक्रमाने जास्त समता नांदेल व तेढ कमी होईल. उलट विषमता कायम ठेवण्याचे प्रयत्न चालू आहेत असे दिसल्यास परिस्थिती जास्तच चिघळेल.

८. कोणत्याही व्यवहारात ब्राह्मणांनी फक्त जात न मानण्याने किंवा जातिसंस्था न काढण्यानेही आजची परिस्थिती निवळण्यासारखी नाही. महाराष्ट्रात ब्राह्मण केवळ जातिश्रेणीत श्रेष्ठ आहेत एवढेच नाही तर राजकीय व आर्थिक सत्तेतही इतर महाराष्ट्रीय घटकांच्या मानाने फार प्रबल आहेत. त्यांच्या हातांत मान, धन, सत्ता ही फाजील केंद्रीभूत झाली आहे हे खरे शल्य आहे.

९. या केंद्रीकरणाची ऐतिहासिक कारणे काहीही असोत, प्रत्यक्ष स्थिती उत्तर-पेशवाईच्या काळापासून जवळजवळ दोनशे वर्षे याप्रमाणे अतोनात विषम आहे. हिंदू समाजवस्थेच्या बुडाशी समाजाचे मुख्य घटक निरनिराळ्या प्रकारे समतोल ठेवून, परस्परावलंबी करण्याचे तत्त्व आहे असे मानले तर हे तत्त्व गेल्या दोनशे वर्षांत महाराष्ट्रात पूर्णपणे झुगारून देण्यात आले आहे व आपल्या समाजाचा तोल पूर्णतया गेला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या दरम्यान विद्या, राजसत्ता व पैसा ही विभागली जाण्याऐवजी ती विशेषेकरून ब्राह्मण समाजाच्या हाती एकवटली आहेत. त्यामुळे समाजातील विषमता फार वाढली, ब्राह्मण जोरावले, इतर समाजाशी वागण्याची त्यांची पद्धत असह्य झाली व इतरांत असंतोष वाढला. हिंदुस्थानातील इतर प्रदेशांतील हिंदू समाज व महाराष्ट्रातील हिंदू समाज यांत हा फार मोठा भेद आहे. इतरत्र कोठेही—द्राविडांतही—एकट्या ब्राह्मण जातीच्या हाती सत्ता इतक्या प्रमाणात केंद्रीभूत झालेली नाही. या केंद्रीकरणाचे दुष्परिणाम आज अत्यंत स्पष्टपणे दिसत आहेत.

१०. ब्राह्मण जातीचे आजचे विशिष्ट स्थान व त्यामुळे उत्पन्न झालेली विषमता टिकणे सर्व समाजाच्या दृष्टीने अनिष्ट आहे. म्हणून सर्व प्रकारे समता प्रस्थापिण्याचे कार्य ब्राह्मणांनी आता अंगीकृत केले पाहिजे. व्यापक समाजहितदृष्टी जरी नसली, तरी केवळ व्यवहार म्हणून, आपले विशिष्ट स्थान टिकविणे अशक्य आहे म्हणून, सुज्ञपणाने परिस्थितीत बदल घडवून आणण्यास मदत केली पाहिजे. यात जितका सुज्ञपणा ब्राह्मण अधिक दाखवितील त्या मानाने परिवर्तन शांततामय व समाजात सद्भावना कायम राखून घडून येईल. एवंच ब्राह्मणांचे आजचे उद्दिष्ट सर्व प्रकारचा अधिकारसंन्यास व आपणांस क्रमाने शक्य तोवर इतर समाजांच्या सामाजिक व आर्थिक दर्जावर आणणे हे असले पाहिजे.

११. या उद्दिष्टाचा सामाजिक भाग, जन्मपरत्वे आपणांकडे कोणत्याही प्रकारचे सामाजिक श्रेष्ठत्व येत नाही असे समजून वागणे व आजपर्यंतच्या परंपरेने जी श्रेष्ठत्वाची बाह्य चिन्हे, आचारांत वगैरे येतात त्यांस सहेतुक टाळा देणे; तसेच जातिसंघटना कोणतीही न करिता सामान्य स्थानिक, प्रादेशिक, व्यावसायिक, इत्यादी संघटनांद्वाराच आपले समाजकार्य करणे हा होय.

१२. उद्दिष्टाचा राजकारणी भाग म्हणजे सर्व प्रकारचा अधिकारसंन्यास. ब्राह्मणांनी कोणत्याही राजकीय पक्षोपपक्षांचे नेतेपण आपणांकडे घेऊ नये. राजकीय नेतेपणाशी सर्व प्रकारचे सत्ता-विभागणीचे प्रश्न निगडित असतात. या बाबतीत ब्राह्मणांनी भाग घेण्याचे टाळणे अत्यावश्यक आहे. तसेच कोणत्याही प्रकारच्या मानाची अगर राजकीय अधिकाराची जागा ब्राह्मणांनी शक्य तोवर पत्करू नये. नाइलाज म्हणून पत्करावी लागली तर ती बहुसंख्य ब्राह्मणेतरांच्या सांगण्यावरूनच पत्करावी. येथे ब्राह्मणेतर म्हणजे मराठी ब्राह्मणेतर असेच समजावयाचे आहे. म्हणून जोवर संयुक्त महाराष्ट्र निराळा नाही, तोवर महाराष्ट्रियेतरांच्या पाठिंब्याचा काही एक उपयोग न करिता, केवळ मराठी ब्राह्मणेतरांच्या इच्छेनुसार वर्तन ठेवण्याची पूर्ण तयारी ठेविली पाहिजे. निमसरकारी अगर खाजगी सार्वजनिक संस्थांतही हीच वृत्ती पत्करून सर्व प्रकारच्या सार्वजनिक कार्यात व संस्थांत ब्राह्मणेतरांचा शिरकाव जास्त करून घेणे व त्यांना मानाच्या व अधिकाराच्या जागा शक्य तितक्या अधिक प्राप्त करून देणे, हेच धोरण अवलंबिले पाहिजे.

१३. या धोरणाचे अगर धोरणाच्या पुरस्काराचे विपर्यास दोन प्रकारे होऊ शकतात, हे प्रथमपासून लक्षात ठेविले पाहिजे. पहिले म्हणजे या धोरणाचा असहकार अथवा अडवणूक असा अर्थ होऊ देता कामा नये. आजवरच्या सत्तेच्या केंद्रीकरणामुळे सर्व प्रकारच्या कार्याकरिता लागणारी शिकलेली, अनुभविक माणसे ब्राह्मण समाजातच विशेष संख्येने आहेत. तेव्हा अधिकाराच्या किंवा मानाच्या जागा न स्वीकारणे याचा अर्थ काम स्थगित करणे किंवा कार्यक्षमता कमी करणे असा नाही. इतरांस काम शिकण्यास भरपूर वाव द्यावा व अधिकार आणि मान सर्व ब्राह्मणेतरांस द्यावा; पण ब्राह्मणेतरांचे सल्लागार, दुय्यम किंवा मदतनीस म्हणून जेवढे काम पडेल ते सर्व नेटाने व जबाबदारीने पार पाडण्याची तयारी ब्राह्मणांनी ठेविली पाहिजे. खांदेपालटीत कारभारास धक्का न पोहोचेल अशी खबरदारी शक्य तितकी आपणांकडून घेतली पाहिजे. अधिकारत्याग किंवा मानसंन्यास म्हणजे कार्यनिवृत्ती नव्हे. आपापल्या परीने, आजच्याप्रमाणेच पण निराळ्या स्थानी, काम करीत राहिले पाहिजे. विपर्यासाचा दुसरा प्रकार म्हणजे ही पेशवाईची नवी आवृत्ती काढण्याचा प्रयत्न आहे, असा आरोप येणे. सल्लागार अगर दुय्यम म्हणून काम करणे याचा अर्थ सूत्रधारित्व आपणाकडे राखून इतरांच्या नावाने कारभार करणे असा नाही. शक्य तोवर खरा अधिकार इतर चालवतील, ब्राह्मणेतरांपैकी मंडळीच सर्व प्रकारच्या जागा घेण्यास तयार होतील, या भावनेने आपण वागले पाहिजे. सुरुवातीस सर्व गोष्टी साध्य न झाल्या तरी हे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून कारभार केला पाहिजे.

१४. सामाजिक व राजकीय बाबींत व इतर सार्वजनिक कारभारांत काय करावे, हे सांगणे तितकेसे कठीण नाही. शिवाय या बाबतींत इष्ट दिशेने बरीच प्रगती अनिच्छेने का होईना आधीच झाली आहे. निवडणुकी वगैरेबाबत जातीकडे लक्ष, कबुली न देताही, दिले जातेच. पण अजूनही जातीकडे लक्ष न देण्याची भाषा हा ब्राह्मणांचा कांगावा अगर डाव आहे, असा प्रवाद आहे. तेव्हा ब्राह्मणांनी या सर्व गोष्टीबाबत वरीलप्रमाणे उघड धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. ज्या चळवळीस ब्राह्मणेतरांचा पाठिंबा नाही, ती महाराष्ट्रात बिनबुडाचीच ठरणार आणि केवळ ब्राह्मणांची चळवळ संबंध महाराष्ट्रास आणि विशेषतः ब्राह्मणांस घातुक होणार, हे अलीकडील घटनांवरून सुस्पष्ट झाले आहे.

१५. आर्थिक बाबींतले धोरण ठरविणे पुष्कळच अंशी जास्त कठीण आहे. यास अनेक कारणे आहेत. आर्थिक प्रश्न अधिक गुंतागुंतीचा आहे. शिवाय ब्राह्मणांची सांपत्तिक स्थिती इतर महाराष्ट्रीय जातींच्या मानाने चांगली असली, तरी महाराष्ट्रातील अर्थव्यवहार त्यांच्या हाती बव्हंशी नाही. तो महाराष्ट्राबाहेरून आलेल्या व अजून मराठी समाजात पुरत्या न मिसळलेल्या जातींच्या हाती आहे. या जातींचे धोरण पुढे काय राहील हे आज सांगणे कठीण आहे. या जमातींपैकी बहुतेकांतील बहुसंख्य

घटक महाराष्ट्राबाहेर राहतात. म्हणून महाराष्ट्रच आपली कर्मभूमी आहे असे समजून मराठा समाजात मिसळून जाण्याची वृत्ती त्या जमाती धारण करतीलच असे नाही. ते काही झाले तरी महाराष्ट्राचा आर्थिक प्रश्न सोडविणे ब्राह्मणांच्या हाती विशेषकरून नाही. हा प्रश्न सुटण्याचा एक शक्य मार्ग म्हणजे मराठ्यांच्या हाती आर्थिक व्यवहारही इतर सत्तेबरोबर येणे. परंतु हा मार्ग संभाव्य बिलकुल नाही. ज्यांची आर्थिक पकड महाराष्ट्रावर आहे, त्यांची पकड हिंदुस्थानच्या इतर बऱ्याच भागावरही असल्यामुळे, त्यांचे आर्थिक बळ फार मोठे आहे. तेव्हा अनिर्बंध आर्थिक व्यवहारांत मराठा समाजास त्यांच्या हातून आर्थिक सत्ता हरण करणे अशक्य आहे. शिवाय हिंदुस्थानची आजची आर्थिक घडण अशी आहे की, त्यात अनिर्बंध व्यवहार चालू आहे तोवर आर्थिक विषमता वाढत जावी. तेव्हा आजच्या परिस्थितीत ज्यांच्या हातांत संपत्ती व अर्थव्यवहार आहे, त्यांच्या हातांतील संपत्ती दुसरीकडे जाणे अगर कमी होणे शक्य नाही. आर्थिक समता कोणत्याही अंशी स्थापण्याकरिता उपाययोजना राजकीयच झाली पाहिजे. महाराष्ट्रातील राजसत्ता बऱ्हंशी मराठ्यांच्या हातांत गेल्यावर ते योग्य ती उपाययोजना करतीलच. ह्याबाबत ब्राह्मणांनी आर्थिक समतेचे ध्येय डोळ्यांपुढे ठेवून, सहकारी व्यवस्थानिर्मिती व सर्व प्रमुख व्यवहारांचे राष्ट्रीयीकरण, या महाराष्ट्राच्या म्हणजे मराठ्यांच्या संभाव्य धोरणास पाठिंबा दिला पाहिजे. आजच्या परिस्थितीत व्यक्तिशः प्रत्येकास काय उदीम-व्यवसाय पाहावा लागेल ते वेगळे. परंतु ब्राह्मण व्यापार-उद्योगधंद्यांत जास्त शिरू लागले, म्हणून त्यांनी अनिर्बंध व्यवहारास पाठिंबा दिला व आजच्या पैसेवाल्यांशी संगनमत केले, असा ठपका येऊ न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे.

१६. आर्थिक बाबींत समता नांदावयाची तर पुढचा विचार म्हणजे आपली राहणीची अपेक्षा. ब्राह्मण जात दिवसेंदिवस जास्तच नागर झाली आहे. तेव्हा ब्राह्मणांचे व्यवसाय नागर, मुख्यतः थोडे बहुत शिकलेल्यांचे. यांत नोकरीपेशा प्रमुख. अर्थव्यवहार मोठ्या प्रमाणात सरकार अगर सार्वजनिक संस्थांच्या ताब्यात आल्यास सर्वच बाबतींत नोकरीपेशात, सेवकवर्गात, सामील होणे त्यांस प्राप्त होणार. म्हणजे ब्राह्मणांचे राहणीचे मान मुख्यतः सरकारी, निमसरकारी वगैरे संस्थांतील पगारांवर अवलंबून राहील. या पगाराबाबतची अपेक्षा आपल्या एकंदर समाजाला परवडेल अशीच आपणांस ठेविली पाहिजे. गेल्या शंभर वर्षांतील पगार हे आपल्या राष्ट्रीय संपत्तीच्या मानाने फाजिल होते. मुख्यतः शेतकीच्या उत्पादनावर अवलंबून असलेल्या समाजात शेतकऱ्यावर सार्वजनिक खर्चाचा बोजा पुष्कळच पडतो. त्यामुळे दिवसेदिवस सरकारी नोकरांच्या पगारांचे मान शेतकऱ्याच्या राहणीच्या मानाने फार विषम न वाटेल असेच ठेवले पाहिजे. आर्थिक समता साधावयाची तर, आर्थिक व्यवहाराचे राष्ट्रीयीकरण, सांप्रत संपत्ती धारण करणाऱ्यांवर कराचा मुख्य बोजा, व पुढील पगारांच्या मानात काही प्रमाणबद्धता, या सर्व गोष्टी करून, ती साधली पाहिजे. यापुढे विशेष मोठ्या पगाराच्या सरकारी जागा कमी होतील व त्यांतील ब्राह्मणांचे प्रमाणही कमी होईल. सर्वसामान्य नागरी वर्गाच्या पेशांत व नोकरींत ब्राह्मणांचा समावेश होईल. या सर्व पेशांतील प्राप्ती व शेतकऱ्याची प्राप्ती यांमधील विषमता आजच्यापेक्षा पुष्कळच कमी होईल. याप्रमाणे आपल्या सध्याच्या राहणीच्या मानात फरक पडेल, हे ब्राह्मणांनी लक्षात घेऊन त्यास पोषक अशी वृत्ती व विचार बनविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

१७. पुढील सरकारी, निमसरकारी व सहकारी संस्था यांचा कारभार व त्यांच्यांतील पगाराची अपेक्षा या सर्वांमध्ये ब्राह्मण जातींतील व्यक्तींचा जो भाग असेल त्याबाबत, महाराष्ट्रातील खाजगी शैक्षणिक संस्थांच्या मूळच्या बाण्याला धरून काम करण्याची आपण तयारी ठेवली पाहिजे. अर्थात येथे प्रश्न स्वार्थत्यागाचा नसून केवळ आपल्या समाजास कितपत पगार झेपतात एवढाच आहे.

हिताकरिता चालविण्यासाठी अगदी बेताच्या वेतनावर करून देणे, हेच बदलत्या काळातील आपले ध्येय आहे. हे ब्राह्मणवर्गाने जाणून त्याप्रमाणे वागल्यास इष्ट परिवर्तन त्वरेने घडण्यास हरकत नाही. आणि हे नवे ध्येय आपल्या जुन्या मानलेल्या उद्दिष्टांशी मुळीच विसंगत नसून त्यांचाच नूतन अवतार आहे असे मानणेच युक्त ठरेल.

१८. वरील लिखाणातील दोन गृहीत बाबींबाबत स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. पहिली बाब म्हणजे सर्व लिखाणात ब्राह्मण जात अशी निराळी बराच काळ राहणार असे गृहीत धरले आहे, आणि जातिभेद नष्ट करावे असे सुरुवातीस प्रतिपादन केले आहे, यांत सकृद्दर्शनी विसंगती दिसते. खरी ती तशी नाही. आज ब्राह्मणांनी आम्ही जात मानीत नाही एवढे म्हणून भागण्यासारखे नाही. आजवर जातिभेदाधिष्ठित समाजाच्या घडणीमुळे ब्राह्मण जातीतील व्यक्तींना अनेक फायदे झाले आहेत, त्यांचे फार मोठे परिणाम आज उघड साचलेले आहेत. ब्राह्मणांच्या मानाने इतरांची परिस्थिती सर्व प्रकारे मागासलेली असता नुसते आम्ही जात मानीत नाही म्हणणे पोकळ आहे. इतरांपैकी निदान काहींची परिस्थिती व ब्राह्मणांची परिस्थिती ही सारखवट झाल्यावरच, जातिभेद नसावेत अशी तीव्र भावना निर्माण झाल्यास, ते खरोखरच काही अंशी तरी नाहीसे होऊ शकतील. असे जोपर्यंत होत नाही तोपर्यंत जातिभेद न मानतो म्हटले तरी ते प्रत्यक्ष नष्ट होणे शक्य नाही. तेव्हा जातिभेद नष्ट करण्याकरिताच म्हणून इष्ट व आवश्यक परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी आज ब्राह्मण जातीतील व्यक्तींवरच विशेष आहे. आपण ब्राह्मण म्हणून जे फायदे भोगले व भोगतो त्याकरिताच तीही पत्करिली पाहिजे.

१९. ब्राह्मणांनी सत्ता, अधिकार वगैरे शक्य तोवर ब्राह्मणेतरांवर सोपवावे या म्हणण्याचा अर्थही स्पष्ट करावयास हवा. मुख्यतः सत्ता व अधिकार मराठ्यांकडे जाणार व जाणे इष्ट आहे. जातिविशिष्ट समाजाच्या दृष्टीने बोलावयाचे तर क्षत्रियांकडे सत्ता गेली पाहिजे; लोकशाहीच्या भाषेत बोलावयाचे तर बहुसंख्यांकांकडे ती गेली पाहिजे. मराठा व कुणबी असे दोन समाज मानण्याची वृत्ती जाऊन निदान पश्चिम महाराष्ट्रात तरी 'मराठा' हाच शब्द सामान्यत्वे रूढ झाला आहे. पूर्व महाराष्ट्रात अजून कुणबी समाज आपणास इतका सरसहा मराठा म्हणवीत नाही, तरी त्या दिशेने फरक थोड्या वर्षांत निश्चित घडून येईल. मग व्यापक अर्थाने मराठा समाज हा निर्विवाद महाराष्ट्रातील सर्वांत बहुसंख्य व सर्वव्यापी समाज होईल; व त्याच्या हाती सत्ता जाणे इष्ट व आवश्यक आहे. एवढ्याने आपले सर्व प्रश्न सुटतील असे नाही. मराठा समाज व तत्सम इतर जाती यांतील भेद तोडावे लागतीलच, पण मराठा समाजाच्या आजवरच्या संग्राहक वृत्तीकडे लक्ष देता हे भेद तोडणे विशेष कठीण होऊ नये. पुढील खरा महत्त्वाचा प्रश्न मराठे-महार संबंधाचा. आज ब्राह्मणेतरांची ब्राह्मणांबाबतची जी परिस्थिती तत्सदृशच महारांची मराठ्यांबाबतची. शिवाय महार समाज आज सर्वत्र विखुरलेला असल्यामुळे या परिस्थितीचे निराकरण विशेषच कठीण होणार. अंती जातिभेद नष्ट होऊन ब्राह्मण, महार व इतर सर्वच मराठे बनावे; पण हे क्रमाने होणार. या परिवर्तनाची पहिली पायरी म्हणजे ब्राह्मणांनी वर दर्शविल्याप्रमाणे आपणच जबाबदारी पत्करणे ही होय. मराठे व तत्सम, मराठे व महार हे भेद आहेत तोवर आम्हांवरही काही जबाबदारी नाही, सगळे प्रश्न एकदमच सुटले पाहिजेत, अशी भाषा साम्राज्यशाहीवाल्यांच्या कांगाव्यासारखी आहे. आपल्यावरील जबाबदारी पार पाडण्यास लागले, म्हणजे त्यानेच इतर प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. काही झाले तरी ब्राह्मण-ब्राह्मणेतर हा प्रश्न अत्यंत निकडीचा आहे; त्याबाबत दिरंगाई करून चालण्यासारखे नाही; हे समजण्यात व त्यावर विचार करून उपाययोजना त्वरित करण्यातच शहाणपणा आहे.

२०. अलीकडील घडामोडींनी उघड्या पडलेल्या एकाच बाबीबाबत वर विचार करण्यात आला

आहे. इतरही अनेक महत्त्वाचे प्रश्न त्यातून उद्भवतात. आपल्या समाजाची प्रगती शांततामय लोकशाहीच्या मार्गाने होताना दिसत नाही. प्रत्येक राजकीय पक्ष विरोधी पक्षांचा मोड हरतऱ्हेने व हरयुक्तीने करावा याच विचाराचा दिसतो; आणि पक्षभेदभावना इतकी तीव्र झाली आहे की, विरोधी पक्षाच्या व्यक्तींची कोणत्याही तऱ्हेने हानी झाली असता त्यात आनंद मानणारे लोक सर्व पक्षांच्या प्रतिष्ठितांत आढळतात. तसेच गुंडांचा व्यक्तिशः किंवा संघटित रीत्या प्रतिकार करण्याची असमर्थता, व स्वतःच्या आणि स्वपक्षाच्या तात्कालिक फायद्यासाठी गुंडगिरीस उत्तेजन देण्याची अगर तिजबद्दल तटस्थता स्वीकारण्याची वृत्ती, ह्या गोष्टी आपल्या समाजाचे नैतिक दौर्बल्य व अदूरदर्शित्व प्रकट करतात. हे सर्व प्रश्न राजकारणाशी निगडित असल्याने त्यांचा विचार इतक्यात शांतपणे होऊ शकेल, असे दिसत नाही. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाने धारण केलेले आजचे स्वरूप मात्र इतके उग्र आहे की, त्याने सर्व राजकीय पक्षांच्या ब्राह्मण जातीतील व्यक्तींस विचार करण्यास भाग पाडावे. तेव्हा या प्रश्नाचा मूलग्राही पक्षभेदातीत विचार निर्विकार मनाने शक्य तितक्या लवकर व्हावा, या दृष्टीने वरील विचार मांडले आहेत. यात गतदोषारोपाच्या विवेचनात न शिरता पुढील धोरण काय असावे यावरच सर्व भर आहे, व या दृष्टीनेच त्यांचे ग्रहण केले जाईल अशी आशा आहे.

*सह्याद्रि* २७ : ३ मार्च १९४८ पृ० १५५–१६०

☆

# ४ . . 'गांवगाडा' [प्रस्तावना]

श्री त्रिं. ना. आत्रे यांचा 'गांवगाडा' मराठी भाषेतील समाजशास्त्रविषयक ग्रंथांपैकी अत्युत्कृष्ट आहे. हा ग्रंथ आज अनेक वर्षे दुर्मिळ व बहुतांशी अज्ञात होता. हे मोठे वैगुण्य होते, म्हणून श्री मोटे यांनी याच्या पुनर्मुद्रणाची जबाबदारी पत्करून ती चिकाटीने पार पाडली याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत. या ग्रंथाची थोडी तोंडओळख करून द्यावी व त्याची योग्यता काय हे दाखवावे या उद्देशाने ही प्रस्तावना लिहीत आहे.

ग्रंथलेखक त्रिं. ना. आत्रे यांची हयात बहुतांशी मुंबई प्रांतात सरकारी नोकरीत गेली. नोकरी मुलकी खात्यातील व तन्निमित्त निरनिराळ्या भागांत त्यांची फिरती घडली. लहानपणापासून खेड्यांतील जीवनाशी परिचय व पुढील आयुष्य खेड्यांशी विविधप्रकारच्या निकटच्या संबंधित कार्यात घालविले, यामुळे श्री आत्रे यांच्याविषयी खऱ्या महत्त्वाच्या असामान्य गोष्टी दिसतात त्या दोन : एक, त्यांस पद्धतशीर माहिती गोळा करण्याचे व पारखण्याचे मिळालेले शिक्षण. ते स्वतः याबाबत खालील प्रमाणे उल्लेख करतात. "मुलकी खात्यांत शिरकाव झाल्यावर, आणि त्यांतले त्यांत जाती-जातींच्या चालीरीतींची माहिती कशी गोळा करावी ह्याचें वळण मे. एंथोवेन साहेब बहादूर, सुपरिंटेंडेंट, एथनॉग्राफिकल सर्व्हे, इलाखा मुंबई ह्यांनीं घालून दिल्यावर व तें दोनतीन वेळां गिरवून घेतल्यावर खेड्यापाड्यांनीं मुक्काम पडून लोकांशीं सुखदुःखाच्या गोष्टी करतांना अनेक बातींची परंपरा कानावर येऊं लागली, व दृष्टि अंतर्मुख होऊं लागलीसें वाटून खेड्यांचें अंतरंग तिजवर थोडेसें उमटल्याचा भास झाला." याहून दुसरा विशेष म्हणजे श्री आत्रे यांस वाटत असलेली खेडेगावांतील जीवन व लोक यांविषयीची अंतरीची तळमळ. याची साक्ष समग्र ग्रंथभरच पाहावयास मिळते. श्री आत्रे या जीवनाचे वर्णन करताना कसे रंगून जातात, खेड्यांतील लोकांचा मूलभूत साधेपणा व चांगुलपणा यांची मनोमन साक्ष ते सारखे किती जिव्हाळ्याच्या भाषेत देतात, शेतकऱ्याची कुतरओढ व लांडगेतोड झालेली पाहून त्यांना कसा संताप व उद्वेग येतो हे कळावयास मुळात ग्रंथच वाचला पाहिजे. एवंच अनेक वर्षे काळजीपूर्वक व परिश्रमाने मिळवलेले ज्ञान, शुद्ध पण तीव्र भावनेच्या मुशीत ओतून प्रासादिक, अभिजात मराठीत घडविलेला हा एक बहुमोल दागिना आहे.

ग्रंथाचा मुख्य विषय मराठी खेडे. ग्रंथकर्त्याने अनेक ग्रंथ वाचले व सरकारी पाहण्या वगैरेतील माहिती चिकित्सापूर्वक अभ्यासली हे ग्रंथावरून उघड दिसते. पण लिखाणास खरा जिवंतपणा आला आहे तो ग्रंथकर्त्याच्या स्वतःच्या प्रत्यक्ष अनुभवाच्या व निरीक्षणाच्या ठशामुळे. ग्रंथकर्त्याचा संचार मुख्यत्वे महाराष्ट्राच्या 'देश' भागातच झाला. तेव्हा गांवगाड्यात वर्णिलेली परिस्थिती ही विशेषेकरून या 'देश' भागाचीच आहे.

## ग्रंथाचे स्वरूप

ग्रामव्यवस्था, ग्रामकारभार व ग्रामजीवन या सर्वांचा विचार ग्रंथात आला आहे. यात हाताळलेले मुख्य प्रश्न म्हणजे गावचा सरकारी कारभार, जातीजमातींचे स्वनियमन, शेतकरी व बिगर शेतकरी यांतील प्रमुख वर्ग व त्यांचे परस्परसंबंध, गावांतील दुकानदारी, गावांस भेट देणाऱ्या फिरस्त्या जमाती आणि हा सर्व गाडा भरणे व चालवणे या विषयीच्या मूलभूत कल्पना व त्यांचे आजचे स्वरूप.

ग्रामजीवनाचे वर्णन व परीक्षण अनेकांगांनी केले असल्यामुळे ग्रंथात प्रसंगी पुनरुक्ती झाली आहे व कोठे पाल्हाळही वाटेल. परंतु भरपूर रसाळ तपशीलाबरोबरच मथितार्थ थोडक्यात व्यक्त करणे हेही ग्रंथकर्त्यास साधते. "हक, मोहब्बत, भीक, लोचटपणा व चोरी हीं जपमाळेच्या मण्यांप्रमाणें एकामागून एक येतात." अगर "साल्उधार व दामदुकाळ हीं खेड्यांतील दुकानदारीचीं प्रधान अंगें आहेत." अशी सूत्ररूप अर्थपूर्ण वाक्ये ग्रंथात सगळीकडे विखुरलेली आढळतात.

गेल्या ४०–५० वर्षांत कायद्यात अनेक बदल झाले आहेत. वतनदार कुलकर्णी जाऊन पगारी तलाठी आले. ग्रामपंचायती सर्वत्र स्थापल्या गेल्या, कुळांच्या संरक्षणार्थ कायदे केले तरी ग्रामव्यवस्थेचा गाभा बहुतांशी कायम आहे, इतकेच नव्हे तर एकंदर कारभाराचे स्वरूप बरेच यात रेखाटल्याप्रमाणेच आहे.

ग्रंथकर्त्यास मुलकी खात्यात प्रत्यक्ष काम केल्याचा दीर्घ अनुभव असल्यामुळे त्यांनी तत्कालीन व्यवस्थेचे कायदेशीर स्वरूप बिनचूक रेखाटले आहेच, पण शिवाय प्रत्यक्ष कारभारातील अनेक खाचाखोचाही स्पष्ट केल्या आहेत. सरकारी कारभाराचे विवेचन 'गांव-मुकादमानी' व 'वतन-वेतन' या दोन प्रकरणांत आले आहे. हे सोपपत्तिक दिले आहे. मुसलमानी व मराठी अमलातील मूळ स्वरूप दिग्दर्शित करून त्याचे स्वरूप इंग्रजी अमलात कसे व का बदलले याचे विवेचन केल्यामुळे व्यवस्थेचे यथार्थ दर्शन होते. या विवेचनाच्या अनुषंगाने, इंग्रजी अमलातील बदललेल्या वतनदारीचे स्वरूप व त्याचे परिणाम यांचा तपशीलवार ऊहापोह केला आहे. सरकारी कारभारातील मुख्य आधुनिक वतनदार म्हणजे पाटील व कुलकर्णी. गावचा पाटील हा पुरातन काळात जितका सरकारचा अधिकारी तितकाच रयतेचा कैवारी असावा अशी अटकळ व व्यवस्था होती. पूर्वीच्या अमदानीत तात्कालिक राज्यव्यवस्थेच्या चांगुलपणाच्या मानाने ही अटकळ पूर्ण होत असावी व पाटील पिढीजात गावप्रमुख या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडीत असावा. इंग्रजी अमदानीत पूर्वीपेक्षा अनेक पटींनी कारभाराला व्यवस्थित वळण लागले व कायदेकानू आणि अंमलपद्धती यांचे सातत्य टिकले, तरी मूळची राजकीय व आर्थिक घडी बदलली जाऊन पाटील-कुलकर्णी व्यवस्था ही जास्त निर्मल व उपकारक न होता क्रमशः खालावून कशी बिघडली याचे ग्रंथातील विवेचन अतिशय उद्बोधक आहे.

हिंदुसमाजातील जातिधर्माचे विविध स्वरूप हरतऱ्हेने या ग्रंथात वर्णिलेले आढळेल. कोणत्याही समाजात अनेक कारणपरत्वे उत्पन्न होणारे भेद हे जातिभेदाधिष्ठित समाजात तात्कालिक अगर तात्पुरते न राहता त्यांचे रूपांतर कायमच्या विभिन्न नवीन जात-पोटजातींत कसे होते याचा आपल्या ग्रामसमाजाच्या थराथरांतून टिकून राहिलेला इतिहास ग्रंथकर्त्यांनी अनेक उदाहरणे देऊन विशद केला आहे. या बाबतच्या आपल्या समाजातील जुन्या प्रवृत्ती थोड्याही अंशाने बदललेल्या ग्रंथकर्त्यास आढळल्या नाहीत. नवीन पंथ, नवीन भेद सारखे निघणे व टिकणे व इष्टानिष्ट प्रकारांस जातिधर्माचे व कुलाचाराचे स्वरूप प्राप्त होणे हे सतत होतच आहे. पोटजात हाच समाजाचा मूळ घटक म्हणून तिचे नियमन करण्याकरता जात-पंचायत व जातीजातींतील प्रमुख यांचे कार्य व महत्त्व मोठ्या प्रमाणात टिकून असल्याचे ते नमूद करतात. तसेच आर्थिक परिस्थिती पुरी बदलली असताही जातींची स्वतःच्या व्यवसायास चिकटून बसण्याची व इतरांस कमी लेखण्याची प्रवृत्ती किती दृढ आहे याची अनेक

उदाहरणे देतात. या सर्वच बाबतींत संक्रमणावस्थेत जुन्यातील बऱ्याचा अंश नाहीसा होऊन दुष्परिणाम मात्र कसे वाढले आहेत याचे वर्णन सगळीकडे पाहावयास मिळते.

## ग्रामसमाजरचनेचे विवेचन

या पुस्तकात ग्रामसमाजरचनेचे वर्णन व विवेचन, तिचे दोन मुख्य भाग कल्पून केले आहे : एक शेतकरी व दुसरा त्यावर अवलंबून असलेला इतर बिगरशेतकरी समाज. हा भेद जुन्या सर्व व्यवस्था व विचार यांच्या बुडाशी असल्यामुळे त्याच्या अनुषंगाने मूळ रचनेचे यथार्थ स्वरूप कळण्यास फार मदत होते. बिगरशेतकरी समाजाचे ग्रंथकर्त्याने वर्णिलेले मुख्य तीन भाग. एक बलुते-आलुते, दुसरा दुकानदारी व तिसरा फिरस्ते. प्रत्यक्ष शेतीशिवाय इतर सर्व व्यवसाय व गरजा भागविणारी पुरातन व्यवस्था आलुते-बलुत्यांची. या व्यवस्थेचे केलेले तपशीलवार सांगोपांग वर्णन हा या ग्रंथाचा फार महत्त्वाचा भाग आहे. आलुत्या-बलुत्यांची बदलती संख्या व यादी, त्यांची विविध कार्ये, त्यांस मुशाहिरा देण्याच्या अनेक पद्धती यांबद्दलची भरपूर माहिती येथे आढळते. स्वयंपूर्ण खेडे असताना ही व्यवस्था कशीही चालो, ग्रंथकर्त्यांना तिचे स्वरूप फार विकृत झालेले आढळले. खेड्यातल्या खेड्यात सर्वांस सोयीने व काटकसरीने हरप्रकारचे कसब व सेवा उपलब्ध करण्याऐवजी ही व्यवस्था आता एक प्रकारची केवळ वतनदारी कशी बनली आहे हे वारंवार प्रत्येक बलुतेदाराबद्दल केलेल्या विवेचनात दाखवण्यात आले आहे.

या व्यवस्थेचे विकृत स्वरूप सर्वांना सारखेच जाचक दिसते. परंतु आलुते-बलुते प्रकरणात व कारू-नारूंच्या संबंधी, विशेषतः महार-जागल्यांच्या संबंधी केलेल्या बहुतेक वर्णनांत श्री आत्रे हे शेतकऱ्यांचे विशेष पक्षपाती वाटतात. यामुळे इतरांच्या गैरसोयी व त्यांवरील दुष्परिणाम जरी वर्णिले तरी सर्व व्यवस्थेत शेतकऱ्याचीच कशी नागवणूक होते हे सांगण्याबाबत त्यांचा विशेष कटाक्ष दिसतो. त्यातल्या त्यात शेतकरी व महार-जागले यांचे संबंध वर्णिताना ग्रंथकर्त्यांचा दृष्टिकोण शेतकऱ्याचाच असावा असे भासते. वरवर पाहता संबंध कसेही दिसले तरी महारांची मूलतः निकृष्ट सामाजिक व आर्थिक स्थिती त्यांस पदोपदी कशी नडते व त्यांवर कळतनकळत कसा अन्याय व जुलूम होतो याविषयीचे वर्णन लेखक स्वाभाविक सहृदयतेने करतील ही अपेक्षा या बाबतीत फलद्रूप होत नाही. पण हा केवळ कमीअधिक जिव्हाळा दाखवण्याचा भाग झाला. याही बाबतीत विवेचन करताना ग्रंथकर्त्यांची भूमिका तर्कशुद्ध आहे. महारांचा प्रश्न खऱ्या रीतीने सोडवण्यासाठी महारवतन खालसा करणे हा एकच उपाय, हे पन्नास वर्षांपूर्वी या ग्रंथात स्पष्ट मांडले गेले हे या विधानाच्या पुष्ट्यर्थ सांगता येते.

## ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदलाचे वेधक दर्शन

'दुकानदारी' या प्रकरणात गेल्या दीडशे वर्षांतील महाराष्ट्रातील सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचा एक महत्त्वाचा भाग मोठ्या मार्मिकतेने आपल्या डोळ्यांपुढे उभा केला आहे. ऐनजिनसी व्यवहाराऐवजी पैशांत व्यवहार होऊ लागणे, स्वयंपूर्णता जाऊन शहरपेठेवर खरेदी व विक्री या दोहोंकरता सर्वस्वी अवलंबू लागणे, जुने सामाजिक संकेत व रूढी यांप्रमाणे व्यवहार न चालता अपरिचित कायदे-कानू व कोर्टकचेऱ्या यांचा अंमल सुरू होणे व स्वराज्यात जो परकीयांच्या शिरजोरपणावर दाब राहतो, तो नाहीसा होऊन समाज अधिकच विस्कळित होणे ही या परिवर्तनाची अनेक अंगे आहेत. परिणामी, मूळचा शेतकरी समाज व एतद्देशीय सावकार इत्यादी व्यावसायिक हे डबघाईस येऊन परप्रांतांतील वैश्यापासून पठाणापर्यंत स्थानिक समाजाचे लागेबांधे न मानणारे व विधिनिषेधांची पर्वा न करणारे असे परस्थ वरचढ होऊन बसले. या परिवर्तनातील स्थानिक मराठी समाजाचे परंपरागत अवगुण, बदलती परिस्थिती व परकीयांचा चढाऊपणा या सर्वांचा भाग निर्भीडपणे सांगोपांग विशद केला

आहे. एकोणिसाव्या शतकात घडून आलेल्या महाराष्ट्रीय ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदलाचे मूलग्राही विवेचन दुकानदारी व कुणबी या दोन प्रकरणांत जितके केले आहे तितके इतरत्र कोठे आढळणार नाही.

फिरस्ते प्रकरणातही तपशीलवार, बहुविध माहिती मोठ्या परिणामकारक रीतीने दिली आहे. प्रकरणाचा अंतीचा रोख जो समग्र पुस्तकाचा तोच म्हणजे शेतकऱ्याची नागवणूक. शेतकरी ही नागवणूक मुकाट्याने सहन करतो हा सामाजिक दौर्बल्याचा एक परिणाम असला तरी कारू-नारू, महार-जागले, फिरस्ते इत्यादींची संख्या सारखी वाढत राहते व त्या सर्वांस पोशिंदा उत्पादक व्यवसाय एकटा शेतीचाच राहतो, ही घटना मूलतः आर्थिकच मानावी लागते. ही गोष्ट ग्रंथकर्त्यांच्या ध्यानी पूर्णपणे आली आहे व त्यांनी हिचे केलेले निदान त्यांच्याच शब्दांत "पूर्वीच्या राजवटींत दर्याची व जंगलाची अटक सैल होती", व "कुणबी थोडा व काळी फार होती", ते आता राहिले नाही असे देता येईल. अर्थशास्त्राच्या भाषेत सांगावयाचे तर लोकसंख्या सारखी वाढत राहिली व त्याबरोबर आर्थिक व्यवसाय वाढावे व आर्थिक व्यवस्थेचा विकास व्हावा, या ऐवजी काहीसा संकोचच झाला. याचा हा परिणाम आहे. कौतुकाची गोष्ट ही की महाराष्ट्राच्या सामाजिक अवनतीच्या चिकित्सेबरोबरच आर्थिक अवनतीची चिकित्साही ग्रंथकर्त्यांने तितक्याच मार्मिकपणे, सोदाहरण, सोपपत्तिक करून दाखविली आहे.

## परकी अमलाच्या दुष्परिणामांकडे दुर्लक्ष

या सर्व विवेचनात एक भाग दुर्लक्षिलेला वाटतो. तो म्हणजे सामाजिक व आर्थिक अवनतीतील परकी अमलाचा वाटा. समाजातील जिवंतपणा नष्ट होऊन समाजाला दुर्बलता येणे, आक्रमणविरोधी शक्ती खचणे हे परकीय राजवटीमुळे मोठ्या अंशी वाढते. परकी अमलाचे हे परिणाम ग्रंथकर्त्यांच्या लक्षात आलेले नाहीत असे म्हणता येत नाही. तरी त्यांबद्दल इतर बाबींप्रमाणे विवेचन नाही हे खरे. तसेच आमच्या आर्थिक अवनतीच्या बुडाशी ब्रिटिशांची राजनीती व अर्थनीती कशी होती याबद्दलही कोठे ऊहापोह नाही. ग्रंथकर्त्यांचा काल व परिस्थिती लक्षात घेता या गोष्टी स्वभाविकपणे झाल्या असाव्या. परकी अमलाचे वरीलप्रमाणे महत्त्व मानल्यास स्वराज्यप्राप्तीनंतर हे दुष्परिणाम नष्ट होणे स्वाभाविक घडावे. म्हणजे मराठी समाजात जिवंतपणा, एकोपा व प्रतिकारक्षमता जेवढ्या प्रमाणात येईल तेवढ्या प्रमाणात महाराष्ट्रास स्वराज्याचा खरा फायदा झाला असे म्हणणे युक्त ठरावे.

## प्रचलित समाजाचे दोषदर्शन

ग्रामसमाजरचनेचे सर्वांगीण वर्णन याने ग्रंथ जरी मुख्यतः व्यापला असला तरी ग्रंथकर्त्यांचा खरा उद्देश प्रचलित समाजाचे दोषनिदर्शन व त्यावर उपाययोजना हाच वाटतो. समाजस्थितीचे वर्णन सांगोपांग व तिचे निदान निःसंदिग्ध आहे. ग्रंथकर्त्यांनी वर्णिलेल्या समाजाची लक्षणे सारांशाने सांगू म्हटले तर ती अशी दिसतात : या समाजात खऱ्या अर्थाने व्यवस्था व वळण ही उरलेली नाहीत. जुनी निरर्थक रचना व संकेत यांबद्दल पोकळ तोरा एवढाच शिल्लक आहे. हा अनेकशः विभागलेला असून यात भोंगळपणा, धर्मभोळेपणा व एकमेकांबद्दल वैर आणि बेपर्वाई ही सर्वत्र दिसून येतात. अर्थात यांत एकात्मता नाहीच नाही. पण शिवाय ईर्षा नाही, घट्टपणा नाही, बाहेरच्यांचे हल्ले निवारण करण्याचे सामर्थ्य नाही, स्वत्व काय माहीत नाही, मग त्याबद्दल अभिमान कोठचा ? या समाजास कोणी नियंता नाही, कोणी त्राता नाही, त्यात कोणी धुरीण नाहीत. यात सर्वत्र मिरासदारी वृत्ती, गैरहिशोबीपणा व वाढते दारिद्र्य हीच आढळतात. या परिस्थितीच्या बुडाशी ग्रंथकर्त्यांच्या मते आपल्या समाजरचनेचे दोन मोठे विशेष व त्यांतून निर्मित दोष हे आहेत. हे दोन विशेष म्हणजे

जातिधर्म व वतनपद्धती. वतनपद्धतीने वतनदारांस 'व्यक्तिशः तुटक, स्वार्थी व कमजोर करून एकंदर गांवगाड्याचा विचका केला, तीच गति जातिधर्मानें एकंदर हिंदुसमाजाची केली.' जातिधर्मामुळे समाज अतिशय विभागला गेला, जो तो विभाग आपापल्या तोऱ्यात राहून अमर्याद एककल्ली व एकधोरणी बनला व परिणामी सर्व समाज आत्मसंरक्षणाच्या कामी लुळा पडला. ग्रंथकर्त्यांच्या मते जो समाज हरहुन्नरी नाही किंवा वेळ पडेल त्याप्रमाणे धंदा करण्याची ज्यात सवड ठेवली नाही तो मृतप्राय हीनदीन अवस्थेप्रत कधी ना कधी पोचलाच पाहिजे. हे सर्व दोष व परिणाम महाराष्ट्र समाजात त्यातल्या त्यात उत्कटपणे आढळतात. याचे कारण मराठ्यांचा इतिहास व परंपरा ही नवीन युगास आवश्यक अशा गुणांस पोषक नव्हती.

"पुष्कळ दिवसांपासून दाक्षिणात्यांचा वैश्यवृत्तीकडे बहुतेक ओढा नाहीं म्हटलें तरी चालेल. गेल्या हजार-पाचशें वर्षांत विद्वान व्हावें, राज्यकारभार हांकावा, जमेदार बनावें, स्थावर संपादावें, ह्या व ह्यांसारख्या उद्योगांची दक्षिणेंत अतोनात चहादारी झाली, आणि तागडी-माप हातीं धरावें व एकाचे दोन करावे, असल्या वाणिज्याला लोक तुच्छ मानूं लागले. ब्राह्मण किंवा क्षात्रधर्मांना काय तो मान मिळू लागला, आणि वैश्यवृत्ती मानहीन झाली. हे दोन्ही रोजगार ताजे नव्हते. त्यांच्या उत्पन्नांचा झरा नसतो, पूर असतो."

स्वराज्य होते, मुलुखगिरी होती, तोवर हे चालले. पुढे परचक्र आले, काळ बदलला तरी मागच्या राज्यांत चालले तसेच पुढेही चालेल या भिस्तीत जणू महाराष्ट्र समाजाचे सर्व घटक बसले व समयानुरूप नवीन व्यापारी इत्यादी कसब शिकले नाहीत. यामुळे इतर प्रदेशांतील हिंदू समाजापेक्षाही महाराष्ट्रातील समाज जास्त विस्कळित व परधार्जिणा राहिला.

## ग्रंथाचे आजचे महत्त्व

यावर कोणी असे म्हणतील की ग्रंथ लिहिल्यास जवळजवळ पन्नास वर्षे झाली. तात्कालिक तो कितीही मार्मिक असला, तरी त्याचे आज महत्त्व काय? यास उत्तर एवढेच की खरे पाहता आपल्या समाजाची प्रवृत्ती गेल्या पन्नास वर्षांत फार थोडी बदललेली दिसते. महाराष्ट्र समाजात नागर वर्गाचे महत्त्व पूर्वापार फार कमी होते. यामुळे मराठी समाजाची खरी घडण सर्वांशी ग्रामीण समाजाचीच. आपले सर्व स्वभावविशेष ग्रामसमाजोद्भव आहेत. या ग्रामीण समाजाचे यथार्थ दर्शन जे या 'गांवगाड्या'त आढळते तेच आज टिकून आहे. आजही आपला समाज अनेकशः विभागलेला, दुर्बल व त्राता नसलेला असा आहे. गैरहिशेबीपणा, मिरासदारी वृत्ती, पोकळ तोरा ही आमच्यांत कायमच आहेत. जातिभेद, वतनदारी वृत्ती यांचा प्रभाव टिकलेला असून वैश्यवृत्तीचा अभाव आम्हांस पूर्वीपेक्षाही अधिक पदोपदी नडत आहे. अशा परिस्थितीत या जुन्या उपेक्षित ग्रंथाचे परिशीलन व मनन जितके अधिक आपल्या समाजात होईल तितके इष्ट असे मला वाटते. यात एखाद्या परस्थाने किंवा स्वसमाजाशी एकरूप न झालेल्याने केलेली हेटाळणी नाही. उलट स्वेतिहास व स्वत्व यांबद्दलची खरी कल्पना व योग्य अभिमान या ग्रंथात पदोपदी आढळतात. पण स्वजनप्रेम असले तरी आंधळेपणा नाही. शेतकरी व ग्रामीण समाज यांबद्दल जिव्हाळा वाटला तरी त्यांच्या भोळेपणाबद्दल भ्रामक कल्पना नाहीत. "बुडतसे जन देखवेना डोळा" या भावनेने प्रेरित होऊन एका सुज्ञ जाणत्याने केलेले विवेचन यात सापडते. ते इतक्या अवधीनंतर तरी पथ्यकारक ठरो अशी इच्छा प्रदर्शित करून ही लांबलेली प्रस्तावना संपवितो.

आत्रे, त्रिं. ना., *गांव-गाडा*, (मुंबई : मोटे प्रकाशन, १९५९) आवृत्ती ३, पृ० १७–२३

☆

# ५ . . भारत व महाराष्ट्र

## १. भारतीय संस्कृतीची घडण

महाराष्ट्र जीवनाच्या अनेक अंगांविषयी अधिकारी व्यक्तींकडून लेख लिहवून या ग्रंथात संपादकांनी एकत्रित केले आहेत. इतिहास व परंपरा यांचा विचार करून महाराष्ट्राचा वारसा कोणता, महाराष्ट्राने आजवर निरनिराळ्या क्षेत्रांत केलेल्या कामगिरीचे वैशिष्ट्य कोणते, यांबाबत बहुतेक लेखांत विवेचन केले आहे. तसेच आपल्यापुढील समस्या व भविष्यातील संभाव्य मार्ग यांचाही बहुतेकांनी विचार केला आहे. अशा या लेखसमुच्चयाच्या जोडीस 'भारत व महाराष्ट्र' या विषयावर एक प्रास्ताविक लेख लिहावा अशी संपादकांची इच्छा. तीस मान देऊन हा लेख लिहीत आहे.

महाराष्ट्राचे कार्य, महाराष्ट्राची परंपरा, महाराष्ट्राचे जीवन ही सर्व भारतीय जीवनपरंपरेत समाविष्ट आहेत. तेव्हा महाराष्ट्रातील कोणत्याही व्यापक प्रश्नाचा विचार करताना भारतीय परिस्थिती नमेस धरलीच पाहिजे; म्हणून महाराष्ट्रावरील लेखमालिकेस सुरुवात भारतापासून करणे सयुक्तिक वाटते. परंतु 'भारत व महाराष्ट्र' या लेखात कोणत्याही एका विशिष्ट अंगाचा विचार अप्रस्तुत ठरेल. म्हणून संपादकांनी सुचविलेल्या विषयाची व्याप्ती मी ठरविली ती अशी : भारत स्वतंत्र होऊन प्रभावी राष्ट्र म्हणून आधुनिक जगाच्या कारभारात नुकतेच वावरू लागले आहे. जगातील व्यवहाराचे स्वरूप अलीकडे झपाट्याने बदलले आहे व नवीन बिकट समस्या उत्पन्न झाल्या आहेत. भारतास अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांची स्वतःकरिता उकल करावयाची आहे; व याबरोबरच जगाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीत मदत करावयाची आहे. या परिस्थितीत भारतास काय करावयाचे आहे, जगाकडून त्यास काय घ्यावयाचे आहे व जगास काय द्यावयाचे आहे याचा विचार महत्त्वाचा आहे. हा विचार थोडक्यात आपल्या बुद्धीने मांडावा व भारतीय कार्यात महाराष्ट्रास भाग कोणता व कसा घेता येईल हेही दिग्दर्शित करावे असे मी योजिले आहे.

### भारतीय एकात्मतेचे वैशिष्ट्य

भारताचा विचार येथे एक नवीन स्वतंत्र राज्य म्हणून आपण करीत नाही. आपणांस विचार करावयाचा तो भारतीय परंपरा, संस्कृती, तत्त्वविचार, समाजरचना व मूल्ये या सर्वांची घडण व त्यांचा जगातील इतर समाज व संस्कृती यांशी संबंध याविषयीचा आहे. सांस्कृतिक इतिहासात विवक्षित राज्यसत्तेच्या इतिहासास गौण स्थान आहे. भारतीय संस्कृतीच्या विकासाचा विचार करताना राज्यसत्तेचा प्रसार अगर साम्राज्यस्थापना यांचे महत्त्व पूर्वकाळीही फारच कमी होते असे आढळून येते. वैदिक आर्यांच्या विजिगीषू समाजांचे या देशावर आक्रमण झाल्यानंतर काही शतकांत विशिष्ट स्वरूपाची भारतीय परंपरा निर्माण झाली व तदुत्तर ती सातत्याने टिकून आहे असे ठोकळ मानाने मानण्यात

येते. या सांस्कृतिक परंपरेच्या विविध स्वरूपांचा विकास व बाह्य जगावर झालेले परिणाम हे बहुधा राजकीय आक्रमण अगर साम्राज्यप्रसार या मार्गांनी झाले नाहीत. वैदिक आर्यांनी उत्तर भारतात केलेल्या आक्रमक लढायांनंतर भारताच्या इतर भागांतही वेदविद्या, हिंदू, बौद्ध, जैन यांच्या उपासना व तत्त्वज्ञान, हिंदू समाजरचना इत्यादींचा फैलाव विशिष्ट राज्यसत्तेमुळे झालेला आढळत नाही. ब्राह्मण, भिक्षू, जैन मुनी इत्यादींस मिळालेला तात्कालिक मान, त्यांच्या विद्या, मंत्रतंत्र यांचे मानण्यात आलेले महत्त्व इत्यादींमुळेच हा प्रसार झाला. भारताबाहेरील हिंदू व बौद्ध धर्मांच्या प्रसाराचा इतिहास असाच आहे. ब्रह्मदेश, सिंहलद्वीप, चीन, मध्य आशिया इत्यादी भागांत बौद्ध धर्माचा स्वीकार झाला तो कोठेच भारतीयांचे आक्रमण न होता झाला. जावा, सुमात्रा इत्यादी भागांत हिंदू संस्कृतीचा पगडा तेथे हिंदूंचे साम्राज्य स्थापले जाऊन झाला असे इतिहासज्ञ काही दशकांपूर्वी मानीत असत. पण अलीकडे उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून असे दिसून येते की, तद्देशीय राजे यांनीच भारतीय ब्राह्मण, कारागीर वगैरे यांना सन्मानाने बोलावून नेले; व त्यांच्या द्वारा सुरू झालेले सांस्कृतिक व व्यापारी दळणवळण वाढून हळूहळू तेथील सर्वच संस्कृतीचे, विशेषतः विद्यांचे स्वरूप भारतीय बनले. राजे, सामंत आणि क्रमाने बहुसंख्य जनता यांनी हिंदू तत्त्वे, पुराणे, आचार, नृत्यादी कला यांचा स्वीकार केला. हे भारतीय मोठ्या संख्येने तेथे जाऊन अगर राज्यसत्ता प्रस्थापून झाले नाही.

या वैशिष्ट्यांबद्दल आग्रहाने सांगण्याचे कारण हे की, भारतीय एकता अगर एकात्म भावना ही एकराज्याच्या कल्पनेशी कधीच निगडित झालेली नाहीत, हे लक्षात यावे. शिकंदराच्या दिग्विजयामुळे यवन संस्कृती त्या वेळच्या ज्ञात जगभर पसरली अगर रोमन साम्राज्याखाली मोठा भू-भाग आल्यामुळे रोमन संस्कृतीचा पगडा बसला व टिकला असे मानले जाते. असला प्रकार भारतीय संस्कृतीबाबत झालेला नाही. तसेच, मध्ययुगीन युरोपात युरोपीय एकतेची भावना ही पोप व पवित्र रोमन साम्राज्य यांशी निगडित होती, असे समजले जाते. तसाही प्रकार हिंदुस्थानच्या इतिहासात आढळत नाही. अशोक, गुप्तघराणे किंवा हर्षवर्धन यांच्या साम्राज्यप्रसाराचा भारतीय सांस्कृतिक एकतेच्या भावनेशी काही संबंध होता असे कधीच मानण्यात आलेले नाही; किंबहुना निदान शालिवाहन कालापासून तरी उत्तरीय आक्रमणाला थोपविणे, परतविणे हा महाराष्ट्रीय पराक्रम-परंपरेचा अभिमानास्पद भाग मानण्यात आलेला आहे. पण यामुळे महाराष्ट्रीय किंवा इतर दाक्षिणात्य भारतीय संस्कृतीचे अविभाज्य घटक नाहीत, असे कोणी कधीच मानले नाही. पंथप्रसाराचाही प्रकार हाच आहे. अनेक शतके हिंदू, बौद्ध, जैन यांचे भारतातील बल, अगर भारताच्या विशिष्ट प्रदेशांतील स्थान सारखे बदलत राहिले; नवे पंथ तिघांतही निघाले, जुने मागे पडले अगर लयास गेले; परदेशस्थांची आक्रमणे झाली व आक्रमकांनी क्रमशः येथील भाषा व पंथ यांचा स्वीकार केला; तरी भारतीय संस्कृतीच्या एकात्म प्रवाहास यांनी धक्का लागला, असे झाले नाही. अलीकडे विशिष्ट एकछत्री राज्यसत्ता, विशिष्ट प्रकारची निष्ठा अगर राजकीय विचार यांचा स्वीकार न करणाऱ्यांस भारतीय एकात्मतेचे शत्रू असे उच्चस्थही म्हणू धजतात! हे किती चुकीचे, कोते व आततायी आहे, हे आजवरचा इतिहास लक्षात घेता सहज कळून येईल.

भारतीय एकात्मतेची भावना टिकून राहिली याचा संबंध विशिष्ट राज्यसत्ता किंवा राज्यकारभार यांजशी मुळीच नव्हता. तसेच, तिचा संबंध विशिष्ट धर्म अगर पंथ यांजशी नव्हता. शैव, वैष्णव, बौद्ध, जैन किंवा महानुभाव, लिंगायत, शीख हे सर्व या परंपरेचे वारसदार; यांच्या एकमेकांतील मत-भेदांमुळे मूळ परंपरेला कोणत्याच प्रकारे धक्का बसला नाही. कोणताही ग्रंथ, इतिहास अगर भाषा यांशीही ही परंपरा चिकटलेली नाही. भारतीय एकतेचे विविधतापूर्ण, कोणत्याही एकाच विशेषाबद्दल अनाग्रही असे हे स्वरूप आहे. ख्रिस्ती-युरोपीय किंवा अरबी-इस्लामी परंपरेचे रूप यापेक्षा फार भिन्न

आहे. यामुळे पाश्चात्त्य कल्पनांस अनुसरून भारतीय एकतेबद्दल विचार करणारांमध्ये भारतीय परंपरेचे नीट आकलन होत नाही; अगर तिच्या स्वरूपाबद्दल व भवितव्याबद्दल पाश्चात्त्य परिस्थितीशी केलेल्या तुलनेवरून भलते ग्रह, निदाने, भाकिते केली जातात.

## प्रादेशिक समाजाची कल्पना

परंपरेचा वाहक समाज हा आहे. पण समाजाचे स्वरूप परंपरेपेक्षा जास्त बांधीव व संकुचित असे असते. तेव्हा एकाच परंपरेत अनेक समाजांचा समावेश एकाच काळी होतो; व काही समाजांचे अस्तित्व संपुष्टात आले तरी इतरांच्या द्वारा परंपरा टिकून रहाते. सहवास, सहकार्य व परस्पर हितसंबंध यांमुळे समाज बनतो व टिकून रहातो. एका अर्थी हा प्रश्न भावनेचा आहे. जो आपला वाटतो तो आपल्या समाजातला.. याच अर्थी सर्वांस समान मानणारे साधू विश्वकुटुंबीय होत. लौकिकदृष्ट्या समाजाची लक्षणे अनेक सांगता येतील; व समाज या शब्दाचा अर्थही कमीअधिक व्यापक मानता येईल. व्यक्तीच्या अगदी निकटचा सामाजिक घटक, जवळजवळ जिकडेतिकडे, कुटुंब असे मानले जाते. कुटुंबाच्या पलीकडे शेजार व प्रदेश, वर्ग व जात, व्यवसाय व धंदा असे अनेक समाज मानण्याचे, पाडण्याचे पर्याय आहेत. परंतु जात, धंदा वगैरे पर्यायांनी सूचित केलेले समाज एकदेशी असतात; म्हणजे त्यांचे समाजस्वरूप काही व्यवहारांपुरते अगर परस्परसंबंधांपुरते दिसून येते. समग्र जीवनाच्या दृष्टीने विचार करता हे समाज कोणत्या तरी मोठ्या व्यापक समाजाचे घटक म्हणूनच रहातात. कोणत्याही व्यापक, सर्वांगीण, बहुधा स्वयंपूर्ण अशा समाजाचा विशिष्ट भूभाग अगर प्रदेश हाच पाया असू शकतो. प्रत्येक प्रदेशातील समाज एकजिनसी असतो असे नाही. त्यात अनेक थर असू शकतात, बहुधा असतातच. प्रादेशिक समाजातील सर्व घटकांची भाषा एक असते असेही नाही. पण राजकीय, आर्थिक, सामाजिक इत्यादी अनेक संबंध शेजारामुळे घनिष्ठ राहिल्यामुळे, जेत्यांच्या, वरिष्ठांच्या सत्तासंपत्तिवानांच्या अमलामुळे, कारभारामुळे, त्यांनी लावलेल्या अगर लागलेल्या वळणामुळे, ते जोवर टिकून आहेत, तोवर समाज कितीही भिन्नभिन्न घटकांचा बनलेला असला तरी तो एका चौकटीत बसून रहातो.

समाजात जितके थर कमी होतील किंवा असतील, धर्म, भाषा, इतिहास, इत्यादींमुळे समाजाच्या सर्व घटकांतील व थरांतील एकतेची भावना जेवढ्या प्रमाणात वाढेल, तेवढ्या प्रमाणात प्रादेशिक समाज एकजिनसी बनतो; व केवळ बाह्य दडपणामुळे एका चौकटीत बसलेल्या अनेकविध समाजाच्या ऐवजी अनेक प्रकारच्या एकतेच्या भावनांमुळे एकजूट बनलेल्या समाजाचे त्यास स्वरूप येते. युरोपीय मध्ययुगीन काळाच्या शेवटास युरोपीय समाजांत एक महान स्थित्यंतर घडून आले. तत्पूर्वी प्रादेशिक कृषीवलांचे समाज जरी भिन्नभिन्न झालेले होते तरी धर्मगुरू, राजे व सामंत यांचा समाज अखिल-युरोपीय मानला जात असे. पोप व पवित्र रोमन सम्राट यांचा अंमल सर्व युरोपीय खिस्ती समाज तत्त्वतः मानीत होता. हळूहळू राष्ट्रभाषा, साहित्य, राष्ट्रेतिहास यांचे महत्त्व वाढून, अखिल युरोपीय सम्राट व पोप यांच्या सत्तेचे महत्त्व कमी होऊन, काही राष्ट्रांत तर ही सत्ता झुगारून देऊन राष्ट्रीय भावना बळावल्या; आणि राजे व सामंत हे आपणांस अखिल युरोपीय सर्वोच्च थराचे घटक मानण्याऐवजी स्वतःस त्या त्या राष्ट्रातील धुरीण मानू लागले. खंडव्यापी समाजथरांच्या ऐवजी एका प्रदेशातील सर्व थरांच्या, पूर्णपणे एकजिनसी नसला तरी सर्व थर मिळून एक नवीन एकात्म भावना बाळगणाऱ्या समाजाची कल्पना बळावली. या प्रवृत्तीमुळे नवीन राष्ट्रीय सरकारे प्रभावी बनली. राष्ट्रीय भावनेचा अतिरेक झाल्यामुळे पुढे अनेक आपत्ती ओढवल्या हे खरे असले, तरी मूलतः सर्व थरांचा मिळून बनलेल्या एका प्रादेशिक समाजाची कल्पना ही तत्पूर्वी प्रसृत असलेला, निरनिराळे व कायम विभाग-लेले थर असलेला, विस्तृत समाज यापेक्षा लोकशाहीच्या व समतेच्या कल्पनांस उपकारक ठरली.

जातिसंस्थेमुळे हिंदुस्थानातील स्तरीकरण, युरोपीय स्तरीकरणापेक्षाही जास्त घट्ट व टिकाऊ होते व आहे. येथेही तत्त्वतः ब्राह्मण-क्षत्रियादी समाज जे सगळीकडे होते, त्यांत भाषा व प्रदेश यांच्या भिन्नतेस वाव नव्हता. परंतु व्यवहारांत हे सर्व भेद होते; एवढेच नव्हे तर पोटजाती प्रदेशापुरत्या, नव्हे कोठे कोठे शहरांपुरत्याही निराळ्या झाल्या होत्या; व त्यांतील बेटी व्यवहाराच्या निर्बंधामुळे त्या स्वतंत्र जातीच बनल्या होत्या. जातिभेदांतर्गत उच्चनीचत्व कायम राहिले तर कोणताही समाज अनेक थरांत कायम विभागलेलाच रहाणार, एकजिनसी कधीच बनणार नाही. याबाबत भारतातील समाज संक्रमणावस्थेत दिसत आहेत. प्रत्यक्षात, व्यवहारात बहुतेक जातींच्या भौगोलिक मर्यादा भाषिक प्रदेशाने निर्देशित झाल्या आहेत; आणि बहुतेक प्रदेशांतील निरनिराळ्या जाती सर्व भाषिक प्रदेशभर विखुरलेल्या असतात. तेव्हा बेटीव्यवहार जरी जातीतच झाले तरी कोणत्याही जातीतील आप्तसंबंधांची व्याप्ती सर्व प्रदेशभरची असते. पोटजातींतील विवाहावरील बंधने शिथिल झाल्यास हे जास्तच अनुभवास येते. म्हणजे जाती निराळ्या राहिल्या तरी प्रत्येक जातीतील व्यक्तीस सर्व प्रदेशभरची आपलेपणाची भावना रहाते. यास भाषा, इतिहास, परंपरा यांबद्दलच्या अभिमानाची जोड दिली म्हणजे प्रादेशिक समाज हा एक आहे ही भावना बळावते.

## भारत : प्रादेशिक समाजांचे संघराज्य

एकात्म भावनेची दुसरी बाजू भिन्नत्वाची भावना. भाषा, इतिहास वगैरेंमुळे एका प्रदेशातील लोक जास्त जवळचे वाटतात. याचा पर्याय दुसऱ्या प्रदेशातील जास्त दूरचे वाटतात असा सहज होतो. यामुळे प्रादेशिक समाजाच्या कल्पनेस कुटीर कल्पना असे कधी कधी म्हणण्यात येते. परंतु या सर्व प्रश्नांचा विचार तारतम्याने केला पाहिजे. विश्वकुटुम्बाची कल्पना प्रत्येकास पटली व त्याप्रमाणे प्रत्येक वागू लागला तर उत्तमच. पण ज्या अर्थी हे अजून शक्य नाही त्या अर्थी मानवी समाजाची रचना व बांधणी ही शक्य तोवर जास्तीत जास्त व्यापक पायावर कशी साधता येतील व हा पाया जास्तीत जास्त कसा अधिक व्यापक करता येईल हेच पाहिले पाहिजे. या दृष्टीने खरा विचार हा की, प्रादेशिक समाज ही कल्पना बळावणे हे पाऊल पुढे पडते की मागे पडते ? वर दर्शविल्याप्रमाणे आज प्रत्यक्ष हिंदू समाजात सर्वच प्रकारच्या भिन्नत्वाच्या कल्पना प्रभावी आहेत. जातीबद्दलची उच्चनीचत्वाची भावना आहे. पोटजातीबद्दलचा अभिमान आहे व त्याबरोबरच प्रादेशिक व भाषिक भिन्नत्वाच्या कल्पनांचा पूर्ण पगडा आहे. प्रादेशिक व भाषिक भिन्नत्व हे नित्य साहचर्य नसल्यामुळे आले आहे. भिन्नभाषिक लोक, दुसऱ्या प्रदेशांतील लोक, सहसा नेहमीच्या सहवासातले नाहीत, म्हणून त्यांच्याविषयी भिन्नत्वाची भावना घालवणे हे जास्त प्रयासाचे आहे. सर्व समाज जास्त जाणता आणि जास्त चल झाल्याखेरीज हे होणे कठीण. एकाच प्रदेशातील लोकांत जाती, पंथ, धर्म इत्यादी भिन्नत्वामुळे आलेले भिन्नत्व हे याहून निराळ्या प्रकारचे. असल्या भिन्नत्वाच्या कल्पनांमुळे समाज दुबळा होतो. कारण रोजच्या व्यवहारात सारखे ज्यांशी वागावयाचे त्यांशी भिन्नत्वाची भावना असल्यास सहकार्य पुरेसे होत नाही व सामर्थ्य खचते. उच्चनीचत्वाच्या भावना यात भरीस पडल्यास समाजात दुफळी, बेकी अधिकच स्पष्ट होते. तेव्हा खरा तातडतोबीचा व महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे सर्व शेजाऱ्यांचा, निकटवासीयांचा समाज शक्य तितका एकजिनसी बनवावा. त्याबरोबरच ही शेजारची, लगतच्या प्रदेशाची कल्पना जितकी जास्त व्यापक तितकी बनवावी. प्रादेशिक समाज जितके एकात्मतेच्या कल्पनेने भारतील, तितके हे स्थित्यंतर जास्त लवकर होईल. जाति, धर्म, पंथ यांतील भेदांचे महत्त्व कमी होण्याचा आज भारतातील एकमेव मार्ग म्हणजे प्रादेशिक समाजाच्या एकतेचे महत्त्व पटणे हे होय; आणि या कल्पनेच्या प्रसाराने आपल्या समाजाचे पाऊल मागे पडणार नसून पुढेच पडणार आहे.

परिणामी, भारतीय एकतेच्या भावनेलाही ही प्रवृत्ती पोषकच ठरेल. जाती, धर्म, पंथ हे भेद दुर्लक्षून महाराष्ट्र, आंध्र, बंगाल असे मोठे प्रादेशिक समाज मानून वागण्याची प्रवृत्ती बळावल्यास हे सर्व एका भारतीय समाजाची उपांगे ही कल्पना पटविणे कठीण नाही; किंबहुना या दोन्ही कल्पनांचा प्रसार एकसमयावच्छेदेकरूनच होऊ शकेल. पण जोवर प्रत्येक पंथ, जात, गट आपापले वैशिष्ट्य निराळे मानतो व त्याप्रमाणे वागतो तोवर भारतीयतेचा कितीही डांगोरा पिटला, तरी आमचा समाज अनेकविध विभागलेला आणि म्हणून दुर्बळ राहणार.

याबरोबरच दुसराही एक महत्त्वाचा विचार लक्षात घेतला पाहिजे. राष्ट्राभिमानाचा अतिरेक व दुष्परिणाम होतात ते राष्ट्रनिष्ठा या एकाच कल्पनेस फाजील महत्त्व दिल्यामुळे. व्यक्ती, कुटुंब, गाव, प्रदेश, राष्ट्र, खंड, जग ही एक श्रेणी मानता येईल. या श्रेणीतील प्रत्येक घटकाबाबत व्यक्तीचे विशिष्ट कर्तव्य असते, विशिष्ट प्रकारची निष्ठा असते. सर्वांची अधिकारक्षेत्रे प्रायः एकमेकांपासून विभिन्न, निराळी. जोवर एकाचे दुसऱ्यावर अतिक्रमण होत नाही तोवर एकमेकांत विरोध उत्पन्न होण्याचे काही कारण नाही, व सर्वांबद्दलची निष्ठा योग्य प्रकारे संभाळून व्यक्तीस कारभार करता येतो. यांतील कोणत्याही एकाचे स्थान इतरांहून विशेष श्रेष्ठ व निष्ठा बाळगावयाची ती त्या बाबतचीच असे म्हटल्याने अतिरेक होतो व बेबंदशाही अगर हुकूमशाही, अराजक किंवा केवळ दंडनीती या कुठल्यातरी टोकाकडे समाज साहजिकच झुकतो. गाव व प्रदेश यांनी राष्ट्रास न मानले तर बेबंदशाही माजेल. उलट राष्ट्राभिमान, देशाची एकता या गोष्टी महत्त्वाच्या असल्या तरी राष्ट्राच्या सरकारने कुटुंब, गाव अगर प्रदेश यांच्या योग्य हक्कांवर अतिक्रमण केले, यांपैकी कोणास अन्यायाने वागविले तर ते, गाव-प्रदेशाहून राष्ट्र मोठे, म्हणून निमूटपणे सहन केले पाहिजे असे नाही; किंबहुना समाजाचा समतोल राखण्याकरिता अशा अतिक्रमणाचा योग्य प्रकारे प्रतिकार करणे हे कर्तव्यच ठरते. असला प्रतिकार कोतेपणाचे लक्षण नसून खऱ्या अर्थी राष्ट्रहित साधणाराच आहे.

भारताचा खंडप्राय विस्तार व त्यातील विविध भाषा, पंथ व जाती यांचा विचार करता, भारताचे एकराज्य झाले तरी एक समाज होणे अल्पावकाशात तरी शक्य नाही हे उघड आहे. दळणवळण फार वाढले व भाषिक भिन्नत्व कमी झाले की कालांतराने, प्रादेशिक समाजांतील अंतर्गत भेद दरम्यान नाहीसे झाले असल्यास, हे घडेलही. पण आज विचार प्रादेशिक समाजाबाबतच केला पाहिजे. हेही काही लहान नाहीत; स्वतंत्र युरोपीय राष्ट्रांएवढे बहुसंख्य आहेत. या कोटीत गणल्या जाणाऱ्या समाजांतील सर्व थरांत, त्यांत समावेश झालेल्या सर्व पंथांत एकतेची, आपलेपणाची भावना वसू लागली, तरी आजवरच्या हिंदी समाजाच्या मानाने आपण फार मोठी प्रगती केली असे म्हणता येईल.

भारताचे खरे स्वरूप जे उत्कट दिसावयास हवे, ते पंजाब, केरळ, आसाम, गुजराथ इत्यादी प्रादेशिक समाजांचे एक संघराज्य, अशा स्वरूपाचे आहे; आणि हे केवळ आपाततः ऐतिहासिक घडामोडींमुळे बनलेले संघराज्य नव्हे. विविधत्व, भिन्नत्व कितीही असले तरी मूलभूत परंपरा व संस्कृती यांतील एकता मानणारे व जाणणारे हे सर्व समाज आहेत. आजवर राजकीय स्वतंत्र एकता त्यांस कधी लाभली नसूनही भारतीय परंपरेतील सातत्य व जिवंतपणा टिकून राहिला. तेव्हा तो जास्त अनुकूल परिस्थितीत पुढेही टिकेल असे मानण्यास प्रत्यवाय नसावा. सामाजिक क्षेत्रांतील भारतीयांचे आजचे महत्त्वाचे कार्य म्हणजे सर्व अंतर्गत थरांतील अनिष्ट भेदभाव घालवून बलवान प्रादेशिक समाज उभारणे व त्याच्या द्वारा भारतीय परंपरेस पोसून व वाढवून विश्वकार्यास हातभार लावणे हेच आहे.

भारताच्या व महाराष्ट्राच्या कार्याचा विचार करणे हे परस्परपोषक आहे, व भारतीय कार्याबरोबर महाराष्ट्राच्या वैशिष्ट्याचा विचार करणे हे निदान महाराष्ट्रियांपुरते आवश्यक आहे, हे वरील विवेचना-

वरून कळून येईल. वरील विचारसरणीस अनुसरून महाराष्ट्रीय कार्य हे भारतीय कार्याचे एक उपांग ठरते. त्या अर्थी विषयास सुरुवात करावयाची ती आज जगात भारताचे स्थान कोणते व तो कोणते कार्य करील अशी अपेक्षा करावी, येथून करणे इष्ट आहे.

## २. आधुनिक जगातील प्रवाह आणि भारत

### युरोपीय संस्कृतीचे वर्चस्व

जगातील आजचे भारताचे स्थान फारसे महत्त्वाचे नाही. मानवतेतिहासातील आधुनिक युग युरोपीयांचे—यातच आधुनिक युरोपवंशी अमेरिकी वगैरेंचा समावेश होतो—युग असे म्हटले पाहिजे. स्थूल मानाने गेली ५०० वर्षे युरोपीयांची इतरांच्या मानाने सारखी प्रगती होत होती; व युरोपीय राज्य आणि संस्कृती यांचा पगडा १९ व्या शतकाच्या अखेरीस सर्व जगावर पूर्णपणे बसला होता. प्रथम व्यापाराच्या निमित्ताने युरोपीयांनी साहसी जगपर्यटनास सुरुवात केली. ही सुरुवात झाली तेव्हाच त्यांची नाविक कलेत बरीच प्रगती झाली होती. बंदुकी व दारूगोळा यांबाबतही ते इतरांहून वरचढ होते. साहस व वाढते ज्ञान यांमुळे आजवर अज्ञात असे नवीन भूभाग त्यांस सापडले; व ज्ञात प्रदेशांत दळणवळणाचे नवीन जलमार्ग त्यांनी रूढ केले. दक्षिण व पूर्व आशियात युरोपीयांचा प्रवेश हा या वेळेस नव्यानेच झाला. रोमन साम्राज्याच्या अंतापासून जवळजवळ १००० वर्षे एखाद-दुसरा साहसी प्रवासी सोडल्यास, युरोपीय, व्यापाराच्या अगर इतर निमित्ताने, या भागात फारसे येत नसत; आणि या भागाचा सर्व युरोपीय व्यापार अरबांच्या हाती होता. दक्षिण व पूर्व आशियातील तत्कालीन लोकांपेक्षां नाविक दल व शस्त्रास्त्रे यांबाबत युरोपीय पुढारलेले असल्यामुळे या नवागतांनी परदेशी व्यापारातून बऱ्याच अंशी अरबांचे उच्चाटन केले व आपणांस हवी असलेली बंदरे व व्यापार यांविषयींच्या सवलतीही एतद्देशीय राजांकडून मिळविल्या.

याप्रमाणे प्रथम जम बसल्यावर ज्या मानाने एतद्देशीय परिस्थिती मऊ सापडेल व स्वदेशी राजा अगर कंपनी यांचे धोरण साहाय्यक व निश्चयी असेल त्या मानाने युरोपीयांच्या व्यापाराची व वर्चस्वाची अधिकाधिक प्रगती होत गेली. प्रथम व्यापार, नंतर काहींनी धर्मप्रसार यास महत्त्व दिले. या दोहोंच्या जोडीस विशेषतः व्यापार टिकविणे किंवा वाढविणे याकरिता काही हक्क व क्रमाने राजकीय सत्ता काबीज करण्याचा उपक्रम झाला. जेथील राज्ये लहान, अस्थिर व दुर्बल होती तेथे व्यापाराच्या दृष्टीने महत्त्व वाटल्यास प्रत्यक्ष मुलूखच युरोपीयांनी ताब्यात घेतले. पहिली दोन-तीनशे वर्षे या सर्व हालचालींची प्रगती फारशी वेगाने होत नव्हती; पण औद्योगिक क्रांतीनंतर युरोपीयांचे शास्त्रीय व शस्त्रास्त्रांबाबतचे वर्चस्व झपाट्याने वाढले; व नवीन उत्पादनव्यवस्थेस अनुसरून व्यापाराच्या नवीन व वाढत्या क्षेत्रांची निकड उत्पन्न झाली. यामुळे, युरोपीयांनी इ. स. १७५० च्या पुढे जास्त आक्रमक धोरण स्वीकारले व त्यांची राजकीय सत्ता फार मोठ्या प्रमाणावर पुढील १५० वर्षांत जगभर वाढली. आशियापेक्षा इतर खंडांतील लोक अधिक मागासलेले असल्यामुळे तेथे युरोपीय वर्चस्व अधिकच पूर्णत्वाने स्थापित झाले. यांतील काही भागांत, विशेषतः अमेरिका व ऑस्ट्रेलियात, मूळची लोकसंख्या अतिशय विरळ किंवा तेथील युरोपीय आक्रमक व विशेष हिंसक, यामुळे ती जवळजवळ नामशेष होऊन, युरोपीयांच्या प्रत्यक्ष वसाहतीच तेथे बनल्या. इ. स. १९१४ च्या सुमाराची परिस्थिती पाहिली असता असे आढळते की, युरोप, अमेरिका व ऑस्ट्रेलिया या खंडांत प्रायः युरोपीय अगर त्यांचे वंशज-शुद्ध अगर

मिश्र–यांची वस्ती होती. आफ्रिकेतील बहुतेक भाग युरोपीयांच्या प्रत्यक्ष ताब्यात होता अगर त्यांस कोणत्या तरी अर्थी अंकित होता. आशियातीलही स्थिती जपान व तुर्की साम्राज्य सोडल्यास अशीच होती. पहिल्या महायुद्धानंतर तुर्की साम्राज्य मोडकळीस येऊन त्यातील बराच भाग युरोपीयांकडेच विश्वस्त म्हणून आला. चीन पूर्वीपेक्षाही दुर्बळ झाले. जपान मात्र वाढत्या जोमात टिकून राहिले.

१९ व्या शतकात युरोपीयांनी झपाट्याने जगभर आक्रमण केले. त्यांच्या मागे औद्योगिक क्रांतीमुळे सर्व तऱ्हेचे वाढलेले आर्थिक व शास्त्रीय बल हे होते. औद्योगिक व आर्थिक विकासामुळे आक्रमण सुकर झाले. तसेच, हा विकास असाच पुढे चालू ठेवण्यास हे आक्रमण आवश्यक व पोषक होते. म्हणजे नवीन उत्पादनशक्ती व शास्त्रीय ज्ञान यांचा भरपूर उपयोग करून घेण्यास सबंध जागतिक अर्थव्यवस्था त्यांस व्यापावयास हवी होती. जेथे युरोपीयांचे राजकीय वर्चस्व नव्हते, तेथेही त्यांच्या अर्थव्यवहाराचा अंमल दिसून येत होता. जपान राजकीय दृष्टया स्वतंत्र असले तरी हे स्वातंत्र्य युरोपीयांचे अर्थव्यवस्थेत अनुकरण करून, त्यांच्या अर्थव्यवहारांत पूर्णपणे सामील होऊन, जपानने टिकविले होते. या अर्थी आर्थिक दृष्टया युरोपीयांचे जागतिक वर्चस्व राजकीय वर्चस्वापेक्षाही अधिक पूर्ण व सर्वव्यापी होते.

या सर्वांच्या बुडाशी युरोपीयांची शास्त्रीय ज्ञानातील प्रगती ही होती. हिजमुळे शस्त्रास्त्रे, सर्व प्रकारची वाहतुकीची साधने, कृषी व औद्योगिक उत्पादन या सर्वांतच मोठा बदल घडून आला. या सर्वच बाबतींत युरोपीय फार प्रभावी ठरले; व सर्व जगातील निसर्गसंपत्तीचा उपयोग आपणांस जास्त चांगला करता येतो, त्या अर्थी जगाच्या फायद्याकरिताच सर्व पृथ्वी आमच्या सत्तेखाली हवी, असा दावा ते मांडू लागले. युरोपीय गेल्या दोन शतकांत फार समर्थ व संपन्न झाले. ही सामर्थ्यसंपन्नता जीवनाच्या सर्वांगांत दिसून आली. शास्त्रीय प्रगतीमुळे त्यांच्या शस्त्रास्त्रांचा पल्ला व प्रखरता ही वाढली, नवनवीन प्रकारच्या उपभोग्य वस्तूंचे उत्पादन लोकसंख्येच्या वाढीच्या मानाने मोठ्या प्रमाणावर वाढले व वाहतूक झपाट्याने व स्वस्त झाल्यामुळे सर्व ठिकाणच्या वस्तू सुलभतेने प्राप्त होऊ लागल्या. या शास्त्रीय प्रगतीमुळेच शिक्षण, आरोग्य व मनोरंजनाची साधने यांतही क्रांतिकारक फरक पडले. एके काळी श्रीमंतासही दुर्मिळ असलेल्या या बाबतच्या सुखसोयी सामान्य जनतेस उपलब्ध करून देणे शक्य झाले.

युरोपीयांची राजकीय सत्ता आज ओसरत आहे. आशिया व आफ्रिका या खंडांतील देश व राष्ट्रे स्वतंत्र होऊन आपला कारभार स्वबुद्धीने चालवू लागली आहेत. तरी युरोपीयांचा इतरांच्या सर्व जीवनावरील पगडा फारसा कमी झालेला दिसत नाही. याचे कारण असे की, युरोपीयांचे गेल्या दोन शतकांतील वर्चस्व हे त्यांच्या राजकीय अगर आर्थिक सत्तेवर मूलतः आधारित नव्हते. शास्त्रीय प्रगतीमुळे युरोपीय समाज व राष्ट्रे संपन्न व बलवान झाली. हाच युरोपीय वर्चस्वाचा खरा पाया. तेव्हा शास्त्रीय प्रगती, एकंदर विज्ञानवृद्धी हिलाच या बाबतची आदिशक्ती असे मानले पाहिजे. अर्थात, मुळात ही शास्त्रीय प्रगतीच युरोपीय समाजाची कशी झाली याचा विचार करताना युरोपीय समाजातील काही विशिष्ट गुणांचा विकास, आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत नवीन कल्पनांचा उद्भव व तज्जन्य नवीन व्यवस्था व संस्था या सर्वांस जमेस धरावे लागेल. युरोपीय शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराबरोबरच आर्थिक व राजकीय कल्पना व व्यवस्था यांचा प्रसार व स्वीकार पुष्कळ अंशी झाला, हेही आधुनिक विज्ञान व आधुनिक समाजकल्पना व व्यवस्था यांचा संबंध बराच निकटचा आहे असे दर्शविते.

युरोपीयांची राजसत्ता पूर्वीप्रमाणे टिकून राहाणे शक्य नाही; व इतर देशांच्या प्रगतीबरोबर युरोपीयांचे आर्थिक वर्चस्वही कमी होण्याचा संभव आहे. परंतु, असे झाले तरी युरोपीय विज्ञान व संस्कृती

यांचा प्रभाव कमी होण्याची चिन्हे नाहीत. किंबहुना दिवसेदिवस त्यांचे क्षेत्र वाढत आहे व अ-युरोपीय समाज-जीवनाची सर्वांगे जास्त जास्त प्रकर्षाने त्यांच्या अंमलाखाली येत आहेत. भारतात हे उघड उघड घडताना दिसत आहे. युरोपीय शास्त्रांचा आपण पूर्णपणे स्वीकार केला आहे. वाहतूक, कृषी व औद्योगिक उत्पादन या बाबतींत आपली गरिबी लक्षात घेता आपणांस जेवढे युरोपीयांचे अनुकरण करता येते तितके आपण करीत आहोत. पैसा व पेढ्या यांचे व्यवहार, उद्योगपती व मजूर यांच्या संघटना यांबाबतही आपण युरोपीयांच्या पावलावर पाऊल टाकीत आहो. आपला राज्यकारभार ब्रिटिशांनी घालून दिलेल्या साच्यातच चालला आहे; एवढेच नव्हे तर, आपल्या राज्यघटनेचे स्वरूप, त्यात ग्रथित केलेली मूलतत्त्वे ही सगळी आपण स्वातंत्र्योत्तर काळात युरोपीयांपासूनच सहेतुक उचलली. आपल्या रोजच्या खाजगी जीवनातही युरोपीय संस्कृतीचा वाढता पगडा दिसून येतो. आपली घरे, त्यांतील सामान, त्यांची सजावट, आपले खाणेपिणे, आपले पोशाख ही दिवसेदिवस अधिकाधिक युरोपीयांसारखी होत आहेत. वृत्तपत्रे व सिनेमासारखी करमणुकीची साधने ही तिकडून आली; पण आमची नाटके, तमाशा यांवरही तिकडील कल्पनांचा प्रभाव दिसून येतो. आमची सर्व शिक्षणव्यवस्था युरोपीय ढबीची व त्यांच्या कल्पनांनी व्यापिलेली असल्यामुळे त्यांचा अंमल वाढता राहाणार, हे उघड आहे. आमचे काव्यादी ललित वाङ्मय, टीकात्मक साहित्य, चित्र, शिल्प इत्यादी कला यांचे पुनरुज्जीवनही युरोपीयांकडून स्फूर्ती घेऊनच, त्यांच्यातील नवमतांचा स्वीकार करूनच होत आहे.

ही प्रवृत्ती कमी होण्याची लक्षणे काही दिसत नाहीत. दिवसेदिवस दळणवळणाची साधने—सर्व प्रकारची—जास्त सुधारत आहेत, प्रभावी होत आहेत. यामुळे देशादेशांचे, लोकालोकांचे हरतऱ्हेचे संबंध जास्त नित्याचे व निकट होत आहेत. गेल्या दहा-पंधरा वर्षांतच हवाई वाहतुकीच्या वाढीमुळे केवढे तरी मोठे स्थित्यंतर दिसून येते. हेच पुढे चालून मानवास, मानवनिर्मित वस्तूंस व लिखित वा उच्चारित मानवी संदेशांस भौगोलिक अंतर आक्रमणे जास्त जास्त सुलभ होत राहणार. यामुळे जगातील निरनिराळे प्रदेश व समाज यांमधील दळणवळण व देवाणघेवाण सारखी वाढणार. पूर्वीपेक्षा आपण एकमेकांस कितीतरी जास्त निकटवर्ती वाटतो व प्रत्यक्षात झालोही आहो. एवंच, जगातील निरनिराळ्या समाजांतील तुटकपणा कमी होत असल्यामुळे एकमेकांच्या कल्पनांचा, वस्तूंचा, आचार-विचारांचा स्वीकार करणे हे वाढतच जाणार व जगातील लोकजीवनात जास्त सारखेपणा येणार, हे उघड आहे.

तसेच, युरोपीय समाज अजून इतर सर्वांपेक्षा जास्त प्रगत, संपन्न व बलवान् आहे. गेली दोन शतके ज्या मार्गाने व ज्या दिशेने या समाजाची प्रगती झाली, तो मार्ग अजून मोकळा आहे. शास्त्रीय प्रगतीचा शेवट झाला, प्रगतीचे अंतिम टोक गाठले गेले असे अजून दिसत नाही. इतर काही समाज युरोपीयांच्या जवळ येत असले, तरी तुलनेत युरोपीय अजून फार पुढारलेले व समर्थ असल्यामुळे, आणखी अनेक दशके तरी ते आघाडीवर राहाणार व विज्ञानाच्या व व्यावहारिक उत्पादनाच्या बाबतीत विकासाच्या दिशा मुख्यतः तेच दाखविणार असे निश्चित वाटते. तेव्हा, आपला मागासलेपणा व आपणांवर युरोपीय कल्पना व जीवन यांचा अंमल ही अल्पावधीत कमी होणार नाहीत. आपले विचार व आचार युरोपीयांच्यासारखे जास्त जास्त होत जाणार हे धरूनच चालले पाहिजे.

## वैज्ञानिक क्रान्तीचे व विकासाचे जागतिक स्वरूप

ही प्रचलित प्रवृत्ती आपल्या समाजाने काहीशी सहेतुक स्वीकारली आहे. आपणांवर १५० वर्षे ब्रिटिशांचे राज्य होते. तेव्हा राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे व त्यांच्या वर्चस्वाचा साहजिक परिणाम म्हणून

ब्रिटिशांचे, युरोपीयांचे अनुकरण आपणांकडे सुरू झाले. परंतु भारतीय समाजधुरीणांस बदलत्या परिस्थितीचे यथार्थ स्वरूप कळू लागल्यानंतर, राजा राममोहन राय यांच्या काळापासून तो थेट आजपर्यंत, यांपैकी बहुतेकांनी युरोपीयांचे गुण, विद्या, आचार–विचार कमीअधिक प्रमाणात आपण उचलले पाहिजेत, असे प्रतिपादिले. त्यातल्या त्यात युरोपीयांची विद्या, विशेषतः शास्त्रीय ज्ञान, ही त्यांच्या उत्कर्षाची जन्मदात्री असून, ती आपण प्रसन्न करून घेतलीच पाहिजे, याबाबत तर जवळ-जवळ पूर्ण ऐकमत्यच आढळून आले. युरोपीयांच्या अनेक प्रकारच्या आचारांबद्दल मतभेद झाले, अजूनही आहेत. पण आजवरचा अनुभव असा की, याबाबत दर पिढी सहेतुकपणे अगर अहेतुकपणे जास्त जास्त युरोपीयसदृश होत आहे.

एका दृष्टीने यात काही अगदी नवीन घडत आहे असे नाही. मानवेतिहासाच्या प्राक्कालापासून मानवसमाजाच्या निरनिराळ्या वंशांनी, शाखांनी एकमेकांपासून विज्ञान, धर्मकल्पना, समाजरचना, रीतिरिवाज या सर्व बाबतींत उचल केली आहे. आर्थिक संबंध, राजकीय आक्रमण, धर्मप्रसार इत्यादी कारणांमुळे, परस्परसहवास घडल्यामुळे, बुद्ध्या, सहजगत्या अगर अगतिक होऊन, एकमेकांचे अनुकरण घडले आहे. आजचे मानवी ज्ञान व संस्कृती यांचा उगम बहुरूपी आहे. खुद्द युरोपीयांनी जुने ज्ञान आत्मसात केल्यानंतर त्याच्या पायावरच पुढची प्रगती केली. चिनी, हिंदी, अरबी या सर्वांनी ऐतिहासिक कालात वेळोवेळी ज्ञानवर्धनात व संस्कृतिवर्धनात पुढाकार घेतला. आजच्या भौतिक शाखांतीलही मूळ कल्पना सर्व युरोपीयांच्या नाहीत. आपण जे जे आज विशेष भारतीय समजतो, त्यातही पूर्वकालीन उसनवारी पुष्कळ आहे. शास्त्रीय प्रगतीमुळे दळणवळण वाढून आज जग फार लहान झाले व संबंध घनिष्ठ झाले. आजच्या घडामोडी, त्यांचा वेग व व्याप्ती यांमुळे अद्‌भुत वाटतात. पण तत्त्वतः पूर्वापार चालत आलेल्या मानवेतिहासातील मूळ प्रवृत्तीस धरूनच हे चालू आहे, असे विचारांती आढळून येते.

युरोपीय प्रगतीच्या बुडाशी विशिष्ट युरोपीय अनुकूल परिस्थिती व तत्कालीन समाजातील काही विशिष्ट गुणांचा विकास ही होती, असे मानतात. साहस, जिज्ञासा, चिकित्सक बुद्धी यांच्या समुच्चयामुळे युरोपीय समाज प्रगतिपथावर चढला, असे म्हणतात. पण हे गुण प्रथमच युरोपीयांत दिसून आले असे नाही. किंबहुना, पूर्वेतिहासात जेथे जेथे विशेष कर्तृत्व आढळते, तेथे तेथे या गुणांचा प्रादुर्भावही दिसून येतो. अमुक एका समाजात अगर कालखंडात ते दृष्टीस पडतात असेही नाही; अनुकूल परिस्थिती प्राप्त झाली असता ते सर्वत्रच उमटू शकतात. गेल्या ५० वर्षांतील आशिया खंडातील अनेक जुन्या समाजांच्या पुनरुज्जीवनाच्या इतिहासावरून हे गुण किंवा त्याबाबतच्या काही विशिष्ट प्रक्रिया खास युरोपीय आहेत असे दिसत नाही. युरोपीय दडपणामुळे आव्हानामुळे या जुन्या समाजांत मोठी स्थित्यंतरे घडली आहेत, घडत आहेत व सर्वत्र युरोपीयांनी नवीन बनविलेल्या शास्त्र व संस्कृती यांच्या विकासात भाग घेण्याची तयारी दिसून येत आहे. बुद्धिवादी शास्त्रीय दृष्टी आधुनिक युगाचा विशेष समजला जातो. पण जुन्या युगात झालेल्या अनेक घडामोडींच्या बुडाशी ही दृष्टी दिसून येते. उदाहरणार्थ, भारतीय भाषाशास्त्र व व्याकरण यांचा विकास ही आधुनिक शास्त्रीय पद्धतीच्या वापराचा अत्यंत जुना उत्कृष्ट नमुना आहे, असे काही आधुनिक भाषाशास्त्री म्हणतात. तेव्हा या नवीन प्रवाहात समरस होण्यास आम्हांस आता काही विशेष प्रयास पडतील असे दिसत नाही. आम्हांस काही अपरिचित गुण मिळवायचे आहेत, असे नाही. यापुढे आमचे कर्तृत्व मर्यादित राहिले तर ते केवळ आमच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे व व्यवस्थेमुळेच राहण्याचा संभव आहे.

युरोपीय विद्या व युरोपीय शास्त्रे ही आता जागतिक झाली आहेत. मानवी ज्ञानाच्या वाढीचा

ओघ पूर्वापार अखंड आहे. त्यात युरोपीयांनी विशेष मोठी व चमत्कृतिजनक भर गेल्या तीनचारशे वर्षांत घातली म्हणून त्यास तात्पुरते युरोपीय विद्या असे स्वरूप आले. पण आता या विद्येचा प्रसार व स्वीकार जगभर झाल्यामुळे, तिच्या वाढीस सर्वच थोडाबहुत हातभार लावू लागल्यामुळे तिचे स्वरूप पुन्हा जागतिक झाले, असे मानण्यास प्रत्यवाय नसावा.

भौतिक शास्त्रांच्या प्रगतीबाबत असेही म्हणता येईल की, त्यांत कोणत्याही एखाद्याचे वैशिष्ट्य असे टिकणे कठीण आहे. परिस्थितीचा वास्तविक सूक्ष्म अभ्यास, कल्पक प्रयोग, चिकित्सक विश्लेषण इत्यादींच्या साहाय्याने झालेली ज्ञानवृद्धी सर्वत्र सारखी होणे अटळ आहे. विशिष्ट परिस्थितीमुळे काही समाजांत विशेष प्रगती घडून आली, किंवा विशिष्ट शास्त्रांचे अध्ययन कोठे ज्यास्त सातत्याने झाले तरी या गोष्टी तात्कालिक परिस्थितीमुळे घडून आल्या, असेच म्हणावे लागते. विशिष्ट परिस्थितीमुळे काही विषयांचे, प्रगतीच्या काही दिशांचे महत्त्वमापन निरनिराळ्या समाजांत कमीअधिक दिसून आले, तरीही सर्व विज्ञान एकच. प्रगतीच्या सर्व दिशा एकमेकांस पूरक व सर्व ओघ एकाच दिशेने वाहणारा व सर्वांस सारखाच प्राप्य हेच मूलतः खरे.

जी गोष्ट विज्ञानाची तीच थोड्याबहुत फरकाने साहित्य व कला यांची आहे, असे म्हणता येईल. पूर्वकाळी शिल्प, स्थापत्य इत्यादींचे विशिष्ट प्रकार विशिष्ट प्रदेशांत उदयास आले व विकसित झाले. असेच काहीसे साहित्य–प्रकारांचेही झाले. परंतु, कालांतराने हळूहळू देवघेव होऊन, निरनिराळे ओघ एकात मिसळावे व त्यातून नवे प्रकार निघावे असेच होत गेले; व आता तर देवाणघेवाण सर्वच बाबतींत इतकी सतत व सुलभ होत आहे की, कोठलेही एक वैशिष्ट्य फार काळ टिकणे अगर एखादा प्रकार एखाद्याचाच राहणे हे शक्य दिसत नाही. कलाकुसर व हस्तव्यवसाय यांचे स्थान उत्पादनक्रिया व कलाविकास यांच्या दरम्यानचे असल्यामुळे त्याबद्दल निराळे लिहावयास नको. नाही म्हणावयास, भारतीय शास्त्रीय संगीतावर युरोपीय शास्त्रीय संगीताची अजून छाप पडलेली नाही. असा एखादा सकृद्दर्शनी दिसणारा अपवाद का राहिला, हा विचार एका अर्थी महत्त्वाचा असला तरी प्रस्तुत विवेचनाच्या दृष्टीने केवळ तात्कालिक अपवाद म्हणून गणता येईल.

वरील विवेचनाचा सारांश असा की, आधुनिक युरोपात सुरू झालेल्या वैज्ञानिक क्रांतीचा प्रभाव जगभर पूर्ण झाला आहे व त्यातून उद्‌भूत झालेला विज्ञान, साहित्यकला इत्यादींच्या विकासाचा ओघ आता जागतिक स्वरूप धारण करीत आहे. यात भारत सहभागी होत आहे व कालांतराने पूर्णपणे समरस होईल. असे झाले तरी सर्व क्षेत्रांत भारतीयांच्या कर्तृत्वास, ते ठळकपणे निराळे दिसण्यास, वाव राहीलच. चंद्रशेखर व्यंकटरमण यांनी थोर युरोपीय शास्त्रज्ञांप्रमाणे महत्त्वाचे संशोधन केले अगर तेनसिंग शेरपाने आधुनिक साहसी विक्रम करून दाखविला हे भारतीयांस गौरवपर, अभिमानास्पद झाले; व यांत आपण जागतिक ओघात समरस झालो असेही दिसते. रवींद्रनाथांच्या कवित्वाची भरारीही, बंगाली साहित्य आंग्ल साहित्याभिमुख झाल्यावर, त्यातील प्रकार व मूल्ये यांनी भारल्यावर घडून आली. काही काळापूर्वी आपली तौलनिक हीन स्थिती आपणांत इतकी भासत होती की, आमच्यांतील एखादाही कर्तृत्वाच्या क्षेत्रात युरोपीयांच्या बरोबरीने काम करू शकतो, याचेच आम्हांस कौतुक वाटे. आज जरी ही परिस्थिती बदलली असली तरी जागतिक क्षेत्रात आम्ही अधिकाधिक मानाचे स्थान मिळवावे असे आम्हांस वाटणे अगदी साहजिक आहे. आज ते स्थान फारसे मानाचे नाही; आमचा भाग अजून गौणच आहे. तेव्हा जेथे आपले काही वैशिष्ट्य न मानता आम्ही नवीनाचा स्वीकार केला, तेथे आमचा प्रभाव कसा पडेल, जास्त भरीव कामगिरी कशी करून दाखविता येईल, हा विचार अनेक दृष्टींनी महत्त्वाचा ठरतो.

परंतु, या लेखात त्याचा विचार करावयाचा नाही. भारत आपले काही वैशिष्ट्य टिकवीत आहे काय

व त्याजकडून काही विशिष्ट कार्य अपेक्षित व शक्य आहे काय, हे पाहावयाचे येथे योजिले आहे. अर्थात आम्ही जगावेगळे काही आहो, याकरिता ओढूनताणून अट्टाहासाने काही राखावयाचे अगर करावयाचे असा अभिप्राय नाही. असला विचार कधीच सुज्ञपणाचा ठरणार नाही. इष्ट प्रचलित प्रवृत्ती व जागतिक प्रवाह यांशी झगडणे, त्यांपासून तुटून राहाणे, हे कोणासच हितावह ठरत नाही. वर निर्देशिल्याप्रमाणे अंती सर्व मानवेतिहासाचा ओघ एकच आहे. त्यातून कोणीच निराळा राहू शकत नाही. भारतीय विचारपरंपरेच्या दृष्टीनेही विश्वप्रयत्नांत सहभागी होणे, जगौघात विलीन होणे, हेच श्रेयस्कर मानले आहे. असे असले तरी आधुनिक युगाची घडी आता कोठे बसत आहे. काळे, गोरे, युरोपीय, आशियाई असे भेद अजून अनेक क्षेत्रांत टिकून आहेत; व शास्त्रे वगैरेबाबत समरसपणा दिसून आला तरी तो इतर अनेक कल्पनांत व व्यवस्थेत दिसत नाही. तेव्हा संक्रमणकाळात, नवीन घडण होत असलेल्या काळात, आमचा विशिष्ट इतिहास व परंपरा यांकडे पाहता काही कार्य आमची वाट पाहात आहे, असे म्हणता येईल काय एवढेच येथे पाहावयाचे आहे. येथे भारताचे विशिष्ट कार्य याचा अर्थ भविष्यातील मानवेतिहासास विशेष वळण लावण्याचे कार्य, एवढाच घ्यावयाचा आहे.

## जुने समाज व संस्कृती यांच्या प्रतिक्रिया

येथवरच्या विवेचनात विज्ञान, साहित्य, कला यांच्या बरोबरीने धर्मकल्पना, समाजरचना व अर्थव्यवस्था यांचा उल्लेख केलेला नाही, हे लक्षात येईल. याचे एक कारण म्हणजे या सर्व बाबतींत अजून जगात फार विविधता दिसून येते. आधुनिक शास्त्रीय ज्ञान व उत्पादनतंत्र यांचा उपयोग करून घेण्यास अमुक प्रकारच्याच तत्त्वज्ञानाचा स्वीकार केला पाहिजे किंवा सामाजिक रचना अमुकच प्रकारची असली पाहिजे, असे दिसत नाही. एवढेच नव्हे तर आधुनिक जग ज्यांवर आधारित आहे, त्या अचाट वैज्ञानिक शक्तींचा वापर अर्थोत्पादनासाठी करून घेण्यास अर्थव्यवस्थाही विशिष्ट प्रकारचीच असली पाहिजे असे आढळून आलेले नाही. १९ व्या शतकातील इंग्लंड, हिटलरचा जर्मनी, मैजी युगातील जपान, भांडवलशाही अमेरिका, साम्यवादी रशिया या सर्वांनीच आपापल्या परीने नवीन तंत्राचा उपयोग करून, त्यात भर घालून, आपले बल वाढविले. तेव्हा, या सर्व बाबतींत अजून तरी जागतिक विचाराची किंवा सांस्कृतिक प्रवाहाची दिशा एक झाली किंवा निश्चित झाली असे म्हणता येत नाही.

दुसरे असे की, युरोपीय भौतिक शास्त्रज्ञ जसे आपले सिद्धांत व शोध यांबाबत छातीठोकपणे विधाने करतात व प्रत्यक्षात त्यांचे स्वरूप निश्चितपणे दर्शवू शकतात, तसे युरोपीय समाजशास्त्रज्ञांचे नाही. किंबहुना निसर्गावर आम्ही मात केली, निसर्गशक्तीस वळवू शकलो, परंतु त्या मानाने मनुष्यस्वभाव व मानवी समाज यांस इष्ट व योग्य वळण लावण्यास, त्यांची सुव्यवस्था करण्यास आम्ही असमर्थ ठरलो, असेच सर्वांस कबूल करावे लागते. मनुष्याचे निसर्गावरचे प्रभुत्व व त्यामुळे त्याच्या हाती आलेली प्रचंड शक्ती नीट वापरली जाईल, ठीक पेलली जाईल, याबद्दल खात्री देता येत नाही. मानवसमाजांची अर्थव्यवस्था व त्यांचे परस्परसंबंधही आज समाधानकारक खास नाहीत. यादवी व युद्धे यांचा धोका सततचा आहे. यामुळे हे मोठे व महत्त्वाचे कार्यक्षेत्र असे आहे की, यात विशिष्ट मानवहितार्थ प्रयत्न करणे शक्य आहे, इतकेच नव्हे तर अत्यावश्यकही आहे. या क्षेत्रात भारतीय कर्तृत्वास वाव आहे काय, हे पाहण्याच्या आधी युरोपीय वर्चस्वाच्या काळात, गेल्या १०० वर्षांत, आपले वैशिष्ट्य दाखविणे, टिकविणे याबाबत जुन्या समाजाच्या, संस्कृतींच्या काय प्रतिक्रिया दिसून आल्या, त्यांनी काय प्रयत्न केले याचे थोडक्यात समालोचन करू.

युरोपीयांचे आक्रमण इतर सर्व खंडांवर सुरू झाल्यानंतर निरनिराळ्या समाजांच्या परिस्थिति-

भिन्नतेमुळे त्याजवर निरनिराळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया झाल्या. काही जुने समाज व संस्कृती यांस युरोपीयांनी जवळ जवळ नामशेष केले. हे विशेषतः अमेरिकेत, इंका वगैरेंच्या संस्कृतींबाबत दिसून आले. काही अगदी प्राथमिक अवस्थेतील समाज एक तर फार मागासलेलेच राहिले; अगर स्वतःचे वैशिष्ट्य असे काही न टिकविता युरोपीयांशी पूर्ण समरस झाले. आफ्रिकेत बऱ्याच अंशी हे घडले. पण जे समाज जुन्या काळी काही अंशी तरी युरोपीयांशी तुल्यबळ होते त्यांनी आपले वैशिष्ट्य हरप्रकारे टिकविण्याचे अनेक प्रयोग केले. जपान्यांनी २५० वर्षे युरोपीयांशी संपर्क न यावा म्हणून कडक निर्बंध घातले. चिन्यांनीही युरोपीय दळणवळण मर्यादित राखले. आशियातील इतर इस्लामी, हिंदू व बौद्ध भागांत युरोपीयांचा शिरकाव न होऊ देण्याइतकी एतद्देशीय राज्ये प्रबल नव्हती. त्यामुळे व्यापार, धर्मप्रसार व राज्यसत्ता अशा सर्वच प्रकारे युरोपीयांशी संबंध अटळ झाला. १९ व्या शतकाच्या मध्यानंतर चीनचे व जपानचे संपर्क टाळण्याचे धोरण युरोपीयांच्या लढाऊ आक्रमणाविरुद्ध टिकू शकले नाही. हे संबंध सुरू झाल्यानंतर सर्व समाजांत स्थूल मानाने दोन प्रकारच्या प्रतिक्रिया दिसून आल्या. युरोपीयांची श्रेष्ठता निदान काही बाबतींत तरी कबूल करावी लागल्यामुळे, या बाबतीत त्यांच्यापासून शिकण्याची व त्यांचे अनुकरण करण्याची आवश्यकता भासली; पण त्याचबरोबर इतर बाबतींत आमचे काहीतरी निराळे असे आहे व ते हरप्रयत्नाने टिकविणे इष्ट व आवश्यक आहे असेही वाटले. जेथे राज्यसत्ता टिकून होती व समाज सुसंघटित होता तेथे या दोन्ही दिशांचे प्रयत्न सहेतुक, पद्धतशीर करण्यात आले; जेथे परिस्थिती प्रतिकूल होती तेथे व्यक्तींच्या व गटांच्या तुटक व बहुतांशी निष्फळ प्रयत्नांत या प्रवृत्ती दृग्गोचर झाल्या; तरी मूलतः प्रतिक्रियांचे स्वरूप सगळीकडचे एकच होते.

## जपान, चीन आणि इस्लामी राष्ट्रे

जपानचे उदाहरण सर्वांत स्पष्ट व उद्बोधक आहे. असंपर्काचे धोरण टिकत नाही हे दिसल्यावर तेथील क्रांतिकारक पुढाऱ्यांनी आधिभौतिक शास्त्रे, विशेषतः शस्त्रास्त्रे व आधुनिक उद्योगधंदे यांबाबत युरोपीयांच्या विद्या पूर्ण अवगत करून घेण्याचे धोरण अवलंबिले. अशा रीतीने फार मोठे परिवर्तन त्यांनी बुद्ध्या केले तरी समाजरचना व ती ज्यावर आधारित होती त्या कल्पना यांत अत्यल्प बदल केला. किंबहुना, आधुनिक प्रचार वगैरे साधनांच्या योगे ती जास्त पद्धतशीर बसविण्याचा व दृढमूल करण्याचा प्रयत्न केला. मैजी क्रांती (१८६८) ते द्वितीय महायुद्धोत्तर पराभव (१९४६) एवढ्या कालखंडात, या दुहेरी प्रयत्नात जपानने पूर्ण यश संपादिले असे दिसते. दुर्बळ राजसत्ता, मोठा देश व विस्कळित समाज यामुळे चीन स्वतंत्र असूनही तेथे काही विशेष होऊ शकले नाही. राज्यसत्तेने शस्त्रास्त्रे मिळविण्याचे व सुसंघटित लष्कर उभारण्याचे काही प्रयत्न केले ते तोकडे पडले. परंतु राजकीय स्वातंत्र्यामुळे युरोपीय आक्रमणाचे परिणाम मुख्यत्वे समुद्रकिनाऱ्यालगतच्या पट्टीतच भासले व तेही व्यापार-उद्योगाबाबत. समाजरचना इत्यादींबाबत परिवर्तन न झाल्यामुळे स्वत्व जसेच्या तसेच अगदी अलीकडेपावेतो टिकले. इस्लामी संस्कृतीचा बहुतेक मध्यवर्ती प्रदेश १९१४ पर्यंत तुर्की साम्राज्यात अंतर्भूत होता. त्याची परिस्थिती बरीचशी चीनसारखी होती. पण चीनपेक्षा हा कमी एकजिनसी व जास्त विभागलेला व यात खिस्त्यांविरुद्ध प्रतिकाराची परंपरा जुनी. तेव्हा तेथील मुख्य प्रतिक्रिया इस्लामचे एकीकरण व पुनरुत्थान या प्रकारची झाली. पंथ, राष्ट्र, धर्म, भाषा इत्यादी एकात्मतेस पोषक अशा निरनिराळ्या ज्या भावना आहेत त्यांचा चीनच्या व जपानच्या परिस्थितीत सारखाच परिपोष होऊ शकला म्हणून या देशांचे पुढील इतिहासही एकसंधी राहिले. इस्लामी पुनरुत्थानाचे तसे होऊ शकले नाही. इराण शियापंथी व भाषा आणि राष्ट्रभावना यांनी विभिन्न म्हणून तो निराळाच राहिला. तुर्कांचे साम्राज्य नष्ट झाल्यावर तेही भाषा व राष्ट्रभावना

या दोन्हींबाबत शेजारच्या अरबांहून निराळे व कमी धार्मिक, त्यामुळे त्यांचाही मार्ग काहीसा निराळा राहिला. परिणामी, आजची प्रभावी कल्पना अरब-एकीकरण अशा स्वरूपात उरली. अर्थात, अरब हे इस्लामचे मध्यवर्ती, त्यामुळे इस्लामी पुनरुत्थानाचा भाग अरबी एकीकरणात आहेच. पण यात फरकही आहे, हे इस्लामी म्हणून निराळे निघालेले पाकिस्तान अरबांशी समरस होत नाही यावरून दिसून येते. हिंदुस्थानातील हिंदू व मुसलमान यांचा विचार प्रथमपासूनच निराळा करावा लागतो. युरोपीय विद्या हस्तगत करण्याबाबत दोघांचे प्रयत्न जरी सारखे होते, तरी स्वत्व टिकविण्याबाबतच्या दोघांच्या कल्पना अगदी भिन्न होत्या. इस्लामच्या पुनरुत्थानाच्या कल्पनेबाबत हिंदी मुसलमानांस नेहमीच ममत्व वाटले. हिंदूंनी त्यांत लक्ष घालावयाचे काही कारण नव्हते. त्यांचा प्रश्न पूर्णपणे भारतातल्या सीमेतला, एकाच राज्यातला होता; व स्वत्वाचा विचार करताना युरोपीय आक्रमणाबरोबरच जुने इस्लामी आक्रमणही जमेस धरणे साहजिकच होते.

चिनी, जपानी, इस्लामी, हिंदू या सर्वांच्या प्रतिक्रियांचे स्वरूप स्थूल मानाने एकच आहे : प्रथम अवमान व उपेक्षा व नंतर शक्य तितके संसर्ग टाळण्याचे प्रयत्न; हे यशस्वी न झाल्यामुळे, युरोपीय आक्रमण चालूच राहिल्यामुळे, युरोपीय काही बाबींत तरी वरिष्ठ आहेत याची उगवती जाणीव; ही तीव्र झाल्यानंतर त्यांच्या सामर्थ्याच्या मूळ स्थानाचा शोध व विशिष्ट बाबतींत अनुकरण करण्याचा प्रयत्न; पण याबरोबरच आपल्या कल्पना व व्यवस्था यांबाबत शक्य तितका कमी फरक व्हावा असा कटाक्ष. जुने तसेच टिकविण्याचे प्रयत्न जसेजसे जास्त निष्फळ झाले व आचार बदलले, बदलावे लागले, तसे आत्मसंशोधन काही अंशी सुरू झाले व अंशतः अनुकरणापेक्षा समाजव्यवस्था, धर्मकल्पना इत्यादींबाबत काही मूलभूत फेरबदल घडले पाहिजेत काय, याचा शोध सुरू झाला. यातही काही प्रतिक्रिया, परिवर्तने सर्वसामान्य दिसतात. युरोपीयांचे ज्याबाबत वर्चस्व कबूल करावे लागते त्यात आमचाही काही पूर्वकालीन वाटा होता असा दावा सर्वच करू लागले. तसेच, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव वगैरे जी काही नवीन मूल्ये स्वीकारार्ह अगर ज्यांचा निदान उघड रीतीने पुरस्कार करणे अटळ, तीही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आमच्या परंपरेतच बसतात हे दाखविण्याचा आग्रह. सर्वसाधारणपणे आमचा पुरातन काळ उज्ज्वल परंतु मध्यंतरी कारणपरत्वे अधोगती झाली किंवा प्रगती खुंटली, समाजास मांद्य आले म्हणून युरोपीय पुढे गेले, असे स्वतःस व इतरांस भासविण्याचा सर्वांचा प्रयत्न—ह्या गोष्टी सर्वसामान्यपणे दिसून येतात.

या सर्व प्रयत्नांत काही काळ तरी यश असे जपान्यांनी मिळविले. चिनी साम्राज्याचे स्वातंत्र्य टिकून राहिले तरी युरोपीयांच्या वाढत्या मागण्यांस ते विरोध करू शकले नाहीत; व शेवटी खुद्द जपान्यांनीही त्यांचा पराभव केला. मांचू राज्यसत्ता खिळखिळी झाली. त्या शेवटच्या काळात चिनी तत्त्ववेत्त्यांच्या परंपरेत राहून तीस सावरण्याचे प्रयत्न झाले, पण हे अगदी वांझोटे ठरले. तेव्हा राजकीय क्रांती अपरिहार्य झाली. ती घडून आल्यानंतरही एकसूत्री कारभार कोणासच प्रस्थापित करता आला नाही; आणि ३०–४० वर्षे मुख्यतः सेनानींच्या अंतःस्थ यादवीत गेली. परंतु या सर्व कालातील विचारप्रवाहाची दिशा सुन्यत्सेन यांनी मुळात लावल्याप्रमाणे राहिली. सुन्यत्सेन यांनी सुरुवातीपासूनच प्रांजलपणे युरोपीय राष्ट्रवाद व लोकशाही यांचा स्वीकार केला; व त्यांच्या जोडीस सर्वांच्या चरितार्थाची सोय केली पाहिजे ही कल्पनाही पुरस्कारिली. ही त्यांची त्रयी. त्यांच्या आयुष्याच्या अखेरीस, रशियाचे साहाय्य मिळविण्याच्या वेळेस, या त्रयीत थोडा फरक पडून साम्यवादाकडे काटा झुकू लागला. त्यांचा पक्ष, कुओमिंटांग हा त्यांच्या मृत्यूनंतर लवकरच अधिकारारूढ झाला. पण पुढे त्यात दुफळी होऊन कम्युनिस्टांस वनवासास जावे लागले. सुन्यत्सेन यांची विवेचनाची धाटणी चिनी असली व कल्पनांतील काही भाग परंपरागत असला तरी त्यांतील मूळ गाभा युरोपीय होता; व चिनी कल्पना,

संस्था इत्यादी राखण्याबाबत त्यांचा विशेष आग्रह कधीच नव्हता. आता तर कम्युनिस्टांचे वर्चस्व झाल्यामुळे मार्क्सवाद स्वीकारूनच पुढे विचार सुरू आहे. तेव्हा यापुढे चिनी राज्यकारभार, अर्थ-व-समाजव्यवस्था यांस काही विशिष्ट चिनी वळण लागले तरी ते परंपरागत काही राखण्याच्या कटाक्षामुळे किंवा चिनी म्हणून काही विशिष्ट जगास देण्यासारखे आहे अशा कल्पनेमुळे लागेल असे नाही.

इस्लामी राष्ट्रांतील याबाबतचा इतिहास फार गुंतागुंतीचा आहे. अरबी व इस्लामी यांचे युरोपीयांशी साहचर्य व देवाणघेवाण ही पुरातन कालापासून सतत चाललेली आहेत. तसेच खिस्ती व इस्लामी हे दोन्ही धर्म 'किताबी', एकाच परंपरेतील. यामुळे काही अंशी त्यांचा प्रश्न चिन्यांच्या प्रश्नाहून सोपा होता. त्यांचे आर्थिक, सामाजिक वगैरे प्रश्न विशेष बिकट नव्हते. मुस्लिमांची मुख्य अडचण धर्मकल्पनांबाबतची. इस्लाम धर्माची व विशेषेकरून 'कुराण' या पवित्र ग्रंथाची पकड सर्व मुस्लिम समाजावर पूर्ण राहिलेली आहे. तेव्हा युरोपीय कल्पना व संस्था यांचा स्वीकार करताना कुराणातील वचनांची त्यांशी सांगड कशी घालावयाची या बिकट प्रश्नाची त्यांस उकल करावयाची आहे. कल्पनेपेक्षाही आचारांतील अडचण जास्त आहे. बंधुभाव, समता इत्यादी कल्पना निदान मुस्लिम समाजापुरत्या कुराणातच सांगितल्या आहेत; व वंशभेद न मानणे वगैरे आम्ही पूर्वीपासूनच प्रत्यक्षात उतरविले आहे असे त्यांस म्हणता येते. परंतु मुस्लिम व बिगरमुस्लिम यांतील मूलभूत व ठासून सांगितलेला फरक, धर्मसंस्था व राज्यकारभार यांचा अभेद्य संबंध, व इस्लामी म्हटल्यावर सर्व ऐहिक आणि पारमार्थिक व्यवहार व विचार कुराणातील वचनांवर आधारून करण्याची आवश्यकता, या गोष्टी आज अवघड ठरल्या आहेत. कुराण सुटले तर तत्त्वतः इस्लामच सुटला; व कुराण धरले तर त्यातील तपशीलवार निर्देशन, सूचना नित्याच्या व्यवहारांत बाह्यात्कारी तरी पाळणे आवश्यक, अशी ही कोंडी आहे. कुराण हा एक सबंध समाजाच्या व्यवहारास नवीन वळण लावणाऱ्या प्रभावी ग्रंथाऐवजी केवळ तत्त्वचिंतनाचा प्रबंध असता तरी आजची ही अडचण भासली नसती. (पण मग या ग्रंथाने जी जागतिक क्रांती घडवून आणली तीही कदाचित घडली नसती !)

जपानातील इतिहास या दोन्हींपेक्षा निराळा. हा देश त्या मानाने लहान, यातील समाज प्रथमपासूनच बराच एकजिनसी व बांधीव. युरोपीयांचे प्रथम संबंध १६ व्या शतकात आल्यानंतर काही कारणांनी राजसत्तेने सर्व संपर्क थांबविला व फक्त एका बंदरात एका युरोपीय राष्ट्रामार्फत मर्यादित व्यापारी दळणवळण चालू ठेवले. हे धोरण जवळजवळ २५० वर्षे टिकले. दरम्यान नवीन युरोपीय विद्येची थोडीबहुत कल्पना काही धुरीणांस येऊ लागली होती. तेव्हा कोमोडोर पेरीने बळजबरीने प्रवेश करून घेतला, त्या वेळेस युरोपीय ज्ञान हस्तगत करण्याबद्दल अनुकूल भूमिका आधीच तयार झाली होती. युरोपीय विद्येचा स्वीकार व सम्राटांचे पुनरुत्थान या दोन्ही गोष्टी एकदमच झाल्या. इतरांपेक्षाही जपान्यांचा स्वाभिमान जास्त प्रखर व स्वतःच्या विशेषत्वाची कल्पना काही अधिकच. तेव्हा आपले देववंशी सम्राटकुल व आपण नेहमी अपराजित राहिलेले, ते युरोपीयांची विद्या हस्तगत करून पुन्हा प्रभावी होऊ, इतर बाबतींत आपणांस काही शिकावयाचे नाही, बदलावयाचे नाही, ही विचारसरणी तेथे प्रभावी ठरली. यामुळे युरोपीय विद्येबरोबर युरोपीय समता व लोकशाहीच्या कल्पनांचा सरसहा स्वीकार न होता, जुन्या शिंतो उपासनेचा व सम्राटभक्तीचा प्रसारच झाला. जपानच्या कडव्या स्वाभिमानास युरोपीय राष्ट्रवाद पोषक ठरला, पण इतर दृष्टीने नवीन धर्मकल्पना व उदारमतवाद यांचा स्वीकार होऊ शकला नाही. राष्ट्रप्रेम, शिस्त, सामूहिक किंवा समाजभावना दृढ करून निरलसता, दीर्घोद्योग या गुणांचा परिपोष, जगात प्रभावी बनण्याकरिता करविण्यात आला. जपानने शिक्षणप्रसार फार झपाट्याने घडवून आणला पण आधुनिक युरोपीय कल्पनांचा पगडा बसू दिला नाही. यामुळे, आधुनिक शस्त्रास्त्रे व यंत्रोत्पादन यांनी सज्ज असलेले हे राष्ट्र १९४६ सालापावेतो सम्राटास देवासमान मानणारे, समाजातील

स्तरीकरण टिकवून धरणारे, स्त्रिया, मजूर इत्यादींबाबत युरोपीय विचार न मानणारे, लष्करी हुकूमशाहीस उचलून धरणारे असे राहिले. पण १९४६ च्या पराभवानंतर अमेरिकी अमलाखाली हे सर्व झपाट्याने बदलले. सनदशीर लोकशाही प्रस्थापित झाली. स्त्रियांस हक्क पूर्ण मिळाले, मजूर-संघटना कायदेशीर ठरल्या, जमीनदारीचे उच्चाटन झाले, सामाजिक सुरक्षेवर भर देण्यात आला, सम्राटपूजेचा निषेध करण्यात आला. अवघ्या पाच वर्षांत मोठे स्थित्यंतर झाले. युरोपीय कल्पनांचा हा स्वीकार वरवरचा का मनोमनीचा ठरणार हे आज सांगता येत नाही. काही झाले तरी एवढे खरे की, जुनी जपानी समाजरचना, शिंतोपंथ किंवा सम्राटपूजा ही पूर्वीप्रमाणेच प्रस्थापित होणे आता शक्य नाही. मैजी युगातील जपानी उपक्रम अनेक दृष्टींनी उद्बोधक; पण त्याने सिद्ध एवढेच झाले की, विशिष्ट अनुकूल परिस्थिती असता सकृद्दर्शनी विरोधी प्रवृत्तीही जीवनाच्या निरनिराळ्या भागांत टिकविता येतात, आणि अशी विसंगती पुष्कळ काळ टिकते; एवढेच नव्हे तर, त्यामुळे समाजाचे बळ कमी होते असे दिसत नाही. पण त्याचबरोबर हेही खरे की, काही विश्वव्यापी कल्पना किंवा जीवनमार्ग हा दाखविल्याखेरीज स्वत्व म्हणून काही राखून ठेविले तरी त्याचा प्रभाव इतरांवर होऊ शकत नाही. लढाईत पराभव ज्या प्रकारे झाला, तो न होता तर जपानची व्यवस्था पूर्वीप्रमाणे अनेक दशकेही टिकून राहिली असती, असे मानता येईल. परंतु कितीही काळ ती टिकली असती तरी सम्राटपूजा, शिंतोधर्म अगर तत्सदृश कोणत्याही जपानी कल्पनांचा अगर आचारविचारांचा इतरांनी स्वीकार केला असता असे दिसत नाही.

## हिंदूंची प्रतिक्रिया : नवीन कल्पनांना पुरातन धर्मनीतितत्त्वांचे अधिष्ठान

आजच्या भारतीय परिस्थितीचा विचार करावयाचा म्हणजे मुख्यतः हिंदूंच्या प्रतिक्रियेच्या अनुरोधानेच केला पाहिजे; व हा विचार करताना आपले लक्ष नीतिधर्मकल्पनांवर केंद्रित केले पाहिजे. आपल्या देशात अनेक पंथ व उपासनासंप्रदाय आहेत. त्यांच्यांत गेल्या १०० वर्षांत फार मोठे फरक घडून आले. परंतु आपली वैचारिक परंपरा यांपैकी कोणाशीच विशेष संलग्न नसल्यामुळे हे फरक प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरत नाहीत.

आधुनिक सामाजिक, राजकीय व आर्थिक व्यवस्था यांचा विकास युरोपात होत असताना उदयास आलेल्या काही नवीन कल्पना आपणांकडे सुलभतेने स्वीकृत केल्या गेल्या. यांतील प्रमुख म्हणजे उपासना, पंथ वगैरे गोष्टींस समाजजीवन, राजकीय व आर्थिक व्यवस्था यांत गौण स्थान देणे, स्थलांतर, धंद्याची निवड, उपासना-प्रकार इत्यादी बाबींतील प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य मान्य करणे व सर्व व्यक्ती राजकीय व सामाजिक व्यवहारांत समतोलाच्या आहेत असे तत्त्वतः मानणे. उपासना, पंथ यांबाबत सहिष्णुता राखण्याबाबतची भारतातील परंपरा फार जुनी आहे. सर्वसाधारणपणे हिंदू, बौद्ध व जैन राजांनी सर्व भारतीय व खिस्ती, पारसीक, इस्लामी, यहुदी इत्यादी अभारतीय पंथांच्या उपासकांस समान वागणूक व आश्रयही दिलेला होता. तेव्हा पहिल्या तत्त्वाचा स्वीकार नूतन परिस्थितीत करणे हे आपल्या परंपरेस अनुसरूनच होते. याच अर्थी विनोबांनी secular चे भाषांतर 'वेदान्ती' या शब्दाने करावे असे सुचविले होते. व्यक्तिस्वातंत्र्य व समानता या कल्पना नवीन खऱ्या. जातिभेदाधिष्ठित समाजात त्या उद्भवणे अशक्य. प्रत्येकाचा धंदा व समाजातील स्थान ही जन्मतः ठरलेली जेथे असणार तेथे हे नवीन विचार उघड गैरलागू. परंतु याहीबाबत जात गुणकर्मांने ठरली जावी, जन्माने नव्हे, अशा वचनांचा आधार घेऊन व तत्त्वतः सर्व प्राणिमात्र आम्ही सारखेच मानीत आलो आहोत असे म्हणून, व्यक्तिस्वातंत्र्य व समानता यांचा स्वीकार केला असता प्रचलित समाजरचना बदलावी लागली तरी पुरातन नीतिधर्मकल्पनांचा पाया कायमच राहातो अशी भूमिका भारतीय

विचारवंतांनी घेतली. अशा रीतीने या नवीन कल्पनांचा स्वीकार आमच्या जुन्या वैचारिक बैठकीशी सुसंगत ठरविल्याने तिचे स्वरूप याकरिता बदलण्याची गरज भासली नाही. पण फेरविचाराची आवश्यकता दुसऱ्या दृष्टींनी जाणवली.

आधुनिक काळातील हिंदू पुढाऱ्यांस आपल्या पुरातन वैचारिक परंपरेत व तिजमुळे उत्पन्न झालेल्या वृत्तीत व कृतीत दोन मोठी वैगुण्ये आढळली. एक तर ऐहिक जीवनास गौण मानण्याच्या प्रवृत्तीमुळे नित्य व्यवहाराचा सूक्ष्म अभ्यास, त्याबद्दलची कळकळ किंवा धडपड हीस असावे तितके महत्त्व राहिले नव्हते. दुसरे असे की, व्यक्तिगत मुक्तीच्या महत्त्वामुळे समाजधर्म, सामूहिक कर्तव्ये यांवर भर देण्यात आला नव्हता. नवीन विचारवंतांच्या प्रतिक्रियेची पहिली दिशा सर्वसंगपरित्याग, संन्यास या कल्पना खऱ्या महत्त्वाच्या नव्हत व ऐहिक कर्तव्ये बजावणे, संसारात राहून योग्य कर्मे करणे हेच उत्तम, हे सिद्ध करून लोकांस पटविणे, अशी होती. आजपावेतो रूढ व मान्य असलेल्या हिंदू, बौद्ध व जैन विचारसरणींस काहीसे विरोधी असे हे करणे होते. संन्यासमार्ग श्रेष्ठ हा विचार हिंदूंपेक्षा बौद्ध–जैनांत जास्त प्रभावी हे खरे. गृहस्थाश्रमाचे श्रेष्ठत्व व प्रत्येकाने अनृणी होण्याकरिता काही ऐहिक कर्तव्ये बजावण्याची कल्पना हिंदूंत होती; पण सर्वसाधारणपणे संन्यास–विचारांचा फार मोठा पगडा सर्वांवर बसला होता आणि त्यामुळे संसाराबाबत उदासीन वृत्ती ही हिंदूंतही आदरणीय बनली.

संन्यासमार्गास अयुक्त ठरविणे हे नव्या युरोपीय कल्पनांच्या अगर तत्त्वज्ञानाच्या आधारे करता आले असते; पण तसे कोणीही केले नाही. उलट आपल्या परंपरेतील मूळ ग्रंथांचाच बदलता अर्थ लावण्याचा मार्ग सर्वांनी पसंत केला. केवळ ज्ञानमार्ग अगर संन्यासमार्ग यांच्याऐवजी खरा श्रेष्ठ मार्ग म्हणून आपला नवीन 'निष्काम कर्मयोग', 'अनासक्तियोग', 'ज्ञानकर्मसमुच्चय' इत्यादी निरनिराळ्या संज्ञांनी त्यांनी संबोधिला.

हिंदू पुढाऱ्यांनी आपली नूतन वैचारिक भूमिका मूलतः जुन्या हिंदूधर्मनीतीच्या तत्त्वांवरच पूर्णपणे आधारली, ही डोळ्यांत भरण्याजोगी महत्त्वाची घटना आहे. आपल्या स्वभावाप्रमाणे प्रत्येकाने आधारित ग्रंथांचे अर्थ नवीन तऱ्हेने लावले; परंतु बहुशः जे काही सांगावयाचे ते त्यास धरूनच सांगितले. या बाबतीत सनातनी वा सुधारक असे फरक पडले नाहीत. दयानंद सरस्वती हे अनेक बाबतींत 'सुधारक' पण वैदिक धर्मावरील श्रद्धा व त्याच्या पुनरुत्थानाचा प्रयत्न यांविषयी 'प्रतिगामी' ठरावे अशी त्यांची भूमिका होती. ज्यांचा ज्यांचा प्रभाव जनतेवर—सुशिक्षितांवर वा अशिक्षितांवर —झाला, ते सर्व हिंदू तत्त्वचिंतनाच्या पायावरच उभे राहिले. विवेकानंद, टिळक व अरविंद यांची याबाबतची जी भूमिका तीच पुढे गांधी व विनोबा यांची. आमच्या सर्व प्रमुख पुढाऱ्यांनी अशा रीतीने जुन्या धर्मनीतिग्रंथांच्या आधारेच नवविचार मांडले; एवढेच नव्हे तर, त्यांच्या सर्वांच्या प्रयत्नाचे फळ म्हणून आज एक सर्वसामान्य भूमिकाही तयार झालेली दिसते; जुने कोणते सोडावयाचे व नवीन कोठे बसवावयाचे या दोन्हींबाबत बरीच एकवाक्यता दिसून येते.

जुन्या परंपरेस धरून विचार केल्यामुळे एक महत्त्वाची, शाश्वत महत्त्वाची होण्यासारखी, गोष्ट घडली. ती ही की, संन्यासमार्ग श्रेष्ठ न मानला तरी एका प्रकारे संन्यस्त वृत्ती सुटली नाही, अलिप्तता कायमच राहिली. आधुनिकांपैकी कोणीही 'अमुक एक सत्तासंपत्ती, यश, ऐश्वर्य यांच्या प्राप्तीच्या मार्गाचा हिरीरीने पुरस्कार करा, त्यामागे जिद्दीने सर्वस्व पणाला लावून लागा' असे सांगत नाही. कर्म अटळ म्हणून कर्तव्यबुद्धीने करीत राहिले पाहिजे एवढेच सांगण्यात येते. फलाशा अगर आसक्ती न राखणे यावर कटाक्ष दिल्यामुळे कर्माच्या ऐहिक उद्दिष्टाचा विचार फारसा प्रस्तुत न ठरता ते करताना जी मनोवृत्ती तीच महत्त्वाची ठरते. विश्वशांती, तुष्टी, पुष्टी ही जरी सर्वमान्य उद्दिष्टे ठरली तरी ही साधण्याकरिता काही अमुक केलेच पाहिजे असे ठरत नाही. कर्तव्याकर्तव्यविचारात उचितकर्म

'प्रासंगिक' किंवा 'विहित' आणि 'अवसरप्राप्त' एवढेच मार्गदर्शन होते. प्रसंगोपात्त कर्म नसल्यास फार पुढचा विचार केल्याने फलाशा–व–आसक्तीचा दोषही पदरी येण्याचा संभव राहातो; आणि अर्थात उचित किंवा विहित हे देशकालमानाप्रमाणे काळोवेळी ठरते. एवंच, संन्यासमार्गाला विरोध करणारेसुद्धा 'अमुक एक करा' यापेक्षा 'अमुक एका वृत्तीनेच करा' यावर जोर देतात.

असेच काहीसे समाज-समूह-विचार यांबाबतही घडते. आपल्या परंपरागत तत्त्वविचारांत विशिष्ट समूह-अगर-समाजकर्तव्यांचा उद्भवच होत नाही. व्यक्तीची मुक्ती याचा अर्थ विश्वस्वरूपात विलीन होणे असा होतो; व मग व्यक्ती व सर्व चराचर सृष्टी यांच्या दरम्यानचे विशिष्ट समाज-समूह उरतच नाहीत. याबाबतचा विचार करावयाचा तर तो तत्त्वविचारांतून न निघता विशिष्ट समाजातील व काळातील 'विहित' किंवा 'उचित' कर्मे कोणती यांतूनच निघू शकतो. संन्यासमार्गास विरोध करणारे आधुनिकही 'संसारात राहून अलिप्तपणे प्राप्त कर्मे करणे ही वृत्ती व विश्वशांती हे ध्येय' हेच सांगतात. यामुळे आपला देश, समाज किंवा धर्म यांविषयी विशेष निष्ठा अगर कर्तव्य यांवर कोणी जोर दिला नाही. 'स्वर्गप्राप्तीकरिता धर्मप्रसारार्थ लढा किंवा आपल्या स्वतःच्या समाजाच्या हिताकरिता जग विसरून वाटेल ते करा' असले विशिष्ट कडवे आदेश आमच्या परंपरागत विचारांतून निघू शकत नाहीत.

संन्यासमार्गास विरोध करण्यात टिळक अग्रगण्य मानले जातात. तसेच, ते जन्मभर चळवळे व धडपडे व आपली मते कडक भाषेत त्वेषाने मांडणारे असे त्यांचे वर्णन केले जाते. तेव्हा त्यांनी 'गीतारहस्या'त सारांशाने सांगितलेला स्वतःचा निष्कर्ष विशेष उद्बोधक वाटावा. टिळक लिहितात : "सर्व गोष्टींचा याप्रमाणें विचार केला म्हणजे ब्रह्मात्मैक्यज्ञानानें आपली बुद्धि निर्विषय, शांत, सर्वा भूतीं निर्वैर व सम ठेवणें आणि आपणांस ही स्थिति प्राप्त झाली म्हणून सामान्य अज्ञानी लोकांस न कंटाळतां, किंवा आपण स्वतः सर्व सांसारिक कर्मांचा त्याग करून म्हणजे कर्मसंन्यास स्वीकारून लोकांची बुद्धि न बिघडवितां देशकालपरिस्थितीप्रमाणें ज्याला जें योग्य असेल त्याचाच त्यास उपदेश करून व स्वतःच्या निष्काम कर्तव्याचरणानें सद्वर्तनाचा यथाधिकार प्रत्यक्ष धडा घालून देऊन, सर्वांस हळूंहळूं यथासंभव शांतपणे पण उत्साहाने उन्नतीच्या मार्गास लावणें, हाच ज्ञानी पुरुषाचा खरा धर्म असें सिद्ध होतें."[1]

याच परंपरेतील डॉ. भाऊजी दप्तरी यांचा 'औपनिषदिक जीवनसौख्य' हा महत्त्वाचा ग्रंथ अगदी अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथात जीवनाला अत्यानंदप्राप्ती कशी होईल हाच उपनिषदांचा विषय, असे डॉ. दप्तरी आग्रहाने प्रतिपादतात; आणि प्राणधारणार्थ कर्मे करण्याचे महत्त्व उपनिषदे फार मानतात असे ठासून सांगतात. तरी तेही जागृतीत मनुष्याने अद्वैताची भावना राखण्याचे महत्त्व, विषयानंदत्यागाची आवश्यकता व परिमितता साधण्याचे मार्ग यांवर भर देतात. एवंच, आधुनिकांच्या वृत्तीत फरक पडला तो प्रत्यक्ष कर्मत्यागापुरताच. 'अलिप्तपणा' व सामूहिक जीवनास गौण लेखण्याची प्रवृत्ती ही आजही टिकून राहिली आणि कोणीही तत्त्वज्ञानाची बैठक घेणारा यास विरोध करीत नाही.

## राजा राममोहन रॉय ते विनोबा

वरील विवेचनाबाबत दोन शंका उपस्थित करण्यासारख्या आहेत. पहिली शंका ही की, आधुनिक विचारवंतांची म्हणून जी भूमिका वर दर्शविली ती आज भारतात खरोखर सर्वमान्य झाली आहे असे म्हणता येईल काय? दुसरी अशी की, तात्त्विक विचाराची नवीन बैठक सर्वमान्य बनली असे धरले तरी त्यामुळे प्रत्यक्ष जीवनावर, व्यवहारावर काही परिणाम होतो असे मानता येईल काय? पहिल्या

१. बाळ गंगाधर टिळक, 'श्रीमद्भगवद्गीतारहस्य' (१९१५) पृ. ४००

प्रश्नाचे उत्तर देताना मुख्यतः राजकीय, आर्थिक व सामाजिक विचारांचा व चळवळींचा प्रवाह यांकडे लक्ष दिले पाहिजे. काही वर्षांपूर्वी मिल, स्पेन्सर आदी युरोपीय समाजशास्त्रज्ञ अथवा खिस्ती धर्म यांवर आधारून सामाजिक विचाराची मांडण काही पुढारी आपणांकडे करीत असत. त्याचा तात्कालिक परिणाम काहीही झाला असला तरी ही मांडण आज टिकून नाही. निरनिराळे राजकीय पक्ष व समाजांतील क्रांतिकारक धुरीणही आज टिळक, अरविंद, गांधी–विनोबा यांच्या मूळ बैठकीच्या आधारेच आपले विचार मांडतात. डॉ. आंबेडकर यांनी आपल्या अनुयायांस बौद्ध धर्माचीच दीक्षा दिली. सर्व विचारवंतांवर आपल्या जुन्या परंपरेची पकड केवढी मोठी आहे, याचेच हे द्योतक आहे. एका अमेरिकी समाजशास्त्रज्ञाने बौद्धिक क्षेत्रात काम करणाऱ्या भारतीयांचे सूक्ष्म निरीक्षण गेल्या दोन-तीन वर्षांत केले; त्याने भारतीयांच्या या वर्गात 'अलिप्तपणा' व 'वानप्रस्थाश्रम' या कल्पनांचे अजून बरेच आकर्षण आहे असे नमूद केले आहे.

नीतिधर्मकल्पनांचा जीवनावर व व्यवहारावर कितपत परिणाम होतो हे मापणे कठीण असले तरी, असा बराच परिणाम होतो हे निश्चित आहे. निरनिराळ्या समाजांचे स्वभावविशेष काही अंशी तरी निराळे आहेत असे मानले जाते व त्यांचा संबंध नीतिधर्मकल्पना व समाजमूल्ये यांशी दाखविता येतो. खिस्ती, इस्लामी, हिंदू, बौद्ध इत्यादी धर्मांच्या प्रसाराच्या इतिहासांची तुलना केली असता त्यांतील फरक व मूळ धार्मिक कल्पना यांचा संबंध दिसून येईल. अल्बेरुणीच्या काळापासून मराठशाहीपर्यंत अनेक परदेशी प्रवाशांनी भारतीय परिस्थितीबाबत वर्णने लिहिली आहेत. यांतील बहुतेकांत हिंदूंच्या मद्यमांस-सेवनाबाबतच्या वृत्तीचा उल्लेख आहे. अहिंसेच्या कल्पनेच्या प्रभावामुळे भिक्षू व जैनसाधूंप्रमाणे ब्राह्मणांसही मांसाशननिवृत्त व्हावे लागले व ही निवृत्ती श्रेष्ठतेचे लक्षण ठरली. तसेच संयम, दमन यांचे समाजात विशेष महत्त्व मानल्यामुळे मद्यसेवन, निदान त्याचा अतिरेक सर्व उच्च जातींत त्याज्य गणला गेला. त्यामुळे इतर समाजांपेक्षा काही वर्तनविशेष हिंदूंत आढळले. उलट, इंग्रज हे वरिष्ठ ही कल्पना रूढ झाल्यावर मद्यमांससेवन हे पुढारल्याचे लक्षण असेही मानण्यात येऊ लागले. परधर्म–परमतसहिष्णुता हा एक हिंदूंचा दुसरा विशेष. याचाही उगम धर्मकल्पनांतला. एकच देव, एकच प्रेषित, एकच धर्मग्रंथ हे खरे, इतर सर्व झूट असे मानणारे व कोणतीही उपासना शेवटी एका देवालाच पोहोचते व कोणत्याही एकाच ऋषीचे वचन प्रमाणभूत मानता येत नाही असे म्हणणारे–यांच्या वृत्तींत व वर्तनांत फरक पडणे अपरिहार्य आहे. तेव्हा धर्मनीतिकल्पनांचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध नाही हे खरे नाही. हिंदू सौम्य व सहिष्णू हे आनुवंशिक गुणांमुळे नाही. त्यांच्यांतलेच मुसलमान बनले ते कडवे धर्मप्रसारक व मूर्तिभंजक झाले.

आमच्या आधुनिक विचारवंतांनी परंपरागत बैठक मूलतः सोडली नाही. याचा अर्थ, आमच्या जनतेच्या वृत्तीत ऐहिक जीवनाबाबत थोडी कर्तव्यबुद्धी उत्पन्न करण्यापलीकडे काही बदल व्हावयास हवा असे त्यांस वाटले नाही, असाच केला पाहिजे. आधुनिक युगातील विशेष प्रभावी कल्पनांपैकी लोकशाही वगैरे काहींचा आम्ही स्वीकार केला, पण इतरांचा केलेला नाही. उदा०- राष्ट्रवादाचा नागडा पुरस्कार आमच्यापैकी कोणत्याच पुढाऱ्यांनी केला नाही. सर्व मानवसमाजाच्या प्रश्नांचा विचार करण्याच्या आमच्या परंपरेतच विनोबांच्या 'जय जगत्' घोषणेचा उगम आहे. भांडवलशाही व कम्युनिझम यांबद्दलही तसेच. प्रत्यक्षात आपल्याकडे भांडवलशाहीच चालू आहे व आपले भांडवलशाहा इतर कोठल्याहीपेक्षा जास्त लोभी, स्वार्थी व नीतिबंधने न जुमानणारे आहेत. हे खरे असले तरी भांडवलशाहीच्या तत्त्वज्ञानाचा आपण स्वीकार केला नाही. म्हणजे आर्थिक व्यवहार हे एक लढतीचे क्षेत्र आहे, यात कायद्याच्या मर्यादा सांभाळून प्रत्येकाने आक्रमक वृत्तीने वागावे व या लढतीत जो सर्वांत जास्त यशस्वी होईल तो श्रेष्ठ, समाजादरास विशेष पात्र—असली विचारसरणी आपणांकडे मान्य झालेली

नाही, मान्य होईल असे दिसत नाही. याउलट कम्युनिझममधील हिंसात्मक प्रवृत्ती व केंद्रित सत्ता ही आपणांस पटलेली नाहीत. म्हणून विकेंद्रीकरण, सहकारी अर्थव्यवस्था यांची भाषा आपण बोलतो. आज प्रत्यक्षात सहकार किंवा विकेंद्रीकरण या दिशांनी आपण काहीच वाटचाल केलेली नाही हे खरे; परंतु समाजास काय पटते, काय पटत नाही, हे पुढारी कोणत्या घोषणा करितात यावरून सूचित होते, असे म्हणावयास हरकत नाही.

वरील विवेचनाचा निष्कर्ष हा की, गेल्या शंभर-दीडशे वर्षांत आमच्या विचारवंत पुढाऱ्यांनी मोठी कामगिरी बजावली. युरोपीय विज्ञान व संस्कृती यांच्या आघातामुळे विस्कळित झालेल्या, भांबावलेल्या समाजास क्रमशः धीर देऊन, परंपरागत धर्मनीतिकल्पनांस उजळा देऊन, त्यांवर नवीन भाष्ये करून एक आधुनिक युगास अनुरूप अशी भूमिका त्यांनी बनविली. हे कोणा एकाचे कार्य नसून राजा राममोहन रॉयपासून विनोबांपर्यंत एका साखळीनेच एक एक दुवा जोडून ते बनलेले आहे.

## अहिंसेच्या पुरस्कारास जागतिक परिस्थिती अनुकूल

यामुळे आमच्या वैचारिक परंपरेचे सातत्य टिकवून नवीन युगाच्या प्रवाहात आम्ही मिसळत आहो. आपल्यासारख्या गरीब समाजाच्या दृष्टीने ही गोष्ट फार महत्त्वाची, आत्मविश्वास निर्माण करणारी अशी आहे. अर्थात या कार्याची खरी यशस्विता व खरे महत्त्व, आपल्या समाजाच्या वृत्तीत व कर्तबगारीत हे प्रतिबिंबित कसे होते, यावर अवलंबून आहे; व ज्या मानाने हे त्यात उत्कट दिसेल त्या मानानेच आम्हांस काही इतरांस देण्यासारखे आहे असे दिसून येईल. आमची सहिष्णुता, संसारत्यागास आमच्या समाजाने दिलेला मान, आमचा सौम्यपणा, निरनिराळ्या विशिष्ट प्रकारे दिसून येत असलेली आमची अहिंसा, हे आमच्या समाजाचे जुने स्वभावविशेष होते. वर दर्शविल्याप्रमाणे आमची मूळ धर्मनीतिकल्पनांची बैठक टिकून आहे असे मानले तर या स्वभावविशेषांत कोणताच मूलभूत फरक घडून आला असे होणार नाही; पण आधुनिक युगास अनुरूप असे या विशेषांचे परिवर्तन व्हावे. संसारत्यागाचा टिळकांसारख्या आधुनिकांनी निषेध केला असला तरी संन्याशांबाबतची पूज्य बुद्धी आमच्या समाजातील नाहीशी झालेली आहे, असे दिसत नाही. एवढेच की, त्याच्या जोडीला त्यागी वृत्तीने लोकहितरत होणाऱ्यांबाबतही ही पूज्य बुद्धी दर्शविली जाते. या दृष्टीने ऐहिक समाजोत्कर्ष व लोककल्याण ही नवीन कर्तव्ये व उद्दिष्टे आम्ही मान्य करून घेतली.

तसेच अहिंसेचे. अहिंसा धर्माचे मुख्य परंपरागत स्वरूप म्हणजे अनेकांनी स्वीकारलेली मांसाशन-निवृत्ती. जैनांनी या धर्माचे विशेष महत्त्व मानल्यामुळे त्यातील साधूंचा जीवनक्रम व प्राणिमात्राच्या जीवरक्षणार्थ सांगितलेली अनेक धर्मकृत्ये यांत अहिंसेचे प्राचीन स्वरूप उत्कटतेने दिसून येते. आधुनिक धुरीणांत अहिंसाधर्माबाबत खरा विचार महात्मा गांधी यांनीच केला. त्यांनी अहिंसक वृत्तीवर भर देऊन मानवसमाजातील दैनंदिन ऐहिक परस्पर संबंधांत अहिंसा कशी प्रतिबिंबित होऊ शकते, झाली पाहिजे, याबाबत एका नवीन विचारसरणीचा उपक्रम केला. हे अहिंसाधर्माचे संभाव्य नवीन स्वरूप. आज आमच्यापुढे, सर्व मानवजातीपुढे अनेक बिकट समस्या उभ्या आहेत. आमच्या विकसित धर्मनीति-कल्पनांचा, आमच्या नवीन भूमिकेचा यांपैकी काही सोडविण्यात अंशतः तरी उपयोग होऊ शकेल काय अशा दृष्टीने विचार केल्यास ही नवीन भूमिका शाश्वत हितकारक आहे किंवा नाही, हे अजमाविता येईल. हा विचार, विश्वशांती व अर्थव्यवहारनीती या दोन मोठ्या आधुनिक प्रश्नांविषयी आपली नवीन भूमिका काय मार्गदर्शन करिते, हे सांगून मांडता येईल.

अहिंसेचा पूर्ण, आत्यंतिक स्वीकार केल्याने विश्वशांती लाभू शकेल असे गांधींच्या विचारसरणीस

अनुसरून आम्ही आज म्हणतो. या विधानाच्या पुष्ट्यर्थ आपणांस या मार्गाने तत्त्वतः उद्दिष्टप्राप्ती होण्याचा संभव आहे, हे दाखविले पाहिजे. एवढेच नव्हे तर, हा मार्ग व्यवहारात अशक्य कोटीतील नाही हेही सिद्ध केले पाहिजे. येथे अहिंसा ही फक्त मानव समाजातील परस्परसंबंध, व्यवहार यांबाबत अभिप्रेत आहे एवढे लक्षात ठेवले पाहिजे. शिवाय, विचार करीत आहो तो सांप्रतच्या परिस्थितीबाबत.

कोणत्याही मार्गाची इष्टानिष्टता, त्याची संभाव्य यशस्विता ही समाजाची संस्कृती, त्यातील रूढ विचारसरणी व प्रचलित आचार यांवर अवलंबून असतात. केवळ बलाबलाच्या सामन्यात दुर्बलांचा टिकाव लागणे शक्य नसते. परंतु, बलवानांत विवेकजागृती होऊ शकते. एकंदर समाजात बदलत्या नैतिक मूल्यांचा सार्वत्रिक स्वीकार झाल्यामुळे समाजदृष्ट्या इष्टानिष्ट आचरण बदलते; आणि अशा प्रक्रियांमुळेच केवळ बळी तो समर्थ असे न राहता नैतिक बल या कल्पनेस वास्तविक सत्यस्वरूप प्राप्त होते. तेव्हा विश्वशांतीचा प्रश्न हा आज मोठ्या बलवानांच्या परस्पर झगड्यांचा प्रश्न होऊन बसला आहे, त्यात अहिंसेचा मार्ग बसूच शकत नाही, असे म्हणता येणार नाही. या प्रश्नाचा विचार करताना मुख्य प्रश्न उद्भवतात ते असे : आजच्या जगात अहिंसेचा आत्यंतिक पुरस्कार प्रभावी ठरावा इतकी मानवसमाजाची सांस्कृतिक पातळी वाढली आहे काय, हा एक प्रश्न. याबरोबर दुसरा हा की, सर्व मानवसमाजाचा नाश वा अधोगती टाळावयाची असली तर अहिंसेच्या मार्गाशिवाय दुसरा काही तरणोपाय आहे काय? व तिसरा हा की, शस्त्रास्त्रांत झालेली अलीकडची वाढ लक्षात घेता काही तीन-चार राष्ट्रे सोडल्यास, इतरांस आंतरराष्ट्रीय संबंधांत हिंसक मार्ग आक्रमू म्हटले तरी ते झेपण्यासारखे आहे काय? यांपैकी पहिल्या प्रश्नाचे उत्तर अनिश्चित असले तरी दुसऱ्या दोहोंबाबतचा अभिप्राय अहिंसेच्या बाजूने निघण्यासारखा आहे.

अहिंसेच्या मार्गाचा निश्चयात्मक स्वीकार होण्यास यापूर्वी कधीही नव्हती एवढी अनुकूल भूमिका आज मानवेतिहासात बनू पहात आहे. मानवी जीवन उत्क्रांत आहे असे मानल्यास, भौतिक संस्कृतीच्या वाढीबरोबर धर्म-व-नीतिविचारही बदलावे व मागे अकल्पित वाटणाऱ्या गोष्टी शक्यतेच्या कोटीत याव्या हे साहजिक आहे. सबंध लोकजीवन समृद्ध व्हावे, सर्व जनतेस सुरक्षितता वाटावी, शिक्षणप्रसार सार्वत्रिक होऊन समान संस्कृती सर्वांची व्हावी या गोष्टी पूर्वकाळी कधी व्यावहारिक मानल्या जात नसत. कपोलकल्पित कथा म्हणून कोणी वर्णने केली किंवा आदर्श तात्त्विक विचार म्हणून मांडले तरी प्रत्यक्षात या दृष्टीने प्रयत्न होऊ शकेल हे असंभाव्य होते. यंत्र व अमानवी नैसर्गिक शक्ती यांचा अर्थोत्पादनात उपयोग होऊ लागल्यानंतरच ही परिस्थिती पालटली. मार्क्सवाद हा संभाव्य व्यावहारिक कार्यक्रम या स्वरूपात औद्योगिक क्रांतीच्या आधी उद्भवणे शक्य नव्हते. आधुनिक शस्त्रास्त्रांच्या क्रांतीमुळे, विशेषतः अणुस्फोटानंतरच्या प्रगतीमुळे, अशाच प्रकारे सार्वराष्ट्रीय संबंधांचे स्वरूप बदललेले दिसते. औद्योगिक क्रांतीमुळे सार्वजनिक सुबत्ता शक्य ठरली, तर आता अस्त्रांच्या प्रचंड संहारक शक्तीमुळेच कोणतेही महायुद्ध अशक्य ठरू पहात आहे. यापुढे मानवास जगावयाचे असल्यास अहिंसेचे आत्यंतिक पथ्य पाळण्याचा त्यास उपक्रम करावा लागेल, असे जगातील अनेक विचारवंत मानू लागले आहेत.

## अहिंसेच्या नवीन आविष्काराची आवश्यकता

अहिंसेच्या पुरस्कारास आज परिस्थिती अनुकूल आहे व भारताने तो केला तर हे पूर्वपरंपरेस धरूनच होईल. अशोकापासून गांधींपर्यंत अहिंसेचा निश्चयाने स्वीकार केल्याची उदाहरणे आमच्याकडे आहेत. हरताळ पाडणे, धरणे धरणे इत्यादी अहिंसात्मक प्रतिकार करण्याचे अगर दडपण आणण्याचे मार्ग आमच्या समाजात पूर्वापार रूढ आहेत. परंतु एवढ्याने भागण्यासारखे नाही. कोणत्याही नवीन

मार्गाचा अगर मूल्याचा पुरस्कार करणाऱ्याने या मार्गाचा स्वतः हरतऱ्हेने अवलंब केला पाहिजे; नवीन मूल्याने आपले जीवन व्याप्त झाले आहे असे दाखविले पाहिजे. आमच्या प्रत्यक्ष उदाहरणाने नवीन मार्गाची यशस्विता आम्ही इतरांस पटवू शकलो तरच आम्ही काही केले असे होईल. नुसत्या घोषणा केल्यास केवळ भोंदूपणा पदरी येईल. तेव्हा, आज आमचे खरे कर्तव्य म्हणजे परस्परांशी व परकीयांशी होणाऱ्या व्यवहारात अहिंसा शक्य तितकी आचरणात आणणे. या दृष्टीने विचार करता गेल्या दहा वर्षांत आपल्या हातून काहीच कार्य झाले नाही, हे उघड आहे. अहिंसेवर विशेष विश्वास असल्यास अंतर्गत व्यवस्थेत दंडाचा क्रमशः कमी कमी उपयोग करणे ओघानेच आले. पण या दिशेने कोणताही उपक्रम, कोणताही बुद्धिपुरस्सर प्रयत्न आपल्या प्रांतिक अगर मध्यवर्ती सरकारांनी कधीच केला नाही; किंवा असे काही त्यांनी मनातही आणल्याचे दिसत नाही. पूर्वी केवळ रूढ कल्पनांमुळे मद्यसेवन अत्यंत माफक राहात असे. आज दारूबंदीमुळे दारू पिणे कमी होण्याच्या ऐवजी गुन्हेगारीच वाढत आहे, असा प्रवाद आहे. याबाबत विशेष आश्चर्य हे की, हिंसक समजल्या जाणाऱ्या चीनच्या कम्युनिस्ट राजवटीत बहुतेक बदल लोकशिक्षणद्वारा घडवून आणण्यात येतात व लोकमत तयार केल्यानंतरच नियमन करतात असे म्हणतात. आमच्याकडे मात्र सर्व भिस्त कायदा व दंड यांवरच ठेवण्यात येते. जे अंतर्गत कारभारात तेच परकी कारभारात. काश्मीर, गोवे या कोणत्याही बाबत आपले धोरण आत्यंतिक अहिंसेचे आहे असे आपणांस म्हणता येणार नाही. किंबहुना, विशेषतः काश्मीरच्या बाबतीत 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान' अशी आमची स्थिती झाली आहे, असेच बहुसंख्य परकी मानतात. तेव्हा जुनी परंपरा व महात्मा गांधींचे नाव एवढ्यावर समाधान मानावयाचे असल्यास गोष्ट वेगळी. नसल्यास, आपणांस जुन्या परंपरेचा काही नवीन आविष्कार अंतर्गत व बहिर्गत कारभारांत करून दाखविणे आवश्यक आहे. यात काही अशक्य किंवा विशेष अवघड असेही नाही. आपल्या जनतेच्या एकंदर वृत्तीकडे पाहता योग्य पुढाकार घेतला गेल्यास अंतर्गत कारभारात काही प्रयोग करून पाहणे किंवा परकी धोरणात अहिंसक भूमिकेस पाठिंबा मिळविणे, हे होऊ शकणे कठीण नाही. पण पुढाऱ्यांस, मुख्यतः राजकारणी पुढाऱ्यांस याबाबत असे काही करण्याची आवश्यकता भासली पाहिजे; व दुसरे, त्यांचा आपल्या लोकांवर विश्वास हवा.

## समाजशिल्पाची आवश्यकता

धर्मनीतिकल्पनांबाबत केवळ शुद्ध विचार अगर उद्दिष्टे मांडण्याने भागत नाही. साधनेच्या मार्गाबाबत पायरीपायरीने वाटही दाखवावी लागते, ही गोष्ट आपणांकडे पूर्वापार मान्य झालेली आहे. पण यासही आधुनिक वळण लावणे आवश्यक आहे. भौतिक शास्त्रीय प्रगतीबरोबर समाज-व-अर्थव्यवस्थेबाबत पुरेशी प्रगती झाली नाही, हे सद्यःस्थितीतील एक मोठे वैगुण्य मानण्यात येते, हे वर नमूद केले आहे. भौतिक शास्त्रांत निरनिराळ्या प्रकारे निरीक्षण करून, बुद्ध्या प्रयोग करून ज्ञान संपादता आले व त्यामुळे जड व चेतन सृष्टीतील व्यापारांचे नियमन करून मानवाच्या उत्पादनशक्तीची वाढ करून घेण्यात आली. मानवसमाजाच्या व्यवहारांचा अभ्यास व नियमन यांबाबत हा मार्ग पूर्णपणे स्वीकारता येत नाही. असे असले तरी, समाजशास्त्राच्या कक्षेतही प्रयोगास, शास्त्रीय निरीक्षणास, अनुभव गोळा करण्यास बराच वाव आहे, अशी विचारसरणी अलीकडे स्वीकारली जात आहे. ही विचारसरणी मान्य केल्यास कोणत्याही सामाजिक, आर्थिक नियमनाच्या बाबतीत प्रयोगशील वृत्ती स्वीकारून व्यावहारिक इष्टानिष्टता, शक्याशक्यता अजमावणे युक्त ठरेल, व असे केल्याने पुढील कार्य भक्कम पायावर उभारले जाईल. मानसशास्त्राच्या अभ्यासाचा पुरा फायदा घेऊन मतप्रसाराचे, विचारप्रवर्तनाचे प्रभावी तंत्र कम्युनिस्टांनी उभारले आहे असे सांगण्यात येते. अर्थात्, कोणताही

विचारी माणूस पूर्व अनुभव जमेस धरूनच पुढचे पाऊल टाकतो. पण हे केवळ अनमानधपक्याने करणे आणि पद्धतशीर रीतीने मुद्दाम निरनिराळ्या प्रकारे रचना करून, अनुभव घेऊन या सर्वांच्या शास्त्रीय चिकित्सेवर कार्यक्रम आधारणे यांत फार फरक असतो. तेव्हा अल्प प्रमाणात का होईना, समाजशिल्प किंवा समाजस्थापत्य या प्रकारचा विचार नीतिधर्मशास्त्राच्या जोडीने करण्याची शक्यता आता उत्पन्न झाली आहे. अशा रीतीने विचार केल्याने समाजस्वास्थ्य व शांतता यांस मदतच होणार आहे. मुळात धर्मनीतिकल्पना व समाजमूल्ये यांची घडण करण्यात शास्त्रीय प्रायोगिक पद्धतीचा उपयोग फारसा होईल असे दिसत नाही. परंतु स्वीकृत कल्पना व मूल्ये यांना मूर्त स्वरूप देण्यात, त्यांस व्यवहारात उतरविण्यात हा मार्ग निःसंशय हितावह ठरावा. मुद्दा हा की, समाजाने प्रगतीची सर्वसाधारण दिशा मान्य केल्यावर विशिष्ट मर्यादेत सहेतुक प्रयोग करीत करीतच पुढील कार्याचे स्वरूप निश्चित करावे. उदाहरणार्थ, अहिंसा तत्त्वतः मान्य केल्यास समाजाच्या अंतर्गत कारभारात दंडाचा उपयोग क्रमशः कसा कमी करता येईल हे प्रयोग करीत, अनुभव घेत ठरवावे; अथवा दान कल्पनेच्या प्रसाराने आर्थिक स्थित्यंतर शांततेने होते असे वाटल्यास याबाबतही निरनिराळ्या योजना आखून त्यांची व्यवहार्यता व उपयुक्तता पारखावी. सामाजिक स्थित्यंतर घडविण्याचे काम हे केवळ प्रचारकाचे असे समजून चालावयाचे नाही; आणि केवळ प्रचाराने अगर कायद्याच्या दडपणाने कार्य होईल तेवढेच व्हावयाचे असे अगतिकत्वही पत्करण्याची आवश्यकता नाही. सामाजिक स्थित्यंतराच्या कार्यक्षेत्रात, इतर कोणत्याही क्षेत्राप्रमाणे अनेक देशभर विखुरलेल्या हरप्रकारच्या अभ्यासू व विचक्षण कार्यकर्त्यांची जरुरी आहे; व अशांच्या सहेतुक प्रयत्नाने जे कार्य होईल ते समाजाच्या सर्व थरांत मुरून शाश्वत टिकेल व बाहेरही आपला प्रभाव पाडील.

## संचयात परिमितता व संपत्ति-सत्तांचा संयमाने वापर

अर्थोत्पादनव्यवस्थेचा प्रश्नही फार महत्त्वाचा असून विश्वशांतीशी निगडित आहे. मनुष्य कार्यान्वित होतो तो स्वार्थासाठी; तेव्हा निरनिराळ्या तऱ्हांच्या व श्रेणींच्या विलोभनांची तरतूद केल्यासच अर्थव्यवस्था नीट चालू शकते, हा आधुनिक भांडवली अर्थशास्त्राचा मूलभूत सिद्धान्त. कम्युनिस्टांनीही अर्थव्यवस्था बदलणे व कायम ठेवणे याकरिता बाहेरून काही इलाज केला तरी व्यवस्थेच्या अंतर्गत व्यवहारात व्यक्तिगत विलोभनास फार महत्त्व दिले. व्यक्तिगत विलोभनावर फार भिस्त ठेवली असता, भांडवलशाही अगर कम्युनिझम यांचे ठळक दोष टाळता येत नाहीत. तेव्हा विलोभनाचे कार्य अंशतः तरी धर्मनीतिकल्पनाद्वारा करता येते काय, हा प्रश्न फार महत्त्वाचा ठरतो. संपत्तिसंचयार्थ केलेल्या व्यापारादी उद्योगास कमी लेखून ब्राह्मण, भिक्षू, लढवय्ये, राजकारणी इत्यादींचे महत्त्व मानणे हे भारतीय, चिनी वगैरे संस्कृतींनी साधले होते. जुन्या संस्कारांमुळे संपत्तिसंचयाविषयी काहीशी अलिप्त वृत्ती अजून आपल्या समाजातील काही वर्गांत टिकून आहे. महाराष्ट्रातील आधुनिक शिक्षणकार्याचा एक भाग काही काळ यशस्वी होण्यात या प्रवृत्तीची मदत झाली. ही वृत्ती टिकून राहिल्यास सरकारी व सहकारी अर्थव्यवहार सचोटीने चांगला करणे सुलभ होईल. आपणांस आज अर्थव्यवहार व संपत्तिसंचय यांचे योग्य महत्त्व मान्य करून व्यक्तिगत संचयाचे अगर श्रीमंतीचे विलोभन फार न वाटेल असे करावयाचे आहे. हे सर्व कायद्याने करावयाचे तर दंडाचा वापर ठिकठिकाणी अभिप्रेत राहतो; म्हणून तो टाळण्यास नीतिकल्पनांचा आश्रय घ्यावयाचा. जुन्या जातिधर्मांत विहित नसलेले व्यवहार कायदेशीर वाटले तरी टाकले जात असत. याच पद्धतीवर आधुनिक व्यवसायधर्माची कल्पना रुजू शकून तिजबद्दल निष्ठा उत्पन्न झाल्यास निरनिराळ्या व्यवसायातील इष्टानिष्ट आचरणाच्या मर्यादा आखण्यास मदत होईल. युरोपीय संस्कृतीत या कल्पनेचा थोडाबहुत विकास झालेला आढळतो.

याहून महत्त्वाचे म्हणजे व्यक्तिगत संचयात परिमितता व संपत्ति-सत्तेचा संयमाने वापर याचे महत्व समाजाने मानावे व याविरुद्ध आचरण गर्हणीय मानावे. संयम व परिमितता यांचे आपल्याकडे सर्वच व्यवहारात महत्त्व वर्णिले असले तरी ब्राह्मणी कल्पनांच्या पगड्यामुळे यांचा अर्थव्यवहाराबाबत विशेष विचार हिंदू परंपरेत आढळत नाही. जैन धर्मात श्रावकाच्या दैनंदिन आचरणाचे नियमन करण्याचा विचार फार बारकाव्याने केलेला आढळतो. त्यांच्यांतील प्रमुख हे व्यापार, सावकारी वगैरे व्यवहारांत पडलेले. तेव्हा धनसंपादन व संचय यांबाबतही नियमनाचे प्रकार त्यांनी रूढ केले आहेत. परिग्रह परिमित ठेवणे, त्याचा त्याग करणे वगैरे गोष्टींचे व्रतांप्रमाणे महत्त्व त्यांच्यात मानले जाते; आणि अगदी आधुनिक कालापर्यंत या व्रतांचे पालन केल्याची उदाहरणे आढळतात. पूर्णस्वत्वनिवृत्ती अगर सर्वस्व-दान या फार पुढच्या अपवादात्मक गोष्टी आहेत. परंतु उत्पादन-साधनांचा व त्यांपासून उद्भूत झालेल्या सत्तेचा व संपत्तीचा संयमशील वापर, या कल्पनेस समाजात फार महत्त्व प्राप्त झाले तर अनेक आर्थिक कलहांचे मूळ नष्ट होईल. आज या दृष्टीने कोठे विचारही होताना दिसत नाही. दैनंदिन अर्थव्यवहारात नीतिकल्पनांचा प्रभाव पडू शकेल असे आज कोणी प्रतिपादताना दिसत नाही.

## भूदान-ग्रामदान

अर्थव्यवहारक्षेत्रात अहिंसक मार्गाने स्थित्यंतर घडवून आणून व्यवस्था नवीन पायावर बसविण्याचा एकच प्रयत्न होत आहे. हा प्रयत्न म्हणजे विनोबांची भूदान-ग्रामदानाची मोहीम. ही अभिनव आहे यात शंका नाही. तिची वैशिष्ट्यपूर्ण सुरुवात झाली. तिचे कार्य अजून जरी भरीव नसले तरी तिचा मार्ग इतका क्रांतिकारक आहे की, त्यास अनुसरून यश मिळण्याचा अल्पही संभव असेल तर तिचा हरतऱ्हेने पाठपुरावा करणे इष्ट ठरते. विश्वशांतीच्या प्रश्नाप्रमाणेच योग्य उत्पादन-व्यवस्थेच्या निर्मितीस आज अतोनात महत्त्व आहे. आधुनिक उत्पादनव्यवस्था खाजगी व्यक्तींच्या हाती राहिल्यास सत्ता केंद्रित होते, समानता दुरावते व समाजस्वास्थ्य बिघडते. उलट ही साधने मुख्यतः शासनसंस्थेच्या ताब्यात आल्यास हुकूमशाही निर्माण होण्याचा संभव उत्पन्न होतो. तेव्हा उत्पादनसाधने काही प्रमाणात खाजगी व्यक्तींच्या व मुख्यतः लहान-मोठ्या सहकारी समूहांच्या हाती राहून विकेंद्रित व बहुतांशी स्वशासित अशी आर्थिक व्यवस्था निर्माण करता आल्यास वरील पेचातून मुक्तता होईल; आणि ही व्यवस्था घडविण्याचे व टिकविण्याचे कार्य राज्यसत्तेकडून मुख्यतः न होता लोकांच्या स्वयंनिर्णयाने, स्वसंकल्पाने झाले तर ते टिकाऊ होईल. अत्यंत व्यापक अर्थाने भूदान-ग्रामदानांतून उमटत असलेली कल्पना अशी आहे, असे म्हणता येईल.

भूदान-ग्रामदानांतून काही भरीव निष्पत्ती होण्यास, पुढील घडामोडी बहुतांशी अनुकूल झाल्या तरी बराच अवधी लागेल. पण निदान या मोहिमेची वाटचाल तरी फलदायी मार्गावर आहे किंवा नाही, या प्रश्नास अस्तिपक्षी उत्तर देण्याच्या मार्गात मुख्य दोन अडचणी आहेत. एक तर आज चळवळीची व्याप्ती केवळ ग्राम अगर कृषी यांच्या अर्थव्यवस्थेबाबत आहे. आधुनिक युगात मुख्य आर्थिक सत्ता व केन्द्रीकरण नागर विभागात व उद्योगव्यापारात आहे. या महत्त्वाच्या अंगाबाबत अजून या मोहिमेत काहीच विचार नाही. संपत्तिदान हे उत्पादन-साधनांच्या मालकीच्या प्रश्नाच्या दृष्टीने फार अपुरे पडणार. तेव्हा ग्रामदानात ज्याप्रमाणे सर्व उत्पादनसाधने तत्त्वतः ग्रामसत्तेखाली येतात व त्यांच्या वेळोवेळीच्या विनियोगाचा अधिकार ग्रामसत्तेचा राहतो अशी कल्पना करता येते, तसे काही नागर उद्योगधंदे व व्यापार यांबाबत मांडले पाहिजे. ही मांडणी सोपी नाही. त्याहूनही कठीण बाब म्हणजे ज्या वर्गांच्या हातांत आज ही संपत्ती आहे त्यांनी क्रमाक्रमाने स्वत्वनिवृत्ती करण्याची तयारी दर्शविणे. परंतु, असा काही मार्ग लवकर न निघाल्यास भूदान मोहिमेची पिछेहाट होण्याचा संभव फार

आहे. कारण, नाही तर भूदान मागणारे केवळ गरिबांचे काळ, खऱ्या सत्ताधाऱ्यांना, स्वजातीय नागरवर्गाला ते काही सांगत नाहीत, असा अर्थ निघण्याचा धोका फार आहे. स्थित्यंतर दानमार्गाने होऊ शकते, हे दाखवावयाचे तर ते तत्त्वतः नागर अर्थव्यवस्थेत कसे होईल हे स्पष्ट केले पाहिजे.

दुसरी अडचण म्हणजे, भूदान-ग्रामदानाच्या धुरीणांत प्रत्यक्ष शाश्वत कार्य व्हावे व त्याकरिता संघटित, सुव्यवस्थित प्रयोग करावे, या वृत्तीची वाण आढळते. त्यांतील अनेक, केवळ दानसंकल्प झाले म्हणजे कार्य संपले असे समजतात; आणि बहुतेक, संघटित कार्यपद्धतीस विरोध करतात. अवघड समाजस्थित्यंतर घडवून आणावयाचे तर अनेकांचे सतत संघटित परिश्रम हवेत हे उघड आहे. त्यातल्या त्यात लोकांस पटवून त्यांच्या इच्छेनुसार काही करून घ्यावयाचे म्हटले तर, याकरिता परिश्रम, सातत्य व कालावधी ही अधिकच हवीत. हवेवर कल्पना सोडली अगर तिचा काही कमीअधिक प्रचार केला म्हणजे स्थित्यंतर आपोआप घडून येते, असा आजवरचा कुठलाच अनुभव नाही. तेव्हा ग्रामदान मोहिमेच्या पाठीशी जोवर अनेक कुशल कार्यकर्त्यांची संघटना उभी होत नाही तोवर तिजमुळे काही भरीव कार्य होण्याचा संभव अत्यल्प आहे.

सारांशाने असे म्हणता येईल की, वैचारिक दृष्ट्या आपण विशिष्ट भूमिका बनविली आहे. परंतु तीस अनसरून प्रत्यक्ष कार्य मात्र अजून आपल्या हातून काही भरीव होऊ शकले नाही. आपली गरिबी ही एक गोष्ट आपणांस प्रतिकूल आहे. बाकी बरीच अनुकूलता आहे. आपल्यांतील सर्व नवीन प्रयत्नांबाबत इतर देशांतही कुतूहल दिसून येते. परंतु उद्दिष्टे सर्वमान्य असूनही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपण काहीसे गोंधळल्यासारखे दिसतो. शास्ते, विचारवंत व कार्यकर्ते या तिहींचे आपल्यापुढील कार्यांत पूर्ण सहकार्य हवे. ते घडून येताना दिसत नाही. शास्त्यांस विचारवंतांची गरज भासत नसावी; व कार्यकर्ते सत्तेच्या बळावर मिळतात अगर उत्पन्न करता येतात, असा त्यांचा विश्वास असावा. विचारवंत एका बाजूस शास्त्यांपासून तुटक, व दुसऱ्या बाजूस प्रत्यक्ष दैनंदिन सुव्यवस्थित कार्याबाबत उदासीन दिसतात. विचारवंतांचे जागते पुढारीपण व शास्त्यांचा पाठिंबा यांच्या अभावी निश्चयी कार्यकर्त्यांची साखळी निर्माण होणे व झाल्यास दृढ कार्यान्वित होणे हे दुरापास्त. या कोंडीतून बाहेर पडणे अत्यावश्यक आहे; व हे सर्वांनी मिळूनच करावयाचे आहे. असे केल्यासच स्वतंत्र, सात्त्विक, समताप्रधान व समाधानी समाजाच्या निर्मितीच्या मार्गाने आपली पावले पुढे पडतील. या भारतापुढील अवघड पण इष्ट व आवश्यक कार्यात महाराष्ट्रास काय भाग घेता येतील हे आता थोडक्यात पाहू.

## ३. महाराष्ट्रपुढील समस्या आणि संभाव्य मार्ग

समाजात एकोपा व उत्साह असल्याखेरीज त्याच्या हातून भरीव कार्य होणे कठीण. तेव्हा महाराष्ट्र समाजाच्या याबाबतच्या सद्यःस्थितीचे थोडे समीक्षण करणे प्रथम आवश्यक आहे. सुरवातीसच 'महाराष्ट्र समाज' या संज्ञेचा कोणता अर्थ येथे अभिप्रेत आहे हे स्पष्ट केले पाहिजे. मराठी बोलणारे ज्या सलग प्रदेशात बहुसंख्य आहेत तो महाराष्ट्र व या प्रदेशात राहणारा समाज तो महाराष्ट्र समाज, असे आम्ही समजतो. या प्रदेशाबाहेर नेहमीचे वस्ती करून राहणारे मराठी बोलणारे असले तरी या अर्थाने त्यांचा महाराष्ट्र समाजात समावेश होत नाही. उलट, महाराष्ट्र प्रदेशात स्थाईक असलेले सर्व, ते कोणत्याही भाषेचे, धर्माचे, वंशाचे असोत महाराष्ट्र समाजातील. स्थाईक म्हणण्याचे कारण एवढेच की शेजार व साहचर्य यांमुळे उत्पन्न झालेल्या हरप्रकारच्या निकट संबंधांतून एका समाजाची

भावना उत्पन्न होत असल्यामुळे केवळ आल्यागेल्यांचा प्रादेशिक समाजात सहज समावेश होणे कठीण असते. अशा अर्थी महाराष्ट्र समाजात एकोपा आज कितपत साधला आहे, त्यातील सर्वांना आपण एकाच समाजाचे, आपले हितसंबंध एकसारखे, आपले पुढील कार्य एकजुटीने करावयाचे असे कितपत वाटते व आज वाटत नसल्यास, असे लौकर वाटू लागण्याचा संभव आहे काय, या प्रश्नांचा विचार केला पाहिजे. सद्यःस्थिती पाहता मराठी बोलणारे बहुसंख्यही या अर्थी आपणांस एका समाजाचे मानीत नाहीत, हे स्पष्ट आहे. याचे मुख्य कारण आपली जातिभेदाधिष्ठित समाजरचना. आनुवंशिक उच्चनीचतेची भावना ज्यांच्यांत आहे ते आपणांस येथे अभिप्रेत असलेल्या अर्थाने एका समाजाचे समजणे शक्य नाही. तेव्हा याविषयीचा पहिला प्रश्न म्हणजे महाराष्ट्रीय हिंदू समाजातील जातिभेदामुळे उत्पन्न झालेल्या उच्चनीचतेच्या कल्पना व क्रमाने जातिभेद हे नाहीसे होण्याच्या मार्गावर आहेत काय ? याबाबत एक मोठा फरक अलीकडील काही वर्षांत घडला आहे हे नमूद केले पाहिजे. महाराष्ट्रातील ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद हा बऱ्याच अंशी सौम्य झाला आहे; आणि हळूहळू त्याचे महत्त्व नाहीसे होण्याचा दाट संभव आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बहुसंख्य ब्राह्मणेतरांकडे राजकारणातील सत्ता गेली. प्रत्यक्ष जातिभेद व जातिविचार यांत अजून फरक पडलेला नाही. पांढरपेशा नागरवर्गच अजून शिक्षित, पुढारलेल्या व्यवसायांत प्रामुख्याने आहे; पण लौकरच ग्रामीण समाजातील व्यक्ती झपाट्याने या सर्व व्यवसायांत शिरकाव करून घेतील व अशा रीतीने अनेक जातींचा असा संमिश्र समाज शहरांत तयार झाल्यास जातिभेद येथे तरी नाहीसा होईल, अशी आशा करता येते. महाराष्ट्र समाजात एकोपा निर्माण करण्याच्या दृष्टीने या चालू प्रवृत्तीस हरतऱ्हेने मदत करून तीस अधिक गतिमान करणे हे महत्त्वाचे आहे.

## महाराष्ट्र समाजातील अस्पृश्यांचा प्रश्न

ही एक बाब सोडल्यास इतर बाबींतील बदल अजून फार थोडा आहे. हिंदूंच्या दृष्टीने आजच्या परिस्थितील फार मोठे वैगुण्य म्हणजे आपल्या समाजातील अस्पृश्यांची स्थिती. याचे आपल्याकडील खरे गमक म्हणजे ग्रामीण महार समाजाची अवस्था. खऱ्या अर्थाने हीत अजून काहीही विशेष सुधारणा झालेली नाही; व व्हावी अशी स्पृश्य हिंदूंत कळकळ दिसत नाही. महारांनी धर्मान्तर करून ते बौद्ध झाल्यामुळे त्यांची स्थिती सुधारण्यास काही मदत होईल किंवा नाही हे जरी आज अनिश्चित असले, तरी कोणाही पुढाऱ्याने धर्मांतर करण्याचा आदेश द्यावा अशी त्यांची स्थिती शतकानुशतके होती व आजही आहे, हे निर्विवाद आहे. डॉ. आंबेडकरांच्या कार्यांत प्रतीत झालेली आमच्या प्राचीन परंपरे-विषयीची त्यांची जागती तळमळ ही आमच्या समाजाच्या लक्ष्यातही आलेली दिसत नाही. मग तिचे चीज करणे दूरच राहो ! हिंदू समाजात राहून बराच काळ तरी अस्पृश्यांची स्थिती सुधारणे शक्य नाही, असे अनेक कटू अनुभवांती आढळून आल्यावर ते धर्मांतराचा विचार करू लागले. हा करतानाही आपल्या परंपरेतीलच परंतु अब्राह्मणी पंथाचा फक्त त्यांनी विचार केला. आज हिंदुस्थानात महत्त्व असलेल्या शीखपंथाचाही त्यांनी विचार एकदा केला असावा असे दिसते. परंतु त्यांचे खोल तत्त्वचिंतन व बौद्धिक बैठक यांस अनुसरून त्यांना प्रथमपासून बुद्धधर्माचे विशेष आकर्षण वाटत होते; व शेवटी त्याचीच दीक्षा स्वतः घेऊन त्यांनी ती आपल्या अनुयायांसही दिली. हिंदू म्हणविणाऱ्या बहुतेकांत आपल्या प्राचीन परंपरेची संग्राहक वृत्ती नाहीशी झाली आहे, हे डॉ. आंबेडकर व नवबौद्ध यांची आम्ही जी संभावना केली व करीत आहो त्यावरून दिसून येते. महारांचे धर्मांतर मोठ्या प्रमाणावर झाले. हे करताना त्यांना अनेक तोटे सोसावे लागले. तरी ते त्यांनी सोसले. त्यांनी अनेक जुने वेडगळ आचार व समजुती यांचा एकमताने त्याग केला. यावरून या सर्व दृष्टींनी निकृष्टावस्थेत असलेल्या समाजातील

एकोपा, कणखरपणा, त्यागबुद्धी यांचे कौतुक वाटून हे आमच्यांतले म्हणून धन्यता मानावी; पण असे काहीच न होता ग्रामीण समाजातील अनेक घटक त्यांचा छळ करण्यास प्रवृत्त झाले आहेत व हिंदुत्वाचा अभिमान सांगणारे त्यांवर आग पाखडीत आहेत, असे आज दिसत आहे.

एकंदर अस्पृश्य, महार व नवबौद्ध या सर्वांचा ग्रामीण विभागातील प्रश्न तत्त्वतः एकच आहे. या विभागात सर्व प्रकारची सत्ता मुख्यतः मराठा व तत्सम शेतकरी वर्गाच्या वरील थरांत आहे. त्यांचे राजकीय महत्त्व अलीकडे वाढल्यामुळे ही सत्ता या थरांत आज विशेषत्वे केंद्रित झाली आहे. सद्यःस्थितीतील मुख्य वैगुण्य म्हणजे अस्पृश्य, त्यातल्या त्यात महार, यांशी आपल्या परंपरागत वागणुकीत काही विशेष चुकते असेच यांस वाटत नाही, हे आहे. खऱ्या अर्थाने पाहता, अस्पृश्यतानिवारणाची चळवळ महाराष्ट्रात आधुनिक काळात सर्वांत जुनी व सर्वांत प्रभावी; परंतु महात्मा ज्योतिबांनी ब्राह्मणांविरुद्ध बंड व अस्पृश्यता-निवारण या सांगितलेल्या द्विविध कार्यक्रमातील पहिलाच तेवढा ब्राह्मणेतर चळवळीने उचलला. छत्रपती शाहूमहाराजांनंतर अस्पृश्यता निवारणात कळकळीने लक्ष घालणारा व ग्रामीण समाजावर प्रभाव पडेल असा पुढारी महाराष्ट्रात निघाला नाही. आज तर यात राजकारण शिरल्यामुळे परिस्थिती विशेषच बिकट झाली आहे. महार व नवबौद्ध आमच्या उलट मते देतात, म्हणून अनेक भागांतील प्रमुख ग्रामीण राजकीय पुढारी त्यांच्यावर बहिष्कारादी खटपटीत भाग घेत आहेत. रामनाथपुरची एखादी आवृत्ती अजून महाराष्ट्रात निघाली नाही; पण ती अल्पप्रमाणात तरी केव्हाही निघावी अशी स्फोटक परिस्थिती आज सार्वत्रिक आहे. या परिस्थितीकडे अजाणता अगर बुद्धयाच सर्वांचेच दुर्लक्ष होत आहे. जोवर हे कायम आहे तोवर एकोप्याची गोष्ट बोलणे तर राहोच, पण महाराष्ट्र समाज अशी संज्ञा वापरण्याचाही अधिकार आम्हांस पोचत नाही हे उघडच आहे.

## आदिवासींची परिस्थिती

महार व अस्पृश्य हे आमच्या नागर व ग्रामीण समाजांत पुरे समाविष्ट झालेले. याशिवाय वडर, वंजारी वगैरे अनेक अर्धवट स्थाईक जमाती आहेत; व गोंड, गोवारी, वारली, कोळी, ठाकूर वगैरे पुष्कळ अंशी स्वतःच्या प्रदेशांत राहणाऱ्या आदिवासींचे समाज महाराष्ट्रात आहेत. यांचे मुख्य महाराष्ट्र समाजाशी, नित्य साहचर्याच्या दृष्टीनेही पुरे विलीनीकरण व्हावयाचे आहे. आर्थिक दृष्ट्या यांस स्वास्थ्य व सुस्थिती मिळवून देणे हा पहिला प्रश्न; सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या यांस आपल्या बरोबरीचे स्थान मिळवून देणे हा त्याच्यापुढचा. या सर्वांस उपेक्षित म्हणता येते. अस्पृश्य व हे सर्व मिळून यांची संख्या आपल्या समाजात जवळजवळ एक-पंचमांश असावी.

## महाराष्ट्रातील भिन्नधर्मीय समाज

महाराष्ट्रात सर्व व्यवहारांत मराठी बोलणाऱ्या स्पृश्य हिंदूंबरोबर पुरा भाग घेणारे पण त्यांशी पूर्ण तादात्म्य न पावलेले, अशाही समाजांचा येथे उल्लेख केला पाहिजे. यांचे दोन प्रकार आहेत. पहिला, महाराष्ट्रातीलच पण धर्माने अगर पंथाने निराळे असलेले. यांतील सर्वांत मोठा वर्ग मुसलमानांचा. ते ज्या ज्या थरांत वावरतात त्या त्या मराठी समाजाच्या थराहून धर्माशिवाय कोणतेच भिन्नत्व बहुतेक मराठी मुसलमानांच्या बाबत दाखविता येणार नाही. एके काळी आपण राज्य केले अशी भावना, नंतर काही काळ लीग-पाकिस्तानी राजकीय चळवळ यांमुळे मुसलमानांतील अनेक येथीलच असून आपणांस पूर्णपणे महाराष्ट्र-समाजाचे घटक समजत नसत. आज परिस्थिती बदलली असल्यामुळे हिंदूंची योग्य भावना दिसल्यास त्यांचीही वृत्ती बदलण्यास हरकत नसावी. अनेक पिढ्यांच्या संस्कारांमुळे हिंदूंतील उच्चजातीयांची वृत्ती अन्यधर्मीयांबाबत तुटक बनली आहे. सर्व व्यवहारांत त्यांच्याशी

मोकळेपणाने, समानतेने वागणे आमच्याकडून होत नाही व त्यांच्या धर्म आदी कल्पना समजून घेणे, त्या अभ्यासणे हे आम्ही करीत नाही. जोवर असली वृत्ती टिकून आहे तोवर हे आमचे आहेत असे म्हणणे निरर्थक आहे. इतर धर्मांच्या मूळ ग्रंथांची भाषांतरेही धडशी मराठीत नाहीत; ही करवून घेणे व तत्सम इतर प्रयत्न करणे याचे महत्त्व डॉ. केतकर यांनी अनेक वर्षांपूर्वी प्रतिपादले. पंजाबात शीख व हिंदू यांच्या दरम्यान व गुजरायेत हिंदू व जैन यांच्यांत बेटी-व्यवहार होतात; अशाच प्रकारे समान परिस्थितीतील पण भिन्न धर्मांच्या सर्व मंडळींविषयी समाजात भावना व वागणूक असणे हे एकात्मतेचे खरे लक्षण.

## मूळचे इतर प्रदेशांतील महाराष्ट्रात स्थाईक झालेले समाज

मूळचे इतर प्रदेशांतील पण महाराष्ट्रात स्थाईक झालेले असे अनेक समाज महाराष्ट्रात आहेत. यांतील बहुतेक मराठी भाषकही बनलेले आहेत. जातिसंस्थेमुळे बेटी-व्यवहाराकरिता मूळ स्थानाशी संबंध पुष्कळांचा राहिला आहे; कित्येकांचा तुटला असला तरी जातिभेदामुळे भिन्नत्वाची स्मृती कायम आहे. हे समाज पूर्ण मराठी न बनल्यामुळे समाजाच्या एकात्मतेस बाध येतो व व्यावहारिक दृष्टयाही भेद कायम टिकून नुकसान होते. याबाबतचे महाराष्ट्रातील ठळक उदाहरण म्हणजे, आपल्याकडील व्यापार-सावकारी करणाऱ्या जमातींचे. कोकणपट्टीचा काही भाग सोडल्यास महाराष्ट्राच्या इतर भागांत वाणी-वैश्य अशा प्रकारे संबोधल्या जाणाऱ्या मराठी जाती आढळत नाहीत. यामुळे इतर प्रदेशांतून आलेल्या वाणी जमातींच्या हातीच महाराष्ट्रातील व्यापार व सावकारी व्यवहार मुख्यतः आहेत. पण शतकानुशतके हा व्यवहार त्यांच्या हाती राहून त्यांस अजून महाराष्ट्रीय आम्ही समजत नाही व तेही स्वतःस तसे म्हणवीत नाहीत. या घटनेमुळे महाराष्ट्राची फार हानी झाली आहे. कारण, ज्या व्यवहारावर समाजाचे मूळ पोषण व वर्धन अवलंबून तो समाजात पूर्ण तादात्म्य न पावलेल्यांच्या हाती असण्याने वेचक अर्थव्यवहाराचा फायदा सर्व समाजास मिळत नाही; त्याविषयीचे ज्ञान, कसब व कौशल्य समाजात पसरत नाही व धनसंचयामुळे होणाऱ्या आर्थिक उत्कर्षापासून समाज पारखा राहतो. आधुनिक आर्थिक व्यवस्थेत तर ही वैगुण्ये फार भासतात. महाराष्ट्रातील आजच्या असंतोषाचे हे एक प्रमुख कारण आहे, असे म्हणण्यास हरकत नाही.

यातील मूळ दोष अर्थात आमच्या समाजरचनेचा. जातिभेदाधिष्ठित रचनेत कोणत्याही नवागतांस त्यांचे निराळे स्थान दाखवून त्यांस समाजाच्या व्यापक पटावर विवक्षित ठिकाणी लौकर बसवून देता येते. पण उलट हे स्थान बदलण्याची काहीच सोय नसल्यामुळे प्रत्येकाची निराळी चौकट ही तशीच कायम राहते. सतराव्या व अठराव्या शतकांत इंग्लंडमध्ये हॉलंड, फ्रान्स, जर्मनी, स्पेन इत्यादी अनेक देशांतून अनेक कारणांमुळे निर्वासित आले. ते इंग्रज समाजाशी लौकर समरस झाल्यामुळे त्यांच्यांतील गुणसमुच्चयाचा पूर्ण फायदा इंग्रज समाजास मिळाला. हा प्रश्न अर्थात दोन्ही पक्षी आहे. शेठ वालचंद हिराचंद यांचे घराणे अनेक पिढ्या येथे स्थाईक झालेले व शेठजींनी मुंबईस 'महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स' हे नाव धारण करणारी संस्था स्थापन करण्यात प्रमुख भाग घेतला; तरी महाराष्ट्रातील पुढारलेले समजणारे समाज आपणास आपला मानीत नाहीत अशी त्यांची भावना झाल्याचे म्हणतात. उलटपक्षी, 'व्यापारी जमातीस महाराष्ट्रीय म्हणवून काय फायदा? गुजराती, मारवाडी म्हणून वावरणेच अधिक श्रेयस्कर,' अशाही मनोभूमिका असण्याचा संभव आहे. येथे मुद्दा एवढाच की, महाराष्ट्र-समाजाच्या एकोप्याच्या विचाराशी या प्रश्नाचा निकट संबंध आहे. बाहेरून येऊन आमच्यात स्थाईक झालेल्यांस आमच्याबद्दल आपलेपणा कसा वाटू लागेल याची काळजी आम्हांस वाटली पाहिजे. अगदी ताजे उदाहरण सिंधी समाजाचे देता येईल. मुंबई, कल्याण

वगैरे जमेस धरून सिंधी निर्वासितांपैकी सर्वांत मोठा भाग महाराष्ट्रात स्थाईक झाला आहे असे दिसते. यांच्याबाबत आम्ही अजून आपले काही कर्तव्य आहे असे दाखवीत नाही, ओळखीत नाही. आमची वृत्ती अशी बेपर्वाईची असल्यास त्यांनाही आमच्याबद्दल ममत्व का वाटावे ?

## महाराष्ट्र समाज निर्मितीच्या कार्याचे स्वरूप

एकोपा असलेला महाराष्ट्र समाज निर्माण करण्याच्या क्रियेचे स्थूल स्वरूप हे असे आहे. या निर्मितीतील पहिली पायरी म्हणजे तिची आवश्यकता आमच्यांतील प्रमुखांस पटावी व तिचे स्वरूप त्यांस आकलन व्हावे. असे झाले म्हणजे मग समाजातील निरनिराळ्या थरांत इष्ट मनोवृत्ती निर्माण करणे व इतर आवश्यक गोष्टी करणे यांस ते उद्युक्त होतील. समाजधुरीणांच्या मनाची तयारी व कळकळ यांस या कार्यात फार महत्त्व आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर संबंध काहीसे सुधारले याचे मुख्य कारण बहुसंख्य ब्राह्मणेतरांच्या चळवळीचे दडपण. असे असले तरी ब्राह्मणांतील अनेकांना आपले पिढीजाद श्रेष्ठत्व कायम टिकविणे शक्य नाही व इष्टही नाही हे पटले व ते याबाबत ठासून बोलू लागले, यासही त्याचे थोडेबहुत श्रेय दिले पाहिजे. अर्थात इतर समाजांबाबतचे स्थित्यंतराचे स्वरूप जरा निराळ्या प्रकारचे आहे. मराठा व तत्सम शेतकरी समाज हा महाराष्ट्रातील सर्वांत मोठा आहे; व यापुढे तो वाढत्या प्रमाणात सत्ताधारी होणार. इतर सर्व अल्पसंख्याक. तेव्हा या समाजाच्या पुढाऱ्यांनी, ब्राह्मणादी पुढाऱ्यांच्या साहाय्याने पुढील परिवर्तन जबाबदारीने व जागरूकपणाने घडवून आणावयाचे आहे. गेल्या अर्धशतकात महाराष्ट्रातील ग्रामीण समाजातील मराठा, कुणबी, आदी फरक ज्या पद्धतीने घालविण्यात या समाजाने यश मिळविले त्याकडे पाहता हे कार्य त्याच्या कुवतीबाहेरचे नाही असे वाटते. ते कार्य हे असे आहे, ते आपले आहे व आपणच केले पाहिजे एवढे मात्र त्यांच्या लक्षात आले पाहिजे.

अस्पृश्य, विधर्मी, आतले, बाहेरील असले भेद मोठ्या भावनेच्या भरात आपले बहुसंख्य विसरू शकतात हे गेल्या सार्वत्रिक निवडणुकीतील दृश्य या दृष्टीने आशादायक आहे. परंतु एखाद्या विशेष मोठ्या लाटेने दूरवरचा प्रदेश आक्रमिला तरी तो नेहमीचा व्यापण्यास सतत तसूतसू प्रयत्न करावा लागतो. तद्वत हे कार्य धिमेपणाने, सतत, तपशीलवार, सर्वांगीण प्रयत्न करूनच साधावयाचे आहे, हे लक्षात ठेवणे जरुरीचे आहे.

एकोपा असलेला महाराष्ट्र बनविणे हा भारताला बलशाली बनविण्याच्या कार्यापैकीच एक भाग आहे. अनेक दृष्टींनी या प्रकारच्या कार्यास महाराष्ट्रातील एकंदर परिस्थिती भारतातील इतर प्रदेशांपेक्षा जास्त अनुकूल आहे. संयुक्त महाराष्ट्राबद्दलचे निवेदन तयार करण्याच्या वेळेपासून याबाबत पक्षोपपक्षांत बऱ्याच अंशी एकमत आढळून आलेले आहे. यात बिघाड होऊ न देता पुढील मार्ग आक्रमू शकलो तर इतरांसही मार्गदर्शन होण्याचा संभव आहे. हे कार्य प्राथमिक स्वरूपाचे झाले. हे होत असतानाच अखिल भारतीय स्वरूपाची जी कार्ये वर निर्देशिली, त्यांत भाग घेण्याकरिता महाराष्ट्राची काय तयारी केली पाहिजे, त्याबाबत आपणांस वैगुण्ये आज काय आढळतात याचा विचार ओघाने येतो. वर विचार केलेल्या आर्थिक स्थित्यंतर व अहिंसेचे प्रयोग या प्रश्नांच्या अनुषंगानेच हेही विवेचन करणे सोयीचे होईल.

महाराष्ट्र उद्योगधंद्यांत अगर व्यापारात मागासलेला आहे असे म्हणता येत नाही. परंतु या प्रदेशातील बहुतेक सर्व नागर आणि अनागर उद्योग व व्यापार महाराष्ट्राबाहेरच्या जमातींच्या हाती आहे. त्यामुळे मराठी भाषकांचा असा विचार केल्यास हे बहुतांशी अर्थव्यवहारांत मागासलेले व गरीब असेच आहेत. ते स्वतःस व इतर त्यांस असेच समजतात. महाराष्ट्रीय हे मुख्यतः शेतकरी, मजूर व पांढरपेशे नोकरी करणारे अगर काही निवडक व्यवसायांतले. व्यापार-उदीमाचे पिढ्यान्-

पिढ्या वाळकडू यांस नसल्यामुळे आधुनिक अर्थव्यवहारात हे अकुशल व बहुतांशी गैरहिशेबी असतात. महाराष्ट्रातील शेती सुद्धा मोठ्या अंशी निकृष्ट व दुष्काळी. या सर्व कारणांमुळे महाराष्ट्रातील, विशेषतः मराठी भाषकांची, आर्थिक परिस्थिती बिकट व असंतोषजनक अशी आहे. असंतोषाचे एक मुख्य कारण म्हणजे स्वतःचे भवितव्य घडविण्यात आज आपला काही विशेष भाग आहे अगर असू शकेल, असेही त्यांस वाटत नाही. आपल्या व्यवहाराच्या नाड्या ज्यांच्या हातांत आहेत त्यांचेच भारताच्या व महाराष्ट्राच्याही राजकारणात महत्त्व फार आहे व ते स्वतःचे हितसंबंध पाहूनच आर्थिक धोरण बनवितात, असा ग्रह बहुसंख्य मराठी भाषकांचा झालेला आहे. हा नाहीसा व्हावा या दृष्टीने अलीकडे काही विशेष घडलेलेही नाही. महाराष्ट्रीय राजकारणाची सूत्रे ज्यांच्या हातांत आहेत त्यांच्याकडून हा ग्रह घालविण्याजोगी भरीव कामगिरी लवकर झाल्याखेरीज याबाबतचा असंतोष वाढत जाणार, अशी चिह्ने दिसत आहेत.

हा विचार तात्कालिक झाला. मराठी भाषिकांस हवे वाटते असे आर्थिक धोरण लवकर अमलात येऊ शकल्यास, भारताची समाजवादी अर्थव्यवस्थेच्या दिशेने खरोखर दोन पावले पडल्यास, आपल्या परिस्थितीत काय फरक पडू शकेल व घडविता येईल हे मुख्यतः पाहिले पाहिजे. या दृष्टीने विचार करता, आपणांत काही विशेष गुण आढळतात. मराठी भाषक त्यांचा इतिहास व परंपरागत व्यवसाय यामुळे सर्वसाधारणपणे अल्पसंतुष्ट असतात; व त्यांपैकी अनेकांत ठराविक वेतनावर निष्ठेने काम करण्याची वृत्ती बळावलेली असते. या दोन्ही गुणांमुळे सरकारी व सहकारी अर्थव्यवहार सचोटीने व कार्यक्षमतेने चालविणे इतर प्रदेशांपेक्षा महाराष्ट्रात जास्त सुकर व्हावे. उलट, व्यक्तिगत साहसाने धनसंचय करून पिढ्यान्‌पिढ्या अर्थव्यवहारात अधिकार चालविणे यास लागणारे गुण आज तरी त्यांच्यांत नाहीत. त्यांच्यांतील फार थोडे आज या क्षेत्रात पुढारलेले आहेत. या परिस्थितीमुळे समाजवादी अर्थव्यवस्थेस महाराष्ट्रातील जनमत अनुकूल असे बनले आहे.

## मराठी भाषकांची वैगुण्ये

याचबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, मराठी भाषकांत काही प्रमुख वैगुण्ये अशी आहेत की, ज्यामुळे सहकारी व सरकारी अर्थव्यवहार चांगला चालविण्यास अडचण भासावी. पहिले वैगुण्य, त्यांचा गैरहिशेबीपणा. पूर्वकालीन स्वयंपूर्ण ग्राम-व्यवस्थेत जेथे पिकेल तेथे व जितके पिकेल तितकेच खावयाचे असल्याने दूरवरचा हिशेब करण्याचे कारण नसे. उलट, तात्कालिक परिस्थितीशी जमवून घेऊन समाधान मानणे हाच गुण ठरे. आधुनिक अनेक–साधनप्रधान व विस्तृत क्षेत्रांतील अर्थ-व्यवहारांत सर्व प्रकारचे हिशेब करणे हेच अर्थव्यवहाराच्या कार्यक्षमतेचे प्रमुख सूत्र बनलेले आहे. हिशेबीपणा आपणांत नाही हे काही उपजत वैगुण्य नाही. हा केवळ आपल्या मनोवृत्तीचा भाग आहे. ही एक प्रकारची सवय आहे व म्हटल्यास ते एक मूल्य आहे. हिशेबी नसणे यातच जुन्या काळी मोठेपणा मानला जात असे व या मूल्याचा पगडा अजून आमच्या मनावर आहे. शिवाय, हिशेबी असणे म्हणजे क्षणोक्षणी हिशेब करण्याचा सराव ठेवणे. हे करण्यास आमच्यांतले बहुतेक कंटाळतात.

याच प्रकारची आमची आणखी दोन मोठी वैगुण्ये म्हणजे, एक तर आम्ही उद्यमशील नाही; व दुसरे, आमच्यांपैकी, विशेषतः ब्राह्मण व मराठे वर्गांतील बहुतेकांस आपला भाग आपणांस स्वतः काही केल्याशिवाय केवळ स्थानपरत्वे मिळावा असे वाटते. ही दोन्ही वैगुण्ये आमच्यांत ऐतिहासिक परिस्थितीमुळे उत्पन्न झाली असावी. त्यांचे मूळ मिरासदारी, वतनदारी यांत असावे. मुलुखगिरीमुळेही यात भर पडली असावी. ही वैगुण्ये आमच्यांत का आली असावी याचा ऊहापोह करण्याचे हे स्थळ नाही; पण ती आमच्यांत प्रामुख्याने आहेत हे मान्य करणे प्राप्त आहे. आमची सहकारी चळवळ

कार्यक्षम असावी तितकी नाही. याचे मूळ उपरिनिर्दिष्ट वैगुण्यांत आहे. जातिपरत्वे अगर पिढीजाद मोठे त्यांस मानाची स्थाने दिलीच पाहिजेत, मग ते लायक असोत, कार्यक्षम असोत किंवा प्रामाणिकही असोत वा नसोत—ही कल्पना आमच्या सार्वजनिक आयुष्यात पदोपदी नडत आहे. मानाचे स्थान मिळालेच पाहिजे, त्याची जबाबदारी काही पत्करावी लागेल ही मात्र भावना नाही. अशी आमच्याकडे सार्वत्रिक परिस्थिती आहे. याबाबत आजची मुख्य जरुरी जनमत तयार करण्याची. आपला समाज व प्रचलित जनमत ही संक्रमणावस्थेमुळे अर्धवट अवस्थेत पडली आहेत. जुन्या जातिभेदाधिष्ठित स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेत आपल्या समाजाचा पिंड वाढलेला आहे. आज जातिभेद मोडावे, समानता मानावी, लोकशाही पद्धतीने कारभार करावा वगैरे गोष्टी आम्ही सर्व तत्त्वतः मान्य करतो. प्रत्येकजण, प्रत्येक घर, प्रत्येक जात या नवीन कल्पनांचा आपले स्थान सुधारणे व महत्त्व वाढणे एवढ्यापुरता आश्रय करतात; परंतु जेथे जुनी स्थाने, जुन्या सवयी, जुन्या कल्पना सोडणे हे स्वतःच्या तात्कालिक हिताविरुद्ध दिसते तेथे आम्ही सर्व नव्याकडे स्वभाविक रीतीने दुर्लक्ष करतो. ही धरसोड चालावयाची नाही. समाज-प्रगतीच्या दृष्टीने ती अत्यंत अनिष्ट आहे, याची जाणीव आम्हांस झाली पाहिजे. आणि ज्यांना ज्यांना कोणत्याही कारणाने आज समाजात मानाचे अगर सत्तेचे स्थान आहे, त्यांनी तर कटाक्षाने हे दुहेरी–दुटप्पी वर्तन टाळले पाहिजे.

आमची वैगुण्ये म्हणून जी दर्शविली ती विचारान्ती प्रयत्नाने सहज घालविण्यासारखी आहेत; व आमची आर्थिक बाबतींतील व्यक्तिगत अल्पसंतुष्टता व सेवानिष्ठा हीही आजच्या परिस्थितीत टिकवून ठेवण्यास अडचण भासू नये. हे साधल्यास सरकारी व विशेषतः सहकारी व्यवस्थेची व्याप्ती फार मोठी करून आधुनिक अर्थव्यवहारांत एका नवीन प्रकारच्या अर्थव्यवस्थेचे प्रात्यक्षिक सार्वत्रिक करून दाखविण्याचे मोठे कार्य महाराष्ट्राकडून घडण्यासारखे आहे.

गरीब असला तरी सहकारी व शांतिप्रधान अहिंसक समाज स्थापण्याचे उद्दिष्ट भारतासमोर आहे असे मानल्यास, अर्थव्यवहारात स्पर्धा व वैयक्तिक फायदा यांच्याऐवजी सामूहिक सहकार्यप्रधान व्यवस्था निर्माण करण्याच्या भागात महाराष्ट्रास मोठा वाटा उचलता येईल, असे दाखविले. शांतिप्रधान अहिंसक समाजनिर्मितीबाबत मात्र निश्चयाने बोलणे कठीण आहे. महाराष्ट्राची परंपरा सर्वस्वी यास विरोधी आहे असे म्हणता येत नाही. भक्तिमार्गी वारकरी संप्रदाय हाच महाराष्ट्रातील सर्वांत महत्त्वाचा, आणि हा पूर्णपणे शांतिप्रधान असे म्हणण्यास हरकत नाही. श्रीचक्रधराने महाराष्ट्राचे 'सात्त्विक' म्हणून केलेल्या वर्णनाचा दाखला आम्ही अभिमानाने देत असतो. असे असले तरी आमच्या लष्करी व क्रांतिकारी परंपरेचे उल्लेखही आम्ही वारंवार करतो. १८ व्या शतकातील आमच्या लष्करी मोहिमांत स्वसंरक्षणाचा, स्वराज्यस्थापनेचा भाग काहीएक नव्हता; आणि भारतातील इतर भागांत केलेल्या त्यावेळच्या लुटारू आक्रमणांमुळे आजही आमच्या विषयी त्या त्या भागांत जनमत कलुषित आहे, हे आमच्या लक्षात आलेले दिसत नाही; आणि स्थलकालानुसार क्रांतिकारकांच्या अत्याचारांचे समर्थन जरी करता आले तरी मानवसमाजाच्या सांस्कृतिक प्रगतीच्या दृष्टीने अहिंसा–वा शांततेचा मार्ग हाच शाश्वत, हे मत महाराष्ट्रात सार्वत्रिक मान्यता पावलेले दिसत नाही.

## गांधीविरोधाची कारणे

महाराष्ट्रातील अहिंसा तत्त्वाचा अस्वीकार व गांधींच्या राजकारणास अनेक महाराष्ट्रीय पुढाऱ्यांनी व पक्षांनी केलेला विरोध यांचा संबंध अनेक वेळा जोडला जातो. तेव्हा महाराष्ट्रातील दिसलेल्या गांधीविरोधाबद्दल थोडी-चर्चा या संबंधात करणे आवश्यक वाटते. गांधींच्या आयुष्यक्रमाचे दोन स्थूल भाग पडतात. एक मुख्यतः निस्सीम अहिंसक सत्याग्रहप्रयोगी म्हणून. याचा प्रमुख आविष्कार दक्षिण

आफ्रिकेत झाला. हिंदुस्थानात ते आल्यानंतर चंपारण्य, खेडा इत्यादी सत्याग्रहांत ही भूमिका बरीच कायम राहिली. पण याच्यापुढे ते हिंदुस्थानचे प्रमुख राजकारणी पुढारी ही पदवी पावले व शेवटपर्यंत तसेच राहिले. नाही म्हणावयास आयुष्याच्या अखेरच्या, नोआखाली अत्याचारानंतरच्या एकदोन वर्षांत त्यांची मूळची भूमिका बऱ्याच अंशी उत्कटपणे अवतरली. महाराष्ट्रात गांधींच्या धोरणाबाबत मतभेदप्रदर्शन झाले ते मुख्यतः त्यांच्या राजकारणी पुढारीपणाच्या कालात. त्यांच्या या कालातील धोरणाबाबतच्या अनेक विवाद्य भागांचा शांतिप्रधान अहिंसात्मक मार्गाशी काहीएक संबंध नव्हता. कायदेमंडळावरील बहिष्कार, खिलाफत चळवळीस पाठिंबा, मुसलमान, अस्पृश्य, हिंदी संस्थानिक व इतर राजकीय पक्ष इत्यादींबाबत गोलमेजपरिषदेत व तदनंतर त्यांनी स्वीकारलेले धोरण, कॉंग्रेस मंत्रिमंडळाची घटना व कार्य या सर्व गोष्टी अशा प्रकारच्या आहेत. हेच गांधींच्या अनेक बाबतींतील मतांबद्दलही म्हणता येते. एका बाजूस जुने तंत्र स्वीकारून ग्रामस्वयंपूर्णतेवर भर, तर दुसऱ्या बाजूस हिंदी भांडवलवाल्यांबाबत पूर्ण सहानुभूती. ही पाहून गांधींचे अर्थकारण प्रतिगामी स्वरूपाचे होते, असे म्हणावयास वाव होता. आर्थिक बाबतींत तसेच सामाजिक बाबतींतही त्यांची भूमिका पूर्ण समतावादाची नसून वरिष्ठ वर्गाकडे विश्वस्तपणा घेणाऱ्याची होती, असे म्हणणेही शक्य होते. त्यांचा वर्णाश्रमाच्या कल्पनेचा पुरस्कार याच अर्थाचा दिसतो. त्यांची विवेचनपद्धतीही आगरकर-टिळकांच्या लिखाणांशी परिचित असणाऱ्यांस न रुचावी अशा तऱ्हेची होती. ही सर्व उदाहरणे देण्याचे कारण एवढेच की, गांधींचे राजकीय, आर्थिक अगर सामाजिक क्षेत्रांतील अनुयायित्व न पत्करणे व अहिंसेस विरोध अगर हिंसेचा पुरस्कार यांचा काहीएक संबंध नाही हे स्पष्ट व्हावे. दक्षिण आफ्रिकेतील गांधींचे कार्य अतोनात वाखाणणाऱ्या, महाराष्ट्रात 'मवाळ' पदवीस पात्र झालेल्या गोखल्यांच्या 'हिंद सेवक समाजा'तील सहकाऱ्यांनीही गांधींचे अनुयायित्व पत्करले नाही, एवढे वरील विधानाच्या समर्थनार्थ पुरे आहे.

गांधींच्या पुढारीपणाबद्दल महाराष्ट्रात मतभेद राहिले, याचे दुसरेही कारण लक्षात घेण्याजोगे आहे. १९२० नंतर नवीन प्रकारची, केवळ राजकीय नव्हे, तर आर्थिक, सामाजिक चळवळही हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत गांधीयुगाबरोबरच अवतरली. यामुळे गांधींच्या पुढारीपणाचे लोकोत्तरत्व त्या भागांत प्रतीत झाले; आणि त्या बहुतेक भागांत मतभेद निघावा असा पूर्वानुभवच तेथे नव्हता. महाराष्ट्राचे तसे नव्हते. राजकीय चळवळ खेड्यापाड्यांपावेतो, तेल्या-तांबोळ्यापर्यंत टिळकांनीच पोचविली होती. सामाजिक चळवळ ज्योतिबांपासून सुरुवात होऊन अनेक अंगांनी स्त्रियांपासून अस्पृश्यांपर्यंत पोचत होती. आर्थिक चळवळीतही सार्वजनिक काका, रानडे, खुद्द टिळक यांनी पुढाकार घेतला होता; तर मजूर चळवळीचे आद्य संस्थापक लोखंडे, व पुढील पिढीतील ना. म. जोशी वगैरे महाराष्ट्रातील होते. व्यापक अर्थाने सामाजिक चळवळीचा इतका मोठा विस्तार बंगाल्यातही झाला नव्हता. तेव्हा गांधींचे कार्य कोणत्याच क्षेत्रात अभिनव न वाटून त्यांची कार्यपद्धती व कल्पना यांची येथे आधीच रूढ झालेल्यांशी तुलना व्हावी हे अपरिहार्य होते.

## गांधींच्या खऱ्या कार्याची उपेक्षा

याकरिता गांधींशी मतभेद दाखविणे अगर त्यांस विरोध करणे महाराष्ट्रातील अनेकांकडून घडले. त्यात महाराष्ट्राची विकृत मनःस्थिती दिसते असे अनेक टीकाकार जे म्हणतात ते अवास्तव व अयथार्थ आहे. याचबरोबर हेही खरे की, गांधींशी राजकारण, अर्थकारण इत्यादी क्षेत्रांतील मतभेदांमुळे गांधींचे खरे महान् कार्य महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे उपेक्षिले गेले. हे कार्य म्हणजे अहिंसेचा निस्सीम पुरस्कार व दुर्बलास सबल बनविण्याकरिता सत्याग्रहतंत्राचा उपक्रम. गांधींच्या कार्यक्रमाचा तपशीलवार विचार येथे प्रस्तुत नाही. मुद्दा एवढाच की, त्यांनी दाखविलेली दिशा आधुनिक युगास अनुरूप आहे

आहे किंवा नाही याचा सखोल विचार निर्विकारपणे करणे अत्यावश्यक आहे. 'साधनानाम् अनेकता' हे मान्य करूनही मानवसमाजाची आजची परिस्थिती अशी आहे की, कोणत्याही समाजाच्या अंतर्गत व्यवस्थेत व समाजा-समाजांतील परस्पर व्यवहारांत अहिंसेशिवाय तरणोपाय नाही, हाच आधुनिक युगधर्म आहे, असे म्हणणे अयुक्त ठरत नाही. अस्त्रांच्या वाढीमुळे सार्वराष्ट्रीय संबंधातील आजचा पेचप्रसंग सर्वांस भोवत आहे. समाजाच्या अंतर्गत व्यवस्थेतही पूर्ण सार्वत्रिक समानता प्राप्त होऊन, ती टिकेपावेतो सारखी स्थित्यंतरे होणे, सत्ताधारी व संपत्तिवान् यांचा भाग इतरांनी मिळविण्याचा प्रयत्न करीत राहणे हे अपरिहार्य आहे. या स्थित्यंतरांतून दर वेळेस हिंसक क्रांती उद्भवावयाची नसल्यास सर्वांनीच अहिंसेचे पथ्य पाळले पाहिजे; व सत्याग्रहासारखा एखादा अहिंसात्मक प्रतिकाराचा व परिवर्तनाचा मार्ग रुळवला पाहिजे.

## अंतर्मुख होण्याची आवश्यकता

महाराष्ट्रात या प्रश्नाकडे अजून जावे तितके लक्ष जात नाही, याचे मूळ आमचा अहंकार व आमची रगेलपणाची परंपरा यांत असावे. आमचा अहंकार एवढा दुर्दम्य आहे की, आम्हांस शिष्टाचाराचेही वावडे आहे. लीनता व स्वाभिमानशून्यता आम्ही एकच समजतो, असा भास आमच्या वर्तनावरून अनेक वेळा होतो. या आमच्या स्वभावाचे सर्वांत हीन व अनिष्ट प्रदर्शन म्हणजे आमच्या अनेक वृत्तपत्रीय लिखाणात पदोपदी, अनेक वर्षे दिसून येत असलेली हीन अभिरुची व आततायीपणा. स्वाभिमान-शून्यता जेवढा दुर्गुण तेवढाच दुसऱ्याशी वागताना, त्याच्याबद्दल बोलताना योग्य मर्यादा न पाळणे हा आहे; आणि रगेलपणा अगर कणखरपणा यांचे 'मारकेपणा' हे खास इष्ट स्वरूप नाही. आमची ही वैशिष्ट्ये इतिहासजन्य असतील. तसे असल्यास आमच्या इतिहासाचा व तो नवीन पिढीस शिकविण्याच्या पद्धतीचा आम्हांस फेर-अभ्यास केला पाहिजे. जपानी लोकांचा स्वाभिमान व कणखरपणा जगप्रसिद्ध आहेत; असे असूनही त्यांचा शिष्टाचार, त्यांच्या वर्तनातील अदब, त्यांच्या हरघडीच्या वागण्यात प्रतीत होत असलेले सौजन्य ही सर्व परस्थांना मोहित करतात, इतकी असामान्य आहेत. दक्षिण आफ्रिकेच्या सत्याग्रहात महात्मा गांधींनी जगाच्या प्रत्ययास आणलेले खरे लोकोत्तर गुण म्हणजे त्यांचे धैर्य व कणखरपणा.

आमचा अहंकार व रगेलपणा, एकमेकांशी तुसडे वर्तन, इतरांबद्दलची तुच्छतादर्शक वृत्ती, सामूहिक कारभारात पदोपदी अडणारा भांडखोरपणा अशा स्वरूपात आज दिसून येतात. या सर्वांमुळे आमची फार हानी होत आहे. यांमुळे समाजातील सर्व अंतर्गत कारभारात निष्कारण अडथळे उत्पन्न होतात; आणि इतर प्रदेशांतील लोक यांमुळेच, इच्छा असूनही, आम्हांस चाहू शकत नाहीत. याबाबत आमच्या समाजाच्या धुरीणांनी अंतर्मुख होण्याची फार मोठी आवश्यकता आज भासत आहे. असे झाले व आमची बुद्धी, कणखरपणा व त्यागाची तयारी यांच्या जोडीस आम्ही खरी लीनता, सहिष्णुता व सौजन्य संपादू शकलो, थोडक्यात 'सात्त्विक' ही पदवी पूर्ववत प्राप्त करून घेतली, तर भारताच्या व जगाच्या कारभारात मानाचे व मोलाचे स्थान आम्हांस साहजिकच मिळेल.

सरदार, गं. बा., संपादक, *महाराष्ट्र जीवन (परंपरा, प्रगति, समस्या)* (पुणे : जोशी, लोखंडे, १९६०) पृ० १-४८

☆

# ६ . . महाराष्ट्रातील विद्यापीठ शिक्षणाची पुनर्घटना

महाराष्ट्रातील विद्यापीठ शिक्षणाची पुनर्घटना करताना निरनिराळ्या विभागांसाठी तात्कालिक वेगवेगळे निर्णय घेऊन चालणार नाही. त्यासाठी राज्यव्यापी स्वरूपाची दीर्घ मुदतीची एक योजना आखली पाहिजे. अशा दीर्घ मुदतीच्या योजनेत राज्यातील भावी विद्यापीठांची संख्या, प्रत्येक विद्यापीठाला उपलब्ध असणारी आर्थिक वा अन्य साधनसामग्री, त्यांच्या घटना इत्यादी आवश्यक गोष्टींसंबंधीचे निश्चित निर्णय घेणे आवश्यक आहे. कोणत्या प्रकारची विद्यापीठे आपणास स्थापन करावयाची आहेत यावर हे निर्णय अवलंबून आहेत. गेल्या काही वर्षांत देशामध्ये झालेल्या विद्यापीठ शिक्षणाची उत्क्रांती ध्यानात घेता, भारतीयांच्या उच्च शिक्षणाच्या गरजा भागविण्यासाठी दोन प्रकारच्या प्रयत्नांची आवश्यकता आहे असे म्हणावे लागेल. एक तर खऱ्या अर्थाने विद्यापीठांचा किंवा पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या व जेथे अंशतः तरी संशोधन केले जाते अशा विद्यापीठ केंद्रांचा विकास. यात अर्थातच निरनिराळ्या प्रकारच्या विषयांच्या व अभ्यासक्रमांच्या केंद्रांचा समावेश आला. दुसरे म्हणजे शिक्षणाच्या सर्वांगीण वाढीस अनुसरून सर्व ग्रामीण व विद्यापीठ केंद्राबाहेरील नागर विभागांतून पदवी अभ्यासक्रम शिकविणाऱ्या एका प्रदेशातील महाविद्यालयांस संलग्न करून घेणाऱ्या विद्यापीठाची स्थापना. या दोन्ही प्रकारच्या विद्यापीठांच्या वाढीची पुढील योजना आखताना, शैक्षणिक, आर्थिक व इतर माहितीच्या आधारे काळजीपूर्वक विचार झाला पाहिजे. याकरिता येत्या वीस वर्षांत महाराष्ट्रात किती विद्यापीठ केंद्रांची वाढ होऊ शकेल हे ठरविले पाहिजे. त्यासाठी जरूर असणाऱ्या आर्थिक बाजूचाही विचार केला पाहिजे. तसेच विशिष्ट प्रादेशिक महाविद्यालयांचा व्याप किती राहील, वाढत असलेल्या दुय्यम शिक्षणाशी त्यांचे काय संबंध राहतील वगैरे संलग्न प्रश्नांचाही विचार आवश्यक आहे. या प्रकारे विचार केल्यावरच महाराष्ट्रात विद्यापीठ शिक्षणाचा विकास ठरविण्यासाठी योजना तयार करता येईल.

विद्यापीठ शिक्षण-विकास योजनेचे अंतिम स्वरूप ठरविण्यापूर्वी कोणत्या विद्यापीठ केंद्रांना महाविद्यालये संलग्न असावी या संबंधीचा निश्चित निर्णय होणे महत्त्वाचे ठरते. या प्रश्नाचा दोन्ही दृष्टींनी विचार करण्यासाठी भारतीय विद्यापीठांचा अनुभव उपलब्ध आहे. उदाहरणार्थ, उत्तर प्रदेशातील मुख्य विद्यापीठे प्रामुख्याने प्रत्यक्ष शिक्षण देणारी विद्यापीठ केंद्रेच आहेत. याउलट महाराष्ट्रात सर्व विद्यापीठांना शैक्षणिक व संलग्न अशा दोन्ही बाजू आहेत. गुजराथमधील वल्लभ विद्यानगर आणि बडोदे विद्यापीठ यांच्या स्थापनेने झालेले प्रयोगही ध्यानात घेण्यासारखे आहेत. आपल्या राज्यातील विद्यापीठ शिक्षण-विकास योजनेत जास्तीत जास्त विद्यापीठ केंद्रे काढावीत व अशा सर्व विद्यापीठांस व केंद्रांस फक्त शिक्षण व संशोधनाची बाजूच असावी असे माझे स्पष्ट मत आहे. म्हणजेच, भावी योजनेत राज्यभर पसरलेल्या निरनिराळ्या महाविद्यालयांना एकत्र जोडणाऱ्या संलग्न विद्यापीठांची

संख्या अतिशय लहान ठेवावी. याउलट मोठी शहरे किंवा विशिष्ट मर्यादित क्षेत्रासाठी मिळून एक अशी अनेक फक्त शिक्षण संशोधनात्मक विद्यापीठ केंद्रे असावी. विद्यापीठांची संख्या वाढविताना नुसती संमिश्र विद्यापीठे वाढविली आणि शैक्षणिक विद्यापीठ केंद्रांच्या विकासाकडे दुर्लक्ष केले तर ती अत्यंत अनिष्ट गोष्ट होईल हे सांगावयास नकोच.

पुणे विद्यापीठाच्या सध्याच्या क्षेत्राचे उदाहरण घेऊन माझे हे म्हणणे खालीलप्रमाणे माडता येईल. सध्याच्या पुणे विद्यापीठात उत्तर, मध्य, दक्षिण असे तीन भाग करून एक तर (अ) तीन संमिश्र विद्यापीठे (संमिश्र विद्यापीठ म्हणजे एक शैक्षणिक विद्यापीठ केंद्र व त्यास जोडलेले आजूबाजूचे संलग्न क्षेत्र) स्थापन करता येतील; किंवा (ब) पुणे शहरासाठी एक शैक्षणिक विद्यापीठ व पुणे विद्यापीठाच्या इतर संलग्न क्षेत्रांत दोन संलग्न विद्यापीठे स्थापन करता येतील; किंवा (क) पुणे शहरासाठी एक शैक्षणिक विद्यापीठ, इतर योग्य ठिकाणी एक किंवा दोन शैक्षणिक विद्यापीठे आणि बाकीच्या सर्व प्रदेशासाठी एक नुसते संलग्न विद्यापीठ. या निरनिराळ्या तीन पर्यायांच्या गुण-दोषांचे विस्तृत विवेचन मी येथे करीत नाही. स्वतंत्र व स्वायत्त अशी अनेक शैक्षणिक विद्यापीठे महाराष्ट्रात असावीत, त्यांवर संलग्नतेचा बोजा असू नये अशा मताचा मी आहे. व हाच उत्तम पर्याय म्हणून मी त्यांची शिफारस करीन. पश्चिम महाराष्ट्राची सध्याची परिस्थिती ध्यानात घेता पुणे विद्यापीठाशी असलेली संलग्नतेची बाजू शक्य तितक्या लवकर दूर झाली पाहिजे असे मला वाटते.

दक्षिण महाराष्ट्रातील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या विभागासाठी निव्वळ संलग्न विद्यापीठ असावे का कोल्हापूरला शैक्षणिक केंद्र ठेवून त्याचे स्वरूप संमिश्र विद्यापीठाचे ठेवावे, अशा तऱ्हेने मांडला आहे. पुणे विद्यापीठाच्या सध्या संलग्न प्रदेशाची ताबडतोब पुनर्रचना करण्याचा विचार संपूर्ण केल्याशिवाय केवळ दक्षिण महाराष्ट्रासाठी संलग्न विद्यापीठ ठेवण्याची भाषा बोलणे, अर्थहीन आहे. सर्व गोष्टींचा विचार ध्यानात घेऊन दक्षिण महाराष्ट्रात विद्यापीठ केंद्र काढावयाचे म्हणताच पहिला क्रम कोल्हापूरचा लागतो हे निर्विवाद आहे. परंतु या बाबतीत एका निराळ्या प्रकारे विचार करता येईल. तो म्हणजे कोल्हापूर ते मिरजपर्यन्तच्या भागात एक विद्यापीठ केंद्र चालू करण्याच्या दृष्टीने शक्यता अजमावणे, म्हणजे या भागातील सर्व शैक्षणिक चळवळी एकसूत्रीपणे चालवून हा सबंध विभाग हेच एक विद्यापीठ केंद्र करण्याच्या दृष्टीने योजना आखणे हा प्रयोग मुद्दाम करून पाहण्यासारखा आहे. त्यामुळे तेथे संशोधन-कार्यविषयक प्रगती घडून येण्याचीही शक्यता आहे. हे विद्यापीठ केंद्र विस्तृत संलग्न प्रदेशांशी जोडण्याचा प्रयत्न केल्यास मात्र सर्वच योजना ढासळण्याची शक्यता आहे. दक्षिण महाराष्ट्रासाठी संलग्न विद्यापीठ किंवा मिरज ते कोल्हापूर विभागासाठी एक विद्यापीठ केंद्र काढून पाहण्याचा प्रयोग यांपैकी निश्चित अशी काही तरी निवड केली पाहिजे. माझ्या स्वतःच्या मते यांतील दुसरा पर्याय शैक्षणिक व आर्थिक दृष्ट्या अधिक ग्राह्य आहे. हा स्वीकारल्यास पुणे विद्यापीठाच्या संलग्न विभागाचे काय करावयाचे याचा व्यापक विचार त्याबरोबरच करावा लागेल.

*केसरी*, ३-७-१९६२

☆

# ७ . . 'शिंदे लेखसंग्रह' [पुरस्कार]

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हे महाराष्ट्रातील गेल्या पिढीतील एक थोर पुरुष होऊन गेले. ते विद्वान व बहुश्रुत होते. समाजोद्धार व धर्मकार्य यांस अभेद्य मानून त्यांनी बहुतेक आयुष्य या क्षेत्रात सतत कार्य करण्यात वेचले. त्याबरोबर राष्ट्रीय चळवळींत महाराष्ट्रात एक नवीन आघाडी उभारण्यात त्यांनी पुढाकार घेतला. महाराष्ट्रातील ब्रिटिश राजवटीतील विद्वान, निःस्वार्थी व लोकहितरत पुढाऱ्यांच्या परंपरेत त्यांस निःसंशय बहुमानाचे स्थान आहे. हे खरे असले तरी त्यांच्या हयातीत त्यांच्या गुणांच्या व कार्याच्या मानाने एकंदर समाजावर त्यांची छाप पडली नाही, आणि आज तर त्यांचे बऱ्याच अंशी विस्मरण झालेले दिसते. त्यांच्या कार्याची व विचारांची नवीन पिढीस ओळख करून द्यावी व त्यांचा दृष्टिकोण व त्यांचे धोरण यांचे महत्त्व पटवावे हा प्रस्तुत प्रकाशनाचा मुख्य हेतू आहे. महाराष्ट्राच्या सद्यःस्थितीत हे कार्य फार महत्त्वाचे आहे असे मला वाटते.

## मूलग्राही विचार, संयत टीकापद्धती

आपल्या आयुष्यात कोणत्याच प्रचलित विचार अगर कार्यप्रवाहात कर्मवीर शिंदे पूर्णपणे समरस झालेले दिसत नाहीत. धर्मकार्यातील त्यांचे मूळ अधिष्ठान ब्राम्होसमाजाचे. महाराष्ट्रात ब्राम्होसमाज राहोच, पण त्याची विशिष्ट मराठी आवृत्ती प्रार्थनासमाज यासही कधी महत्त्व प्राप्त झाले नाही. कर्मवीर शिंदे चिकित्सक व व्यासंगी होते. इतिहास व भाषाशास्त्र या दोन्ही क्षेत्रांतील त्यांचे ज्ञान सखोल व विचार स्वतंत्र होते. आज त्यांचे या विषयांवरील लेख एकत्र छापल्यामुळे त्यांच्या विद्वत्तेची खोली व बुद्धीची चमक आपणांस कळून येते. परंतु प्रसंगोपात्त, वेळात वेळ काढून केलेले हे लेखन मधून मधून कोठेतरी प्रकाशित झाले असल्यामुळे एक नवीन दिशा सूचित करणे या पलीकडे त्याचे वजन पडले नाही. तसेच त्या वेळचे मान्यवर संशोधक व विचारांची रूढ दिशा यांबाबतचे बरेचसे लिखाण टीकात्मक असल्यामुळे त्याची उपेक्षा झाली हेही घडले असावे. आज त्यांचे मूलग्राही विचार, व्यापक दृष्टी व सडेतोड परंतु संयत टीकापद्धती यांचे कौतुक वाटते. त्यांच्या कार्याचा अस्पृश्यतानिवारण हा गाभा मानला पाहिजे. या कार्यात त्यांना भरीव यश प्राप्त झाले नाही, यात आज तरी आश्चर्य वाटावयास नको. त्यांच्या या कार्याच्या पूर्वार्धात स्पृश्य समाजाची फारशी सहानुभूती व मदत त्यांस मिळाली नाही. पुनरुज्जीवित सत्यशोधक समाजाची दृष्टी ब्राह्मणांवरील हल्ल्यांत केंद्रित झाली व महात्मा ज्योतिबांच्या कार्याच्या या दुसऱ्या बाजूकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. पुढील काळात स्पृश्यांची वृत्ती व त्यांच्या कार्याची गतिमानता यांबद्दल अधिकाधिक निराशा उत्पन्न झाल्यामुळे डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील अस्पृश्यांनी चढाऊ धोरण व स्वावलंबी मार्ग पत्करला, आणि शिंदे साहजिकच

बाजूला पडले. राजकारणातही तीच गत झाली. कर्मवीर शिंदे यांचा पिंड राजकारणी दिसत नाही. ते राजकारणात पडले ते कोणत्याही पक्षात अगर पक्षाकरिता नसून विशिष्ट विचारांच्या पुरस्कारार्थ. दारूबंदी, शेतकऱ्यांची दुरवस्था असल्या विषयांत ते नेहमीच लक्ष घालत होते. म्हणून गांधीयुगात समाजकारण, राजकारण व अर्थकारण हे जवळ येत आहेत असे दिसल्यामुळे त्यांचे लक्ष थोडेबहुत राजकारणाकडे गेले असावे. परंतु ब्राह्मणेतरांचा सवता सुभा ज्यायोगे होईल असे काही करू नये, असे म्हणाऱ्याला त्या वेळेस मान्यता न मिळणे साहजिक होते आणि जे तरुण त्यांच्या विचाराशी तत्त्वतः सहमत होते त्यांचा कल मार्क्सवादाकडे वळल्यामुळे श्री. शिंदे यांची व्यापक भूमिका त्यांस पटणे शक्य नव्हते.

## उद्‌बोधक चरित्र

हा तत्कालीन ऐतिहासिक घटनेचा विचार झाला. सद्यःस्थितीकडे पाहिले असता विठ्ठल रामजी शिंदे यांचे विचार व भूमिका यांचे महत्त्व टिकून आहे असे आढळून येते व त्यांचे चरित्र फार उद्‌बोधक ठरते. कर्मवीरांनी हाताळलेले बहुतेक वाद अजून शिल्लक आहेत. मराठी–कोंकणी, मराठी–कानडी, ब्राह्मण–ब्राह्मणेतर, स्पृश्यास्पृश्य, मराठे–मराठेतर या सर्व वादांचे सांप्रतचे स्वरूप काहीसे बदलले आहे. परंतु शिंदे यांनी याबाबत केलेले विवेचन इतके मूलभूत आहे की, ते आजही मार्गदर्शक ठरते. या सर्व लिखाणाचा विशेष हा आहे की, इतिहासाबद्दल लिहिताना ते कधी वर्तमान परिस्थिती विसरले नाहीत. आणि चालू वादांबद्दल लिहिताना वादांचे ऐतिहासिक स्वरूप व समाजाचे भवितव्य यांवर दृष्टी ठेवूनच त्यांनी विवरण केले. यामुळे त्यांच्या सर्वच लिखाणात सत्यान्वेषणावरील भराबरोबर कळकळ व तळमळ दिसून येतात. उदाहरणार्थ, 'भागवत धर्माचा विकास' या व्यापक व विस्तृत आढाव्यातील, 'विचित्र मायपोट' व 'ओदिया जगन्नाथ' हे परिच्छेद व्यापक ऐतिहासिक दृष्टी व सद्यःस्थितीचे मर्मभेदी वर्णन यांचा परिणामकारक भाषाशैलीत केलेला उत्कृष्ट संयोग म्हणून दाखविता येईल. परंतु तळमळ कितीही असली तरी श्री. शिंदे यांचा तोल कोठेही सुटला नाही व पूर्वग्रहाला, पक्षपाताला त्यांनी कोठे थारा येऊ दिला नाही. तत्कालीन परिस्थितीमुळे अनेकांवर टीका करणे श्री शिंदे यांस अपरिहार्य होते. ब्राह्मण समाज व ब्राह्मण लेखक यांचे दोष दाखविण्याखेरीज त्यांस गत्यंतर नव्हते. पण यांतही त्यांनी कटाक्षाने समतोल राखला, दोषदर्शनाबरोबर गुणग्रहणही केले.

## निराळी बैठक

महाराष्ट्रातील त्यांच्या पूर्वकालीन व समकालीन इतर समाजसुधारकांपेक्षा कर्मवीर शिंदे यांची बैठक बरीच निराळी होती. भारतीय तत्त्वज्ञान व वैचारिक परंपरा यांचा सखोल अभ्यास त्यांनी केला होता व या परंपरेवर कितीही टीका केली तरी तिजविषयी त्यांस निःसंशय आदर व ममत्व होते. 'कौल्किता हाच आत्मीय शिक्षणाचा पाया' या लहानशा प्रवचनातही त्यांची कळकळ, त्यांचे सूक्ष्म निरीक्षण व मूल्यांबाबतचा अभिनिवेश ही सर्व उत्कटपणे आढळतात, आणि त्यांस नवीन समाजाची निर्मिती करावयाची होती ती परंपरेचा गाभा व जिवंतपणा राखून सहेतुक करावयाची होती. यामुळे त्यांची भूमिका सत्यशोधक समाजाचे तत्कालीन पुढारी यांहून निराळी होती. एवढेच नव्हे तर आगरकरां-सारख्या 'बुद्धिवादी' समाजसुधारकांपेक्षाही फार भिन्न होती. "सर्व प्रकारच्या भावनामय चळवळी या आध्यात्मिक चळवळी असतात. आपण कोठूनही सुरुवात करा, शेवटी एकाच उगमापाशी पोहोचतो, आणि तो उगम म्हणजे आध्यात्मिक होय." हा त्यांचा मूळ सिद्धांत होता. योगायोग हा की, एका

दृष्टीने फार निराळे वाटणारे डॉ. आंबेडकर यांच्या आयुःक्रमाकडे पाहता त्यांच्या बाबतीतही हा सिद्धान्त तंतोतंत लागू पडला असे दिसते.

परंपरेचे जरी महत्त्व मानले तरी प्रचलित राजकीय व आर्थिक परिस्थितीचे कर्मवीर शिंदे यांचे ज्ञान तपशीलवार व मार्मिक होते व याबाबतची त्यांची मते 'जहाल' होती. शेतकरीवर्गाची व अस्पृश्यांची हीन स्थिती ही त्यांनी जवळून पाहिलेली होती, आणि म्हणून शेतकऱ्यांस "स्वतःची आर्थिक व सामाजिक ऊर्फ विधायक घटना करणे हाच आपला मुख्य उद्देश ठेवा आणि त्या कार्याला कोणाचीही वाट न पाहता आपल्या पायांवर उभे राहून वागा" असा त्यांनी उपदेश केला, आणि पूर्वीच्या समाजसुधारकांनी कितीही कळकळीने आणि स्वार्थत्यागपूर्वक काम केले असले तरी, "समाजस्थिति त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेली नाहीं अथवा तिचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनाहि घडलेला नाही. खरा सुधारक निघावयाचा तो सामान्य जनतेमधूनच निघावयाचा आहे." असा त्यांनी स्पष्ट अभिप्राय दिला.

## व्यापक भूमिका

निर्विकार मनन व चिंतन आणि विविध कार्यांतील अनुभव यांमुळे कर्मवीरांचे प्रगल्भ विचार आजही मार्गदर्शक ठरतात. मराठेतर या विषयक त्यांनी केलेले निरूपण सद्यःस्थितीत असेच महत्त्वाचे ठरते. बहुसंख्यांकांतील मतभेदावर लक्ष ठेवून त्यांत फूट पाडण्याचा प्रयत्न करणे हे अल्पसंख्यांकांच्याही अंतिम हिताचे नाही, हा त्यांचा इशारा अत्यंत मार्मिक आहे. फुटीचे राजकारण खेळणे कोणासच श्रेयस्कर नाही. सर्वांनी एकी साधण्याचाच प्रयत्न केला पाहिजे, आणि तीही शक्य तितक्या व्यापक भूमिकेवरून, हेच त्यांचे पदोपदी सांगणे आहे. एकी साधणे, सर्वांचा विश्वास संपादन करणे याची जबाबदारी जे श्रेष्ठ आहेत, सत्ताधारी आहेत त्यांजवर पडते, असे ते ठासून बजावीत. त्यांच्या वेळेस महाराष्ट्रात ब्राह्मणांचे सर्वांगीण वर्चस्व अजून पुष्कळ अंशाने टिकून होते. म्हणून महाराष्ट्राच्या उत्कर्षाचा मार्ग आखण्यात किंवा अस्पृश्यता निवारण्यात ब्राह्मणांवर मोठी जबाबदारी आहे, असे त्यांनी वारंवार प्रतिपादन केले. सुदैवाने आज परिस्थिती बदलली आहे आणि निदान ब्राह्मणांच्या बरोबरीने महाराष्ट्राच्या पुढारीपणाचे ओझे मराठ्यांवर पडले आहे. परंतु कर्मवीरांनी ब्राह्मणांस उपदेश केला तो सर्व परिस्थितींस लागू पडेल अशा भाषेतच केला. "आपल्या हातानें आपल्याजवळची सत्ता देऊन टाकणें हें प्रत्येक सत्ताधाऱ्याचें आद्य कर्तव्य आहे" ही एका तत्त्वज्ञाची युक्ती सांगून, "ब्राह्मणांनीं सर्व समाजाला, मराठ्यांनीं इतर ब्राह्मणेतरांस व अस्पृश्यांस आपल्याजवळचे सर्व अधिकार देऊन त्यांच्या हितार्थ झटावें यांतच महाराष्ट्राचें कल्याण आहे," असा बहुमोल चिरकालिक उपदेश केला.

## पायाभरणीचे कार्य

कर्मवीर शिंदे स्वतः खऱ्या अर्थाने कर्ते सुधारक होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी केलेले अस्पृश्यांविषयीचे कार्य आज सर्व अनुकूलता असूनही होणाऱ्या प्रगतीच्या मानाने उपेक्षणीय खास वाटत नाही. परंतु त्या कार्याचे स्वरूप पायाभरणीचे कार्य असे होते आणि त्याचा बोलबाला व उठाव त्यांचे शिष्य म्हणून स्वतःस मानणाऱ्या भाऊराव पाटलांच्या कार्याइतका होऊ शकला नाही. परंतु याबाबत असेही असावे की, कर्मवीर शिंदे यांचा पिंड कार्यकर्त्यापेक्षा मूलतः शास्त्रज्ञाचा, अभ्यासकाचाच होता. यामुळे पुणे विद्यापीठाच्या बोधवाक्याप्रमाणे "यः क्रियावान् स पंडितः" हे सिद्ध करण्यापुरते ते क्रियाशील झाले तरी विचाराने पंडितच राहिले. ते स्वतः एके ठिकाणी लिहितात, "अस्पृश्यतेचा छडा लावण्यांत—निवारण्याचा भाग तर राहू द्या—मला स्वतःला जो जन्मभर अनुभव

आला आणि आनंद झाला तो लक्षांत घेतां मला आणखी जन्म मिळाले तरी ते ह्याच शोधनांत आणि सेवाशुश्रूषेंत खर्चीन अशी उमेद वाटत आहे." पण इतर पंडितांपेक्षा ते निराळे होते. पंडितगिरीत आनंद वाटला तरी त्यांची मूळ प्रेरणा अध्यात्माची व हीनदीनांबद्दलच्या करुणेची होती. यामुळे त्यांच्या संशोधनात व लिखाणात वास्तविकपणा व जिवंतपणा हे दोन्ही गुण उत्कटत्वे आढळतात. सामान्य पंडित आणि त्यांच्यातील दुसरा ठळक फरक म्हणजे कोणत्याही अभिनिवेशाचा त्यांच्यात पूर्णपणे अभाव होता, हा होय. ते वारंवार सांगतात की अहंकार सोडा, भेद विसरा आणि काही शिकावयाचे असल्यास प्रथम पूर्वग्रह अजिबात टाकून द्या. हा त्यांनी केवळ उपदेश केला एवढे नव्हे तर त्याचे पालन आपल्या कार्यात व लेखनात कटाक्षाने केले. जुन्या परिभाषेत सांगावयाचे तर त्यांचा आदर्श भक्तिमार्गी योगी हा दिसतो आणि या आदर्शानुसार वर्तण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला.

गेल्या वीस वर्षांत महाराष्ट्रातील समाजकारण, अर्थकारण व राजकारण या सर्व क्षेत्रांत बरेच मोठे स्थित्यंतर घडले आहे. परिस्थितीत समाजकारणात व राजकारणात महाराष्ट्रातील मुख्य जमात मराठे यांचे महत्त्व पुष्कळ अंशी वाढले आहे. अर्थकारणात शेतकऱ्यांपैकी बरेच पुढारले आहेत. डॉ. आंबेडकर यांच्या अनुयायांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यामुळे एक मोठी क्रांती घडली. परंतु मूलतः परिस्थिती बहुतांशी होती तशीच आहे. जातिविचाराचे महत्त्व व समाजाची त्रिविध विभागणी कायम टिकून आहे. बहुसंख्य शेतकरी आणि अस्पृश्य समाज यांची दरिद्रावस्था संपलेली नाही. कर्मवीर शिंद्यांचे चरित्र व विचार यांच्या शिकवणीची महाराष्ट्रात अजून तीव्रतेने गरज आहे. या ग्रंथाच्या प्रकाशनामुळे या शिकवणीचा प्रसार होऊन महाराष्ट्र सर्वांगीण उत्कर्षाच्या मार्गास लागो एवढीच इच्छा.

मंगुडकर, मा. प., संपादक, *शिंदे लेखसंग्रह*, (पुणे : ठोकळ प्रकाशन, १९६३) पृ० ७–१०

☆

# सूची


अकोला करार : ४९, ५२
अन्नधान्य चौकशी समिती : २२१
अन्नधान्य : पुरवठा ११७–१२१, २१२
समस्या : १२२, २१५ (पाहा : धान्य)
ॲबरक्रोंबी रिपोर्ट : ३९
अमेरिका : १०१, ११३, २६५, २७०–७१
अर्थव्यवस्था : १४४, २७०, २८१, २८९
नियोजित : १४४, १४७, १९८
प्रादेशिक : ९१, १३१
अर्थव्यवहार : १३६, १३८, १४२–४४, १४७, १५९–६०, १६५, १७४–७५, २५१, २७८, २८२, २८८–८९
अस्पृश्य (श्य) : २२, २४७, २८४–८५, २९०, २९४, २९६–९७
अस्पृश्यता निवारण : २८५, २९४, २९६
अहिंसा : २७८, २८०–८१, २८९–९०

आंतरराज्य पाणीवाटप वाद : ११५–१६
आंबेडकर, डॉ. : ५१, २७७, २८४, २९४, २९६–९७
आगरकर : २९०, २९५
आर्थिक केंद्रीकरण : १२६, १३७, २८२
आर्थिक विकास : ११०, १२६, १३७, १४३, १५९, १७३, १७५, १८२, २६६
आलुते-बलुते : ७४, ७५, २१४, २५७

इंग्लंड : १०३, १४२–४३, १४५, १८३, १८६, २७०, २८६
इरिगेशन कमिशन : १२६
इस्लाम : २७१–७४, २७७

उत्पादन : १४४, १५३, १६१, १७३, २०९
औद्योगिक : १८३, १९९, २६६–६७
कृषी (शेती) : ८७, ९१, १०८–१०, १२६–२७, १५१, १५८, १७४, १७८, १९९, २०९, २१२, २५२ २६६–६७
तंत्र : १४६, २७०
साधने : १०८, १५९, २८२

ऋणविमोचन कायदा : १९२–९३, १९५–९६

औद्योगिक केंद्रे : ४२, ४८
औद्योगिक क्रांती : १७८, १८३, २६५–६६, २७९
औद्योगिक मंडळ : २०८–१०
औद्योगिक विकास : १०४, १५८, २६६

कम्युनिझम : २७७–७८, २८१
कम्युनिटी डेव्हलपमेंट : १७०
कम्युनिस्ट : १७०, २७२–७३, २८०
कर : ५५, ५६, १३९
कर्ज : ६९, १९१–९२, १९६, २०८, २११, २१४, २१६, २२९
पीक : १७३, १९६–९७, २००, २०९, २१२–१३, २१८, २२६, २२९
पुरवठा : २१३, २३०–३३

वाटप : २१५, २२७, २३२
कर्नाटक : ३२, ३३, १३४, १४८
कर्वे, अण्णासाहेब : २४६
कायमधारा पद्धती : ६६, ६७
कुणबी : २४८, २५३, २५८, २८७
कूळ कायदा : ६६, ११०, १५२–५३
कृष्णा–गोदावरी पाणीवाटप : १११–१६
केंद्रीकरण : ४५, १४१, १४६, २५०
अर्थव्यवहाराचे : १८६
सत्तेचे : २५०–५१
केतकर, डॉ. : २८६
कोकण : २७, ३१, ५०, ६९, ७०, १३५–३६, १५३, १८२–८७, २१०

खंड : ५५, ५६, ६९
अँडरसनचे खंडाचे तत्व : ६४
खरेदी–विक्री संघ : १९२, १९९
खानेसुमारी : ३, ६–११, १३–१९, ३२

गलिच्छ वस्त्या : ९४–९८, १०३–०४, १५०
गांधी : १६७, २७५, २७७–७९, २८९–९०
गुजरात : ३१–३३, १४८, २८६, २९२
गुजराती : ४८, १३३–३४, २८६
गुल्हाटी कमिशन : १११–१५
गोखले, नामदार : ५१, २९०
ग्रामदान : २८२–८३
ग्राम पुनरुज्जीवन : ९०
ग्रामव्यवस्था, स्वयंपूर्ण : २८८–८९
ग्रामीण अर्थव्यवस्था : ९१, २५८
ग्रामीण विकास : ८९, ९२
ग्रामीण पत-पाहणी : २२६, २२९
ग्रामोद्योग : १४६, १५८–५९

घटना समिती : २५, २९–३०
घोड-खोरे : १३६, १५४

चलन-शुद्धी : ७२, ७३, ७६

चीन : १५३, २६१, २६६, २७१–७३, २८०–८१

जंगल : १५४, १५६–५७, १७६, १८७
कामगार संस्था : २१०, २१४
वाढ : १७२, १७४
जपान : २६६, २७०–७२, २७४, २९१
जमाबंदी : ५५–५७
जमिनीच्या कमाल धारणेचे विधेयक : १०७–०८
जमीनदारी : ५६, ७०, १५०, २७४
जमीनधारणा : १०९–१०
जमीन महसूल : ६२, ६७, ६९
जाति संस्था : २४९–५०, २६३, २८६
जिल्हा परिषद : १२४, १६२–६५, १७४, १७६–७७, १८०, १८४, २०६–०७, २३१
जैन : १७, २६१, २७४–७५, २७७–७८, २८२, २८६
जोशी समिती : १४९–५०
ज्वारी खरेदी योजना : ११८, १२२–२५, २१५, २२१-२५

झा समिती : ११७-१८

टिळक, लोकमान्य : ५१, ७७, १६२–६३, १६७, २७५–७८, २९०

डेक्कन ॲग्रिकल्चरल असोसिएशन ९०, ९१, १११

तेजी–मंदी : ७९, ८६, ८७, १४९

थकबाकी : २१३–१४, २१८

दंगा (१८७५ चा) : ५७
दार कमिशन : ४९
दुग्धव्यवसाय : १५७, २१४, २२६
दुष्काळ : ८–१०, ५७, ६२, १२०
निवारण समिती : १३६, १५४
द्वैभाषिक : ८९, १५५

धरण योजना : १२७–२८, १३५
धान्य : किमती २२, ५७, ७३, ११९, १२१, २२२
खरेदी : ७३–७६, १२०, १२४, २२२, २२५
भावनियंत्रण : ७३, ७६–७७
भाववाढ : ७९, ८१, ८८
वाटप : ७५, ७६, ८१, ८३–८५, २२२, २२४
साठा : ७३, १२०, १२४, २२२
साठेबाजी : ११९, १२१

नगर : ११–१३, ५०, ११४
रचनाशास्त्र : १०२, १०४
नदीमंडळे : ११२, ११६
नागपूर : ५०, १७२, २३१
करार : ४९–५०, ५२
नागर उद्योगधंदे : १५८, २८२, २८७
नागर केंद्रे : १४२, १८६
नानावटी समिती : १९१, १९४–९५
नियंत्रण : १३९, १४४–४५, १४७–४९, १५२, १५४, १६८, १७३, २०१
नियोजन : १३५–३९, १४५–४७, १५१–५२, १५४, १६०, १६५, १६९–७०, १७२–७३, १७५, १९९, २०२
आर्थिक : ९१, १४८, १६६, २०२
मंडळ : ९१, १०८, १५४, १६४, १७१, १८२, १८४
विकेंद्रित : १५४–५५, १६५
समाजवादी : १४८, १५०, १५३–५५
निसर्गसंपत्ती (साधने) : १७३–७४, २६६
संरक्षण : १५९, १७२, १८३
संरक्षण व संवर्धन : १६०, १७५
नेतृत्व, स्थानिक : १६७–६८, २२५

पंचवार्षिक योजना : १५६, १७०, १८४
दुसरी : १३६–३८, १४०, १४३, १८६
पंचायत समिती : १६४–६५, १७५-७८, २०७
पंचायती राज्य : १६५–६६
पड जमीन : १५६–५७
पत : १९६–९७, २१७
व्यवहार : २११, २१९
पतपेढ्या : २२६
प्राथमिक : १९१–९२, २२७
पत-मंडळ, कृषि : २२७
पशुपालन : १५७, १५९, १७४-
पाटबंधारे : १११, १७३, १७५
योजना : ११३, १७३
पाटील, भाऊराव : २४६, २९६
पाणीपुरवठा : १२८, १७३–७४
नियमन : १२६, १२८
पाणीवाटप : ११४, ११६, १२७–२८
पानशेत प्रलय : १०१–१०६
पुणे : ३४, ३५, ६०, ७७, ८१, १०२–०५, १४३, १९३, २४१, २९३
घरांची टंचाई : ९४–९७
पूरग्रस्त पुनर्वसन : १०१–०३, १७१
पोट-राष्ट्र : ३, ४
प्रक्रिया : उद्योग १५८
शेतीमाल : १५८, २०५, २२६
संस्था : २२७, २३३
प्रवरा (लोणी) सहकारी साखर कारखाना : १२८, १५३, २०३–०४
प्रांत (राज्य) : धान्यतुटीचे ७३, ७४, ७६, ८०, ८८, १२०, १२२
धान्य शिलकीचे : ७३, ७६

फॅमिन कमिशन : ६२–६३
फॅमिन रिलिफ कोड : ६२–६३
फायनान्स कमिशन : ५१, ११४–१५
फुले, ज्योतिबा : ५१, २४७, २८५, २९०, २९४

बँक (बँका) : १४६, १६०, १९५, २२६
जिल्हा : १४६, १९५, २०८, २१४–१५, २१७, २२९–३१

जिल्हा मध्यवर्ती : २१३, २२३, २३२–३३
जिल्हा सहकारी : १२४, २३०
नागरी : २१७, २३०
प्रांतिक : १९५–९६
प्राथमिक मॉर्टगेज : १९२
भूविकास : २१०, २१९, २३३
राज्य : २०८, २११ २१४–१५, २१७, २१९ २२९–३०
राज्य सहकारी : २०९, २१७, २३०–३१
रिझर्व : १४६, २०८–११, २१४, २१६–१९, २२६–२७, २२९–३०, २३२
बलवंतराय मेहता समिती (कमिटी) : १७१, १७७, २०७–०८
बलुतेदार : ७४, २३३
बांधबंदिस्ती : १७२, १७४
बागायतदार : १४९, १५९, २१५
बृहन्महाराष्ट्र : ३–१८ (पाहा : महाराष्ट्र)
बेकारी : ८७, १४३, १८६
बौद्ध : २६१, २७४–७५, २८४
धर्म : २६१, २७७, २९७
नव : १५५, २८४–८५
ब्राह्मण : २६, ५०, २४७–५३, २७७, २८७–८८, २९५–९६
ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद : १५५, २८४
ब्राह्मणेतर : ७०, २४९, २५१, २५३, २८४, २९५
चळवळ : ५१, २४७, २८५, २८७
ब्रिटिश : ५५, ८४, १२०–२१ १३१, १६७, १७०–७१ १८३, २६७–६८
राजवट : १६६, १७०, २९४

भांडवलदार : १४५, १४८–५१, १५३, २०१, २९०
भांडवलशाही : १२४, २७७, २८१,
भारतीय संस्कृती : २६०–६१, २८१
भाषावार प्रांत (राज्य) रचना : २६, ३०, १६२–६३, २४०
भूदान : २८२
भूमिहीन : १०८, १७५
संघटना : १६०–६१

मंदी : ६९, ७०, ८६–८८, २००
मजूर : ७४, ७५, १४२, १७३, २४७, २६७, २८७
शेत : २१४, २३३
संघटना : १६०, १७५, २७४
मराठवाडा : २७, ५०, १३५–३६, १५३, २१०, २१७
मराठी : प्रदेश १४९–५०, १५३
भाषक (भाषीय) : ३१, ३२, ४९, १३३–३४, १४८, २८६–८७
भाषा : ३१, ४७, २८६
समाज : ५२, १४३, १४८, १५०, १५५, २४८, २५७–५८
मराठे : १४, १५, २६, ५०, ५२, १५५, २४६–४८, २५२–५३, २८५, २८७–८८, २९६–९७
महार : २६, ५०, १५५, २४७–४८, २५३, २५७–५८, २८४
महाराष्ट्र : २७, ४५, ४६, ८९–९१, १०७, ११०, ११५, ११७, १२०, १२३, १२७–२८, १३३, १३५, १३७, १४१, १५१, १६८, १७१, १८४, १९७, २०६, २०९, २११, २१५, २२२, २२५, २३२, २४०–४१, २४७–५२, २६०, २६४, २८१, २८३, २८५–८७, २८९, २९१–९४, २९६–९७
संयुक्त : २०, २४, २७, २८, १४८–१५५, २८७
समाज : १६५, २५९, २८३, २८५, २८७
सरकार : १०७, ११०–११, ११८, १२०–२३, १२७
(पाहा : बृहन्महाराष्ट्र)
महाराष्ट्रीय : ४२, ४४, ४६, ४८, १४२, १५०, २६१, २६४, २८६–८७
महाराष्ट्रीयेतर : ४४–४६, ४८

महाविदर्भ : ४९, ५०
मार्क्सवाद : १३८, २७३, २७९, २९५
मुंबई : ९, ११, १४, १५, २९, ३१–४९, ६०, ८२, ९०, १०४–०५, १२३, १४१–४२, १५१, १५३–५४, १७१, १७४, १७६, १८५–८७, २०७, २१९, २३१, २८६
मुंबई प्रांत (इलाखा) : ५५–५६, ५९, ७२–७४, ७६, ९०, १९५–९६, १९८, २५५
राज्य : ८२, ८८, १३७, १४९, २२९
सरकार : ५७, ६२, ६३, ६६, १४०, १४२, १५०, २०४
मुंबई युनिव्हर्सिटी रिफॉर्म कमिटी : २४१
मुसलमान : १७, २७२–७३, २७७, २८५, २९०

युनिव्हर्सिटी : २३७–४५
युरोप : २६१, २६५
युरोपीय संस्कृती : २६५–६७, २८१

रयतवारी पद्धती : ५६, ५७, ६९
रशिया : १०१, १५४, १६५, १७०, २७०, २७२
राज्यघटना : २०, २१, ३०, ३१, ४९, ११५–१६, १८२, २६७
रानडे, न्यायमूर्ती : ५१, १३१, २९०
रॉय, राजा राममोहन : २६८, २७६, २७८
रॉयल कमिशन : ३८–४१
राष्ट्रसभा समिती (महाराष्ट्र प्रांतिक) : ६८, ७१
राष्ट्रीय सभा : ६८, ७०, १६२
राष्ट्रीयीकरण : २०१–०२, २५२
आर्थिक व्यवहाराचे–२५२
राहणीमान : ८१, ८४–८६, १९९
रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटी : २०७
रोजगार : १४२, १५९, १६१, १७४–७५

लंडन : ३८–४१, १४२, १७०, १८६
लेव्ही : २२१, २२५

लोकशाही : १३२, १४१, १४५–४६, १४८, १५०–५१, १५४, १६२–६३, १६५, १६७, १७८, १८१, २४७, २५४, २६२, २७४, २७७
लोकशाही अर्थव्यवस्था : १४६
लोकशाही विकेंद्रीकरण : १७३, १७९, १८१
लोकशाही समाज : १०६, १६८, १८४
लोकशिक्षण : १५२–५३, २८०
लोकसंख्या : ३७, ५२, ११४, १२०, १४१–४२, १८४, १८६, २५८
नागर : १०–१३, ८७, १०४
वाढ : ८–१०, ४१, ९६

वतनदारी : २५६, २८८
वतनपद्धती : २५९
वर्धा जिल्हा विकास योजना : १५६–६१
विकास योजना : १३५–३६, १३९, १४२, १४६, १५६, १५८–६१, १६४–६५, १७०–७३, १७६, १७८ १८२, १८४
जिल्हा : १७१, १७४–७६, १८४–८५
प्रादेशिक : १८४–८५
स्थानिक : १६४–६५, १७४
विकेंद्रीकरण : ४२,१३८,१४०–४३, १४५–४६,१६६–६८, १७१, १८०, १८५–८७ २२५, २३१, २७८
अर्थव्यवहाराचे : १८६
सत्तेचे : १६५, १६७
विदर्भ : १३५–३६, १५३–५४, १७४, १७६, २१७
विद्यापीठ : १६३, २९२–९३
पुणे : २१०, २९३, २९६
विनोबा : १३३, २७४–७८, २८२
वीज निर्मिती : १११, ११३, ११५, १८३
वीज पुरवठा : ६०, १७३–७४
व्यापार : खुला : ७३, १२२, १३१, १९९

शिंदे, कर्मवीर विठ्ठल रामजी : २९४–९७
शिवाजीमहाराज : ३१, १४३

शिक्षण : १७, १८, १५९–६०, १६६, १७३–७४, १८३, २४३–४४
शेतकरी : ५७, ७२, ९२, १०७, १२०–२१, १२३, १२७, १४०, १४६–४७, १५०–५१, १७३, १९१–९२, १९४–९५, १९९–२०२, २१२, २३०, २४७, २५२, २५५–५९, २८५–८७, २९६–९७
ऊस : २०३–०४
कमिशन : ६२
छोटे : १६०, १७३, २०९, २१४, २३३
संघटना : ७०, ९२, १६१
शेतकी समिती : ६८, ७०, ७१
शेतमालाच्या किमती : १९८, २०१, २१२, २२२
शेतसारा : ५५, ५८, ६३–६६
शेती : ८९, ९१,९२, १०८, १२६–२७, १४३, १५०, १५९, १६६, १७४, १९९, २०४, २१०, २५८, २८८
उत्पन्न : १०७, १०९, १५२, १९७
विकास : १७४, २१०
सहकारी : १०९–१०, १५०, १५२, १६०

संघराज्य : २५–२७, ३३, ३५, ३६, ४६, ४८, ५०, ५१, ११४, १६३, १८४
घटना : २४, २५, ३५, ११४
सरकार : ३५, ३६
हिंदी : २९, ३०, ३२, ४५
संन्यास मार्ग : २७५–७६
संपत्ती : १०८, १३९–४०, १४२, २५२, २८१–८२
सट्टेबाजी : ८६, ८७, ११८, १४९
सत्यशोधक समाज : ५१, २९४–९५
समाजवाद : १०८, १३८, १४८, १५०–५२
समाजशास्त्र : १४०, २८०
सरकार, एकावयवी : २४, २५
सरैय्या समिती : १९४, १९८, २०१
सहकार : १२४–२५, १३८, १४०, १४७, १६६, १७३, १९९
सहकारी अर्थव्यवस्था : २२६–२७, २२९, २७८
सहकारी अर्थव्यवहार : २८१, २८८
सहकारी कायदा : १९२
सहकारी कारखाने : १४०, १८७, २१५
सहकारी कृषि (शेती) संस्था : १०९, २१४
सहकारी खरेदी–विक्री : १२२, १९८, २१०
सहकारी खरेदी–विक्री संस्था : १२४, २१२, २२३, २२६
सहकारी चळवळ : १९१, १९३–९४, १९६, १९८–९९, २२६, २३१ २८८
सहकारी पतयंत्रणा : २२६, २३०–३२
सहकारी पतपेढ्या : १९२–९३
सहकारी प्रक्रिया संस्था : २२०, २२६
सहकारी बँक : १२४, १९५, २०६–१०, २१२, २१५, २१७, २२९, २३२
सहकारी मार्केटिंग सोसायटी : १२४, २१५, २२२
सहकारी लोकराज्य : १२४, २०५, २२७
सहकारी संघटना : ९२, १२५, १७४, २२७
सहकारी संस्था : १२४, १५२, १५४, १७९–८०, १८४, १९२–९४, १९६, १९८–२०२, २०४–०५, २०८, २१४, २१८, २२१, २२४, २३३
सहकारी साखर कारखाने : १४०, १५१, १७३, १८०, २०३, २२०, २२६, २३२–३३
सार्वजनिक सभा : ५७, ६३
सावकार : ६५, ६६, ६९, १९५, १९७, १९९, २५७
सावकारी नियंत्रण कायदा : १९३, १९५
सावकारी व्यवहार : १९४, १९७, २००, २८६
सेटलमेंट रिपोर्ट (तालुका) : ५६, ५७
स्वराज्य : १६२–६३, १६६–६७
स्वस्त धान्य दुकान : ११८, १२२–२३, २२१–२२, २२४